# १

## कुलवृत्तांत व बालपण

ज्याप्रमाणे उत्तर भारतामधे पवित्र गंगा नदीच्या काठी अनेक तीर्थक्षेत्रे उदयास आली व तेथील ऋषी, मुनी, संत महात्म्यांनी भारतीय सांस्कृतिक इतिहास जोपासला व जतन केला, त्याचप्रमाणे दक्षिण भारतामधे कृष्णा नदीच्या काठी अनेक तीर्थक्षेत्रे उदयास आली, तसेच अनेक राजकीय नेतेही उदयास आले. वाईचे किसन वीर, कराडचे यशवंतराव चव्हाण, पद्‌माळेचे वसंतदादा पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील व वाळव्याचे नागनाथ अण्णा नायकवडी ही मंडळी म्हणजे कृष्णा नदीच्या काठावरील सुपीक जमीनीत तयार झालेले थोर नेते होत. कृष्णा नदीचा पारदर्शीपणा, संथपणा, विशालता व सर्वांशी समानता या सर्व गुणांचे दर्शन कृष्णा नदीच्या लोकनेत्यांमधे दिसून येते.

वाळव्याचे नागनाथ नायकवडी अशाच असामान्य लोकनेत्यांपैकी एक आहेत. त्यांचे पूर्वज मराठवाड्यामधील मुंगी पैठणमधे राहात होते. ३२ एकर जमिनीचे वतनदार होते. त्यांनी मुसलमानांच्या विरुध्द युध्दात भाग घेऊन सात शत्रूंना कंठस्नान घातले होते. म्हणून त्यांना मुंगी पैठण सोडून सातारा इलाख्यामधील सुरक्षित अशा कराड गावी यावे लागले. तेथेही त्यांनी सुमारे ३० एकराची जमीन वतन म्हणून मिळविली होती. पण तेथेही स्थिरस्थावर न झाल्यामुळे वारणा काठच्या येलूर या गावी येऊन त्यांनी पाटीलकी मिळवली. त्यांना बोगर पाटील असे संबोधले जात होते. हे काम करीत असताना त्यांचे हाताखाली काम करणाऱ्या कुलकर्णी तलाठ्याशी भांडण झाले व ते भांडण विकोपास गेल्यामुळे कुलकर्णीला एक पाय गमवावा लागला होता. यानंतर येलूरमधील दोन भावांपैकी एक वाळव्यास येऊन स्थायिक झाले.

वाळव्याच्या नायकवडी घराण्याचे मूळ पुरुष रायाजी. त्यांना येसाजी व कुशाजी असे



दोन पुत्र होते. येसाजी येलूरमधे राहिला व कुशाजी वाळव्यास आले. त्यांचा पुत्र आप्पाजी व आप्पाजीचा पुत्र बाळू, बाळूस पाच पुत्र होते पिराजी, शिवाजी, जोती, केदारी, लिंबाजी. या पैकी पिराजीस नारायण, नारायणास जोती, जोतीस गणपती व गणपतीस कृष्णा, रामचंद्र, चंद्रोजी (निवृत्ती) व ईश्वरा असे चार पुत्र होते. पैकी कृष्णा चुलत्यास दत्तक गेले, ईश्वरा उर्फ यशवंत निपुत्रिक होते, मधले चुलते चंद्रोजी (निवृत्ती) प्लेगामधे वारले व रामचंद्र हे चरित्रनायक नागनाथ नायकवडी यांचे वडील होत. त्यांचे आईचे नांव लक्ष्मीबाई नागनाथ अण्णा यांचे दोन वडीलबंधू अकाली वारल्यामुळे नवससायास केल्यानंतर नागनाथ यांचा जन्म १५ जुलै १९२२ रोजी वाळवा येथे रामचंद्र नायकवडी यांच्या सामान्य शेतकरी कुटुंबात झाला.

लक्ष्मीबाईची पहिली दोन मुले लहानपणीच वारल्यामुळे मारुतीचे देवळाजवळ दगडावर कोरलेल्या नागाच्या मूर्तीची त्या दररोज पूजा करीत असत. त्यांनी होणाऱ्या मुलाचे संरक्षण करण्यासाठी नागदेवास नवस केला. त्यानंतर मुलगा झाला. त्याचे नाव ठेवावयाचे याची चर्चा बारशाचे वेळी झाली. त्यावर लक्ष्मीबाईंनी नागदेवाचा प्रसाद मिळाला म्हणून मुलाचे नाव नागनाथ असे ठेवले. तेच चरित्रनायक नागनाथ नायकवडी म्हणून प्रसिध्दी पावले.

भगवान श्री. विष्णू यांना आवडते कमळ, ते चिखलातच का उगवते? मौल्यवान हिरा कोळशाच्या खाणीतच का सांपडतो? बहिष्कृत केलेल्या गरीब कुटुंबातच ज्ञानेश्वरांचा जन्म का होतो? भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म मागासवर्गीय कुटुंबातच का होतो? बहुजन समाजाला सुशिक्षित करण्यासाठी डोळस दृष्टी ठेवून प्रयत्न करणारे जोतिराव फुले एका गरीब माळी कुटुंबातच का जन्मावेत? या सर्व घटनांवरुन असे दिसून येईल की दुर्लक्षिलेल्या समाजाकडे आणि उपेक्षित समाज बांधवांकडे सर्व जगाचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि समाजाचा उध्दार करण्यासाठीच त्या लोकोत्तर समाजपुरूषांचा जन्म नियतीने सर्वसामान्य कुटुंबातच घातला होता. सर्वसामान्यांचे जीवन स्वाभिमानी व स्वावलंबी करण्यासाठी धार्मिक, सामाजिक व राजकीय हक्काची जाणीव करून देण्यासाठी या महापुरुषांनी आपलं सर्व जीवन समाजाला अर्पण केले होते. व इतरांनी त्याचे अनुकरण करावे अशी चैतन्यदायी प्रेरणा दिली होती. हा वारसा घेऊन काहींनी धार्मिक क्षेत्रात, तर काहींनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात अजरामर अशी जनहिताची कामे करीत आपले जीवन सार्थकी लावले. असे जीवन नागनाथ अण्णा यांना नियतीने दिले असा इतिहास पहावयास मिळत आहे.

आपल्या बालपणाबद्दल अण्णा म्हणतात. ''आज मी जो आहे, जसा आहे, त्याची सुरवात घरातूनच झाली आहे. मी शेतकरी कुटुंबातला, घरची मध्यम शेती, वडील शेतीत रात्रंदिवस काबाडकष्ट करणारे, काळ्या मातीत राबणारे अंगठे बहाद्दर. त्यांना आम्ही बापू म्हणायचो. सारे त्यांना त्याच नांवाने बोलवावयाचे, माझ्या आधीचे दोन भाऊ वारले. आई–वडिलांनी नवस केले होते. म्हणून माझे नाव नागनाथ ठेवले.''

नागनाथ अण्णांना आदर्श जीवनाचे धडे घरातच मिळाले. अण्णांचे वडील बापू त्यांना म्हणायचे 'कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावर पाय द्यायचा नाही, आणि कुणाच्या सुतळीच्या तोड्याची अपेक्षा करावयाची नाही.' अशा संस्कारात वाढलेल्या अण्णांचे आई–वडील शाकाहारी

होते, वारकरी होते. साहजिकच अण्णांच्यावर शाकाहाराचा संस्कार झाला. तो आजही त्यांनी पाळला आहे. थोडं कळायला लागल्यावर अण्णांना वाळवा येथील प्राथमिक शाळेत घातले. सशक्त शरीराचे अण्णा शाळा करत करत घरात पाणी भरायला आईला मदत करीत असत. वडील लोकसंग्रही असल्यामुळे गावकरी माणसांचा घरात नेहमी राबता असायचा. तसेच घरात गुरांचाही परगाना होता. त्यासाठी पाणी भरायचे, शेतात जायचे त्यामुळे कष्टाची भाषा त्यांना बालपणीच कळाली होती. आईचे वडील मिलिटरीत होते. त्यांच्याबरोबर आईंनी भारतातील आधुनिक जग पाहिले होते. काही काळ कलकत्यासारख्या मोठ्या शहरातील राहणीमान त्यांनी पाहिले होते. त्यामुळे आपला मुलगा शिकून मोठा व्हावा अशी इच्छा आईची होती. आई म्हणायची, ''मुलाने शिकले पाहिजे.'' शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळले होते. पण वडिलाना शिक्षणाबरोबर कुस्तीत नाव मिळवावे असे वाटायचे अशा द्विधा मनस्थितीच्या कात्रीमधे अण्णांचे बालपण गेले. त्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण ओढाताणीतच झाले. ते म्हणतात ''पहिली, दुसरी, तिसरीत मी नापास झालो होतो पण मला वरच्या वर्गात घातले गेले होते. माझा गणित विषय चांगला होता. वर्गात मास्तर सारखे नाव काढायचे. फक्त अपूर्णांकाचं गणित तेवढं जमायचं नाही.'' प्राथमिक शाळेत असताना अण्णांचा पोषाख म्हणजे पांढरा पटका, धोतर व पांढरी पैरण असा होता. मराठी प्राथमिक शाळेत त्यांचे सहकारी वर्गमित्र शंकर माळी, तातोबा वाजे, सखाराम घोरपडे, यशवंत पेठकर व बंडा गायकवाड असे होते. पैकी बंडा गायकवाड जिवलग मित्र होते. ते चांभार समाजापैकी होते. अण्णांचे घरी अस्पृश्यता पाळत नसत. त्यामुळे अनेक वेळा अण्णांबरोबर बंडा गायकवाड अण्णांचे घरी जेवण्यास व राहण्यास येत असत. प्राथमिक शाळेत अण्णांचे शिक्षक येडेनिपाणीचे पांडू मास्तर होते. वाळव्याच्या नं. १ च्या प्राथमिक शाळेत इयत्ता १ ते ६ वी पर्यंतचे अण्णांनी शिक्षण घेतले.

अण्णा बालपणाची आठवण सांगताना क्रांतिसिंह नाना पाटील यांची पहिली ओळख कशी झाली त्याचे वर्णन करताना म्हणाले की, ''गावात चौकातल्या कट्ट्यावरनं एक घोषणा कानावर यायची, मग मी धावत चौकात जायचो, भारत माता की जय! शिवाजी महाराज की जय! अशी शड्डू ठोकून घोषणा देणारे क्रांतिसिंह नाना पाटील असायचे. ते माझ्या हातात तिरंगा झेंडा द्यायचे. तो घेऊन मी सभेत पुढे बसायचो, नाना पाटील खूप छोट्या छोटया गोष्टीतून स्वातंत्र्याचं, एकीचं महत्त्व सांगायचे'' अशा प्रसंगामुळे बालपणीच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाची आकर्षक छाप अण्णांच्या मनावर कायमची कोरली जात होती. अण्णा क्रांतिसिंहांच्या पावलावर पाऊल ठेवून क्रांतिवीर का व कसे झाले याचे बीज बालपणातील या प्रसंगात पेरले गेले होते.

अण्णांना ७ वीच्या शिक्षणाकरिता आष्ट्याच्या प्राथमिक शाळेत घातले. तिथे शिराळ्याचे श्री. हणमंत गणेश नवांगुळ हे त्यांचे वर्ग शिक्षक होते. ते खादी वापरायचे. त्यामुळे अण्णांना खादीचे महत्त्व व खादीचे कपडे वापरण्यामागची राष्ट्रीय भूमिका कळाली होती व त्याबद्दलचे आकर्षणही वाढले होते. आष्टा येथील शाळेमधे सुसंस्कारीत घरातील श्री. सा. बा. सनदे हे वर्गमित्र होते. अण्णा आष्टा प्राथमिक शाळेतून १९३९-४० साली सातवी पास झाले व अनेक



अडथळे पार करुन माध्यमिक विद्यालयात ते पुढील शिक्षण घेण्यासाठी तयार झाले.

कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराज यांनी होतकरु गरीब मुलांच्यासाठी प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमधे मोफत राहण्याची सोय केली होती. समाजातील सर्व जातींच्या मुलांसाठी अशीच सोय छत्रपती शाहू महाराजांनी करुन ठेवली होती. समाजातील सर्व थरातील गरीब मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी हा त्यामागे हेतू होता. अण्णांनी राजाराम हायस्कूलमधे ८ वी मध्ये नाव घातले व प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमधे प्रवेश मिळविला. त्यावेळी आठवी म्हणजे एका वर्षात तीन इयत्ता हायस्कूलमधे करता येत होत्या. कोल्हापूरच्या अनेक कुटुंबांनी प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमधील गरीब विद्यार्थ्यांना मोफत जेवण्याची सोय वार लावून केली होती. त्याचाही अण्णांना उपयोग घेतला. त्यांचे वर्गमित्र वाळव्याचे बी. एल. गायकवाड बरोबर असल्यामुळे कोल्हापूरचे वास्तव्य सुखकर गेले. तेथेच त्यांना भारतातील राष्ट्रीय चळवळीतील घटनांची माहितीही होत होती. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीत समाजातील सर्व थरातील लोक भाग घेत होते.

कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमधील स्नेही पी. डी. गुणे त्या काळातील आठवण सांगताना म्हणाले की, मी नागनाथ यांच्यापेक्षा एक इयत्ता पुढे पण एक विचाराचे म्हणून असेल हायस्कूलच्या गॅदरिंग कमिटीचे मेंबर म्हणून एकत्र आलो. मागील वर्षीच्या कमिटीने गैरव्यवहार केला होता म्हणून आम्ही नागनाथाच्या सेक्रेटरीशिपखाली जागरुकतेने काम करून एक आदर्श घडविला. बापूसाहेब भोसलेही आमचे कमिटीचे मेंबर होते. आम्ही सर्व गॅदरींगचे कार्यक्रम गेल्या वर्षापेक्षा वरचढ करुन दाखविले. त्याचबरोबर खर्च वजा जाता उरलेले पैसे सम प्रमाणात सर्व विद्यार्थ्यांना परत केले. या कृतीचे सर्वांनी कौतुक केले व त्याचबरोबर नागनाथ अण्णांच्या नेतृत्व गुणाची ओळख इतर मित्रांना झाली.

* * * *

# २

## स्वातंत्र्य लढ्यातील पहिला संग्राम

राजा छत्रपती शाहू महाराज यांचे वर्णन करताना थोर चरित्र लेखक धनंजय कीर म्हणाले होते. ''जनसामान्यांच्या उद्धाराचे ब्रीद बाळगणारा लोकोत्तर राजा म्हणजे राजर्षी शाहू. त्यांनी अज्ञान, अंधश्रध्दा व दारिद्र्य हे मानवाचे तीन शत्रू होत, मानवाच्या उत्कर्षाचे काटे फिरविण्यासाठी शिक्षणाची चावी द्यावी लागते; हे ओळखून सामान्य जनतेसाठी शाळा व वसतिगृहे बांधायला मोफत जमिनी दिल्या. पैशाची मदत केली. अस्पृश्यांच्या जीवनाला कलाटणी दिली. विद्येचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांबरोबर उद्योगधंद्याची वाढ केली. प्रारंभी सत्यशोधक समाजाला प्रोत्साहन दिले, नंतर आर्य समाजाच्या हाती शिक्षण दिले, मजूर संघ काढला व युरोपमधे कामगाराच्या हाती सत्ता कशी जात आहे हे सांगितले.'' अशा समाज सुधारक विचारांच्या राजर्षी शाहू महाराजांच्या कोल्हापुरात नागनाथ अण्णा, विद्यालयीन शिक्षण घेण्यास १९४० च्या सुमारास आले होते.

कोल्हापूर म्हणजे कलेचे माहेरघर. इथल्या मातीत शिक्षण घेऊन समाजकारणात व राजकारणात अनेक लोकनेते तयार झाले. कोल्हापुरच्या राजाराम हायस्कूलचा विद्यार्थी म्हणजे खणखणीत नाणे समजले जात असे. कोल्हापुरात सर्व समाजातील मुलांची शिक्षणाची सोय झाली असल्यामुळे बहुजन समाजामधील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात जी थोर लोकनेते मंडळी पुढे उदयास आली त्यापैकी नागनाथ अण्णा हे होत.

म. जोतीराव फुले यांनी सुरु केलेल्या सामाजिक क्रांतीमुळेच बहुजन समाज शिक्षणाकडे वळला होता. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन जाती-जमातीसाठी बोर्डींग काढून गरीब घरातील मुलांना शिक्षणाची दारे सताड उघडी करुन दिली. अशा परिस्थितीचा लाभ घेण्यास नागनाथ नायकवडी यांनी कोल्हापुरच्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमधे प्रवेश घेतला. येथे गरीब मुलांना



मोफत राहण्याची सोय होती. स्वत:ची खोली स्वत:च स्वच्छ करावी लागे, सारवावी लागे, जेवलेली ताटे स्वत:च धुवावी लागत आणि सामाजिक जाण असलेल्या घरामधे ठरलेल्या दिवशी जेवायला जावे लागत असे. या वातावरणात अण्णा सामाजिक जाणिवेचे, शिस्तीचे शिक्षण पुस्तकी ज्ञानाबरोबरच घेत होते.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची भारतास स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अधिवेशने भरत होती. म. गांधी स्वातंत्र्य लढा तीव्र करण्याचे आदेश देत होते. विद्यार्थ्यांनी शिक्षण सोडून स्वातंत्र्य लढ्यात भाग घ्यावा असा आदेश देत होते. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटीश सरकार भारतीयांच्या स्वातंत्र्य लढ्याकडे दुर्लक्ष करुन तो दडपण्याचा आटापिटा करीत होते. अनेक ठिकाणी लाठीमार, गोळीबार करुन स्वातंत्रलढा चिरडण्याचा प्रयत्न करीत होते पण स्वातंत्र्यासाठी पेटून उठलेली जनता अधिक जोमाने व अधिक संख्येने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी पुढे येत होती. हजारोंना अटक होत होती व त्यांची जागा घेण्यास हजारो तरुण पुढे येत होते. ही वस्तुस्थिती नागनाथ अण्णांना पहावयास मिळत होती.

नागनाथांनी पी. डी. गुणे, श्रीनिवास कवी, आर. जी. देसाई, बापूसाहेब भोसले या मित्रांच्या सहकार्याने कोल्हापूरच्या शुक्रवार पेठेतील जैनमठात १९४२ साली एक राष्ट्रीय शाळा सुरु केली. तीन महिने ती चालली व बंद पडली व सर्व सहकारी पुन्हा मॅट्रीकच्या वर्गात दाखल झाले व मॅट्रीक झाले. पण नागनाथ यांनी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. पुढे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मॅट्रीक झाले.

अण्णा कोल्हापूर येथे राष्ट्र सेवा दलात जाऊ लागले. राष्ट्र सेवादलाच्या शिबिरामधे होणाऱ्या प्रबोधनामुळे अण्णांना अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली व त्यामुळेच स्वातंत्र्य लढ्यात आपणही भाग घ्यावयाची उर्मी अण्णांच्या मनात निर्माण झाली. ''आपला देश गुलाम आहे. इंग्रजांचे राज्य घालविल्याशिवाय आपल्या देशातील बहुसंख्य असलेल्या कष्टकरी जनतेची दु:खे संपणार नाहीत. या देशातून ब्रिटीशांची सत्ता घालविण्यासाठी जिवाची बाजी लावली पाहिजे'' अशा विचारांनी अण्णांचे मन भारावून गेले ''शाहू महाराजांच्या विचार व्यवहाराने कसदार झालेल्या भूमीत एक क्रांतिवीर घडू लागला.''

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या समाजकार्याचा पगडा तर अण्णांच्या मनावर बालपणापासून झाला होता. नाना पाटील यांनी बहुजन समाजातील निरक्षरता दूर करण्यासाठी सातारा-सांगली भागात प्रचार दौरे काढून जागृती निर्माण केली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनीसुध्दा दुर्गम भागात प्राथमिक शिक्षणाची सोय करुन दिली होती. १९४० साली नागनाथ अण्णांनी स्वत: शिकण्यापेक्षा इतरांना सुशिक्षित करण्यासाठी पुढाकार घेऊन सखाराम मकदम, गणपती गोविंद बाबर, वाय. सी. पाटील, बापूजी साळुंखे, बी. एल. गायकवाड अशा समविचारी विद्यार्थी मित्रांच्या सहकार्याने शिराळा पेठ्यात व्हॉलंटरी प्राथमिक शाळा सुरु केल्या. कर्मवीरांनीही त्यांना प्रोत्साहन दिले होते. त्यामुळे तरुण अण्णांनी उत्साहाने काम सुरु केले. व्हॉलंटरी शाळेतील शिक्षकांना विद्यादान मोफत करावे लागे. त्यांच्या जेवण खाण्याची व राहण्याची व्यवस्था तेथील ग्रामस्थांनी मोफत करुन द्यावयाची अशी योजना होती. शाळांची तपासणी रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी करणार होते.

नागनाथ अण्णांच्या या कार्यामुळे रयत शिक्षण संस्थेचे प्राचार्य ए. डी. आत्तार, प्राचार्य रा. सु. पाटील, बॅ. पी. जी पाटील यांचा परिचय १९३९ साली झाला व तो कायम राहिला. याच

काळात कोल्हापूर जवळच्या सोनतळी येथील सेवादलाच्या कॅम्पमधे नागनाथ अण्णांनी भाग घेतला. कॅम्पमधे झालेल्या क्रीडा स्पर्धेमध्ये त्यांनी प्रथम क्रमांक मिळवून प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगला बहुमान मिळवून दिला.

या वातावरणामधे अण्णांचे नाव विद्यार्थी नेत्यांमधे होऊ लागले होते. त्यांनी कामेरी येथे पहिली वाळवे तालुका विद्यार्थी परिषद घेण्यात पुढाकार घेतला व कोल्हापूरच्या शिक्षणतज्ज्ञ मंडळीना बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या विद्यार्थी परिषदेस बॅ. खर्डेकर, विप्लवी चामुंडराय पाटील, वाय. पी. शिंदे महाराज यांनी प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहून विद्यार्थ्यांच्या उपक्रमास प्रोत्साहन दिले.

आता अण्णा राष्ट्रीय लढ्यातील लहान सहान गोष्टीत लक्ष घालू लागले होते. स्वदेशी मालाला प्रोत्साहन देण्याकरिता आणि कापड उत्पादनात स्वावलंबी होण्यासाठी म. गांधींनी खादीच्या प्रचाराची व प्रसाराची मोहीम सुरु केली होती. जाडी भरडी खादी तरुण मोठ्या हौसेने वापरु लागले होते. लोकांची गरज भागविण्यासाठी तालुक्याचे व जिल्ह्याच्या ठिकाणी खादी भांडारे सुरु होत होती. अण्णांनी पुढाकार घेऊन इस्लामपूर येथे खादी भांडाराची स्थापना केली व स्वत: खादी वापरणेस सुरु केले. थेरगावचे पांडुरंग पाटील खादी भांडाराचे व्यवस्थापक होते.

अण्णा म्हणतात ''कोल्हापूर येथील सेवादलाच्या शिबिरामुळे आत्मबल वाढत गेले. त्याला 'हरिजन' या महात्माजींच्या मासिकातील विचारामुळे राष्ट्रीय संस्कार लाभले. मग जाणतेपणाने अगदी ठरवून खादी प्रचारास लागलो. खादीचं कापड जाड व राठ असतं. त्याचा लंगोटा मांडीस कचायचा पण तो वापरायचाच असा निश्चय केला होता. गांधीजींचे राष्ट्रीय विचार मनावर खोलवर परिणाम करुन गेले,''

इकडे भारतभर म. गांधींच्या आदेशानुसार वैयक्तिक सत्यागृह होत होते. बहे, बोरगाव व हणमंत वडिये येथे नाना पाटील, सातारा येथे भाऊसाहेब सोमण व तात्यासाहेब साठे, कुपवाड येथे दिपचंद होरा, धामणी येथे आर. पी. पाटील, येळावी येथे गंगाराम पोवार, तासगांव येथे वि. स. पागे, भिलवडी येथे धुळाप्पा नवले, बिसूर येथे वसंतदादा पाटील यांनी ब्रिटीश सरकारच्या अन्यायी धोरणास विरोध दर्शविण्यासाठी सत्याग्रह केला होता. ब्रिटीश हे आपले शत्रू असल्यामुळे ते गेल्याशिवाय आपला भारत देश स्वतंत्र होणार नाही. भारत स्वतंत्र होण्याची वेळ आली आहे. अशावेळी ब्रिटीश सरकारला कोणतीही मदत अगर सहकार्य देऊ नका. त्यांच्या युध्द प्रयत्नात हर प्रयत्नाने अडथळे निर्माण करा. युध्दात मदत न करता माझा, माझ्या काँग्रेस पक्षाचा, देशाचा युध्दास संपूर्ण विरोध आहे, असा निर्वाणीचा इशारा देत सर्व सत्याग्रही सत्याग्रह करीत होते.

भारतातील विविध पक्षांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी वेगवेगळ्या घोषणा करुन परिस्थिती गोंधळाची करुन टाकली होती. जिना त्यामधे अग्रभागी होते. सर्वांना स्वातंत्र्य पाहिजे होते, फक्त मार्ग वेगवेगळे होते. प्रमुख राष्ट्रीय नेते सत्याग्रह केल्यामुळे तुरुंगात शिक्षा भोगत होते आणि बाहेर पडून स्वातंत्र्याची चळवळ अधिक जोरदारपणे करण्याचे मनसुबे रचत होते. त्याचवेळी नेताजी सुभाषचंद्र बोस आश्चर्यकारक रीतीने भारतातून गुप्तपणे जर्मनीमधे गेले. नंतर त्यांनी जपानमधे जाऊन त्यांच्या मदतीने आझाद हिंद फौजेची स्थापना करुन भारताच्या स्वातंत्र्याकरिता 'चलो दिल्ली' ची घोषणा केली होती. भारतात स्वातंत्र्याच्या मागणीस पाठिंबा मिळत होता. दुसरे महायुध्द व भारतातील स्वातंत्र्य मागणीचा लढा व युध्दासाठी सामुग्रीची गरज या कात्रीत ब्रिटीश सरकार सापडले होते. त्यातून मार्ग काढण्यासाठी २३ मार्च १९४२ रोजी इंग्लंडहून



क्रिप्स कमिशनने भारतास स्वातंत्र्य देण्याच्या आश्वासनाची म. गांधीनी 'बुडत्या बँकेचा दिलेला चेक' अशी संभावना केली.

अशा स्फोटक परिस्थितीत अ. भा. काँग्रेसचे मुंबई येथे ७/८ ऑगष्ट १९४२ रोजी ऐतिहासिक अधिवेशन आयोजित केले होते. देशभरातून कार्यकर्ते मुंबईस येत होते, तसेच नागनाथ अण्णा विद्यार्थी दशेत असताना मुंबईच्या या अधिवेशनास होते.

७/८ ऑगष्ट १९४२ च्या अधिवेशना नंतर काँग्रेसने अंतिम लढा देऊन ब्रिटीश सत्ता संपविण्याचा निर्धार केला होता. त्यातून काँग्रेस तरी संपेल किंवा ब्रिटीश सत्ता तरी संपेल व यातूनच स्वातंत्र्याचा मार्ग निश्चित सापडेल, असा विश्वास वाटत होता. ब्रिटीश सरकारने मात्र महायुध्द संपेपर्यंत काँग्रेसचा हा निर्वाणीचा लढा सर्वशक्तीनिशी चिरडून टाकण्याची तयारी केली होती. त्याचबरोबर युध्द संपल्यावर भारतात स्वातंत्र्य स्थापन होईल, अशी घोषणा अधिवेशनाच्या आदल्या दिवशी ब्रिटीश सरकारने जाहीर केली होती. अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर हे काँग्रेसचे निर्णायक अधिवेशन भरणार होते.

काही झालं तरी अशा महत्त्वाच्या अधिवेशनास जायचे असे नागनाथ अण्णांनी ठरविले व आपल्या एस. टी. पाटील, सखाराम बाबूराव कोकाटे, बी. बी. पाटील अशा मित्रांसह मुंबईस गेले. विद्यार्थी दशेत असल्यामुळे अण्णांना अधिवेशनाचे निमंत्रण नव्हते. मुंबईच्या गवालिया टँकवरील अधिवेशनाची जागा बंदिस्त होती. अशा परिस्थितीत आत कसे जायचे असा प्रश्न होता. अण्णांच्या धाडसी स्वभावामुळे त्यांना एक मार्ग सापडला. भिंतीच्या बाहेर एक हात अंतरावर आंब्याचे एक झाड होते. त्या झाडावर चढून त्यांनी अधिवेशनाच्या परिसरात उडी घेतली. खादीधारी स्वयंसेवकाचा वेश असलेले अण्णा स्वयंसेवकांमधे मिसळून गेले व अधिवेशनातील नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. 'छोडो भारत' 'करेंगे या मरेंगे' या पं. जवाहरलाल नेहरुंच्या आवेशपूर्ण घोषणा अण्णांनी ऐकल्या व पाठही केल्या.

९ ऑगस्ट रोजी म. गांधींचे शिवाजी पार्कवर भाषण होणार होते. पण त्यांचे भाषण होण्यापूर्वीच त्यांना व इतर प्रमुख नेत्यांना अटक करुन अज्ञात स्थळी नेऊन ठेवले गेले. अरुणा असफअल्ली राष्ट्रीय तिरंगा झेंडा उभारुन भाषण करीत असतानाच पोलिसांनी तेथे जमलेल्या कार्यकर्त्यांवर लाठीमार करुन अश्रुधुराचा वर्षाव केला. त्यामुळे कार्यकर्ते चौफेर पांगले व गोंधळाच्या परिस्थितीत अधिवेशन बरखास्त झाले व एका रात्रीत हजारो कार्यकर्ते पकडले गेले. तसेच अनेकांनी पोलिसांचा डोळा चुकवून आपआपल्या गावी जाऊन भूमिगत राहून लढा पुढे चालू करण्याचा निर्धार केला. अण्णाही परत कोल्हापूरला आले ते मनात खूप काही ठरवूनच.

सातारा जिल्ह्यातील भूमिगत काँग्रेस कार्यकर्ते वेगवेगळी विध्वंसक कार्ये करुन ब्रिटीश सरकारला धक्के देत होते. अनेक ठिकाणचे पूल पाडले, सरकारी बंगले जाळले, कोर्टाच्या इमारतींना आग लावली गेली, टेलीफोन तारा तोडल्या. त्यामुळे पोलिसांनी भूमिगतांना पकडण्यासाठी मोहिम आखली होती. तशातच काँग्रेसच्या नेत्यांना अटक केली असल्यामुळे कार्यकर्ते स्वत:च निर्णय घेऊन ब्रिटीश सरकारला सळो की पळो करुन टाकीत होते. काहींच्या योजना यशस्वी होत होत्या, पण काहीं घरभेद्या पोलिस खबऱ्यांमुळे अटक झाले होते. वाईचे किसन वीर, येडेनिपाणीचे पांडू मास्तर, सोलापूरचे भाई विभूते व बलदेव प्रसाद पुण्यातील येरवडा जेलमधे बंदिस्त झाले होते. इकडे क्रांती आंदोलनाच्या कार्याच्या सोईसाठी सातारा जिल्ह्यात भूमिगत कार्यकर्त्यांचे नऊ गट करण्यात आले होते. कराडमधे यशवंतराव चव्हाणांचा, तांबवे भागात

काशीनाथ देशमुखांचा, कुंडल भागात नाना पाटलांचा, सांगली भागात वसंतदादांचा, किर्लोस्करवाडीस गोविंदराव खोतांचा, तासगाव भागात स्वामी रामानंद भारतींचा, शिराळा भागात बाबूराव चरणकर, बिळाशीचे गणपती पाटील व बर्डे मास्तरांचा, मिरज भागात भूपाल कत्ते यांचा गट काम करीत होता.

त्या दरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस कलकत्त्याहून वेश पालटून नजरकैदेतून सुटले व बर्लिन येथे २८ मार्च १९४१ रोजी पोहोचले.

किसन वीर मात्र अटक झाल्यापासून बाहेर पडण्याच्या योजना आखत होते. सहकारी तयार करीत होते. त्यांच्या योजनेस यश मिळून ३१ ऑक्टोबर १९४२ च्या रात्री किसन वीर, पांडू मास्तर व त्यांचे तीन साथीदारांनी येरवडा जेलमधून यशस्वी पलायन करुन ब्रिटीश सत्तेला फार मोठा धक्का दिला.

पोलिसांचा डोळा चुकवित येरवडा जेलमधून बाहेर आलेले पांडू मास्तर लगेच वाळवा तालुक्यात पोहोचले. भूमिगत कार्यकर्त्यांना पांडू मास्तरांच्या धाडसी कृत्यांचे आश्चर्य वाटले व भूमिगत कार्यकर्त्यांत अधिक उत्साह निर्माण झाला. पांडू मास्तर नागनाथ अण्णांचे १ ली व २ रीचे वाळवा येथील वर्ग शिक्षक होते. पांडु मास्तर येरवडा जेलमधून बाहेर आले असे समजलेवरुन अण्णा पांडू मास्तरांना भेटावयास गेले. निशस्त्र पांडू मास्तरांच्या धाडशी कामाचा अण्णांच्या मनावर खोल परिणाम झाला व त्यांनी ठरविले की ब्रिटीश सत्तेला तोंड देण्यासाठी, सशस्त्र लढा देण्यासाठी आपल्याजवळही शस्त्रे असावयास पाहिजेत.

पांडू मास्तर येरवड्याहून आले, भेटले व पहाटे निघून गेले. त्यांच्याजवळ हत्यारे नाहीत, सहकारी नाहीत, ही उणीव भरुन काढण्यासाठी नागनाथ अण्णांनी ठरविले की कोठून तरी हत्यारे मिळविल्याशिवाय थांबायचे नाही. त्यांच्या रोमहर्षक योजनेबद्दल सांगताना अण्णा म्हणाले.''ताबडतोब मी कोल्हापूरला गेलो. कोडोलीचे आर. एस. पाटील यांचेकडे जाऊन हत्यारे आणण्यास उसने पैसे मागितले. त्यांनी ताबडतोब ट्रंकेमधून १०० रुपये काढून दिले. व्यंकटराव महाडिक व शेवाळे हे सहकारी विद्यार्थी आजारी असताना त्यांची सेवा मी केली होती. त्यांचेकडे माझा मनोदय सांगितल्यावर व्यंकटराव महाडिक म्हणाले 'हत्यारे पाहिजे असतील तर मिळतील' असा धीराचा विश्वास दिला व लगेच चला जाऊया म्हणाले. महाडिक व मी त्यांच्या गडहिंग्लज तालुक्यातील मुंगळी या गावी गेलो. सुमारे ६ मैल चालत जावे लागले. महाडिकांचे आजोळही गावातच होते. त्यांनी त्यांच्या विचारे मामांना बोलावून घेतले. महाडिकांच्या आजारपणात विचारे मामा बरेच वेळा कोल्हापूरला आले होते त्या काळात माझाही परिचय विचारे मामाशी झाला होता. महाडिकांची बहीण सामानगडाच्या पलिकडे निंगनूर येथे १० मैलावर होती, तेथे गेलो. चंदगडच्या अलिकडे शिनोळी येथे विचारे मामा, महाडिक, महाडिकांचे मेव्हणे व मी रात्री ७-८ चे सुमारास पोहोचलो. तेथील रिवाजाप्रमाणे शेकोटीभोवती बसून रात्रीचे जेवण घेतले. महाडिकांचे मेव्हणे देसाई फौजेतील निवृत्त पेन्शनर होते. त्यांना महाडिकांनी माझी अपेक्षा सांगितलेवर देसाईंनी ती स्वीकारली. नंतर मी व देसाई शिरोळी गावात बसमधे बसलो व गोव्यात गेलो.

देसाईचा मिलिटरीतला एक सहकारी इनामदार मित्र परमे गावी होता, त्यांचेकडे गेलो. देसाई व मी परमे येथील इनामदाराकडे सायंकाळी ५-६ वाजता गेलो. मला सोप्यात बसावयास सांगितले व देसाई आत जे गेले ते रात्रभर बाहेर आले नाहीत. माझी रात्रीच्या जेवण्याची



व्यवस्था सोप्यातच केली. सकाळी मला शौचास जाणेस तांब्या दिला. तोंड धुतल्यावर दूध दिले व तेवढ्यात देसाई बाहेर आले व सांगितले की ''काम होत नाही'' अशा निराशाजनक अवस्थेत बाहेर आलो. गावापासून ३-४ मैल चालत आलो फाटक्या सावलीचे ओढ्याकाठी एक झाड होते. त्या झाडाखाली विचार करत गोट्यावर गोटे आपटत असताना भूक लागली होती. मी त्यावेळी बांद्याजवळ असल्याचे लक्षात आले. गावाबाहेर एक छपरी हॉटेल होते. काही खावे म्हणून त्यामधे शिरलो. दूध मिळेल का? म्हणून विचारलं तर छपरीवाला म्हणाला ''दूध मिळणार नाही,'' पण दूधपाणी मिळेल. ते घेतले, दूधपाणी म्हणजे साखर घातलेले पण चहा पावडर नसलेले हे दूधपाणी आयुष्यात प्रथम माहीत झाले होते. मी ते दूधपाणी घेत असताना समोरच्या बाकड्यावर दोन तीन माणसे बसली होती त्यात मधे बसलेला माणूस सांगत होता की, ''परवा मी शिकारीला गेलो होतो. मला जंगलात वाघाची दोन बछडी सापडली याची परमे गावच्या इनामदाराला कुणीतरी बातमी दिली त्याने माझी वाघाची बच्ची न्हेली की राव!'' हे ऐकल्यावर या गृहस्थाचा आपल्या कामात उपयोग होईल म्हणून मी त्याना ''माझे तुमच्याकडे काम आहे. जरा येताका?'' असे म्हणताच तो गृहस्थ माझ्या बरोबर आला आम्ही दोघेही त्याच फाटक्या सावलीच्या झाडाखाली येऊन बसलो. माझी ओळख करुन दिली तो ही आपली ओळख करुन देताना म्हणाला मी महादेव शेट्टी जातीने सोनार. मी त्यांना सर्व माहिती सांगितली. हत्यार खरेदीसाठी १०० रुपये आणलेत हेही सांगितले. तुमचेकडून माझे काम नक्की होईल असे म्हटलेवर त्यांनी मला त्यांचे गावी नेले. तेथे त्यांचे घरी भात शिजवला. एक ओला नारळ खिसला, रस्सा केला. दोन दिवस महादेव शेट्टीकडे राहिलेवर तिसऱ्या दिवशी त्यांनी बाळ मणेरीकर या मित्राची ओळख करुन दिली. त्यांचेबरोबर फिरावयास गेलो असता समजले की महादेव शेट्टीचा दोस्त हत्यारे आणताना कस्टम अधिकाऱ्यांनी पकडला आहे.

म्हणून बाळ मणेरीकर यांनी मडगावचा दौरा आखला. मडगाव ही मणेरीकरांची सासरवाडी, म्हापसे येथे मणेरीकराचा मावसभाऊ बापू नार्वेकर होता. त्यांचेकडे मला मणेरीकर यांनी नेले. नार्वेकरांची भेट झाली. थोडी ओळख झाल्यावर त्यांना हत्यारे पाहिजेत म्हणून सांगितले. नार्वेकर यांनी बऱ्याच ओळखी करुन दिल्या. पणजी बंदरावर त्यांचा हाफ पॅन्ट-हाफशर्ट घातलेला तरुण पोस्टमास्तर पाहुणा होता, त्यांचेकडे मला नेले. त्या पोस्टमास्तरांनी बशीभर जर्दाळू, काजू वगैरे सुका मेवा आमचे समोर ठेवला त्याबद्दल त्यांनी सांगितले की, सुक्या मेव्याचे व्यापारी आले की या मेव्याची भेट देऊन जातात. त्यांनी परत गोव्यात जाण्यापूर्वी दोन हत्यारे जमवून ठेवली होती. एक वापरलेले रिव्हॉल्व्हर व एक नवे कोरे करकरीत पिस्तूल अशी हत्यारे माझेसाठी आणून दिली त्याची किंमत १०० रुपये त्यांना दिली. फोंडा मार्गे जाणाऱ्या वाटाड्यास ५ रुपये देणेचे ठरले होते.

कुडाळला विनायक कुलकर्णी म्हणून १ वर्षात ३ इयत्तेच्या स्पेशल क्लासमधील वर्गमित्र होता. त्याचे भावाने व मी कुडाळला सेवादलाचे शिबीर घेतले होते. कणकवलीचे पटवर्धन त्यांना कोकणचे गांधी म्हणतात. त्यांचेकडून दोन मोठे भोपळे घेतले, आतला भाग पोखरुन त्यात हत्यारे घातली. धोतराच्या दोन भागात ते भोपळे बांधून एका पोत्यामधे घातले व ते खांद्यावर पोते घेऊन कोल्हापूरला आलो. बरोबर बाळ मणेरीकर होते. कारण कोल्हापूरला येण्याचा खर्च मणेरीकर यांनी केला होता तो कोल्हापूरला गेलेवर परत करण्याचे आश्वासन मी मणेरीकर यांना दिले होते.

कोल्हापूरला आलो त्याच दिवशी नेमिनाथ उपाध्ये, डी. बी. पाटील यांची व बाबूराव जाधव यांची ओळख झाली, त्यांनी आपला डबा मला जेवावयास दिला व स्वत: उपाशी राहिले. जैन बोर्डिंगमधे बाळ मणेरीकर यांची राहण्याची व्यवस्था केली. कोल्हापूरच्या कार्यकर्त्यांच्या ओळखी करुन दिल्या व त्यांनी खर्च केलेल्या पैशाची व्यवस्था करुन देऊन त्यांना परत पाठवलं.

त्यानंतर बाळ मणेरीकर यांनी खूप प्रामाणिकपणे काम करुन मला मदत केली. कारण मणेरीकर यांचा मेव्हणा पणजीला टेलर होता. त्याचेकडे मिलिटरी ड्रेस शिवणेकरीता सैन्यातील अधिकारी येत असत, त्याचाही उपयोग हत्यारे मिळविण्यास झाला.

कोल्हापूरला असताना दगडू पाडळकर यांनी एअरगन कशी चालवायची ते ट्रेनिंग दिलं असलेमुळे गोव्यातून आणलेली हत्यारे वापरताना अडचण वाटली नाही. हत्याराचा वापर करण्याचा प्रसंग कोल्हापुरातच आला. एके दिवशी बॅ. जी. डी. पाटील व सोनीचे दत्तू पाटील यांना पोलिसांनी पकडले होते. कांबळे हवालदार व साध्या ड्रेसमधील दोन पोलीस बरोबर होते. मिरजेच्या दरोड्यामधील आरोपी म्हणून त्यांना पकडले होते. त्याचवेळी मी त्या रस्त्यावरुन सायकलवरुन जात होतो. मी हवालदार कांबळेस विचारले, यांना काय म्हणून धरले आहे. यावर तो म्हणाला,''दरोड्यातील संशयित आरोपी आहेत. मी मग पोलीसांशी झटापट करुन त्या दोघांची सुटका केली, ते तेथून पळाले व पोलीसांनी मला धरले. माझे नाव विचारलेवर मी आर. एस. पाटील म्हणून खोटे नाव सांगितले. त्यावर मी हवेत गोळीबार केल्यावर दोन पोलीस पळू लागले, त्यांना थांबविण्याकरिता कांबळे हवालदार म्हणाला,''हे अमेरिकन नकली पिस्तूल आहे, भिऊ नका.'' म्हणून पिस्तूल कसलं आहे हे दाखविणेस मी कांबळे हवालदाराचे हातावर गोळी झाडली. तो जखमी झाला नंतर आर. एस्. पाटील यांना पकडले. पण ते सुटले व आज ते स्वातंत्र्य सैनिकाची पेन्शन घेत आहेत. दुसरे दिवशी यादव या मित्राने माझी सायकल हुडकून काढून आणून ठेवली.''

विद्यार्थी दशेपासून अण्णा आपल्या सहकारी मित्रांच्या संकटकाळी धावून गेलेत व धाडसाने स्वत:चा जीव धोक्यात घातला पण समयसूचकतेमुळे प्राप्त संकटातून आपलीही सुटका करुन घेतली. ज्यांना वाचवलं त्यांनी आठवण ठेवली नाही त्याची त्यांना खंत नाही. ज्यांनी आठवण ठेवून कृतज्ञता दाखविणारे सहकार्य केले त्यांचा आयुष्यभर फायदाच झाला आहे आणि अशाच घटनांनी अण्णांचे जीवन समृध्द व कृतार्थ झाले असलेचे आपण पहात आहोत.

मा. अण्णांच्या जीवनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील मित्रांची त्यांनी आजपर्यंत आठवण ठेवली आहे. ज्यांनी जिवावर उदार होऊन सहकार्य केले, प्राण वाचवले त्या व्यक्तीबद्दल ते नेहमी कृतज्ञता तर व्यक्त करतातच पण अनेक तऱ्हेने मित्रांना मदतीची भरपाई त्यांनी केली आहे.

गोव्यातून हत्यारे मिळविण्याच्या धाडसी उपक्रमामधून अण्णांची समयसूचकता, अनोळख्या ठिकाणी नवीन ओळखी करुन इच्छित साध्य करण्याची हातोटी दिसून येते. या गोष्टी स्वभावात नसत्या तर गोव्यातून हत्यारे आणण्याचे काम शक्य झाले नसते आणि स्वातंत्र्यलढ्यातील कार्ये पार पाडता आली नसती.

* * * *



# ३

# स्वातंत्र्य संग्रामासाठी पैसे जमविण्यासाठी धाडसीकार्ये

नागनाथ अण्णां गोव्यातून हत्यारे धाडसाने व कौशल्याने मिळवत होते. त्यासाठी ४४ दिवस घालवावे लागले होते. भूमिगत कार्यकर्त्यांची संख्या वाढत होती आणि ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्यासाठी, विविध योजना पार पाडण्यासाठी, लांब पल्ल्याच्या व पोलिसांशी वेळ पडल्यास सामना करण्यासाठी बंदुकांची गरज भासत होती. अण्णा कुंडल ग्रुपमधील एक जबाबदार कार्यकर्ते होते. नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली कुंडल ग्रुपचा दबदबा वाढला होता.

क्रांतिसिंहांच्या प्रती सरकारचे प्रमुख डिक्टेटर म्हणून मान्यता त्यांना मिळाली होती. सातारा जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्त्यांची गटप्रमुखांची संघटना अधिक मजबूत करण्याचे उद्देशाने भूमिगत कार्यकर्ते के. डी. पाटील, जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी, व्यंकटराव माने, डी. जी. देशपांडे, बर्डे मास्तर, जोशी काका, निवृत्ती काका, किसन वीर, धन्वंतरी कासेगावकर वैद्य यांची बैठक जून १९४३ मधे भरली होती. संघटनात्मक बाबींवर चर्चा होऊन के. डी. पाटील यांची जिल्ह्याचे भूमिगत संघटना प्रमुख म्हणून निवड केली व त्यास सर्वांनी मान्यता दिली.

तेवढ्यात यशवंतराव चव्हाण यांनी कराडच्या शांताराम इनामदारांबरोबर भूमिगत कार्यकर्त्यांना उद्देशून एक पत्र पाठवले होते. त्यामध्ये भूमिगत कार्यकर्त्यांनी काम बंद करुन पोलिसांसमोर हजर होण्याची सूचना केली होती. पत्र पाहण्यास कोणीतरी मागितले पण शांताराम इनामदारांनी ते गिळून टाकले. भूमिगत अवस्थेत सर्वच कामे तोंडी निरोपाने चालत. विशेष प्रसंगी खात्रीचे माणसाबरोबर चिठ्ठी पाठवली जायची पण तिचा दुरुपयोग होईल अशी शंका आल्यास चिठ्ठी खाऊन टाकायची पद्धत होती. यशवंतरावांच्या पत्रास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यावर विचार होऊन बर्डे मास्तर व जोशीकाका यांनी मुंबईस जाऊन अच्युतराव पटवर्धन यांचेकडून चळवळ बंद करण्याबाबत काय धोरण आहे हे समजून घ्यावे असे ठरले. त्याप्रमाणे

अच्युतराव पटवर्धन यांना मुंबईस भेटल्यावर बर्डे मास्तर व जोशी काकांनी निरोप आणला की जर जनतेपासून दूर जात असाल तर चळवळ ताबडतोब बंद करा आणि जनतेचा पाठिंबा असेल तर भूमिगत चळवळ जरुर चालू राहू द्या. फक्त पथ्य म्हणजे हिंसा करावयाची नाही, वैयक्तिक प्रॉपर्टी लुटायची नाही, जनतेला त्रास होईल असे काही करावयाचे नाही.

मुंबईहून ज्येष्ठ नेते सूचनावजा आदेश देत होते. पण स्थानिक कार्यकर्त्यांना मात्र चळवळीच्या निमित्ताने काम करीत असताना असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागत होते. नाना पाटील यांनी मात्र अनेक प्रसंगांना तोंड देत चळवळ जोमाने पुढे चालवण्याचा निर्धार केला होता.

बलाढ्य ब्रिटीश सत्तेविरुध्द लढण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या मूलभूत गरजा म्हणजे शस्त्रे व पैसा महत्त्वाच्या होत्या. त्या गरजा भागविण्यासाठी नेहमी काहीतरी उपाययोजना भूमिगत नेत्यांना आखणे व त्या पार पाडणे क्रमप्राप्त होते. कुंडलचे आप्पासाहेब लाड शेणोलीच्या घाटात रेल्वेच्या पगार गाडीच्या लुटलेल्या घटनेबद्दल म्हणतात.

''भूमिगत चळवळीसाठी थोडीबहुत हत्यारे आली, पण पैसा मिळेना, प्रत्येक श्रीमंताने अहो आमच्याकडून अमक्याने पैसे नेले! असे म्हणावे. सांगली कोल्हापूरहून नाना पाटील यांना हजारो रुपये मिळतात, म्हणून लोकांकडून पैशाची मागणी येऊ लागली, परंतु सर्व चळवळ पुरी होईपर्यंत कोल्हापुरातून शंभर रुपये, सांगलीतून २५ रुपये व विट्याहून २५ रुपये असे एकूण १५० रुपये मदत मिळाली. प्रांतिककडून थोड्या प्रमाणात मदत होईल, पण लोक तर शंभर दीडशे. त्यांचा खर्च कसा भागणार? आता प्रत्येकाने पैसा मिळणार नाही म्हणून स्पष्टच कळविले होते. जबाबदार लोक सोडून बाकीच्यांनीही सत्याग्रह करुन तुरुंगात जावे असा आदेश देण्यात आला होता. मे १९४२ ला आप्पा मास्तर, बाबूराव लाड, ईश्वरा लाड व कुंडलचे १०-१२ लोक पकडले गेले. आता बजेटची सर्व जबाबदारी नाथाजी लाड यांच्यावर येऊन पडली. बापूसाहेब (जी.डी.) व नागनाथ नायकवडी यांनी एक अभिनव योजना पाटलांच्यापुढे मांडली. ती म्हणजे पे स्पेशल ट्रेन लुटणे होय. नाना पाटलांना ते हवेच होते. त्यांनी तात्काळ संमती दिली. सरकारी मालमत्ता लुटण्यास नानांची संमती असे. मात्र खाजगीरीत्या एखाद्या सैनिकाने तसे काही केले तर त्याबद्दल ते भयंकर संतापत.''

बापूसाहेब, नागनाथ, नाथाजी लाड, आण्णा धनगर, आप्पा लाड, बंडू लाड, रामा तेली, एस. पी. पाटील, ज्ञानू चौकिवाले (वस्ताद), रामू तात्या, एस. पी. जाधव टेलर, रावसाहेब कळके व दुधोंडीचे पाटील असे तेरा लोक या स्पेशल पे ट्रेन लुटण्याचे कामी होते. दरमहा ७ तारखेला मिरजेपासून पुण्यापर्यंत एक गाडी केवळ नोकरांचा पगार वाटीत जात असे.

७ जून १९४३ या दिवशी पगारी आगगाडी लुटण्याचा बेत मुक्रर झाला. बापूसाहेबांनी सर्व घड्याळाबरहुकूम करण्याचा कार्यक्रम आखला होता. शेणोली खिंडीत गाडी लुटावयाची, तेथून मुख्य पोलीस गेट कराडला आहे ते १५-१६ मैल लांब. स्टेशनवरुन टेलिफोन झाला तर अर्ध्या तासांत पोलिसांचा वेढा पडेल. सर्व धोक्याची ठिकाणे लक्षात घेऊन सर्व प्लॅन तयार करुन तो पुढे मांडला गेला. ७ जून १९४३ ला सकाळी ८ वाजण्याचे आत वरील लोक जाऊन शेणोली खिंडीत गाडीची वाट पहात राहिले. सर्व काही संकेताप्रमाणे व्हावयाचे. पे स्पेशलच असेल तर स्टेशनवरुन एका सायकलवाल्याने १ मैलावर असलेल्या खिंडीत येऊन निरोप द्यावयाचे एवढेच त्याचे काम.



बिचूद स्टेशनवरून गाडी सुटली, स्टेशनवर पहाऱ्याकरिता चार हत्यारबंद पोलीस होतेच. शेणोली स्टेशनवरही चार होते. दोन्ही स्टेशनच्या मध्यावर खिंड आहे. तेथील चढणाला गाडीच्या पुढे दगडाचा ढीग रचण्यात ४-५ लोक गुंतले. बापूसाहेबांनी लगेच इंजिनवर चढून ड्रायव्हरला खाली ओढले व रिव्हाल्व्हर छातीला लावून गडबड न करण्याची ताकीद दिली. पाच मिनिटे गाडी थांबवण्यात वेळ गेला. पैशाची पेटी फोडण्यात तीन मिनिटे खर्च झाली आणि पैसा घेऊन डोंगरावर जाण्यात २० मिनिटे वेळ लागला. याप्रमाणे अर्ध्या तासांचा ठरविलेला प्रोग्रॅम २८ मिनिटातच उरकला. मात्र पोलिसांना त्या ठिकाणी येण्यास अर्ध्याऐवजी पाऊण तास लागला तो पर्यंत सर्व भूमिगत कार्यकर्ते आश्रयाच्या ठिकाणी निर्धास्त पोहोचले. या गाडी लुटीत एकूण १९ हजार ७१६ रुपये मिळाले. नागनाथ अण्णांसह १४ क्रांतिकारकांनी या धाडसी कामात भाग घेतला होता.

नागनाथ अण्णा या प्रसंगाबद्दल सांगताना म्हणतात की, ''क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे नाथाजी लाड, आप्पा मास्तर, लाड गुरुजी, जी. डी. लाड, ज्ञानू चौकीवाले (वस्ताद), रामभाऊ पवार असे आम्ही एकत्र येऊन काम करीत होतो. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी काही निधीची गरजच असते. म्हणून आर्थिक अडचण सोडविणेसाठी मिरजेहून नोकरांचा पगार घेऊन जाणारी रेल्वे गाडी शेणोलीच्या घाटात धाडसाने लुटली. पण यामुळे फार काही पैसे मिळाले नाहीत. जे काही मिळाले ते थोड्या दिवसातच कार्यकर्त्यांचा प्रवासखर्च व इतर खर्च अशातच संपले. पुढे पोलिसांनी गुन्ह्याचा तपास केला पण भूमिगत काही हाताशी लागले नाहीत व लुटून नेलेले पैसेही मिळाले नाहीत,''

पोलिसांनी मात्र भूमिगतांवर पाळत ठेवून त्यांना पकडण्यासाठी शर्थ केली होती. अशा परिस्थितीत असि. सुपरिटेंडेंट इ. एस. मोडक या पोलीस अधिकाऱ्याने सांगली येथे फौजदार गल्लीतील एका खोलीमधून वसंतदादा पाटील व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांना २२ जून १९४३ रोजी अटक केली होती. परंतु वसंतदादा हे पारतंत्र्यात तुरूंगात खितपत पडणारे कमकुवत वीर नव्हते. त्यांनी २४ जुलै १९४३ रोजी सांगली जेल फोडला व जेलमधील १८ बंदुका व १८० काडतुसे घेऊन दिवसाढवळ्या सहकाऱ्यांसह पोबारा केला. पण पोलिसांच्या पाठलागात व गोळीबारात जखमी झाल्यामुळे अटक केले गेले. तत्पूर्वी दोन साथीदार हुतात्मा झाले होते. त्यांना १३ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली व त्यांना येरवडा जेलमधे स्थानबध्द करुन टाकले.

सांगलीत वसंतदादा पाटील यांना अटक केल्यामुळे सांगली भागातील चळवळ थंडावल्यासारखी झाली होती. वाई, कराड, इस्लामपूर भागातील काही भूमिगतांना पकडल्यामुळे पोलिसांची त्या भागातील डोकेदुखी काही प्रमाणात कमी झाली होती.

या धाडसी मोहिमेबद्दल सांगताना क्रांतिवीर नागनाथ अण्णा म्हणाले की,''पोलीस खात्याने त्यांची एक छावणी कोल्हापूर जिल्ह्यातील कसबे सांगाव येथे ठेवली होती. तीन पोलिस व एक हवालदार यांची तेथे नेमणूक होती. त्यांच्या चार बंदुका आणण्यासाठी जी. डी. लाड, शाम पाटील कोल्हापूर, ईश्वरा गुरव व मी असे चौघेजण तेथे दुपारी चार वाजता गेलो. पण त्यावेळी कसबे सांगावची पोस्टाची थैली कागल येथे सोडण्यासाठी एक पोलिस हत्यारासह गेला होता. राहिलेल्या तीन पोलिसांच्या तीन बंदुका घेऊन आम्ही आलो. या धाडसी मोहिमेसाठी

नानासाहेब घाडगे म्हणून कागलच्या विद्यार्थी दशेतील मित्राची महत्त्वाची मदत झाली. हायस्कूलमध्ये असताना जिम्नॅशियम हॉलमधे व्यायाम करणेसाठी आम्ही दोघेही एकत्र येत असू. त्यामुळे आमची मैत्री कायम झाली व ती आज अखेर आहे. त्यांनी सांगाव येथे टेहळणी करुन त्यांच्या माने दादांच्या पाहुण्यांशी चर्चा करुन आल्यावर आम्ही नंतर दुसरे दिवशी सांगाव येथे गेलो. तेव्हा पोलिस चौकीचे दारात एक पोलिस उंबरठ्यावर बसून पायावर ठेवलेल्या ताटातील तांदूळ निवडत होता. अचानकपणे त्या पोलिसास ओलांडून आम्ही सारे सहकारी आत गेलो. कुठे आहेत हत्यारे, कुठे आहेत संगिनी म्हणून चौकशी करीत तीन बंदुका साहित्यासह जमा केल्या व पोलिसांनी प्रतिकार करण्यापूर्वीच चौकीतून बाहेर पडलो. उंबरठ्यावर बसलेला पोलिस चोर–दरोडेखोर असे म्हणून ओरडून लोकांना जमा करण्याचा प्रयत्न करीत, आम्ही आत असताना खोली बाहेरुन बंद करण्यासाठी त्याने कडीला हात घातला होता पण मी त्याचे हातावर पिस्तुलाची गोळी झाडल्यामुळे तो बाजूला झाला. आम्ही हत्यारे घेऊन गावाबाहेर निर्वेधपणे निघून गेलो. तेवढ्यात कागलला गेलेला पोलिस परत आला होता. त्याने हत्यारांचा परवाना असलेल्या गावकऱ्यांना घेऊन अर्धा तास आमचा पाठलाग केला. पण आम्ही वेगाने खूप दूर गेल्यामुळे त्यांनी पाठलाग सोडून दिला. कारण अंधारही पडला होता. कसबे सांगाव पासून तीन मैलावर एक गाव आहे, तेथे येऊन झोपलो. दुपारी जोराचा पाऊस पडल्यामुळे झोपेतून जागे झालो व जोंधळ्याचे शेताबाहेर आलेनंतर एका शेतकऱ्याला विचारलेवर कळले की आम्ही सांगावचे आसपासच आहोत. ताबडतोब कोल्हापूर येथे ताराराणी विद्यामंदिराजवळच्या नानासाहेब घाटगे यांच्या घरी आलो. त्यांनी त्यांच्या जीपने वाळव्याच्या शिवारात तुजारपूरजवळ आणून सोडले. हे ठिकाण कामेरीच्या पूर्वेला होते. अशा रीतीने पोलिसांच्या तीन रायफली घेऊन वाळवा येथे आलो.

एकदा ८–१० रायफली घेऊन वाळवा येथे एक फेरी गावातून काढली होती. हेतू हा की कोणी विरोधकांनी आमच्याविरूध्द पोलिसांना बातम्या देऊ नयेत, अगर त्यांच्या कारवाया थांबाव्यात. त्यामुळे वाळवा गावाला अनेक वेळा पोलिसांनी वेढा देऊन मला व माझ्या सहकारी भूमिगत कार्यकर्त्यांना पकडण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला, पण कोणी सापडले नव्हते. भूमिगत गावकऱ्यांसारखे राहात असलेमुळे त्याचा संशय पोलिसाना येत नसे.

इस्लामपूरचे कॉ. डी. जी. देशपांडे ४२ च्या स्वातंत्र्यलढ्यातील नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबद्दल लिहितात की, प्रतिसरकारच्या सर्व चळवळीच्या नेतृत्वाची जबाबदारी नाना पाटील यांच्यावर होती. भूमिगत अवस्थेत ते मिटींगला फारसे येत नसले तरी पोलिसांच्या हाती सापडलेल्या भूमिगतांनी सपाटून मार खाल्यावर ''हे पत्र अथवा हे रिव्हॉल्व्हर तुला कोणी दिलं'' या प्रश्नावर ''मला नाना पाटलांनी गावाच्या बाहेरील झाडाखाली दिले'' हेच उत्तर असावयाचे. त्यामुळे नाना पाटील म्हणजे फार भयंकर प्रकरण आहे असे सरकारला वाटू लागले. सरकारच्या पोलिस खात्याने त्यांना पकडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण लोकांच्या पाठिंब्यामुळे नाना पाटील स्वातंत्र्य मिळेपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नाहीत. असा धाक क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जनमानसात निर्माण झाला होता.

शेणोली येथील रेल्वेची पे ट्रेनची मिळालेली रक्कम थोड्याच दिवसात संपली व पुन्हा



पैशाच्या अडचणी वाढतच गेल्या. पैसे मिळविण्यासाठी नवीन मार्ग शोधणे सुरु झाले.

अशा वेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांचा मुक्काम आटपाडी येथे होता. तेथे भूमिगत कार्यकर्त्यांची ये जा सुरु होती. गावात सम विचारी स्वातंत्र्यलढ्यास उत्स्फुर्तपणे मदत करणाऱ्या व्यक्तींच्या ओळखी होत होत्या. अशापैकी तेथे असलेल्या चरखा संघाचे खादी भांडाराचे प्रमुख धुडकू तानाजी ठाकरे होते. ते कट्टर गांधीवादी होते. पैशाची अडचण त्यांना सांगितलेवर ते म्हणाले, हे काम खानदेशात सोपे आहे. त्याकरिता त्यांनी धुळ्याजवळील वडजई गावचे कार्यकर्ते नास्तिक बाबू उर्फ फकीरा देवरे यांना बोलावून घेऊन कार्यकर्त्यांची गाठ ठाकरे यांनी घालून दिली. अण्णा व त्यांचे सहकारी भूमिगत कार्यकर्ते फकिरा देवरे यांच्या वडजई येथील मळ्यातील घरी महिना दीड महिने राहिले. ते एक मध्यम दर्जाचे शेतकरी होते. अत्यंत सज्जन गृहस्थ होते. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे त्यावेळच्या कडक उन्हाळ्याच्या दिवसात पाहुण्यांसाठी साठवलेले साजूक तूप वाढत असत. अशी व्यवस्था सकाळ संध्याकाळचे जेवणात असे आणि हे सर्व ते नुकसान सहन करुन स्वतःच्या पैशाने करीत. फकिराप्पा देवरे यांचा एक चुलत भाऊ दयाराम देवरे पोलिस खात्यात जमादार होते. त्याची नेमणूक धुळे येथील पोलीस मुख्यालयात होती. त्यांचेवर फकिराप्पांनी कामगिरी सोपविली की धुळ्याच्या मुख्य सरकारी खजिन्यातून काही सरकारी रक्कम बाहेरच्या गावी निघाली की ते येऊन भूमिगत कार्यकर्त्यांना सांगायचे. फकिराप्पा देवरे व दयाराम देवरे यांचा जिव्हाळ्याचा सबंध होता. त्यामुळे सोपविलेली कामगिरी त्यांनी विश्वासाने पार पाडली. १३ एप्रिल १९४४ या दिवशी दयाराम ड्यूटीवर असताना त्यांचेकडे सरकारी तिजोरीतून एक पत्र आले की पाच लाख एकावन्न हजार रुपयाची रक्कम उद्याच १४ एप्रिल १९४४ तारखेस धुळ्याहून नंदुरबार या तालुक्याचे ठिकाणी नेणेची आहे त्याकरिता दोन हत्यार बंद पोलिसाची मागणी केली आहे. हे सरकारी पत्र हातात पडताच दयाराम देवरे ते पत्र घेऊन फकिराप्पाच्या मळ्यात आले.

पुढील घडामोडीचा वृत्तांत सांगताना अण्णा म्हणाले की, ''आम्ही त्यावेळी जेवावयास बसलो होतो. दयाराम देवरे यांनी आम्हाला आणलेले पत्र दाखविले त्यावर चर्चा करताना दयाराम देवरे म्हणाले की मी असे दोन पोलीस देतो की जे ४–६ महिन्यात निवृत्त होत आहेत. पुढची तयारी तुम्ही करा असे सांगून ते गेले. जी. डी. लाड व मी चर्चा करुन योजना आखणीस चिमठाणचे रस्त्यावर काय परिस्थिती आहे हे पाहणेस फकिराप्पाच्या मदतीने चारचाकी वाहनाने गेलो. त्यासाठी आग्रा रोडने ४–४ च्या संख्येने आमच्या सहकाऱ्यांनी जाऊन गावाबाहेर येऊन थांबायचे ठरले, कारण एकदम ४० माणसे एकत्रपणे गेली तर पोलिसांना संशय येईल म्हणून अशी योजना केली होती. आम्ही ठरलेल्या ठिकाणी येत असताना माझेपुढे जो ४ जणांचा ग्रुप होता त्यामधील एक माणूस रस्त्याचे कठड्याखालून जात होता. संशय आलेवरुन पोलिसांनी त्याला हटकले. म्हणून तो पळून पुढे निघून गेला. त्याचा पाठलाग करीत पोलिस पळू लागले होते. हे माझे समोर घडले. धोक्याची शिट्टी वाजवण्यासाठी पोलिस शिट्टी वाजवण्याच्या बेतात असताना मी त्या पोलिसाची शिट्टी पकडली. त्यामुळे त्या पोलिसास शिट्टी वाजवता आली नाही व काही अंतरावर असलेल्या रस्त्यावर गस्त घालत असलेल्या पोलिसांना धोक्याचा संदेश जाऊ शकला नाही. आम्ही आमचे लोकांना पुढे जावा म्हणून सांगितले. पण या प्रसंगामुळे

आमचे ४–४ चे ग्रुप विस्कळीत झाले. ३२ जण धुळ्यामधे दाही दिशांना निघून गेले. फक्त जी. डी. लाड यांचा चार जणांचा ग्रुप व माझा चार जणांचा ग्रुप चिमठाणकडे निघाला होता. त्याकाळात खाजगी सर्व्हिस गाडीनेच सरकारी खजिना नेत. हे समजलेवरुन आमचेपैकी धोंडीराम माळी, रावसाहेब कळके, आप्पासाहेब पाटील यांनी खजिन्याचे गाडीत जरुरीच्या कामास चिमठाणला जायचे सांगून प्रवेश मिळविला होता. मी व जी. डी यांनी लुटुपुटीचे भांडण करुन रस्त्यावर अडथळा निर्माण करावयाचा व गरज पडल्यास भांडण खरे वाटण्यासाठी एकमेकाला चप्पलांनीही मारायचे ठरले होते. त्याप्रमाणे आम्ही चिमठाणचे अलिकडे सरळ रस्त्यावर खजिन्याचे गाडीची वाट पहात बसलो. डॉ. उत्तमराव पाटलांना गाडीत घेतलं नाही म्हणून ते ट्रकने येऊन आमच्यात सामील झाले होते. आम्ही आठजण व गाडी थांबली तर उत्तमराव पाटील नववे असे त्या मोहिमेत होतो. खजिन्याची गाडी वळणावर आल्याचे पाहून आम्ही नाटक सुरु केले. जी. डी. बापू त्यांचे दोन साथीदार व मी रस्त्यावर भांडण्याचे नाटक करीत होतो. रस्त्यावर लोक भांडत आहेत हे पाहून ड्रायव्हरने गाडी थांबवली, पण चाणाक्षपणे त्या ड्रायव्हरने काहीतरी धोका असे जाणले. त्याचवेळी गाडीतील आमच्या लोकांनी दोन पोलिसांना धरुन त्यांच्या बंदुका हस्तगत केल्या त्या बरोबर पोलिस ओरडले, म्हणून ड्रायव्हरने धाडसाने गाडी चलाखीने पुढे सुरु केली. गाडी आमचे अंगावरच येत आहे हे पाहून आम्ही बाजूस झालो. पण पुढे रस्त्याचा चढ असल्यामुळे आम्ही पळत त्या गाडीचा पाठलाग केला. गाडीचा वेग कमी असताना एक हात दाराला व एक उजवा पाय बॉनेटवर ठेवून ड्रायव्हरच्या हातावर पिस्तुलाच्या दोन गोळ्या झाडल्या. तरी ड्रायव्हर थांबेना. म्हणून तिसरी व चौथी गोळी कानावर मारल्यामुळे ड्रायव्हरने त्याचे हातातील स्टेअरिंगच्या चाकावर डोके टेकले व त्यामुळे गाडी थांबली. मी गाडीची किल्ली काढून घेतली. गाडीतील साथीदारांनी दोन पोलिसांना धरुन ठेवले होते. त्यांचेकडील ३०३ नंबरच्या बंदुका व काडतुसे ताब्यात घेतल्या होत्या. खजिन्याच्या देवदारी पेट्या शेंदरी लोखंडी पट्ट्यांनी मजबूत केल्या होत्या त्या पेट्या धोंडीराम माळी व रावसाहेब कळके यांनी गाडीतील टॉमी व स्क्रू ड्रायव्हर आणून उघडण्याचे काम झटपटपणे केले. आम्ही सर्वांनी खजिन्याचे पेटीतील पैसे व नोटांची बंडले धोतरामधे घेतली. रस्त्याने त्यावेळी लग्नास जाणाऱ्या वऱ्हाडाच्या बैलगाड्या दिसल्या. त्या ओळख नसलेल्या वऱ्हाडींना एक हजाराची नाणी वाटून टाकली. नाण्याचे वजन घेऊन जाणे त्रासाचे होईल म्हणून हे केले. ट्रकने येऊन उत्तमराव पाटील आमच्यात सहभागी झाले होते. ते त्याच भागातील असलेमुळे त्यांनी आम्हाला रस्ते दाखविले, एप्रिलचा महिना असलेमुळे उकाडा होता. सर्वजण पळून घामाघूम झालो होतो. गाडीत कॅशियर होता. ३५ वर्षाच्या पांढरपेशा वर्गातील वाणी नावाच्या कॅशियरने प्रसंगाचे गांभीर्य ओळखून रस्त्यातील एका भिल्ल मुलाकरवी जवळच्या औट पोस्टवर खजिना लुटल्याची बातमी दिली. त्यामुळे पोलिस औट पोस्टमधील तीन पोलिस पाठलाग करीत आले. त्यांनी रायफलीचा आवाज काढला व त्यामुळे आम्हाला पोलिस पाठलाग करत आहेत हे कळाले. त्यांचेत व आमचेत जेवढे अंतर वाढेल तेवढी सुरक्षितता असलेमुळे वेगाने जात होतो. पण तेवढ्या अंतरावरून पोलिसांनी गोळीबार चालू ठेवला. जी. डी. बापूंच्या पिंढरीतून एक गोळी घुसली व ते जायबंदी झाले. धोंडीराम माळी यांनी त्यांची विजार फाडून फडके केले व जी. डी. बापूंची जखम बांधली व पुन्हा



पुढे पळत गेलो. आम्ही सर्वजण एका खड्ड्यात बसलो तेवढ्यात पोलिसांची दुसरी गोळी माझ्या उजव्या खांद्याला लागून खाली पडली व त्या ठिकाणी जोंधळ्या एवढे रक्ताचे तीन थेंब आले व ती जागा लहान चेंडू एवढी फुगली कारण गोळीचा रेंज संपत आला होता मी थोडक्यात बचावलो. संधिप्रकाश संपायला आला होता. पोलिसांवर आम्हीही गोळीबार करीत होतो. त्यामुळे सूर्यास्तानंतर पोलिसानी पाठलाग थांबवला. बोरकुंडच्या ओंकारराव पाटलांचे घरी थांबायचे ठरले होते. तसे उत्तमराव पाटील यांनी सांगून ठेवले होते. एका भिल्लास तीन हजार रुपये देऊन जखमी जी. डी. बापूना खांद्यावर घेऊन येण्यास सांगितले. रात्रभर प्रवास करुन उजाडताना ज्या गावात आलो तेथील शिक्षकाला भेटलो. तो खादीधारी होता म्हणून आपला समजून त्यास ४–८ दिवस आम्हाला ठेवणेची व्यवस्था कर म्हणून सांगितले पण ते शक्य नाही असे म्हटल्यावर आम्ही त्याला टांगा मिळवून देण्याची विनंती केली. त्यांनी दोन घोड्यांचा टांगा ठरवून दिला. टांगा गावाबाहेर उभा होता त्यामधे जी. डी. बापू लाड, धोंडीराम माळी, डॉ. उत्तमराव पाटील व मी बसलो होतो. कच्च्या रस्त्याने टांगा जात असताना पुढून येणारी पोलीस पार्टी पाहिली त्यातून बेधडकपणे टांगा नेला. पोलीसांनी आम्हाला वाट करुन दिली व बोरकुंडच्या ओंकारराव पाटलांचे घरी आम्ही पोहोचलो.

मिळालेली रक्कम सातारा जिल्ह्यात कशी आणायची हा मोठा प्रश्न होता. राजमती ताई अगोदरच धुळे येथे फकीरा देवरे यांचा पाहुणा एक सी. आय. डी. ऑफिसर होता, त्यांचेकडे येऊन थांबल्या होत्या. सर्वानुमते असे ठरले की पैसे सातारा जिल्ह्यात आणण्याचे कामाकरिता धोंडीराम बापू माळी व राजमती ताई यांची निवड केली. रेल्वेने बॅगा भरुन त्यांनी यायचे असे ठरले. बोरकुंडला टरबुज, कलिंगडे भरपूर मिळत होती ती खरेदी केली. ती फळे व नोटांची बंडले पोत्यात भरली व बैलगाडीने नाशिककडे निघालो. नाशिकजवळ बाहुबली जैन देवस्थानाची एक शाखा मसरुळ येथे होती, त्याचे संचालक शांतीकुमार लोठाडे होते. त्यांचेकडे आम्ही थांबलो. मसरुळच्या आश्रमाजवळ मिलिटरीच्या गाड्या थांबल्या होत्या. त्या गाडीतून बॅगांची एक खेप केली, दुसरी खेप केली. अशा रीतीने चार लाख ३१ हजार रुपये आटपाडीला नाना पाटील यांचेकडे पोहोचते केले.

भूमिगत कार्यकर्त्यांसाठी मदत म्हणून मुंबईच्या श्री. अच्युतराव व श्री. ग. बा. नेवाळकर यांचेकडे १ लाख १० हजार रुपये पोहोचते केले. खानदेशातील भूमिगत कार्यकर्त्यांच्या खर्चासाठी १ लाख १० हजार दिले. असे दोन लाख २० हजार खर्च झालेनंतर २ लाख ११ हजार सातारा जिल्ह्याकरिता राहिले. ते जिल्ह्यातील भूमिगत चळवळीसाठी व कार्यकर्त्यांसाठी खर्ची पडले.

धुळ्याच्या खजिना लुटीतील पैसे क्रांतिसिंह नाना पाटील यांचे सेक्रेटरी नाथाजी लाड यांचेकडे आणून दिलेवर सातारा जिल्ह्यातील इतर भूमिगत ग्रुपमध्ये त्या पैशाबद्दल अपेक्षा वाढल्या होत्या. इतर ग्रुपमधील नेत्यांना आपल्यालाही त्या खजिन्यातील पैसे मिळावेत असा प्रयत्न त्यांचेकडून केला गेला होता. सातारा जिल्ह्यातील ज्या भूमिगत कार्यकर्त्यांनी पैसे मागितले होते, त्यांना अण्णांनी पैसे दिले. या प्रसंगामुळेच वाई ग्रुपचे नेते किसन वीर व नागनाथ अण्णा यांचे संबंध घट्ट झाले.

* * * *

# ४

# देशद्रोह्यामुळे अटक, तुरुंगाच्या भिंतीवरुन मारलेली उडी व सुटका

स्वातंत्र्य संग्रामाचे काळात सातारा जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्त्यांनी घातलेला धुळे खजिना लुटीचा धाडसी प्रयत्न मुंबई इलाख्यात गाजला होता. ब्रिटीश सत्तेला तो एक जबरदस्त तडाखा सातारच्या भूमिगतांनी दिला होता. त्यामुळे धुळे खजिना लुटीतील संबंधित फरारी भूमिगत कार्यकर्त्यांना पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने खूप मोठ्या पैशाची बक्षिसे जाहीर केली होती. ब्रिटीश सत्तेने भारतावर सुमारे दीडशे वर्षे सत्ता ज्या तऱ्हेने मिळवली व प्रस्थापित केली त्याच मार्गाने स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्याचे प्रयत्न केले जात होते. प्रति सरकारचे भूमिगत कार्यकर्ते जनतेच्या पाठिंब्यामुळे उघडपणे लोकांत वावरत होते. स्वातंत्र्य चळवळीबद्दल सहानुभूती असलेले पोलिस खात्यातील कर्मचारी व अधिकारी आपली नोकरी सांभाळून भूमिगतांना मदत करीत होते. तसेच भूमिगतांमधे वावरणारे काही कृतघ्न घरभेदे भूमिगतांच्या हालचालीची माहिती देऊन बक्षिसे, मानमरातब व पैसे मिळवून जगत होते. ज्यांची काळी कृत्ये भूमिगतांना समजली होती त्यांना प्रतिसरकारच्या नियमाप्रमाणे अद्दल घडविणाऱ्या शिक्षाही केल्या जात होत्या. पोलिसांना व पोलिसांच्या खबऱ्यांना भूमिगतांची दहशत होती, भीती होती पण पैशाच्या लोभामुळे काही घरभेदे पोलिसांच्या मायावी जाळ्यात अडकत होते व पोलिसांना मदत करीत होते. त्यामुळे पोलिसांना काही भूमिगतांना पकडण्यात यश मिळत होते. अजून भारताला स्वातंत्र्य मिळाले नव्हते, त्यामुळे स्वातंत्र्यलढा संपला नव्हता. त्यासाठी अनेकांची पोलिसांनी तुरुंगात रवानगी केली, तरी दुसरे त्यांची जागा घेऊन पोलिस यंत्रणेला आव्हान देत ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्याचे धाडसी प्रयत्न करत होते. नागनाथ नायकवडींना धुळे खजिना लुटीच्या गुन्ह्यामधे प्रमुख आरोपी म्हणून सरकारने ५०० रुपयांचे बक्षीस जाहीर करुन पकड वॉरंट काढले होते. अण्णांच्या हालचालींकडे डोळ्यात तेल घालून लक्ष देण्याच्या सूचना सरकारने पोलिसखात्यास



दिल्या होत्या. पोलिस त्यांचे मागावर लक्ष ठेवून त्यांचा पाठलाग करीत होते व अण्णांनी त्यांना चुकवून स्वातंत्र्य मिळविण्याचे पवित्र कार्य धाडसाने उघडपणे चालू ठेवले.

अण्णांनी २८जुलै १९४४ ला सेवादलाच्या वतीने किसानांची एक मोठी फेरी वाळव्यामधील हाळ या भागामधे आयोजित केली होती. त्यामधे लहान मुलांपासून अगदी ५०–६० वर्षापर्यंतचे शेतकरी सहभागी झाले होते. जवळजवळ ४०० शेतकऱ्यांची ही फेरी व मेळावा सायंकाळपासून चालू होता, तो रात्री ९ वाजता संपला. मेळाव्यास आलेले शेतकरी व कार्यकर्ते आपआपल्या घरी निघून गेल्यावर अण्णा व त्यांचे प्रमुख सहकारी कार्यकर्ते सुखावले होते, समाधानात होते.

त्या प्रसंगाबद्दल सांगताना अण्णा म्हणाले. ''दिवसभरच्या धावपळीमुळे आम्ही दमलो होतो. आमचे जिव्हाळ्याचे मित्र व सहकारी शंकरराव परुळेकर होते. त्यांचे अंगणातच आसपासच्या घरातून जमविलेल्या भाजी भाकरीचा पाहुणचार घेण्यासाठी आमची १०–२० जणांची पंगत बसली, सर्वांनी जेवण घेतले. त्यानंतर आम्ही शेजारच्याच तुकाराम देसाई यांच्या घरात झोपलो. पद्माळ्याचे नारायण जगदाळे हे वसंतदादा पाटील यांचे मावसभाऊ हे त्या दिवशी आमच्याकडे आले होते. ते मुक्कामास माझे बरोबर होते. तेही भूमिगत होते. नंतर धोत्रेवाडीचे बाबूराव खोत, वसगडेचे शामगोंडा पाटील आणि नांद्रेचे बाबूराव पाचोरे हे बाहेरचे पाहुणे म्हणून मेळाव्यासाठी आले होते. देसाई यांचे घरात झोपण्यास आम्ही एकत्रच होतो. आमच्यापैकी नारायण जगदाळे यांच्या हाताला खरुज आली होती त्यामुळे ते बैचेन झाले होते. त्यावर उपाय म्हणून त्यांनी रात्री अवेळी उठून अंगणात जाळ केला. हात शेकले व त्यानंतर परत येऊन झोपले. झोपताना दार बंद करणेस व दाराला कडी घालणेस ते विसरले. सताड उघड्या घरात आम्ही भूमिगत कार्यकर्ते डाराडूर झोपलो होतो.

त्या दिवसाचे दरम्यान आमच्या एका सहकारी भूमिगताचे पिस्तूल रामू गोटखिंडे याने पळविले होते. ते परत करण्याचा लकडा लावल्यामुळे व त्याला धमकी दिल्यामुळे तो दुखावला होता. तो आमचेवर सूड उगवण्यासाठी योग्य त्या संधीची वाट पहात होता. त्या करिता त्याने वाळवा येथील सदू आण्णा देशपांडे यांचेशी संगनमत करुन आष्टा पोलिस ठाण्याचे पोलिसांना आम्ही वाळव्यात मुक्कामास असलेची बातमी दिली. पोलिसांचे दृष्टीने ती फार मोठ्या आनंदाची बातमी होती. पोलिसांनी रामू गोटखिंडे याला पोलिसाचा ड्रेस दिला होता. त्या ड्रेसमधेच रामू गोटखिंडे वाळव्याचे सदू आण्णा देशपांडेस भेटणेस गेले असता सदू आण्णा देशपांडे कंदील घेऊन आपल्या घराबाहेर आले. त्यांच्या घराशेजारील बाळगौंडा यांची पत्नी दळण दळण्यास उठली असता तिने ते पाहिले होते. सदू आण्णा देशपांडे यांचेशी खलबते करुन रामू गोटखिंडे देसाईचे घराकडे आष्ट्याची पोलिस पार्टी घेऊन आला. रामू गोटखिंडे वाळव्यातच काही दिवस रहात होता, त्यामुळे देसाईचे घर त्याला माहिती होते. देसाईचे घर नारायण जगदाळेच्या हलगर्जीपणामुळे उघडेच राहिले होते. घर उघडे असलेमुळे पोलिसांना देसाईचे घरात सहज प्रवेश मिळाला.

आष्टा पोलीस स्टेशनचा फौजदार अहमदी व पोलिस पार्टी एकदम घरात शिरली. शंकरराव परुळेकर त्यामुळे प्रथम जागे झाले व ते अण्णांना हलक्या आवाजात म्हणाले, ''अण्णा

घात झाला!'' त्यामुळे मी डोळे उघडले होते. पोलिसांनी रायफलीची बॉनेट माझ्यावर रोखली होती ती मला दाखवली. त्यावेळी माझे कोटाचे खिशात ७ बारी पिस्तूल पोलिसांना मिळाले तसेच शे-दोनशे रुपयेही मिळाले. अशा परिस्थितीत मी काहीही हालचाल केली नाही. नंतर पोलिसांनी मला, नारायण जगदाळे, बाबूराव खोत, बाबू पाचोरे, शामगौंडा पाटील, शंकरराव परुळेकर अशा सहा जणांना दिनांक २९ जुलै १९४४ रोजी पकडून वाळव्याचे चावडीत आणले. चावडीत एक हत्यारबंद पोलिस पहारा करीत होता. आम्हाला अटक झाल्याची बातमी गावामधे वाऱ्यासारखी पसरली. आमचे वाळव्यातील सहकारी चावडीसमोर जमले व चावडीचा कट्टा चढून आले. पण त्यांना चावडीत प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी सगळा गाव जागा केला. ज्यावेळी आम्हाला पोलिस पकडून न्यावयास लागले त्यावेळी हजारो शेतकऱ्यांनी पोलिसांचा पाठलाग केला. जमाव आमचे मागे येत आहे हे पाहून लोकांना आम्ही सांगितले की, ''कोणीही पुढे येऊ नका'' त्यानंतर लोक परत गावात जाऊन चर्चा करीत बसले. त्या दिवशी अक्षरश: वाळवा गावात अनेकांच्या घरातील चुली पेटल्या नव्हत्या. गावांत शोककळा पसरली होती, तसेच पोलिसांना ज्या घरभेद्यांनी आमच्या मुक्कामाची बातमी दिली, त्यांचेबद्दल सुडाची व तिरस्काराची भावना आपोआपच पसरली होती.

दुपारी वाळव्याचा पोष्टमन रामचंद्र शिंदे टपाल पेटीतील पत्रे गोळा करणेस गेला असता त्याला पोष्टाचे पेटीत एक पाकीट मिळाले. त्यावर पत्ता असा होता की, ''डी. एस. पी. सातारा'' रामभाऊ शिंदे मनाने देशभक्त होते. त्यांचे गाव देवराष्ट्रे होते. रामभाऊ शिंदे यशवंतराव चव्हाणांचे प्राथमिक शाळेतील वर्गमित्र होते. भूमिगत कार्यकर्त्यांबद्दल त्यांना सहानुभूती होती. डी. एस. पी. च्या नावाने पोष्टाचे पेटीतील पाकीटाबद्दल शिंदे पोस्टमन यांना जिज्ञासा निर्माण झाली. त्यांनी ते पाकीट फोडून वाचले. ते पत्र आमच्या कार्यकर्त्यांकडे आणून दिले. कार्यकत्यांनी ते पत्र वाचले व राष्ट्रोध्दारक देशपांडे म्हणाले की, 'हे पत्र सदू आण्णा देशपांडे यांच्या हस्ताक्षरातील व सहीचे आहे.' हे ऐकल्याबरोबर त्या ठिकाणी जमलेले शेकडो लोक उठले, सदू आण्णांचे घराकडे गेले. त्यांना घराबाहेर काढले, उचलले व गावाच्या बाहेर एक फर्लांगावर आष्टा रस्त्यावर नेले. तेथे सदू देशपांडे याचा उजवा हात, डावा पाय तोडला. त्याला तेथे टाकून लोक निघून गेले. ही बातमी पोलिसांना मिळाल्याबरोबर पोलिस आले व देशपांडेचे हात पाय कोणी तोडले याची चौकशी सुरु केली. पोलिसांनी संशयावरुन १) नारायण कदम (शिराळकर), २) खंडू सखाराम शेळके (दाजी) ३) किसन अत्माराम अहिर (पैलवान) ४) किसन गोविंदा जाधव ५) सखाराम तुकाराम घोरपडे (काका) ६) पांडू गणू पाटील ७) दिना हिंदू नायकवडी ८) रामचंद्र संतू अहिर (मास्तर) वगैरे २०-२२ लोकांवर गुन्हा नोंद केला पण वरील सर्व फरारी होते. त्या चौकशीवर सर्व गावकऱ्यांनी बहिष्कार घातला. त्यामुळे पोलिस चौकशीत काहीही निष्पन्न झाले नाही. पण पोलिसांना सहकार्य करणाऱ्यांवर दहशत मात्र बसली.

बाबूराव देशपांडे नावाचे अनेक गावात वतन असणारे वतनदार वाळवा येथे कोटभागावर राहात होते. त्यांनी मात्र उघडपणे पोलिसांना सहकार्य करुन पोलिसांना जेवण दिले. गावातील भूमिगत कार्यकर्त्यांची माहिती दिली आणि बैलगाडीतून पडवळवाडीपर्यंत पोलिसांना सोडायला दिनांक ३१ जुलै, ४४ रोजी गेले होते. पडवळवाडीत सर्व्हीस मोटार गाडीत फौजदार व पोलिस



पार्टीला बसवून नारायण अनंत उर्फ बाबूराव देशपांडे वाळव्यास परत येत होते. ही दिवसाढवळ्या घडलेली गोष्ट पडवळवाडीचे सर्व ग्रामस्थ पहात होते. त्यामुळे पडवळवाडीचे ग्रामस्थ अस्वस्थ झाले होते. त्यांचा राग अनावर झाला. पडवळवाडीच्या ग्रामस्थांनी बाबूराव देशपांडे यांचा उजवा हात व डावा पाय तोडला. सदू आण्णा देशपांडे व बाबूराव देशपांडे यांच्या हातापायाचे कलम केले असे त्या घटनेबद्दल लोक म्हणत. बाबूराव देशपांडे यांस जबर दुखापत करणेच्या आरोपाखाली पोलिसांनी पडवळवाडीच्या १) तुकाराम नाना खोत (वस्ताद) २) कृष्णा रामा करमाळकर (तात्या) ३) हरी गणू कदम (भाऊ) ४) यशवंता बापू करमाळकर ५) महादेवराव अनुसे (देवास) धनगर ६) शाम उर्फ तुकाराम साधु कुंभार ७) दत्तू लखू बाड यांना आरोपी केले होते पण ते सर्व फरारी झाले होते.

मी इस्लामपूर लॉकपमध्ये होतो. दुसरे दिवशी डी. वाय. एस. पी. भोसले माझे कडे आले सावंत फौजदारांचे खोलीत ते मला म्हणाले, वाळवा व पडवळवाडीत काल एक व परवा एक देशपांडे प्रकरण झाले, हे थांबले पाहिजे. मी सांगितले, मलाही तेच पाहिजे आहे. काहीही करा पण हे थांबले पाहिजे त्याकरिता बाळकू पाटील नावाचा कामेरी येथील एक विद्यार्थी आहे त्यास बोलवा म्हणून सांगीतले, त्याचेकरवी वाळवा ग्रामस्थांना माझे विचार कळवतो. पोलिसांनी बाळकू पाटील याला बोलावून आणले. त्याला मी असे सांगितले की वाळव्यास जाऊन माझे वडिलांना भेट, किसन अहिर पैलवानांना भेट व त्यांना असे सांग की तुम्ही काहीही आततायी काम करु नका, तुम्ही शांत रहा, मी थोडयाच दिवसात परत येत आहे.

हा निरोप कळल्यावर दुसरे दिवशी माझे वडील व आई मला इस्लांमपूर पोलिस लॉकअपमध्ये भेटण्यास आले. सावंत फौजदार मला म्हणाले की माझ्या खोलीत आई वडिलांना भेटा. खोलीचे दार ओढून घेतो. आई वडिलांना काय सांगायचे ते सांगा. वडिलांनाही मी तेच सांगितले की लोकांनी शांत राहावे व मी लवकरच परत येईन. वडिलांनी विचारले कसे येणार? त्यावर मी म्हणालो, जेलच्या तटावरुन उडी मारुन येणार, त्यावर वडील म्हणाले तसे केलेस तर पोलिस गोळी मारतील. तसे काही करु नकोस, असे सांगून आई वडील निघून गेले.

इस्लामपूरमध्ये मी लॉकअपमधे असताना माझे सहकारी वाय. सी. पाटील पत्राने संपर्क साधून होते. आंघोळ केल्यावर ओले धोतर वाळत घालण्यास लॉकअपचा पाणक्या कर्मचारी येत होता. धोतराच्या शेवटच्या कोपऱ्यात चिठ्ठी बांधून मी पाठवत होतो व धोतराचे कोपऱ्यातून मला चिठ्ठी वाय. सी. पाटील पाठवत असे. यासाठी लॉकअपचा कर्मचारी बेमालूम आम्हाला मदत करीत होता. बाहेर पडण्याच्या आमच्या योजनेस मूर्त स्वरुप येणार अशा वेळी एक दिवशी वाळलेल्या धोतराच्या कोपऱ्यातील चिठ्ठी खाली पडली व ती तेथे पहाऱ्यास असलेल्या पोलिसांनी पाहिली. फौजदाराकडे ती चिठ्ठी गेल्याबरोबर दुसरे दिवशी सावंत फौजदाराने मला सातारा सब जेल दाखविला. तो दिवस बुधवार होता. मला दुपारी ४ वाजता सातारा जेलमधे नेले. तेथे माझ्या पूर्व परिचयाचे कैदी होते. मला इस्लामपूरहून सातारा जेलमधे पाठवलेची बातमी कामेरीचे एस. बी. पाटील या तेथे असलेल्या कैदी सहकाऱ्यांला लगेच समजली. जेलच्या गेटवर एस. बी. पाटील येऊन थांबले होते.

सातारा जेलमधील लॉकअपमधे असताना चार पोलिस आम्हाला सकाळी शौचास

खोलीबाहेर काढायचे. नंतर खोलीतच आंघोळ करावी लागत असे. शौचास बाहेर पडताना व परत जाताना एस. बी. पाटील यांची भेट घडत असे. पोलिसांचा डोळा चुकवून आम्ही योजना आखीत होतो व बाहेर पडण्याचा मार्ग शोधत होतो. शेवटी एस. बी. पाटील यांनी माझी बाहेर जाण्याची योजना आखली. माझे बाहेर जाणेचे ८० टक्के श्रेय एस. बी. पाटील यांनाच आहे. जसे धुळे खजिना लुटीचे श्रेय फकिरा देवरे यांना आहे. तसेच माझ्या सातारा जेलमधून बाहेर पडण्याचे श्रेय एस. बी. पाटील यांना आहे. एस. बी. पाटील सातारा शहरात बरेच दिवस असलेमुळे त्यांना शहरातील रस्त्यांची माहिति होती. जेल भोवतालची सर्व परिस्थिती माहित होती. मला त्यांनी योजना सांगितली व ते कामाला लागले. एक एक कैदी मित्र मदतीस गोळा केले. वशीचे साळी, नेर्लेचे शामू रामा पाटील यांनी खाली भिंतीकडे तोंड करुन उभे राहावयाचे, एस. बी. पाटील यांनी त्या दोघांच्या खांद्यावर दोन पाय द्यावयाचे, त्या दोघांनी व एस. बी. पाटील यानी खाली बसायचे व मी नंतर एस. बी. च्या खांद्यावर बसून भिंत पकडायची व बाहेर पडायचे, अशी आखणी पूर्ण झाली. आम्ही बुधवारी सायंकाळी फिरायला जाण्याचे नाटक केले व शनिवारी बाहेर पडण्याची योजना पक्की झाली.

हिरू नावाचा एस. बी. पाटील यांचा कैदी मित्र होता. तो लांब मुदतीची शिक्षा भोगत होता. त्याची रविवारी १० सप्टेंबरला मेसमधे कामाची पाळी होती. त्याने एका पोलिसास मेसचे सामान देणेच्या निमित्ताने पोलिसास गुंतवून ठेवले. नागठाणे ता. तासगांव येथील पोलिस अडिसरे त्या दिवशी ड्युटीवर होता. बर्डे मास्तर व मी एकाच खोलीत होतो. बर्डे मास्तर खोलीचे पाठीमागे प्रातर्विधी व आंघोळीस म्हणून गेले. त्यामुळे अडिसरे पोलिस बर्डे मास्तरांच्यावर देखरेख ठेवण्यास गेला होता. एक पोलिस हवालदार खोलीची कुलपे नीट लावली आहेत की नाहीत याची तपासणी करीत होता. ठरल्याप्रमाणे मी जेलच्या भिंतीवरुन उडी मारली. पूर्वेकडील बाजूच्या भिंतीचे बाहेरील दुसरी भिंत पडली होती. तेथे तारेचे कंपाउंड घातले होते. परंतु खेळणाऱ्या मुलांनी दोन तारांमधून बाहेर जाणेची वाट केली होती. जरा इकडे तिकडे पहात तोंड न वळवता तारेच्या बोळक्यातून बाहेर आलो व समोरच्या पोलिस लाईनकडे गेलो. जाता जाता कोणास शंका येऊ नये म्हणून हरळी उपटून घेतली होती. समोरच्या पोलिस लाईनीतील घरात पोलिसही नव्हता व घरात कोणी बाई माणूसही नव्हते, पायरीवर पाय ठेवला त्याच पायावर गिरकी घेतली. पोलिस लाईनीमधून बाहेर आलो. पुढे जात असताना जोशी वकीलांच्या नावाची पाटी दिसली, दारातून आत गेलो, तर तेथे पंचम जॉर्जचा फोटो पाहून चुकीच्या घरात आल्याचे लक्षात आले तेवढ्यात आतून कोण आहे.? महिलेने चौकशी केली. 'वकीलांच्याकडे काम होते' असे म्हणाल्यावर 'बसा' म्हणून सांगितले. 'पुन्हा येतो'! असे सांगून मी बाहेर पडलो. तोवर एक गावकरी दूध घालणेस जोशी वकिलांकडे आला होता, तो दूध घालून बाहेर पडल्यावर त्याचेबरोबर बोलतच मी चाललो. त्याला भाऊराव पाटील यांच्या घरचा पत्ता विचारला. तेवढ्यात रस्त्याचे बाजूस कार्यकर्ते जाजू यांचे दुकान दिसले. त्यांना मी म्हणालो, ''मी आताच जेल फोडून बाहेर आलो आहे. मला आजच्या दिवसापुरता आसरा द्याल का?'' ते म्हणाले, 'ही जागा सुरक्षित नाही.' त्यावर मी म्हणालो, 'ठिक आहे मला कर्मवीर अण्णांचे घर दाखवा.' असे म्हंटल्यावर जाजूंनी आपल्या भाच्यास बरोबर दिले. थोडे अंतर चालून गेल्यावर कर्मवीर आण्णांच्या



घरचा रस्ता माझ्या लक्षात येताच त्याला परत पाठवून दिले व मी कर्मवीर आण्णांच्या घरात गेलो. त्यावेळी तेथे मावशीबाई आणि सुखटणकर आपल्या मोठ्या मुलीला खांद्यावर टाकून उभे होते. त्यांना मी म्हणालो, तुम्ही मला ओळखत नाही. मी तुम्हाला ओळखतो. मी जेलमधून आलो आहे. गनी भाईंना बोलवा. सुखटणकर यांनी ए. डी. आतार यांना बोलावून घेतले होते. तोपर्यंत मी कर्मवीर आण्णांचे कॉटवर गाढ झोपलो होतो. ए. डी. आतार आल्यावर त्यांनी मला हालवून जागे केले व पाठीमागचे दाराने आपल्या घरी नेले. त्यांच्या पत्नीने आम्हा दोघांना जेवायला वाढले पण मला घास गिळवेना त्यावर गनी अत्तार म्हणाले 'नागनाथ जेव, अरे बाबा या गनी अत्तारचा अगोदर मुडदा पडेल. मगच पोलीस हुंबऱ्याच्या आत पाऊल ठेवतील.' ते एका शिक्षकाच धाडस बघून मी पोटभर जेवलो. त्यापुर्वी पोलीसांनी मला वाळवे येथे पकडल्यापासून पूर्ण एक भाकरी खात नव्हतो त्यातील एक घास बाजूला काढून ठेवत होतो. परंतु त्या दिवशी मात्र पोटभर जेवलो. सायंकाळी रयत शिक्षण संस्थेच्या सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेजच्या वसतिगृहामधे मला जेवावयास घातले. वशीचे महादेव पाटील व आष्ट्याच्या सनदे या विद्यार्थ्यांची भेट घालून दिली.

एक दिवस महादेव पाटील व सनदे यांचे खोलीत थांबून पोलिसांचा डोळा चुकवून धनिनिच्या बागेतून आम्ही रात्रीचे वेळी गावाबाहेर पडलो. मेढयाचे रस्त्याने जात असताना एक मोकळी बैलगाडी मेढ्याकडे जात होती, त्या गाडीवानाने आम्हाला गाडीत घेतले व असा प्रवास करीत करीत मेढ्याचे दक्षिणेकडील ऐकीव या छोट्या गावी आम्ही पोहोचलो. तेथे रयत शिक्षण संस्थेची एक व्हॉलंटरी शाळा होती. मला शाळा तपासणी करण्यास आलेले इन्स्पेक्टर म्हणून तेथे नेले. तेथे शिगावचे भगवान पाटील शिक्षक होते. त्यांचेकडे जेवण करुन निघालो ते थेट सुपने, तांबवे येथे आलो. तेथील भूमिगत कार्यकर्ते डी. जी. पाटील यांच्या मळ्यातील घरात येऊन थांबलो. त्यांनी कराडला यशवंतराव चव्हाणांना ही बातमी कळवली. त्याबरोबर यशवंतराव चव्हाण मला भेटण्यास तांबवे येथे आले. त्यानंतर धन्वंतरी कासेगावकर वैद्यही आले. पांडू मास्तर तर पूर्वीपासूनच तेथे होते.

भूमिगत कार्यकर्त्यांची पोलिसांना माहिती पुरवणारा पोलिसांचा खबऱ्या रामू गोटखिंडे पोलिस संरक्षणात आष्टा येथे आरामात राहात होता. माझ्या सहकाऱ्यांनी त्यांचेवर पाळत ठेवली होती. त्याला धडा शिकवण्याची वाट पहात होते. शेवटी एके दिवशी पाणी आणण्यासाठी विहिरीत उतरलेवर तेथेच त्याचेवर हल्ला करुन कंठस्नान घातले. त्याच्या देशद्रोहाची शिक्षा त्याला मिळाली व हकनाकपणे त्याने आपला जीव गमवला. अशा तऱ्हेने दोन देशद्रोह्यांची हातपाय तोडून कलमे केली व तिसऱ्याचे झाडच उपटून टाकले.

अण्णांच्या या पराक्रमाच्या घटना ऐकत असताना मला एक ऐतिहासिक योगायोग आठवला.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये आपल्या जिवाची बाजी लाऊन ज्या क्रांतिवीरांनी महाराष्ट्रातील प्रतिसरकारचा इतिहास घडविला, त्यामधे एकाच सातारा जिल्ह्यातील तीन क्रांतिवीरांच्या धाडसी कार्यामधे योगायोगाने साम्य पहावयास मिळते.

क्रांतिवीर किसन वीर यांचा जन्म पवित्र कृष्णा नदीचे जे तीर्थक्षेत्र दक्षिण काशी म्हणून

ओळखले जाते, त्या वाई शहरामधे ११ ऑगस्ट १९०६ रोजी झाला. त्यानंतर कृष्णा नदीच्याच काठी वाळवा येथे ज्या गावाला १८८५ साली अखिल भारतीय काँग्रेसचे पहिले अध्यक्ष ॲलेन ह्यूम व लोकमान्य टिळक यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक घेतली होती, त्या ऐतिहासिक वाळवा गावात क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचा जन्म १५ जुलै १९२२ साली झाला. तसेच याच कृष्णा नदीच्या विशाल पात्राकाठी पद्माळे या गावी स्वातंत्र्य सेनानी वसंतदादा पाटील यांचा जन्म दि. १३ नोव्हेंबर १९१७ रोजी झाला.

या तिन्ही लोकनेत्यांना राजकीय वारसा नव्हता. तिन्ही नेते सर्व सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मले, पण स्वत:च्या कर्तबगारीवर त्यांनी अद्वितीय अशी राजकीय कामे करुन इतिहास घडविला.

क्रांतिवीर किसनवीरांचे पूर्वज वारकरी पंथाचे, शाकाहारी होते व त्यांचे बालपण वाई या दक्षिण काशीत गेले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे पूर्वज मुंगी पैठण या तीर्थक्षेत्रातून कराडला कृष्णा काठी आले. नंतर येलूर येथे आल्यानंतर तेथे काही पूर्वज थांबले व काही वाळवा येथे स्थायिक झाले. नागनाथ अण्णा यांचेही पूर्वज वारकरी शेतकरी कुटुंबातील होते. तसेच स्वातंत्र्य सेनानी वसंतदादा पाटील यांचे पूर्वज महाराष्ट्रीयांचे कुलदैवत तुळजापूरच्या भवानी मातेचे पुजारी होते व त्यापैकी काही पद्माळे येथे येऊन स्थायिक झाले. तिन्ही क्रांतिवीरांचे पूर्वज कोणत्यातरी तीर्थक्षेत्री राहात होते, वारकरी व शाकाहारी होते!

त्यानंतर स्वातंत्र्यसंग्रामामध्ये तिन्ही स्वातंत्र्य योध्दयांनी ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. ब्रिटीश सत्तेला धडकी बसावी अशी ऐतिहासिक कार्ये त्यांनी केली आहेत. किसन वीर यांना ब्रिटीश सत्तेने येरवडा जेलमधे स्थानबध्द करुन ठेवले होते. पण त्यांनी आपल्या साथीदारांसह अभेद्य अशा येरवडा जेलच्या भिंतीवरुन उडी मारुन दि. ३१ ऑक्टोबर १९४२ रोजी भूमिगत झाले होते. वसंतदादा पाटील यांनाही ब्रिटीश सरकारने अटक करुन सांगली जेलमधे स्थानबध्द केले होते, पण तेही आपल्या १३ साथीदारांसह सांगली जेलच्या तटावरुन उडी मारुन भूमिगत झाले. दुर्दैवाने पोलीसांनी त्यांचा पाठलाग करुन जखमी केले, त्यामुळे पुन्हा त्यांना अटक झाली तसेच नागनाथ अण्णा नायकवडी यांनाही ब्रिटीश सरकारच्या पोलिसांनी अटक करुन सातारा जेलमधे स्थानबध्द केले होते. पण त्या जेलच्या अभेद्य अशा तटावरुन उडी मारुन आदरणीय अण्णा दि. १० सप्टेंबर १९४४ रोजी स्वतंत्र झाले व भूमिगत झाले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा पुन्हा जोमाने चालू ठेवला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शेतकरी समाज बांधवांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास घडविण्यासाठी प्रयत्न केला आहे. किसन वीरांनी भुईंज ता. वाई येथे १९७१ मधे सहकारी साखर कारखाना सुरु केला व वाई येथे आर्टस्, सायन्स व कॉमर्स महाविद्यालय जून १९६२ मधे सुरु केले. नागनाथ अण्णा नायकवडी यानी वाळवा येथे जून १९४९ साली किसान शिक्षण संस्थेची स्थापना करुन हुतात्मा किसन अहिर यांच्या नावचे हुतात्मा किसन अहिर विद्यालय सुरु केले, मुलांच्यासाठी हुतात्मा नानकसिंग वस्तीगृह व मुलींच्यासाठी सावित्रीबाई फुले वस्तीगृह व जिजामाता विद्यालय सुरु केले. या शिक्षण संस्थेच्या आर्थिक अडचणी सोडवणेसाठी व शेतकऱ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर



कारखाना १९८१ साली सुरु केला. पुढे हुतात्मा नानकसिंग विद्यालय व क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय यांची उभारणी झाली. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याने साखर उताऱ्यामध्ये भारतात प्रथम क्रमांक मिळविला आहे व आजपर्यंत टिकवला आहे. तो 'हुतात्मा पॅटर्न' म्हणून आज भारतात प्रसिध्द आहे. वसंतदादांनी आशिया खंडात जास्त गळीत करणारा 'शेतकरी सहकारी कारखाना' माधवनगरमधे सन १९५६ मधे सुरु केला व बुधगाव येथे इंजिनिअरिंग कॉलेज सुरु केले.

राजकीय क्षेत्रात तिघांनीही आपले बहुमोल योगदान दिले आहे. किसन वीर विधान परिषदेचे सदस्य व लोकसभेचे सदस्य होते. नागनाथ अण्णा नायकवडी दोन वेळा विधान सभेचे सदस्य होते व लोकसभेच्या चार निवडणुका त्यांनी लढविल्या. वसंतदादा विधानसभेचे सदस्य होते व चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले व राजस्थानचे राज्यपालही झाले होते. काँग्रेस पक्षाचे किसन वीर व वसंतदादा आधारस्तंभ होते, तसेच नागनाथ नायकवडी डाव्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे व पुरोगामी विचारांच्या चळवळीचे आधारस्तंभ आहेत. समाजवादी पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे सदस्य व महाराष्ट्राचे प्रदेश अध्यक्ष आहेत.

वरील तिन्ही लोकनेते होते, शेतकऱ्यांचे खरे प्रतिनिधित्व करीत होते. सामाजिक व राजकीय अन्याय दूर करण्यास या तिन्ही नेत्यांनी पुढाकार घेतला. म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या जनमानसात स्वयंभू व स्वयंप्रकाशित व्यक्तिमत्त्व म्हणून आपले स्थान कायम राखले आहे.

क्रांतिवीर किसन वीर अल्पसंख्याक समाजापैकी असूनसुध्दा त्यांनी स्वातंत्र्य मिळाल्यापासून सातारा जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे नेतृत्व अखेरपर्यंत केले. मा. यशवंतराव चव्हाणांचे विश्वासू सहकारी म्हणूनही त्यांनी मान्यता मिळवली होती. मा. वसंतदादा यांनी महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्रीपद व राजस्थानचे राज्यपाल पद भूषवले होते. त्याचबरोबर दिल्लीमध्ये अ. भा. काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून उत्तर प्रदेश व दिल्ली प्रदेशामध्ये काँग्रेस पक्षाचे महत्त्वाचे काम केले होते. आपल्या कार्याने त्यांनी महाराष्ट्राचे नाव दिल्लीत गाजवले होते. मा. नागनाथ अण्णांनी तर ओळख नसतानासुध्दा पंजाबमधील मन्सासिंग व नानकसिंग या दोन माजी सैनिकांना दिल्लीतून सातारा जिल्ह्यात आणले होते. त्यांच्या मदतीने शिराळा पेट्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांना हत्यारे वापरण्याचे प्रशिक्षण आझाद हिंद फौजेच्या धरतीवर दिले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचेच अनुकरण क्रांतिवीर अण्णांनी केले. साताऱ्च्या प्रतिसरकार लढ्यातील नागनाथ अण्णांचे हे धाडस सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखे आहे.

नियतीच्या निर्णयामुळे मला वरील तिन्ही क्रांतिवीरांचे चरित्र लिहिण्याची संधी मिळाली व मी चरित्र लेखन कार्यामधे कृतार्थ झालो आहे. या महान नेत्यांच्या चरित्रा बरोबर माझ्या चरित्र लेखनाचे भरपूर कौतुक झाले आहे व होत आहे व होणारही आहे.

* * * *

५

# ऐतवडे बु।। येथील पोलिसांच्या छाप्यातून धाडसाने मुक्त

क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी सांगाव पोलिस चौकीतून पोलिसांची हत्यारे मोठ्या धाडसाने पळवली होती. शेणोली येथील घाटात पे ट्रेन लुटली होती. धुळे खजिना लुटीत महत्त्वाची भूमिका पार पाडली होती त्यामुळे ब्रिटीश सरकारच्या सातारा पोलिसांपुढे नागनाथ अण्णा एक आव्हान होऊन बसले होते. जसे छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याद्वारे आदिलशाहीला हादरे देऊन त्यांचे किल्ले घेतले आणि महाराष्ट्रात आपली हुकुमत प्रस्थापित केली. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूर दरबारमधील अफजलखान नावाच्या सरदाराने ''शिवाजीस पकडून किंवा त्याला मारुन येणारच''अशी प्रतिज्ञा करुन आलेल्या त्या बलाढ्य सरदारास शिवाजी महाराज यांनी अद्दल घडविली हा इतिहास आपण वाचतो. अगदी तसाच इतिहास नागनाथ अण्णांनी सह्याद्रीच्या कडेकपारीत वारणा खोऱ्यात घडविला.

ऐतवडे बु।। ही कर्मवीर भाऊराव पाटील यांची जन्मभूमी. त्यांनी रयत शिक्षण संस्थेद्वारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय करुन महत्त्वाची देशसेवा केली. त्यांची ही जन्मभूमी ही १९४२ च्या क्रांती लढ्यातील भूमिगत कार्यकर्त्यांची कर्मभूमी होती. क्रांति वीरांगना राजमती पाटील या ऐतवडे येथीलच होत्या. त्यांनी पुढाकार घेऊन ऐतवडे येथे स्वामी रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी व सेवादलाच्या कार्यकर्त्यांचा एक मेळावा आयोजित केला होता. हेतू हा होता की, शेतकरी मेळाव्याचे निमित्ताने भूमिगत कार्यकर्ते एकत्र येतील व पुढील कार्याबद्दल विचार विनिमय करता येईल.

६ जानेवारी १९४५ ला स्वामी रामानंद भारती यांची तुरुंगातून मुक्तता झाल्यावर त्यांनी ग्रामराज्याचा व सेवादलाचा प्रचार धुमधडाक्याने सुरु केला होता. जिल्ह्यामधे सभाबंदी व



भाषण बंदी असताना स्वामीजींनी १८८ सभा घेऊन जनतेमधे चैतन्य निर्माण केले होते.

या मेळाव्यास नागनाथ अण्णा, वाय. सी. पाटील वगैरे सहकाऱ्यांसह उपस्थित होणार असा पोलिसांचा अंदाज होता. सातारा जेल फोडून बाहेर आल्यावर सातारा पोलिसांनी ठरविले होते की कोणत्याही परिस्थितीत नागनाथ अण्णांना पकडायचेच. प्रतिसरकारमधील नागनाथ अण्णा एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून ओळखले जाऊ लागले होते व तशी नोंद पोलिस दप्तरी झाली होती म्हणून क्रांतिकारी भूमिगत कार्यकर्त्यांना धडा शिकवण्यासाठी ब्रिटीश सरकारने गिल्बर्ट नावाचा पोलिस खात्यात नावाजलेला एक पोलिस अधिकारी नेमला होता. त्याने अण्णांना पकडण्याचा विडा उचलला. बंगालमधील क्रांतिवीरांची चळवळ मोडून काढण्यात त्याला यश आले होते. त्यामुळे त्याला वाटले की नागनाथ (अण्णा) नायकवडी सारख्या भूमिगत कार्यकर्त्यांस आपण सहज पकडू शकू अशी घमेंड तो बाळगून होता. परंतु नागनाथ अण्णांनी त्याची घमेंड जिरवली व सातारा जिल्ह्याच्या प्रतिसरकारचे पाणी काय असते याचा प्रत्यक्ष अनुभव त्याला करुन दिला होता.

ऐतवडे बु।। गावी भूमिगतांचा मेळावा घेण्याचे कारण म्हणजे सर्व ऐतवडे गावाचे ग्रामस्थ शेतकऱ्यांची भूमिगतांना व त्यांच्या चळवळीला सहानुभूती होती.

ऐतवडे येथील भिमराव गायकवाड हा एक अत्यंत हुशार शेतकरी होता. त्यांची व नागनाथ अण्णांची दोस्ती जमली होती. गावाबाहेरच्या उत्तरेकडील ओढ्याकाठच्या मोकाश्याच्या जुन्या विहिरीच्या आत पिंपर्णीचे एक झाड उगवले होते. विहिरीच्या बगाडाखाली त्या झाडाच्या पारंब्या विहीरीत लोंबत होत्या व त्या पारंब्याची जाळीच निर्माण झाली होती. एके दिवशी ऐतवडे येथे नागनाथ अण्णा गेले असता त्यांनी भिमराव गायकवाड याला सुचविलेवरुन विहिरीत पिंपर्णीच्या पारंब्या पाठीमागे गुहे सारखी संकटाचे वेळी उपयोगी पडेल अशी जागा अगोदरच करुन ठेवली होती. आयत्या वेळी त्या जागेचा फार चांगला उपयोग नागनाथ अण्णा यांनी करुन घेतला.

त्या प्रसंगाबद्दल सांगताना आदरणीय नागनाथ अण्णा म्हणाले, ''स्वामी रामानंद भारती महाराज ऐतवड्याच्या शेतकरी मेळाव्यास आले त्यांनी भूमिगत कार्यकर्त्यांना व जमलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.'' कार्यक्रमानंतर स्वामी रामानंद भारती, मी, वाय. सी. पाटील वगैरे कार्यकर्ते मंडळी क्रांति वीरांगना राजमती पाटील यांचे घरी जेवण्यास गेलो. राजमती पाटील यानी मुद्दाम पुरणपोळीचा बेत पाहुण्यांसाठी केला होता. कार्यकर्ते मंडळींसाठी राजमती पाटील यांच्या घराच्या मागील दाराशी हात धुण्यासाठी पाण्याचा हंडा ठेवला होता. पाने वाढली होती. एक एक जण हात पाय धुऊन पानावर बसत होता. केळीच्या पाना भोवती रांगोळ्या काढल्या होत्या. जेवण्याचे पदार्थ वाढावयास सुरवात झाली. मी उभा राहिलो होतो. बसण्यापूर्वी सहज माझे लक्ष बाहेरच्या दाराकडे गेले तोच डी एस. पी. गिल्बर्ट हातात रिव्हॉलवर घेऊन पुढच्या दारातून घरात पाऊल टाकीत असल्याचे मी पाहिले. माझ्यात व गिल्बर्ट यांच्यात २० फुटाचे अंतर असावे. गिल्बर्टला पाहिल्याबरोबर मी पाठीमागच्या दाराने परड्यातील छातीइतक्या उंचीच्या तटावरून उडी टाकून आमच्या छुप्या आश्रयाच्या विहीरीकडे पळू लागलो. माझ्या

पाठोपाठ गिल्बर्ट व पोलिस वाढलेल्या अन्नाची पाने तुडवीत माझ्या मागे आले. मी जिवाची पर्वा न करता विहीरीचे लक्ष गाठण्याची शिकस्त करुन पळत होतो. गावाबाहेरचा ओढा मी ओलांडला. ओढ्यात गुडघाभर पाणी होते. माझ्या पायाची पाण्यात झालेली खळबळ गिल्बर्टने पाहिली व माझ्यामागे विहिरीपर्यंत येऊन पोहोचला होता, पण मी त्यापूर्वी विहीरीच्या बगाडा खालील पिंपर्णीच्या पारंब्याना धरुन विहिरीत उतरलो व पारंब्यामागील घळीत जाऊन बसलो होतो. गिब्लर्टने व पोलिसाने विहिरीला फेरे घातले, पण माझा ठावठिकाणा त्यांना लागला नाही. आत्तापर्यंत पाठलाग केलेली शिकार हाती न लागल्याने गिल्बर्ट पाय आपटीत पुन्हा राजमती पाटील यांच्या घरी आला.

या पोलिस छाप्यातून निसटणे तसे महाकठीणच होते. परंतु प्रसंगावधान व धाडसी निर्णयामुळे पोलिसांना चकवता आले. तसेच संभाव्य संकटांना तोंड देण्याकरिता पूर्व योजना असलेमुळेच मी या संकटातून निसटलो होतो.

गिल्बर्ट व पोलिस राजमती ताईंच्या घरी आले व त्यांनी त्यांना तुझे नाव काय म्हणून विचारले, त्यावर ताईंनी ''माझे नाव सुमती'' असे सांगितले गिल्बर्ट हे ऐकून घराबाहेर आले. तेथे पोलिस पाटील उभे होते. गिल्बर्टनी पोलिस पाटील यांना विचारले ''राजमती पाटील'' कोठे आहेत. तर पोलिस पाटील यांनी सांगितले की ''सुमती'' नाव सांगितलेली महिला हीच राजमती पाटील आहे. घराबाहेरील अंगणात चाललेले संभाषण राजमतीताई पाटील यांनी ऐकले व क्षणाचाही विलंब न लावता घराच्या मागच्या तटावरून उडी मारुन निघून गेल्या. गिल्बर्ट राजमती पाटील यांना पकडण्यासाठी घरात आला. चौकशी केली, पण पोपट पिंजऱ्यातून केंव्हाच निघून गेला होता. अशा तऱ्हेने गिल्बर्ट व पोलिसांच्या हाती काहीही मिळाले नाही व पोलिसांची फटफजिती झाली.

वास्तविक पाहता राजमती पाटील ताईंनी त्या दिवसाचा कार्यक्रम व जेवण आयोजित केले होते. स्वामी रामानंद भारती यांची ते आजारी असताना सेवा सुश्रुषा केली होती. पण त्या दिवशीच्या प्रकारामुळे ताईना खूप वाईट वाटले होते. दुःख बाजूला सारुन ताईसुध्दा पोलिस छाप्यातून निसटल्या होत्या.

त्यानंतर पोलिसांनी राजमती पाटील यांच्या वडिलांना व इतर नातेवाईकांना खूप मारहाण केली, खूप त्रास दिला. भूमिगतांबद्दलचा ठाव ठिकाणा विचारला पण त्यामधे पोलिसांना यश आले नाही आणि मोकळे हात हालवित परत जावे लागले होते. तो पोलिसांच्या दृष्टीने अशुभ दिवस होता २६ जानेवारी १९४५.

योगायोगाची घटना म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजा भारताच्या सीमा ओलांडून ''चलो दिल्लीचा'' नारा देऊन याच दिवशी व याच काळात भारतात घुसत होत्या. भारताची गुलामगिरी संपण्याचा दिवस जवळ येत आहे, याची वरील घटना ही सुचिन्हेच म्हणावी लागतील.

* * * *



# ६

## आझाद हिंद फौजेची शाखा व फौजी ट्रेनिंग कँप

१९४२ च्या स्वातंत्र्य संग्राम काळातील ६ सप्टेंबर १९४२ हा काळाकुट्ट दिवस मानावा लागेल. कारण या दिवशी ब्रिटीश सरकारच्या पोलिसांनी वडूज येथील मोर्चावर गोळीबार करुन ९ लोकांना ठार केले. तसेच त्याच दिवशी इस्लामपूर येथे डी. एस. पी. एट्स यांनी मोर्चाचे नेते पांडू मास्तर व विनायकराव थोरात (दादा) यांना फसवून अटक केल्यामुळे मोर्चातील लोक खवळले व भाले कुऱ्हाडी घेऊन मामलेदार कचेरीवर चालून गेले. बेफाम झालेले मोर्चातील लोक आवरत नाहीत असे पाहून पोलिसांनी प्रथम लाठीमार नंतर गोळीबार केला व त्यात किर्लोस्करवाडीचा पंड्या इंजिनियर व कामेरीचा विष्णू बारपट्टे ठार झाले. अनेक जखमी झाले. त्यामुळे जमलेले हजारो मोर्चेकरी लोक वाट दिसेल तिकडे पळत सुटले. पोलिसांनी रायफलीच्या जोरावर निशस्त्र मोर्चेकरी लोकांवर विजय मिळविला होता. हे कटू सत्य वाळवा येथील २४ वर्षांचा तरुण भूमिगत कार्यकर्ता नागनाथ नायकवडी पाहात होता व त्या प्रसंगावर विचार करत होता की, अनेक शस्त्राने सज्ज असलेल्या ब्रिटीशांना भारताबाहेर घालविण्यासाठी संघर्ष करावयाचा असेल, तर तो शस्त्रानेच करावा लागेल व त्यासाठी भूमिगत चळवळीच्या लोकांकडे शस्त्रे पाहिजेत, ती हाताळण्याचे शिक्षण द्यावयास पाहिजे, त्याकरिता तज्ज्ञांकडून तरुणांना फौजी शिक्षण द्यावयास पाहिजे.

तरुण नागनाथ अण्णांनी खूप विचार केला, मित्रांशी चर्चा केली व शेवटी ठरविले की बलाढ्य ब्रिटीश सत्तेला तोंड देण्यासाठी प्रशिक्षित सशस्त्र कार्यकर्त्यांची आझाद हिंद फौजेच्या धर्तीवर फौज उभारण्याची गरज पुरी करण्यासाठी आपल्या भागात फौजी ट्रेनिंग कँप सुरू करावा.

अशा फौजी कँपसाठी आवश्यक असलेली शस्त्रे गोव्यातून आणण्याच्या योजना केल्या शस्त्रे खरेदी करणेस लागणारा पैसा आता पे ट्रेन व धुळे खजिना लुटल्यामुळे उपलब्ध झाला होता. त्या पैशातून शस्त्रे खरेदी करणे व बेमालूमपणे ती शस्त्रे आणणेचे कामी नागनाथ अण्णांना राजमती ताई (बिरनाळे) यांचीही मदत होत होती.

ट्रेनिंग देण्यासाठी आझाद हिंद फौजेतील निवृत्त ऑफीसर आणण्यासाठी नागनाथ अण्णा दिल्लीस गेले. ८८ दर्यागंज येथे आझाद हिंद फौजेतील सेनापतीवर ब्रिटीशांनी खटला भरला होता. त्यासाठी त्यांना मदत करणेस जी कमिटी स्थापन केली होती ती कमिटी दिल्लीत ८८ दर्यागंज येथे होती. वल्लभभाई पटेल यांची कन्या मणिबेन पटेल त्या कमिटीच्या सेक्रेटरी होत्या. नागनाथ अण्णांनी पत्ता शोधून काढला, दिल्लीतील त्या भव्य इमारतीत पायऱ्या चढून गेले व मणिबेन पटेल यांना सांगितले की, ''मी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातून आलो आहे. आमच्या कार्यकर्त्यांना फौजी शिक्षण देणेसाठी आझाद हिंद फौजेमधील दोन निवृत्त अधिकारी पाहिजेत त्यासाठी आपण मदत करावी.'' हे ऐकून मणिबेन पटेल यांनी सातारा जिल्ह्यातून आलेल्या नागनाथ अण्णांकडे एकवेळ निरखून पाहिले व निर्धारयुक्त पण अण्णांच्या दृष्टीने निराशाजनक उत्तर दिले, ''फौजी संघटना गांधीजींच्या तत्त्वज्ञानात बसत नाही, त्यामुळे आपल्या अपेक्षेप्रमाणे आम्ही मदत करु शकत नाही'' नागनाथ अण्णांचा भ्रमनिरास झाला. इतक्या लांब येऊन हाती काहीच लागले नाही म्हणून एक क्षणभर वाईट वाटले. त्यांनी शांतपणे तो निराशाजनक प्रसंग सहन केला व अल्पशी देणगी देऊन पावती घेत असताना त्या ठिकाणी दोन तगडे शीख तरुण लष्करी गणवेशात आले. मणिबेनला लष्करी पध्दतीची सलामी दिली, आणि विचारले की लष्करी पध्दतीचे शिक्षण देण्याचे काम आम्हास मिळेल काय? त्यावर मणीबेन यांनी उत्तर दिले, ''फौजी संघटना गांधीजींच्या तत्त्वज्ञानात बसत नाही, तेव्हा तशा स्वरूपाचं काम आमच्याकडे नाही'' त्यावर त्या दोन शीख तरुणांनी बूट आपटून लष्करी पध्दतीची सलामी दिली व त्या ऑफिसमधून बाहेर पडले. हे सर्व नागनाथ अण्णा पहात होते, ऐकत होते. त्यांना तर खजिनाच सापडल्याचा मनात आनंद झाला. मघाशी आलेली निराशा पळून गेली व ते आशेच्या हिंदोळ्यावर नाचू लागले. त्या शीख तरुणांपाठोपाठ नागनाथ अण्णाही त्या कचेरीबाहेर पडले. तोपर्यंत ते शीख बरेच अंतरावर गेले होते, त्यांना पळत जाऊन अण्णांनी गाठले, आपली ओळख करुन दिली व त्यांना फौजी ट्रेनिंग देण्यासाठी सातारा जिल्ह्यात येण्याबद्दल अण्णांनी मोडक्या तोडक्या हिंदीत विनंती केली. अण्णांचं भाग्य मोठं व त्या शीख तरुणांनी सातारा जिल्ह्यात येण्याचं एकदम कबूल केले. त्यापैकी एका तरुणाचं नाव होतं मन्सासिंग व दुसऱ्याचं नानकसिंग.

सुभाष बाबूंची आझाद हिंद फौज ज्यावेळी ब्रम्हदेशात आली होती. त्यावेळी ब्रिटीश सरकारने एक शीख रेजिमेंट त्यांच्या बंदोबस्तासाठी ब्रम्हदेशात पाठवली होती. ही शीख रेजिमेंट ब्रम्हदेशात गेल्यावर सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेस जाऊन मिळाली होती. त्यामधे वरील मन्सासिंग व नानकसिंग होते. दोघे २४-२५ वर्षांचे असावेत. पुढे ब्रिटिशांनी आझाद हिंद फौज ताब्यात घेतली व ती शीख रेजिमेंट कलकत्त्याजवळ एका युध्दकैदी बंदीखान्यात आणून ठेवली. त्या कँपमधे हे दोन शीख तरुण होते. त्यानी कंपाऊंड तारेखालून घळ खणून त्यामधून आपली सुटका करुन घेऊन ते पंजाबमधे आले होते व काही काम मिळावे या हेतूने मणिबेन



यांचेकडे आले होते. नियतीने नेमकी त्या दोघांची गाठ नागनाथ अण्णांशी घालून दिली होती. मनासारखे काम मिळते आहे हे ऐकून त्यांना आनंद झाला. परंतु सातारा येथे जाण्यापूर्वी आपल्या नातलगांना भेटून जाण्याची इच्छा मन्सासिंग यांनी अण्णांकडे व्यक्त केली. त्यास अण्णांनी लगेच संमती दिली. लगेच ते तिघेजण लुधियाना पासून ८-१० मैलावर असलेल्या नानकसिंग यांच्या मावशीच्या घरी गेले. गरीब शिख कुटूंबा प्रमाणे वाढलेल्या तूप-रोटीचे जेवण घेत असतानाच गल्लीतील मुलांनी पोलीस आल्याची खबर दिली. अर्ध्यावर जेवण सोडून तिघेही बाहेर पडले. वाटेतच नानकसिंगांच्या बहिणीला भेटले. नंतर लाहोर स्टेशन जवळील बागेत अण्णा थांबले आणि मन्सासिंग व नानकसिंग हे दोघे लाहोर जवळील एका खेड्यात मन्सासिंगच्या आई-वडीलांना भेटून परत अण्णांच्या जवळ आले. दोघेही म्हणाले ''चलो ! अभी कहाँ भी चलो!'' आणि मग वाळव्याच्या दिशेने प्रवास सुरु झाला.

ऐतवडे बु ।। येथील राजमती पाटील उर्फ ''ताई'' या नागनाथ अण्णा यांच्या विचारांशी सहमत असलेल्या क्रांतिकारी स्वभावाच्या कार्यकर्त्या होत्या. फौजी संघटना उभारुन आणि त्याची व्याप्ती वाढवून ब्रिटीश साम्राज्यसत्ता खिळखिळी केली पाहिजे अशी त्यांचीही धारणा होती. त्यामुळे नागनाथ अण्णा, मन्सासिंग व नानकसिंग यांना घेऊन थेट ऐतवडे बु।। येथे आले. तोपर्यंत गोव्याहून गरजेपुरती शस्त्रे आणून ठेवली होती. त्यामुळे फौजी संघटनेला ट्रेनिंग देण्याच्या कार्यास उत्साहाने सुरुवात झाली. वाळवे तालुक्यातील तरुण कार्यकर्ते ऐतवड्यास येऊ लागले. नवेखेड, जुनेखेड, पडवळवाडी, गोटखिंडी, अंकलखोप, वाळवे, कामेरी, ढगेवाडी, ऐतवडे वगैरे वीस पंचवीस खेड्यातील शेकडो तरुण या फौजी संघटनेत येऊन दाखल झाले. पलीकडच्या कोल्हापूर जिल्ह्यातील कलनाकवाडी, मडिलगे, ठाणे वगैरे खेड्यातीलही कार्यकर्ते आले. या सर्वांची खाण्यापिण्याची सोय करण्याची जबाबदारी ताईंनी आपल्यावर घेतली. त्याकरिता वाळवे तालुक्यातील अनेक खेड्यातून शेकडो पोती धान्य ऐतवड्यास येऊन पडू लागले. ऐतवडेच्या उत्तरेस ढगेवाडीचा डोंगर आहे, त्या ठिकाणी फौजी संघटनेच्या कार्यकर्त्यांना ट्रेनिंग देणे सुरु झाले. ढगेवाडीचे जंगल क्रांतिकारकांच्या लष्करी कवायतीच्या हुकुमांच्या आवाजांनी दणाणू लागले. दिवसेंदिवस फौजी संघटनेत सामील होणाऱ्या तरुणांची संख्या वाढू लागली त्यामुळे शस्त्रे अपुरी पडू लागली. त्यावर उपाय म्हणून कोल्हापूरच्या प्रफुल्ल पिक्चर्समधे आर्ट डायरेक्टर म्हणून काम करणाऱ्या श्री. बाबूराव जाधव व सिने आर्टिस्ट डी. बी. पाटील यानी लाकडी बनावटीच्या हुबेहूब रायफली बनवून दिल्या. त्याचबरोबर कर्नाटकामधील ब्याकूड गावच्या वसंतराव पाटील यांनीही दोन स्टेनगन्स बेळगावच्या मिलीटरीमधल्या लोकांशी संधान बांधून आणून दिल्या.

भल्या पहाटे फौजी संघटनेच्या कवायतीस प्रारंभ व्हायचा. सकाळचा नाष्टा झालेवर बारा वाजेपर्यंत लष्करी शिक्षणाची तालीम व्हायची. नागनाथ अण्णा, किसन अहिर, मन्सासिंग, नानकसिंग, वाय. सी. पाटील, राजमती पाटील, बाळकू बिरनाळे (पैलवान) अंता पाटील (ढगेवाडी), गंगाराम गायकवाड (जखराईवाडी), शंकर सावळा नाईक (आत्रे) लाडेगांव, वाळवेचे खंडू शेळके (दाजी), रामचंद्र अहिर (मास्तर), सखाराम घोरपडे (काका), नारायण कदम (शिराळकर), पडवळवाडीचे तुकाराम खोत (वस्ताद), महादेव अनुसे (देवास) तसेच खेडचे

शामराव पाटील (आप्पा) वगैरे या संघटनेच्या कामाकरिता अहोरात्र कष्ट करीत होते. अशा रीतीने फौजी कँपचे काम निर्धोकपणे दोन महिने चालले होते. पण तेवढ्यात या क्रांतिकारी कामाची बातमी पोलिसांना लागली असा संशय आल्यामुळे फौजी कँपची जागा बदलण्याचे ठरले, त्याकरिता दुसरी सुरक्षित जागा शोधणेचे काम किसन अहिर, चरणचे ज्ञानू नायकवडी व बंडा नायकवडी यांच्या मदतीने वारणा नदीचे पलीकडे कोल्हापूर जिल्ह्यातील थावडे गांव निश्चित केले. थावडे हे हजार बाराशे वस्तीचे एका टेकडीवर असलेले कानसा नदीचे काठावरचे गाव, चारी बाजूने जंगलाने वेढले होते. पवनाईच्या चोपडाईत तर शिवराईच्या डोंगराचे मधोमध असलेले मैदान फौजी कँपसाठी अत्यंत सुरक्षित असे ठिकाण होते. कोणत्याही बाजूकडून एखादा नवीन माणूस आला तरी तो टिपता येत असे. तसेच या गावाकडे येण्यासाठी कित्येक मैल चालत जावे लागे. म्हणून ही जागा फौजी कँपसाठी नक्की केली व ढगेवाडीचा फौजी कँप आता थावड्याच्या जंगलात सुरु झाला. सुरवातीला काही दिवस ऐतवडे येथून कँपसाठी जेवण आणण्याची सोय केली, पण नंतर थावड्याच्या ग्रामस्थांनी जेवणाची सोय करुन दिल्यामुळे कँपचे काम निर्वेधपणे सुरु झाले.

थावड्याच्या जंगलातील फौजी सेनेच्या कॅम्पची माहिती कित्येक महिने बाहेरच्या जगाला मिळू शकली नाही. आता फौजी ट्रेनिंग घेत संघटनेतील तरुण कार्यकर्ते शेजारच्या खेड्या-पाड्यातून फिरुन तेथील शेतकऱ्यांवरील अन्यायांची बातमी काढीत. चांगल्या माणसांची आणि टग्या माणसांची यादी तयार करीत. पाटील तलाठ्यांचीही चौकशी करीत, त्या माहितीवरुन टग्या माणसांना पकडून फौजी कँपमधे आणीत. अन्यायाने कुठल्या गरीब माणसाची त्या टग्याने जमीन बळकावली असेल, तर ती त्या गरीब माणसाला परत देण्याचा हुकूम होई. पाटील व तलाठ्यांनी गोरगरिबांकडून अन्यायाने पैसे घेतले असतील, गरीब बाया बापड्यांना त्रास दिला असेल तर त्याची दखल घेऊन फौजी कँपच्या पुढे अशा लोकांना आणून ताकीद दिली जाई त्यामुळे क्रांतिकारी फौजी संघटनेच्या कार्यकर्त्यांबद्दल थावड्याचे आसपासच्या खेड्यात गोरगरीबांना दिलासा मिळाला व गुंडांचेवर वचक बसला. लवकरच त्यामुळे खरे ग्रामराज्य सुरु होण्याची पार्श्वभूमी तयार होऊन प्रतिसरकारच्या कार्याची सुरवात झाली. परंतु नियतीच्या मनात हे घडवावयाचे नव्हते.

एके दिवशी सकाळी फौजी संघटनेची कवायत चालू असताना पवनाईच्या माथ्यावर एक नवखा माणूस टेहळणी करीत जात असलेला संघटनेच्या कार्यकर्त्यांना दिसला. ताबडतोब त्याचा पाठलाग केला व शेवटी खूप धावपळ व हुलकावण्या दिल्यावर त्या अनोळखी माणसास संघटनेच्या लोकांनी जिवंत पकडले. जबर मार दिला. त्यानंतर तो बोलता झाल्यावर कळले की तो एक सी. आय. डी. च होता. नागनाथ अण्णा शस्त्रे, दारुगोळा आणण्यासाठी कँपबाहेर गेले होते ते परत येईपर्यंत त्या सी. आय. डी. ला जखडून पकडून ठेवणे भाग पडले.

त्या सी. आय. डी. ला पकडून ठेवण्यासाठी अजब युक्ती संघटनेच्या तरुणांनी शोधून काढली. कँपचे पूर्व बाजूने दक्षिणोत्तर ओढा गेला होता. त्या ओढ्यातील एका खड्ड्यात सी. आय. डी. ला गळ्यापर्यंत पुरला. त्यामुळे तो गयावया करून जीव वाचविण्याची विनंती करू लागला. नागनाथ अण्णा कँप तळावर आलेवर त्याला खड्ड्यातून बाहेर काढले. सक्त ताकीद



दिली की, 'येथील फौजी कँपबद्दल कसलीही वाच्यता केल्यास जीवघेणी शिक्षा केली जाईल.' जीवदान देणेची विनंती संघटनेने मान्य केली व त्या सी. आय. डी. ला सोडून दिले.

तरीसुध्दा थावडे फौजी कँपबद्दल पोलिसांना माहिति मिळाली असावी म्हणून ताबडतोब कँपची जागा बदलणे गरजेचे होते म्हणून किसन अहिर यांनाच नवीन सुरक्षित जागा शोधण्यास सांगितले. त्यांनी वारणा खोऱ्यातील सुरक्षित जागा मणदूरच्या जंगलात निवडली होती. थावड्याचा कँप हलवण्यापूर्वी किसन अहिर मणदूरच्या जंगलातील नवीन जागेची पाहणी करुन दुसरे दिवशी बारा बाजेपर्यंत थावड्याचे कँपवर परत यावे असे ठरले होते. शिराळा पेट्याचे अगदी आतल्या बाजूस मणदूरचं जंगल होतं. तेथून वारणेचा उगम काही मैल अंतरावर होता. थावड्याचे वायव्य बाजूने जंगलातून मणदूरकडे किसन अहिर निघाले. तो दिवस होता २३ फेब्रुवारी १९४६. दुसऱ्या दिवशी मणदूरची जागा पुन्हा एकदा पाहिली व थावड्याला परत येण्यास साथीदारांसह निघाले. मणदूर गावापासून तीन चार फर्लांग पुढे येत असताना तेथे पांडू मास्तर पुढून येताना दिसले. ते थोड्याच दिवसांपूर्वी येरवडा जेल फोडून भूमिगत अवस्थेत पोलिसांचा पाठलाग चुकवित दोन सहकाऱ्यांसह फिरत होते. शिराळ्यापासून चार पाच मैल पुढे चालून आल्यानंतर शिराळ्याचे दिशेने सायकलवरुन जाणारा एक हत्यारी कॉन्स्टेबल दिसला. पांडू मास्तर व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या कॉन्स्टेबलला पकडून त्याची बंदूक काढून घेतली व सायकलची मोडतोड करुन फेकून दिली. त्याचा ड्रेस फाडून टाकला. अशा अवस्थेत त्या पोलिसाने शिराळा पोलिस स्टेशनला घडलेली सर्व हकिकत सांगितली ताबडतोब सातारहून जादा पोलिसांची कुमक आणली. शिराळ्याचे पोलिस मणदूरचे रोखाने निघणार म्हणून पांडू मास्तर किसन अहिर यांना परत मणदूरचे जंगलात घेऊन गेले.

सातारहून आलेले पोलीस शिराळ्याहून मणदूरपर्यंत कॉन्स्टेबलची बंदूक पळविलेल्या इसमाचा (पांडू मास्तरांचा) माग काढीत आले होते. रात्री मणदूर गावाला पोलिसांनी वेढा घातला. प्रत्येक घराची झडती घेतली. पांडू मास्तर व किसन अहिर ज्या घरात झोपले होते त्या घरी पुढच्या बाजूने पोलीस चौकशी करत आले. किसन अहिरांना पोलिसांची चाहूल लागली झोपलेल्या पांडू मास्तरांना त्यांनी जागे केले. पांडू मास्तरांना काही सुचेनासे झाले. प्रसंगावधान ओळखून किसन अहिर जवळ जवळ मैल दीड मैल अंतर पांडू मास्तर यांना पाटीवर घेऊन धावत आले मास्तरांना सुरक्षित ठिकाणी ठेवून किसन अहिर कँम्पच्या दिशेने निघाले. परंतु किसन अहिरच्या शोधासाठी थावडे कँम्पवरुन अण्णांनी पाठवलेले तीन कार्यकर्ते मणदूरहून शिराळ्यास परत जाणाऱ्या पोलिसांच्या हाती लागले.

किसन अहिर यांना वाटले, आपली वाट पाहून थावड्याचे कँपवरील सहकारी आपली काळजी करीत असतील. थावड्याला ताबडतोब जावे असा विचार करुन ते धावतच थावडे कँपकडे निघाले. मणदूर सोडून पूर्व बाजूला पोहोचताच, फौजी सेनेच्या विजयी ललकाऱ्या ऐकू येऊ लागल्या व त्यांच्या जीवात जीव आला. मोठ्या काळजीतून मुक्त झाल्याचे आनंदात ते कार्यकर्त्यात, संघटनेत सामील झाले.

घडलेल्या घटना फौजी संघटनेच्या नेत्यांनी ऐकल्यावर सर्वांनी ठरविले की मणदूर येथे पोलिसांनी पकडलेल्या तीन सहकाऱ्यांना ताबडतोब सोडवण्यासाठी निर्वाणीची कृती करावयाची.

त्यांनी ठरविले की शिराळ्याकडे जाणाऱ्या पोलिसांच्या वाटेत मणदूरच्या पूर्व बाजूला एक मैलावरुन जो दक्षिणोत्तर ओढा गेला आहे. त्या ओढ्यात रस्त्याचे दोन्ही बाजूस फौजी संघटनेच्या लोकांनी दबा धरुन बसायचे. पोलिसांच्या गाड्या अथवा पोलीस ओढ्यात आल्याबरोबर त्यांच्यावर अचानक दोन्ही बाजूने गोळीबार करुन हल्ला करावयाचा व आपले सहकारी पोलिसांच्या हातातून सोडवावयाचे.

ठरलेल्या योजनेप्रमाणे फौजी संघटनेच्या दोन तुकड्या करण्यात आल्या. एका तुकडीचे नेतृत्व नानकसिंग, मन्सासिंग व किसन अहिर यांनी केले व ते ओढ्याचे उत्तरेकडील खळग्यात दबा धरुन बसले. दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व नागनाथ अण्णा यांनी केले व ते रस्त्याचे दक्षिणेकडील ओढ्याच्या खळग्यात दबा धरून बसले. तेवढ्यात मणदूरकडून अर्धा फर्लांगवर पकडलेल्या तीन फौजी सेनेच्या कार्यकर्त्यांना घेऊन पोलिस जंगलातून लपत-छपत येत असलेले दिसले. फौजी संघटनेच्या लोकाना संशय येऊ नये, म्हणून पोलिस पायीच लपत-छपत घनदाट जंगलातून ते शिराळ्याकडे निघाले होते. मणदूरच्या पूर्व बाजूला असलेले जंगल ओलांडलं, की त्यांना शिराळा गाठायला सोप जाणार होतं. फौजी संघटनेच्या सेनानींनी पोलिस जंगलातून येत असल्याचे पाहताच तयार राहण्याचा इशारा दिला. त्यामुळे सर्व सैनिक हल्ला करण्याच्या तयारीने बाहेर पडले. पोलिसांना या गोष्टीची कल्पना येताच त्यांनी दाट जंगलात घुसण्याचा प्रयत्न केला. त्यावर झाडाच्या आडोशाने क्रांतिवीरांनी गोळीबार केला. त्याला पोलिसांनीही गोळीबाराने उत्तर दिले. फौजी संघटनेने चढाईचा पवित्रा घेतला होता. गोळीबारामुळे आसपासच्या जंगलात जनावरांची धावपळ सुरु झाली होती आणि फौजी संघटनेचे सैनिक पुढे पुढे सरकत होते. त्यास पोलिस प्रतिहल्ले चढवित होते. तेवढ्यात दबा धरुन बसलेल्या पोलिसांच्या एका तुकडीकडे किसन अहिर यांचे लक्ष गेले. किसन अहिर व नानकसिंग यांनी पोलीसांच्या फळीत घुसून गोळीबार सुरु केला. पोलीस सैरावैरा धावू लागले. स्वत:च्या बचावासाठी त्यांनीही गोळ्या झाडल्या त्यातील एक गोळी किसन अहिरांच्या गुडघ्यात घुसून आरपार गेली व ते भारतमातेचे नाव घेत जमिनीवर कोसळले. दुसरी गोळी नानकसिंगांवर झाडली ते जय हिंद चा पुकार करीत जमिनीवर कोलमडले. जखमी किसन अहिर व नानकसिंग यांच्याकडे फौजी संघटनेतील सैनिक धावू लागले. नेमके याच संधीचा फायदा घेऊन पोलिस पकडलेल्या तीन क्रांतिकारकांना सोडून जंगलात पळून गेले. नागनाथ अण्णा नायकवडी व इतर घटनास्थळी पोहोचले त्यावेळी पाहिले की किसन अहिर यांच्या गुडघ्यातून आरपार गोळी गेली होती व नानकसिंग यांच्या तोंडात घुसून माणेच्या मणक्यात अडकली होती. त्यातून रक्तस्त्राव होत होता. त्या दोघांनी फौजी संघटनेच्या सहकाऱ्यांचा शेवटचा निरोप घेतला. त्यांचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले ते भारतमातेच्या स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्मा झाले. तो दिवस होता २५ फेब्रुवारी १९४६.


ताबडतोब त्या दोघांची प्रेते खांद्यावर घेऊन वारणा नदीच्या पाण्यातून थावडयाचे जवळील शित्तूरपैकी राऊतवाडीमध्ये नेऊन तेथील शेतकरी मित्रांच्या मदतीने हुतात्म्यांच्या पार्थिवांचे दहन केले. पोलिसांना दहन केल्याचा सुगावा लागू नये म्हणून त्या वाफ्यामधे आडव्या पाटाचे पाणी सोडून पुरावा नष्ट केला. त्यानंतर काही फौजी संघटनेचे कार्यकर्ते कोल्हापूर जिल्ह्यात निघून गेले व नागनाथ अण्णा आपल्या कार्यकर्त्यांसह शिराळ्याचा डोंगर पालथा



घालून सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात ढेबेवाडी येथे आपल्या ढगेवाडीच्या बाळकू दलाल या सहकाऱ्याच्या एका नातेवाईकाकडे येऊन थांबले. दुसऱ्या दिवशी एका बैलगाडीत गवताच्या खाली फौजी संघटनेची हत्यारे लपवून ठेऊन त्या गाडीत एका महिलेस बसवून माहेरी जाते आहे असा बहाणा करुन अण्णा त्या बैलगाडीने कराडला येऊन पोहोचले व नंतर वाळव्यात येऊन दाखल झाले.

किसन अहिर व नानकसिंग यांच्या शहिद होण्याने फौजी संघटनेची फारमोठी हानी झाली. स्वातंत्र्य मिळण्याच्या सुमारास नागनाथ अण्णांनी मन्सासिंग यांना वाय. सी. पाटील यांना बरोबर देऊन किर्लोस्करवाडी येथे दिल्लीकडे रेल्वेने रवाना केले. जाताना वाय. सी. पाटील व मन्सासिंग ज्या बैलगाडीतून जात होते ती बैलगाडी पोलिसांनी संशयाने अडवली पण वाय. सी. पाटील यांनी बैलगाडीच्या खाली तरटाच्या झोळीमधे बरोबरची हत्यारे प्रसंगावधान राखून लपवली असल्यामुळे कटू प्रसंग टळला व मन्सासिंगांना वाय. सी. पाटलांनी निरोप दिला. पोहोचल्या नंतर मन्सासिंगांचे पत्र अण्णांना आले.

* * * *



स्वातंत्र्य सैनिकांचा फौजी ट्रेनिंग कॅम्प ढगेवाडी
नोव्हेंबर १९४५

राजमती पाटील — मा. नागनाथ अण्णा

७

## गुंडांचेकडून ऐतवडे बु।। येथे हल्ला पण दुसऱ्या तरुणांचा नाहक बळी

ब्रिटनमधे जुलै १९४५ साली निवडणुका झाल्या. त्यापूर्वी १९४५ मधे ब्रिटीश सरकारने अ. भा. काँ. कमिटीच्या कार्यकारिणीचे सभासद पंडीत नेहरु, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, जे. बी. कृपलानी, डॉ. राजेंद्र प्रसाद, आचार्य नरेंद्र देव, पट्टाभी सितारामय्या, शंकरराव देव यांची सुटका केली होती. त्याच वेळी ब्रिटनमधील युध्दकाळातील पंतप्रधान चर्चिल यांच्या कॉन्झरव्हेटिव्ह पक्षाचा पराभव झाला व मजूर पक्षाचे ॲटली पंतप्रधान झाले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सहानुभूतीने सुटेल अशी चिन्हे दिसू लागली होती. त्याच वेळी २ सप्टेंबर १९४५ ला जपानने शरणागती पत्करली व दुसरे महायुध्द संपुष्टात आले. भारतामधे ब्रिटीश सरकारने निवडणुका जाहीर केल्या व २० ऑक्टोबर १९४५ रोजी सरकारने सभा संमेलनावरील बंदी उठवली. त्यामुळे निवडणुकीच्या प्रचारास कार्यकर्ते मोकळे झाले होते.

मुंबईत पंडीत नेहरु ताडदेवच्या करमरकर यांचे स्टुडिओत भूमिगत कार्यकर्त्यांना भेटले. अच्युतराव पटवर्धन व कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली. सातारच्या प्रतिसरकारची माहिती शेख काकांनी हिंदीत करुन दिली. पं. नेहरुंनी भूमिगतांच्या कार्याचा गौरव केला व भूमिगत चळवळीच्या कार्याची पुढील जबाबदारी स्वीकारण्याचे आश्वासन दिले.

पुढे २१ सप्टेंबर १९४५ रोजी मुंबईत गवालिया टँक मैदानावर अ. भा. काँ. कमिटीची महत्त्वाची बैठक झाली. दुसरे दिवशी चौपाटीवरच्या जाहीर सभेत पंडीत नेहरुंनी भूमिगतांच्या कार्याचे अवमूल्यन करण्याची भाषा बोलणाऱ्यांना ठणकावले की ''कोण म्हणतो सातारा जिल्ह्यातील भूमिगत क्रांती चळवळ काँग्रेसची नव्हती!'' पंडीत नेहरुंनी तर आपले भाषण ''जय सातारा'' म्हणून संपविले. त्यामुळे भूमिगतांच्याबद्दल होत असलेली कुजबूज संपली.

अशा स्थितीत सार्वत्रिक निवडणुका काँग्रेस पक्षाने लढविण्याचे ठरविले आणि सातारा जिल्ह्यातून काँग्रेस पक्षाचे सर्व उमेदवार निवडून आले. मुंबई इलाख्याचे बाळासाहेब खेर मंत्रीमंडळ



अस्तित्वात आले. गृहमंत्री मोरारजी देसाईंचे पार्लमेंटरी सेक्रेटरी कराडचे यशवंतराव चव्हाण झाले.

मुंबई सरकारने राजकीय कैदी सोडून देण्यास सुरवात केली व २६ एप्रिल १९४६ ला सरकारने सार्वत्रिक माफी जाहीर केली. कालचे पोलिसांचे शत्रू आता पोलिसांचे हितचिंतक झाले.

मोरारजी देसाई यांनी प्रथम अरूणा असफ अल्ली व नाना पाटील यांचेवरील वॉरंटे रद्द केली. त्याचा निषेध केल्यामुळे सभापती भाऊसाहेब सोमण यांनी ठणकावले की, जर सातारा जिल्ह्यात काँग्रेस पक्ष टिकवावयाचा असेल तर सर्व भूमिगतांवरील पकड वॉरंटे रद्द करा. त्यामुळे २५ एप्रिल १९४६ ला सातारा जिल्ह्यातील सर्व भूमिगतांवरील वॉरंटे रद्द झाली व दि. १६ मे १९४६ रोजी सर्व भूमिगत कराड तालुक्यातील कणेगाव येथे प्रगट होणार असे जाहीर केले व त्याप्रमाणे जनतेच्या उत्स्फूर्त प्रतिसादामध्ये भूमिगतांचा स्वागत समारंभ सोहळा नेत्रदीपक अशा रीतीने पार पडला.

नागनाथ अण्णांचे दोन जिवलग सहकारी सोनवडे येथे हुतात्मे झालेमुळे अण्णांनी कणेगावचे सत्कारानंतर आपला कोणताही सत्कार घेण्याचे नाकारले व विधायक कार्यात गुंतवून घेतले. नागनाथ अण्णांनी आता विधायक कामामधे लक्ष घालावयाचे ठरविले होते. त्याचा एक भाग म्हणून ऐतवडे बु.।। येथे सामुदायिक शेतीचा प्रकल्प सुरू करावयाची योजना आखण्यासाठी बैठक घेण्यात आली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपली ऐतवडे येथील जमीन सामुदायिक शेतीसाठी देण्याचे कबूल केले होते. या सामुदायिक शेतीच्या प्रकल्पात इतर शेतकऱ्यांना येणेबद्दल आवाहन करणेस व सामुदायिक शेतीचे महत्त्व पटवून सांगणे हा या बैठकीचा हेतू होता.

ठरविलेप्रमाणे दि. २२ मे १९४६ रोजी नागनाथ अण्णा, वाय. सी. पाटील, राजमती पाटील वगैरेनी चर्चेत भाग घेतला व नंतर रात्री राजमती पाटील यांच्या घराचे माडीवर पडवळवाडीचे बाबूराव कोकाटे व ब्याकुडचे (कर्नाटक) प्रतापराव पाटील हे दोघे तरुण झोपले. घराच्या पडवीत इतर कार्यकर्ते व घरातील पुरुष माणसे झोपली होती. चळवळीच्या काळात गावगुंडांचा बंदोबस्त करण्याचे काम चालूच होते. त्याचा काही गावगुंड मनात राग धरुन होते त्या मध्यान रात्री कुप्रसिध्द गुंड सखाराम बारपटे (कामेरी) व शिवा महार (वशी लाडेगांव) हे तेथे नागनाथ अण्णा व वाय. सी. पाटील यांना गोळी घालून मारण्यास आले, झोपलेल्या सर्वांना उठवून गप्प बसण्यास सांगितले. तेथे नागनाथ अण्णा त्यांना सापडले नाहीत, म्हणून काहीही न करता परत न जाता शिवा महार याने माडीवर झोपलेल्या दोघांवर गोळ्या झाडल्या. विनाकारण कोकाटे व पाटील या दोन तरुणांचा जीव त्या गुंडांनी घेतला आणि ते तेथून निघून गेले.

खबरदारीने नागनाथ अण्णा व वाय. सी. पाटील ऐतवडे येथील जैन बस्तीच्या माडीवर जाऊन झोपले असलेमुळे बचावले. कोकाटे व पाटील यांचेवर गोळीबार झालेचे अण्णांना लोकांनी येऊन लगेच सांगितले. अण्णांनी ताबडतोब हत्यारांसह कार्यकर्त्यांची जमवाजमव करुन गुंडांचा पाठलाग केला. पण ते पसार झाले होते. पण निष्पाप दोन तरुणांची हत्या झाली हे दुःख न विसरण्यासारखे होते.

सर्व कार्यकर्ते संतापले. शिवा महार याचा बदला घेतल्या शिवाय या दोन कार्यकर्त्यांच्या देहाला अग्नी द्यावयाचा नाही म्हणू लागले. एवढ्यात कार्यकर्त्यांना शिवामहार पानाचंद सर्व्हिस मोटार मधून आष्ट्याहून सांगलीस जात असलेची बातमी मिळाली. बाळकू बिरनाळे (पैलवान) यांनी आपले मित्र बच्चू पोरवाल यांच्या मोटार सायकलवरुन दोघांनी डिग्रज पर्यंत पाठलाग केला. मोटार सायकल आडवी लावून गाडी थांबवली. शिवा महारास गाडीतून खाली ओढून रिव्हाल्वरने गोळ्या झाडून बदला घेतला.

* * * *

# ८

## स्वातंत्र्याचा उष:काल व सत्तेचे राजकारण

१६ मे १९४६ रोजी कराड तालुक्यातील कणेगाव येथे भूमिगत कार्यकर्ते प्रगट झाले. तेथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. कार्यकर्त्यांसह क्रांतिसिंह नाना पाटील त्या सत्कार सोहळ्यास उपस्थित होते. सामुदायिकरीत्या जनतेने केलेला हा अभूतपूर्व व ऐतिहासिक सत्कार होता. १९४२ च्या क्रांतिलढ्यातील क्रांतिवीर व कार्यकर्ते सर्वजण त्या दिवशी एकत्र आले होते तेथे अनेक भूमिगत कार्यकर्त्यांच्या एकमेकांबरोबर ओळखी झाल्या.

स्वामी रामानंद भारती यांनी सुटका झाल्याबरोबर सातारा जिल्ह्यात झंझावाती दौरा काढून काँग्रेस कार्यकर्त्यांमधे व संघटनेमधे चैतन्य निर्माण केले होते. सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या दि. १४ मे १९४६ या दिवशी कराड येथे लिंगायत बोर्डिंगमधे भरलेल्या बैठकीत स्वामी रामानंद भारती यांची अध्यक्ष म्हणून आणि किसन वीर व वसंतदादा पाटील यांची सेक्रेटरी म्हणून, आय. एन. हकीम यांची उपाध्यक्ष म्हणून, गणपत रामचंद्र पाटील यांची खजिनदार म्हणून व शिगांवचे रंगराव पाटील यांची ऑफिस सेक्रेटरी म्हणून सर्वानुमते निवड झाली. नागनाथ अण्णा या बैठकीस उपस्थित होते व त्यांनीही वरील निवडीस पाठींबा दिला होता. बैठक संपल्यावर माडीवरुन खाली येताना जिन्यामधे वसंतदादा पाटील यांना नागनाथ अण्णा म्हणाले ''तुम्ही राजकारण करा, मी समाजसेवा करतो. कॉग्रेसमधे मी पदाधिकारी होऊ इच्छित नाही.''

जिल्हा काँग्रेस कार्यकारीणिमधे कुमठ्याचे पांडुरंग बोराटे, शिगावचे रंगराव पाटील, खातगुणचे चिंतामण शहा, कुंभारगांवचे बाबूराव चव्हाण, कुंडलचे आप्पा लाड, गिरवीचे वसंतराव जानवळे, सांगलीचे ए. बी. पाटील, इंचलकरंजीचे बा. भा. पाटील, किर्लोस्करवाडीचे ज्ञानू लक्ष्मण पाटील, खेडचे ज्ञानोबा विठ्ठल कदम निवडले होते. जिल्हा काँग्रेस कमिटीचे सर्व



पदाधिकारी नागनाथ अण्णांना ओळखत होते. त्यातील बरेचजण १९४२ च्या क्रांतियुध्दात भाग घेतलेले होते. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेल्या बहुजन समाजातील तरुण व तडफदार कार्यकर्त्यांकडे जिल्हा काँग्रेसची सत्तासूत्रे आली होती. पण नागनाथ अण्णा मात्र सत्तेच्या राजकारणापासून दूर राहिले होते.

त्याच दरम्यान १९४६ साली सार्वत्रिक निवडणुका होऊन सातारा जिल्हा दक्षिण मतदार संघातून यशवंतराव चव्हाण, बाबूराव गोखले, व्यंकटराव पवार, के. डी. पाटील हे काँग्रेसचे चार उमेदवार प्रचंड मताने निवडून आले होते. कराड, पाटण, वाळवा, खानापूर, शिराळा, तासगाव असा हा मतदारसंघ होता. मुंबई राज्यात काँग्रेसला बहुमत मिळाल्यामुळे बाळासाहेब खेर यांचे मंत्रीमंडळ अधिकारावर आले. सत्तास्पर्धेच्या राजकारणात अडकलेल्यांना भूमिगत राहून स्वातंत्र्य लढ्यात काम केलेल्या क्रांतिकारकांच्या कार्याचे मूल्यमापन करताना शंका-कुशंकानी ग्रासले होते. यशवंतरावांना मंत्री म्हणून न घेता त्यांना पार्लमेंटरी सेक्रेटरी केले होते. फलटणचे मालोजीराव निंबाळकर आणि साताऱ्याचे गणपतराव तपासे यांना मात्र मंत्रीमंडळात घेतले होते. हितचिंतक मित्रांची नाराजी असूनही यशवंतराव चव्हाण यांनी पार्लमेंटरी सेक्रेटरीपद स्वीकारले. हा त्यांचा निर्णय महाराष्ट्राचा भावी इतिहास घडविण्यास पुढे उपयोगी पडला आहे असे काही वर्षांनी दिसून आले.

पारतंत्र्याचा काळ संपायला आला होता. स्वातंत्र्याचा उष:काल दृष्टिक्षेपात आला होता. जीवाची पर्वा न करता लढणाऱ्या क्रांतिकारकांची व क्रांतिकार्यास मदत करणाऱ्या जनतेची स्वप्ने खरी ठरणार की, नाही? याचा निकाल लागण्याचा काळ जवळ येत होता.

नागनाथ अण्णा मात्र या संधीकाळात जे घडत होते ते पाहून समाधानी नव्हते. त्यांचा भ्रमनिरास झाला होता. सत्तेसाठी धावपळ करणाऱ्यांकडे पाहता त्यांना असे वाटत की, 'यासाठी का आम्ही जिवावर उदार होऊन स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली होती'?

या कालखंडामधे म्हणजे १९४६ साली सातारा लोकल बोर्डाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भूमिगत नेत्यांमधील दुरावा वर्णन करताना ज्येष्ठ पत्रकार नरुभाऊ लिमये त्यांच्या आत्मचरित्रात लिहितात की, 'भूमिगत नेते व यशवंतराव यामध्ये असलेला दुरावा मला प्रत्यक्ष पहावयास मिळाला तो १९४६ साली. बाळासाहेब देसाई व व्ही. एन. पाटील यांच्यामधे लोकल बोर्ड अध्यक्षपदासाठी झालेली स्पर्धा आणि यशवंतरावांची देसाईंना मदत. या प्रसंगी सेहेचाळीस साल अनेक दृष्टीने महत्त्वाचे ठरले. भूमिगत नेते आपला राजकीय हक्कच जणू व्ही. एन. पाटील यांच्या अध्यक्षपदाचे रुपाने मागत होते, पण यशवंतरावांनी देसाईंची उमेदवारी हा आपल्या प्रतिष्ठेचा (आणि भावी धोरणाचा) प्रश्न बनविला.'

क्रांतिसिंह नाना पाटील त्या काळात नागनाथ अण्णा यांच्या बंधूंच्या विवाहा निमित्त वाळवा येथे आले होते. नागनाथ अण्णांनी, क्रांतिसिंहांना आपली प्रतिष्ठा या निवडणुकीत लावू नये, यामध्ये यश येणार नाही अशी धोक्याची सूचनाही दिली होती, पण नागनाथ अण्णांचे कोणी ऐकले नाही व क्रांतिसिंहानी पुरस्कृत केलेले उमेदवार व्ही. एन. पाटील पराभूत झाले. त्यामुळे क्रांतिसिंह नाना पाटील व कुंडल ग्रुप आणि यशवंतराव चव्हाण, किसन वीर गटामधील दरी वाढली, ती कधीच कमी झाली नाही. नागनाथ अण्णा नाईलाजाने हे सर्व अनुभवत होते.

भारताला स्वातंत्र्य मिळणार अशी चिन्हे दिसत असताना १९४६ मधे हैद्राबाद संस्थानातील जनतेने हैद्राबाद मुक्ती लढा स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली सुरु केला होता. नागनाथ अण्णांनी त्या लढ्यातही सक्रिय भाग घेतला होता. हैद्राबाद मुक्ती लढ्यात लढणाऱ्या कार्यकर्त्यांना शस्त्रास्त्रांची मदत देणेसाठी जात असताना करमाळा येथे पोलिसांनी त्यांना अडविले व ताब्यात घेतले होते. परंतु जनतेने त्यांना सोडविले. बार्शीचे दिवाण वकील, सोलापुरचे भाई छन्नूसिंग चंदेले, फूलचंद गांधी, जैन श्राविकाश्रमाच्या सुमती शहा यांनी पुढाकार घेऊन सहकार्य केलेमुळे हे घडले होते.

नागनाथ अण्णा काँग्रेस पक्षाच्या सत्तेच्या राजकारणापासून दूर राहिलेमुळे त्यांना आपल्या पक्षात घेण्याकरिता समाजवादी पक्षाचे पुण्याचे नेते साथी एस. एम. जोशी नागनाथ अण्णांना भेटण्यास वाळवा येथे आले होते. तसेच राष्ट्रीय नेते साथी जयप्रकाश नारायण आपल्या पत्नीसह नागनाथ अण्णांना भेटण्यास व समाजवादी पक्षात येण्यास आग्रह करण्यास आले होते. नागनाथ अण्णांच्या सहभागामुळे समाज परिवर्तनाचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी समाजवादी पक्षाला मदत होणार असल्याची खात्री राष्ट्रीय नेत्यांना झाली होती. हेच साथी एस. एम. जोशी व साथी जयप्रकाश नारायण यांच्या भेटीमधून दिसून येते. नागनाथ अण्णांनी हे सामाजिक सेवेतील प्रतिष्ठेचे स्थान आपल्या निर्भय व निरपेक्ष समाजसेवेतून मिळविले होते.

यामुळेच सत्तेच्या राजकारणाच्या सोनेरी पिंजऱ्यात नागनाथ अण्णा अडकले नाहीत. स्वतंत्र विचाराने समाज परिवर्तनासाठी लढा देण्यास ते सत्तेबाहेर राहिले व पुढील जीवनामधे अन्यायाविरुध्द सतत लढत राहिलेचे दिसून आले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचवली होती. त्या महान कार्यास हातभार लावण्यासाठी कराड तालुक्यातील कापील गोलेश्वर येथे विद्यार्थी परिषद घेतली. नागनाथ अण्णा, बापूजी साळुंखे, वाय. सी. पाटील यांनी ''शामची आई'' या पुस्तकाद्वारे मुलांना आईचे मोठेपण शिकवण्याचा अमर संदेश देणारे, साथी साने गुरुजी या विद्यार्थी परिषदेस अध्यक्ष म्हणून लाभले होते. परिषदेत कर्मवीर अण्णांचा भव्य सत्कार करुन एक लाख रुपयाचा निधी त्यांना अर्पण करण्याचे जाहीर केले होते. बापूजी साळुंखे, नागनाथ अण्णा, वाय. सी. पाटील कार्यकर्त्यांचे सहकार्याने निधी गोळा करण्याच्या कामाला लागले. अशक्य वाटणारी जबाबदारी स्वीकारणे व ती पार पाडणे हा नागनाथ अण्णांचा स्थायीभाव दिसून येतो. त्यामुळे त्यांना नेहमी यशच मिळत गेलेचे पहावयास मिळते.

* * * *



# १

## 'महार वतन' गुलामगिरी संपविण्याचा प्रयत्न

अनादी काळापासून हिंदू धर्मात द्रविड, अनार्य व बाहेरुन आलेल्या आर्य लोकांमधे समझोता झाल्यामुळे विश्वधर्माची गंगोत्री म्हणजे हिंदू धर्म होय अशी अवस्था होती. पण निसर्गदत्त धर्मात व्यक्तिगत स्वार्थासाठी मनू या स्वार्थी माणसाने ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण समाजाचे पाडून विषमतेचे बीज पहिल्यांदा या देशात पेरले. त्यामुळे भारतीय समाजरचना 'चातुर्वर्ण्य' व्यवस्थेवर आधारलेली झाली. यापैकी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्णासाठी त्या त्या कामाच्या जागा, धार्मिक सामाजिक कायदे कानून रुढींनी अगदी ठरवून दिल्या होत्या. सत्ता, संपत्ती, वैभव, ज्ञान, प्रतिष्ठा, व्यापार, लष्करी, निमलष्करी, मुलकी, अधिकार पदे या तीन वर्गातील लोकांनी उपभोगली होती. चौथा वर्ण शूद्र, अतिशूद्र आणि दलित यांना सत्ता, संपत्ती, ज्ञान, वैभव, प्रतिष्ठा, अधिकार पदासाठी अपात्र ठरविले होते. अशी व्यवस्था अनेक शतके चालली होती.

कुणबी शेतकऱ्यांनी घाम गाळून शेतीची मशागत करावयाची व कसबी कामाची जबाबदारी बारा बलुतेदारांनी उचलावयाची. शूद्रांपैकी ढोरांनी कातडी कमवावयाची, चांभारांनी पादत्राणे तयार करावयाची, भंग्यांनी मैला उचलावयाचा, मांगाने फाशी देणेचे काम करावयाचे, शेवटी राहिलेले महार यांना. इतर म्हणजे पडत्या कामाचे चाकर. गाव गाड्याचा खरा वेठबिगारी किंवा हरकाम्या महार होय. महाराला रोखीचा हक्क नसे आणि त्याच्या उदर निर्वाहासाठी ज्या जमिनी दिल्या होत्या त्यास 'महार वतन' असे म्हणत.

अस्पृश्यता आणि जातीपातींवर आधारलेली भारतीय समाज रचना म्हणजे सामाजिक समतेच्या आड उभी राहिलेली फार मोठी धोंड आहे. या अडथळ्याला दूर करण्याचे काम

महात्मा ज्योतिबा फुले, महर्षि शिंदे, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते की, महार वतनामुळे महार समाजाची अधोगती झाली आहे. महार समाजाची प्रगती घडवून आणावयासाठी महार वतनाच्या शृंखलांतून महारांना मुक्त करणे गरजेचे होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९ मार्च १९२८ रोजी ब्रिटीश कौन्सिलमधे महार वतने नष्ट करण्यासाठी बिल मांडले. महारांची मोफत सेवा बंद करणाऱ्या या बिलास सवर्णांनी विरोध केला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी बिल परत घेतले. महारांची कामे निश्चित करावीत, त्यांना भरपूर पगार द्यावा अशा मागणीचे बिल डॉ. आंबेडकरांनी पुन्हा १७.९.१९३७ रोजी मांडले पण त्यासही पाठिंबा न मिळाल्यामुळे परत घ्यावे लागले.

महार वतनी जमिनीवर जो सरकारी सारा द्यावा लागे त्याला जुडी म्हणतात. त्या जुडीच्या दरात १९३९ साली सरकारने वाढ केली. त्या दरवाढी विरोधी ठिकठिकाणी सत्याग्रह झाले. नाशिक जिल्ह्यात तीव्र सत्याग्रह झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सरकारपुढे पाच मागण्या ठेवल्या १) महार वतन पध्दतीत आमूलाग्र बदल करणे २) महारांच्या वतनी जमिनी रयताव्या कराव्यात ३) महारांना मासिक पगार द्यावा ४) महारांनी फक्त सरकारी कामे करावीत ५) ती कामे ठरवून द्यावीत. पण त्याच काळात दुसरे महायुध्द झाल्यामुळे चळवळ थांबली. यापूर्वीच छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात महार वतने खालसा करुन महार समाजाचा दुवा मिळविला होता.

परंपरेने मिळालेल्या महार वतनी जमिनींसाठी स्वातंत्र्यानंतर न्याय मिळेल असे वाटले होते,पण महार समाजाला त्यासाठी झगडावेच लागले. १९४७ साली पलूस या गावी श्री. बी. सी. कांबळे यांनी महार लोकांनी सवर्णांची कामे बंद करावीत व महार वतनी जमिनी रयतावा कराव्यात म्हणून आंदोलन सुरु केले होते.

ही वस्तुस्थिती नागनाथ अण्णा नायकवडी पहात होते, अभ्यास करीत होते. त्यावर त्यांनी ठरविले की वाळवा व तासगाव तालुक्यातील ८० गावातील प्रत्येक गावचे ५ महार व त्यांचे समर्थक यांची संघटना बांधून वाळवा येथे महार वतनी जमिनी रयतावा करण्याच्या मागणीसाठी परिषद घ्यायची. त्याच्या तयारीसाठी पडवळवाडीचे वस्ताद तुकाराम खोत व इतर कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन नागनाथ अण्णा प्रत्येक गावी पायी जाऊन महारवाड्यातील लोकांना भेटले, त्यांचेकडे जेवण घेतले व त्यांना प्रत्येक गावचे ५ महार प्रतिनिधी वाळव्याच्या परिषदेसाठी पाठविणेस सांगितले. नागनाथ अण्णांच्या पायी केलेल्या भ्रमंतीस वाळवा व तासगाव तालुक्यातील महार समाजातील लोकांनी भरघोस पाठिंबा दिला. त्यामुळे वाळवा येथे भव्य परिषद यशस्वीझाली. त्या परिषदेमधे महार वतने रयतावा करण्याची एकमुखी मागणी सरकारकडे करण्यात आली. महारांनी गावातील कामे करणे बंद केले. हे परिषदेचे यश म्हणावे लागेल. घटनेने मिळालेले समानतेचे हक्क मिळविण्यास महार समाज आता जागृत झाला होता.

अनेक वर्षांच्या सामाजिक अन्यायाच्या विरोधात महार समाज बांधवांना एकत्र आणून संघटितपणे सरकारापुढे, महारांच्या वेठबिगारी रुढीच्या परंपरेला संपविण्यासाठी नागनाथ अण्णांनी



पुढाकार घेतला, त्याचप्रमाणे इतरत्र अनेकांनीही प्रयत्न केले होते.

शेवटी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यावर ना. यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने कनिष्ठ महार वतन खालसा करण्याचे बिल विधानसभेत मांडले व पासही झाले. या बिलाच्या ठरावावर बोलताना आमदार पी. टी. मधाळे, महार वतनामुळे महार समाजावर होणाऱ्या अन्यायाचे वर्णन करताना म्हणाले होते की, एखादा अधिकारी ऑफीसमधे गैरहजर असेल, तर त्याच्या पत्नीला हजर राहण्यास सांगितले जात नाही. परंतु महार चावडीत गैरहजर असेल तर त्याच्या बायकोला बोलवा, ती नसेल तर त्याच्या मुलाला बोलवा अशा तऱ्हेने चावडीतील कनिष्ठ कामे महारांच्या कुटुंबियांकडून करुन घेत असत. अशा अमानवी रुढीचे उच्चाटन करण्यास सुरवात झाली. महारांची कामे पगारी कोतवाल नेमून त्यांचेवर सोपविण्यात आली. १९५७-६२ या काळात मा. नागनाथ अण्णा नायकवडी विधानसभेचे सदस्य होते व त्यांनीही महार वतन खालसा बिल पास करण्यासाठी भाग घेतला होता. आपण ज्या सामाजिक अन्यायाच्या विषयास हात घातला, संघटितपणे पुढाकार घेतला होता त्याचे निराकरण झाल्याचे समाधान आ. नागनाथ अण्णा यांना व महार समाज बांधवांना नक्कीच लाभले असणार .

१९३१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशास स्वातंत्र्य मिळाल्यावर अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्वाची मागणी केली होती. म्हणून म. गांधींनी येरवडा तुरुंगात आमरण उपोषण सुरु केले. त्यावर समझोता होऊन अस्पृश्यांना सर्वसाधारण मतदारसंघात राखीव जागा ठेवण्यास डॉ. आंबेडकर यांनी मान्यता दिली. म. गांधींचे उपोषण सुटले. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण राहावे म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेचे युनियन बोर्डिंग हाऊस पुणे येथे पांडवनगर भागात १९३२ साली सुरु केले.

अगदी याच व अशा उद्देशाने क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी स्थापन केलेल्या हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून अस्पृश्यांपैकी श्री. महादेव शिवाप्पा कांबळे यांची बिनविरोध निवड १९९१ मधे करुन सहकार क्षेत्रातील उद्योगामधे इतिहास घडविला. भारतामधे अस्पृश्यांना समानतेचे स्थान देण्याचे हे एकमेव उदाहरण आहे.

* * * *

# १०

## कर्मवीर भाऊराव पाटील यांना एक लाख रुपयांचा कृतज्ञता निधी अर्पण सोहळा

पूज्य साने गुरुजींच्या अध्यक्षतेखाली कराड तालुक्यातील कापील या गावी दिनांक १२ व १३ मे १९४५ रोजी भरलेल्या सातारा जिल्हा काँग्रेसच्या परिषदेत, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचविल्याच्या महान कार्यास एक लाख रुपयाचा निधी देण्याचा ठराव पास झाला होता. पुढे दिनांक २८ सप्टेंबर १९४५ रोजी कोल्हापूर येथे भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक विद्यार्थी काँग्रेसच्या सभेत एक लाख रुपयाचा निधी गोळा करण्याचे कामासाठी श्री. जी. डी. साळुंखे (बापूजी) मुख्य सचिव, श्री. पी. जी. पाटील व वाय. सी. पाटील खजिनदार म्हणून निवडले. परंतु श्री. नागनाथ नायकवडी, श्री. वाय. सी. पाटील व श्री. बी. डी. कोकाटे हे या उपक्रमाचे मुख्य सूत्रधार होते.

या उपक्रमाची प्रसिध्दी वेळोवेळी मुंबईचे 'लोकशक्ती', पुण्याचे 'ज्ञान प्रकाश' व 'सकाळ', साताऱ्चे 'ग्रामोध्दार' व 'ऐक्य' सांगलीचे 'गावराज्य', कोल्हापूरचे 'पुढारी', नाशिकचे 'स्वराज्य' व बेळगावचे 'राष्ट्रवीर' या मराठी वृत्तपत्रांनी ना. बी. जी. खेर, अर्थमंत्री ना. वैकुंठलाल मेहता, मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. एस. के. पाटील, श्री. ठक्कर बाप्पा यांनी या पवित्र व महत्त्वाच्या कार्यास जनतेने सढळ हातांनी मदत करावी असे जाहीर आवाहन केले.

यामुळे दोन वर्षामधे रु. १,०५,७८९.०० जमा झाले व रु. ४,१८०-१० आणे ३ पै खर्च वजा जाता रु. एक लाखाचा निधी अर्पण करणेस तयार झाला. सदरचा निधी म. गांधींच्या हस्ते अर्पण करण्याची योजना होती पण ते शक्य झाले नाही. त्यांनी निधी अर्पण सोहळ्यास आशीर्वादपर एक संदेश दिला.



''श्री. भाऊराव पाटील की सेवा यही उनका सच्चा कीर्तिस्तंभ है। फिर भी छात्रोंने जो प्रवृत्ती की है वह उनके लिये तो स्तुत्य है। भाऊराव पाटील दीर्घकाल तक सेवा करते रहे।''

दिनांक ९ जानेवारी १९४८ – **मो. क. गांधी**

सत्कार निधी सोहळ्यास महात्मा गांधी येऊ शकत नसल्यामुळे हा सत्कार सोहळा संत गाडगे महाराज यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७ नोव्हेंबर १९४८ रोजी म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती दिवशी करण्याचे ठरले, या दिवशीच्या सोहळ्याचे निमित्ताने सातारा जिल्ह्यातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच अनेक थोर समाजसेवक व राजकीय पुढारीसुध्दा उपस्थित होते. त्यांनी सातारा शहरातून प्रचंड मिरवणूक काढली. खास सजविलेला हत्तीही आणला होता. त्यावर कर्मवीर अण्णा व संत गाडगे बाबांना बसण्याची विनंती विद्यार्थ्यांनी केली, पण दोघांनीही पायी चालणेच पसंत केले. मिरवणुकीनंतर साताऱ्च्या मुख्य समारंभात संत गाडगे महाराज यांचे हस्ते एक लाख रुपयांचा कृतज्ञता सत्कार निधी कर्मवीर भाऊराव पाटील यांना अर्पण करण्यात आला. संत गाडगे महाराज त्या प्रसंगी म्हणाले ''मायबापहो, भाऊरावांनी आपला स्वत:चा प्रपंच न करता जगाचा प्रपंच चालवला आहे. गोरगरिबांच्या मुलामुलींना पोटाशी धरुन त्यांना शहाणे करीत आहेत. या त्यांच्या पुण्य कार्यासाठी जनतेने त्यांच्यावर पैशाचा पाऊस पाडावा''

सत्कारास उत्तर देताना कर्मवीर भाऊराव पाटील म्हणाले, ''मला आज एक लाख हृदये मिळाली आहेत. मी एक साधा रयत सेवक आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर अण्णासाहेब शिंदे, महात्मा गांधी, सदगुरु गाडगे महाराज यांच्याकडून शिक्षण कार्याची प्रेरणा घेतली आहे. स्वावलंबातून शिक्षण हे जगातील शिक्षणाचे ध्येय असावयास पाहिजे. मला व माझ्या संस्थेला असेच सहकार्य करावे. 'तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता।''

नागनाथ अण्णांनी दोन वर्षे श्री. वाय. सी. पाटील व श्री. बी. डी. कोकाटे यांचे बरोबर फिरुन एक लाखाचा निधी गोळा करण्यास खूप कष्ट घेतले. त्या दरम्यान धाकट्या भावाचे लग्न ठरले होते. त्या करिता वधू पक्षाकडून ७०० रुपये आले होते. त्यामधे ३०० रुपयाची भर घालण्यास वडिलांना सुचवले व १००० रुपये कर्मवीरांच्या फंडास देऊन टाकले होते. नागनाथ अण्णांनी या संपूर्ण कार्यात स्वत:चे नावावर एकही रुपया दिला नाही. लोकांचा जास्तीत जास्त सहभाग त्यांनी मिळविला व इतर विद्यार्थी कार्यकर्त्यांना मदत केली कारण ते भूमिगत होते.

१९३९ साली कर्मवीर भाऊराव पाटील यांचा विद्यार्थी दशेत असताना संबंध आला तो नागनाथ अण्णानी जोपासला. कर्मवीरांच्या कार्याने ते प्रभावीत झालेमुळेच नागनाथ अण्णांनी सखाराम मकदम, वाय. सी. पाटील, बापूजी साळुंखे, बी. एल. गायकवाड यांच्या मदतीने शिराळा पेट्यातील अतिदुर्गम भागात व्हॉलंटरी शाळांची सुरवात १९४०-४१ साली केली

होती. कर्मवीरांच्या जन्म भूमीत ऐतवडे बु.।। येथे सामुदायिक शेतीचा उपक्रम सुरु करण्याची योजना नागनाथांनी आखली होती. याच ऐतवडे गावी भूमिगतांचा फौजी ट्रेनिंग कँप ढगेवाडीच्या डोंगरात सुरु करुन स्वातंत्र्य संग्रामात एक इतिहास घडविला होता. कर्मवीर भाऊराव पाटील हे नागनाथ नायकवडींचे आराध्य दैवत आहे. त्यांच्या कार्यास एक लाखाचा कृतज्ञता निधी देताना, तो सोहळा पाहताना नागनाथ अण्णांना जे समाधान लाभले असेल त्याला तोड नाही. कारण रयत शिक्षण संस्थेच्या इतिहासातील ही सर्वसामान्य जनतेकडून मिळालेली ऐतिहासिक देणगी ठरली आहे.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना १९८३ साली सुरु झाल्यावर नागनाथ अण्णांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेस लाखो रुपयांची मदत केली आहे. कृतज्ञता व्यक्त करण्याचे हे दुर्मिळ उदाहरण आहे.

साताऱ्च्या अभेद्य जेलच्या भिंतीवरुन उडी मारुन नागनाथ अण्णांनी धाडसाने सुटका करुन घेतल्यानंतर साताऱ्यामध्ये संरक्षण मिळेल असे एकमेव ठिकाण अण्णांनी निवडले होते ते म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सातारा शहरातील सोमवार पेठेतील घर. त्या दिवशी कर्मवीर भाऊराव पाटील घरात नव्हते पण त्यांच्या कॉटवर त्या दिवशी अण्णांनी बिनधास्तपणे विश्रांती घेतली होती याची आठवण अण्णांना अजूनही आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील हयात असताना त्यांच्या सदिच्छा वेळोवेळी नागनाथ अण्णांनी मिळवल्याच होत्या. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर रयत शिक्षण संस्थेच्या कार्याची प्रेरणा घेऊन अण्णांनी वाळवा येथे किसान शिक्षण संस्था स्थापून विद्यालये व महाविद्यालय सुरु केले आहे. किसान शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमामध्ये नागनाथ अण्णा, कर्मवीर भाऊराव पाटील हे आमचे दैवत आहे असे जाहीरपणे सांगत असतात.

विशेष म्हणजे वाळवा व सोनवडे येथील किसान शिक्षण संस्थेच्या वसतिगृहामध्ये गरीब व गरजू मुलां-मुलींची मोफत राहण्याची व जेवणाची सोय नागनाथ अण्णांनी केली आहे. सुरवातीच्या कठीण काळामध्ये वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी तेल, मीठ व धान्य घरोघरी जाऊन गोळा करुन विद्यार्थ्यांची सोय केली जात होती. विद्यार्थ्यांचे जेवण झाल्याशिवाय शिक्षकांनी जेवण घेऊ नये असा दंडक अण्णांनी घालून दिला होता. याही उपक्रमामध्ये नागनाथ अण्णांनी कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्यागाची प्रेरणा घेतली आहे असे मला वाटते. त्या काळात नागनाथ अण्णांनी मुलांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी अनेकांकडून आर्थिक मदत गोळा केली होती.

✻ ✻ ✻ ✻



# ११

## परकीय गेले, स्वातंत्र्य मिळाले पण स्वदेशी सरकारचा आकस

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजी महासत्तेच्या गुलामगिरीतून भारतीय जनता मुक्त झाली. देशाच्या राजधानी दिल्लीपासून ते छोट्या खेड्यापर्यंत सर्व ठिकाणी तिरंगी राष्ट्रध्वज फडकावून पहिला स्वातंत्र्यदिन साजरा झाला तसाच वाळवा येथे नागनाथ अण्णांनी साधेपणाने छोटा स्वातंत्र्य दिनाचा समारंभ गावकऱ्यांच्या उपस्थितीत पार पाडला. नागनाथ अण्णा त्या प्रसंगाबद्दल म्हणाले, ''आम्ही एक टप्पा ओलांडला, आमचे एक पाऊल पुढे पडले, परंतु ब्रिटीश भांडवलदारांचे सरकार गेले व हिंदी भांडवलदारांचे आणि उच्चवर्णीय वर्गाचे हिंदी सरकार अस्तित्वात आले. देशातील कष्ट करणाऱ्या जनतेला, दडपलेल्या जाती जमातींना व महिलांना वाटले की आता आपली गरिबी हटणार, दुःखे संपणार, सुखाचे दिवस येणार. पण तसे काही घडणार नाही याची जाणीव झाल्यामुळे मी १६ ऑगस्ट पासून समाजबांधवांच्या समाजसेवेचे, अन्यायाला तोंड देऊन तो दूर करण्याचे पूर्वीचे काम चालू ठेवले.''

नागनाथ अण्णांच्या कार्याविषयी डॉ. भारत पाटणकर म्हणतात,''स्वातंत्र्याची पहाट होता होताच जनतेला पिळून टाकणारी, दुःखात लोटणारी काळरात्र सर्व जनतेच्या जीवनावर पसरली. म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ अण्णा आणि त्यांच्या बहुसंख्य सहकाऱ्यांनी स्वातंत्र्यासाठी पेटविलेल्या जीवनाच्या मशाली तशाच पेटत्या ठेवण्याचा निर्णय घेतला. नव्या पिढीला या काळरात्रीची जाणीव देत त्यांनीही आपल्या आयुष्याच्या मशाली खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी पेटवाव्यात असा संदेश देत ही मंडळी लढतच राहिली. सत्तेत जाणे सहज शक्य असताना तिला ठोकरले आणि नागनाथ अण्णांनी आजतागायत जनतेच्या चळवळीत राहणेच पसंत केले. यासाठी जो धीर लागतो सहनशक्ती लागते, तपश्चर्या लागते, जननिष्ठा

लागते ती अण्णांच्या अंगी आणि त्यांच्या मोजक्या सहकाऱ्यांच्या अंगी असलेमुळेच हे शक्य झाले, म्हणूनच स्वातंत्र्य मिळून ५६ वर्षे झाली तरी नागनाथ अण्णा आजही क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आहेत.''

अण्णांनी आपले प्राथमिक शिक्षण वाळवा व आष्टा येथे पुरे केले. माध्यमिक शिक्षण राजाराम हायस्कूल कोल्हापूर येथे बोर्डिंगमधे राहून खूप कष्टाने घेतले, पण विद्यार्थी दशेतच स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतल्यामुळे त्यांचे माध्यमिक शिक्षण इंग्रजी ६ वी नंतर थांबले होते. शिक्षण घेत असताना शाळेच्या व हायस्कूलच्या वर्गांना अधिकारी भेट देत असत. प्रत्येकाला तू मोठा झाल्यावर कोण होणार? असे विचारीत. त्या प्रश्नाला अण्णा उत्तर देताना म्हणत, ''मी मोठा झाल्यावर शिक्षक होणार व माझ्या गावी हायस्कूल सुरु करुन माझ्या गावच्या मुलांमधे राष्ट्रीय वृत्ती वाढविण्याचा प्रयत्न करणार'' परंतु ही महत्त्वाकांक्षा पुरी करण्यासाठी अर्धवटपणे खंडीत झालेले शिक्षण पुरे करणे गरजेचे होते. स्वातंत्र्य मिळालेवर राष्ट्रीय चळवळी थंडावल्या होत्या. या काळात नागनाथ अण्णांनी कोल्हापुरच्या राजाराम हायस्कूलमधे मॅट्रीकच्या वर्गात पुन्हा नांव घातले. योगायोगाने शिक्षणास प्रोत्साहन देणारे, राष्ट्रीय विचाराचे श्री. व्ही. एस. अय्यर आणि श्री. साटम हे वर्गशिक्षक मिळाल्यामुळे अण्णा १९४७-४८ साली मॅट्रिक पास झाले. मॅट्रिकचे परिक्षेतील गणिताच्या पेपराच्या आदल्या दिवशी श्री. अय्यर सरांच्या मोठ्या मुलाने अण्णांना दोन संभाव्य प्रश्न व उत्तरे सोडवून दाखविली होती. दुसऱ्या दिवशीच्या गणिताच्या पेपरमधे काल कळालेले दोन प्रश्न होते, अण्णांनी ते दोन प्रश्न सोडून इतर प्रश्न सोडवले व परिक्षेचे पावित्र्य राखले. असा प्रामाणिकपणा अण्णांनी आयुष्यभर जोपासला म्हणून त्यांचे सामाजिक कार्य नेहमीच पारदर्शी ठरलेले आहे.

अण्णांनी राजाराम कॉलेजमधे एफ. वाय. क्लासमधे नाव घातले. त्यावेळी राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल बॅ. खर्डेकर होते. त्यांचे अण्णांच्यासारख्या होतकरु व गरीब विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष असे. गरीब विद्यार्थ्यांच्या फी साठी त्यांचा पगार खर्च होत असे. थकलेल्या फी साठी एकाद्या विद्यार्थ्याबद्दल तक्रार घेऊन कॉलेजचा क्लार्क प्रिन्सिपॉल बॅ. खर्डेकरांकडे गेला की ते त्याला सांगत, माझ्या पगारातून थकलेली फी जमा करावी.

याच काळामधे वाळवा तालुक्यामधे सुडाचे राजकारण झाले. सखाराम बारपट्टे यांनी कामेरीचे आमदार के. डी. पाटील यांचा खून केला. त्यामुळे सातारा जिल्ह्यामधे खळबळ उडून गेली. असे प्रकार थांबावेत, शांततेचे व सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे, म्हणून राज्यकर्त्यांमधे चर्चा सुरु झाली. त्याचाच भाग म्हणून मुंबई इलाख्याचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांचेकडे प्रमुख स्वातंत्र्य सेनानींची बैठक गृहमंत्र्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकारामुळे आयोजित केली होती. गृहमंत्री मलबार हिलवरील सह्याद्री बंगल्यात राहात होते. त्या बंगल्याच्या व्हरांड्यामधे रविवारी ही बैठक झाली. बैठकीस वसंतदादा पाटील, नागनाथ अण्णा, बाबूजी पाटणकर, शेख काका, किसन वीर, कासेगावकर वैद्य उपस्थित होते. बैठकीसाठी गोल खुर्च्या मांडल्या होत्या, समोर मोरारजी देसाई येऊन बसले, यशवंतराव चव्हाणांनी उपस्थितांच्या ओळखी करुन दिल्या. त्या प्रसंगाची आठवण सांगताना अण्णा म्हणाले ''यशवंतराव चव्हाण माझ्याकडे बोट करुन म्हणाले, ''हे नागनाथ नायकवडी'' पुढे अशी प्रश्नोत्तरे झाली.



''हेच नागनाथ नायकवडी काय?'' मोरारजी देसाई
''होय, मीच नागनाथ नायकवडी.'' मी,
''आपण मोठे पुढारी झाला आहात'' मोरारजी देसाई
''आपण हे कशावरुन म्हणता?'' मी
''मला कधी भेटला नाही?'' मोरारजी देसाई
''पुढाऱ्यांना भेटण्याची मला सवय नाही'' मी
''ठीक आहे'' मोरारजी देसाई,
''ठीक आहे!'' असे म्हणून मी खुर्ची बाजूला करुन उठलो, त्याचबरोबर माझेबरोबरचे सर्वजण उठले व बैठक संपली. सह्याद्री बंगल्याचे पायरीवरुन उतरताना वसंतदादा माझ्या पाठीवर थाप मारुन म्हणाले, ''कोणीतरी मोरारजीस सातारचे पाणी दाखवावयास पाहिजे होते, ते तू केलेस'' अशा प्रसंगातून अण्णांनी आपला सातारी स्वतंत्र बाणा जोपासला होता व वेळ प्रसंगी दाखविला होता. त्याबद्दल जीवनामधे खूप मोठी किंमतही द्यावी लागली होती व त्यांनी धीटपणाने स्वतंत्र वृत्तीने व बाणेदारपणे सोसली होती.

याच दरम्यान नागनाथ अण्णांनी वाळवे तालुक्यातील शेतकऱ्यांचे लेव्ही विरुध्द आंदोलन सुरु केले. शेतकऱ्यांना सरकार लेव्ही धान्याचा योग्य दर देत नाही, त्याच बरोबर शेतकऱ्यांना लागणाऱ्या सिमेंट पत्रे वगैरे वस्तू रास्त भावाने मिळत नाहीत. या अन्यायकारी सरकारी धोरणाविरुध्द आवाज उठवण्यासाठी जुनेखेड येथे एक भव्य परिषद अण्णांनी आयोजित केली. क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. यशवंत चव्हाण यांनी उपस्थित राहून शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करावेत अशी मागणी केली. १९४२ च्या लढ्यातील शस्त्रे सरकारजमा केली नाहीत असा आरोप होता. यासारख्या अनेक कारणांमुळे मोरारजी देसाई यांनी सातारच्या पोलिसांकरवी नागनाथ अण्णांना पकडण्यासाठी वॉरंट काढले. अण्णांना पकडण्यासाठी ज्या फौजदाराने अण्णांना पूर्वी वाळवा येथे अटक केली होती, त्या अहमदी फौजदाराकडे अण्णांना अटक करण्याची कामगिरी सोपविली होती.

अण्णा एफ. वाय. च्या परिक्षेस राजाराम कॉलेजमधे बसले होते. त्यावेळी कॉलेजचे रजिस्ट्रार माधवराव राऊतांकडून पोलिस अण्णांना अटक करण्यास आले आहेत हे कळाले. प्रिन्सिपॉल खर्डेकरांनी लगेच अण्णांना कॉलेजच्या मागच्या दाराने बाहेर जाण्याची व्यवस्था केली आणि फौजदारास प्रिन्सिपॉलनी सांगितले की, नायकवडीची खुशाल चौकशी करा! त्यामुळे फौजदारास हात हालवत परत जावे लागले.

त्यानंतर काही दिवसांनी किर्लोस्कर कंपनीसमोर कामगारांची सभा घेण्यास अण्णा गेले असताना पाठलाग करीत असलेल्या पोलिसांनी अण्णांना पकडण्याची हालचाल केली. हे कळताच अण्णांनी भिंतीवरुन उडी टाकून पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण भिंती पलीकडे कुंपण असल्यामुळे अण्णा पकडले गेले. त्यांना सांगलीच्या जेलमधे बंदिस्त करुन ठेवले. पण अण्णांच्या बरोबर चळवळीत असणारी क्रांतिकारक जनता गप्प बसून अन्याय सहन करणारी नव्हती. देशद्रोही घरभेद्यांना जनता कोर्टात शिक्षा देणारी जनता मोरारजी सरकारला नमवून अण्णांची सुटका करुन घेण्यासाठी संघटीत झाली. कॉ. संतराम पाटील व कॉ. रावसाहेब कळके यांनी

नेतृत्व केले. १० हजाराच्या संख्येने जनतेने पायी चालत त्यावेळच्या दक्षिण सातारा कलेक्टर कचेरीवर सांगलीला भव्य मोर्चा काढला. त्यामध्ये पडवळवाडी ता. वाळवा या गावचे घरटी शेतकरी सामील झाले होते. अण्णांना सोडले नाही तर सांगली जेलचा दगड अन दगड वेगळा करण्याचा इशारा मोर्चातील जनतेने दिला. कलेक्टर श्री. सुखटणकर यांनी मुंबई सरकारशी चर्चा केली व दुसऱ्या दिवशी अण्णांची सांगली जेलमधून सुटका झाली. ब्रिटीश सत्तेच्या तुरुंगातून अण्णांनी स्वत:हून धाडसाने सुटका करुन घेतली होती. आता काँग्रेसच्या सरकारला नमते घेऊन अण्णांची सुटका करण्याची नामुष्की पत्करावी लागली होती. यापुढेही ज्या ज्या वेळी अण्णांना शासनाने विनाकारण डिवचले त्या वेळी डिवचणाऱ्यांना पश्चात्ताप झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

मला मात्र मोरारजी देसाई व नागनाथ अण्णा यांचेशी झालेला खटक्याचा संवाद, नंतर त्यांना झालेली अटक व जनतेच्या रेट्यामुळे झालेली सुटका या प्रसंगावरुन छत्रपती शिवाजी महाराजांचा औरंजेबाच्या दरबारात झालेला अपमान, त्यावर त्यांनी दिलेले बाणेदार उत्तर व दरबारातून निघून गेल्यावर त्यांना झालेली नजरकैद आणि त्यातूनही त्यांनी करुन घेतलेली सुटका व वेश बदलून राजधानी रायगडला परत येणे, या इतिहासाची पुनरावृत्ती नागनाथ अण्णांनी करुन दाखविली, म्हणून महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे नागनाथ अण्णा हे खरे वारसदार आहेत असे वाटते.

याच प्रसंगातून नागनाथ अण्णांचे सर्वसामान्य जनतेचा असलेला पाठिंबा दिसून आला. त्याच जनसामान्यांच्या रेट्यामुळे शासनाला माघार घेऊन त्यांची सुटका करावी लागली होती. त्यामुळे नागनाथ अण्णांच्या पुढील जीवनामध्ये अशा तऱ्हेची अप्रिय कार्यवाही करण्याचे धाडस आजपर्यंत शासनाला झालेले नाही. स्वातंत्र्यलढ्यामध्ये ब्रिटीश सत्तेच्या अन्यायी सत्तेविरुध्द अण्णा ज्या हिरीरीने लढले त्याच तडफेने व स्वतंत्र बाण्याने स्वातंत्र्यानंतरच्या शासनाच्या अन्यायाविरुध्द अण्णा आजही लढत आहेत. जेथे अन्याय तेथे नागनाथ अण्णा स्वत:हून धावत जातात व ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यांना आधार देतात, पाठिंबा देतात, मदत करतात त्यामुळेच शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, विस्थापितांचे अनेक जटील प्रश्न नागनाथ अण्णांनी सोडवलेले आहेत व सोडवत आहेत.

* * * *



# १२

## क्रांतिवीराचा आदर्श विवाह सोहळा

एका थोर विचारवंताने 'लग्न' या विषयावर मार्मिक विवेचन करताना म्हटले आहे की, लग्न हा माणसांना लागलेला शोध आहे. स्त्री पुरुषांना परस्परांविषयी जे वाटते ते अनादी कालापासून वाटत आले आहे. सुखाने जगावे असे सर्वांना वाटते पण सुख नेमके कशात आहे हे माणसांना समजावयाला बराच वेळ लागला. माणसाच्या मनात स्थैर्याचा विचार आला. शेती कसली गेली, घरे उभी राहिली त्यामागे संसार आले. नकळत स्त्री–पुरुष परस्परांसमीप आले. या सुखद सहवासाला रक्षण देणाऱ्या भिंती उभ्या राहिल्या. त्यातून कुटुंबे वाढू लागली. या कुटुंबांना विवाहसंस्थेचा परीघ लाभला. या परिघात स्त्री–पुरुष संबंधाचे रामायण घडले. त्यातून अनेक व्याप वाढतात. नवीन जोखिमा जीवनात प्रवेश करतात. सर्वांचे पुन्हा एक विस्तीर्ण जग निर्माण होते. तिच्यातून जीवनाची ही बांधणी माणसाना आवडू लागते. त्यातून बहुरंगी सामाजिक बांधिलकी निर्माण होते. ती एक आवश्यक बाब असल्याचे उमगते व पटते. माणसांनी बांधिलकीचे शास्त्र तयार केले. रक्षाबंधनापासून लग्न बंधनापर्यंत आणि सामाजिक बांधिलकीपासून राष्ट्रभक्तीपर्यंत अनेक उभे आडवे धागे एकमेकात गुंतून त्यांची गुंफण तयार झाली. लग्न ही सुंदर गुंफण आहे. जीवनाचे सर्वांगीण पूर्णत्व विवाहामुळे शक्य होते. प्रदीर्घ अनुभव निर्माण झालेले लग्न नावाचे नवनीत स्त्री पुरुषांना जगण्याचे बळ देते. या नवनीतामुळे जीवनाचे अमृत होते. या अमृताचा नैवेद्य देव, देश आणि धर्म यांच्या वाट्याला येतो.

परंतु कालांतराने लग्न या जीवनातील पवित्र सोहळ्यास ब्राह्मणवर्गाने आपले वर्चस्व समाजावर राहण्यासाठी त्या लग्न विधीस रोजगार हमी योजनेचे स्वरुप दिले. लग्नामधे अनेक अनावश्यक गोष्टी घुसडल्यामुळे सर्वसामान्यांतील लग्न म्हणजे आनंदाचा सोहळा होण्याऐवजी

खर्चाचा एक विषय होऊन बसला. हुंडा, वरदक्षिणा यासारख्या अनिष्ट रुढींमुळे सामान्यांची ससेहोलपट होऊन कर्जबाजारी होण्याची वेळ येऊ लागली होती. म. ज्योतिराव फुले यांनी अशा अनिष्ट रुढीवर कोरडे ओढले. सत्यशोधक समाजाने लग्न विधी साध्या रीतीने करण्याचे प्रबोधन केले. संत गाडगे महाराज यांनी तर आपल्या कीर्तनात लग्नासाठी होणाऱ्या अनावश्यक खर्चावर टीका करून त्याची गरज नसल्याचे सांगितले. क्रांतिसिंह नाना पाटील आपल्या समाज प्रबोधनपर भाषणात लग्नातील विधीबद्दल व खर्चाबद्दल टीका करीत. त्यांनी स्वत:चे लग्न काहीही खर्च न करता, मुंडावळ्या, बाशिंग न बांधता करुन इतरांना आदर्श निर्माण केला. त्याला 'गांधी लग्न' असे नाव दिले. त्यांची प्रेरणा घेऊन ज्या स्वातंत्र्यवीरांनी आपल्या लग्नात क्रांतिसिंहाचे अनुकरण केले, त्यामधील क्रांतिवीर नागनाथ अण्णा हे एक आदर्श पुरुष आहेत.

अण्णांनी भूमिगत चळवळीमुळे अपुरे राहिलेले शिक्षण कोल्हापुरला पुरे केले. ते मॅट्रीक झाले व एफ. वाय. च्या वर्गात त्यांनी आपले नाव दाखल केले. शिक्षण शास्त्रातील पदवी घेऊन वाळवा येथे ग्रामीण समाजबांधवांना शिक्षण देणारी संस्था काढण्याचा दूरदृष्टीचा विचार अण्णांच्या मनात होता. तोही अण्णांनी आपले लग्न ठरविताना केला असावा.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारतास स्वातंत्र्य मिळाले पण स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी अनेक गोष्टी करण्याचे काम अपुरे होते. त्यासाठी लग्नाच्या बंधनात पडावे की नाही अशा द्विधा मनस्थितीत असताना अण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाई आपल्या मुलाचा विवाह करुन टाकण्याचा विचार करीत होत्या. लग्न करण्याचा लकडा अण्णांचे मागे लावल्यामुळे एके दिवशी अण्णांनी आईस लग्न करण्यास तयार आहे व योग्य अशी मुलगी पाहा असे सांगितले.

अण्णा लग्न करण्यास तयार झाले हे कळताच अण्णांचे सहकारी कार्यकर्ते गंगाराम गायकवाड यांनी सुचविले की बुरुंगवाडीचे कदम पोस्टमास्तर यांची कन्या मिरज येथे शिकत आहे व ती अण्णांना योग्य अशी आहे.

अण्णांच्या आई व (जक्राईवाडीचे) गंगाराम गायकवाड मिरजेस गेले. श्री. यशवंत गोविंद कदम यांच्या घरी गेले तर तेथे घरास कुलूप होते. मग चौकशी करीत कुसुमताई ज्या हायस्कूलमधे शिकत होत्या तेथे गेले. शाळेत कामासाठी भेटावयास आलेल्या पालकांसाठी ठेवलेल्या बाकड्यावर बसले. इतक्यात कुसुमताई वर्गाबाहेर आल्या व त्यांनी अण्णांच्या मातोश्रीसच विचारले की तुम्ही कोणास भेटावयास आला आहात. आईला मुलगी पसंत पडली. मिरजेहून आलेनंतर घरात चर्चा झाली. गंगाराम गायकवाड करवी मुलीचे वडील यशवंतराव कदम (पोस्ट मास्तर) यांना मुलगा व घर पाहण्यास वाळव्यास या असा निरोप पाठविला. दोन-चार दिवसातच श्री. कदम मुलाचे (अण्णांचे) घर पाहण्यास वाळवा येथे आले. त्यावेळी वाळवा येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे इमारत बांधण्याचे काम चालू होते. पाया भरला होता व भिंतीचे काम सुरु होते. त्यासाठी मारुतीचे देवळासमोर चुन्याचे घाणीवर अण्णा मित्रांना चुन्याच्या पाट्या नेण्यासाठी मदत करीत होते. गावात आलेला नवीन पाहुणा सी. आय. डी. चा माणूस असावा असे समजून अण्णांनी एका मुलास नवीन आलेला पाहुणा कोठे जात आहे याची चौकशी करणेस पाठवले. तो पळत जाऊन परत आला व त्याने सांगितले की ते पाहुणे तुमच्याच घरात गेलेत.



तेवढ्यात घरुन आईचा निरोप आला की श्री. कदम, मुलीचे वडील आले आहेत घरी मागचे दाराने ये. त्या प्रमाणे अण्णांनी घरी जाऊन आंघोळ केली आणि सोप्यामधे बैठकीत येऊन बसले. त्यावेळी अण्णांनी मुलीचे वडिलांना स्पष्टपणे सांगितले की, ''मी चळवळीतला एक कार्यकर्ता असलेमुळे जसे मला अनेक मित्र आहेत तसेच शत्रूही आहेत. माझ्या जिवाचा धोका अजून टळलेला नाही. या गोष्टीचाही विचार करुन, मुलीला याची कल्पना देऊन मगच आमच्या स्थळाचा विचार करावा.'' तसेच लग्नानंतर शिकणार का? असेही विचारले होते.

अण्णांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे कदम यांचेकडे तिखट प्रतिक्रिया उमटली. अशा पार्श्वभूमीवर एकूण परिस्थिती पाहिल्यावर श्री. कदम न बोलता गेले. सायंकाळ झाल्याने शिरगावला आपल्या पाहुण्यांच्याकडे मुक्काम केला. शंकरराव जाधव यांनी पाहुण्यांना विचारले आपण का आला होता, त्यावर त्यांनी सांगितले वाळव्याला नागनाथ नायकवडीचे स्थळ माझ्या मुलीसाठी सुचवले होत ते पहाण्यासाठी वाळव्याला गेलो होतो. त्यावर आश्चर्य व्यक्त करत शंकरराव म्हणाले, ''नागनाथ अण्णा लग्न करतायत काय''? होय, म्हणूनच तर मी स्थळ पाहण्यासाठी गेलो होतो. पण ते भलतच काय तरी बोलत्यात! शंकरराव जाधव म्हणाले, ''भलतच म्हणजे काय?'' त्यावर श्री. कदम म्हणाले मुलगा म्हणतोय ''माझ्या जिवाचा धोका अजून टळलेला नाही.'' शंकरराव म्हणाले. आहो! बुरुंगवाडकर त्यांनी खर तेच सांगीतले. खर सांगण हा काही गुन्हा आहे का? आहो, असे स्थळ मुलीला मिळालेतर आयुष्याचे कल्याण होईल. श्री. यशवंत कदम यांच्या मनाचे समाधान झाले त्यानी शंकरराव जाधव यांना सांगितले तुम्हीच वाळव्यास जाऊन मुलाकडील लोकांना मुलगी पहाण्यास बुरुंगवाडीला येण्याचे निमंत्रण दया. त्या प्रमाणे शंकरराव जाधव यांनी निरोप सांगितला. अण्णा, राजमती ताई, खंडू शेळके (दाजी), नारायण कदम (शिराळकर), रामचंद्र अहिर (मास्तर) अशी काही मंडळी बुरुंगवाडीला बैलगाडीने मुलगी पाहणेस गेले. मुलगी पाहण्याचा सोहळा पार पडला. सर्वांनी पसंतीचा सूर काढला. मुलीची उंची कमी होती पण त्यामधे तडजोड केली. शेवटी विवाह ही एक तडजोड असते हेच खरे. श्री. नायकवडीचे कडून सांगण्यात आले की, ''तुम्ही काही देऊ नका, आम्ही काही घेणार नाही. तुमचं हळदीकुंकू व आमचा नारळ'' अशा शब्दात तोंडी याद्या झाल्या. लग्न कोल्हापूरला अण्णांचे शिक्षक श्री. अय्यर (सर) यांचे घरी साध्या पध्दतीने करायचे ठरले.

अण्णांचे लग्नास पैलवान बिरनाळे व राजमती ताई, माधवराव गायकवाड, जी. आर. पाटील, ऐनापुरे, मुलीचे वडील यशवंत गोविंद कदम, मुलीचे बंधू बाळासाहेब कदम, श्री. अय्यर पतीपत्नी अशी मोजकी मंडळी हजर होती. श्री. अय्यर यांच्या कन्येने एक काव्य म्हटल्यावर श्री. अय्यर यांनी नागनाथ अण्णांच्या जुन्या कपड्यावर शुभाविवाह लावला. कुसुमताई कदम आता सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी झाल्या. तो शुभ दिवस होता १३ फेब्रुवारी १९४९ त्यानंतर सौ. कुसुमताईंना व अण्णांना अय्यर सरांनी आपल्या घरी जेवावयास वाढले व नंतर कुसुमताईंना घेऊन अण्णा राजारामपुरीतील आपल्या खोलीवर आले. त्यासाठी १ रुपया टांग्यासाठी खर्च झाला. असा हा आगळा वेगळा विवाह सोहळा अवघ्या १ रुपयात संपन्न झाला.

आपल्या वैवाहिक जीवनाबद्दल सांगताना सौ. कुसुमताई ज्यांना सर्वजण 'माई' संबोधतात, त्या म्हणाल्या की, ''आमचा पहिला मुलगा किरण १९५० साली झाला. त्याचे बारसे केले. त्यास नायकवडी उपस्थित होते. पहिला मुलगा झाला म्हणून सासूबाईंना आनंद झाला होता. मुलाचे कौतुक माझे माहेरी व सासरी सर्वजण करीत होते. त्याच काळात नायकवडी यांनी भूमिगत चळवळ पुढे चालू ठेवल्याचा राग येऊन, मोरारजी देसाई यांनी नायकवडींवर पकड वॉरंट काढले होते. त्याच अवस्थेत किर्लोस्कर कंपनी समोर कामगारांची गेट सभा नायकवडी यांनी घेतली होती. पोलीस पकडण्यास येत आहेत असे पाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पळताना जांघेला तार लागली व जखम झाली त्यामुळे पोलिसांनी पकडले व सांगली जेलमधे ठेवले. सांगली-वाळवा-शिराळा भागातील कार्यकर्ते एकत्र झाले व ४ ते ५ हजार हत्यारबंद शेतकऱ्यांनी सांगली कलेक्टर कचेरीवर गावा गावापासून पायी चालत गेलेला मोठा निर्धार मोर्चा काढला. यामधे वाळवा तालुक्यातील पडवळवाडी या गावचा प्रत्येक घरटी एक शेतकरी सामील झाले होते. पावसाळ्याचे दिवस होते. रस्ते चिखलाचे झाले होते. अशा अवस्थेत मोर्चातील शेतकरी कलेक्टर कचेरीसमोर ठाण मांडून नायकवडींना सोडण्याची मागणी करीत होते. नायकवडींना सोडल्याशिवाय हलणार नाही अशा घोषणा देत होते. शेवटी मोरारजी सरकार नमले व कलेक्टरने जाहीर केले की, उद्या नायकवडींना सोडतो व त्याप्रमाणे नायकवडींची सुटका झाली. मी त्या धक्क्यामुळे आजारी पडले. सुरवातीला ताप आला व पुढे त्यामुळे मणक्यातील टी. बी. चे निदान झाल्यामुळे चिंताग्रस्त झाले होते. माझ्या मुलाला किरणला आईकडे सांभाळावयास ठेवले. प्रथम कोल्हापुरला कम्युनिस्ट पक्षाच्या ऑफिसमधे राहून उपचार केले. तेथे बरं वाटेना म्हणून मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमधे ॲडमिट केले. थोड्या उपचारानंतर बरे वाटल्यावर वाळवा येथे आले. १९५२ साली नायकवडी स्वतंत्र उमेदवार म्हणून विधानसभेची निवडणूक लढवत होते. त्यांच्या येलूर येथील प्रचार सभेत भाग घेतला. पण त्या श्रमामुळे डोकेदुखीचा त्रास वाढला व मी बेशुध्द झाले. तेथून मला मिरज मिशन हॉस्पिटलमधे नेले. दुसरे दिवशी मी डोळे उघडले जवळ जवळ ९ महिने मिरज हॉस्पिटलमधे उपचार घेत होते. सासूबाई हॉस्पिटलमधे माझ्या जवळच होत्या. नायकवडी डॉक्टरांकडे येऊन माझ्या प्रकृतीची चौकशी करीत होते. अशक्तपणा एवढा वाढला होता की हात उचलता येत नव्हता. वडील-बापू मला जेवण चारायचे. नायकवडी आईला म्हणायचे तू लग्न करावयास लावलं, तर तूच बायकोच्या सोबतीला थांब. नऊ महिन्यांनी घरी निघाले. मिरज-किर्लोस्करवाडी रेल्वेने आलो. तेथून मला घोड्यावर बसवून नदीपर्यंत आणले शिरगावचे शंकर जाधव, मुलगा आणि नायकवडी बरोबर होते. नावेतून बसून नदी पार करुन वाळव्यास आलो. स्वत:चे घरात पुनर्जन्म घेऊन परत आले.

घरी आलेवर घरातील सगळी कामे करत असे. शेण काढणेपासून भाकरी बडवणे, आडाचे पाणी ओढून ते डोक्यावरुन आणणेचेही काम केले. मारुतीची विहीर व थोरातांच्या विहीरीतून पाणी भरले आहे.

माझे सासरे रानातच थांबत. त्यांना घरातून जेवण पाठवावे लागे. आमचं घर जुन्या पध्दतीचं होतं. मातीच्या भिंती माळवदी चार खणांचे तीन जाप्त्याचे घर होते. सोप्याला दार



नव्हते. एकदा नायकवडी व दीर शामराव झोपले असताना सासूबाई काम करणेस उठल्या होत्या त्यावेळी मधल्या जाप्त्याच्या छताच्या विटा खाली पडल्या. म्हणून सासऱ्यांनी माळवदी छत खाली उतरवले. मधल्या जाप्त्याची उंची वाढवून कौलारु केले. पहिले दोन दीर वारल्यामुळे नायकवडी हे नवसाने झाले होते. त्यानंतर धाकटे दीर शामराव झाले होते. स्वयंपाकघर कौलारुच होते. माळवदी भेंड्याच्या भिंती होत्या त्या मातीने सारवाव्या लागत. अशा घरात आमचा व घराण्याचा परिवार वाढला आहे.

नवीन पिढीने जुन्या घरात आता पाहिजे तसा बदल केला आहे. नव्या पिढीच्या विचारांना साथ देऊन मी नवीन पिढीबरोबर, नातवंडांबरोबर जीवन घालवत आहे.

नंतर विशाखा व प्रगती या दोन मुली झाल्या, त्यावर अरुण व वैभव असे दोन मुलगे झाले. नायकवडीचे समाज सेवेचे कार्य चालूच होते. घरची जबाबदारी आई वडील व भाऊ यांच्यावरच सोपवली होती. नायकवडीचे वडील, आई, भाऊ वारलेनंतर ते अंगणातूनच चौकशी करीत.

अशा परिस्थितीमधे लग्न झालेवर सात वर्षांनी मिरज हायस्कूलमधे माझे नांव घातले. एक महिना उशीरा गेले पण परवानगी मिळाली. मुले वाळव्यात सासूबाईंकडे ठेवली. माझे वर्ग शिक्षक बोडस होते व मुख्याध्यापक काळे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विषय घेतले व पास झाले. कसलाही खाजगी क्लास नाही, शिकवण्या नाहीत. परंतु माझ्या प्रामाणिक प्रयत्नामुळे पुणे बोर्डाच्या ११ वी परीक्षेत हिंदी व इंग्रजी विषयात ६० टक्के मार्क मिळवून मी पास झाले. नायकवडींना व वडिलांना आनंद झाला. श्रमाचे सार्थक झाले. त्यानंतर कुठल्यातरी सेवाभावी हॉस्पिटलमधे नर्स म्हणून आयुष्य काढणेसाठी नर्सिंग कोर्सला जाण्याचा माझा विचार होता पण तसे घडायचे नव्हते. नायकवडी यांनी त्यांची शिक्षणशास्त्रातली उच्च शिक्षण घेण्याची मनीषा माझ्याकडून पुरी करुन घेतली.

मला महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजमधे नायकवडींनी घातले राहण्याची सोय प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंगमध्ये केली होती. त्या बोर्डिंगमधील मी पहिली रहिवासी विद्यार्थिनी होते. त्यानंतर या बोर्डिंगमध्ये मुलींनाही वेगळा प्रवेश सुरु झाला. माझ्या बी. ए. च्या अभ्यासक्रमाचे विषय नायकवडींनी निवडायचे आणि मी अभ्यास करायचा. अशा रीतीने अभ्यास करुन मी १९६३ साली पुणे विद्यापीठाची पदवीधर हिंदी स्पेशल विषय घेऊन झाले.

त्यानंतर वाळवा येथे जिजामाता कन्याशाळेत शिक्षिका म्हणून १९६३ मध्ये नोकरीस सुरवात केली. त्यांचेकडे पैसा नव्हता, गडी नव्हते, त्यामुळे घरची कामे करुन नोकरी केली. शाळेतील मुलांचे पेपर्स रात्री व पहाटे उठून तपासले. विद्यालयाला शासकीय अनुदान सुरु झाले नसलेमुळे पगार वेळेवर मिळत नव्हता. नायकवडी म्हणायचे, आपलं घर आहे शेत आहे, पोटापुरते धान्य मिळते मग पगार कशाला? चूल बंद नाही ना! अशा प्रकारे दोन्हीकडून थपडा खात नोकरी केली. संस्थेने १९६७ ते ७२ च्या काळातील नोकरीचे रु. २९,२५६/- पगाराचे दिले नाहीत. त्याबद्दल खंत नाही. ज्ञानदान केले त्याचे समाधान आहे. १९७४ पासून बँकेतून

पगार मिळावयास लागला. सुरवातीला द.म.रु. १५६/– पगार म्हणून मिळत होता.

त्यातच शाळेने डेप्युटेशनवर बी. एड. साठी कोल्हापुरला पाठवले. १९६५ साली मी बी. एड. झाले व त्यानंतर मुख्याध्यापिका म्हणून नोकरी करुन शेवटी २६ वर्षे सहा महिने नोकरी करुन १९९१ साली सेवानिवृत्त झाले. त्यावेळी शाळेत ४०० मुली होत्या.''

सौ. कुसुमताई यांना सेवानिवृत्त झालेवर तीन पुरस्कार मिळाले आहेत. (१) कै. द्वारकाबाई हरी पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मा. प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या हस्ते श्री. संभाजी पवार यांचेकडून, सांगली (२) कै. गोदावरी बियाणी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'आदर्श माता' पुरस्कार सौ. प्रमिलाताई मधू दंडवते यांच्या हस्ते, बियाणी बंधू व रोटरी क्लब सांगली यांचेकडून, सांगली (३) कै. बयाबाई श्रीपती कदम यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'आदर्श माता' पुरस्कार कडेगाव येथे मुख्यमंत्री विलासराव देशमुख व सौ. देशमुख यांच्या हस्ते मा. ना. पतंगराव कदम यांचे उपस्थितीत.

त्या म्हणतात, ''नायकवडी यांना गेली ४–६ वर्षे काही मागत नाही व भेटतही नाही. १९९१ साली प्रॉव्हिडंड फंड व निवृत्तीचे वेतन म्हणून मिळालेल्या पैशातून सर्व मुलांना व मुलींना प्रत्येकी ४० हजार रुपये देऊन मुलांच्या कर्तव्यातून मुक्त झाले आहे. राहिलेली रक्कम सेवाभावी संस्थेसाठी खर्च करीत असते. आयुष्यात एकदाच हट्ट केला व तो नायकवडी यांच्याबरोबर रशियाचे दौऱ्यामधे जाण्यासाठी. नायकवडी लोक वर्गणीतून जाणार होते. मी माझे खर्चाने दौऱ्यामध्ये सामील झाले होते. तेथील प्रवासात नायकवडीचे स्विय सहाय्यक म्हणून काम केले. परदेश प्रवासाचा अनुभव मिळाला.

सध्या माझे वय ७४ वर्षाचे आहे. भरपूर वाचनाचे, शिवण कामाचे वेड आहे. नायकवडी आज जनतेचे झाले आहेत. आम्हालाही तसे जनतेचे मानून त्यांनी प्रेम द्यावे अशी अपेक्षा. सासूबाई, दीर शामराव, त्यांच्या पत्नी हौसाबाई यांनी आधार दिला म्हणून तरुन निघाले. मुलगी विशाखाचे डोळे आले असता दुर्लक्ष झाले. उसने १० रु. घेऊन औषध आणले पण तिचा डावा डोळा दुखावला गेला.

१९५७ व १९८५ साली नायकवडी विधानसभेवर निवडून आले. घरातील कामे करुन शाळा सांभाळून त्यांच्या प्रचारसभेत भाग घेतला. परंतु मला आमदार निवास किंवा विधानभवन पहावयास मिळाले नाही. कोणी दाखविले नाही. माझे दीर शामरावांनी नायकवडींच्यापेक्षा मुलांचेवर लक्ष देऊन आधार दिला होता. आता नातवंडांमधे सुनांमध्ये कसा वेळ जातो समजत नाही.

थोरला मुलगा किरण शेती व कुटुंबाची सर्व जबाबदारी संभाळून सामाजिक कार्य करीत आहे. त्याची पत्नी सौ. सुमन त्यास साथ देत आहे. त्यांना चि. गौरव व कुमारी प्रतिमा अशी मुले आहेत. दुसरा मुलगा स्व. अरुण (भैय्या) हा कृषी विज्ञान घेऊन एम.एस.सी. झाला होता. सारमाजिक कार्याची त्याला आवड होती. वाळवा पंचायत समिती सदस्य व हुतात्मा बँकेचा चेअरमन असतानाच काळाने त्याच्यावर झडप घातली. त्याच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरुन निघणार नाही. त्याची पत्नी श्रीमती सुषमा ही एम.एस.सी., एम.फील., पी.एच.डी.



असून प्राध्यापिका म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा येथे नोकरी करते. पतीच्या सामाजिक कार्याचा वसा तिने जपला आहे. सांगली जिल्हा परिषदेची ती सदस्या आहे. त्यांना कुमारी अनुभूती, चि. केदारज्योती व चि. अभिजित अशी मुले आहेत. तिसरा मुलगा वैभव राज्यशास्त्र विषयात एम.ए. झाला आहे. त्याने विद्यार्थी दशेत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन प्राविण्य मिळविले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्टुडंट कौन्सिल चेअरमनपदी त्याची १९८९–९० साली निवड झाली होती, हुतात्मा बँक, हुतात्मा बझार, हुतात्मा दूध संघ याचा तो संस्थापक आहे. अनेक सहकारी पाणी पुरवठा संस्था उभारुन कार्यान्वित करणेस त्याने पुढाकार घेतला आहे. सांगली जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणूनही त्यांने काम केले आहे. कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर त्याची हुतात्मा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी निवड झाली आहे. हुतात्मा शिक्षण व उद्योग समूहाच्या सर्व कामकाजात मार्गदर्शक म्हणून काम करीत असतो, त्याची पत्नी सौ. नंदिनी बी.कॉम असून, त्यांना चि. वीरधवल व कन्या कुमारी मधुरा अशी मुले आहेत.

थोरली कन्या सौ. विशाखा सुरेश कदम ही एम.ए., बी.एड. असून जिजामाता कन्या शाळेत शिक्षिका आहे. जावई डॉ. सुरेश यशवंत कदम एम.बी.बी.एस. असून वाळवा येथे स्वतंत्रपणे व्यवसाय करतात. दुसरी कन्या सौ. प्रगती उमाजी पाटील एम.ए. असून, जावई श्री. उमाजी गोविंद पाटील एम.ई. (मॅकॅनिकल) असून विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखान्याचे चीफ इंजिनियर आहेत.

नायकवडी महाराष्ट्रात व भारतात क्रांतिवीर म्हणून त्यांच्या राष्ट्रसेवेने प्रख्यात झाले आहेत. त्यांची पत्नी म्हणून अनेक पुरस्कार घेताना मलाही मोठेपण आपोआप लाभले आहे. नायकवडींचे बरोबर रशियात परदेश दौरा केला आहे, त्यामुळे मी सर्व दृष्टीने जीवनात संतुष्ट आहे.''

राष्ट्र पुरुषांच्या चरित्राचा अभ्यास करताना अभ्यासकांना जसे म. गांधींच्या कस्तुरबा, म. जोतिराव फुले यांच्या सावित्रिबाई, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या लक्ष्मीबाई, यशवंतराव चव्हाणांच्या वेणूताई यांच्याबरोबर वादळी व्यक्तिमत्त्वाच्या क्रांतिवीर नागनाथ नायकवडींच्या सौ. कुसुमताईंचा उल्लेख करावाच लागेल. इतिहासकारांना त्यांच्या त्यागाची दखल घ्यावीच लागेल.

सौ. कुसुमताई नायकवडी म्हणतात, ''तीनही कर्तबगार मुलांबरोबर दोन्ही जावई कष्टाळू व कर्तबगार आहेत. आता कौटुंबिक परिवार वाढला आहे. पण यामध्ये माझ्या सासू कै. लक्ष्मीबाई (आईसाहेब) व माझे दीर कै. शामराव (आप्पासाहेब) यांची उणीव सतत भासते. मोठ्या मनाची दिलदार स्वभावाची माणसे मुलांच्या व नातवंडांच्या कर्तृत्वाने आनंदित झाली असती. कौतुकाची थाप पाठीवर पडली असती. या दोघांनी घरासाठी खूप त्रास सहन केला, आता सुखाचे दिवस आले. सर्वांचे चांगले झाले घराचे गोकुळ झाले व हे दोघे निघून गेले. त्यामुळे मन खंतावतं, दुःखी होतं.''

* * * *

## १३

# शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांकरिता वाळव्यामध्ये आणणारा भगिरथ

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी आपल्या विद्यार्थी दशेतील शिक्षणाबद्दल ८० व्या वाढदिवसानिमित्त सांगितले की, ''माझी आई म्हणायची शिकलं पाहिजे. तिचे वडील मिलिटरीत होते म्हणून तिला शिक्षणाचं महत्त्व कळत होतं, वडीलांना शिक्षणा पेक्षा मी कुस्तीत नाव मिळवावे असे जास्त वाटे, कुस्ती करायचो. शिक्षणाकडे तसं दुर्लक्षच. पहिली नापास झालो. पण माझा गणित विषय चांगला होता. वर्गात मास्तर नाव काढायचे. फक्त अपूर्णांकाचं गणित तेवढ जमायच नाही. सातवीपर्यंत शाळा वाळव्यात झाली, पुढे सातवीला आष्ट्यात शाळेला गेलो. पहिला जिवलग मित्र बी. एल. गायकवाड वाळव्यात मिळाला होता. १९४२ साली मॅट्रीकचं शिक्षण अर्ध्यावर सोडून भूमिगत चळवळीत दाखल झालो. तोवर अन्यायावर पेटून उठायची जाणीव पक्की होत होती. विद्यार्थी दशेतच कॉंग्रेसचा झेंडा खांद्यावर घेतला होता. सखाराम मकदम, गणपती बाबर हे सहकारी मिळाले. रयत शिक्षण संस्थेतील ए. डी. आतार, रा. सु. पाटील, बॅ. पी. जी. पाटील यांची भेट झाली. पुढे जवळीक निर्माण झाली. मे १९३९ च्या सुमारास कर्मवीर अण्णांची भेट झाली. त्यांच्या विचारांचा प्रभाव पडला. सहकाऱ्यांना (वाय. सी. पाटील, सखाराम म. कदम, बापूजी साळुंखे, बी. एल. गायकवाड) घेऊन शिराळ्याच्या दुर्गम भागात २४ गावामध्ये व्हॉलंटरी शाळांची सुरवात केली. सातवीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर बी.ए.बी.टी. व्हायचं आणि गावांत जाऊन शाळा सुरु करायची, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संस्काराचं शिक्षण द्यायचं अस ठरवलं होतं. पुढं काय करणार असं शिक्षक विचारायचे, तेंव्हा मी त्यांना हे उत्तर द्यायचो. पण तिथचं शिक्षण बाजूला पडले आणि हे स्वातंत्र्य लढ्याचं शिक्षण सुरु झालं. आपली दिशा चुकली, मार्ग चुकला असं कधी वाटलं नाही. जे जे ठरवलं ते ते करुन दाखविलं. अगदी या क्षणापर्यंत तरी कशातच अपयश आलं नाही.''



क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या तरुणपणातील आपल्या भविष्यातील ध्येयाची ओळख वरील उद्गारा मध्ये होते. पुढे भूमिगत असताना २९ जुलै १९४४ रोजी अटक झाली. त्यांना सातारा जेलमधे ठेवले होते. त्या अभेद्य जेलच्या भिंतीवरुन उडी मारुन त्यांनी ब्रिटीश सरकारचा पराभव केला. त्या प्रसंगी सातारा येथे प्रथम आश्रय कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याच घरात घेतला होता. ए. डी. आतार यांनी संरक्षण देऊन त्यांना सुखरुपपणे साताऱ्याबाहेर जाण्यास मदत केली होती. त्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या अडचणीच्या वेळी २७ नोव्हेंबर १९४८ रोजी संत गाडगे महाराज यांचे हस्ते सर्वसामान्य जनतेने दिलेला १ लाख रुपयांचा निधी कर्मवीर भाऊराव पाटील यांना देण्यात नागनाथ अण्णांनी पुढाकार घेतला होता. विद्यार्थी दशेत असल्यापासून, प्रतिसरकारचे सेनानी म्हणून काम करीत असताना कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेच्या गरीब मुलांना ग्रामीण भागात मोफत शिक्षण देण्याच्या उपक्रमाचा नागनाथ अण्णांवर प्रभाव पडला होता व त्यांची महत्त्वाकांक्षा पुरी करण्याचा मार्गही त्यांच्या दृष्टिक्षेपात आला होता.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आदर्श शिक्षण कार्याचे वर्णन करताना नांदेडचे प्रा. नरहर कुरुंदकर म्हणाले होते की,''समाज शिकवणे, जागा करणे, हलवणे, त्यांच्यात सामाजिक, राजकीय नेतृत्व निर्माण करणे असे समाज परिवर्तनाचे काम त्यांनी केले. त्यांच्या संस्थेत सगळ्या जातीधर्माची मुले अतिशय काटकसरीने जीवन जगत होती. शारीरिक श्रम करीत होती. उपासमार, अडचणी व दुःख वाटून घेत होती. हरिजन मुलांना पोटाशी धरुन त्यांना शिक्षण दिले, जागृत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कार्यकर्ते पुरवले.भाऊरावांचे हे कार्य नसते तर महाराष्ट्रातील राजकीय सूत्रे संस्थानिक, जमीनदार, वतनदार व ब्राह्मण यांच्याच हातात राहिली असते. हे चित्र भाऊरावांनी आपल्या कार्याने बदलून टाकले आणि ग्रामीण भागातून नवे नेतृत्व निर्माण केले''

या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या महान कार्याची प्रेरणा घेऊनच क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी वाळवा येथे किसान शिक्षण संस्था अनेक अडचणींना तोंड देत सुरु केली होती. वाळवा येथे प्राथमिक शिक्षणाची सोय होती पण माध्यमिक शिक्षणासाठी सांगली, सातारा, कोल्हापूर येथे मुलांना जावे लागत होते. सातवी पास झालेवर माध्यमिक शिक्षणास कोल्हापूर येथील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमधे राहून राजाराम हायस्कूल मधे शिक्षण घेताना नागनाथ अण्णांना खूप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. तसे कष्ट आपल्या गावच्या व परिसरातल्या मुलां मुलींच्या वाट्याला येऊ नये या करता मुलां-मुलींच्या मोफत शिक्षणाची सोय करण्याचे त्यांनी योजिले. त्यासाठी समविचारांच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने वाळवा येथे वाळव्याचे सुपुत्र हुतात्मा किसन अहिर यांचे जिवंत स्मारक म्हणून हुतात्मा किसन अहिर विद्यालय १९४९ मधे सुरु केले. सुरवातीला कोटभागातील अंबादास ग्रामोपाध्ये यांचे माडीवर विद्यालय भरत होते. आणि श्री. भिमराव भिलवडे मुख्याध्यापक व श्री. वसंतराव रामचंद्र हर्डीकर हे शिक्षक होते. ८ वी ९ वीच्या वर्गात २८ विद्यार्थी होते.

विद्यालयाच्या इमारतीसाठी जागेची जरुरी होती. नागनाथ अण्णांनी शासनाकडून गावातील मोकळी जमीन ९९ वर्षे कराराने नाममात्र १ रुपया भाड्याने मिळविली. त्यावर चार

खोल्या बांधण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांकडून एकरी दोन रुपयेप्रमाणे निधी जमविला, चुनखडी जमविली, वाळू आणली, चुन्याची घाणी सुरु केली, दगड, विटा, आणल्या. सावंतवाडीहून सागवान लाकूड आणले. शिवाजीराव नारायण थोरात (सरकार) यांनी खोल्यांवर घालण्यास बंगलोरी कौले दिली. ग्रामस्थांच्या श्रमदानातून विद्यालयाची चार खोल्यांची इमारत तयार झाली. त्यासाठी खंडू सखाराम शेळके, गोविंद विठू सवाशे, नारायण आबा कदम, रामचंद्र संतू अहिर, किसन गोविंद जाधव, सखाराम तुकाराम घोरपडे, कुबेर बाबू नवले, शंकर हरी परुळेकर, बळवंत आप्पा भिलवडे यांनी विशेष सहकार्य केले. रयत शिक्षण संस्थेतील शिक्षक श्री. डी. आर. माने व त्यांचे स्नेही श्री. रामभाऊ वसगडेकर मिस्त्री यांनी बांधकामास मार्गदर्शन केले. नागनाथ अण्णांच्या मातोश्री सौ. लक्ष्मीबाई नायकवडी या तर नेहमी देखरेख करण्यात पुढाकाराने असावयाच्या. नागनाथ अण्णांनी सर्वांच्या बरोबर बांधकामासाठी श्रमदानही केले होते.

गावातील शेतकऱ्यांच्या, मागासवर्गीयांच्या, अल्पसंख्याकांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय गावातच होणार म्हणून सर्व गावकऱ्यांनी श्रम, पैसा व कौशल्य वापरुन या कार्यात मदत केली होती. त्यामुळे चार खोल्यांची इमारत पुरी झाल्यानंतर विद्यालयाचे वर्ग नवीन इमारतीमधे सुरु झाले. त्याचे उद्घाटन अण्णांचे क्रांतीयुध्दातील दैवत क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हस्ते १९४९ साली झाले. विद्यालय स्वत:च्या इमारतीत सुरु झाल्यामुळे शिक्षक उत्साहाने विद्यादान करु लागले.

हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पहिल्या कार्यकारी मंडळामधे भाऊ गणू कदम-अध्यक्ष, भरमू बाबाजी मगदूम-उपाध्यक्ष, रामचंद्र हरी हर्डीकर-सेक्रेटरी, भरमा दादा मगदूम, जिनगौडा पाटील, हरी रामू पाटील, संतराम विठू भोई, नबी उस्मान मेवेकरी, आकाराम भाऊ नायकवडी हे सदस्य होते. नागनाथ अण्णा मात्र कोणतेही पदाधिकारी झाले नाहीत, पण विद्यालयाच्या प्रत्येक कामकाजात पुढाकार त्यांनी घेतला होता.

विद्यालयास शासनाचे अनुदान मिळणेसाठी किसान शिक्षण संस्था रजिस्टर करणे गरजेचे होते. नागनाथ अण्णांचे प्रा. ए. ए. पाटील म्हणून राष्ट्रीय विचाराचे प्राध्यापक मित्र होते. त्यांना अण्णांनी रशियाची घटना अभ्यासून किसान शिक्षण संस्थेची घटना तयार करणेस सांगितले. प्रा. ए. ए. पाटील यांनी खूप परिश्रम घेऊन संस्थेची घटना तयार करुन दिली. त्यानुसार किसान शिक्षण संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अन्वये नं. एस/२९२७ दि. ३१ ऑगस्ट १९५३ रोजी रजिस्टर झाली. तसेच पब्लिक ट्रस्ट ऑक्टोबर १९५० अन्वये नं. एस. एस. ई ३० दिनांक १२ ऑक्टोबर १९५३ रोजी रजिस्टर झाली. किसान शिक्षण संस्थेचे ध्येय उद्देश खालीलप्रमाणे नमूद केले होते.

१) खेडेगाव अगर शहर, तालुका अगर जिल्हा येथील जशी परिस्थिती असेल त्याप्रमाणे लोकांच्या शैक्षणिक गरजा काय आहेत याचा संस्था विचार करील आणि योग्य ते शिक्षण देण्याची व्यवस्था करील.

२) ही संस्था जनतेमधे प्रचार करुन सभा भरवून, चर्चा करुन व लोकांना पटवून देऊन शिक्षणाचा प्रसार करील.



३) ही संस्था निरनिराळ्या क्षेत्रातील शाळा उघडील व त्या चालवील, तसेच शिक्षण क्षेत्रातील निरनिराळे कोर्सेस सुरु करील, साक्षरता प्रसाराची मोहीम सुरु करुन सामाजिक शिक्षणाचा फैलावही ही संस्था करील. उच्च शिक्षण घेण्यासाठी गरीब, लायक व होतकरु विद्यार्थ्यांना ही संस्था शिष्यवृत्त्या देईल.

४) सर्व लोकांना आपल्या पायावर उभे राहून शिक्षण घेणेसाठी, शिक्षणाच्या साहाय्याने मागासलेपणा व अज्ञान घालविणेस किंवा आपला शैक्षणिक दर्जा वाढविणेस ही संस्था अविश्रांतपणे झटत राहील.

वरील ध्येय धोरणे राबविण्यासाठी किसान शिक्षण संस्थेचे पहिल्या कार्यकारी मंडळामधे सर्वश्री शंकर हरी परुळेकर-अध्यक्ष, अजिज रहिमान चाऊस-सेक्रेटरी, भरमा बाबाजी मगदूम, रामचंद्र हरी हर्डीकर, आर. आर. विचारे, आकाराम दादा मोटे, ज्ञानदेव बाळू शिंदे, बाळकू नाना पाटील हे सदस्य होते. हे कार्यकारी मंडळ १९५३ ते १९६३ पर्यंत कार्यरत होते.

संस्थेची नोंदणी झाल्यामुळे प्रतिष्ठा मिळाली. १९४९ ते १९५३ पर्यंत सर्वश्री बी. ए. भिलवडे, एम. जी. कुलकर्णी, सौ. एस. बी. पाटील मुख्याध्यापक होते. १९५३ साली श्री. एम. बी. ऐतवडेकर एम.ए., एम.एड., डी.एड. हे मुख्याध्यापक झाल्यावर विद्यालयाची प्रगती सुरु झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली. व्याप वाढला व पुढील पाच वर्षात विद्यालयाची पहिली बॅच एस.एस.सी. परीक्षेस बसली.

१९५३ ते १९६३ पर्यंत सर्वश्री ऐतवडेकर नंतर, श्री. ए. डी. मोटे, सौ. एस. एस. पाटील, श्री. एल. एच. भाकरे, श्री. ए. डी. मोटे, श्री. आर. आर. विचारे, श्री. ए. बी. पाटील या मुख्याध्यापकांनी खूप कष्ट घेऊन विद्यालय प्रगतिपथावर नेले.

१९६२ साली मुदलियार कमिशनच्या शिफारशिप्रमाणे विद्यालयात तांत्रिक शिक्षणाची सोय सुरु केली. कृषि व तांत्रिक शिक्षणाचे कोर्सेस सुरु झाले. त्यासाठी शासनाची मंजुरी मिळविणेस, केंद्र शासनाचे अनुदान मिळविणेस नागनाथ अण्णांनी मुंबई, दिल्ली येथे प्रयत्न केले होते. तांत्रिक शिक्षणासाठी वेगळी इमारत बांधावी लागली. नवी यंत्रसामग्री, साहित्य घ्यावे लागले. शासनाचे अनुदान मिळविणेसाठी संस्थेला स्वत:ची रक्कम उभा करणे करीता श्री. शामराव रामचंद्र नायकवडी (आप्पा) व श्री. वसंतराव पवार हे तांत्रिक विभागाचे प्रमुख म्हणून काम पहात होते.

हुतात्मा किसन अहिर विद्यालयामध्ये तांत्रिक विभाग सुरु करण्यापाठीमागे नागनाथ अण्णांची अशी भूमिका होती की, जी मशिनरी घ्यावयाची ती उत्तम दर्जाची आणि औद्योगिक उत्पादनास योग्य अशीच घ्यावयाची. त्या मशिनरीवर एक पाळी विद्यार्थ्यांना शिकण्याकरिता वापरायची व दुसरी पाळी कुशल कामगार नेमून वर्कशॉपसारखे वापरुन किर्लोस्कर कंपनीसारख्या कारखान्याचे जॉब वर्क करणेस वापरायची. त्यामधून १०-१२ हजारांचे उत्पन्न शाळेच्या इतर खर्चासाठी उपयोगी पडणार होते. किर्लोस्कर ब्रदर्सचे मॅनेजर पी. डी. गुणे यांनी या योजनेस पाठिंबा दिला, म्हैसूरहून किर्लोस्करची मशिनरी मिळवून दिली व जॉबवर्कही दिले. नागनाथ अण्णांनी ही योजना राबवण्यात यश मिळविले.

१९६३ नंतर विद्यालयाचे श्री. ए. आर. चाऊस, श्री. एस. पी. हावलदार, श्री. डी. डी. पाटील व श्री. के. एस. काळे मुख्याध्यापक आहेत. आज हुतात्मा किसन अहिर विद्यालयामध्ये १०१० मुले मुली शिक्षण घेत आहेत आणि ८८ शिक्षक विद्यादान करीत आहेत.

मुलींची संख्या वाढल्यामुळे १९६३ साली मुलींसाठी वेगळे 'जिजामाता विद्यालय' किसान शिक्षण संस्थेने सुरु केले. नागनाथ अण्णांच्या सुविद्य पत्नी सौ. कुसुमताई नायकवडी या विद्यालयाच्या पहिल्या मुख्याध्यापिका झाल्या. त्यानंतर अनुक्रमे श्री. एस. पी. हवलदार, सौ. कुसुमताई नायकवडी, सौ. पी. एस. हवालदार यांनी मुख्याध्यापकपदाची जबाबदारी पार पाडली. आज या मुलींच्या विद्यालयामधे ७०४ मुली शिक्षण घेत आहेत व २६ शिक्षक विद्यादान करीत आहेत.

नागनाथ अण्णा फक्त मुला मुलींच्यासाठी विद्यालये सुरु करुन थांबले नाहीत. वाळवा येथे मुलांचेसाठी हुतात्मा नानकसिंह वसतिगृह १९४९ मधे सुरु केले. तेथे आज १६७ मुलांना मोफत राहणे व जेवण दिले जाते. मुलींच्यासाठी सावित्रीबाई फुले वसतिगृह १९६५ साली सुरु केले. तेथेही सुसज्ज इमारतीमधे २०० मुलींना मोफत सोयी दिल्या जातात.

हुतात्मा किसन अहिर विद्यालयामधेच उच्च माध्य. विद्यालयाची स्थापना १९७५ मधे झाली. ११ वी व १२ वी च्या वर्गामधे आज ७४९ विद्यार्थी असून २२ शिक्षक आहेत.

स्वातंत्र्य संग्रामामधे नागनाथ अण्णांचे दोन सहकारी किसन अहिर व नानकसिंग पोलिस गोळीबारात २५ फेब्रुवारी १९४६ रोजी शहीद झाले होते. त्याचे जिवंत स्मारक म्हणून वाळवा येथे त्यांचे नावे विद्यालय व वसतिगृह सुरु केले आहे. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी वरील दोघे हुतात्मा झाले त्या सोनवडे गावाच्या परिसरामधे हुतात्मा नानकसिंग विद्यालय व उच्च माध्य. विद्यालयाची स्थापना करण्याचे व हुतात्मा किसन अहिर वसतिगृह सुरु करण्याचे नागनाथ अण्णांनी अनेक वर्षे योजिले होते. त्यासाठी १९८५ साली सोनवडे गावाची ४८ एकर पडीक जमीन नागनाथ अण्णांनी शेतकऱ्यांकडून अल्प दराने खरेदी केली. त्या जागेचे सपाटीकरण करणे, हायस्कूलची इमारत बांधणे यास बराच काळ जाणार होता, म्हणून भाड्याचे जागेत हायस्कूल व वसतिगृह सुरु केले. श्री. बुधा शेठ यांनी दोन खोल्या हायस्कूलसाठी दिल्या व वसतिगृहासाठी श्री. मारुती हरी नाईक यांनी घर भाड्याने दिले होते. मुले व शिक्षक एकत्र राहात. सुरवातीला विद्यार्थी मिळविणेसाठी खूप प्रयत्न करावे लागले, पण शिक्षकांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळे व नागनाथ अण्णांच्या समाजातील प्रतिष्ठेमुळे पहिल्या वर्षी तीन शिक्षक व ८६ विद्यार्थ्यांनी सुरु झालेल्या नानकसिंग माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात ९७९ विद्यार्थी शिक्षण घेत असून ३० शिक्षक ११ इतर कर्मचारी या शैक्षणिक कार्यात सहभागी आहेत.

सोनवड्याचे पश्चिमेस एक टेकडी आहे त्या ठिकाणी पूर्वीपासून जंगल होते. त्या टेकडीच्या पश्चिमेकडील उतारावर किसन अहिर व नानकसिंग पोलिसगोळीबारात धारातीर्थी पडले. ती टेकडी सोनवडे गावातील १७ जणांच्या नावावर होती. ती ३४ एकर आणि काळोखे वाडीच्या लोकांचे १४ एकराचे माळरान असे मिळून ४८ एकर जमीन किसान शिक्षण संस्थेने खरेदी केली. त्यावर इमारतीचे बांधकाम कोल्हापुरच्या प्रतिभा कन्स्ट्रक्शन कंपनीचे श्री. राम जाधव यांनी ना नफा ना तोटा या तत्त्वावर १८ खोल्यांची हायस्कूलची इमारत बांधून थोड्या



मुदतीत दिली. नवीन इमारतीत आता वर्ग सुरु आहेत. तसेच थोड्या अंतरावर वारणा नदी वाहते. तिच्यावर २० अश्वशक्तीची मोटार बसवून हायस्कूलपर्यंत पाण्याची सोय केली आहे. इमारतीचे बांधकाम चालू असताना नागनाथ अण्णा, संस्थेचे अध्यक्ष तुकाराम नाना खोत, अण्णांचे सहकारी श्री. शामराव पाटील (आप्पा), श्री. दत्ता शेळके (दादा), श्री. जयवंत अहिर (मामा), श्री. वसंतराव पवार (सर) यांनी जमिनी खरेदी करार, नदीवरुन पाणी उपसा परवाना मिळवणे, विद्युत तारांचा मार्ग बदलणे, जमिन सपाटीकरण, रस्ते बांधणे, मोटर कनेक्शन, पाईपलाईन, बांधकामाची देखरेख इ. कामासाठी त्या उजाड माळावर ताडपत्रीच्या राहुटीत राहात होते. इमारतीचे बांधकाम करणाऱ्या सर्व कामगारांना संस्थेमार्फत मोफत जेवण दिलेमुळे बांधकाम लवकर झाले होते.

पाण्याची सोय झाल्यामुळे आजूबाजूच्या परिसरामधे अण्णांनी खड्डे खणून घेतले व त्यामधे ५ हजार आंब्याची, ५ हजार नारळाची, सुपारीची, झाडे लावली ही रोपे दापोली कृषी विद्यापिठातून आणण्याचे काम श्री. शामराव सव्वाशे यांनी केले. त्या झाडांना फळे येण्यास सुरवात झाल्यावर ते आंबे व नारळ विकले जात नाहीत शाळेतील मुलांना, मुलींना, शिक्षकांना, परिसरातील शेतकऱ्यांना प्रत्येक घरटी आंबे पोहोच केले जातात, तसेच नागनाथ अण्णांच्या परिचयाचे, महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यां पर्यंत पोहोच केले जातात. असे दृश्य कोठेही पहावयास मिळणार नाही. शाळेच्या उत्तर व दक्षिण बाजूस दोन प्रशस्त क्रीडांगणे तयार केली आहेत. आज चांदोली धरणाचे पूर्वेस हुतात्मा नानकसिंग विद्यालय व त्याचा परिसर एक निसर्गरम्य शुध्द हवेचे ठिकाण झाले आहे. अण्णा आपल्या असंख्य स्नेहींना सोनवड्याचा परिसर पाहण्याचा अग्रह करतात. स्वत: अण्णाही वरचेवर मुक्कामास तेथे जात असतात.

नोव्हेंबर १९९७ साली सोनवडे हायस्कूल पटांगणावर एन. सी. सी. चा कँप आयोजित केला होता. त्यामधे १० महाविद्यालये व २० हायस्कूलच्या ८२९ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. सिनियर डिव्हीजनचा कँप ७.११.९७ ते १८.११.९७ पर्यंत व ज्युनियर डिव्हीजनचा कँप ९.११.९७ ते १८.११.९७ पर्यंत भरला होता. या कँपचे कमांडर लेफ. कर्नल एम. पी. पाटील होते. ऐतिहासिक योगायोगाची घटना अशी की दिनांक २५ फेब्रुवारी १९४६ रोजी भूमिगत स्वातंत्र्य सैनिक व पोलिसांच्या गोळीबाराने सोनवड्याचा परिसर दुमदुमला होता. त्याच परिसरात १९९७ साली स्वतंत्र भारताचे भावी नागरिक एन. सी. सी. च्या तरुण विद्यार्थ्यांनी फायरिंग प्रॅक्टीस करताना तो परिसर दणाणून टाकला होता. हुतात्म्यांना दिलेली ती सलामीच होती. नागनाथ अण्णांनी स्वातंत्र्यपूर्व काळात ढगेवाडी व थावडे येथे भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना लष्करी ट्रेनिंग देण्याचा कँप सुरु केला होता. त्याच अण्णांच्या शिक्षण संस्थेच्या हायस्कूलच्या मैदानावर एन. सी. सी. च्या कॅडेटनी गोळीबाराचे ट्रेनिंग घेतले. ही घटना क्रांतिवीर नागनाथ अण्णांना खूप मानसिक समाधान देऊन गेली असणार हे निश्चित. दुसरी योगायोगाची गोष्ट म्हणजे नागनाथ अण्णांचे नातू गौरव किरण नायकवडी व दिग्विजय सुरेश कदम हे या कँपमधे सहभागी झाले होते आणि मनोज पोपट धनवडे याचा फायरिंग स्पर्धेमधे प्रथम आल्याबद्दल सत्कार केला होता.

सोनवडे येथील विद्यालयाचे १९८५ पासून सर्वश्री शिवाजीराव गणपती शेळके, दत्तात्रय दादू पाटील, श्रीपती गणपती पाटील, काशिनाथ संतराम काळे हे मुख्याध्यापक होते.१९९० साली तांत्रिक शिक्षणाचीही सोय तेथे करणेत आली आहे. तसेच १९९३ पासून हॉर्टी कल्चर विभागाचे शिक्षणही सुरु केले आहे.

किसान शिक्षण संस्थेचे खालील कार्यकारी मंडळ १९६३ सालापासून आजपर्यंत कार्यरत आहे. सर्वश्री तुकाराम नाना खोत–अध्यक्ष, जनार्दन बळवंत शिंदे–सेक्रेटरी, सखाराम तुकाराम घोरपडे, दत्तू ज्ञानू सापकर, किसन धोंडी अहिर, पांडुरंग ज्ञानू गावडे, श्रीमती हिराबाई साधू हिरवे, सौ. हुसेनबी नबीसाहेब मेवेकरी, सौ. नवसाबाई पंढरीनाथ खोत असे सदस्य आहेत. अण्णा मात्र याही कार्यकारी मंडळाचे सदस्य किंवा पदाधिकारी झाले नाहीत. परंतु त्यांनी किसान शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर तीन महिलांना संधी देऊन एक अनुकरणीय आदर्श निर्माण केला आहे. किसान शिक्षण संस्थेला आर्थिक अडचणी खूपच होत्या. सर्व राजकीय व आर्थिक अडथळ्यांवर मात करुन हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील शिक्षक कार्यक्षेत्रातील १५ गावातील शेतकरी व कार्यकर्ते यांनी नागनाथ अण्णांच्या पुढाकाराने हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना हा सहकार क्षेत्रातील एक आदर्श कारखाना उभा केला. शेतकऱ्यांच्या ऊसाला उच्चांकी दर देण्याबरोबर किसान शिक्षण संस्थेला बहुमोल अशी आर्थिक मदत होत आहे.

नागनाथ अण्णा ज्यांना आपले पूज्य दैवत मानत होते ते क्रांतिसिंह नाना पाटील आयुष्याच्या शेवटच्या काळात वाळवा येथील हुतात्मा किसन अहिर विद्यालयात राहिले होते. मिरज मिशन हॉस्पिटलमधे १९७६ मधे त्यांचे निधन झालेवर वाळवा येथेच क्रांतिसिंहांचा अंत्यविधी पार पडला होता. त्यांच्या पवित्र स्मृतीचे जिवंत स्मारक उभारण्याचे नागनाथ अण्णांचे मनात बरेच दिवस होते. तो योग १९९२ साली आला. किसान शिक्षण संस्थेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाची स्थापना हा होय.

१९९२ मध्ये किसान शिक्षण संस्थेने महाविद्यालयाच्या मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला. परंतु त्यावेळी शासनाने असे ठरविले होते की, नवीन महाविद्यालयाला परवानगी देऊ नये. नागनाथ अण्णा तसे जिद्दीचे, प्रयत्नवादी क्रांतीवीर. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या ४० सदस्यांची महाविद्यालयाची शिफारस मुख्यमंत्र्यांकडे केली. ना. सुधाकर नाईक मुख्यमंत्री होते. ४० आमदारांनी मुख्यमंत्र्यांना पटवून सांगितले की या संस्थेचे संस्थापक, आदरणीय क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आहेत. कुठलीही संस्था ही केवळ संस्था म्हणून न चालवता ती संस्था आदर्श म्हणून चालवतात, म्हणून एक खास बाब म्हणून त्यांना परवानगी द्यावी. शेवटी महाराष्ट्र शासनाने पत्र नं. एन जी सी ३५९२/१२०७/वि शी–२ दिनांक २१ ऑगस्ट १९९२ अन्वये महाविद्यालयास मंजुरी दिली. त्यानंतर कॉलेज/८१८२ दिनांक १६.१०.१९९२ अन्वये मान्यता दिली. त्यावेळी किसान शिक्षण संस्थेस महाराष्ट्र शासनाने विशेष बाब म्हणून मंजुरी दिली.

१९९२ पासून शासनाच्या मान्यतेने क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयामधे बी.ए.–१ व बी.एस.सी–१ हे वर्ग हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या तांत्रिक विभागाच्या



इमारतीमध्ये सुरु झाले. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु आदरणीय रा. कृ. कणबरकर हे या महाविद्यालयाचे फक्त मार्गदर्शकच नव्हे तर हितचिंतकही होते. हे महाविद्यालय सुरु करण्यास प्रथमपासून मा. वैभव नायकवडी यांनी पुढाकार घेतला होता. हे महाविद्यालय उभारण्यास श्री. वसंतराव पवार, श्री. जयवंत अहिर यांनी परिश्रम घेतले. त्याचबरोर हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचेही महत्त्वाचे योगदान आहे.

हुतात्मा नानकसिंग वसतिगृहामध्ये महाविद्यालयातील सांगली, सातारा, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांची सोय झाल्यामुळे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली. सर्वांना, शोषितांना, तळागाळातील पददलितांना, मागासलेल्यांना उच्च शिक्षण मिळावे हा संस्थेचा हेतू साध्य झाला आहे. हे महाविद्यालयीन शिक्षण मुला–मुलींना वसतिगृहात, मोफत निवासाची व भोजनाची सोय झाल्यामुळे शक्य झाले होते. त्यामुळेच शेतकरी कुटुंबातील राजाराम पाटील या विद्यार्थ्याने कोल्हापूर विद्यापीठात ५ वा येण्याचा मान पटकावला.

विद्यार्थ्यांचे कष्ट, कुशल प्रशासन, मूल्यमापनाची परिमाणात्मक पध्दत, व्यक्तिमत्त्व विकास, शिस्तबध्द, तज्ज्ञ, कुशल प्राध्यापक या सर्वांमुळे या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रगती अहवाल चढत्या श्रेणीमधे आहे. नागनाथ अण्णांची प्रेरणा, किसान शिक्षण संस्थेचे, हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचे सहकार्य लाभल्यामुळेच वाळव्यासारख्या ग्रामीण भागात एक आदर्श महाविद्यालय ज्ञानदानाचे कार्य करीत आहे.

नागनाथ अण्णांनी काळाची गरज ओळखून किसान शिक्षण संस्थेची हुतात्मा इन्स्टिट्यूट ऑफ इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी ही शाखा १९९९ मधे सुरु करुन वाळवा येथे संगणक शिक्षणाची सोय करुन दिली आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुला मुलींना संगणक शास्त्राचे शिक्षण प्रथमच उपलब्ध झाले आहेत. शेतकरी पालक नागनाथ अण्णा यांच्या दूरदृष्टीचे कौतुक करीत आहेत.

किसान शिक्षण संस्थेने आपले कार्यक्षेत्र वाळवा येथे मर्यादित न ठेवता आसपासच्या खेड्यांपर्यंत जाऊन पोहोचविले आहे. शिरगाव येथे क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी विद्यालय आणि पडवळवाडी येथे हुतात्मा बाबूराव कोकाटे विद्यालय इ.स.२००० या वर्षात सुरु केली आहेत.

इ.स.२००० साली वाळवा येथे किसान शिक्षण संस्थेची हुतात्मा किसन अहिर पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा सुरु केली आहे, यामुळे पूर्व प्राथमिक शिक्षणापासून पदवी पर्यंत शिक्षणाची सोय किसान शिक्षण संस्थेने व पर्यायाने नागनाथ अण्णांनी करुन ग्रामीण भागात अनुकरणीय आदर्श निर्माण केला आहे.

नागनाथ अण्णांच्या प्रेरणेने सर्व विद्यालय व महाविद्यालयातील होतकरु खेळाडूंना प्रोत्साहन दिले जाते. खेळाडूंना मोफत गणवेषही दिला जातो. उत्तम तऱ्हेचे मार्गदर्शन मिळालेमुळे हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील मुला मुलींनी खो–खो, कबड्डी खेळामधे तालुका, जिल्हा व राज्य स्तरीय स्पर्धांमधे प्राविण्य मिळविले आहे. देश पातळीवर प्रथम क्रमांक मिळविले आहेत. वाळवा खो–खो टीमचा दबदबा व आदर्श निर्माण केला आहे. शिमोगा (कर्नाटक) सेलम (तामिळनाडू) मेरठ (उत्तर प्रदेश) येथेही वाळव्याचे खो–खो टीमने मैदान गाजविलेले आहे. अनेकवेळा क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी टीमच्या व्यवस्थापिका म्हणून जात असत.

मा. अण्णा आपल्या श्री. वसंत पवार, श्री. जयवंत अहिर, श्री. चंदर लोहार, श्री. दत्ता शेळके व शेतकरी कार्यकर्त्यांसह प्रत्यक्ष मैदानावर हजर असत.

किसान शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यालयाबरोबरच वसतिगृहाची सोय नागनाथ अण्णांनी केली होती. १९६३ साली सुरुवात झालेल्या वसतिगृहामधे ३५ विद्यार्थी ठेवण्यास मान्यता होती जागेअभावी सुरुवातीला मुलांचे वसतिगृह वाळवा येथील माळभागातील शामराव ज्ञानू सव्वाशे यांच्या घरात चालू होते. त्यांनी वसतिगृहासाठी इमारत मोफत वापरण्यास दिली होती. सुरुवातीच्या काळात विद्यालयाचे शिक्षक गावात फिरुन, दानशूर शेतकऱ्यांच्याकडून धान्य गोळा करीत होते. नागनाथ अण्णांची अशी इच्छा होती की, गरीब परिस्थितीमुळे जे विद्यार्थी शाळेला जाऊ शकत नव्हते अशा मुलांची सोय करण्याच्या दृष्टीने हे वसतिगृह सुरु केले होते. नागनाथ अण्णा स्वत: वसतिगृहातील मुलांच्या संगोपनाची, जेवणखाण्याची, आजारी पडलेल्यांच्या औषध पाण्याची चौकशी करत. त्याच बरोबर नागनाथ अण्णांच्या आईसाहेब क्रांतिमाता लक्ष्मीबाई या स्वत:च्या मुला नातवंडांसारखी वसतिगृहातील मुलांना आपल्या स्वत:च्या घरच्यासारखी मायेची ऊब देत असत.

शिक्षक व कार्यकर्ते धान्य व गरजेच्या वस्तू जमा करीत. त्यांच्याबरोबर आईसाहेब धान्य गोळा करण्यास जात असत. एवढे करुनही ज्या-ज्या वेळी अडचण येई, त्यावेळी घरातील धान्याचा उपयोग करीत असत, त्याला नागनाथ अण्णांचे वडील रामचंद्र नायकवडी व बंधू शामराव नायकवडी मदत करीत असत. वाळव्यातील कार्यकर्त्यांमधे धान्य व साहित्य गोळा करण्यास शंकरराव परुळेकर, सखाराम घोरपडे (काका), थोरले भरमाप्पा, अण्णा मगदूम, (चेअरमन), धाकटे भरमाप्पा मगदूम, बाबूराव मगदूम, जिनपाल पेशवे, बाळू नाना मगदूम, चंपाताई होरे, दत्तूपंत (काका) कुलकर्णी, महादेव जाधव, महंमद चाऊस, कुबेर नवले, पांडुरंग गावडे, संतराम शेडजी, भाऊ कदम, बाबू लाडखान, नबी उसमान मेवेकरी, अल्लाबक्ष मेवेकरी, दत्तोबा तांदळे, धोंडी बाबाजी अहिर, बाळकृष्ण भंडारे, खंडू सखाराम शेळके (दाजी), नारायण कदम, ज्ञानदेव शेळके, दादू जाधव,पांडूरंग मुळीक इ. अनेक कार्यकर्त्यांनी धान्य व पैशाच्या रुपाने मदत केली होती.

तसेच अहिरवाडीचे राऊ नाना यादव, पडवळवाडीचे तुकाराम नाना खोत, लालू नाना कोकाटे, देवास, कवी अण्णा, रघुनाथ खोत, करमाळकर तात्या, मारुती बाढ, भाऊ कदम, मिरजवाडीचे जगन्नाथ खोत, बाबासाहेब साळुंखे, देवाप्पा खोत, आष्ट्याचे बच्चू पोरवाल, संदे सर, मारुती गायकवाड शिरगांवचे शंकरराव जाधव, पंढरीनाथ माने, किसन हवलदार, सांगलीचे नामदेव कराडकर, कोल्हापुरचे धोंडीराम दिंडे, शंकरराव नलवडे, दादासाहेब पाटील, जुनेखेडचे शामराव आप्पा पाटील, जखराईवाडीचे नामदेव गायकवाड, गंगाराम गायकवाड, यांनी वसतिगृहास धान्य व वस्तू देऊन मदत केली होती. ढगेवाडीचे आनंदा ज्ञानू ढगे यांनी तर काही कमी पडू दिले नाही. एकदा तर वसतिगृहाच्या मुलांना धान्य आणण्यास पैशाची व्यवस्था करण्याकरिता मिरजेचे सुप्रसिध्द सर्जन डॉ. आनंद गायकवाड यांचेकडे गेले होते, पण त्यावेळी डॉ. गायकवाड घरी नव्हते. प्रसंगाचे महत्त्व जाणून डॉक्टरांच्या पत्नी सौ. माणिकताई गायकवाड यांनी नागनाथ अण्णांना जरुर त्या पैशाची अडचणीच्या वेळी मदत केली होती.



वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विशेष लक्ष दिले जात होते. अचानकपणे कोण आजारी पडल्यास त्यांना प्रथम दवाखान्यात नेऊन औषधोपचार करुन नंतर तो मुलगा बरा झाल्यानंतर त्यांच्या घरी कळविले जात असे.

१९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला त्यावेळी माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या सूचनेवरुन गुजरातमध्ये गेलेल्या डांग जिल्ह्यातील २७ विद्यार्थांना वाळवा येथील वसतिगृहामधे नागनाथ अण्णांनी ठेवून घेतले होते. त्यांचे विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण पुरे झाल्यानंतर ते आपल्या गावी गेले, त्याचप्रमाणे ३० सप्टेंबर १९९३ रोजी मराठवाड्यातील किल्लारी येथे झालेल्या भीषण भूकंपामुळे निराधार झालेल्या १०८ मुलांना दत्तक घेऊन मानवतेच्या भूमिकेतून नागनाथ अण्णांनी त्या मुलांची जबाबदारी स्वीकारली होती. वाळवा येथे वसतिगृहात राहून पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करुन देण्याची सोय केली होती.

मुलींच्या वसतिगृहासाठी किसान शिक्षण संस्थेच्या वतीने हुतात्मा संकुलामधे अद्यावत सर्व सोयीने युक्त असे १ कोटी २३ लाख रुपयाचे २०० मुलींची सोय असलेली सावित्रीबाई फुले मुलींच्या वस्तीगृहाची नवीन इमारत बांधली आहे. या इमारतीचे बांधकाम प्रतिभा कन्ट्रक्शनचे श्री. राम जाधव व श्री. वसंत वाजे यांनी केले. या वसतिगृहाचे उद्घाटन उत्तर प्रदेशमधील त्यावेळच्या खासदार फुलनदेवी यांचे हस्ते व शंकरराव नलवडे (कोल्हापूर), सौ. कुसुमताई नायकवडी यांच्या उपस्थितीमध्ये २७ मे १९९९ रोजी केले. नागनाथ अण्णांच्या मनामधे सदैव हुतात्म्यांची जिवंत स्मारके कधी उभारता येतील असे विचार नेहमी घोळत असतात. हुतात्मा साखर कारखाना नेहमीच शिक्षणाचा प्रसार तळागाळात पोहचविण्याचा प्रयत्न करत राहिल. कारखाना ही प्रेरणा आहे असे समजून हा कारखाना व्यवस्थित चालविण्यासाठी शक्य ते प्रयत्न झाले पाहिजेत. ज्या ठिकाणी किसन अहिर व नानकसिंग हुतात्मा झाले, स्वातंत्र लढ्यात जेथे त्यांनी आपले प्राण गमावले त्या पवित्र भूमीत नागनाथ अण्णांनी किसान शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यालय व वसतिगृह सुरु केले आहे. सोनवडे येथील गावकऱ्यांनी ४४ एकर जागा नानकसिंग यांच्या नावाने विद्यालय सुरु करण्यास दिली. या शाळेचे वेगळेपण असे आहे की उंच डोंगरावर शाळेच्या दोन प्रशस्त इमारती आहेत. इमारती सभोवती पाच हजार हापूस आंब्याची, नारळाची, काजू, सुपारी, बदाम, दालचिनी वगैरेची झाडे आहेत. मुलांसाठी खेळायला प्रशस्त मैदान, मोफत शिक्षण, मोफत निवास सोनवडे येथे हुतात्मा नानकसिंग विद्यालयात उपलब्ध करुन दिले आहे. महाराष्ट्रातील कुठल्याही गरीब विद्यार्थांस प्रवेश मिळतो. त्याची इच्छा ज्ञान संपादन करण्याची असावी एवढीच अट असते, 'ज्यांना कोणी नाही त्यांना आम्ही आहोत' हे ब्रीद वाक्य शाळेचे व संस्थापकांचे आहे. वाळवा येथल्या प्रमाणेच मुलांची सर्वांगिण काळजी वसतिगृहात घेतली जाते. त्या बाबत नागनाथ अण्णा नेहमी जागृत असतात व स्वत: लक्ष देत असतात. खेळामध्ये सर्वांना उत्तेजन दिले जाते, दीपावलीसारख्या सणामधे मिठाई करुन दिली जाते. नागनाथ अण्णा परगावी असले तर त्यांच्या पत्रामध्ये वसतिगृहातील मुलांच्या धान्याची सोय केली आहे का? पैशाची व्यवस्था झाली आहे का? वगैरे गोष्टींची चौकशी प्रामुख्याने होत असते.

आज नागनाथ अण्णांनी स्थापन केलेल्या किसान शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांमधे १८८ शिक्षक व प्राध्यापक असून ८२ मागासवर्गीय व १०६ इतर वर्गांपैकी आहेत. मंडल आयोगाची अपेक्षा येथे केव्हाच पार पाडली आहे. तसेच एकूण ४०२० विद्याथ्यांपैकी ८५२ मुले व ४७७ मुली मागासवर्गातील

आहेत. १६२७ मुले व १०६४ मुली इतर वर्गातील आहेत. नागनाथ अण्णांनी आपल्या कर्तृत्वाने व आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अपेक्षिलेली बहुजन समाजाच्या शिक्षणाची गंगा खूप मोठ्या प्रयत्नांनी वाळवा व सोनवडे परिसरात आणली आहे.

किसान शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आता वटवृक्ष झाला आहे. त्याच्या छायेखाली हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. खेळाडू विद्यार्थी कबड्डी, खो-खो मध्ये प्राविण्य मिळवत आहेत. या शिक्षण संस्थेच्या सोनवडे येथील हुतात्मा नानकसिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयावर मा. नागनाथ अण्णांचे विशेष लक्ष आहे. तेथे विद्यालयाची भव्य इमारत तर आहेच पण कोल्हापूरच्या प्रिन्स शिवाजी वसतिगृहासारखी इमारत बांधण्याचा अण्णांचा विचार आहे. वाळवा येथील हुतात्मा किसन अहिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जिजामाता मुलींचे विद्यालय, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाच्या परिसरावरही त्यांचे दररोज लक्ष असते. सकाळ व सायंकाळच्या स्नानानिमित्त त्या परिसरातील वातावरणात त्यांना समाधान मिळते. या किसान शिक्षण संस्थेच्या आदर्शवत व्यवस्थापनाला मा. अण्णांचे सुपुत्र श्री. वैभव यांचे मार्गदर्शन होत असते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामिण भागातील मुलांना राहण्याची व जेवण्याची मोफत सोय संस्थेने हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याच्या माध्यमातून केल्याने संपूर्ण मोफत शिक्षणाचा आदर्श घडवीत आहे. त्यामुळे राज्यातील दूरवरच्या भागातून येथे गरीब विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रवेश घेऊन लाभ घेत आहेत.

* * * *



**मा. क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी**
किसान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष **मा. तुकाराम नाना खोत (वस्ताद)** पडवळवाडी यांचा सत्कार करताना.



# १४

## महाराष्ट्र विधानसभेत व दिल्लीच्या लोकसभेच्या वाटेवर

नागनाथ अण्णांनी गोटखिंडी येथील बाबर गुरुजी, सखाराम मकदम, बाळकू नाना पाटील, गणपती अण्णा पाटील, पांडुरंग दादा पाटील, पांडुरंग सीताराम पाटील यांच्या सहकार्याने गोटखिंडी येथे नवजीवन संघटनेचे ४०० कार्यकर्त्यांचे एक शिबीर घेतले व कॉ. यशवंत चव्हाण यांनी शिबिरामध्ये मार्गदर्शन केले होते. नागनाथ अण्णांवर मोरारजी देसाईनी वॉरंट काढले होते. पोलिस गोटखिंडी येथील शिबिरापर्यंत पोहोचले पण अण्णा पोलिसांच्या तावडीतून सहीसलामत निसटून गेले.

या गोटखिंडीच्या मित्रांच्या आग्रहास्तव नागनाथ अण्णांनी गोटखिंडी येथे एक हायस्कूल सुरु केले होते. पण वाळवा येथील किसान शिक्षण संस्थेचा व्याप वाढल्यामुळे तेथील स्थानिक कार्यकर्ते यांच्या ताब्यात ते हायस्कूल देऊन त्यांना शक्य ती सर्व मदत व मार्गदर्शन करण्यात अण्णांनी पुढाकार घेतला होता.

१९५२ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची पहिली निवडणूक जाहीर झाली. नागनाथ अण्णांनी वाळवा मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवावी अशी मागणी झाली. जनतेने लढून, त्याग करुन मिळविलेले स्वातंत्र्य काँग्रेसने भांडवलदार, जमीनदार वर्गाच्या हातात दिले आहे. असा निष्कर्ष काढून कामगार शेतकऱ्यांची लोकशाही सत्ता पुन्हा आणण्यासाठी खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याची चळवळ अण्णांनी सुरु केली होती. यासाठी या राजकीय चळवळीचा भाग म्हणून कामगार किसान पक्ष व डावा समाजवादी पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी) यांच्या आघाडीचे वतीने नागनाथ अण्णांना विधानसभेच्या वाळवे मतदारसंघाची उमेदवारी दिली होती.

त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांचा एक ग्रुप होता. जी. डी. लाड, राम लाड, आकाराम लाड, नाथा लाड, शाहीर निकम हे त्या ग्रुपमध्ये होते. नागनाथ अण्णा त्यांना मानायचे. पण त्यांच्या कळपात नसायचे. शेवटी ते कॉ. दत्ता देशमुख गटात सहभागी झाले होते.

त्याचवेळी शे. का. पक्षात दोन गट झाले. जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, डॉ. वनकर यांचा एक गट. दुसरा नवजीवन संघटना, नाना पाटील, व्ही. एन. पाटील, बापूसाहेब भापकर, भाई सथ्था, कॉ. दत्ता देशमुख यांचा होता. हे दोन्ही गट शंकरराव मोरे गट व दत्ता देशमुख गट अशा नावाने ओळखले जात होते.

नागनाथ अण्णा कॉ. दत्ता देशमुख गटा बरोबर चळवळीत असायचे. पुढे देशमुख गटाला शे. का. पक्षातून काढून टाकले. मग कॉ. देशमुखांनी कामगार किसान पक्ष काढला. नवजीवन संघटनेचे नेते त्यात सामील झाले. मा. नागनाथ अण्णांची मग कामगार किसान पक्षाला सहानुभूती होती.

१९५२ च्या निवडणुकीत काँग्रेस सोडून सर्व डाव्या पक्षांची एकजूट करावी असे प्रयत्न चालू होते. कम्युनिस्ट व शे. का. पक्ष एकत्र आले. समाजवादी व डॉ. आंबेडकरांचा शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हे एकत्र आले. माधवराव गायकवाड वगैरे डाव्या समाजवादी व कॉ. दत्ता देशमुखांचा निवडणूक समझोता झाला.

काँग्रेस पक्ष कमकुवत झाला होता. म्हणून काँग्रेसचा पराभव होणार हे गृहीत धरुनच विरोधी पक्षाने तसा समज करुन घेतला होता. पण डाव्या पक्षांमध्ये एकोपा झाला नाही. त्यामुळे १९५२ च्या निवडणुका दुरंगी ऐवजी चौरंगी झाल्या. काँग्रेसविरोधी तीन फळ्या उभ्या राहिल्या. १) समाजवादी व शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन २) डावे समाजवादी व कामगार किसान पक्ष ३) शे. का. पक्ष व कम्युनिस्ट पक्ष. खेर, मोरारजींबद्दल जनमत चांगले नव्हते. त्यांना प्रतिकूल परिस्थिती होती. विरोधी पक्षाच्या मोठ्या सभा होत. या निवडणुकीत विधानसभेसाठी कोपरगांवमधून शंकरराव काळे, दक्षिण नगरमधून बापूसाहेब भापकर, भाई सथ्था व निंबाळकर, कोल्हापूरमधून संतराम पाटील, जीवनराव सावंत, सातारमधून व्ही. एन. पाटील, संगमनेर मधून कॉ. दत्ता देशमुख, वाळव्यामधून नागनाथ नायकवडी डाव्या समाजवादी व कामगार किसान पक्षाचे उमेदवार होते.

१९५२ च्या निवडणुकीत नागनाथ अण्णांना अपयश आले. तसेच विरोधी पक्षाचे अनेक उमेदवार पराभूत झाले. स्वातंत्र्य संग्रामात जिवाची बाजी लावून स्वातंत्र्याकरिता जे लढले ते पराभूत झाले व स्वातंत्र्यानंतर सुखवस्तू विजयी झाले. तिकडे सातारा जिल्ह्यातही स्वातंत्र्य सेनानी किसन वीर यांनाही मतदारानी नाकारले होते. ते काँग्रेसचे उमेदवार होते. सांगली जिल्ह्यात स्वातंत्र्य लढ्यातील अनेक नेते वेगवेगळ्या विरोधी पक्षांचे वतीने निवडणूक लढवित होते. पण वसंतदादांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाने जिल्ह्यातील सर्व आठ आमदारांच्या जागा जिंकल्या होत्या. १९५२ च्या निवडणुकीत काँग्रेसची मतांची टक्केवारी घसरली. पण बहुरंगी लढतीमुळे राज्यामध्ये काँग्रेसचे उमेदवार बहुसंख्येने निवडून आले. नागनाथ अण्णांना



अपयश आले पण त्यांना मते दिलेल्या मतदारांनी आपण कोठे कमी पडलो याचा अभ्यास केला. कारण काँग्रेस सारख्या निवडणुकीची सर्व साधने असलेल्या बलाढ्य पक्षाच्या उमेदवारांविरुध्द स्वतःच्या वाहनाने, स्वतःची भाजी भाकरी खाऊन अण्णांसाठी वाळवा तालुक्यातील मतदारांनी आटोकाट प्रयत्न केले होते. त्यावेळी अण्णांनी ''सायकल'' या चिन्हावर निवडणूक लढविली होती. राजकारणाच्या आखाड्यात निवडणूक ही एक लढत असते. एक पडणार व एक विजयी होणार हे ठरलेले असते.

निवडणुकीत अपयश आल्यावर काहीजण राजकारणाबाहेर पडतात, काही अज्ञातवासात जातात. पण नागनाथ अण्णांनी नेहमी मिळालेल्या अपयशात पुढील यशाची शिखरे पाहिली होती. त्यांनी पूर्वीप्रमाणे समाजपरिवर्तनाच्या, शेतकऱ्यांविरुध्द अन्यायाच्या विरोधी चळवळ व लढे उभारण्याच्या कार्यात पुढाकार घेतला. मे १९५२ मध्ये जुनेखेड तालुका वाळवा येथे शेतकऱ्यांचे लेव्ही विरुध्द आंदोलन आणि शेतकऱ्यांची भव्य परिषद संघटित केली होती. क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. यशवंत चव्हाण या नेत्यांनी या परिषदेस उपस्थित राहून नागनाथ अण्णांच्या लढ्यास मार्गदर्शन व पाठिंबा दिला होता. साधारणपणे दुसऱ्या महायुध्दा पासून शेतकऱ्यांकडून सरकार धान्याची सक्तीची लेव्ही वसूल करीत असे. धान्याची टंचाई लक्षात घेता अशा लेव्हीला विरोध नव्हता. पण तिला काही रीत असावी. सरकारी अधिकाऱ्यांचा जुलूम नसावा आणि लेव्हीच्या धान्याला योग्य किंमत द्यावी अशी मागणी होती. लेव्ही एकरी सरसकट घेण्याऐवजी उत्पन्नावर, प्रमाण ठरवून घेण्यात यावी अशी शेतकऱ्यांची सामुदायिक मागणी होती. तसेच जमणाऱ्या लेव्ही धान्याचे गरिबांना योग्य रीतीने वाटप होणे गरजेचे होते. त्याचबरोबर शेतकऱ्यांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तू म्हणजे सिमेंट, पत्रे, रास्त भावात मिळत नव्हत्या. नागनाथ अण्णांनी त्या परिषदेत मागणी केली की, लेव्हीच्या धान्यास योग्य दर द्यावा व शेतकऱ्यांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तू रास्त भावात उपलब्ध व्हाव्यात.

त्यानंतर नागनाथ अण्णांनी वाळवा तालुक्यातील पी. डब्ल्यू. डी. व लोकल बोर्डाकडील रस्ते कामगारांची संघटना बांधून त्यांना योग्य व नियमित दराने वेतन मिळावे यासाठीही प्रयत्न केले होते. लोकल बोर्डाकडील देवी डॉक्टरांकडे चतुर्थ श्रेणी सेवकांचा पगार कमी करण्याचा फतवा सरकारने काढला होता. अण्णांचे मित्र आमदार व्ही. एन. पाटील यांना या प्रकरणात लक्ष घालण्यास सांगून असेंब्लीमध्ये प्रश्न उपस्थित करणेस सांगितले. तसेच व्ही. एन. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सांगली येथे सांगली जिल्ह्यातील चतुर्थ श्रेणी सेवकांची सभा घेऊन सेवकांना दिलासा दिला. कॉ. व्ही. एन. पाटील यांच्या व अण्णांच्या प्रयत्नामुळे देवी डॉक्टरांच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातील कपात करण्याचा हुकूम रद्द झाला.

याच दरम्यान राजकीय पातळीवर भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न पुढे आला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात बेळगावच्या अधिवेशनापासून काँग्रेसनेच भाषावार प्रांत रचनेचे तत्त्व मान्य केले होते. मद्रास प्रांतात तामिळनाडू व आंध्र यांच्यात तेढ निर्माण झाली होती. पोट्टीश्रीरामालू यांच्या प्राणांतिक ६३ दिवसांच्या उपोषणात त्यांचा अंत झाला व केंद्र सरकारने आंध्रची निर्मिती केली.

इतर ठिकाणीही मागणी पुढे आली. अ.भा.काँ.च्या हैद्राबाद अधिवेशनानंतर फजलअली कमिशन भाषावार प्रांतरचनेच्या चौकशीसाठी नेमले होते. त्या कमिशनपुढे संयुक्त महाराष्ट्राची मागणी मांडली होती. तसेच पं. जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सितारामच्या कमिटीनेही रिपोर्ट दिला होता. गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटकचे चार जिल्हे पूर्वीच्या मुंबई राज्यात होते. मुंबईमध्ये भांडवलदारांचे राज्य होते. मुंबई ही देशाची व्यापार व उद्योगधंद्याची राजधानी होती. ती महाराष्ट्रात जाणे गुजराथी भांडवलदारांना नको होती. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्रासाठी तीव्र लढा लढावा लागला. फजलअली कमिशनने मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यास विरोध केला होता. तसेच केंद्र सरकारने व काँग्रेसनेही विरोध केला होता. शंकरराव देवांच्या पुढाकाराने संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली होती, पण त्यांच्या कार्यपध्दतीला महाराष्ट्रामध्ये विरोध झाला. १८.११.५५ ला असेंब्लीवर गेलेल्या मोर्चावर गोळीबार झाला. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र प्रश्न सोडविण्यासाठी कॉ. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली व एस. एम. जोशी सरचिटणीस असलेल्या कमिटीत बी. टी. रणदिवे, आचार्य अत्रे, भाऊराव गायकवाड, कॉ. दत्ता देशमुख या डाव्या पक्षाच्या नेत्यांना घेण्यात आले. सर्व डाव्या पक्षांची समिती तयार झाली पण त्यांनी हिंदू महासभा आणि जनसंघ या पक्षांनाही समितीत घेतले होते. नागनाथ अण्णांना ही गोष्ट अजिबात मान्य नव्हती.

नागनाथ अण्णांचा विरोध अशा कारणासाठी होता की, ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने स्वातंत्र्य चळवळीत अजिबात सहभाग केला नाही, उलट इंग्रज सरकारला लष्कर भरती करण्यासाठी मदत केली, ज्या ब्राम्हणी व्यवस्थेने कष्ट करणाऱ्या जनतेत जाती पाडल्या. ब्राम्हण सर्वश्रेष्ठ ठरवून शेतकरी, बलुतेदार, अस्पृश्य ठरविलेल्या जातींमध्ये उतरंड रचली. या सर्वांनी ज्ञान घेण्यावर, शिकण्यावर बंदी घालून त्यांना अज्ञानाच्या अंधारात जबरदस्तीने ढकलले. त्यांना माणूस म्हणून वागवले नाही, जनावरांसारखे वागविले. शिवाजी महाराजांना शूद्र म्हणून हिणवले. राजर्षी शाहूंना शूद्र म्हणून कुचेष्टा केली. अशा ब्राम्हणी जाती व्यवस्थेला कायम टिकवून ठेवणाऱ्या धोरणाचा आर. एस. एस. ने पुरस्कार केला. बहुजन कष्टकरी जनतेचा भाग असलेल्या मुसलमान जनतेचा द्वेष करावयाला शिकवणारा विषारी प्रचार केला. या संघाच्या नथुराम गोडसे या कार्यकर्त्याने हिंदू-मुस्लिमांनी एकमेकांची कत्तल करावी या दुष्ट हेतूने महात्मा गांधींचा खून केला. त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जन्माला घातलेली विषारी अपत्ये म्हणजे हिंदू-महासभा आणि जनसंघ अशा ब्राम्हणी जातीयवादी, धर्मांध संघटनांना संयुक्त महाराष्ट्र समितीत घेता कामा नये असे नागनाथ अण्णांचे आग्रही म्हणणे होते. ते त्यावेळच्या काही पुढाऱ्यांसमोर त्यांनी मांडले. दत्ता देशमुख, दाजिबा देसाई, उध्दवराव पाटील, व्ही. एन. पाटील यांचेसमोर आपले सविस्तर म्हणणे मांडले, परंतु ते मान्य झाले नाही.

पुढे दि. २१.११.१९५५ रोजी पं. जवाहरलाल नेहरु यांनी मुंबई स्वतंत्र ठेवण्याचे रेडिओवरुन जाहीर केले. त्यामुळे मुंबईच्या गिरणी कामगारांनी मुंबईत संप करुन तीव्र आंदोलन केले. १५ ते २१ जानेवारी १९५६ च्या दरम्यान आंदोलनात १०५ हुतात्मे झाले. त्यांचे पडसाद



लोकसभेत उमटले. याच पार्श्वभूमीवर दि. २ जून १९५६ रोजी मुंबईत अ.भा.काँ. ची बैठक झाली. पं. नेहरुंच्या चौपाटीवरच्या सभेतील निदर्शकांनी गोंधळ केला, त्यामुळे केंद्रीय नेत्यांमध्ये जोरात चर्चा झाली. लोकसभेमध्ये २ जुलै १९५६ ला संयुक्त महाराष्ट्राबद्दल चर्चा झाली. अर्थमंत्री सी. डी. देशमुख यांनी आपला राजीनामा सादर केला. पं. नेहरुंवर संयुक्त महाराष्ट्रावर अन्याय केल्याबद्दल तुफान टीका केली. त्यामुळे दि. १६ ऑक्टोबर १९५६ रोजी द्विभाषिक जाहीर झाले व यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले आणि मार्च १९५७ मध्ये विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या.

१९४२ च्या चळवळीतील नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने कॉ. नाना पाटील, कॉ. डांगे, सेनापती बापट, आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, कॉ. दत्ता देशमुख वगैरेंनी सभा घेऊन चळवळ केली होती. संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्ह्यात, तालुक्यात गावात द्विभाषिकास विरोध करुन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांचा निषेध केला होता. द्विभाषिकांमुळे निर्माण झालेल्या असंतोषाचे परिस्थितीत १९५७ ची निवडणूक होणार होती. काँग्रेस पक्षाची पिछेहाट होण्याची ती वेळ होती.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी कराड दक्षिण या लोकसभेच्या जागेसाठी क्रांतिसिंह नाना पाटील उभे राहिले होते. लाल निशाण गटाचे संगमनेरमधून कॉ. दत्ता देशमुख, सातारहून कॉ. व्ही. एन. पाटील, कोल्हापूरहून कॉ. संतराम पाटील, भोर मधून जयसिंग माळी, नगर तालुक्यामधून बापूसाहेब भापकर, कर्जत जामखेडमधून भाई सथ्था, वाळव्यामधून नागनाथ नायकवडी, सटाण्यामधून नारायण सोनावणे असे आठ उमेदवार उभे होते. सुरवातीला संयुक्त महाराष्ट्र समितीने नागनाथ अण्णांना तिकीट देताना खळबळ केली होती, पण तो विरोध शांत झाला. लाल निशाण गटाचे सर्व आठ उमेदवार बैलगाडी चिन्हावर विजयी झाले. क्रांतिसिंह नाना पाटीलही ॲड. आळतेकरांचा पराभव करुन निवडून आले. वाळव्यामधून ॲड. एस. डी. पाटील या काँग्रेस उमेदवाराचा पराभव करुन नागनाथ अण्णा निवडून आले व ते आमदार झाले.

१९५७ च्या नागनाथ अण्णांच्या निवडणुक प्रचाराची धुरा प्रा. एन. डी. पाटील यांनी यशस्वी रीतीने सांभाळली होती. अण्णांचे कार्यकर्ते स्वांतत्र्य संग्रामातील सहकारी स्वत:च्या खर्चाने निवडणूक प्रचारात भाग घेत होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचे सांगली जिल्ह्याचे सेक्रेटरी तासगावचे गणपतराव कोळी यांनीही प्रचार कार्यामध्ये भाग घेतला होता. १९५७ च्या निवडणूक प्रचारात कॉ. एन. डी. पाटील यांचेबरोबर इस्लामपूरचे ॲड. हंबीरराव के. पाटील, पडवळवाडीचे वस्ताद खोत, महंमदभाई चाऊस, इनामदार अप्पा, काका घोरपडे, माधव जाधव, राजाराम कदम, राम देवर्डे, दादासाहेब पाटील, बाबर गुरुजी, रामू मास्तर, खंडू शेळके, नारायण पेशवे, बजरंग शेळके, सौ. कुसुमताई नायकवडी, हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे शिक्षक वगैरेंनी भाग घेतला होता. तरुणांच्या सायकल फेऱ्या सगळीकडे फिरत होत्या, शेवटी मतदानाचे दिवशी नागनाथ अण्णा प्रचार दौऱ्यातून धावत पळत येऊन मतदानाची वेळ संपण्यापूर्वी पाच मिनिटे

आधी त्यांनी वाळवा येथे मतदान केले. वाळवा येथे अण्णांना ९९ टक्के मतदान झाले. खेड येथे १०० टक्के मतदान अण्णांना झाले होते. सर्वांच्या प्रयत्नांमुळे काँग्रेस पक्षाचे ॲड. एस. डी. पाटील यांचा पराभव करुन नागनाथ अण्णा विजयी झाले. वाळव्यामध्ये व तालुक्यामध्ये आनंदोत्सव साजरा झाला. अण्णांच्या मातोश्री क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांना आपला क्रांतिवीर सुपुत्र लोकप्रतिनिधी–आमदार झाल्याचा आनंद झाला. वाळवा येथील जनतेने अण्णांचा विजय मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला.

अण्णांनी स्थापन केलेल्या हुतात्मा किसन अहिर विद्यालय व वसतिगृहाच्या जबाबदारीबरोबर आता लोक प्रतिनिधी म्हणून सर्व वाळवा तालुक्याची जबाबदारी येऊन पडली होती. अण्णांच्या विधानसभेच्या कामानिमित्त मुंबईच्या फेऱ्या सुरु झाल्या. अण्णा आमदार झाले पण त्यांनी पोषाखातील व विचारांतील साधेपणा सोडला नाही. आमदार झाले तरी पूर्वीचेच क्रांतिवीर अण्णा म्हणून राहिले.

संयुक्त महाराष्ट्र समितीचे १०० आमदार निवडून आले. पण गुजराथमधील आमदारांमुळे काँग्रेसला बहुमत मिळाले व यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री निवडले गेले. त्या दरम्यान संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी महाराष्ट्रातील आमदार खासदारांचे शिष्टमंडळ पंतप्रधान पंडीत नेहरुंना भेटण्यासाठी गेले होते. त्यानंतर औरंगाबाद येथे अ.भा.काँ. ची बैठक झाली. त्या बैठकीत, पंडीत नेहरु यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीची मागणी तत्त्वत: मान्य केली. पुढे लोकसभेत ठराव पास झाला व १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण झाले. महाराष्ट्रात सर्वत्र आनंदी आनंद झाला. गेल्या १० वर्षांच्या मुंबई संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा शेवट सुखद झाला.

नागनाथ अण्णा १९५७ ते १९६२ पर्यंत आमदार होते. पुढील २३ वर्षामध्ये त्यांनी स्थापन केलेल्या किसान शिक्षण संस्था विस्तार कार्यामध्ये आणि शेतकऱ्यांवरील अन्याय विरोधी आंदोलनामध्ये भाग घेत मोठ्या चिकाटीने १९८१ मध्ये हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यास मंजुरी मिळवून तो अल्पकाळात उभारला. त्याचा इतिहास पुढे एका वेगळ्या प्रकरणात दिला आहे. आठ वर्षे खटपट करुन अविश्रांत श्रम घेऊन २९ जानेवारी १९८४ ला ट्रायल गळीत हंगाम सुरु झाला व सभासद शेतकऱ्यांच्या ताब्यात व्यवस्थापन देऊन अण्णा मोकळे झाले.

मार्च १९८५ मध्ये महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर झाली. कोल्हापूर येथे कॉ. दत्ता देशमुख यांनी मा. अण्णांना वाळवा मतदार संघातून निवडणूक लढवाल का? यशस्वी व्हाल का? अशी विचारणा केली. अण्णा म्हणाले 'आपण कोणाचेही वाईट केलेले नाही. आपले हात स्वच्छ आहेत. तेव्हा आपण जनतेपुढे उजळ माथ्याने जाऊ शकतो.' कार्यकर्त्यांनी व शेतकऱ्यांनीही आग्रह धरला. नागनाथ अण्णांनी १९८५ ही निवडणूक अपक्ष म्हणून लढविण्याचे ठरविले. निवडणूक प्रचार यंत्रणा सिध्द झाली. कॉ. व्ही. एन. पाटील व प्रा. बाबूराव गुरव यांनी प्रचाराची जबाबदारी पार पाडली. सौ. कुसुमताई नायकवडी आणि श्रीमती इंदूताई पाटणकर



यांनीही प्रचारात भाग घेतला. नागनाथ अण्णांबरोबर डॉ. भारत पाटणकर आणि वाळवा येथील कार्यकर्ते, किसान शिक्षण संस्थेतील शिक्षक, कामगार व ज्ञात अज्ञात असंख्य कार्यकर्त्यांनी आपला वाटा उचलला. अण्णांच्या प्रचारासाठी आष्टा, वाळवा व इस्लामपूर या शहरातून प्रचंड मिरवणुक काढली होती. मिरवणुकीचे अग्रभागी निवडणूक चिन्हाचे जिवंत प्रतीक म्हणून सिंह आणण्यात आला होता. इस्लामपूरच्या प्रचार सभेत माजी नगराध्यक्ष श्री. एम. डी. पवार, एच. के. पाटील, प्रा. बाबूराव गुरव, ॲड. व्ही. एन. पाटील यांची भाषणे होऊन अण्णांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आवाहन केले होते. मोठ्या चुरशीने काँग्रेस उमेदवार श्री. विलासराव शिंदे यांच्या विरोधामध्ये क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांना जनतेने प्रचंड मतानी विजयी केले. मतदारसंघातील विजयाबद्दल वाळवा तालुक्यातील जनतेने फटाके उडवून व गुलाल उधळून आनंद व्यक्त केला. निवडणुकीतील विजयानंतर आ. नागनाथ अण्णांनी मतदारसंघातील वेगवेगळ्या गावातील सत्कार समारंभात मतदारांचे आभार मानले. इस्लामपूर येथील सत्कार सभेत अण्णांनी मतदारांचे आभार मानताना सांगितले की, ''मी कोणत्याही पक्षाचा सभासद नाही. तसेच कोणत्याही पक्षात अगर आघाडीत न जाता जनतेच्या हितासाठी जे काही करता येईल ते अपक्ष आमदार म्हणूनच करेन. कामगार, कष्टकरी, शेतकऱ्यांचे प्रश्न, महागाई आणि सामान्य जनतेचे आजचे असहाय्य जीवन सुखकारक कसे होईल या दृष्टीने प्रयत्न करेन''

आमदार नागनाथ अण्णा यांच्याबद्दल आठवण सांगताना ग. प्र. प्रधान लिहितात, ''अण्णा व मी बरोबर आमदार होतो. ते विधानसभेत होते आणि मी विधान परिषदेचा सदस्य होतो. त्यामुळे तशा भेटीगाठी नागपूर अधिवेशनात थोड्या बहुत पडत. अण्णांच्या बरोबर त्यांच्या आई त्यावर्षी नागपूरला आल्या होत्या. अण्णा आईची ज्या रीतीने सेवा करीत ते पाहून मी चकित झालो. मी विधान परिषदेतील वादविवादात हिरीरीने भाग घेई. पण अण्णांचे मन संसदीय कामात फारसे रमत नसे.'' ते एकदा मला म्हणाले, ''इथे जी आश्वासने दिली जातात, ज्या सुधारणा करायचे सभागृहात ठरते त्याप्रमाणे काम होत नाही. खालपर्यंत शेतकरी–शेतमजूरांपर्यंत फायदे पोहोचत नाहीत'' मी म्हणालो ''पण अण्णा, आज सत्ता तर ग्रामीण पुढाऱ्यांच्या हातात आहे.'' अण्णा एकदम उसळून म्हणाले ''खरी सत्ता नोकरशाहीच्याच हातात आहे आणि ही पांढरपेशी नोकरशाही शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधी आहे.''

तासगावचे भाई गणपत कोळी अण्णांच्याबद्दल लिहितात, ''नागनाथ अण्णा आमदार झाले तरी त्यांचे कपडे, राहणीमान यामध्ये काडीमात्र बदल झाला नाही. अंगात दंडापर्यंत गुंडाळलेला खाकी शर्ट आणि कमरेला धोतर हे पाहून मुंबईचे आमदार आश्चर्यचकित होत. त्यांच्या मातोश्री विचाराने जहाल होत्या, तशाच विचारांच्या परंपरेचे नागनाथ अण्णा कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, दलित, मैलकुली यांच्यासाठी संघर्ष करीत होते.''

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी १९५७ आणि १९८५ साली विधानसभेच्या निवडणुकीत विजय संपादन केला होता. आ. नागनाथ अण्णांचा महाराष्ट्रातील आणि सांगली जिल्ह्यातील मित्र परिवार खूप मोठा होता. मुंबईस कामानिमित्त गेल्यानंतर रात्री मुक्काम कोठे करावयाचा

असा प्रश्न अनेकांना पडत असे. अशा मित्रांसाठी अण्णांच्या आमदार निवासामधल्या खोलीमध्ये नक्की सोय होत असे. ही आठवण सांगलीच्या श्री. नरेंद्र बागल यांनी सांगितली. ते त्यांच्या कामानिमित्त अण्णांचे खोलीत मुक्कामास होते.

शेतकरी कामगार कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव कष्टकरी जनतेच्या संघटनात्मक ताकद निर्माण होण्यासाठी १९८९,१९९१ व १९९६ मध्ये कराड लोकसभा मतदार संघातून अपक्ष म्हणून निवडणूका लढवल्या तत्पूर्वी सत्ताधारी पक्षांना प्रखर विरोध करणारा उमेदवार अनेक वेळा विरोधी पक्षांना मिळत नसल्यामुळे कॉंग्रेस पक्ष एकतर्फीच निवडणूक जिंकत होता. या मतदार संघाचा विस्तार अवाढव्य तर आहेच व अति दुर्गम असा डोंगराळ भाग यामुळे सर्वसामान्यांतील कष्टकरी वर्गाच्या उमेदवारांना मतदारांच्या पर्यंत पोहोचणेही अवघड होई याचा फायदा सत्ताधारी भांडवलदारी पक्षांना होत असे पण अण्णांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी नियोजनबद्ध निवडणूक प्रचार यंत्रणा राबवून मतदार संघाच्या काना कोपऱ्या पर्यंत जाऊन सामाजिक, आर्थिक राजकीय जनजागृती करुन निवडणूका लढवल्या जनतेमध्ये चैतंन्याचे वातावरण निर्माण केले पण पैसा व सत्ता यांच्या बळावर सत्ताधारी पक्षांनी विजय मिळवला असे असले तरी शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी, कामगार व तरुणांच्यामध्ये जागृती निर्माण झाली. राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारी आपमतलबी सत्तेच्या राजकारणा विषयी चीड निर्माण झाली. हे या निवडणूकीतून साधले.


मध्यंतरीच्या काळात बहुजन समाजवादी पार्टीच्या मा. कांशीराम यांनी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांच्या माध्यमातून बहुजन समाजाला संघटीत करुन भांडवलदारी, जातीयवादी, उच्चवर्णियांच्या सत्तेच्या राजकारणाला आव्हान दिले. मा. कांशीराम यांच्या बहुजन समाजाच्या या मुक्ती लढ्याला व पुरोगामी विचाराला अण्णांनी पाठींबा दिला. सर्व प्रकारचे सहकार्य केले पण पुढे मा. कांशीराम यांनी उत्तर प्रदेशात सत्ता मिळवण्यासाठी जातीयवादी, प्रतिगामी पक्षासी हात मिळवणी केले ही त्यांची कृती बहुजन समाजाला मारक असल्याचे लक्षात येताच अण्णांनी बहुजन समाजवादी पार्टीशी असणारे संबंध तोडले.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मा. मुलायमसिंग यादव यांच्यावर प्रतिगामी विचाराच्या जातीयवादी पक्षांसी दूरचा संबंध असणाऱ्या एका माथेफिरु तरुणांने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजातील पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्यांच्यावर हल्ला करु पहाणाऱ्या या घटनेचा निषेध सामुदाईक स्वरुपात वाळवा येथे शेतकरी, कामगार, विद्यार्थी कार्यकर्त्यांनी प्रचंड फेरी काढून निषेध केला. याच समाजवादी पक्षासी अण्णांचे पुढे घनिष्ट संबंध निर्माण झाले. हे एक थोर स्वातंत्र्य सेनानी पुरोगामी विचाराचा लढावू कार्यकर्ता बहूजन समाजाचा संघटक म्हणून मा. मुलायमसिंग यांनी समाजवादी पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाची जबाबदारी अण्णांच्याकडे सोपवली. पुढे २००४ मध्ये डाव्या अघाडीचे व समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून मा. नागनाथ अण्णांनी सन २००४ ची सांगली लोकसभा मतदार संघातून शेतकरी व कार्यकर्त्यांच्या आग्राहस्तव निवडणूक लढवली. शेती मालाचा दर, दुष्काळग्रस्त जनेतचा पाणी प्रश्न, राज्यकर्त्यांचे आर्थिक



घोटाळे, भ्रष्टाचार, सहकारातील अनागोंदी इ. प्रश्न या निवडणुकीच्या निमित्ताने कार्यकर्ते जनतेपुढे मांडत होते. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री मा. मुलायमसिंग यादव, भाई एन्. डी. पाटील, भाई गणपतराव देशमुख, साथी निळू भाऊ फुले इ. प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा झाल्या. हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याचे कामगार, शिक्षक, कार्यकर्ते यांनी नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा राबवली अत्यंत चुरशीची ही निवडणूक झाली पण या तिरंगी निवडणुकीतील मत विभागणीचा फायदा कॉंग्रेसच्या उमेदवारास झाला.

* * * *



मा. नागनाथ (अण्णा) नायकवडी
सातारा येथे खासदारकीच्या निवडणुकीचा अर्ज भरतेवेळी
शेजारी– कॉ. शेख काका, सौ. कुसूमताई नायकवडी, कॉ. नाना शेटे, ॲड. धैर्यशील पाटील

## १५

# हुतात्मा किसन अहिर अर्धपुतळा अनावरण सोहळा

१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये नागनाथ अण्णांबरोबर ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी जिवाची पर्वा न करता बलिदान केले, त्यामध्ये हुतात्मा किसन अहिर हे प्रमुख होते. त्यांची स्मृती जिवंत रहावी म्हणून जाणीवपूर्वक अण्णांनी आपल्या सहकाऱ्याचे जिवंत स्मारक, हुतात्मा किसन अहिर विद्यालय वाळवा येथे व हुतात्मा किसन अहिर वसतिगृह हुतात्मानगर (सोनवडे) येथे सुरु केले आहे. त्या हुतात्मा किसन अहिर यांचा अर्ध पुतळ्याचे त्यांच्या २५ व्या स्मृतिदिनादिवशी म्हणजे २५ फेब्रुवारी १९७१ रोजी विद्यालयाच्या समोर वाळवा येथे भारताचे अर्थमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते अनावरण संपन्न झाले.

हुतात्मा किसन अहिर यांचा जन्म १९१८ साली एका शेतकरी कुटुंबात झाला. लहानपणापासून तालमीचा शौक असलेमुळे त्यांची उमदा पैलवान म्हणून ख्याती झाली होती. नागनाथ अण्णांनी १९४२ च्या लढ्यात वाळवा येथील सहकारी कार्यकर्ते जमविले होते. त्यामध्ये किसन अहिर प्रामुख्याने होते.भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना लष्करी शिक्षण देण्याच्या योजनेचे किसन अहिर मुख्य होते. ढगेवाडी, थावडा येथील सुरक्षित जागा त्यांनीच निवडल्या होत्या. पुढे त्या फौजी कँपचा पोलिसांना सुगावा लागला व मणदूर–सोनवडे, ता. शिराळा येथे नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या गोळीबारामध्ये किसन अहिर व नानकसिंग यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन अर्पिले, हुतात्मा झाले. दरवर्षी दि. २५ फेब्रुवारी या दिवशी हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्याचे नागनाथ अण्णा कधी विसरले नाहीत. २५ व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून हुतात्मा किसन अहिर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण स्वातंत्र्य लढ्यातील एक सेनानी आणि भारत सरकारचे अर्थमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते व



क्रांतिसिंह नाना पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाले या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष कॉ. दत्ता देशमुख होते.

या प्रसंगी ना. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, ''आपल्या नेत्यांवर आलेले मृत्यूचे संकट स्वत:चे अंगावर ओढून घेऊन जाणून बुजून स्वातंत्र्यासाठी कुर्बानी करणाऱ्या किसन अहिर यांच्यासारख्या क्रांतिकारकाचा लौकिक या अर्थाने पुतळा उभारण्यापेक्षाही त्यांच्या नावाने सुरु असलेल्या शैक्षणिक व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे या देशातील प्रश्न समजावून घेऊन गरिबीविरुध्द लढणारे सैनिक निर्माण झाले पाहिजेत. हाच त्यांचा स्मृती बाळगण्याचा क्रांतिकारक मार्ग आहे. आजच्या समारंभाची पार्श्वभूमी क्रांतिकारक इतिहासाची आहे. ४२ च्या राजकीय आंदोलनाच्या काळात साताऱ्यात सशस्त्र उठाव झाला. साऱ्या देशभर हेच वातावरण होते नव्या उमेदीने भारुन गेलेली नवी पिढी उत्साहाने काम करण्यास पुढं आली होती. १० सप्टेंबर १९४२ ला इस्लामपुरातून जो मोर्चा निघाला होता त्यावेळी वाटेत एक जिद्दीचा तापट तरुण मला भेटला. अनेक प्रश्नां संदर्भात तो माझ्याशी वाद घालत होता. असे जिद्दी तरुण हवेत, या विचाराचा मीही होतो. कारण त्यातूनच इतिहास घडत असतो.माझ्याशी वाद घालणाऱ्या तरुणाचे नाव नागनाथ नायकवडी आहे हे मला नंतर समजले. परंतु १९४२,१९४७,१९६० सालचाच काय पण १९६७ सालचा संदर्भही आज राहिलेला नाही. भावा भावा सारखे कार्यकर्ते एकमेकांविरुध्द झाले आहेत. त्यासाठी तशी कारणेही झाली. देशातील आर्थिक व सामाजिक प्रश्न तीव्र होत चालले असून त्यांचे उत्तर नव्या धोरणातून सोडविले पाहिजे आणि त्यासाठी विविध पक्षाच्या नेत्यांना एकत्र आणण्याची कल्पना पसंत आहे. आमची क्रांती धनिकाविरुध्द नाही तर देशाची परिस्थिती गंभीर होईल म्हणून गरिबीविरुध्द योजनाबध्द तीव्र लढा केल्याशिवाय गत्यंतर नाही. समान समता असलेल्या शोषणरहित समाजनिर्मितीच्या प्रयत्नातील कोणत्याही कार्यक्रमास माझा पाठिंबा राहील. वाळवा गावचे गावकरी आणि या समारंभाचे संयोजक नायकवडी यांना मी धन्यवाद देतो.''

समारंभाचे प्रारंभी नागनाथ अण्णांनी सर्वांचे स्वागत करुन समारंभाचा हेतू विशद केला. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. दत्ता देशमुख यांनी ४२ च्या लढ्यातील क्रांतिकारकांच्या वतीने सर्वांचे स्वागत केले होते.

अध्यक्षीय समारोप करताना क्रांतिसिंह नाना पाटील हुतात्मा किसन अहिर यांना अभिवादन करताना म्हणाले, ''४२ चा लढा हा कोणा एकट्याचा नसून सर्व जनता ही त्यात सहभागी झाली होती. भूमिगत कार्यकर्त्यांना आपल्या पदराखाली ज्यांनी आश्रय दिला त्यांचे उपकार स्वत:च्या कातड्याचे जोडे करुन घातले तरी फिटणार नाहीत. या लढ्यात ज्यांनी कुर्बानी केली ते हुतात्मे फार थोर होत. ज्यांच्या नखाची सर आज कुणालाही नाही. स्वातंत्र्य संग्रामात ज्या क्रांतिकारकांच्या कुटुंबांनी त्याग केला त्यांच्या पोषणाची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे.''

या समारंभाची वैशिष्ट्ये म्हणजे हुतात्मा किसन अहिर यांच्या स्मरणार्थ कविश्रेष्ठ ग. दि. माडगुळकर यांनी खास स्मरणगीत रचले होते. त्यास संगीतकार दत्ता डावजेकर यांनी

संगीताचा साज चढविला होता व ते गीत त्यांचे कन्या रेखा डावजेकर यांनी म्हटले होते. (ते गीत या प्रकरणा शेवटी दिले आहे) ना. चव्हाणांचे आगमन होताच त्यांचे कॉ. दत्ता देशमुख यांनी हार घालून स्वागत केले होते तर नागनाथ नायकवडी यांनी ना. चव्हाण यांना अभिवादन केले आणि क्रांतिवीरांच्या मातोश्री लक्ष्मीबाई नायकवडी यांनी ओवाळले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या भाषणाला जमलेल्या जनसमुदायाने उत्स्फुर्त दाद दिली. हुतात्मा किसन अहिर यांच्याबरोबर स्वातंत्र्य लढ्यात लढलेले ५० च्यावर क्रांतिकारक यावेळी हजर होते. पुतळ्याचे निर्माते कलाकार कोल्हापुरचे श्री. बाबूराव जाधव यांना ना. यशवंतराव चव्हाण यांनी शाल व श्रीफळ अर्पण केले.

या समारंभाचे एक वेगळेच आगळेपण होते. निवडणुकीच्या ऐन धामधुमीत सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे ना.चव्हाण, कम्युनिष्ट पक्षाचे क्रांतिसिंह नाना पाटील व लाल निशाण गटाचे कॉ.दत्ता देशमुख या तिघांना एकत्र आणण्यात क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी जी कार्यकुशलता दाखवली त्याबद्दल तिघांनीही समाधान व्यक्त केले. वरील तिन्ही नेत्यांनी निवडणुकीचे भाषण करण्याचे टाळलेच. पण आमचे मार्ग व राजकीय पवित्रे भिन्न असले तरी जनतेवरील निष्ठा ही एकच आहे; त्याद्वारेच आम्ही जनतेच्या हितासाठी प्रयत्न करण्याची घोषणा ना. चव्हाण यांनी केली होती. या आगळेपणाचे उपस्थित सर्वांनीच स्वागत केले. या समारंभा प्रसंगी ॲड. चामुंडराय यांनी किसन अहिर व नानकसिंग यांच्या जीवनावरील लिहिलेले ''दोन दिव्य तारे'' या पुस्तकाचे प्रकाशन ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते झाले. या कामी क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी, दादा पाटील, राजूताई बिरनाळे, शिक्षक व कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले.

## हुतात्मा किसन अहिर यांचे स्मरणगीत

हुतात्मा किसन अहिर कीं जय ।
कृतार्थ त्यांचे कणकण जीवन, मरणहि मृत्युंजय ॥

निर्वाणीचें वचन महात्मा कळवळुनी बोलला
व्यक्ती व्यक्ती इथून पुढारी, कठीण काळ आला
या आदेशां कृतींत उतरी तरुण वीर निर्भय १

बेचाळीसचा लढा स्वयंभू स्वयंभूच नेते.
अग्रगण्य कीं त्यांत हुतात्मा किसन अहिर होते
गुप्तांदोलन, स्वतंत्र शासन, त्यांचा कृतनिश्चय २

जागविले निज जन्मग्रामां, जनीं जागृति नवी
'वाळव्या' तुनी, भूमिगतांची उफाळली वाळवी
परदास्याचें मूळ पोखरी जनशक्ती अव्यय ३



नवी निर्मिली शासनसंस्था, निवडून लोकाग्रणी
धाक वसवुनी, पार नमविले, गांवांतिल ग्रामणी
असंभाव्य तो सुकर करविला जनसामान्य नय ४

पिडित त्यांना धरीले हातीं, पीडक ते झोडले
शुध्दचरित ते जथ्यास अपुल्या प्रीतीनें जोडले
सुरु जाहले ग्रामराज्य ज्या नव्हते कार्यालय ५

प्रफुल्ल कांती तरुण मल्ल, तो वर्णानें सांवळा
अहिरकुळींचा किसन नव्यानें घडवी जणूं गोकुळां
प्रौढ पराक्रम परी जयाचें, ऐन विशीचें वय ६

परसत्तेचें आरक्षकदल कंस सैनिकांपरी
दऱ्यादऱ्यांतुन भटकत होते त्याच्या मागावरी
सहस्त्राबाहू सत्तेलाही पडले ज्याचे भय ७

कोण्या समयीं सहज वाटले त्यांच्या त्यांच्या मनां
शस्त्रावांचून कठीण यापुढे शास्त्यांशी सामना
ज्ञानावाचून लढतां होतो सामर्थ्याचा क्षय ८

नानक नामक आझाद सैनिक मिळविला त्यांनी
ध्येय-भारल्या सैन्यासाठीं समुचित सेनानी
शस्त्रसाधनीं सहज लाविली अनुयायांची लय ९

सिध्द जाहली निवडक सेना, शस्त्रेंही आली
भूमिगतांची प्रतिसत्ता मग वैभवयुत झाली
सत्तांधां ही प्रगती सांगे कोणीतरी संजय १०

नोकरशाही उखरि नखांनी चवताळून भूमी
दैवच केवळ, एक गवसली संधी निज नामी
उजाड रानीं दृष्टीस पडलें अवचित तरुणत्रय ११

आरक्षी कुणी अनुमानाविण बंदुकीस झाडी
बार उडाले, उडले पक्षी. थरारली झाडी
धुळींत कोसळून पडली तिन्हीं शरिरें रुधिरमय १२

एक त्यांतले दिव्य कलेवर अहिरांचें होते
समाज नेता सरे अचानक नियतीच्या हातें
स्मृतीच केवळ उरली मागें आतां तेजोमय १३

सार्वभौम ही स्वतंत्र आतां भारतीय जनता
असे अलौकिक आत्में लढलें मागें तिज करता
त्या आत्म्यांचा आठव राहो जनांतरी अक्षय १४

किसन अहिरां गातो आम्ही, त्यांना आठवतो
चारित्र्याच्या विशुद्धतेसी अंतरि साठवतो
स्मरण तयांचें हाच आमुच्या स्फूर्तीचा संचय १५

**- ग, दि, माडगूळकर**

## मनीषा कोण पुरी करणार ?

बेचाळीसच्या क्रांतिकारकांचं हे आवडतं क्रांतिगीत. बेचाळीस साली या गीतानं असंख्य तरुणांची मनं पेटविली होती. हुतात्मा किसन अहिर व हुतात्मा नानकसिंग हे त्यापैकीच दोन तरुण क्रांतिकारक. शिराळा पेट्यातील 'मणदूर' च्या जंगलात ब्रिटिश सत्तेशी सामना देत हे दोन तरुण उल्केप्रमाणे जळाले आणि क्रांतीच्या दर्यात नाहीसे झाले. या वर्षी म्हणजे २५ फेब्रुवारी २००७ रोजी त्यांचा ६१ वा स्मृतिदिन आहे. अशा वेळी या गीताची परत तीव्रतेने आठवण होते आणि मन आपल्याशीच गाऊ लागते

कोण पुरी करणार ? तयांची ! कोण पुरी करणार ?
मनीषा ! कोण पुरी करणार ?
स्वातंत्र्यास्तव शिर तळहाती
घेऊन लढले त्यातच अंती
लढता लढता धारातीर्थी
पडले जे नरवीर ! तयांची ! कोण पुरी करणार !
मनीषा ! कोण पुरी करणार ?



मातृभूमिच्या दास्यशृंखला
सजले चेवुनी तोडायाला
परंतु चढले जे फासाला
क्रांतिकारक वीर ! तयांची ! कोण पुरी करणार ?
मनीषा ! कोण पुरी करणार ?

जन्मठेप ती भोगी कोणी
भोगितसे कुणि काळे पाणी
सजा अशा या देशाकारणी
झाल्या ज्यांना प्यार ! तयांची ! कोण पुरी करणार ?
मनीषा ! कोण पुरी करणार ?

आणिक तैसे किती हुतात्मे
सत्याग्रही अन् दृढनिश्चयी ते
मातृभूमिच्या पदकमलाते
ठेवून गेले शीर ! तयांची ! कोण पुरी करणार ?
मनीषा ! कोण पुरी करणार ?

या सर्वांचे आत्मे सारे
पिशाच्च होवुनि फिरती बा रे
मातृभूमिच्या भवताली रे
मुक्ती कोण देणार ? तयांना ! मुक्ती कोण देणार ?
मनीषा ! कोण पुरी करणार ?

**-कै. चामुंडराय पाटील**

* * * *

**१६**

# वाळवा-इस्लामपूर रस्ता डांबरी करणेस साराबंदी आंदोलन

वाळवा गावची भौगोलिक परिस्थिती अशी आहे की, पूर्वेस कृष्णा नदी आणि बाकी तिन्ही दिशांनी वाहणाऱ्या ओढ्यांच्या बेचक्यात हे गाव वसले आहे. आष्टा–सांगलीस जाणेसाठी पडवळवाडीपर्यंत कच्चा रस्ता होता. पण ८ मैलांवरील इस्लामपूरला, जाण्यासाठी कच्चा रस्ता ही इतका खराब होता की एस टी मध्ये पाठीमागील बाकावर बसलेल्या बाईबापड्यांच्या मांडीवरील मुल रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मांडीवरुन उडून पडत असे. वयोवृध्दांची अवस्था याहून बिकट होत असे. पावसाळ्यात पूर आलेनंतर तोही चिखलाचा रस्ता बंद होई व वाळव्याची स्थिती बेटावरील गावासारखी होत असे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये क्रांतिकारकांचे गाव म्हणून ब्रिटीश सत्तेतील अधिकारी वाळवा–इस्लामपूर रस्त्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून डोळेझाक करीत होते. परंतु १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर काँग्रेस सरकारने हेतु पुरस्सर दुर्लक्ष केल्यामुळे स्वातंत्र्यानंतर २४ वर्षे झाली तरी वाळवा–इस्लामपूर रस्ता डांबरी करण्यास देशी सरकारला सवड झाली नव्हती. जनता अडचणी सहन करीत होती आणि राजकीय नेते मुद्दाम दुर्लक्ष करीत होते.

नागनाथ अण्णा हे सर्व पहात होते आणि अनुभवत होते. वाळवा गावच्या सर्व शेतकरी बंधूंना त्यांनी एकत्र बोलावून वाळवा इस्लामपूर रस्ता डांबरी करण्यास सरकारला भाग पाडण्यास म.गांधींचा सत्याग्रही मार्ग सुचवला. जोपर्यंत वाळवा–इस्लामपूर रस्ता डांबरी होत नाही तोपर्यंत वाळव्याच्या शेतकऱ्यांनी शेतसारा भरण्यास नकार दिला. त्यासाठी आंदोलन सुरु केले. त्यामध्ये सर्व शेतकरी एकदिलाने सहभागी झाले. साराबंदी चळवळ सुरु झाल्याबरोबर पोलिसांच्या तुकड्यांनी दमदाटी देण्यास सुरवात केली. त्याला न घाबरता हजारो पुरुष व स्त्रिया पोलिसांच्या दडपशाही व जप्तीच्या धमक्याना भीत नव्हती.



स्वातंत्र्य चळवळीच्या काळात गुजरातमधील बार्डोली तालुक्यातील शेतकऱ्यांनी अशा प्रकारचे साराबंदी आंदोलन केले होते. स्वातंत्र्याच्या काळात महाराष्ट्राच्या मागणीसाठी सीमा भागातल्या जनतेने साराबंदी चळवळ केली होती. न्याय्य मागण्या मंजूर करून घेण्यासाठी तशी ही चळवळ वाळव्याच्या शेतकऱ्यांनी सुरु केली होती. सरकारने वाळवे गावाला पोलीस छावणीचे स्वरुप यावे इतक्या मोठ्या संख्येने पोलीस आणून ठेवले होते. जनतेवर सारा भरण्यासाठी दबाव आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पुरुष व बाया बापड्या लहान मुलांना कडेवर घेऊन हजारोंच्या संख्येने वाळव्याच्या रस्त्यावरुन जागृती फेऱ्या काढल्या होत्या. गावात पोलिसांना कसलीही कोणतीही वस्तू मिळत नव्हती. अशा या चळवळीत क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांचे बरोबर नागनाथ अण्णांच्या पत्नी सौ. कुसुमताई नायकवडी व कन्या विशाखा याही इतर महिलांचे बरोबर चळवळीत सहभागी असत.

या साराबंदी चळवळीत क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या मातोश्री क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई नायकवडी यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. एका स्थानिक पुढाऱ्याने पोलिसांचे मदतीने शेतसारा न दिलेल्या शेतकऱ्यांच्या घरावर छापा घालून भांडी–कुंडी जप्त करण्याचे प्रकार सुरु केले. ते आणीबाणीचे दिवस होते. एके दिवशी आंदोलनाच्या काळात पोलिस गावांत आले. सौ. लक्ष्मीबाई नायकवडी यांनी झटपट गावातील बायकांना जमविले आणि चावडीत आलेल्या पोलिसांना घेरावच घातला. शेतकऱ्यांची जप्त केलेली भांडी–कुंडी परत केल्याशिवाय सोडणार नाही, अशी भूमिका घेतली. यामध्ये तुम्हाला तरी मारु किंवा आम्ही तरी मरु असाच डाव टाकला होता. अखेर पोलिसांनी जिल्हा प्रमुखांशी संपर्क साधला. त्यांनी त्यावेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचेशी संपर्क साधला. ना. शंकरराव चव्हाण यांनी हे आंदोलन आणिबाणी विरोधी नाही तेव्हा जप्त केलेली भांडी परत करावीत आणि माफी मागून परत या असा आदेश बजावला तेव्हा कोठे पोलिसांची सुटका झाली. जप्त केलेली शेतकऱ्यांची सर्व भांडी–कुंडी वाजत गाजत लोकांनी ज्यांची त्याला परत केली.

रस्ता आंदोलन काळातील तणावाच्या प्रसंगाबद्दल सांगताना किर्लोस्कर ब्रदर्स कारखान्याचे मॅनेजर पी. डी. गुणे सांगतात की, ''सांगलीचे कलेक्टर श्री. अय्यर व डी. एस्. पी. श्री. व्यंकटाचलम हे नेहमी किर्लोस्करवाडीला येत असत. त्यामुळे त्यांचेशी मैत्रीचे संबंध झाले होते म्हणून एक दिवशी ते श्री. गुणे यांना म्हणाले, 'क्रांतिवीर नागनाथ अण्णांची व तुमची लहानपणापासून मैत्री आहे तर आमचेसाठी त्यांची भेट घडवून द्या. कारण आम्ही सर्व माहिती गोळा केली आहे व अशी खात्री झाली की विरोधकाचे गाव म्हणून वाळव्यावर खरोखरच अन्याय झाला आहे व तो आम्हाला दूर करावयाचा आहे. पण त्याकरिता वाळवा येथे नागनाथ अण्णा यांची गाठच पडत नाही. ती भेट घडवून आणण्याचे प्रयत्न कराल काय?' त्या प्रमाणे श्री. गुणे क्रांतिवीर नागनाथ अण्णांना भेटले व कलेक्टर आणि डी.एस्.पी. यांची भेट किर्लोस्करवाडीत घेतली. त्या भेटीत कलेक्टरने प्रथमच सांगून टाकले की, 'तुमच्या गावावर अन्याय झाला आहे तो आम्ही दूर करून रस्ता तयार करुन देणेस तयार आहोत.' त्यावर श्री. नागनाथ अण्णांनी ताबडतोब सांगून टाकले की ज्या दिवशी रस्ता आमच्या ताब्यात येईल त्या दिवसापासून तीन महिन्यात आम्ही तुमचा सारा भरुन टाकू. दोघांनीही शब्द पाळले आणि रस्ता डांबरी झाला व शेतकऱ्यांनी सारा भरला.''

पण या रस्ता आंदोलनामुळे क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांना वाळव्याच्या सर्वांगिण विकासाचा रस्ता सापडला व त्याद्वारे त्यांनी वाळवा येथे शेतकऱ्यांच्या फायद्याच्या विविध विकास योजना सुरु केल्या व त्या यशस्वी करुन दाखविल्या.

या साराबंदी चळवळीबद्दल नागनाथ अण्णा सांगतात, ''अशा चळवळीबद्दल माझा अनुभव सांगतो. वाळव्याच्या शेतकऱ्यांनी २५ फेब्रुवारी ७१ नंतर रस्त्यासाठी साराबंदी चळवळ केली. चार वर्षे शेतसारा दिला नाही. गावातील ७ जण फक्त शेतकऱ्यांची बाजू सोडून गेले याचं दुःख आहे. बाकीच्यांनी हे काम इतकं धसाला लावलं की दोन दोन हजार स्त्रिया, दोन दोन हजार पुरुष मोर्चात असायचे. ज्या दिवशी पोलिस फौज जास्त त्या दिवशी स्त्रिया जास्त, पुरुष जास्त. आनंदाने सांगण्याची गोष्ट म्हणजे माझ्या अगोदरची पिढी म्हणजे माझी आई, स्त्रियांमध्ये आघाडीवर असावयाची. माझी पिढी म्हणजे माझी बायको त्यांच्यात आघाडीवर असावयाची, पुढील पिढी म्हणजे माझी मोठी मुलगी त्या आघाडीत असावयाची. म्हणजे माझ्या घरच्या तीन पिढ्यातील स्त्रियांनी भाग घेतला होता. स्त्रियां गोषा फेकून देऊन चळवळीत उतरल्या. पुरुषांनीही प्रचंड सहभाग घेतला. इतकं जोरात आंदोलन झालं आणि सरकारला नमावं लागलं व सरकारने डांबरी रस्ता करुन दिला.'' डांबरी रस्त्यासाठी सुरु असलेले आंदोलन सुमारे चार वर्षे चालले होते. नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखालील आंदोलन यशस्वी झाले. वाळवा गावच्या जनतेची अनेक वर्षाची अडचण दूर झाली.

याच काळात कृष्णा नदीचे पाणी उन्हाळ्यात कमी झाल्यावर शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी कमी पडत असे. त्यावर उपाय म्हणून नागठाणे येथे कोल्हापूर पध्दतीचा कृष्णा नदीवर बंधारा बांधण्याची मागणी बरीच वर्षे नागनाथ अण्णा शेतकऱ्यांचे वतीने करीत होते. डांबरी रस्ता आंदोलन करुन मिळविला. तसेच आंदोलन बंधारा होण्यासाठी होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाने नागठाणे गावाजवळ कृष्णा नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यास मंजुरी दिली. त्या बंधाऱ्याचे बांधकाम नागनाथ अण्णांचे कोल्हापूरचे स्नेही कॉन्ट्रॅक्टर श्री. शंकरराव नलवडे यांनी ठरावीक वेळेत पुरे करुन दिले. आज या बंधाऱ्यामुळे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यासाठी पुरेसा ऊस पिकविण्यासाठी पाणी मिळाले. शिरगांव गावाचा रस्त्याचा प्रश्न काहीअंशी सुटला.

कृष्णा नदीवर नागठाणे येथे झालेल्या बंधाऱ्यामुळे आज हुतात्मा कारखान्याने सहकार्य केलेल्या लहान मोठ्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहेत. त्यामुळे नदी काठची हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यासाठी व दुसऱ्या सहकारी साखर कारखान्यासाठी पुरेसा ऊस उत्पादन होत आहे. पावसाळ्यात कृष्णा नदीला पूर यायचा तर धोम धरणात पाणी अडविल्यामुळे उन्हाळ्यात नदी कोरडी पडायची, परंतु नागठाणे बंधाऱ्यामुळे बारा महिने नदीत पाणी साठू लागल्याने नदीकाठच्या हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावच्या शेतकऱ्यांना बारमाही पाणी उपसा जलसिंचन योजनामुळे मिळू लागले आहे.

* * * *



# १७

# किसान लिफ्ट पाणीपुरवठा योजना नं. १ व इतर योजना

शेतामध्ये खात्रीचे नगदी पीक घेणेचे असेल, शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान सुधारणेचे असेल, तर शेतीला खात्रीचे बारमाही पाणी उपलब्ध व्हायला हवे, हे ओळखून वाळव्यातील साधेसुधे शेतकरी लिफ्ट इरिगेशनचा विचार करु लागले. यामध्ये अण्णांचे लहान बंधू शामराव रामचंद्र नायकवडी (आप्पा), रामजी पाटील (नाना), काका माळी, भगवान शेळके, आकाराम कृष्णा जाधव, किसन धोंडी अहिर, शिवाजी नायकवडी, पांडूरंग गावडे (देव), इत्यादी शेतकरी एकत्र आले. त्यांनी १०० एकरांपर्यंतचे उद्दिष्ट ठरवले होते. संस्था रजिस्ट्रेशन, पाणी परवाना मिळवणे महत्वाचे होते म्हणून आई सौ. लक्ष्मीबाई नायकवडी यांनी स्वत: अण्णांच्या कानावर ही गोष्ट घालण्यासाठी आल्या. त्यावेळी शिक्षण संस्थेच्या कामा संदर्भात शाळेच्या ऑफीसमध्ये महंमद (भाई) चाऊस, शंकरराव परुळेकर (आप्पा), सखाराम घोरपडे (काका), दत्ता शेळके, जयवंत अहिर, हवलदार सर, इत्यादीशी अण्णा चर्चा करत होते. आई म्हणाल्या ''शामराव आप्पा व काही शेतकरी इरिगेशन करत आहेत. त्यांना मदत करा.'' अण्णांनी सर्व परिस्थितीचा विचार करुन दोन चार दिवसातच या शेतकऱ्यांची बैठक घेतली व या इरिगेशनचा फायदा जास्त शेतकऱ्यांना व्हावा म्हणून ४५० एकर क्षेत्राच्या स्किमची कल्पना मांडली. शेतकऱ्यांची व्यापक बैठक झाली. सर्व शेतकऱ्यांनी महंमद (भाई) चाऊस यांना किसन लिफ्ट इरिगेशनचे चिफ प्रमोटर केले. त्या काळात वाळव्याचे पुष्कळ शेतकरी आपला विहीर बागाईती ऊस रेठऱ्याच्या कृष्णा सहकारी साखर कारखान्यास पुरवत होते. त्यातून कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे व वाळव्याच्या शेतकऱ्यांचे चांगले संबंध होते त्याचा फायदा इरिगेशनच्या कामात झाला. मा. अण्णांनी काही शेतकऱ्यांच्या सोबत जयवंतराव भोसल्यांची भेट घेतली त्यांनी कारखान्याच्या वतीने इरिगेशन स्किमचा सर्व्हे करुन देण्याचे मान्य केले. श्री. साळुंखे साहेब (सिव्हिल इंजिनिअर), श्री. मिठारे (इलेक्ट्रीकल इंजिनिअर) व श्री. पितांबरी साहेब यांनी याकामी सर्वोतोपरी सहकार्य

केले. नंतर योग्य त्या कागदांची पूर्तता करुन सांगली जिल्हा भूविकास बँकेकडे कर्जासाठी प्रकरण केले. त्यावेळी म्हैसाळचे श्री. आबासाहेब शिंदे भूविकास बँकेचे अध्यक्ष होते. श्री. के. ए. बिरनाळे साहेब (व्यवस्थापक भू विकास बँक) या दोघांनी लक्ष घालून कर्ज मंजूर केले. तसेच गुप्ते साहेब (सांगली बँक) यांनीही लिफ्ट इरिगेशनला तात्पुरता अर्थ पुरवठा करुन सहकार्य केले. किर्लोस्कर ब्रदर्स, किर्लोस्करवाडी येथील मॅनेजर श्री. गुणे साहेब यांनी पंप, ट्रान्स्फॉर्मर ताबडतोब उपलब्ध करुन दिले, श्री. माने साहेब यांनी वीज मंडळाची कामे ताबडतोब पूर्ण केली. सिमेंट पाईप कारखान्यातून उत्तम प्रतीच्या सिमेंट पाईप्स् खरेदी केल्या आणि अवघ्या ८० दिवसात जवळ जवळ ३.५ किलोमीटर लांबीची पाईपलाईन पुर्ण करुन शेतामध्ये पाणी पडले. हे पाहिल्या नंतर शेतकऱ्यांचे ऊर आनंदाने भरुन आले. याचा फायदा हुतात्मा किसन अहिर कारखाना उभारणीस झाला. किसान लिफ्ट इरिगेशन नं. १ या पाणीपुरवठा योजनेमुळे ४५० एकरामध्ये बारमाही पाणी उपलब्ध झाले. याकामी पांडूरंग मूळीक, श्री. महादेव जाधव, वसंतराव पवार, श्री. दत्ता शेळके, श्री. जयवंत अहिर, श्री. जे. बी. पाटील, तुकाराम नाना खोत (वस्ताद) पडवळवाडी,पांडूरंग गावडे (देव), श्री. थोरात मिस्त्री, श्री. अंता ज्ञानू ढगे (काका), इस्लामपूरचे टॅक्सी ड्रायव्हर साहेब, गुलाब बागवान कराड टॅक्सी ड्रायव्हर इत्यादी लहान मोठ्या कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची शिकस्त केली. लाभधारक शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड भरपूर प्रमाणात केली.

या किसान लिफ्ट इरिगेशन नं.१ मुळे वाळवा परिसरातील सर्वच शेतकऱ्यांना पाणीपुरवठ्याचे महत्त्व कळाले. शेतीच्या मशागतीसाठी आता ट्रॅक्टरची गरज शेतकऱ्यांना भासली होती, त्यासाठीही नागनाथ अण्णांनी पुढाकार घेतला. किर्लोस्कर ब्रदर्सकडील ११ ट्रॅक्टर किर्लोस्कर कंपनीचे मॅनेजर श्री. गुणे साहेब यांचे सहकार्याने शेतकऱ्यांना मिळवून दिले. ट्रॅक्टर मिळाल्यामुळे शेतीची मशागत, खतांची वाहतूक वगैरेची कामे सुलभरीतीने व थोड्या वेळात होऊ लागली, शेतकऱ्यांचा उत्साह वाढला. आज या ११ ट्रॅक्टरनंतर वाळवा परिसरात शेकड्यांनी ट्रॅक्टर, ट्रॉली दिसत आहेत.

किर्लोस्कर ट्रॅक्टर्स या कंपनीने जर्मन डाईटस या कंपनीच्या सहकार्याने भारतात ट्रॅक्टर्स बनविले होते. श्री. पी. डी. गुणे या कंपनीचे डायरेक्टर होते. ट्रॅक्टर्सची विक्री वाढविण्याचा एक उपक्रम म्हणून बँक ऑफ इंडियाबरोबर करार करुन शून्य मार्जिन मनीची ट्रॅक्टर विक्रीची योजना तयार केली व किर्लोस्कर ब्रदर्सच्या गॅरेंटीवर वाळव्याच्या शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जाने ट्रॅक्टर्स देण्याचे योजले. अर्थात श्री. नागनाथ नायकवडी यांच्याबद्दल कर्ज परत फेडीची खात्री असलेमुळेच हे शक्य झाले आणि एके दिवशी वाळव्यात ११ शेतकऱ्यांचे ११ ट्रॅक्टर्स उभे राहिले. ९०० एकर भिजणाऱ्या जमिनीचे आधुनिक पध्दतीने शेतीची कामे ट्रॅक्टर्सच्या साहाय्याने झाली. शेतकऱ्यांनी बँक ऑफ इंडियाचे सर्व कर्ज यथावकाश न चुकता परतही केले. या योजना मांडण्यात श्री. पी. डी. गुणे यांनी पुढाकार घेतला, बँक ऑफ इंडियाचे अधिकारी श्री. तात्यासाहेब देशमुख यांनी सक्रिय पाठिंबा दिला व वाळव्याचे शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची सोय ट्रॅक्टर्समुळे श्री. नागनाथ अण्णांच्यामुळे उपलब्ध झाली.

किसान लिफ्ट इरिगेशन स्कीमसाठी सिमेंट पाईप व ट्रॅक्टरच्या टायर खरेदीसाठी स्कीमचे चेअरमन महंमदभाई चाऊस, सेक्रेटरी मुंढेकर, जयवंत अहिर यांना घेऊन मोटारने नागनाथ अण्णा कोल्हापूरला गेले होते. कावळ्याचे नाक्यावर गेले असताना तेथे माणसांची गर्दी होती. ती पाहून अण्णा जयवंत अहिर यांना म्हणाले, गाडी थांबव व गर्दी कशासाठी आहे ते पाहून ये. जयवंत अहिर गर्दीकडे गेले असता रस्त्याकडेच्या झुडुपात कपड्यात गुंडाळलेले



नुकतेच जन्मलेले एक मूल रडत होते ते पाहण्यास गर्दी झाली आहे हे सांगताच, अण्णा त्यांना म्हणाले ''जा घेऊन ये त्या मुलाला'' अण्णांनी ते मूल आपल्या शालीमध्ये घालून मांडीवर घेतले व थेट कोल्हापूरच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये गेले. तेथे त्या बेवारशी मुलाला घेण्यास पोलिसांची परवानगी घेतल्याशिवाय घेता येणार नाही असे डॉक्टर म्हणाले. त्यावर ताबडतोब ते मूल घेऊन अण्णा कावळा नाक्यावरील मिशन हॉस्पिटलमध्ये गेले. वस्तुस्थिती सांगितल्यावर लगेच नर्सेसनी त्या बेवारशी बालकास ताब्यात घेतले, त्याला उपचार करुन, दूध वगैरे देऊन शांत केले व सांगितले की जरुर पडल्यास चौकशीसाठी बोलावू. सरकारी यंत्रणेच्या दवाखान्यातील अमानवी वागणूक पाहून अण्णांना खूप वाईट वाटले. नंतर संध्याकाळी कोल्हापूराहून वाळव्यास परत आलेवर अण्णांनी त्यांच्या आईसाहेबांना ही हकीगत सांगितली. त्यावर क्रांतिमाता लक्ष्मीबाई म्हणाल्या, ''ते मूल दवाखान्यात कशाला दिलेस, घरी आणावयाला पाहिजे होते'' कारण त्या अण्णांच्या तर माता होत्याच, पण अभागी व अनाथांच्याही माता होत्या. काही दिवसांनी चौकशी करता कळले की त्या अनाथ मुलाला एका लक्षाधीश मुस्लीमाने दत्तक घेतले होते.

हुतात्मा किसन अहिर सहकारी कारखान्याचे मदतीने व सहकार्याने अनेक लिफ्ट इरिगेशन स्कीम सुरु झाल्या आहेत. आजपर्यंत हुतात्मा सहकारी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस विकास निधीतून ७, कारखान्याचा स्वनिधीतून १२, बँकांच्या मदतीतून ९, तांत्रिक व आर्थिक साहाय्यातून १२ अशा ४० लिफ्ट इरिगेशन स्कीममुळे जवळ जवळ ७,४५१ एकर बागायती क्षेत्राला पाण्याची सोय झाली आहे व त्या योजनांचा ३०१७ शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. त्यामुळे हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याला मुबलक ऊसाचा पुरवठा होत आहे. नागनाथ अण्णांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली वरील योजनांमुळे या परिसरातील शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे आर्थिक परिवर्तन घडले आहे.

* * * *



मा. नागनाथ (अण्णा) नायकवडी व किर्लोस्कर कंपनीचे मॅनेजर श्री. पी. डी. गुणे
हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखाना साईट वर

## १८

# क्रांतिसिंह नाना पाटील यांचा अखेरचा जीवन प्रवास वाळवा येथे चिरशांती

आदरणीय नागनाथ (अण्णा) नायकवडी यांचे आग्रहाखातर क्रांतिसिंह नाना पाटील वाळवा येथे हुतात्मा किसन अहिर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण समारंभाचे अध्यक्ष म्हणून २५.२.१९७१ रोजी आले होते. त्यावेळी क्रांतिसिंहांनी उपस्थित अफाट जनसमुदायाला हुतात्म्यांच्या जीवनापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे वय ७० च्या पुढे गेलेमुळे आता सार्वजनिक कार्यक्रमाच्या दौऱ्यावर प्रकृतीमुळे मर्यादा आल्या होत्या. म्हणून ते १९७२ पासून पंढरपूर येथील रामबागेतील श्री. पुरुषोत्तम रंगाचार्य यांचेकडे राहात होते. आचार्यांनी क्रांतिसिंहांची सर्व व्यवस्था आपल्या कुटुंबियांप्रमाणे केली, राहण्यासाठी स्वतंत्र खोली दिली, औषधपाणी दिले, सेवा केली होती. तसेच क्रांतिसिंहांना भेटावयास येणाऱ्या सर्वांचे अगत्याने आदरातिथ्य करीत होते.

नागनाथ अण्णांना मात्र क्रांतिसिंहांनी पंढरपूरच्या मठात रहावयास जावे हे काही पटले नव्हते. ते बेचैन झाले व एक दिवस अण्णांनी पंढरपूरला जाऊन क्रांतिसिंहांना भेटून आपली तळमळ व्यक्त केली. अण्णांनी क्रांतिसिंहांना वाळवा येथे येण्याचा आग्रह धरला. नागनाथ अण्णा म्हणाले, ''वाळवा येथे शेतकरी बंधू आपली सर्व व्यवस्था व सेवा करतील. क्रांतिसिंहांची सेवा करण्यात त्यांना आनंद वाटेल.'' त्यावर क्रांतिसिंह म्हणाले ''ठीक आहे काही दिवस येथे पंढरपुरात राहीन व काही दिवस वाळवा येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयात राहीन.'' नंतर काही दिवसांनी नागनाथ अण्णांनी पंढरपूरहून क्रांतिसिंहांना वाळवा येथे आणले. वर्षातून आठ महिने वाळवा येथे व चार महिने पंढरपूर येथे क्रांतिसिंह राहात असत. अधून मधून क्रांतिवीर अण्णा पंढरपूरला जाऊन क्रांतिसिंहांच्या तब्बेतीची चौकशी करत व कित्येकवेळा त्यांच्या



आवडीचे मक्याची कणसे, हरभऱ्याचे डहाळे, ओल्या भुईमूगाच्या शेंगा नागनाथ अण्णा कार्यकर्त्यांच्या करवी पोहच करत असत. क्रांतिसिंह राम बागेतील पुरुषोत्तम रंगाचार्य महाराजांच्या मळ्यात विश्रांती घेत असताना दररोज सकाळी फिरत असत. एके दिवस फिरत असताना त्यांच्या पायाच्या अंगठ्याला जखम झाली. त्यावर पुरुषोत्तम महाराजांनी खूप आयुर्वेद औषधोपचार केले पण जखम वाढत गेली. पुरुषोत्तम महाराजांनी अण्णांना फोन करुन पंढरपूरला बोलावून घेतले. सर्व परिस्थिती दाखवली हा आजार माझ्या उपचाराच्या अटोक्याबाहेर गेला आहे. आपण त्यांना एखाद्या चांगल्या डॉक्टरकडे उपचार करावेत असे सांगीतले. अण्णांनी ताबडतोब मिरज येथे डॉ. गायकवाड यांच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केले. डॉ. गायकवाड यांनी पायाच्या अंगठ्याला गँगरिन झाल्याचे निदान केले. ते म्हणाले 'ताबडतोब पायाचा अंगठा शस्त्रक्रिया करुन काढला पाहिजे' अण्णा म्हणाले ''शक्यतो अधिक चांगले औषधोपचार करुन जखम बरी झाली तर उत्तम' असेच कांही दिवस गेले. जखम वाढली गँगरिन घोट्यापर्यंत सरकला. शेवटी नाईलाजाने नातेवाईक व अण्णांनी पायावर शस्त्रक्रिया करण्यास परवानगी दिली. पिंढरीपासून पाय कापावा लागला. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. त्यावेळीच्या आठवणी सांगताना डॉ. आनंदराव गायकवाड यांच्या पत्नी माणिकताई गायकवाड सांगतात की 'नागनाथ अण्णा क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावर औषधोपचारासाठी लागेल तेवढा खर्च करीत. त्यांचे जेवण वाळव्याहून येई. नाना पाटील यांना मधुमेह असल्यामुळे सकाळी वेळेवर जेवण मिळावे म्हणून मी गरम जेवण पाठवीत असे. क्रांतिवीर नागनाथ अण्णा व त्यांचे सहकारी कार्यकर्ते श्री. आप्पा गायकवाड, अंता काका पाटील, वसंत पवार, सात्ताप्पा पुजारी, जयवंत अहिर, दत्ता शेळके, क्रांतिसिंहांची रात्रंदिवस सेवा करीत.' याच काळात डॉ. गायकवाड यांची लाडकी कन्या मीना हिचा विवाह डॉ. पडियाबरोबर ठरला होता. पण डॉ. गायकवाड यांनी क्रांतिसिहांच्या पायावरील शस्त्रक्रियेस प्राधान्य दिले व आपले कर्तव्य पार पाडले. सर्व सेवा मोफत केली डॉ. ओहळ, डॉ. दातार यांचीही खूप मदत झाली. क्रांतिवीर अण्णा आणि त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी डॉ. गायकवाड, डॉ. ओहळ, सौ. माणिकताई गायकवाड यांचा सत्कार केला.त्यांचे आभार मानले. क्रांतिसिहांची प्रकृती सुधारली त्यांना वाळव्यास आणण्यात आले. वाळव्यात क्रांतिसिहांचा मुक्काम हुतात्मा किसन अहिर विद्यालयात होता. त्यावेळी सात्ताप्पा पुजारी, ज्ञानू पेशवे हे कार्यकर्ते सतत त्यांच्या सेवेत असत क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी क्रांतिसिंहांच्या जेवण–खाण्याची काळजी घेत. क्रांतिसिंहांच्या पत्र व्यवहाराचे काम प्रकाश अहिर करीत असत, त्यांचे स्टेट बँकेतून पेन्शनचे पैसे आणून देण्याचे काम श्री. वसंत पवार पहात असत. तसेच क्रांतिसिहांना पंढरपूरला ने–आण करण्याची जबाबदारी श्री. जयवंत अहिर पार पाडत.या शिवाय चळवळीच्या काळातले असंख्य सहकारी व कार्यकर्ते त्यांना वाळव्यास येऊन भेटत असत. मा. ना. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, राजाराम बापू पाटील, रावसाहेब कळके यांनी भेट घेऊन क्रांतिसिंहांच्या तब्बेतीची विचारपुस केली. वाळवा येथे क्रांतिसिंहांचा मुक्काम असताना खास करुन एक वेळ विट्याच्या कार्यकर्त्यांनी क्रांतिसिंहांचा अमृत महोत्सव कार्यक्रम विटा येथे घेतला तेथे त्यांची भव्य मिरवणूक काढली पण त्यांच्या प्रकृतीला ही धावपळ पेलवली नाही त्यांना अस्वस्थ वाटू

लागले. ताबडतोब क्रांतिसिंहांचे जावई भगवानराव मोरे-पाटील यांनी मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. क्रांतिसिहांच्या भेटीसाठी त्यावेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी मिशन हॉस्पिटला भेट दिली. क्रांतिसिंहांच्या प्रकृतीची विचारपुस करुन क्रांतिसिंहांच्या औषधोपचार, दवाखान्याचा खर्च महाराष्ट्र शासना मार्फत केला जाईल असे जाहीर केले. या काळात अनेक सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच क्रांतिसिंहाचे जुने सहकारी, स्वातंत्र्य सैनिक त्यांना भेटण्यासाठी येत. बॅ. पी. जी. पाटील व सौ. सुमती पाटील, श्रीमती सरोजनी बाबरही भेटून गेल्या होत्या. क्रांतिसिंहांच्या भगिनी सौ. गंगुबाई नाथाजी लाड, नाथाजी लाड, सौ. हौसाबाई पाटील व जावई भगवानराव पाटील, जी. डी. लाड, सौ. विजयाताई लाड, श्री. एन. डी. पाटील, नागनाथ अण्णा व त्यांच्या मातोश्री सौ. लक्ष्मीबाई नायकवडी अशी मंडळी सततच क्रांतिसिंहांच्या जवळ असत. त्यावेळी श्री. आप्पा गायकवाड, अंता काका पाटील, वसंत पवार, श्री. सात्ताप्पा पुजारी, श्री. जयवंत अहिर व दत्ता शेळके यांना क्रांतिसिंहांच्या सेवेसाठी नागनाथ अण्णांनी ठेवले होते. किरकोळ खर्च व औषधाची सर्व सोय नागनाथ अण्णांनी केली होती. क्रांतिवीर नागनाथ अण्णांची तळमळ त्यावेळी शब्दात वर्णन न करण्याइतकी गंभीर झाली होती.

क्रांतिसिंह नाना पाटील मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये विकलांग अवस्थेत असताना त्यांना भेटावयास आलेल्या प्रा. बाबूराव गुरव व कार्यकर्त्यांना म्हणाले ''मी मृत्यूला अनेक वेळा चकविले. आता ते शक्य नाही. आम्ही आयुष्यभर ज्या प्रवृत्तीशी झुंजलो त्या तशाच आहेत. खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याच्या शोधाचा लढा अधिक तीव्र करा. भांडवलशाही शोषण, गुलामी नाहीशी करा! अज्ञान, दारिद्र्य, विषमता, अंधश्रध्दा, अनारोग्य आणि व्यसन अशा समाजशत्रूंचा निःपात करा! स्त्रिया, दलित यांना सत्ता मिळाली पाहिजे. जाती संपेपर्यंत लढले पाहिजे, तुम्हांला खरे खुरे स्वातंत्र्य मिळवावयाचे असेल तर संत तुकारामाच्या रांगड्या भाषेत महात्मा फुले, कार्ल-मार्क्स यांचे विचार कष्टकरी वर्गात पेरा. मी जात सोडीन पण कष्टकऱ्यांची धरलेली पात सोडणार नाही अशी प्रतिज्ञा करा! लढत रहा! विजय आपलाच आहे.'' नागनाथ अण्णा जीवनभर क्रांतिसिंहांच्या आदेशाचे व अपेक्षांचे पालन करीत आहेत.

डॉक्टर शर्थीचे प्रयत्न करुन वैद्यकिय उपचार करत होते. क्रांतिवीर नागनाथ अण्णा व सर्व कार्यकर्ते त्यांची काळजी घेत होते पण सोमवार दि. ६ डिसेंबर १९७६ रोजी दुपारी १.४५ मिनिटांनी क्रांतिसिंहांचा आत्मा अनंतात विलीन झाला. नागनाथ अण्णा त्यावेळी सोलापूरमध्ये काही कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांना ताबडतोब बोलावणेत आले. तोपर्यंत वसंतदादा पाटील व सांगलीच्या नेत्यांनी क्रांतिसिंहांचा अंत्यविधी कृष्णाकाठी सांगलीत करण्याचे योजले होते. दि. ७ डिसेंबरला क्रांतिसिंहांचा देह कॉंग्रेस हाऊसच्या पाठीमागील पॅव्हेलियनमध्ये जनतेसाठी दर्शनास ठेवला होता. सांगली जिल्ह्यातील व सर्व महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक, साहित्यिक, सर्वपक्षीय राजकीय नेते, क्रांतिसिंहाचे मित्र, सहकारी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु बॅ. पी. जी. पाटील, कर्मवीरांचे चिरंजीव आप्पासाहेब पाटील, कुंडल, हणमंत वडिये,पारे, वाळवा, इस्लामपूर, येडेमच्छिंद्र येथील नातेवाईक व कार्यकर्ते लाखाच्या संख्येने दर्शनास आले होते.



शोकसभेत वसंतदादा पाटील, भगवानराव पाटील, संपतराव माने, नागनाथ अण्णा, नाथाजी लाड, दाजिबा देसाई, जी. डी. लाड, वाय. सी. पाटील, डॉ. आर. बी. मोरे, कॉ.पानसरे, भाई भगवानराव सूर्यवंशी, एन. डी. पाटील, बॅ. पी. जी. पाटील, कॉ. बापूराव जगताप यांची कन्या बी. के. पडवळकर वगैरेंनी शोकसभेत भाषणे देऊन क्रांतिसिंहांना श्रध्दांजली वाहिली.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी सांगली येथे क्रांतिसिंहांचा अंत्यविधी करण्यास विरोध केला व वाळवा येथेच अंत्यविधी करणार असा आग्रह धरला. त्यानुसार क्रांतिसिंहांचा पार्थिव देह एका उघड्या ट्रॉलीवर तिरंगी व लाल बावट्यात लपेटून ठेवला होता. अंत्ययात्रा सांगलीहून निघून वाटेतल्या गावातील लोकांना दर्शन देत इस्लामपुरात फिरुन नंतर वाळव्यात हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे आवारात आली. तेथे क्रांतिसिंहांच्यावर अंत्य संस्कार करण्यात आले. क्रांतिसिंहांचे पुतणे बाबूराव यांचे हस्ते मंत्राग्नी देण्यात आला. त्यावेळी हजारो लोकांनी क्रांतिसिंहांना मानवंदना देऊन शोक व्यक्त केला. क्रांतिसिंहांच्या रक्षा विसर्जनासाठी सुध्दा वाळवा येथे हजारो लोक आले होते. त्या दिवशी नागनाथ अण्णांनी आलेल्या हजारो लोकांची जेवण्याची व्यवस्था केली होती. तसेच क्रांतिसिंहांच्या दशक्रिया विधी व उत्तरकार्य विधीपूर्वक नागनाथ अण्णांनी भव्य प्रमाणात केले होते. क्रांतिसिंहांना आपले दैवत मानणाऱ्या क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी स्वातंत्र्यसंग्रामात क्रांतिसिंहांच्या नावाने अनेक चळवळी केल्या. प्रतिसरकार स्थापले व चालविले, त्याच नेत्याच्या अंत्यविधीची व्यवस्था आपल्या वाळवे गावातच करुन आपल्या नेत्याला खरीखुरी श्रध्दापूर्वक श्रध्दांजली वाहिली होती. पित्यासमान अखेरचे सर्व विधी केले होते, क्रांतिसिंहांच्या आत्म्याला शांती मिळालीच असेल असे सर्व जनतेला विश्वास वाटला होता व वाटत आहे.

नागनाथ अण्णांनी क्रांतिसिंहांच्या जीवनामध्ये अनेक गंभीर प्रसंगात जशी क्रांतिसिंहांना साथ दिली तशीच अखेरच्या क्षणीही. ते श्रीरामचंद्रांच्या हनुमानाप्रमाणे त्यांच्या साथीत राहिले होते. असे चित्र इतिहासात प्रथमच घडले होते. त्यावेळी प्रश्नांना उत्तर देताना ते सांगत की, 'मी वाळव्याच्या नागनाथ नायकवडीच्याच सानिध्यात जाणार व राहणार,' त्याप्रमाणे ते वाळव्यात राहिले व शेवटी इथेच चिरनिद्रा घेतली हे वाळवा गावचे सौभाग्य म्हणावयास हरकत नाही. क्रांतिसिंहांचा अंत्यविधी नागनाथ अण्णांच्या आग्रहामुळेच वाळवा येथे झाला. त्यांच्या स्मृतीचे जिवंत स्मारक म्हणून नागनाथ अण्णांनी लगेच वाळवा येथे क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय जून १९९२ मध्ये सुरु करुन भावी पिढीला क्रांतिसिंहांचे प्रेरणादायी स्मारक उभे केले आहे.

नागनाथ अण्णांच्या अनेक दैवतांपैकी दोन दैवते कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) व क्रांतिसिंह नाना पाटील. या दोन्ही महान पुरुषांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नागनाथ अण्णांनी शक्य ते सर्व प्रयत्न केले होते. नागनाथ अण्णा म्हणत असत की, कर्मवीर अण्णा व क्रांतिसिंह अण्णा ही सांगली जिल्ह्याची दोन दैवते आहेत. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर अण्णांना ज्येष्ठ गुरुबंधू मानत होते. या दोन महान पुरुषांच्या जीवनामध्ये योगायोगाने अनेक समान घटना घडल्या होत्या. कर्मवीरांच्या पित्याचे गाव वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक होते व भाऊराव पाटलांचा जन्म त्यांच्या आजोळी म्हणजे हातकणंगले तालुक्यातील

कुंभोज या गावी २२.९.१८८७ रोजी झाला. कुंभोज हे गाव जैनधर्मियांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. त्याच प्रमाणे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पित्याचे गाव वाळवे तालुक्यातील येडेमच्छिंद्र होते व नाना पाटील यांचा जन्म आपल्या आजोळी म्हणजे वाळवे तालुक्यातील बहे या गावी ३ ऑगष्ट १९०० रोजी झाला. बहे हे रामलिंगाचे प्रसिध्द स्थान आहे. कर्मवीर व क्रांतिसिंह हे दोन्हीही सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यातील सुपुत्र आहेत.

कर्मवीर जैन धर्मातील शेतकरी कुटुंबात जन्मले होते. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील हे वारकरी पंथाच्या शेतकरी कुटुंबात जन्मले होते. दोघांनीही आपल्या जीवनात चरितार्थासाठी नोकऱ्या केल्या होत्या. भाऊराव पाटील यांनी किर्लोस्कर ब्रदर्समध्ये फिरता विक्रेता म्हणून नोकरी केली होती. तसेच नाना पाटील यांनी गाव कामगार तलाठी म्हणून वाठार ता. कराड येथे नोकरी केली होती. दोघांचेही वरिष्ठांशी पटले नाही म्हणून नोकरी सोडून दिली होती. कर्मवीर अण्णांनी वाळवे तालुक्यातील नेर्ले येथे बोर्डिंग सुरु करुन शैक्षणिक क्षेत्रात रयत शिक्षण संस्थेद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात प्राथमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये सुरु करुन महात्मा फुले व शाहूमहाराज यांच्यानंतर खूप मोठी शैक्षणिक क्रांती केली होती. केंद्र शासनाने पद्मभूषण पुरस्कार देऊन गौरव केला होता. क्रांतिसिंह नाना पाटील सरकारी नोकरी सोडून राजकारणात पडले. महात्मा गांधींच्या आदेशाप्रमाणे सत्याग्रह करुन शिक्षा भोगली. पुढे १९४२ च्या क्रांतिसंग्रामामध्ये सातारा जिल्ह्यामध्ये प्रतिसरकार स्थापले होते. लोकांनी निवडून देऊन लोकसभेत दोन वेळा पाठविले होते.

कर्मवीर व क्रांतिसिंह हे दोघेही जीवनभर समाजप्रबोधनासाठी समाज उन्नतीसाठी झटले होते. अंगिकारलेल्या कर्तव्य निष्ठेमुळे दोघांचेही कुटुंबाकडे दुर्लक्ष झाले होते. दोघांनीही महाराष्ट्रामध्ये आदरणीय असे स्थान मिळवले होते. शेवटी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे दुःखद निधन ससून हॉस्पिटल, पुणे येथे दिनांक ९ मे १९५९ रोजी दुपारी १ वाजून १० मिनीटानी झाले. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांचे दुःखद निधन मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये दि. ६ डिसेंबर १९७६ रोजी दुपारी १ वाजून ४५ मिनीटाने झाले.

कर्मवीर भाऊराव पाटील 'अण्णा' व क्रांतिसिंह नाना पाटील 'अण्णा' या दोन वाळवा तालुक्यातील सुपुत्र महामानवांचे आशीर्वाद नागनाथ 'अण्णांना' मिळाले होते. या तीन अण्णांनी शिक्षण, राजकारण व सहकार क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी करुन महाराष्ट्राचा इतिहास घडवला आहे.

दिनांक ६ ऑक्टोबर १९९८ रोजी अंकलखोप येथे हुतात्मा भगतसिंग जयंती कार्यक्रमप्रसंगी बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले ''हुतात्मा भगतसिंग, क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला. तर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयतेच्या शिक्षणासाठी आपले आयुष्य घालविले. नाना पाटील व भाऊराव पाटील हे सांगली जिल्ह्याची खरी दैवते आहेत. त्यांच्या विचाराची जोपासना तरुण वर्गाने केली पाहिजे. थोरांचे विचार आत्मसात करुन अन्यायाविरुध्द झटले पाहिजे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी शिक्षण मिळाले पाहिजे, शेतकरी व विद्यार्थ्यांची राजकारणी लोक फसवणूक करीत आहेत.'' त्यानंतर दिनांक ५ डिसेंबर



२००१ रोजी न्यू इंग्लिश स्कूल बेडग येथील कर्मवीर जयंती निमित्त कार्यक्रमात बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''आदर्श विद्यार्थी व आदर्श संस्कार देण्याचे कार्य शिक्षण करीत असते. खेड्यातील मुलांच्या शिक्षणासाठी कर्मवीरांनी शाळा काढल्या आणि शिक्षणाची गंगा सर्वत्र पोहचवली. अण्णा नसते तर आज खेड्या-पाड्यातील जनता शिक्षणापासून वंचित राहिली असती.

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी साताराच्या प्रतिसरकारचे धाडसी व क्रांतिकारी नेतृत्व केले नसते तर कदाचित आपण स्वातंत्र्याची फळे चाखू शकलो नसतो.''

* * * *




हुतात्मा किसन अहिर पुतळा उद्घाटन प्रसंगी भाषण करताना क्रांतिसिंह नाना पाटील उपस्थित मा. नागनाथ अण्णा, कॉ. दत्ता देशमुख, मा. वसंत दादा पाटील, मा. यशवंतराव चव्हाण व मान्यवर.

# ११

## फासेपारधी पुनर्वसनाचा प्रणेता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील २८० गुन्हेगार जमातींना स्वातंत्र्यानंतर १९५२ साली गुन्हेगार कायद्यातून मुक्त केले. तत्पूर्वी इंग्रजांनी या देशातील २८० जमातींना गुन्हेगार जाती ठरवून त्यांचेसाठी १८७१ साली कायदा केला होता. त्या अन्वये गुन्हेगारांच्या पोटी जन्माला आलेल्या बालकालाही गुन्हेगार ठरविले होते. एका गावाहून दुसऱ्या गावास जाताना त्या गावच्या पोलिस पाटालाचा चांगल्या वर्तणुकीचा दाखला घेऊन जावे लागे. शेकडो वर्षांच्या गुलामगिरीतून या जमातींना मुक्त करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अन्यायी व जुलमी कायदा नष्ट करुन फासेपारधीसारख्या जमातींना मुक्त केले. स्वातंत्र्यानंतर या समाजाकडे माणूस म्हणून कोणी पाहिलेच नाही, ही हिंदू धर्मातील शोकांतिका होय.

अशा पार्श्वभूमीवर क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी पारधी समाजाच्या प्रश्नांत १९७५ च्या सुमारास लक्ष घातले. एका दृष्टीने पारधी समाजावर प्रकाश टाकण्यासाठी स्वयंभू सूर्यच उगवला होता. त्यांनी पारध्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. त्याचबरोबर इतरांना बदलायला भाग पाडले.

वास्तविक पाहता राजर्षी शाहू महाराजांनी कृतीने जनतेला असे दाखवून दिले होते की, संस्थांनी कामकाजात नेमलेले फासेपारधी इतरांपेक्षा कितीतरी पटीने प्रामाणिकपणे काम करतात. त्यांचीच प्रेरणा घेऊन क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी वाळवा येथे फासेपारधींना आश्रय दिला. त्यांना माणसासारखे वागविले. त्यांना रोजगार देऊन पोटापाण्याची सोय करुन दिली. क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या जीवनातील फासेपारधी समाजाच्या पुनर्वसनाचे सामाजिक कार्य खूप महत्त्वाचे व ऐतिहासिक म्हणावयास पाहिजे. परंतु समाजातील काही हितशत्रूंनी कौतुक



करण्याऐवजी टीकाही केली होती. पण तिकडे अण्णांनी दुर्लक्ष केले होते.

फासेपारधी म्हटले की गुन्हेगारी जमात. स्वत:चे आणि कुटुंबाचे पोट भरण्यासाठी लहान मोठ्या चोऱ्या करावयाच्या, वेळ प्रसंगी आडवे येतील त्यांचा खून करावयाचा असे वर्णन या समाजाबद्दल करीत असत. अण्णांनी ही वस्तुस्थिती बदलण्याचा जिद्दीने प्रयत्न केला. वाळव्याच्या किसान शिक्षण संस्थेत तरुणांना नोकऱ्या दिल्या. त्यांच्या अनेक पिढ्यांमध्ये शिक्षण घेतले नव्हते. किंबहुना त्यांचा शिक्षणाचा हक्कच समाजव्यवस्थेने हिरावून घेतला होता. तो त्यांचा माणूस म्हणून हक्क अण्णांनी त्यांना दिला. फासेपारधी समाजातील मुले हुतात्मा किसन अहिर विद्यालयात शिक्षण घेऊ लागली. त्यामुळे ही जमात स्थिर होऊ लागली.

उदाहरण द्यायचे झाल्यास, पारधी समाजाच्या श्रीमती चंद्राबाई लंगड्या पवार, सुकना लोमट्या काळे, भिमऱ्या किसन पवार, रचना बांगड्या पवार यांना नागनाथ अण्णांनी किसान शिक्षण संस्थेत नोकरीस घेतले. त्या समाजापैकी जितेंद्र अंकुश काळे, प्रतिका लंगड्या पवार, रणजित गिलट्या पवार, सौ. प्रवेशा विजयकुमार पवार (डी.एड.) यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

महत्त्वाचे ऐतिहासिक सामाजिक कार्य म्हणजे पारधी समाजाचे पुनर्वसन करण्याची चळवळ नागनाथ अण्णांनीच महाराष्ट्रात प्रथम सुरु केली. परिणामाची, टिकेची पर्वा न करता चिकाटीने व जिद्दीने नागनाथ अण्णांनी हे कार्य केले आहे. हुतात्मा किसन अहिर विद्यालयामधील शिक्षक मधुकर वायदंडे हे अण्णांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जानेवारी २००३ पासून आदिवासी पारधी हक्क अभियान चालवित आहेत. पारधी समाजाविषयीचे नागनाथ अण्णांचे योगदान फार मोठे आहे हे दुर्लक्षून चालणार नाही.

यानंतर दलित महासंघाच्या माध्यमातून पारधी हक्क अभियानाद्वारे प्रवाहाबाहेर राहणाऱ्या पारध्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न मधुकर वायदंडे करीत आहेत. एक गाव एक पारधी कुटुंब अशी पारधी अभियानाची भूमिका होती. भूतपूर्व सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हणमंतराव पवार यांनी सांगली जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांना पारधी कुटुंबांच्या प्रश्नात लक्ष घालण्यास सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गावागावात झालेल्या ग्रामसभेत पारधी पुनर्वसनाची चर्चा झाली व वाळवा तालुक्यातील कार्वे, ऐतवडे बुद्रुक, ढगेवाडी, ठाणापुडे, वशी, नरसिंहपूर, शिरटे, कोळे, बहे, साखराळे, कासेगाव, शेणे, नागाव, गोटखिंडी, बावची, वाटेगाव, वाळवे, कुरळप, ऐतवडे खुर्द, चिकुर्डे, इटकरे, डोंगरवाडी, शेखरवाडी या २३ गावातील ग्रामसभेने पारधी कुटुंबांना गायरान व सार्वजनिक ठिकाणी जागा दिल्या आहेत. पारधी त्या ठिकाणी झोपड्या बांधून राहात आहेत. भिक्षा मागून गावचे रक्षण करीत आहेत.

पारधी हक्क अभियानाद्वारे मागणी करीत आहेत की पारधी समाजाला कसायला जमीन द्या, शिधा पत्रिका द्या, पारधी तरूणांना नोकरीत संधी द्या, समाजामध्ये माणूस म्हणून वागवा, गुन्हेगारीचा शिक्का पुसून द्या, अशा मागण्या मान्य करुन देशसेवेसाठी पारधी बटालियन सुरु करावी.

श्री. मधुकर वायदंडे यांना नागनाथ अण्णा यांच्या नेतृत्वाखाली पारधी समाजातील १४ पारधी गुन्हेगार शरण आले आहेत. ही पारधी माणसे समाजाच्या मुख्य प्रवाहात यायला

तयार झाली आहेत. सांगली महानगरपालिकेच्या नोकर भरतीसाठी १० वी १२ वी झालेल्या पारधी तरुणांना नोकरीच्या मुलाखतीसाठी बोलविले आहे पण रहिवासी दाखला, रेशन कार्ड नाही म्हणून नोकरीची संधी मिळणेस अडचणी निर्माण झाल्या आहेत. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी पूर्वीच २० वर्षांपूर्वी धाडसी निर्णय घेऊन चंदाबाई पवार, भिमऱ्या काळे, सुकन्या काळे यांना वाळवा येथील हुतात्मा संकुलामधील सेवेत घेतले आहे व ती मंडळी प्रामाणिकपणे सेवा करीत आहेत.

* * * *



# २०

# हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना संस्थापक

मुंबई प्रांतात कमी-अधिक प्रमाणात विहीरपाण्यावर ऊस पिकाचे उत्पादन घेतले जात होते. कोल्हापूर, सांगली, नगर भागात गुऱ्हाळ घरामधून गुळ तयार केला जात होता. कांही उद्योगपतीनी उगार, कोल्हापूर फलटण, इ. ठिकाणी खाजगी साखर कारखाने सुरु केले होते. पण त्याचा फायदा सर्व सामान्य शेतकऱ्यानां होत नव्हता. गुळ उत्पादक शेतकऱ्यांची लुट व्यापारी करत. या परिस्थितीत १९४८-१९४९ साली पद्मश्री विखे पाटील यांनी पहिला सहकारी साखर कारखाना सुरु केला. पुढे १९५४ मध्ये बिद्री, पंचगंगा, वारणा (जि. कोल्हापूर) १९५६ मध्ये सांगलीचा शेतकरी सह. साखर कारखाना उभा राहिला. १९६० नंतर महाराष्ट्रात सहकारी तत्वावर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात सहकारी साखर कारखाने उभे राहू लागले. सामान्य शेतकऱ्याला विकासाचे साधन मिळाले. लोकांना काम मिळाले कारखाना परिसराचाही कमी-अधिक विकास झाला. ऊस हे नगदी पीक म्हणून शेतकरी तिकडे वळला विहीर-नदी, लिफ्ट इरिगेशन मुळे ऊस बागायती वाढली. कारखान्यांची संख्या ही वाढू लागली. सहकारी साखर धंद्यात अनिष्ठ प्रथा मुळ धरु लागल्या. ग्रामपंचायत पासून विधीमंडळ-संसदेपर्यंतच्या निवडणूकांची सुत्रे साखर सम्राटांच्या हाती गेली.

सामान्य शेतकऱ्यांची दुरावस्था होऊ लागली. ऊस तोडीचा कार्यक्रम कारखान्याच्या अधिकाऱ्यांच्या मर्जीवर चालू लागला. ऊसाची तोड मिळण्यासाठी कारखान्यातील अधिकाऱ्यांची मनधरणी करावी लागे. कित्येकवेळा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात त्या कारखान्याच्या गाळप क्षमतेपेक्षा ऊसाचे जादा उत्पादन होई. कधी-कधी जून महिना संपत आला तरी कारखान्यांचे गळीत सुरु असे. शेवटी-शेवटी तर ज्या शेतकऱ्यांनी वर्ष-सव्वावर्ष पाणी पाजून ऊसाच्या पिकाची काळजी पूर्वक निगरानी केली ते ऊसाचे फड शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत पेटवून ऊस तोड केली जायची.

ऊस तोड ही ऊसाच्या मुळापासून होत नव्हती त्याचा फटका शेतकऱ्याला बसे. एकरी उत्पादन घटत असे. ऊस मालकाला ऊसाचे वाडे सुध्दा मिळत नसे. कारखाना जी ऊस वजन स्लीप देईल ते ऊसाचे वजन आणि जो देतील तो ऊसदर निमुटपणे घ्यावा लागे.

क्रांतिसिंह नाना पाटील हे नागनाथ अण्णा यांचे दैवत. त्यांचे अध्यक्षतेखाली आणि पंढरपुरचे पुरोगामी विचाराचे बाबाजी पुरुषोत्तम रंगाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत वाळवा येथे शेतकऱ्यांची बैठक नागनाथ अण्णांनी घेतली व ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचा ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनी, ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या भल्यासाठी सहकारी साखर कारखाना वाळवा येथे सुरु करण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला. हुतात्म्याचे जिवंत स्मारक उभारण्याचा एक भाग म्हणून नियोजित कारखान्यास हुतात्मा किसन अहिर यांचे नाव देण्याचे नक्की झाले.

त्यावेळी वाळव्याचे शेतकऱ्यांकडे सहकारी साखर कारखाना काढण्याच्या तयारीसाठी शेअर्स खरेदी करण्याइतकी आर्थिक स्थिती नव्हती. नियोजित साखर कारखान्याचे प्रस्ताव तयार करणे, त्याला लागणारी कागदपत्रे जमविणे, योग्य त्या अटींची पूर्तता करून ते टाईप करुन घेणे सुध्दा मोठ्या खर्चाची बाब होती. अशा वेळी सांगलीचे वसंतदादा यांनी मदत केली. त्यांच्या माधवनगर येथील शेतकरी सहकारी कारखान्यामध्ये किसन अहिर साखर कारखान्याचा प्रस्ताव थोड्या अवधीत टाईप करुन दिले. वाळव्यातील कष्टाळू व सामान्य शेतकरी शामराव ज्ञानू सव्वाशे यांच्या नावाची हुतात्मा विद्यालयाच्या मेनहॉलमध्ये ४०० शेतकऱ्यांनी नियोजित साखर कारखान्याच्या चिफ प्रमोटर साठी चर्चा केली. पुढे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर ४००० शेतकऱ्यांच्या जाहिर सभेत एकमताने नियोजित हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे चिफ प्रमोटर म्हणून शामराव ज्ञानू सव्वाशे यांच्या नावाला मान्यता दिली. शेतकरी सहकारी शामराव सव्वाशे यांची नियोजित कारखान्याचे चीफ प्रमोटर म्हणून निवड करण्यात आली. त्यांचे सहीने हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे प्रपोजल केंद्र शासनाकडे, महाराष्ट्र शासना मार्फत पाठवले.

१९७७ साली वसंतदादा पाटील हे अटीतटीच्या शर्यतीत विजय मिळवून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले होते. नागनाथ अण्णांनी मुख्यमंत्री वसंतदादांना हुतात्मा साखर कारखान्याची शिफारस करण्याची विनंती केली. पण चौकशी करता कळाले की, साखर संचालकांनी हुतात्मा कारखान्याच्या प्रपोजलची चौकशीही केली नव्हती. त्यानंतर वसंतदादांनी साखर संचालक श्री. निंबाळकर यांना बोलावून घेतले व सांगितले, ''तुम्ही स्वत: वाळव्याला जाऊन ऊस क्षेत्राची पाहणी करुन ताबडतोब अहवाल पाठवा'' त्या प्रमाणे श्री. निंबाळकर साहेब वाळव्यास आले. कार्यक्षेत्रातील ऊस क्षेत्राची पाहणी करुन पुण्यास गेले. इस्लामपूर येथील कारखान्याचे नेत्यांनी नियोजित साखर कारखान्यास विरोध केला. तसेच नियोजित साखर कारखान्यास पुरेसा ऊस नाही असेही सांगितले होते.

दुसऱ्याच दिवशी ११ फेब्रुवारी १९७८ रोजी विधानसभेच्या निवडणुकीसाठी साखराळे साखर कारखान्याचे नेते श्री. राजाराम बापू पाटील हे आपल्या प्रचारसभेसाठी वाळवा येथे रात्री आले होते. वाळवा गावातील मोठ्या संखेने स्त्री, पुरुष हुतात्मा चौकात एकत्र जमा झाले होते. शेतकऱ्यांचे नेतृत्व क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांनी केले होते. त्यानी राजाराम बापू पाटील यांना घेराव घातला ''नियोजीत हुतात्मा कारखान्यास आपला विरोध का?'' अशी विचारणा केली



त्यावर ते शेतकऱ्यांना म्हणाले, ''आमचा काही तसा विरोध नाही.'' ''मग तसे आम्हाला लिहून द्या'' परिस्थितीचे गांभिर्य ओळखून त्यांच्या बरोबर असलेले साखराळे सह. साखर कारखान्याचे चेअरमन श्री. बाबासाहेब पाटील यांनी आपल्या गाडीतील कारखान्याचे लेटर पॅड काढले व क्रांतिवीर अण्णांचे कार्यकर्ते श्री. दत्ता शेळके यांच्याकडे दिले आणि म्हणाले, ''तुम्हाला हावा तो मजकूर लिहा मी सही करतो.'' या वेळी गावामध्ये लाईट गेल्याने त्यांच्याच गाडीच्या हेड लाईटच्या प्रकाशात हुतात्मा चौकातच पत्र तयार केले व त्यांची सही घेतली. सदर पत्रावर त्यांच्याच कारखान्याचे संचालक श्री. एस. वाय. पाटील (बोरगाव) यांची साक्षीदार म्हणून सही घेतली व सर्व जमाव हुतात्मा किसन अहिर व नागनाथ अण्णांच्या नावाच्या घोषणा देत हुतात्मा किसन अहिर विद्यालयाकडे आला. विद्यालयासमोर अण्णांनी सर्व कार्यकर्ते व शेतकरी यांचे कौतुक केले. दुसऱ्याच दिवशी क्रांतिवीर नागनाथ अण्णा व शेतकरी कार्यकर्ते यांनी सदर ना हरकत पत्र मा. साखर संचालक यांच्या पुणे कार्यालयास दाखल केले. त्यावर साखर संचालक म्हणाले, ''आता नियोजित हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवीन.''

यानंतर प्रस्ताव मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचेकडे गेला. अण्णा मुख्यमंत्र्यांना भेटले असता अण्णांना ते म्हणाले, 'थोड्या दिवसात येणाऱ्या पाडव्याचे दिवशी हुतात्मा कारखान्याच्या शिफारस पत्रावर सही करतो. त्यासाठी पाडव्याचे दिवशी वर्षा बंगल्यावर या.' त्यावर अण्णा म्हणाले 'पाडव्याचे जेवण देणार आहात काय?' मुख्यमंत्री 'होय' म्हणाले. मुख्यमंत्री वसंतदादांचे आणि नागनाथ अण्णांचे स्वातंत्र्य लढ्यापासूनचे घरगुती जिव्हाळयाचे संबंध होते त्याचे हे प्रतिक होय. ठरलेप्रमाणे नागनाथ अण्णा आपले ८ सहकारी व कॉ. दत्ता देशमुख यांच्यासह पाडव्या दिवशी सकाळी मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर पोहोचले मुख्यमंत्र्यांनी नागनाथ अण्णांना व त्यांच्या सहकाऱ्यांना श्रीखंड पुरीची मेजवानी दिली व जेवणानंतर त्याच ठिकाणी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे प्रपोजलच्या शिफारसपत्रावर सही केली. लगेच ते प्रपोजल महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. उड घ–१३७८/१७ २३–१३/सी (सी आर–३) ता. १९ एप्रिल १९७८ ने दिल्लीस पाठवले.

दोन दिवसांनी नागनाथ अण्णा दिल्लीला रेल्वेने गेले आणि हुतात्मा कारखान्याचे प्रपोजल संबंधित अधिकाऱ्यांकडे पोहोचले असल्याची खात्री करुन घेतली.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यास मंजुरी मिळविणेच्या प्रयत्नाच्या काळात पैशाची नेहमी अडचण पडायची. अशा वेळी हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे शिक्षकांनी फार मोलाची मदत केली. वाळवा तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांची पतपेढी इस्लामपूर येथे होती. तिचे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे शिक्षक सभासद होते. ज्या ज्या वेळी पैशाची अडचण अण्णांना पडली त्या त्या वेळी हुतात्मा विद्यालयाच्या शिक्षकांनी त्यांच्या इस्लामपुरच्या पतपेढीमधून कर्ज काढून नागनाथ अण्णांच्या प्रयत्नांना आर्थिक मदत रोखीचा शेअर्स घेऊन केली. प्रमुख शेतकरी व कार्यकर्ते यांनी रोखीचे शेअर्स घेऊन हुतात्मा कारखान्याच्या प्राथमिक खर्चाची तरतूद केली. वाळवा परिसरातील शेतकऱ्यांनी अण्णांना ॲम्बेसिडर गाडी घेऊन दिली होती. त्या गाडीच्या पेट्रोल खर्चाची शिक्षकांची मदत योग्य वेळी, योग्य कारणासाठी झाली होती.

नेमके याच काळात अस्तित्वात असलेल्या कारखान्यांमध्ये ऊसाची पळवापळवी सुरु झाली होती. कारखान्या– कारखान्यांमध्ये भांडणे सुरु झाली होती. हे केंद्र शासनापर्यंत

गेलेमुळे, केंद्र शासनाने असे धोरण जाहीर केले की २५ कि.मी. च्या आत दुसऱ्या नवीन साखर कारखान्यास परवानगी द्यायची नाही. वाळव्याचा नियोजित हुतात्मा कारखाना साखराळे साखर कारखान्यापासून १५-१६ किलोमिटर अंतरावर होणार होता. त्यामुळे हुतात्मा कारखान्यास साखराळच्या कारखान्याचा प्रखर विरोध होता. पण वस्तुस्थिती अशी होती की, साखराळच्या कारखान्याकडे ७०-८० गावे होती. त्यापैकी फक्त ७ गावे ८ वाड्यांचे कार्यक्षेत्र हुतात्मा कारखान्यास मागितले होते. गावे कृष्णा नदीचे काठची होती व दीड दोन हजार एकर ऊस तेथे होत होता. अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र शासनाने हुतात्मा कारखान्याची शिफारस केंद्र सरकारकडे केली असली तरी केंद्र शासनाची नविन साखर कारखान्यांना परवाने देण्यास स्थगिती होती. त्यातच केंद्रात जनता पक्षाचे सरकार मोरारजी देसाईच्या नेतृत्वाखाली अधिकारावर आल्यामुळे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा विचार होणे शक्य नव्हते.

परंतु नागनाथ अण्णांचे प्रयत्न चालूच होते. त्यांनी त्यासाठी दिल्लीतच मुक्काम ठोकला होता. तेथे महाराष्ट्रातील खासदारांना भेटत होते. मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत होते. सुदैवाने १९८० साली जनता पक्षाचे सरकार कोसळले व निवडणुकीनंतर काँग्रेसची सत्ता आली. श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. खासदार बलराम जाखर लोकसभेचे सभापती झाले आणि राव विरेंद्रसिंग शेतीमंत्री झाले.

नियोजित हुतात्मा किसन सहकारी साखर कारखान्याच्या प्रस्तावाची छाननी सुरु झाली. त्यामध्ये अधिकाऱ्याने नियोजित कारखान्याच्या प्रस्तावा सोबत पुर्ण संचालक मंडळाची यादी नसल्याचे दाखवून दिले. ही बाब अण्णांनी दिल्लीहून वाळव्यास पत्राने कळवीले की, शिक्षकांनी कार्यक्षेत्रातील गावोगाव जावून त्या गावातील सर्व लोकांची गाव सभा घेऊन एक मताने संचालक पदासाठी जे नाव येईल त्याची निवड संचालक म्हणून करावी. त्यानुसार
१) श्री. शामराव ज्ञानू सव्वाशे, चीफ प्रमोटर (वाळवा) २) श्री. सखाराम अर्जुन गायकवाड,(वाळवा) ३) श्री. नामदेव बाबू शेळके (वाळवा) ४) श्री. ज्ञानदेव जगन्नाथ माने (नागठाणे, खोलेवाडी) ५) श्री. बाळासाहेब दौलू शिंदे (नागराळे, शिरगांव) ६) श्री. सोनाप्पा रावजी पाटील (पुणदी, पुणदीवाडी) ७) श्री. शामराव दत्तू पाटील (जुनेखेड) ८) श्री. दिनकर यशवंत गुंजवटे (नवेखेड) ९) श्री. गणपती आण्णा पाटील (गोटखिंडी) १०) श्री. बापूसाहेब भाऊसाहेब खोत(मसूचीवाडी) ११) श्री. तुकाराम नाना खोत (पडवळवाडी, अहिरवाडी, गाताडवाडी, लोणारवाडी) यांची एकमताने निवड झाली. सदर संचालक मंडळाची यादी दिल्लीस पाठवली. नागनाथ अण्णांचे सहकारी संगमनेरचे कॉ. दत्ता देशमुख अण्णांच्या प्रयत्नाबद्दल लिहितात, ''नागनाथ तसा फार प्रयत्नवादी. नेपोलियनला जसे 'अशक्य' माहीत नव्हते तसेच नागनाथांचेही होते. काम कितीही अवघड असले तरी नागनाथ प्रयत्न करीत राहणार. बलराम जाखरना भेटणार, महाराष्ट्रातल्या खासदारांना भेटणार, त्यांना सर्वांचीच सहानुभूती होती. नागनाथ १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीतला सक्रिय कार्यकर्ता. बाकीच्याप्रमाणे स्वार्थी व संधिसाधू नाही, हे सर्वांना माहीत होते. कुठलाही धोका पत्करणारा होता. मात्र सर्वांची सहानुभूती असली तरी अंतरांचा नियम तेवढा आड येत होता.''

श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान व राव विरेंद्रसिंग कृषिमंत्री झाल्यामुळे नागनाथ अण्णांच्या प्रयत्नामध्ये उत्साह आला. त्यांना दिल्लीत कळाले की छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३०० व्या राज्याभिषेक समारंभासाठी श्रीमती इंदिरा गांधी रायगडला दि. ३१ मार्च १९८० रोजी भेट



देणार आहेत. नागनाथ अण्णांनी लगेच दिल्लीहून वाळव्यास पत्र पाठवून ११००० विद्यार्थ्यांच्या सह्यांचे नियोजित हुतात्मा साखर कारखाना मंजूर करावा म्हणून एक निवेदन रायगड येथे जाऊन श्रीमती इंदिरा गांधींना देणेची सूचना वाळव्यास केली. त्या प्रमाणे निवेदन व सह्या घेऊन ताबडतोब दत्तोपंत कुलकर्णी, चंदर लोहार, जयवंत अहिर, दत्ता शेळके, पांडुरंग मुळीक यांनी अलिबागचे खासदार ए. टी. पाटील व शिक्षण संचालक व्ही. व्ही. चिपळूणकर यांचे सहकार्याने निवेदन रायगड किल्ल्यावर पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींना दिले. त्यांचे थोड्याच दिवसांत उत्तरही आले की, संबंधित खात्याकडे कार्यवाहीसाठी निवेदन पाठवले आहे.

अशा काळातच मुख्यमंत्री वसंतदादां राजीनामा देऊन ते अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी म्हणून दिल्लीतच आले होते. त्यावेळी दादांनीही अण्णांना मदत केली होती. महाराष्ट्रातील खासदार पंढरपुरचे संदिपान थोरात, विदर्भातील मधुसूदन वैराळे, सोलापुरचे गंगाधर कुचन, रामटेकचे बर्वे, कुलाब्याचे ए. टी. पाटील, नाशिकचे डॉ. प्रतापराव वाघ, मराठवाड्याचे राठोड, इंदापूरचे शंकरराव बी. पाटील, कराडच्या प्रमिलाताई चव्हाण, औरंगाबादचे बाळासाहेब पवार, नगरचे बाळासाहेब विखे पाटील, नाशिकचे कानडोहळ, मुंबईचे आर. आर. भोळे, कोल्हापुरचे उदयसिंह गायकवाड, साताराचे यशवंतराव चव्हाण, कराड दक्षिणचे यशवंतराव मोहिते, नगरचे अण्णासाहेब शिंदे, सांगलीचे अण्णासाहेब गोटखिंडे, आबासाहेब खेबुडकर, इचलकरंजीचे बाळासाहेब माने, या शिवाय कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अरस, गुजरातचे मुख्यमंत्री हितेंद्रभाई देसाई, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव (दादा) पाटील, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यानी कारखाना मान्यता मिळणेसाठी मोलाचे सहकार्य केले. यांनी आपल्या सह्यांचे हुतात्मा साखर कारखान्यास मंजुरी देणेबद्दलचे निवेदन दि. १२ ऑगष्ट १९८० रोजी केंद्राचे कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यांना दिले होते.

त्या अगोदर अण्णा दिल्लीत असताना भारत कृषक संघटनेचे अधिवेशन दिल्लीत तालकटोरा गार्डन बागेत भरलेचे अण्णांना समजले. अण्णा तेथे जाऊन थांबले. तेथे वसंतदादा, औरंगाबादचे अन्वीकर (दादा), सभापती बलराम जाखर वगैरेंची सभा चालू होती. कोल्हापुरचे सी. आर. पाटील यांचे मेव्हणे जयसिंग आडनाईक अण्णांना पाहून एकदम उभे राहिले व सभेत म्हणाले. ''वाळव्याचे क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गेले सहा महिने दिल्लीत तळ मारुन त्यांच्या हुतात्मा कारखान्यास मंजुरी मिळवणेचे प्रयत्न करीत आहेत, पण त्यांची कोणीही दाद घेत नाही.'' हे ऐकून लोकसभेचे सभापती बलराम जाखर यांनी अण्णांना त्यांचे ऑफिसमध्ये दुसरे दिवशी बोलावले. सर्व पार्श्वभूमी समजावून घेतली आणि हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचा निर्णय लवकर घेणेबद्दल कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यांना दि. ११ ऑगष्ट १९८० रोजी पत्र पाठवले. त्यांत म्हटले होते की हा प्रश्न गेली आठ वर्षे पडून आहे, आता याबाबत लवकर निर्णय व्हावा.

याशिवाय अण्णांच्या सूचनेवरुन वाळवा परिसरातील ११,९०० शेतकऱ्यांच्या सह्यांचे एक निवेदन कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यांना देण्यासाठी जयवंत अहिर दिल्लीस गेले. तेथे अण्णा, खा. प्रमिलाताई चव्हाण व जयवंत अहिर कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यांना जाऊन भेटले व शेतकऱ्यांचे सह्यांचे निवेदन त्यांना दिले. या सर्व प्रयत्नांमुळे कृषिमंत्री प्रभावित झाले व या प्रश्नाची त्यांनी गंभीरपणे दखल घेतली. मधल्या काळामध्ये बंगलोर येथे अखिल भारतीय

काँग्रेसचे अधिवेशन होणार होते. कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अरस यांनीही अण्णांना हुतात्मा कारखान्यास मंजुरी मिळणेबद्दल मदत केली होती. म्हणून नागनाथ अण्णांनी त्यांना भेटून आभार मानणेसाठी वसंत पवार, जयवंत अहिर, दत्ता शेळके, शामराव सव्वाशे, पांडुरंग मुळीक, बाळू पाटील (चावरकर), अशोक पवार व चंदर लोहार असे आठजण बंगलोरला पाठवले होते. तेथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, वसंतदादा व देवराज अरस यांनाही भेटून सर्वांचे आभार मानले. त्यांनी पुढे काही अडचण आल्यास मदत करु असेही आश्वासन दिले होते.

शेवटी कॉ. दत्ता देशमुख यांचे सूचनेवरुन नागनाथ अण्णा कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यांना भेटले व विनंती केली की दोन्ही पार्टीचे म्हणणे ऐकून घ्या. मग वाटल्यास काय तो निर्णय घ्या, मग आम्ही तेथे आमचे म्हणणे मांडू. या अण्णांच्या सूचनेस कृषिमंत्र्यांनी मान्यता दिली व भेटीचा दिवस ठरला.

नागनाथ अण्णा या अडचणीच्या काळात आय.आय.पी.ए. च्या होस्टेलमध्ये थोर शिक्षण तज्ञ मा. जे. पी. नाईक रहात होते त्यांच्या एका रुमवर रहात होते. किर्लोस्कर ब्रदर्स कंपनीचे श्री. पी. डी. गुणे हे अण्णांचे वर्गमित्र होते त्यांनी त्यांच्या कंपनीचे दिल्ली येथील कार्यालयातील एस.एस.नायर या अधिकाऱ्याला अण्णांना मदत करण्यास सांगितले होते. अण्णांनी दिल्लीस जाण्यापुर्वी वाळव्यातील कार्यकर्त्यांना सांगीतले, ‘‘वस्तीगृहातील विद्यार्थी उपवासी राहता कामा नयेत, तसेच मला कारखान्याच्या कामकाजासाठी दिल्लीस तारेनेच मनिऑर्डर आली पाहिजे.’’ अण्णांनी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यास मंजूरी मिळाल्याशिवाय दिल्ली सोडणार नाही असा मनाचा निर्धार केला होता.

कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यांनी साखराळे साखर कारखान्याने केलेली तक्रार निकालात काढण्यासाठी १३.११.१९८० रोजी कृषिमंत्र्यांच्या कार्यालयात साखराळे साखर कारखाना व नियोजित हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याना आपआपली बाजू मांडण्यासाठी बोलावले होते. हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याच्या वतीने मा. अण्णा, कॉ. दत्ता देशमुख, जयवंत अहिर, वसंत पवार, चंदर लोहार, दत्तोपंत कुलकर्णी, रामचंद्र अहिर (मास्तर), पांडूरंग मुळीक, दत्ता शेळके, शामराव सव्वाशे हे हजर होते. साखराळे साखर कारखान्याच्या वतीने सर्व संचालक मंडळ व टाटा कंपनीचे दोन नामवंत वकील विमानाने दिल्लीस हजर झाले होते.

जाताना कॉ. दत्ता देशमुख यांनी एक नकाशा तयार करुन घेतला होता. त्यात कृष्णा- कोयना- वारणा- पंचगंगा खोऱ्यातील १७-१८ साखर कारखाने व त्यांचेमधील अंतर दाखविले होते त्यापैकी १-२ वगळता सर्वच कारखाने ५-६ कि.मी. अंतरावर होते. तसेच प्रत्येक कारखान्याची गाळप क्षमता, ऊस क्षेत्र किती?, गळीत किती काळ चालते? वगैरे माहिती दाखविली होती.

नियमाप्रमाणे सरासरी १६० दिवस कारखाना चालला पाहिजे होता. पण काहींचा हंगाम २००-२२५ दिवस तर काहींचा २६० दिवसापर्यंत चालला होता. अशी खुलासेवार माहिती दाखविली होती. सुटाबुटातल्या कॉ. देशमुखांना वकील समजून मंत्री म्हणाले ‘‘बोला वकील साहेब’’ त्यावर कॉ. दत्ता देशमुख म्हणाले, मी काही वकील नाही. तर एक सामाजिक कार्यकर्ता आहे. विरोधी पक्षाला प्रथम बोलू द्या. त्यांचा काय विरोध आहे, ते समजू द्या. मग त्या संबंधाने बोलता येईल.



मग साखराळच्या कारखान्याचे प्रतिनिधींनी विरोध करताना सांगितले की, ‘‘आम्हाला ऊस कमी आहे. जो आहे तोच आम्हाला कमी पडतो. जी गांवे मागितली ती आमच्याच कार्यक्षेत्रातील आहेत. ती गावे आणि त्या गावांतील ऊस कमी झाला तर आमच्यावर आपत्तीच येईल आणि तुमचाच नियम आहे की दोन कारखान्यांमधील किमान अंतर २५ कि.मी. असायला हवे. त्याशिवाय परवानगी देता येणार नाही. असे असताना आमच्यावरच अन्याय का?’’ या म्हणण्यास उत्तर देताना कॉ. दत्ता देशमुख म्हणाले, ‘‘हे म्हणतात आमचा ऊस कमी आहे पण यांचे गळीत १६० ऐवजी १९० दिवस चालते याचा अर्थ ऊस कमी नाही. आता इतरांच्या मानाने कमी असेल तर गोष्ट वेगळी. पण यांच्या गळीत क्षमतेपेक्षा कमी नाही. तुलना करायचीच असेल तर त्यांच्याच क्षमतेच्या मानाने करावी. दुसऱ्यांचा मोठा कारखाना आहे आणि माझा लहान आहे तरी त्या मोठ्या कारखान्याला जेवढा ऊस पाहिजे तेवढाच मला पाहिजे हे समर्थन काही टिकणारे नाही. तसेच जास्त ऊस मिळावा म्हणून यांनी काय प्रयत्न केले? जसे वसंतदादांनी कारखान्याच्या आणि सरकारच्या मदतीने नदी पात्रापासून १०-१५ मोठे लिफ्ट करुन ऊस क्षेत्र वाढविले व १०-१२ हजार एकर क्षेत्र ऊसाखाली आणले तसे यांनी कोणते प्रयत्न केले.? यांनी एक गुंठासुध्दा ऊसाचे क्षेत्र वाढविले नाही. यांचे कितीतरी क्षेत्र रिकामे आहे. यांच्या कार्यक्षेत्रात ७०-८० गावे आहेत. त्यातली फक्त १० गावे मागतो आहे. बाकीची ५०-६० गावे त्यांना आहेतच. त्यात त्यांचे कितीतरी ऊसक्षेत्र वाढवता येईल. त्यांनी ते करायला पाहिजे. आम्ही मागितलेल्या १० गावातील ऊस क्षेत्र त्यांनी विकसित केले नसून ते त्या त्या गावातील शेतकऱ्यांनी वाढविले आहे. त्यामध्ये साखराळे कारखान्याचे योगदान काही नाही. आणि त्यावर त्यांचा डोळा? दुसरे अंतराचे म्हणाल तर ते फसवेच आहे. जिथे कॅनॉल पध्दती आहे. टापू टापूने ऊस आहे. तिथे अंतराचा नियम बरोबर आहे. याच देशात सर्व ठिकाणी तो नियम लावणे बरोबर नाही. जिथे ऊसाची घनदाट जंगले आहेत अशा कोल्हापूर जिल्ह्यात बहुतेक ठिकाणी कारखाने ५-६ कि.मी. अंतरावरच आहेत. फक्त सांगलीच्या शेतकरी कारखान्यात व साखराळच्या कारखान्यात ३५-४० कि.मी. अंतर आहे. इतर सगळ्या कारखान्यात कुठेही ५-५, ६-६ कि.मी. पेक्षा अधिक अंतर नाही. हे नकाशावरुन पाहता येईल. इस्लामपूर सांगली या दोन्हीमधील ४० कि.मी. अंतराच्या क्षेत्रात आणखी जरी कारखान्याची मागणी आली तरी ती तुम्हाला मान्य करावी लागेल. मोठा कारखाना आणि लांबून ऊस आणायचा यापेक्षा छोटा कारखाना आणि जवळचा ऊस असाच कारखाना किफायतशीर होऊ शकतो.’’

कॉ. दत्ता देशमुख यांनी नियोजित हुतात्मा साखर कारखान्याची बाजू खुलासेवार व प्रभावीपणे मांडली. ती कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग पाटील यांना पटली. त्यामुळे साखराळे कारखान्याची बाजू मांडणारे वकील गडबडले. कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यानी साखराळे कारखान्याच्या प्रतिनिधींना विचारले, ‘तुम्ही या १० गावांच्या विकासासाठी आज पर्यंत किती खर्च केला?’ त्यावर ते म्हणाले, ‘आम्ही १५ ते १६ लाख खर्च केला!’ त्यावर राव विरेंद्रसिंग म्हणाले, ‘हा खर्च किती वर्षात व कशा-कशासाठी खर्च केला?’ यावर प्रतिनिधी निरुत्तर झाले! ‘नंतर सविस्तर माहिती पुरवतो’ असे म्हणाले. त्यावर कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग म्हणाले, ‘जेथे पाणी व ऊसाची उपलब्धता आहे तेथे अंतराचा विचार न करता साखर कारखान्यांना परवाना देण्याचे धोरण राहील.’ या सर्व चर्चेत शेती खात्याचे सेक्रेटरी बॅनर्जी उपस्थित होते. या चर्चेनंतर हुतात्मा किसन अहिर

सहकारी साखर कारखान्यास केंद्र सरकारच्या कृषि खात्याचे (लेटर ऑफ इंटेट) इरादा पत्र नंबर एल. आय.१२५ (बी) अॅप्ली. नं. ३८९/७८ दिनांक २६ मार्च १९८१ अन्वये मिळाले. नागनाथ अण्णांनी दीर्घकाळ केलेल्या प्रयत्नांना यश आले.

कृषि मंत्री राव विरेंद्रसिंग यांनी हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्यास मंजुरी देणार असे सांगितल्यावर नागनाथ अण्णा वाळव्यास दिल्लीहून निघून आले होते. नंतर पोस्टाने येणाऱ्या साखर कारखान्याचे मंजुरीच्या पत्राची वाट पहात होते. शेवटी तो सर्वांच्या आनंदाचा दिवस उजाडला. त्या दिवशी वाळव्याच्या पोस्ट मास्तरनीच कळविले की, दिल्लीचे रजिस्टर पत्र आले आहे. लगेच पत्र आणले. हुतात्मा विद्यालयात अण्णा बसले होते. त्यांना ते पत्र दिले. अण्णांनी पत्र वाचले व त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. तेथे हजर असलेल्या सर्वांना आनंद झाला. थोड्याच वेळात ही बातमी वाऱ्यासारखी सर्व गावामध्ये पसरली. शेकडो वाळववासी शेतकरी जमले. त्या आनंद प्रसंगी लोकांनी फटाके वाजवून आनंद व्यक्त केला. काहींनी गुलाल उधळून आनंदात भर घातली. क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांना तर आपल्या सुपुत्राच्या सुयशाबद्दल झालेला आनंद गगनात न मावेनासा झाला होता. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भरते आले होते.

नागनाथ अण्णांनी १९७८ ते १९८१ पर्यंत आर्थिक पाठबळ नसताना आर्थिक समस्येला तोंड देत दिल्लीत मुक्काम करुन साखर कारखान्याच्या मंजुरीसाठी अनेक खासदार, नेते व कार्यकर्ते यांची मदत घेतली होती. दिल्लीच्या मुक्कामात त्यांनी दररोज वाळव्याला पत्रे पाठवून मदत केलेल्या खासदारांना भेटण्याच्या सूचना जयवंत अहिर, दत्ता शेळके व वसंत पवार यांना केल्या होत्या. नागनाथ अण्णांनी दिल्लीहून पाठवलेल्या पत्रांची फाईल पाहता त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू प्रकट होतात. खरेतर तो एक वेगळ्या ग्रंथाचा विषय आहे. नेत्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील कार्यकर्त्यांना कसे कार्यरत ठेवावे, उद्दिष्ट साध्य होण्यसाठी सदिच्छा कशा मिळवाव्यात याचा एक आदर्श वस्तुपाठ नागनाथ अण्णांच्या दिल्लीहून पाठवलेल्या पत्रांमधून पहावयास मिळतो.

नागनाथ अण्णांनी एक महत्त्वाची लढाई जिंकली होती. दुसऱ्या लढ्याची सुरवात होणार होती. आता नियोजित हुतात्मा कारखान्याचे भाग भांडवल मिळविलेनंतर कारखान्यासाठी योग्य अशी जागा मंजूर करुन घेणे ही दोन्ही कामे अवघड अशीच होती, पण नागनाथ अण्णांना दृढ विश्वास होता की याही लढ्यामध्ये यश मिळेलच .

शेअर्स गोळा करणेस हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे शिक्षकांना गावे व कोठा वाटून दिला होता. दररोज मिळालेल्या शेअर्सचा हिशेब शाळेचे मुख्याध्यापक हवालदार (सर) ठेवत होते आणि दर रविवारी झालेल्या कामाची आढावा बैठक अण्णांच्या उपस्थितीत होत असे. शिक्षणाधिकारी मोटे व प्राचार्य शेटेसुध्दा आढावा बैठकीस हजर असत. ज्यांना शक्य होते त्यांनी लगेच शेअर्स घेतले आणि ज्यांना शक्य नव्हते त्यांनी कर्ज काढून शेअर्स खरेदी केले. प्रत्येक शिक्षकांनी त्या त्या गावच्या शेतकरी कार्यकर्त्यांचे सहकार्याने दिलेला कोटा पुरा करण्याचे आटोकाट प्रयत्न केले व थोडया दिवसात १५ लाख रुपयांचे शेअर्स जमा झाले.

हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्यास प्रथम तीन जागा दाखविल्या होत्या. जागेची पाहणी करणेस मा. प्रेमकुमार, महाराष्ट्र राज्य साखर संचालक, पुणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी



तीनही जागा पाहिल्या व वाळवा गावच्या दक्षिणेस असलेल्या गंजीखान्याजवळील जागा नक्की केली. मुख्य साखर कारखाना, गाडीतळ, अधिकाऱ्यांची कॉलनी व मुख्य कार्यालयासाठी ७२ एकर जागा निवडली. बाकीची १३० एकर जागा पडवळवाडी हद्दीतील निश्चित केली.

हुतात्मा कारखान्याचे १५ लाख रुपयांचे शेअर्स भांडवल सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वाळवा शाखेत जमा झाल्यावर बँकेचे बॅलन्स सर्टिफिकेट घेऊन ते वसंत पवार यांनी साखर संचालक श्री. राणे साहेब यांचे कार्यालयात नेऊन दिले. त्यानंतर अण्णा व इतर कार्यकर्ते पुण्यास गेले व शासनाचे साखर संचालक श्री. प्रेमकुमार यांनी रजिस्ट्रेशन नंबर एस.एस.एन/पी.आर.जी.ए ४ दि. २९.६.१९८१ रोजी दिलेले रजिस्ट्रेशन घेऊन आले. त्यामुळे साखर कारखान्यास कर्ज मिळणेचा मार्ग मोकळा झाला होता. त्याप्रमाणे अर्ज केले व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने १ कोटी रुपये, आय एफसी आय ने १ कोटी २० लाख रुपये, आय सी आय सी आय ने १ कोटी १० लाख रुपये व आय डी बी आय ने दोन कोटी २० लाख रुपये असे एकूण ५ कोटी ४० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झालेवर बांधकामास सुरवात झाली. कोल्हापुरचे आर्किटेक्ट मे. बेरी यांनी प्लॅन काढून दिला. त्यानुसार बांधकामाची टेंडर्स मागविली आणि वेगवेगळ्या बांधकामाची वेगवेगळ्या कॉन्ट्रॅक्टर्सना कामे दिली.

हुतात्मा कारखान्याच्या बांधकामाची कॉन्ट्रॅक्टर्स कोल्हापुरच्या शंकरराव नलवडे, प्रतिभा कनस्ट्रक्शनचे राम जाधव यांना दिली होती. तसेच इलेक्ट्रिक कामाचे कॉन्ट्रॅक्टर इचलकरंजीचे तलंगे यांना दिले होते. नागनाथ अण्णांनी कारखाना साईटवर एका राहुटीत मुक्काम ठोकला होता. त्यांच्या देखरेखीमुळे आणि कॉन्ट्रॅक्टर्सच्या तत्परतेमुळे बांधकाम झपाट्याने होत होते. काही वेळा तर उभे राहण्यामुळे नागनाथ अण्णांचे पाय सुजत असत. तिकडे लक्ष न देता बांधकाम उत्तम तऱ्हेने पण लवकरात लवकर होण्याची दक्षता ते स्वत: घेत होते. त्यामुळे कमी वेळात कामे झाली.

आता मशिनरी आणावयाची होती. त्यावेळी नागनाथ अण्णा म्हणाले, 'आम्हांला बकाऊल्फ कंपनीचीच मशिनरी पाहिजे. मद्रासकडच्या कंपनीची मशिनरी परवडणारी नाहीत.' त्यासाठी नागनाथ अण्णांना नागपुरच्या हिवाळी अधिवेशनाचे वेळी मुख्यमंत्री बॅ. बाबासाहेब भोसले यांना भेटून विनंती करावी लागली. नागनाथ अण्णा व बॅ.बाबासाहेब भोसले यांचे सेवादलातील विद्यार्थी म्हणून पूर्वीपासून चांगले संबंध होते. मुख्यमंत्री झाले म्हणून बॅ. बाबासाहेब भोसल्यांचा सत्कार पुष्पहार घालून अण्णांनी केला. नेहमीच्या शैलीत मुख्यमंत्री म्हणाले ''अण्णा मी आता मुख्यमंत्री झालो आहे, काय पाहिजे ते मागून घे'' अण्णा म्हणाले, 'मला काही नको पण माझ्या हुतात्मा कारखान्यास पुण्याच्या बकाऊल्फची मशिनरी देणेची मंजुरी द्यावी.' मुख्यमंत्री म्हणाले, 'दिली'. अशा तऱ्हेने अण्णांनी बकाऊल्फ कंपनीची मशिनरी मिळवली. तोपर्यंत शिक्षकांनी, शेतकरी कार्यकर्त्यांनी ४० लाख रुपयांचे शेअर्स भांडवल जमा करण्याचे लक्ष्य पुरे केले होते.

मे. बकाऊल्फ कंपनीला मशिनरीची ऑर्डर दिली. मशिनरी येऊ लागली. कंपनीचे इरेक्शन इंजिनियर्स आले. त्यांची राहण्याची सोय सांगलीला केली. रोज सकाळी त्यांना आणणेसाठी व संध्याकाळी नेण्यासाठी वाहनाची सोय केली. त्यामुळे मशिनरी उभारण्याची कामे उत्साहाने होत होती. अण्णांना व त्यांच्या सहकाऱ्यांना लवकर मशिनरी बसवून काम पुरे करण्याची घाई झाली होती. परंतु गडबडीमुळे कामात चूक राहू नये याची काळजी अण्णा घेत होते. अण्णा स्वत:

इंजिनियर नव्हते पण बकाऊल्फ कंपनीच्या इंजिनियर्सकडून मशिनरींची माहिती घेत घेत तेही आता अनुभवाने तज्ज्ञ झाले होते. त्यांचे देखरेखीखाली उभारलेल्या मशिनरीमध्ये पुढील २० वर्षात काहीही बिघाड झाला नाही. हीच त्यांच्या चोख व्यवस्थापनाची पावती होय.

वास्तविक साखर कारखाना उभा करण्यास साधारणपणे दोन ते अडीच वर्षे लागतात पण अण्णांच्या चिकाटीच्या प्रयत्नामुळे आठ–नऊ महिन्यातच सर्व उभारणीचे काम पुरे झाले होते. हा एक पुढे विक्रम म्हणूनच नोंदविला गेला. कारखाना उभा करण्यास अण्णांनी रात्रंदिवस राबून कामे पुरी करुन घेतली. त्यांना मे. बकाऊल्फ कंपनीचे व त्यांच्या अधिकाऱ्यांचे तसेच युनि इरेक्ट्रर कंपनीचे मुख्य इंजिनिअर एस. के. भाटीया व त्यांच्या ग्रुपचे उत्तम सहकार्य मिळाले. त्यावेळी कामगारांची जेवणखाण्याची सोयही चांगली केल्यामुळेच हे शक्य झाले होते.

तेवढ्यात महाराष्ट्र शासनाने हुतात्मा किसन अहिर सहकारी कारखान्यास ८५ लाख रुपयांचे भाग भांडवल मंजूर केले होते. परंतु मंत्रालयातील उपसचिव यांनी ते भांडवल पाठवण्याबद्दल चालढकल केली होती. म्हणून त्यांनाच कारखान्याचे काम पाहण्यास बोलावले होते. साखर गोडाऊन समोरच्या पटांगणात शेतकरी शिस्तीत बसले होते. अण्णा त्यांच्यामागे जाऊन उभे राहिले होते. अधिकारी स्थानापन्न झालेवर लगेचच नागनाथ अण्णांनी त्यांना विचारणा केली व म्हणाले की, ‘‘सहकाराच्या माध्यमातून कष्टकरी शेतकरी आपल्या शेतातील ऊसाची साखर बनविण्यासाठी, आपला सर्वांगीण विकास घडविण्यासाठी कमी वेळात कमी खर्चात हा कारखाना आम्ही उभा करीत आहोत. कोठेही पैशाचा अपव्यय नाही असे असताना आम्हाला मंजूर झालेले शासनाचे भाग भांडवलांचे साहाय्य का रोखून धरले आहे?’’ त्यावर अधिकाऱ्यांनी शासनाच्या भाग भांडवलाची रक्कम पाठवतो असे कबूल केले. नंतर मग अण्णांनी त्या अधिकाऱ्यांचा आदरपूर्वक हार घालून सत्कार करण्याची सूचना कार्यकर्त्यांना केली. अण्णांना प्रामाणिक प्रयत्न करुनसुध्दा त्यांच्या कार्यात अडथळे आणणाऱ्याबद्दल राग असतो. योग्य कृती करणाऱ्याचा सत्कारही ते करीत असतात हा अण्णांना झालेला त्रास काही विघ्नसंतोषींच्यामुळे झाला होता. अण्णांच्या जिद्दीच्या प्रामाणिक प्रयत्नात विरोधक अडथळे आणीत होते व अण्णा त्या अडथळ्यांवर मात करुन यश मिळवित होते. अण्णांचा सर्व व्यवहार व कारभार पारदर्शी असलेमुळेच ते अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांना खडसावू शकत होते. शासनाकडून दोन कोटी ८० लाख ९० हजार रुपयाचे भाग भांडवल मिळाले. राहिलेले मिळाले नाही व त्यासाठी पुन्हा खटपटही केली नाही.

कारखान्याची मशिनरी बसवली होती, त्याची देखभाल करणारे अधिकारी व कर्मचारी नेमले होते. कार्यालयीन कामासाठी अधिकारी नेमले होते. त्याच बरोबर गाळपासाठी ऊस ही तयार ठेवला होता. आता ट्रायल पहिला गळीत हंगाम सुरु करण्याची सर्व तयारी झाल्यावर हुतात्मा कारखान्यास केंद्र शासनाचे इंडस्ट्रीयल लायसेन्स मिळववायाचे होते. त्या कामी मुंबईत सर्व शासकीय कागदपत्रे पुर्ण करुन घेण्याचे काम जयवंत अहिर यांच्यावर सोपवले होते व दिल्लीतील कागद पत्रांची पुर्तता करण्यासाठी श्री. वसंत पवार यांना दिल्लीला अण्णांनी पाठवले होते. वसंत पवार दिल्लीहून आवश्यक कागद पत्रे मुंबईस जयवंत अहिर यांना फोन करुन मागवत असत.

साखर संचालक श्री. व्ही. पी. राणे यांनी विशेषलक्ष घालून सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन दिली तरीही ते अधिकारी औद्योगीक परवाना देण्यास टाळाटाळ करीत होते. योगायोगाने



त्यावेळी नुकतेच चौथ्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झालेले वसंतदादा दिल्लीस आले होते. वसंत पवार महाराष्ट्र सदनमध्ये त्यांना भेटले आणि त्यांचे पत्र घेऊन कृषिमंत्र्यांचेकडे गेल्यावर मग तात्काळ केंद्र सरकारची औद्योगिक परवाना नंबर सी.आय.एल. २६(८४) न्यू दिल्ली दि. २८ जानेवारी १९८४ रोजी मिळाले. तो परवाना समक्ष हाती देत नव्हते म्हणून खासदार शालीनीताई पाटील यांनी प्रयत्न केले. वसंतराव पवार यांच्या हाती परवाना पत्र मिळाले ते ताबडतोब मुंबईस आले त्याची एक प्रत जयवंत अहिर यांना मुंबईच्या कामासाठी देऊन पुण्यास आले. तिथे महाराष्ट्र शासनाच्या साखर संचालकांकडून क्रशिंग परवाना मिळवावयाचा होता त्यासाठी लागणारी कागदपत्रे घेऊन जी. एन. पाटील व चंदर लोहार पुण्यात हजर होते पण तेव्हा कळाले साखर संचालक रजेवर औरंगाबादला गेले आहेत. अण्णांनी प्राचार्य शेटे व शिक्षणाधिकारी मोटे यांना स्पेशल गाडीने रातोरात औरंगाबादला पाठवले. तेथे गेलेवर रजेवर असताना त्यांचे कार्यालयास त्यांनी पत्र दिले. ते घेऊन ते दोघे पुण्यास आले. तो होता सुट्टीचा दिवस. मग पट्टेवाल्यास घेऊन वसंत पवार व मंडळीनी संबंधित अधिकाऱ्यांचे तळेगाव येथील घर शोधून काढले व त्यांना औद्योगिक परवाना व साखर संचालकाचे पत्र दाखविलेवर क्रशिंग सुरु करणेस स्वत:चे सहीचे पत्र दिले. ताबडतोब वसंत पवारांनी अण्णांना फोनने क्रशिंगची परवानगी मिळाल्याचे कळविले व मोठ्या धुमधडाक्यात ट्रायल गळीत हंगाम दि. २१ जानेवारी १९८३ रोजी सुरु केला. अण्णांचा, त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांचा, कर्मचाऱ्यांचा आनंद सर्वांच्या तोंडावर ओसंडून वहात होता. क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांनी पहिली मोळी टाकण्यात भाग घेऊन अण्णांच्या शुभ कार्यास आशीर्वाद दिले. त्या दिवसाचे महत्त्व सांगताना अण्णा म्हणाले की, ट्रायल सिझन ८४ च्या फेऱ्यात सुरु करायचा नाही म्हणून ८४ साल उजडू द्यायचे नाही असे त्यांनी ठरविले होते. तीन दिवसांनी साखरेचे उत्पादन सुरळीतपणे सुरु झाले. मातोश्रींच्या हातातील चिमटभर साखरेतील एक कण अण्णांनी आपले जिभेवर ठेवला व त्याचक्षणी कारखान्याचे आवारातून ते बाहेर पडले ते आजपर्यंत. कारखान्यामधून बाहेर जाताना संचालकांना व अधिकाऱ्यांना बजावले होते ‘‘जर ऊस घालणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय झाला तर मीच मोर्चा घेऊन जाब विचारावयास येईन.’’

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नागनाथ अण्णा या कारखान्याचे संस्थापक आहेत, पण सभासद नाहीत. पहिल्या गळीत हंगामामध्ये प्रथम निर्माण झालेल्या चिमटभर साखरेतील एक कण साखरेचा आस्वाद त्यांनी घेतला व त्या क्षणापासून ते साखर कारखान्याच्या आवारातून जे बाहेर पडले ते आजपर्यंत बाहेर राहून कारखान्याची प्रगती करीत आहेत. गेल्या २० वर्षात सभासदांमधून कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी मंडळाचे सदस्य निवडले जात आहेत. पहिले चेअरमन श्री. शामराव ज्ञानू सव्वाशे मराठा समाजातले, दुसरे तातोबा भाऊ वाजे जैन समाजातले, तिसरे महादेव शिवाप्पा कांबळे दलित समाजातले, चौथे अजिज रहिमान चाऊस मुस्लीम समाजातले. २००२ या महिला सबलिकरण वर्षाचे औचित्य साधून पाचव्या चेअरमनपदी स्वातंत्र्य सैनिक धोंडीराम बापू माळी यांची कन्या श्रीमती निलावती महादेव माळी माळी व व्हाईस चेअरमन पदी स्वातंत्र्य सैनिक खंडू शेळके (दाजी) यांची सून सौ. कुंदाताई दत्तात्रय शेळके या महिलांची निवड केली व सहावे चेअरमन पदी अण्णांचे धाकटे चि. वैभव नागनाथ नायकवडी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

नागनाथ अण्णा क्रांतिवीर स्वातंत्र्य सेनानी आहेत. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात आणि प्रति सरकारात इतिहासाने नोंद करावी अशी धाडसी कार्ये केली आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या समाजविकास कार्यातून समाज परिवर्तनाच्या कार्यातही नागनाथ अण्णा नायकवडी यांनी इतिहास निर्माण केला आहे. हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्यास सतत १७ वर्षे उच्चांकी साखर उतारा काढण्याबद्दल भारतामध्ये व आशिया खंडात प्रथम क्रमांक मिळविला आहे.उत्तम प्रतीच्या साखर निर्मितीस खुल्या बाजारात जास्तीत जास्त भाव मिळविला आहे.या कामी कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक श्री. शिवाजीराव वावरे, सर्व अधिकारी, साखर कामगार, कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील शेतकरी, शिक्षक, कार्यकर्ते, हितचिंतक यांचे सहकार्य लाभले आहे.

कारखान्याच्या उभारणीच्या कर्जातून मुदतीच्या अगोदर कारखाना कर्जमुक्त झाला सदर कर्जमुक्ती दिना निमित्त ऑक्टोंबर १९८९ मध्ये कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांचे कुटुंबातील सर्व व्यक्तींना पोटभर जिलेबी घर पोहोच करुन आनंदोत्सव साजरा केला होता.

मजूर व कामगार कल्याणासाठी हंगाम चालू व बंद काळात येणाऱ्या लोकांच्याकरिता व कारखाना कामगारांचे करिता कारखान्याचे कॅन्टीन चालविले असून दोन रुपयात पोटभर जेवण दिले जाते. सध्या बाहेर हॉटेलमध्ये दोन रुपयात चहासुध्दा मिळत नाही. या पार्श्वभूमीवर अशी कामगारांची सोय महाराष्ट्रात पहिली आहे. तसेच हंगामाकरिता येणाऱ्या गाडीवानांची राहणेची सोय व्हावी यासाठी कारखाना साईटवर ४८४ खोल्या बांधून ऊस तोडणी कामगारांची मोफत राहण्याची सोय केलेली आहे. अशी सोय दुसरीकडे कोठेही नाही. गाडीवानांना प्रतिदिनी पाच रुपये भाड्याने टायर बैलगाडी दिली जाते. दुरुस्ती कारखाना करतो व सदर गाडी पंक्चर झाल्यास पंक्चर काढण्यासाठी खास जीपची व्यवस्था केली आहे. हंगामात तोडणी मजूर आजारी पडल्यास किंवा अपघातात सापडल्यास त्यांच्या औषधाचा व जेवणाचा खर्च कारखाना करतो.कारखान्याचे खर्चाने मोफत औषधोपचार केला जातो. तोडणी मजुरांच्या स्त्रिया प्रसूत झालेस त्यांना औषधोपचारासाठी मदत देण्यात येते.

कारखान्याच्या सभासदांसाठी कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोफत ताग बियाणांचा पुरवठा केला जातो. सभासदांना गोबर गॅस प्लँटसाठी २००० रुपये सबसिडी दिली जाते. चार एकराखालील शेतकऱ्यांना रासायनिक खताचा पुरवठा करुन त्यांची वसुली बिलातून केली जाते. प्रेसमड प्रतिटन दोन रुपये प्रमाणे सभासदांना शेतावर पोहोच केली जाते.सर्व सभासद व बिगर सभासद यांच्या सर्व ठेवी व्याजासह वेळेत परत केल्या आहेत. सभासद व बिगर सभासदांना एकच ऊस दर दिला जातो. कारखान्याच्या वेगवेगळ्या सभांना सभासदांना आणणे व परत जाणेस वाहनाची सोय केली जाते. सर्व सभासदांना दरमहा तीन रुपये किलो दराने दहा किलो साखर दिली जाते व दीपावली सणाकरिता जादा १० किलो साखर दिली जाते. कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट बियाण्यांसाठी कारखाना रोपमळे स्वत:चे खर्चाने करतो. सभासदांच्या इले. मोटारींची दुरुस्ती नाममात्र खर्चात करुन दिली जाते. इतर कारखान्यात पालापाचोळ्याची टनाला १० किलो कपात केली जाते पण हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखान्यात ही कपात केली जात नाही. पंधरा मार्च नंतर येणाऱ्या ऊसाच्या वजनात काही प्रमाणात घट येते त्याची भरपाई म्हणून प्रती टन ४० रुपये प्रमाणे जादा रक्कम दिली जाते. हुतात्मा साखर कारखान्याच्या कामगारांना प्रती वर्षी ४० % बोनस देण्याचा विक्रम केला आहे.



कारखाना कार्यक्षेत्रातील १५ गावातील रस्ते डांबरी करुन कारखान्याने दिले आहेत. रस्ते दुरुस्तीही केली जाते. कार्यक्षेत्रातील जलसिंचन योजना कारखान्याने ताब्यात घेऊन अर्थसाहाय्य केले आहे. नागठाणे बंधाऱ्यातून कार्यक्षेत्रात बारमाही कृष्णेचे पाणी उपलब्ध करुन दिले आहे.

गाळपासाठी पूर्णपणे पक्व झालेलाच ऊस आणला जातो. जास्तीत जास्त साखर उतारा असणाऱ्या ऊसाला तोड दिली जाते. जास्तीत जास्त ताजा ऊस पुरवला जातो. ऊस तोड जमिनीबरोबर घासून केली जाते कारण तळात साखरेचे प्रमाण जास्त असते. बगॅसवर जास्तीत जास्त पाण्याचा वापर करुन वाया जाणारी साखर वाचवली जाते. स्टीमचा वापर कमी केला जातो. त्यामुळे बगॅस बचत सहा ते सात टक्के होते. गाळप क्षमतेचा वापर जास्तीत जास्त केला जातो. एकूण चार मिलमधील रिडयूस्ड मिल इक्सट्रॅक्शन ९६ चे जवळपास इतके जास्त असते. त्यामुळे गेली १७ वर्षे साखर उतारा भारतात पहिल्या नंबरने आला आहे. साखरेची प्रत, कणाचा आकार इतर कारखान्याचे मानाने मोठा असतो. त्यामुळे बाजारात साखरेला इतरांपेक्षा प्रति पोत्यास ८ ते १० रुपये जास्त दर मिळतो. एम ३० च्या साखरेचे प्रमाण ३० टक्के ठेवल्याने प्रति पोत्यास १५ ते २० रुपये जादा दर मिळतो. त्यामुळे कामगारांना रिकव्हरीचा फायदा म्हणून वर्षाला २००० रुपये सर्व कामगारांना रिकव्हरी बक्षीस दिले जाते.

कारखान्यात स्वच्छता उत्तम राखली जाते. पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी इ.टी.पी. प्लँट बसवून स्वच्छ केलेले पाणी शेतकऱ्यांच्या शेतीला ८०% फ्रेशवॉटर मिसळून एकरी ५०० रुपये पाणीपट्टी आकारुन दिली जाते.

शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यातही कारखान्याने घोडदौड चालू ठेवली आहे. कार्यक्षेत्रातील बालवाड्या शिक्षिकांना दरमहा ३०० रुपये मानधन दिले जाते. शालेय साहित्य कारखाना पुरवतो. तोडणी मजुरांच्या मुलांसाठी साखर शाळा–बालवाडी सुरु असून शिक्षिकेस ९८६ रुपये मानधन दिले जाते. मुलांना दररोज खाऊ, फळे दिली जातात. कार्यक्षेत्रातील पहिलवानांना वजनाप्रमाणे ३०० ते ८०० रुपये मानधन दिले जाते. अहिरवाडी येथे कारखान्याने सांस्कृतिक भवन बांधून दिले आहे. मूक–बधीर मुलांना शिक्षणासाठी दरवर्षी १,००० रुपये अर्थसाहाय्य केले जाते. कार्यक्षेत्रातील नदीवरील होड्यांना दरवर्षी प्रत्येकी १,००० रुपये दुरुस्तीसाठी मदत केली जाते. वाळवा येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ मोफत कला, विज्ञान महाविद्यालय सुरु केले आहे. हुतात्मानगर (सोनवडे) येथे विद्यालय व वसतिगृह कारखान्याच्या खर्चातून सुरु केले आहे. दलित, आदिवासी साहित्य संमेलनाकरिता अर्थसहाय्य केले जाते. मुलांची मोफत जेवण्याची, राहण्याची सोय केली आहे. मुलींच्यासाठी १ कोटी २३ लाख रुपये खर्चून कारखान्याने सर्व सोयींचे मोफत वसतिगृह बांधले आहे. कोयना व वारणा प्रकल्पग्रस्तांसाठी कारखान्याने आर्थिक साहाय्य केले आहे. कार्यक्षेत्रामधील व बाहेरील शिक्षण संस्थांना आतापर्यंत ५ कोटी रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य केले आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील संचालकांची निवड त्या त्या गावच्या गाव सभेतून एकमताने केली जाते. एकवेळ कारखान्याचा चेअरमन, व्हा. चेअरमन व संचालक झालेल्या व्यक्तीची पुन्हा निवड केली जात नाही. दर पाच वर्षांनी संचालक मंडळात नविन शेतकरी सभासदांची निवड केली जाते. वैभव नायकवडी व त्यांचे सहकारी यांनी हुतात्मा सहकारी बँक, हुतात्मा

सह.दूध उत्पादक संघ, क्रांतिसिंह नाना पाटील शेतीमाल प्रक्रिया संस्था, हुतात्मा मध्यवर्ती सहकारी होलसेल व रिटेल ग्राहक भांडार या संस्था वाळवा येथे सुरु केल्या आहेत. शेतकऱ्यांना समान पाणी वाटप होण्यासाठी मोठी चळवळ सुरु केली आहे. शेतमजूर कष्टकरी स्त्री संघटना, क्रांतिकारी विद्यार्थी संघटना, शेतमजूर-कष्टकरी शेतकरी संघटना अशा संघटना मजबूत करणेसाठी कारखाना मदत करीत आहे. कार्यक्षेत्रातील रस्त्यांचे दोन्ही बाजूस आंबा व नारळाची हजारो झाडे लावली.

हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्यास वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ, राष्ट्रीय सहकारी संघ यांची साखर उतारा, तांत्रिक क्षमता, सर्वाधिक साखरेचे प्रमाण याकरीता सतत पारितोषिके मिळाली आहेत.

गेल्या १९ वर्षात विविध उपक्रमांद्वारे कार्यक्षेत्रामध्ये कारखान्याने आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय पातळीवर परिवर्तन घडवून आणले आहे. तरुणांना रोजगार उपलब्ध झाला आहे. कारखान्यात कायम व हंगामी ७०८ कामगार काम करीत आहेत. त्यापैकी मराठा ४०६, बलुतेदार अल्पसंख्य १३८, मागासवर्गीय १११, मुस्लीम ४५, जैन ७ ख्रिश्चन १ व १२ नंदीवाले असे समाजातील सर्व वर्गातील लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारुन परिसराचा विकास झाला आहे. पाणी पुरवठा योजनाच्या माध्यमातून बारमाही पाण्याची सोय झाली शेतीचा विकास होत आहे. तसेच बालवाडी ते पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय झाल्यामुळे शैक्षणिक, सांस्कृतिक विकासाची गती वाढली आहे. त्यामुळे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना सहकार क्षेत्रात दीपस्तंभ ठरला आहे. याचे सर्व श्रेय क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी यांच्या कुशल नेतृत्वाला, मार्गदर्शनाला आणि कार्यकुशलतेला आहे.

महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीत जास्त भाव देणारा, ऊसामधील जास्तीत जास्त उतारा काढणारा, युनियन न करता कामगारांना जास्तीत जास्त वेतन देणारा, ऊस तोड कामगारांना जास्तीत जास्त सोयी पुरविणारा हा एकमेव कारखाना ''हुतात्मा पॅटर्न'' म्हणून सुप्रसिद्ध आहे व त्याचा जन्मदाता, प्रणेता व मार्गदर्शक क्रांतिवीर नागनाथ नायकवडी ही थोर व्यक्ती आहे. हुतात्मा पॅटर्न म्हणजे 'इथे जे आहे ते दुसरीकडे नाही, दुसरीकडे जे आहे ते इथे नाही' असे म्हणता येईल.

सर्वात लक्षात येईल असे वैशिष्ट्य म्हणजे कामगारांना विश्वासात घेऊन काम कसे करायचे, त्यांना प्रोत्साहन कसे द्यायचे, अधिकाऱ्यांचा वरचष्मा कसा चालू द्यायचा नाही आणि अधिकाऱ्यांनीही कामगारांचे सहकार्य घेऊन उत्पादन कसे वाढवावयाचे याचा नागनाथ अण्णांनी एक आदर्श निर्माण करुन ठेवला आहे. संपत कमिशनचे फायदे तर सर्वांनाच मिळत होते पण कारखान्याची गाळप क्षमता १२५० मे. टन असताना अण्णांच्या देखरेखीमुळेच सतराशे ते अठराशे टनापर्यंत गळीत झाले होते.

साखरसुध्दा १ नंबरची वीस टक्के, बी ग्रेड तीस टक्के आणि सी ग्रेड पंचेचाळीस टक्के निघते. त्यामुळे क्विंटलमागे इतर साखर कारखान्यापेक्षा साखरेला भावसुध्दा पंधरा वीस रुपयांनी जास्त मिळतो. म्हणजे उताऱ्यात पहिला नंबर, गळीत ही चांगले, साखरही चांगली व उच्च प्रतीची, अनुभवी कामगारांचे, तज्ज्ञ केमिस्टांचे, उत्तम कौशल्य यामुळे ऊसाला भावही



जास्त देतात हा एक नमुनेदार कारखाना म्हणून प्रसिध्द आहे.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यामागे नागनाथ अण्णांचा कारखान्यास ऊस घालणारा शेतकरी कसा सुखी होईल हाच सतत विचार करीत असतात. कारखान्याचा पारदर्शी व्यवहार व व्यवस्थापन चांगले आहे. रिकव्हरी म्हणजे काय हे त्यांनी शेतकऱ्यांना दाखवून दिले. शेतकऱ्यांची होणारी प्रचंड पिळवणूक थांबली. त्यामुळे प्रस्थापित साखर सम्राट दुखावले. त्याची पर्वा न करता अण्णा शेतमजूर, कष्टकऱ्यांचे, कामगारांचे हित जपण्यास नेहमी प्राधान्य देत आले आहेत. त्यामुळेच १५ गावे कार्यक्षेत्र असलेला कारखाना ५ कोटी ४९ लाखाचे कर्ज फेडून मोकळा झाला. आज हुतात्मा पॅटर्नची किमया पाहण्यासाठी देशपरदेशामधून जिज्ञासू भेट देऊन माहिती घेतात आणि आश्चर्य करतात. या कारखान्याने आत्तापर्यंत सर्वोत्कृष्ट कार्यक्षमता, साखर उतारा, अर्थ नियोजन, उत्पादकता, तांत्रिक क्षमता या बद्दल राष्ट्रीय व राज्य पातळीवर ४० पुरस्कार मिळविले आहेत. प्रत्येक वर्षी पुरस्कार मिळविणारा हा एकमेव सहकारी साखर कारखाना आहे. साखरेची जास्तीत जास्त निर्मिती, साखरेचा जास्तीत जास्त उतारा व शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर देण्याची प्रथा पाडून ती परंपरा अखंडपणे चालू आहे.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक आहेत. लोकाग्रह होत असतानाही ते समजून उमजून जाणिवपूर्वक कारखान्याचे सभासद झाले नाहीत पण साखर कारखान्याच्या सर्व कामकाजावर त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटला आहे. महाराष्ट्रातल्या साखर धंद्याला एक वेगळे वळण देण्याचे काम त्यांच्या नेतृत्वामुळे निर्माण झाले. अण्णांच्या नेतृत्वाखाली परिसराचा शैक्षणिक, औद्योगीक, आर्थिक, सामाजिक विकास साधत असतानाच शेतमजूर, शेतकरी, दुष्काळग्रस्त, प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त, साखर कामगार वगैरेंच्या अनेक पुरोगामी आंदोलनास या साखर कारखान्याचे माध्यमातून अण्णांनी मदत करण्यात पुढाकार घेतला आहे. सर्वांच्या कल्याणासाठी एक विश्वस्त म्हणून अण्णांची ही घोर तपश्चर्याच म्हणावी लागेल.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या वेगळेपणाबद्दल कॉ. दत्ता देशमुख यांनी म्हटले आहे, ''शेती मालाला योग्य भाव मिळावा आणि व्यापारी, सावकार यांच्या कचाट्यातून सुटका व्हावी या उद्देशाने सहकारी साखर कारखान्याची चळवळ वाढली. पण पूर्वीचे हे स्वरुप आता राहिले नाही. आता सहकारी साखर कारखाने हे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचे एक साधन बनले आहे. या पार्श्वभूमीवर ''हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखाना एक नमुनेदार कारखाना आहे.''

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना उभारणीत प्रत्यक्ष सबंध आलेल्या बकाऊ उल्फ कंपनीचे मुख्य अधिकारी श्री. दारा दमानिया - हुतात्मा कारखान्याचे संस्थापकाबद्दल म्हणतात, ''नागनाथ अण्णासाहेब आणि त्यांचा कारखाना यांचेशी गेली २० वर्षे संबंध आहेत. जेव्हा जेव्हा आम्ही जादा यंत्रसामग्रीबद्दल चर्चा केली तेंव्हा अण्णांचे लक्ष नेहमी गुंतवणुकीतून मिळणाऱ्या मोबदल्यावर होते. त्याचबरोबर कार्यक्षमतेमधील सुधारणा आणि पर्यावरण यावरही भर दिला. कारखान्यातील सर्व सबंधितांची संमती घेऊनच सर्व निर्णय घेतले होते. त्यासाठी सर्वसाधारण सभाही बोलावली होती व सभेत सर्वांपुढे असे पारदर्शी महत्त्वाचे निर्णय घेतले होते कार्यक्षमतेशी कोणतीही तडजोड न केल्यामुळे आणि कमीत कमी गुंतवणुकीमुळे कारखान्यातील मूळ यंत्रसंचाची गाळपक्षमता तिप्पट झाली. कारखान्याने अनेक क्षेत्रामध्ये नवीन उंची गाठलेली आहे आणि अनेक

कार्यक्षमता पुरस्कार मिळविले आहेत. हा कारखाना इतर सर्व साखर कारखान्यांसाठी आदर्श नमुना ठरलेला आहे. आणि आसपासच्या प्रदेशासाठी अमूल्य वरदान ठरलेला आहे. या सर्व गोष्ठी शक्य होण्याचे एकमेव कारण म्हणजे नागनाथ अण्णांच्या जवळ असलेली दूरदृष्टी, योग्य व समर्थ मार्गदर्शन, निःस्वार्थी नेतृत्व आणि दिवसरात्र काम करण्याची उमेद होय''

इतर सामाजिक चळवळींच्या कामात मग्न असताना सुध्दा हुतात्मा कारखान्याच्या दैनंदिन कामकाजामध्ये मा. आण्णांचे बारीक लक्ष असते. त्याबरोबरच कारखान्याचे आजी-माजी चेअरमन, संचालक, शेतकरी, कार्यकर्ते, कामगार, शिक्षक या सर्वांच्याबरोबरच सुपुत्र किरण (दादा), वैभव (काका) तसेच जयवंत अहिर, वसंत पवार हे सर्व जण कारखान्याची उत्तरोत्तर प्रगती साधण्यामध्ये यशस्वी झाले आहेत. साखर उताऱ्यामध्ये हुतात्मा कारखान्याने अनेक पुरस्कार मिळवले आहेत. अण्णांच्या अलौकीक गुणांमुळे हा साखर कारखाना कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्रा बाहेरील ऊस पुरवठा करणारे शेतकरी, शेतमजूर, साखर कामगार, शिक्षक, विद्यार्थी, इतर सर्व सामान्य जनता या सर्वांना हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखाना आपला आपलासा वाटतो. मा. नागनाथ अण्णांच्या निःस्वार्थ, लोकाभिमुख, पारदर्शी कारभार इ. कार्यकुशलतेचा वारसा यशस्वीपणे त्यांचे सुपुत्र पुढे चालवत आहेत व त्यास लोकमान्यता मिळाली आहे. त्यामुळेच राज्यामध्ये या कारखान्याचा ''हुतात्मा पॅटर्न'' आदर्श असा मानला गेला आहे.

* * * *



कारखाना साईट भेटी प्रसंगी
मा. नागनाथ अण्णा नायकवडी समवेत जिल्हाधिकारी मा. रत्नाकर वाघ,
सब रजि. मा. एन. वाय. मुजावर, अण्णांचे बंधू शामराव नायकवडी व चेअरमन-शामराव सव्वाशे.

## २१

# क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी

समाजामधील प्राचीन अथवा अर्वाचीन वास्तू, मंदिरे व पुतळे पाहिल्या बरोबर जिज्ञासा निर्माण होते-त्या वास्तूचा निर्माता कोण होता. तसेच समाजामध्ये सर्वसामान्यांच्या लोककल्याणाकरिता झटणारा, दलितांचे, दुर्लक्षितांचे अश्रू पुसणाऱ्या लोकनेत्यांकडे व क्रांतिकारकांकडे पाहताना जिज्ञासा होते की, या अफाट व महान कार्य करणाऱ्या महापुरुषाची माता कोण आहे? प्रत्यक्ष माहिती मिळाल्यावर खात्री पटते की क्रांतिवीरांना जन्म देणारी, त्यांच्यावर क्रांतीचे, चळवळीचे संस्कार करणारी थोर क्रांतिमाताच होती. ती फक्त क्रांतिवीरांची माता नसून सर्वांची 'आई' होती.

क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या मातोश्री क्रांतिमाता नायकवडी यांना वरील सर्व विशेषणे लागू पडतात. वाळवा गावांत सर्वत्र 'आईसाहेब' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्रांतिमाता लक्ष्मीबाई यांचा जन्म आष्ट्याजवळच्या मिरजवाडी येथील संभाजी आप्पा साळुंखे यांच्या घराण्यात झाला. आईसाहेबांचे वडील कष्टकरी शेतकरी कुटुंबातले व अत्यंत देखणे व्यक्तिमत्त्व लाभलेले सैन्यातील सुभेदार मेजर हुद्द्यावर कलकत्ता येथे नेमणुकीत होते. त्यांना दि. ९ ऑगस्ट १९०० रोजी लक्ष्मीबाई ही पहिली मुलगी झाली. सात मुलीनंतर बाबासाहेब हा एक मुलगा झाला. मोठ्या मुलीनंतर मुलगा नव्हता म्हणून थोरली लक्ष्मीबाई वडिलांची लाडकी होती. कलकत्ता येथेच लक्ष्मीबाई यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण झाले. त्यामुळे त्या अस्खलित हिंदीमध्ये बोलत. बालपणामध्ये त्यांनी हजारो सैनिकांची संचलने, रणगाडे, बंदुका, स्टेनगन्स पाहिल्या. त्यामुळेच पुढे १९४२ च्या आंदोलनात जेव्हा त्यांनी भाग घेतला त्यावेळी त्या महिलांच्या, पुरुषांच्या बैठकीत, सभेत व मोर्चामध्ये निर्भयपणे पोलिसांविरुध्द आग ओकत असत. बंदुकांची फुकण्या म्हणून संभावना करीत. पांच पाचशे पोलिसांनी एका रात्रीत चार चार वेळा त्यांच्या घराला गराडा घातला तरी त्या डगमगल्या नाहीत.



१९१२ मध्ये त्यांचा रामचंद्र गणपती नायकवडी यांच्याशी विवाह झाला. श्री. नायकवडी हे एक कष्टाळू शेतकरी होते. कोणाच्या सुतळीच्या तोड्याची अपेक्षा करावयाची नाही आणि कोणाच्या वाळल्या पाचोळ्यावर पाय द्यायचा नाही. चांगली शेती करायची, सज्जनांच्या संगतीत रहायचे, गोरगरिबांची मैत्री करायची असा त्यांचा जीवनक्रम होता. १९१६ च्या दरम्यान जन्मलेली त्यांची दोन मुले अकाली वारली. पुढे १९२२ मध्ये नागनाथ अण्णा व १९२५ मध्ये शामराव अप्पांचा जन्म झाला. पहिली दोन मुले अकाली वारल्यामुळे साहजिकच या दोघांचे संगोपन आईनी जीव लावून केले. नागनाथ अण्णांनी खूप शिकावे असे आईला वाटत असे. तर वडिलांना तो मोठा पहिलवान व्हावा असे वाटत होते. अशा द्विधा मनस्थितीत आईंनी मुलांचेवर शिक्षणाचे संस्कार घडविले.

पुढे नागनाथ अण्णांनी मॅट्रीकचा अभ्यास सोडून १९४२ च्या लढ्यात उतरल्यावर आईंनी अडथळे न आणता स्वातंत्र्य लढ्यामध्ये नागनाथ अण्णांना प्रोत्साहन दिले व स्वत:ही स्वातंत्र्य चळवळीत सामील झाल्या होत्या. स्वातंत्र्यलढ्याचे काळात भूमिगतांना जेवण देणे, निरोप पोहोचवणे, हत्यारे पोहोचवणे, हत्यारे लपवून ठेवणे, आश्रयास आलेल्या व झोपलेल्या भूमिगतांचे रक्षण करणे, बातम्या फुटू न देणे, पोलिसांना हूल देऊन चकवणे, तुरुंगात गेलेल्या, स्वातंत्र्यलढ्यात हुतात्मा झालेल्यांच्या कुटुंबियांना आधार देणे, शक्य ती मदत करणे, अशी महत्त्वाची कामे आई अविश्रांतपणे करीत होत्या. अशा सर्व कार्यात आई अग्रेसर होत्या. भूमिगतांचा ठावठिकाणा सांगत नाहीत म्हणून सरकारने आईंना व त्यांचे पती रामचंद्र नायकवडी यांना तुरुंगात डांबले. आईंना इस्लामपूर, मेढा, वाई, येरवडा येथील तुरुंगात चार महिने ठेवले होते. तर रामचंद्र नायकवडी यांना नऊ महिने तुरुंगात ठेवले होते. नागनाथ अण्णांना वाळवा येथे अटक झाली त्यानंतर साताऱ्याच्या जेलच्या तटावरुन उडी मारुन पलायन केलेमुळे नागनाथ अण्णांवर वॉरंट सुटले होते. परंतु स्वातंत्र्य मिळेपर्यंत ते पोलिसांना सापडले नाहीत. पुढे स्वातंत्र्य मिळालेवर हत्यारे जमा केली नाहीत म्हणून खेर-मोरारजी सरकारने अटक करणेस वॉरंट काढले व त्यांना अटक केली होती. आईंनी हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा सांगली कलेक्टर कचेरीवर काढून अण्णांना सोडवून आणले होते. जीवन मरणाचे असे अनेक प्रसंग आल्यामुळे आईंचा स्वभाव सावध, संशयी, हेकेखोर व हट्टी बनला होता. नव्या पिढीला या स्वभावाचा अर्थ अनेकवेळा कळायचा नाही.

१९४० पासून आईनी घरच्या संसारापेक्षा नागनाथ अण्णांचे संरक्षण करणे, त्यांच्या पाठीमागे उभे राहणे, त्यांनी उभारलेल्या संघर्षाच्या चळवळी विधायक, रचनात्मक, शैक्षणिक कामे करणाऱ्या संस्था जोपासणे, कार्यकर्त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करणे आईने महत्त्वाचे मानले, त्या कामामध्ये कोठे अडसर निर्माण व्हायला लागला तर उग्र रणचंडीचे रुप घेऊन आडवे येईल त्या व्यक्तीवर, शक्तीवर आग ओकणे हा आईंचा जीवनक्रम बनला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती लढा, भूमिहीन शेतमजुरांचा लढा, ऊस झोन दुरुस्ती चळवळ, हुतात्मा कारखाना, विद्यालय, वसतिगृहे उभारणेचे विधायक काम, शाळेच्या सहली, क्रीडा महोत्सव, दलित आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलन, कामगार, शेतमजूर, यांच्या परिषदा, सभा बैठका अशा सर्व कार्यात आईंचा नेहमी पुढाकार असे. आईंनी अनेकांचे तंटे सोडवले, अनेकांची लग्ने लावली, अनेक परित्यक्तांचे संसार सुरु केले, कितीतरी गरिबांच्या मुला मुलींना शिक्षण

देऊन नोकऱ्या मिळवून दिल्या. सर्व सामान्यांच्या मुला-मुलींना जिल्हा, राज्य व देश पातळीवरचे खेळाडू बनवले.

वयाच्या ७५ वर्षानंतर आई ही एक व्यक्ती राहिली नव्हती; ती एक उग्र, मंगल, दाहक शक्ती बनली होती. विधायक व रचनात्मक कामाची ती एक गंगोत्री बनली होती. गट, तट, पक्ष, पंथ, जात, धर्म, गरिबी, श्रीमंती, स्पृश्य, अस्पृश्य या भिंती आईंनी केव्हाच नष्ट केल्या होत्या.भेटेल त्यांच्या गालावरुन हात फिरवून तू माझा पोरगा हाय म्हणायच्या. मनापासून विचारपूस करायच्या. कोण चुकले तर रागे भरायच्या, जरा सुधरायचं बघा म्हणायच्या, मंत्री असो व कलेक्टर असो त्यांचे मनगट पकडून कामे करुन घ्यायच्या. साखराळच्या वाळवा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक ना. राजाराम बापू पाटील, हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखान्यास पाठिंबा देत नव्हते. आईनी वाळव्यात हुतात्मा चौकात आडवून त्यांच्या सोबत असणाऱ्या साखराळे साखर कारखान्याचे चेअरमन श्री. बाबासाहेब पाटील यांच्या कडून हुतात्मा साखर कारखान्यास ना हारकत पत्र मिळवले. इंदिरा गांधी, अरुणा असफअल्ली, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, दत्ता देशमुख यांच्याशी प्रेमाने व अधिकारवाणीने बोलत.

स्वानुभव आणि निरीक्षण हे आईचे गुरु होते. तर कर्मवीर भाऊराव पाटील व क्रांतिसिंह नाना पाटील ही आईची दैवते होती. कर्मवीर अण्णांना पहिल्यांदा आईंनी पाहिले आणि स्वत: पायात चप्पल घालायचं सोडलं. क्रांतिसिंह नाना पाटील आजारी पडले. या दु:खाने आईचे मन तिळतिळ तुटे, लांबून पाहणाऱ्याला उग्र वाटणारी सर्वांची आई वस्तुत: अतिशय हळवी होती. मनस्वी होती. सतत घारीसारखी सर्वांभोवती फिरायची, झोपलेल्यांच्यावर हात फिरवावयाची. मुलांना व येणाऱ्यांना पोटभरुन वाढत चला अस बायकांना सांगायची.

दलित आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलनाचे वेळी एक मुलगा खड्या आवाजात ''उष:काल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली'' हे गाणे म्हणत होता. दुसरा ''तुम्ही चळू नका, कुणी पळू नका, माग वळू नका'' तो गाणं म्हणत होता. गहिवरुन त्या दोघांच्या तोंडावरुन हात फिरवून तेथे असलेल्या डॉ. बाबूराव गुरव यांना म्हणाल्या ''ह्या दोघास्नी एक एक रुपया इनाम द्या,'' आणि पोरांना म्हणाल्या, ''पोरानु हे ध्यानात ठेवा, इसरु नका, भिऊ नका, एक गठ्ठा व्हा, माझ्या अण्णाला पाठबळ द्या आणि गोरगरिबांची कामे करा.''

मिरजेला मिशन हॉस्पिटलमध्ये सौ. कुसुमताई आजारी असताना त्यांचे वडिलांचे घरुन जेवण डब्यातून यावयाचे. प्रसंगानुरुप मूल, भावंडं किंवा वडील-आई कुणीही आणत असत. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलेवर तीन महिने जेवण गेलेच नव्हते. पाणी व इंजेक्शनवर त्या होत्या. श्री. नायकवडी यांच्या तीन कार्यकर्त्यांनी रक्त दिले होते. त्यानंतर तीन महिन्यांनी थोड अन्न पचू लागले. आजारपणापूर्वी थोरला किरण झाला व आजारपणानंतर दोन मुली व दोन मुलगे झाले.

सौ. कुसुमताई, कु. विशाखा, कु. प्रगती यांनी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊस शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे बोर्डींच्या खोलीत अन्न शिजवून कॉलेजचे शिक्षण पुरे केले. चि. अरुण व चि. वैभव कॉलेजच्या होस्टेलमध्ये ठेवले होते व त्यांच्या खर्चाची व्यवस्था सौ. कुसुमताई पगारातून करीत असत.



१९४२-४४ च्या स्वातंत्र्य लढ्यातील आईचे कार्य १९७२ चे रस्त्यासाठी साराबंदी आंदोलन, हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्यासाठी नाहरकत पत्र, किसन अहिर विद्यालयाच्या मुलामुलींनी मिळविलेले खेळामधील प्राविण्य, वगैरेसाठी आईंनी खरे तर इतिहास घडविला आहे.

१९८५ चे निवडणुकीनंतर वसंतदादा चौथ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले होते. त्यानिमित्त सांगलीत त्यांच्या सन्मानार्थ भव्य मिरवणूक निघाली होती. दादा उघड्या जीपवर होते. हार-तुरे स्वीकारत होते एका बोळाचे तोंडाशी आई (लक्ष्मीबाई) उभ्या होत्या. हातात हार होता. जवळून धों. म. मोहिते जात होते. त्यांना हाक मारली, 'ए, वडगांवकर हीकडं ये, दादाला म्हणावं इथं नागनाथाची म्हातारी उभी हाय. मी तिकडं गर्दीत येणार नाय.' मोहिते दादांचेपर्यंत पोहोचले आणि त्यांना निरोप दिला. दादा लगबगीने खाली उतरले आणि आईंना नमस्कार केला. आईनी दादांना हार घातला व म्हणाल्या, ''मी कवाची वाट बघतोया.''

हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या प्रत्येक विकासाच्या कार्यक्रमात आई जातीने लक्ष घालीत. अण्णा रशियाला गेले तेव्हा हुतात्मा किसन अहिर साखर कारखाना आणि विद्यालयाची जबाबदारी डोळ्यात तेल घालून आईंनी पार पाडली. त्यावेळी त्या जयवंत अहिरांना म्हणाल्या ''अरं साहेब होऊ नका, काम करा.'' त्यांच्या अशा बोलण्यातही प्रेम होते. म्हणून त्यांच्या बोलण्याचा कोणालाही राग येत नसे. आईसाहेबांच व्यक्तीमत्व भारदस्त दिसे ते त्यांच्या कपाळावरच्या ठसठशीत कुंकवामुळे हुतात्मा कारखान्याच्या रविवारच्या मिटींगच्या वेळी तसेच इतर महत्वाच्या कामाच्या वेळी त्या स्वत:च्या हाताने कुंकूमतिलक लावत व खडीसाखरेचा खडा देत असत. कुंकूमतिलक हे यशाचे, विजयाचे प्रतिक मानले जाते. पुढे तर सर्वांची अशी खात्रीच पटली कि कुंकूमतिलक लावून, खडीसाखर घेऊन गेलो कि काम फत्ते. नागनाथ अण्णांचे कार्यकर्ते आठवणीने कुंकवाची डबी वरचेवर भरायचे. पण आईसाहेब ती डबी कुठेच व कधीच ठेवायच्या नाहीत. ती नेहमी त्यांच्या बरोबर असे.

रविवार दि. २५ जून १९८९ हुतात्मा कारखान्याची आठवड्याची मिटींग संपली सर्वांना नाम ओढले व डबी टेबलावर ठेवली आणि त्या म्हणाल्या, ''यात भर घाला'' कुणाच्या ध्यानीमनी नसताना काळाने त्यांच्यावर झडप घातली. आजही मिटींग सुरु होताना त्याच डबीतील कुंकूमतिलक लावले जाते.

अशा ज्येष्ठ लढवय्या स्वातंत्र्य सेनानीच्या माता सौ. लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी यांचे वयाचे ८५ व्या वर्षी वाळवा येथे राहत्या घरी हृदय विकाराचे तीव्र झटक्याने दि. २७ जून १९८९ रोजी सकाळी ९ वाजून ४० मिनिटाने दु:खद निधन झाले. नायकवडी कुटुंब आणि वाळवा गाव आईंनी पोरके केले. नागनाथ अण्णांना व नातवांना दररोजची न्याहरी करुन दिली व विश्रांती घेत बसल्या असतानाच सकाळी साडेनऊनंतर त्यांच्या छातीत दुखू लागले. ताबडतोब शेजारचे हुतात्मा किसन अहिर शाळेतून नागनाथ अण्णांना बोलावले. तेवढ्या वेळात हृदय विकाराचा तीव्र झटका येऊन त्या अत्यवस्थ झाल्या होत्या. नागनाथ अण्णांनी घरी येऊन डॉक्टरांना बोलवेपर्यंत आईंचे देहावसान झाले.

सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांचे देहावसान झाल्याची बातमी वाळवे गावात समजताच गावातील सर्व व्यवहार बंद झाले. बँका, शाळा, विद्यालये, हुतात्मा किसन अहिर साखर

कारखान्याचे व्यवहार बंद पडले. आईंच्या अंत्यदर्शनासाठी नागरिकांनी गर्दी केली. दुपारी दीड वाजता अंत्ययात्रा निघाली. सजवलेल्या ट्रॅक्टरमध्ये आईंचा पार्थिव देह ठेवला होता. अंत्यदर्शनासाठी वाळवे व परिसरातून तसेच सांगली, कोल्हापूर, कराड, सातारा येथून आलेले लोक त्यांच्या पार्थिव देहावर फुले वाहून दर्शन घेत होते. कारखान्याचे कर्मचारी, विद्यार्थी, महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. महिलांना दु:ख अनावर झाले होते. अनेक महिलांनी पंचारतीने आईंच्या पार्थिवास ओवाळले. अनेक गावांतून आईंच्या निधनाचे वृत्त समजताच शेकडो कार्यकर्ते, शेतकरी मिळेल त्या वाहनाने वाळव्यास येत होते. अंत्ययात्रेत साखर कारखान्याचे चेअरमन तातोबा वाजे, सर्व संचालक, अधिकारी, अण्णांचे वडील रामचंद्र नायकवडी सहभागी झाले होते. वाळव्याचे पूर्वेस कृष्णातिरी दुपारी सव्वाचार वाजता अंत्ययात्रा पोहोचली. तेथे नागनाथ अण्णा व बंधू शामराव नायकवडी यांनी आपल्या आईच्या पार्थिवास अग्नी दिला. अंत्यसंस्काराचे वेळी कोणतेही धार्मिक संस्कार करणेत आले नाहीत. यावेळी हजारो स्त्री-पुरुष उपस्थित होते. अत्यंत दु:खी अंत:करणाने उभे राहिलेले क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांना दु:ख सहन न झालेने त्यांना रडू कोसळले. तसेच उपस्थित लोकांनाही अश्रू आवरता येत नव्हते.

हे लिहीत असताना मला कवी कुसुमाग्रज यांच्या क्रांतीचा जयजयकार मधील ओळी आठवल्या. क्रांतिकाराच्या चितेस अग्नी देताना ते म्हणतात.

कशास आई, भिजविसी डोळे उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल
सरणावरती आज आमुची पेटतात प्रेते
उठतील त्या ज्वालातून भावी क्रांतीचे नेते,
लोहदंड तव पायामधले खळखळा तुटणार
आई खळाखळा तुटणार - गर्जा जयजयकार
क्रांतीचा गर्जा जयजयकार !

असे कै. लक्ष्मीबाईच्या आत्म्याने भारतमातेस विचारलेच असणार हे सत्य आहे.

अंत्यसंस्कारानंतर त्याच ठिकाणी शोकसभा झाली. अनेक वक्त्यांनी क्रांतिमाता, देशाभिमानी करारी माता आईसाहेब यांना वाळवा पंचक्रोशी मुकली आहे, अशा शब्दात श्रध्दांजली वाहिली. त्यावेळी प्रा. बाबूराव गुरव, डी. डी. पाटील, सुमित्रा पाटील (कोल्हापूर) आदींची भाषणे झाली.

भारदस्त व्यक्तिमत्त्वाच्या लक्ष्मीबाई वाळवा परिसरातील आदरस्थानी व प्रेरणास्थानी होत्या. त्यांच्या निधनानं या मातीचे चैतन्य हरविल्याची भावना दिसत होती. आईसाहेब काळाच्या पडद्याआड गेल्या तरी वाळव्याच्या क्रांतिभूमितील त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा स्मृतिगंध मात्र आजही दरवळत राहिला आहे.

शोक संदेश पाठवताना कासेगावच्या इंदूताई पाटणकर म्हणतात ''मी तुम्हाला यशोतिलक लावते, तुम्ही उठा, कामाला लागा, एकीनं रहा, थांबू नका, माणुसकीच्या हक्कासाठी लढा, माणूस म्हणून जगा'' हा आईचा संदेश आहे.

विवेकानंद शिक्षण संस्थेच्या तासगाव येथील कॉलेजामध्ये कै. लक्ष्मीबाई नायकवडी यांना श्रध्दांजली अर्पण केली. वाळवा येथील हुतात्मा किसन अहिर विद्यालयामध्ये श्रध्दांजली



अर्पण करताना मुख्याध्यापक एस. पी. हवालदार म्हणाले. ''क्रांतिमातांची प्रेरणा व आदर्श सतत जागृत ठेवणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल.'' कुंभी कासारी साखर कारखान्याचे कामगारांनीही श्रध्दांजली वाहिली. तसेच किसान लिफ्ट नं. १, ग्रामपंचायत वाळवा, वाळवा ग्राम सेवा सह. सोसायटी, आप्पासाहेब माने, जयकिसान मंडळ माळभाग, हुतात्मा किसन अहिर सार्वजनिक वाचनालय, तुकाराम नागरी सह. पत संस्था नवेखेड, क्रांतिसिंह नाना पाटील शेती माल सह. प्रक्रिया संस्था, ॲड. शिवराम पाटील बोरगांवकर, दिनकरराव सेवा सोसायटी वाळवा,किसान शिक्षण संस्थेच्या सर्व शाखा, आष्टा अर्बन को. ऑ. बँक, हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याचे पदाधिकारी व अधिकारी, कामगार, जोशी कुटुंबीय-औदुंबर, कामगार सभा. गडहिंग्लज साखर कारखाना, कुंभोजकर बंधू सांगली, प्रतिनिधी हायस्कूल कुंडल, हुतात्मा किसन अहिर कामगार पतसंस्था वाळवा, विलासराव थोरात वाळवा, दलित पॅन्थर वाळवा, यांनीही आईंना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

वीरमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांना विनम्र श्रध्दांजली वाहताना पद्मश्री सुधांशूनी काव्यात श्रध्दांजली वाहिली.

## ''क्रांतिमाता''

स्वातंत्र्यरणी रणरागिणी तू तळपलीस माऊली
तुझ्या पाऊली वीर माऊली विनम्र श्रध्दांजली !
झांशीच्या लक्ष्मीपरी तू
फडकविसी शौर्याचा केतू
तववाणी स्वातंत्र्य सैनिका रणभेरी भासली १
भोगुनी कारावास भयंकर
सोन्यापरी उजळशी शुभंकर
तुझ्या कृतीने होऊन दुबळी वीररणी उतरली २
स्वातंत्र्यातही सदा कर्मरत
रामराज्य बनवाया उन्नत
मानवतेची ध्वजा निजकरी धैर्याने मिरविली ३
नित्यशब्द तव प्रेमळ निर्मळ
पाप तापहारी गंगाजल
भाग्यवंत आम्ही म्हणून आम्हाला तव ममता लाभली ४
अवचित आज कशी तू गेलीस ?
साऱ्या अणूरेणूतून भरलीस
उठा करा काही शब्दावली आकाशी दाटली ५
फिरले अजूनही पाठीवर
तुझा माऊली प्रेमळसा कर
या आशेवर जगतो लाभो कृपा सावली ६

**सुधांशू २.७.८९ औदुंबर**

कै. क्रांतिमाता लक्ष्मीबाई यांच्या १२ व्या स्मृतिदिनी वाळवा येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयात एक कार्यक्रम आयोजित केला होता. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु, थोर विचारवंत, प्राचार्य रा. कृ. कणबरकर प्रमुख पाहुणे होते. त्या प्रसंगी ते म्हणाले, ''ज्यांचेपुढे नतमस्तक व्हावे अशा व्यक्ती दुर्मीळ होत चालल्या आहेत. क्रांतीचं एक पर्व संपले. आता खऱ्या स्वातंत्र्याची लढाई चालू झालेली आहे. युध्दकाळापेक्षा शांततेची लढाई अवघड असते. देशाला, समाजाला भ्रष्टाचार, जातीयवाद, गुंडगिरीने ग्रासले असून समाजाला लागलेल्या या कॅन्सरपासून मुक्त होण्यासाठी हुतात्मा संकुलातून शिक्षण घेऊन परिवर्तन घडविणाऱ्या नव्या पिढीची गरज आहे. या संकुलामध्ये केवळ पदवीधर घडत नसून सामाजिक कार्यकर्ते घडतात, ही भूषणावह गोष्ट आहे. समाजाला पुढील काळात प्राणवायू देण्याचे काम हुतात्मा संकुल करेल यात शंकाच नाही. आजचे शिक्षक आणि शिक्षण याबद्दल अजिबात चांगले बोलले जात नाही. शिक्षणामधून मनाची मशागत घडत नाही. केवळ परीक्षा पास कशा व्हावे एवढेच शिकवले जाते. आजचे विद्यार्थी उद्याचा भारत घडवणार आहेत. त्यांच्या मनाची शिक्षकांनी चांगली मशागत केली पाहिजे. जोपर्यंत शिक्षक व शेतकरी हातात हात घालून काम करत नाहीत तोपर्यंत समाजाचा विकास होत नाही.''

क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सौ. राजाक्का कुंभार या गरीब महिलेस कै. लक्ष्मीबाई वापरत होत्या तसले टोपपदरी लुगडे भेट म्हणून देण्यात आले. या पवित्र दिनी नागनाथ अण्णांनी जिजामाता विद्यालयातील १० वीच्या परिक्षेत पहिल्या येणाऱ्या ४ विद्यार्थिनींना ८०० रुपयाची शिष्यवृत्ती देण्याचे जाहीर केले. तसेच हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या १० वीच्या व १२ वीच्या पहिल्या चार विद्यार्थ्यांनाही ८०० रुपयाची शिष्यवृत्ती जाहीर केली. या प्रसंगी उपस्थित असलेले सर्वश्री सौ. कुसुमताई नायकवडी, कॉ. नाना शेटे, डॉ. भारत पाटणकर यांनी क्रांतिमाता लक्ष्मीबाईंच्या आठवणी सांगून समयोचित भाषणे केली.

तांदूळवाडी-बलवडी ता. खानापूर येथील शेतकऱ्यांनी मुक्ती संघर्ष चळवळीच्या माध्यमातून येरळा नदीवर परवानगी नसताना क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांच्या हस्ते धरणाची कोनशिला बसवून ग्रामस्थांनी बळीराजा धरण श्रमदानाने बांधले होते. क्रांतिमातेचा पाठिंबा असलेमुळे हे शक्य झाले होते. ९ ऑगष्ट हा दिवस देशभर हुतात्म्यांना अभिवादन करुन साजरा करतात. क्रांतिमातेने बलवडीच्या ग्रामस्थ शेतकऱ्यांना बजावले होते ''बांधा-कोण अडवतंय बघू'' या शब्दाच्या भरवशावर ग्रामस्थांनी बलवडीचे बळीराजा धरण स्वावलंबनाने बांधले होते. म्हणून ९ ऑगस्ट २००१ रोजी क्रांतिमातेच्या हस्ते बसवलेली कोनशिला स्वच्छ करण्यात आली व क्रांतिमातेच्या स्मृतीप्रित्यर्थ क्रांतिवनात १० हजार रोपे लावण्यात आली. क्रांतिमातेच्या क्रांतीचा सुगंध बलवडीच्या परिसरात पसरला.

क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांच्या आक्रमक लढ्यामुळे इस्लामपूर वाळवा रस्ता, कृष्णा नदीवर नागठाणे बंधारा, हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना, हुतात्मा किसन अहिर विद्यालय ही त्यांच्या प्रेरणेची जिवंत स्मारके होत. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी हे तर क्रांतिमातेने वाळवा गावाला, सांगली जिल्ह्याला व महाराष्ट्राला दिलेला प्रेरणेचा अमृत कलश आहे. अशा क्रांतिमातेला शतशः प्रणाम.

* * * *



# २२

## (अ)

## शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, कष्टकरी महिला संघटनात्मक चळवळ

१९८५ च्या विधानसभेच्या निवडणुकीत वाळवा मतदारसंघातून नागनाथ अण्णा निवडून आले होते. ऐतवडे बु।। येथे शेतकरी, शेतमजुरांची भव्य परिषद घेण्याचे त्यांनी ठरविले. त्या परिषदेच्या तयारीसाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण होण्यासाठी सुमारे १०० सभा गावागावांतून घेण्यात आल्या. सातारचे ॲड. व्ही. एन. पाटील, तासगांवचे प्रा. बाबूराव गुरव व नागनाथ अण्णा यांनी वेगवेगळ्या गावी जाऊन सभा घेतल्या होत्या. सौ. कुसुमताई नायकवडी यांनी सभा घेतल्या होत्या. वास्तविक शेतकरी, शेतमजुरांची, कष्टकऱ्यांची संघटना बांधण्याचे प्रयत्न १९७१ पासून करणेत आले होते. पण त्यास १९८५ साली चांगला प्रतिसाद मिळाला व ऐतवडेची परिषद यशस्वी झाली. हजारो शेतकऱ्यांनी, शेतमजुरांनी येऊन नागनाथ अण्णांचे नेतृत्व मान्य केले. त्यातूनच पुढे किणी येथील भव्य परिषद घेणेचे ठरले होते.

वाळवा-इस्लामपूर रस्त्यासाठी साराबंदी चळवळीस सर्वांनीच मदत केली होती. त्यासाठी सर्व थरातील लोक एकत्र आले होते. महिलांनी नागनाथ अण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाई यांच्या नेतृत्वाखाली साराबंदी चळवळीचे वेळी पोलिसांना चांगलाच धडा शिकवीला होता. याच रस्त्याचे कामातील यशामुळे अण्णांना भावी जीवनातील यशाचा मार्ग खुला झाला. परिसरातील विकासाची वाट दाखविली होती. या चळवळीमुळेच नागठाणे बंधारा शासनाने मंजूर केला. कृष्णा नदीचे पात्रात बारमाही पाणी उपलब्ध झालेमुळे लिफ्ट इरिगेशन स्कीम सुरु केल्या. शेतकरी ऊसाच्या नगदी पिकाकडे वळलेमुळे आपल्या ऊसावर प्रक्रिया करणेचा आपला साखर कारखाना करण्याची महत्त्वाकांक्षा शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली. त्यातूनच हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा जन्म झाला. शेतकऱ्यांनी अण्णांना ॲम्बॅसिडर गाडी घेऊन दिल्यामुळे ग्रामीण परिसरातील विकास कामांना चालना देणेस सोयीचे झाले होते. शेतकऱ्यांची शेतमजूरांची संघटना

करताना अण्णांनी इतरांना मंदत केली पण त्या संघटनेचा गैरफायदा करुन घेतला नाही. क्रांतिकारक कशातच गुंतून पडत नाही हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखविले होते.

त्यानंतर १९८८ साली वाळवा येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या आवारामध्ये शेतकऱ्यांचे प्रबोधन शिबीर अण्णांनी आयोजित केले होते. १९९०-९१ मध्ये भारतभर अण्णांनी दौरा केला होता. कष्टकरी जनतेच्या चळवळीचा स्वाभिमानी पर्याय उभा करण्यासाठी २६ मे १९९३ रोजी किणी (वाठार) जि. कोल्हापूर या ठिकाणी ८० हजारांच्या संख्येने शेतमजूर व कष्टकरी, शेतकरी, शेतकरी परिषदेसाठी आले होते. त्यासाठी सुमारे ३५० सभा सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात घेतल्या होत्या. या प्रचार सभांमध्ये मा. अण्णा, ॲड. धैर्यशिल पाटील, कॉ. नाना शेटे, डॉ. भारत पाटणकर, डॉ. बाबुराव गुरव, कॉ. धनाजी गुरव, कॉ. जयंत निकम, श्री. एस. आर. पाटील (सर), श्री. बाळासाहेब नायकवडी (सर) व जमादार सर यांनी भाग घेतला होता. २६ मे १९९३ रोजीचा हा दिवस ऐतिहासिक ठरला, अण्णांच्या नेतृत्वाखाली एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. त्या परिषदेमध्ये अध्यक्षपदावरुन बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले ''राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका पार पाडणारी काँग्रेस तत्त्वाच्या दृष्टीने संपली आहे. ती शेतकरी, कष्टकऱ्यांच्या विरोधी असून पक्की भांडवलदार धार्जिणी बनली आहे. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजांना मदत करणाऱ्या भाजपसारख्या शक्तीशी काँग्रेस पक्ष युती करीत आहे. काँग्रेसच्या या युतीच्या पार्श्वभूमीवरच या जातीयवाद्यांनी अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्याचे धाडस केले आहे. या जातीयवादी शक्ती बेफाम झाल्या असून त्यांना सत्तेची स्वप्ने पडत आहेत. अशा वेळी स्वस्थ बसणे शक्य नाही. स्वतःच्या सामर्थ्यावर प्रश्न सोडवून घेणारी संघटना गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यंत भक्कमपणे बांधण्यात आली पाहिजे. ही संघटना विदर्भ मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात स्थापन झाली पाहिजे. मात्र या संघटनेत भाजप, शिवसेना या सारख्या जातीयवाद्यांना प्रवेश दिला जाणार नाही. प्रगतीत अडथळे आणणारे देशाचे दुश्मन समूळ नष्ट झाले पाहिजेत.''

यावेळी प्रमुख पाहुणे चित्रपट अभिनेते निळू फुले म्हणाले, ''बारा बलुतेदारांच्या हितांच्या मंडल आयोगाबद्दल चुकीची माहिती देऊन जातियवादी शक्ती पोरांना चिथावणी देत आहे. हे कारस्थान आता चालू देणार नाही. महाराष्ट्रात नवीन परिवर्तनवादी चळवळीचा हा शुभारंभ करणारी ही परिषद आहे. सर्व धर्मनिरपेक्ष शक्ती एकत्र करुन मोठी आरोळी ठोकावयाची आहे आणि प्रचंड वादळ उभे करावयाचे आहे.''

या प्रसंगी चित्रपट अभिनेते राम नगरकर, प्रा. डॉ. बाबूराव गुरव, आ. के. एल. मलाबादे, कॉ. गोविंदराव पानसरे, डॉ. बाबा आढाव, आ. शंकर धोंडी पाटील यांनीही आपली यथोचित मते मांडली. या प्रसंगी माजी आमदार वाय. सी. पाटील, प्रा. पी. बी. पाटील, कॉ. शेख काका, डॉ. भारत पाटणकर, कॉ. संतराम पाटील व शंकरराव नलवडे उपस्थित होते. या परिषदेत दिलेला संदेश महाराष्ट्र, कर्नाटक, विदर्भ या ठिकाणी पोहचला होता. जातीयवाद्यांचा बीमोड करण्यासाठी बहुजन समाजातील सर्वांनी एकत्र येण्याची गरज पटल्याची ही परिषद सूचक होती.

नागनाथ अण्णांनी सातारा, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील १३ दुष्काळ तालुक्यातील जनतेला संघटित करण्याचे प्रयत्न आटपाडी पाणी परिषदेद्वारे १९९३ पासून सुरु केले होते. तसेच वारणा व कोयना धरणग्रस्तांची संघटना बांधली होती. त्यांचे विवेचन वेगळ्या प्रकरणात केले आहे.



९ ऑगस्ट १९९५ रोजी ऑगस्ट क्रांतिदिनी संघटनेची व्याप्ती विद्यार्थी तरुणांपर्यंत नेणारे पाऊल नागनाथ अण्णांनी टाकले. कोल्हापूर येथे राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींगच्या मैदानावर सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी विद्यार्थिनी एकत्र येऊन नागनाथ अण्णांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतिकारी विद्यार्थी संघटना महाराष्ट्र या नावाने वेगळी संघटना स्थापन केली होती.

तसेच २८ नोव्हेंबर १९९५ रोजी म. जोतिराव फुले यांच्या स्मृतिदिनाच्या दिवशी शेतमजूर, कष्टकरी शेतकरी स्त्री संघटना या नावाने कष्ट करुन जगणाऱ्या ग्रामीण स्त्रियांच्या मुक्तीसाठी, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे निर्मूलन करण्यासाठी एका स्वतंत्र संघटनेची दि. २८ नोव्हेंबर १९९५ रोजी वाळवे येथे माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत स्थापना झाली. ही स्त्रियांची परिषद संघटित करण्यासाठी सौ. कुसुमताई नायकवडी, स्वातंत्र्य सैनिक कॉ. इंदूताई पाटणकर यांनी पुढाकार घेतला होता.

धरणग्रस्तांच्या चळवळी, शेतमजूर, कष्टकरी शेतकऱ्यांच्या चळवळी, सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या कष्टकरी जनतेला स्वावलंबी आणि समृध्द करणाऱ्या चळवळी, समान पाणी वाटपाच्या चळवळी, स्त्रियांच्या चळवळी, शिक्षण क्षेत्रात सत्यशोधकी पुरोगामी परिवर्तन घडवू पाहणारी विद्यार्थ्यांची चळवळ, अशा अनेक पैलूंची एकत्र गुंफण करुन नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली चळवळी उभ्या राहत आहेत. या चळवळी उभ्या करण्यासाठी नागनाथ अण्णा स्वतः राबत आहेत. वेगवेगळ्या प्रसंगी सभा घेऊन प्रबोधन करीत आहेत. बहुजन समाजातील सर्व घटकांना आपल्या विकासासाठी संघटित करण्यासाठी नागनाथ अण्णा आपल्या वयाच्या ८५ व्या वर्षात सुध्दा सतत कार्यरत आहेत.

समाजामध्ये ज्यांच्यावर शासनाकडून अन्याय झाला आहे अशा संघटना नागनाथ अण्णांकडून मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांचेकडे येतात आणि अण्णा सर्व शक्तीनिशी अन्याय दूर करण्यास मदत करतात. ५ डिसेंबर २००२ रोजी शासकीय दूध योजनेतील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर राज्यव्यापी परिषद नागनाथ अण्णांनी घेतली होती. साखर उद्योगावर लादलेल्या आयकर विरोधात खूप मोठे आंदोलन करुन नागनाथ अण्णांच्या प्रयत्नामुळे आयकराचे संकट तात्पुरते थांबले आहे. अन्यायी वीज दर वाढी विरोधात आंदोलन उभे करुन सर्वसामान्य जनतेचा वीज दर वाढीस असलेल्या विरोध जाहीररित्या अण्णांनी प्रगट करुन दाखविला. साखरवाडी साखर कारखान्यांचे कर्मचारी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मदत मागण्यासाठी नागनाथ अण्णांच्याकडे आले होते. त्यामुळे मला असे वाटते की महाराष्ट्रात जेथे जेथे अन्याय होत आहे तेथील लोकांना मदत करणारे एकमेव नेते म्हणून नागनाथ अण्णा नायकवडी यांची महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासामध्ये नोंद झाली आहे.

* * * *

# (ब)

## धरणग्रस्त पुनर्वसन

१९७२ साली महाराष्ट्र शासनामध्ये ना. वसंतदादा पाटबंधारे मंत्री असताना सांगली जिल्ह्यातील वारणा नदीवरील खुजगाव धरणाचा वाद विधानसभेत व बाहेर निर्माण झाला होता.या प्रश्नाची वस्तुस्थिती सर्वांना समजावी म्हणून वसंतदादांनी सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील नेते शेतकरी, पत्रकार, व इंजिनियर्सची खुजगाव धरणाच्या जागेस भेट आयोजित केली.तसेच नियोजित खुजगावच्या वर चांदोली धरणाची जागाही दाखविली दोन्ही पैकी कोणती जागा योग्य आहे व कोणत्या धरणामुळे कमी पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होईल हे तज्ज्ञाकडून समजावून दिले. त्यानंतर सांगली येथे २ ऑक्टोबर १९७२ रोजी पत्रकारांशी बोलताना दादांनी स्पष्ट केले की, खुजगाव धरण प्रकल्पाच्या एकूण सत्तर कोटी खर्चाच्या निम्म्या रकमेत चांदोलीचे धरण पुरे करता येईल म्हणून खुजगाव ऐवजी चांदोली येथे धरण बांधण्याचा निर्णय घेण्याचे ठरले. चांदोलीचे धरण वर गेल्यामुळे कालवे काढण्यास थोडा खर्च जास्त येईल. पण त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी बुडू द्यायच्या नाहीत व पुनर्वसनाचा प्रश्न मर्यादित करावयाचा हे निकष लावले आहेत. स्थानिक लोकांनीही उठाव केल्यामुळे खुजगाव धरण मागे पडले आणि चांदोली धरणाचे काम सुरु झाले.

१९७६ साली चांदोली बुकवाडी उठवून स्थलांतर करण्यात आले व धरणाच्या कामास सुरवात झाली. १९७६ ते ८४ मध्ये धरणाच्या कामाने वेग घेतला आणि १९८४ साली पाणी साठवण्याचा प्रश्न आला. नागनाथा अण्णांचे सहकारी वाय. सी. पाटील यांची एक छोटी संघटना होती. ती चांदोली धरणासही विरोध करीत होती. कारण पुनर्वसन कसे करणार हे कोणीच सांगितले नव्हते. वस्तुस्थिती अशी होती की, धरणाच्या बांधकामामुळे विस्थापित होणाऱ्या कुटुंबातील कोणीही त्यावेळी तक्रार केली नाही. कारण धरणाच्या बांधकामावर स्थानिक



लोकांना रोजगार व काहींना नोकरी मिळाल्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न कोणाच्या डोक्यात आला नव्हता. पण चांदोली धरणात पाणी साठवण्याचा निर्णय शासनाने घेतल्यावर पुनर्वसनाचा प्रश्न पुढे आला. माजी आमदार वाय. सी. पाटील व आदम बारुसे या दोघांच्या पुढाकाराने विस्थापित होणाऱ्यांनी १५ दिवस धरणाचे बांधकाम बंद पाडले होते. त्यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी विरोधकांना आवाहन केले की, पाणी साठविण्यास विरोध करु नका. तुमच्या पुनर्वसनाची जबाबदारी मुख्यमंत्री म्हणून मी घेत आहे. माझ्या जिल्ह्यात होणाऱ्या धरणामुळे धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची पूर्ण जबाबदारी घेऊन ''खणाला खण आणि फणाला फण'' देऊन तुमचे पुनर्वसन करून देईन असे आश्वासन दिल्यामुळे १५ दिवसांचा लढा थांबला. शिष्टमंडळाला सांगली येथील गेस्ट हाऊसवर बोलावून चांदोली ते पेटलोंढ मध्ये असणाऱ्या सर्व गावातील लोकांना ज्या ज्या ठिकाणी जमिनी असतील तेथे गावठाणे करुन रस्ते लाईट व पाणी यांच्या सोयीकरुन देण्याचा निर्णय झाला.

सुरवातीला भितीपोटी कोणीही सांगली जिल्ह्यातील वाळवा, मिरज तालुक्यातील जमिनी घेण्यास तयार नव्हते. तरी देखील धरणात पाणी साठविण्याचे काम सुरु झाल्या कारणाने व पाणी साठा होणारच या भीतीने लोकांनी पुनर्वसनाला मान्यता दिली. त्यावेळच्या जिल्हाधिकारी सौ. लिना मेहेंदळे यांनी खास आदेश काढून खुंदलापूर, नांदोली, जैप, देवारे, कोन्होली, भय्याची वाडी, झोळंबीचा कांही भाग, गवळ्याची वाडी, पेटलोढ, आळोली, सिध्देश्वर भोगीव, आबोल या गावांचे स्थलांतर करण्यास सुरवात केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने पुनर्वसन कायदा १९७६ प्रमाणे प्रत्येक कुटुंबास ३ ट्रक साहित्य आणण्यास देण्यात आले. त्याचे न्याय्य भाडे देण्याचे आश्वासन दिले. देशाचे हिताच्या कामास मदत करण्याचे आवाहन केलेमुळे मदत झाली व पुनर्वसनाला सुरुवात झाली.

मिरज तालुक्यातील–समडोळी, कवठेपिरान, दुधगाव, तुंग, कसबे डिग्रज, वाळवा तालुक्यात–आष्टा, बागणी, शिगाव, फाळकेवाडी, बहादूरवाडी, येलूर, कुरळप, चिकुर्डे, उरुण इस्लामपूर, वाळवा, बोरगांव, नवेखेड, शिराळा तालुक्यात–मांगले, सागाव, बिळाशी, पतवारुण, आरळा, अशा एकूण २५ वसाहतीत लोक रहाण्यास आले आणि संघर्षाला सुरवात झाली.

ज्या ज्या ठिकाणी धरणग्रस्त लोकांना आणून सोडले होते. तेथे रस्ता नव्हता, गावठाण नव्हते, कुठल्याही सोई नव्हत्या अशी वसाहत धरणग्रस्तांची असताना कोल्हापूर जिल्ह्यातील आंबोली, तांबवे, करडेवाडी, दुडूंब, दुर्गेवाडी, सोनाली येथील लोकांना १९८४–८५ साली कुंभोज ता. हातकणंगले, लाटवडे, वडगाव, ते किणी, चावरे, पारगांव, कोडोली, काखे, सातवे, आरळे, थेरगाव, सरुड, भेडसगाव, सोडोली ता. शाहूवाडी येथे लोकांना सोडण्यात आले होते. तेथेही सांगली जिल्ह्याप्रमाणे अवस्था होती. धरणग्रस्तांना शासनाने वाऱ्यावर सोडून दिल्यासारखी परिस्थिती झाली होती.

ऑगस्ट १९८४ मध्ये धरणग्रस्तांच्या कुटुंबातील काही प्रमुख मंडळी राम पाटील, आबा पाटील, नामदेव नांगरे, श्रीपती पाटील, वारुसे अशांनी नागनाथ अण्णांची भेट घेऊन चांदोली धरणामुळे त्यांच्यावर विस्थापित होण्याची पाळी आल्यानंतर झालेल्या अन्यायाची माहिती सांगितली. अण्णांनी त्यावर विचार केला. तोच पावसाळा सुरु झाल्यामुळे धरणग्रस्तांचे

हाल सुरु झाल्याची बातमी पेपरमध्ये वाचून नागनाथ अण्णांनी ॲम्बेसिडर गाडी पाठवून वर नमूद केलेल्या धरणग्रस्तांना बोलावून घेतले. त्यावेळी नागनाथ अण्णांनी योग्य आदरातिथ्य केल्यानंतर धरणग्रस्तांची माहिती घेतली. ऑगस्ट ८४ ते ऑगस्ट ८५ मधील काळात प्रत्येक रविवारी हुतात्मा किसन अहिर विद्यालयामध्ये धरणग्रस्तांच्या बैठका घेऊन वारणा धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना ऑगस्ट १९८५ मध्ये झाली. (सभासद फी फक्त दहा पैसे ठेवली होती)

नागनाथ अण्णांच्या मार्गदर्शनाखाली धरणग्रस्तांच्या वसाहतीच्या प्रत्येक गाव चावडीवर निदर्शने करण्यात आली. त्यानंतर सांगली, कोल्हापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर अनेक मोर्चे काढण्यात आले. या लढ्यातून धरणग्रस्तांच्या वसाहतींच्या सर्व ठिकाणी आखणी करुन, भूखंड पाडून रस्ते, लाईट, पाणी वगैरेच्या सोयी करण्यात आल्या.

७ ऑगस्ट १९८६ ला ५० हजार धरणग्रस्त शेतकऱ्यांचा नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या मंत्रालयावर मोर्चा काढून १९८६ चा पुनर्वसन कायदा सदोष आहे, हे कॉम्रेड नाना शेटेंनी निदर्शनास आणले. सांगली व कोल्हापुर जिल्ह्यातील ज्या धरणग्रस्तांना प्रस्थापित केले, त्यांच्यापैकी ११ नंबरच्या नोटिसांपासून जे खातेदार मयत होते त्यांच्या जमिनी संपादन करण्यात आल्या. हा दोष शासनाच्या लक्षात आल्यामुळे चुकीचे पुनर्वसन होणार होते. म्हणून १९७६ चा पुनर्वसन कायदा रद्द करुन १९८६ चा सुधारीत पुनर्वसन कायदा करण्यास शासनाला भाग पाडून वारणा धरणग्रस्त संग्राम संघटनेने ऐतिहासिक यश नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली मिळवले होते.

१९८६ चा कायदा पास झाल्यानंतर कुटुंबाची मोजणी करुन जिल्हाधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे ६३४ खातेदारांची संख्या ७९० झाली होती. हे सुध्दा धरणग्रस्तांच्या लढ्यातून मिळविलेले मोठे यश होते. १९८६ ते ८७ च्या दरम्यान सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या तहसिल कार्यालयावर व जिल्हाधिकारी कार्यालयावर ९ मोर्चे काढून शासनास वरील गोष्टी मान्य करावयास लावल्या, तसेच सांगलीच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर ७ दिवसाचे ठिय्या आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे वारणा धरणग्रस्तांना न्याय मिळण्यास मदत झाली.

धरणामुळे अडचणीत आलेली सांगली जिल्ह्यातील १२ गावे, कोल्हापूर जिल्ह्याती ६ गावे, सातारा जिल्ह्यातील ३ गावे व रत्नागिरी जिल्ह्यातील १ गाव यांचा प्रश्न सोडविण्यासाठी नागनाथ अण्णा यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. शरद पवार २९ ऑक्टोबर १९८९ ला वाठार ता. हातकणंगले येथील नवरंग सूतगिरणीच्या उद्घाटनाला आले असताना धरणग्रस्तांच्या अडचणींचे निवेदन दिले. त्यामुळे त्याच दिवशी रात्री कोल्हापूर सर्किट हाऊसवर मुख्यमंत्री, पुनर्वसन मंत्री शिवाजीराव देशमुख, सांगली, कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी धरणग्रस्तांचे नेते कॉ. नाना शेटे, नामदेव नांगरे, राम पाटील, श्रीपत पाटील वगैरे कार्यकर्ते हजर होते. त्या बैठकीत धरणग्रस्तांचे प्रश्न सुटण्यास व धरणग्रस्तांना पर्यायी जमीन देण्यास तयार आहोत असे मुख्यमंत्र्यांना व पुनर्वसन मंत्र्यांना जाहीर करण्यास भाग पाडले.

त्यानंतर १९८८ मध्ये धरणग्रस्तांची एक परिषद वाळवा येथे नागनाथ अण्णांनी घेऊन कोयना धरणग्रस्तांच्या प्रश्नांत लक्ष घालण्याचे ठरविले. त्याचे कारण १९८७ साली नागनाथ



अण्णांना वर्तमान पत्रात एक विदारक बातमी वाचावयास मिळाली. कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या एका वसाहतीत वीज पुरवठा सुरु होण्याचे उद्घाटन केले जाण्याची ती बातमी होती. त्यावेळी धरणाचे पाणी साठवून धरणग्रस्तांना त्यांच्या मूळ गावातून उचलून बाहेर आणण्याच्या घटनेला २८ वर्षे झाली होती. ज्या कोयनाग्रस्तांच्या त्यागामुळे हे कोयना धरण झाले आणि महाराष्ट्राचे नंदनवन करायला मोठ्या प्रमाणात वीज मिळाली त्या धरणग्रस्तांचे पुनर्वसन तर राहोच पण कोयनेची वीज त्यांना मिळायला २८ वर्षे लागतात ही घटना धक्कादायक होती.

नागनाथ अण्णांनी ताबडतोब मनात ठरविले आणि हुतात्माच्या शेतकऱ्यांना मदतीचे आव्हान केले. वादळाने पालापाचोळा निर्दयपणे उधळून दूर कुठे भिरकविला जाईल तिकडे भिरकावावं त्याप्रमाणे कोयना धरणग्रस्त कुठे कुठे भिरकावले आहेत त्याचा शोध घेण्याचे ठरले. कोयना धरणग्रस्तांची संघटना करुन त्यांनाही मदत करण्याचा निर्णय झाला. १९७२-७३ पासून शेतकरी, शेतमजुरांच्या चळवळी पूर्ण वेळ काम करीत असलेल्या डॉ. भारत पाटणकर यांनी या चळवळीची मुख्य जबाबदारी घेतली. हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याकडून एक जीप त्यांना कोयना धरणग्रस्तांची मोजमाप करण्यासाठी देण्यात आली. १९८८-८९ मध्ये डॉ. भारत पाटणकर यांनी सातारा, रायगड, ठाणे जिल्ह्यातील २१६ गावी जाऊन कोयना धरणग्रस्तांचा शोध घेण्याचे काम अनिल खरळकर, संपतराव बेलवलकर यांच्या सहकार्याने केले. त्यानंतर सातारा, सांगली, कोल्हापूर अशा तिन्ही जिल्ह्यात एकाच वेळी एकाच तारखेस १४ दिवस ठिय्या आंदोलन करुन कोयना धरणग्रस्तांची ३९ वर्षे बंद पडलेली पुनर्वसनाची दारे खडबडून पुन्हा उघडण्यात आली. मंगळवेढा तालुक्यात एक ऑफिस उघडून डॉ. भारत पाटणकर, अनिल खरळकर यांच्या नेतृत्वाखाली धरणग्रस्तांच्या २२०० कुटुंबांना शासनाकडून जमिनी देण्यास भाग पाडले. हे काम सतत तीन वर्षे चालू होते. या कालावधीत मंगळवेढ्याच्या ऑफिसच्या गाडीचा खर्च हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याने भागवल्यामुळे कोयना धरणग्रस्तांचा प्रश्न तडीस लागला.

१९९० साली सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व धरणग्रस्तांना एकत्र करुन चांदोली धरणग्रस्तांमुळे अडचणीत आलेल्या लोकांचा प्रश्न सोडविण्यात नवीन कायदा शासनास करावा लागला. त्यामुळे चांदोली अभयारण्य घोषित करुन धरणग्रस्तांना वाऱ्यावर सोडून देण्याचा शासनाचा अंतस्थ हेतू उधळून लावला. धरणग्रस्तांप्रमाणे प्रकल्पग्रस्त समजून त्यांचेही पुनर्वसन मंगळवेढा येथे करण्याचे ठरले असताना ते रद्द करुन १९९० च्या कायद्या प्रमाणे ज्या त्या जिल्ह्यात धरणग्रस्तांचे पुनर्वसन झाले, त्याचप्रमाणे अभयारण्यातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन ज्या त्या जिल्ह्यात करावयास शासनास भाग पाडले. शासन आमच्याकडे जमिनी नाहीत असे म्हणत असताना धरणग्रस्तांच्या कार्यकर्त्यांनी वारणा धरणाच्या लाभ क्षेत्राची माहिती घेऊन लाभ क्षेत्रातील ७९ गावातील संपादन केलेल्या जमिनी २४०० हेक्टर होत्या हे शासनाच्या निदर्शनास आणून दिल्याने वारणा धरणग्रस्तांसाठी लागणारी ९६० हेक्टर जमीन २४०० हेक्टर मधून वजा करता शिल्लक राहणारी १४४० हेक्टर जमीन शिल्लक असताना त्यांना मंगळवेढ्याला का पाठविता असे धरणग्रस्तांनी शासनास विचारले व मंगळवेढ्यास जाण्यास नकार दिला. त्यामुळे शासनाला निदर्शनास आणलेली शिल्लक जमीन धरणग्रस्तांना देण्यास शासनास भाग

पाडले. त्यासाठी तीन वर्षात कार्यकर्त्यांना नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली सुमारे २५ मोर्चे व २ ठिय्या आंदोलने करावी लागली. नागनाथ अण्णा कोल्हापूर जिल्हा ठिय्या आंदोलनाचे नेतृत्व करीत, तर क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी सांगली जिल्ह्याच्या ठिय्या आंदोलनाचे नेतृत्व करीत होत्या. सोबत सौ. कुसुमताई नायकवडी, कॉम्रेड नाना शेटे, एस. आर. पाटील (सर), नामदेव नांगरे, वैभव काका वगैरे कार्यकर्ते होते. सातारा जिल्ह्यासाठी डॉ. भारत पाटणकर, अनिल खरळकर हे आंदोलनाचे नेतृत्व करीत होते.

३१ मे १९९५ च्या पुनर्वसन कायद्याची अंमलबजावणी १९९७ ला सुरु करण्यात आली. अडचणीतील सांगली जिल्ह्यातील १४ गावे, कोल्हापूर जिल्ह्यातील ६ गावे, सातारा जिल्ह्यातील ३ गाव, रत्नागिरी जिल्ह्यातील १ गाव यांच्या पुनर्वसनासाठी १९८९ साली ३२ कोटी ८४ लाख रूपये निधीची मान्यता शासनाने दिली होती. अडचणीतल्या गावांचा सर्व्हे करण्यासाठी नागनाथ अण्णा, भारत पाटणकर, नाना शेटे, नामदेव नांगरे, श्रीपत पाटील, वगैरे कार्यकर्त्यांसह हुतात्मा कारखान्याच्या तीन जीप घेऊन प्रत्येक गावाच्या जंगलात राहून वारणा धरणग्रस्तांचा व अभयारण्यग्रस्तांचा अभ्यास केला व माहिती मिळवली. सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्रीधर जोशी असताना त्यांना भेटून नागनाथ अण्णांनी अडचणीतल्या कुटुंबाचा वारसा नोंद करण्याचा फेर आदेश काढण्यास भाग पाडले. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील १४ गावातील ६६३ कुटुंबे व १०९ भूमिहीन यांचे पुनर्वसन योग्य पध्दतीने नोंदणी करुन झाले. आणि अभयारण्य प्रकल्पग्रस्तांना चोख न्याय मिळाला. त्यानंतर ३१ मे १९९७ रोजी ज्या लोकांचे पुनर्वसन झाले त्या लोकांचे पुनर्वसन मूळ वसाहतीत केले गेले. तसेच ज्या लोकांचे पुनर्वसन झाले नव्हते त्यांच्या पुनर्वसनासाठी आष्टा, पोखर्णी, नेर्ले ता. वाळवे येथे दोन वसाहती उभ्या करुन त्यांचेही पुनर्वसन करण्यात आले. अशा तऱ्हेने वारणा धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले.

धरण व प्रकल्पग्रस्तांकडे दुर्लक्ष करण्याच्या शासनाच्या अमानुष धोरणाला कंटाळून कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा अभयारण्यग्रस्तांनी स्वयंस्फूर्तपणे एके दिवशी पहाटे अचानक वारणा धरणाच्या भिंतीवर प्रवेश केला! सुमारे एक हजार स्त्री-पुरुष धरणाच्या भिंतीवर ठिय्या मारुन बसले. ही बातमी समजल्याबरोबर क्रांतिवीर अण्णांनी आपले सहकारी डॉ. भारत पाटणकर, बाळासाहेब नायकवडी, भाई भारत पाटील यांच्यासह धरणाच्या भिंतीकडे धाव घेतली. प्रकल्पग्रस्तांच्या धाडसाचे कौतुक केले. अखेर शासनाला प्रत्येक प्रकल्पग्रस्त कुटुंबासाठी १०,०००/- रुपये घरबांधणी अनुदान जाहीर करणे भाग पडले. या पैशांचे वाटप धरणाच्या भिंतीवरच होणार होते. पण प्रकल्पग्रस्तांची निर्वाह भत्त्याची मागणी मात्र प्रत्यक्ष पैसे देऊन मान्य करायला सरकाने नकार दिला. त्यामुळे क्रांतिवीर अण्णांनी पुढाकार घेऊन हुतात्मा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने काही महिन्यांचा निर्वाह भत्ता देण्यासाठी ७ लाख रुपये मंजूर करुन दिले. हे पैसे शासनाला उसने दिले आहेत अशा तऱ्हेने त्याची मांडणी करुन शासनाचे प्रतिनिधी म्हणून सार्वजनिक बांधकाम (प्रकल्प) मंत्री ना. श्री. विक्रमसिंह पाटणकर आणि आ. श्री. शिवाजीराव नाईक यांचे हस्ते या पैशांचे वाटप करण्यात आले. या प्रकारची ही इतिहासातली पहिलीच घटना होती. शासनाने हे पैसे अजूनही हुतात्मा कारखान्याला परत



दिलेले नाहीत ही या बाबतची अत्यंत विदारक परिस्थिती आहे! हुतात्मा कारखान्याने धरणग्रस्तांच्या सर्व्हेच्या कामासाठी सतत १० वर्षे एक जीप नाना शेटे यांच्याकडे दिली होती. तसेच कोयना धरणग्रस्तांचा सर्व्हे करण्यासाठी डॉ. भारत पाटणकरांकडे कारखान्याने एक जीप दिली होती. अशा तऱ्हेचे सहकार्य नोंद करुन ठेवण्यासारखे आहे.

धरणग्रस्तांच्या त्यागातून तयार झालेल्या धरणाच्या पाण्यामुळे ज्यांच्या शेतात ऊसाचे पीक उभे आहे व या ऊसावर जे सहकारी साखर कारखाने उभे आहेत त्या साखर कारखान्यांनी हुतात्मा साखर कारखान्या प्रमाणे धरणग्रस्तांना मदत केलेली नाही. धरणग्रस्तांच्या आंदोलनासाठी सुमारे १२८ मोर्चे व ४० ठिय्या आंदोलने केली गेली. त्या मोर्चातील सुमारे १० हजार मोर्चेकरी शेतकऱ्यांना रोज दोन वेळचे जेवण व नाश्ता हुतात्मा कारखान्याच्या वतीने दिला जात होता. ही सोय आजही चालू आहे. मोर्चासाठी लागणारे ट्रक, जीप व इतर वाहने देण्याची व्यवस्थाही नागनाथ अण्णांनी करुन दिली होती. एवढ्या मोठ्या त्यांच्या योगदानामुळेच सर्व धरणग्रस्तांना माणुसकीने जगणेचा हक्क प्राप्त झाला आहे. त्यामुळे आज हजारो पुनर्वसीत कुटुंबे अण्णांना दुवा देत आहेत.

१९९६ ला कृष्णा खोरे महामंडळाची स्थापना झाली.कर्ज रोखे काढून कोट्यावधी रुपयांचा निधी उभारला गेला. ३१ मे २००० सालापर्यंत कृष्णा खोऱ्यातील ५९४ अब्ज घनफूट पाण्याचा वापर करण्याच्या अटीमुळे अनेक नव्या धरणांची कामे वेगाने सुरु झाली. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रश्न ताबडतोबीने तीव्र बनले. उरमोडी, वांग, सळवे-महिंद, उत्तर मांड, कुसवडे, महू-हातगेघर अशा अनेक धरणांवर क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली लढे सुरु झाले. अण्णांच्या नेतृत्वाखाली ही जबाबदारी डॉ. भारत पाटणकर यांनी खांद्यावर घेतली. या सर्व धरणांमध्ये ''आधी-पुनर्वसन मगच धरण'' हे तत्त्व काटेकोरपणे अमलात आणले गेले. पुनर्वसनाच्या ठिकाणी १८ नागरी सुविधांसह सुसज्ज गावठाण आणि पर्यायी जमीन उपलब्ध झाल्याशिवाय एकही गाव मूळ ठिकाणावरुन उठले नाही! त्यामुळे महाराष्ट्रभर ''उरमोडी पॅटर्न'' म्हणून गाजला. क्रांतिवीर अण्णांच्या चळवळीची ही नवी झेप होती. सातारा जिल्ह्यातील या चळवळीने पर्यायी जमीन आणि जमिनीला सरकारने पाणी देईपर्यंत महिना ३,०००/- रुपये निर्वाह (पाणी) भत्त्याची मागणी केली. ठिय्या आंदोलने, 'धरण बंद' आंदोलने असा रेटा लावून शेवटी शासनाला ६००/- रुपये निर्वाह (पाणी) भत्ता मंजूर करायला भाग पाडले गेले. संपूर्ण देशात अशा तरतुदीचे हे एकमेव उदाहरण आहे. याच लढ्यांच्या सुरुवातीच्या काळात उरमोडी धरणाची सुरुवात करणारा नारळ फोडण्यासाठी आलेल्या तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशींना दोन वेळा आणि श्री. बाळ ठाकरे यांना एकदा चळवळीच्या दणक्यामुळे परत जावे लागले ! हा निर्वाह भत्ता सर्व नव्या धरणांच्या धरणग्रस्तांना मिळाला, पण इतरांना नाही. त्यामुळे कोल्हापूर येथे झालेल्या वारणा अभयारण्यग्रस्तांच्या लढ्यातून त्यांनाही निर्वाहभत्ता मंजूर करणे सरकारला भाग पडले. त्याचे पैसे मात्र द्यायला सरकार अजूनही नकार देत आहे.

आतापर्यंत अण्णांच्या नेतृत्वामुळे जुन्या धरणांच्या धरणग्रस्तांचे जवळ जवळ १००% पुनर्वसन झाले आहे व राहिलेल्या पुनर्वसनासाठी अण्णांच्या नेतृत्वाखाली पुणे येथे १९ जानेवारी २००४ रोजी सांगली, सातारा, कोल्हापुर, पुणे जिल्ह्यातील धरणग्रस्तांचे ठिय्या आंदोलन

झाले. त्यामुळे केंद्र शासनाने पुनर्वसनासाठी लागणारा १५०० कोटींचा निधी ताबडतोब मंजूर केला आहे व १ महिन्यात समान पाणी वाटप करण्याचे आश्वासन महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री अजित पवार व गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी ठिय्या आंदोलन करणाऱ्या आंदोलकाना दिले आहे. त्यामुळे धरणग्रस्तांचे सर्व प्रश्न मार्गी लागतील असा विश्वास वाटतो. परंतु अण्णांनी त्याच वेळी बजावले होते की, जर आश्वासनाप्रमाणे एक महिन्यात कामे सुरु झाली नाहीत व निधी उपलब्ध झाला नाही तर पुन्हा ठिय्या आंदोलनाचा अंतिम निर्णय मंत्रालयापुढे घेतला जाईल. तसेच जर केंद्र शासन महाराष्ट्र शासनाच्या आड आल्यास केंद्र शासनाच्या पुढे ठिय्या आंदोलन करण्याची तयारी ठेवली आहे असे अण्णांनी बजावले.

शासनाचा निर्णय बदलण्यास विधानसभेमध्ये आमदारांचे बहुमत असावे लागते. नागनाथ अण्णांनी प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा कायदा आंदोलनाद्वारे आमदार नसतानाही एकट्याने बदलण्यास शासनास भाग पाडले आणि एक इतिहास घडविला.

* * * *



ता. २६ जून २०००
धरणग्रस्त मोर्चा, सांगली–कलेक्टर ऑफिस



२३

# तिसरे व चौथे दलित आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलन

१९३६ साली मुंन्शी प्रेमचंदांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या प्रगतशील साहित्य संघाची चळवळ देशभराच्या डाव्या साहित्यिकांची चळवळ बनली. तिचा जाहीरनामा मार्क्सवादाच्या प्रतिबिंबवादी सौंदर्यशास्त्रावर व समाजवादी वास्तव्यवादावर आधारलेला होता. पुढे अनेक कारणांमुळे ही चळवळ स्वातंत्र्योत्तर काळात ओसरली, ३० साली ब्राम्हणेतर चळवळ काँग्रेसमध्ये विलीन झाल्यापासून जाती व्यवस्था विरोधाचे प्रबोधन बंद पडल्यासारखे झाले होते. शास्त्रे व सर्व धर्माचे मूळ तत्त्ववादी देशात हुकूमशाहीकडे नेत आहे. ह्या देशाच्या सर्व पुरोगामी साहित्यिक व कलावंताच्या मागे शास्त्रे व मूलतत्वादी मागे लागले आहेत.

या पार्श्वभूमीवर आमदार नागनाथ नायकवडींच्या वीर पत्नी सौ. कुसुमताई नायकवडी यांनी वाळवा येथील नियोजित दलित–आदिवासी साहित्यसंमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारली होती. अध्यक्ष म्हणून कविवर्य नारायण सुर्वे यांनी येण्याचे मांन्य केले होते तसेच या संमेलनामध्ये 'राम व कृष्ण यांचे मूल्यमापन नैतिकतेतून की ऐतिहासिकतेतून?' 'परिवर्तनवादी व परिवर्तनविरोधी साहित्यातील स्त्री' आणि 'चित्रपट नाटकातील जाती संघर्ष' या तीन विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. सदर दलित–आदिवासी साहित्य संमेलन २९,३०,३१ ऑक्टोबर १९८८ रोजी हुतात्मा किसन अहिर माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केले होते. आमदार नागनाथ नायकवडी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. पण त्यांनी तिन्ही दिवस प्रेक्षकांमध्ये बसून साहित्य संमेलनाचा आस्वाद घेतला होता.

कामगार वर्ग, राबणाऱ्या सर्व जाती जमातीच्या व स्त्रीमुक्तीच्या चळवळी एकत्र येऊन दलित–आदिवासी ग्रामीण साहित्याचा एकजीव प्रवाह होणे गरजेचे होऊन बसले होते. या उपक्रमाचे महत्त्व जाणून वाळव्याच्या क्रांतिभूमित रुजलेल्या परंपरांमध्ये एक नवा जोमदार साहित्य प्रवाह महाराष्ट्राच्या भूमीवर प्रस्थापित करण्याचा हा एक उपक्रम होता. या संमेलनासाठी

डॉ. आनंद यादव, डॉ. बाबूराव गुरव, कॉ. शरद पाटील, डॉ. बाबा आढाव इत्यादी नामवंत विचारवंत उपस्थित होते.

विख्यात अभिनेते, निर्देशक व नाटककार गिरीश कर्नाड हे द्वितीय दलित-आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन करताना म्हणाले, ''दलित व आदिवासींच्या कलाकृती निर्मितीवर आधारीत साहित्य निर्मिती झाली आहे.

स्वागताध्यक्षा सौ. कुसुमताई नायकवडी म्हणाल्या की, 'हे संमेलन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने गाजलेल्या भूमीत हुतात्मा किसन अहिर व नानकसिंग यांच्या आत्मसमर्पणाने पावन झालेल्या भूमीत व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कर्मभूमीत हे संमेलन साकारत आहे.' निसर्गाच्या उदार मनाने वाळवा गाव चोहो बाजूने वेढले आहे. कृष्णा नदीच्या पाण्याने पावन झाले आहे. १८८५ साली अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे पहिले अध्यक्ष सरह्यूम व लोकमान्य टिळक वाळवा येथे येऊन गेले आहेत. १९४२ च्या क्रांतीलढ्यात वाळव्यातील क्रांतिकारकांनी ब्रिटीश सत्तेचा पराभव करुन प्रतिसरकार स्थापले होते.स्वातंत्र्यानंतर इस्लामपूर-वाळवा रस्ता होण्याकरिता साराबंदी आंदोलन करुन शासनाला नमवले होते. सतत ८ वर्षे अनेक अडचणींवर मात करुन आमदार नागनाथ नायकवडी यांनी केंद्र शासनाशी भांडून हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यास मंजुरी मिळवून त्याची उभारणी ११ महिन्यात करून एक विक्रमी इतिहास घडविला. कारखाना उभा करण्यासाठी घेतलेले कर्ज फेडून साखर उताऱ्यामध्ये भारतात व आशिया खंडात प्रथम क्रमांक मिळवला.

वाळव्याच्या परिसरात असलेल्या रेठरे हरणाक्ष गावी पठ्ठे बापूराव व पवळा यांनी लावण्या व गवळणीने भारावून सोडले. शेजारच्या नागठाणे येथे जन्मलेल्या बालगंधर्वाने नाट्यविश्व दणाणून सोडले. ऐतवडे बु ।। येथील कर्मवीर भाऊराव पाटलांनी खेडोपाडी शाळा, कॉलेज काढल्या. त्यांना जनतेने कर्मवीर ही पदवी दिली. आचार्य जावडेकर हे थोर समाजसुधारक, लेखक व कार्यकर्ते इस्लामपुरचेच होते. अण्णाभाऊ साठे शेजारच्या वाटेगावचे. त्यांनी अमोल वास्तव साहित्य निर्मिती केली आहे. क्रांतिसिंह नाना पाटलांनी जीवनाच्या संध्याकाळी इथेच राहण्याचे ठरविले. याच मातीने त्यांना आकर्षून घेतले व अखेरचे क्रियाक्रर्म सुध्दा येथेच केले आहे.

मुर्ती लहान पण किर्ती महान अशा या चिमुकल्या वाळवा गावी भरत असलेल्या संमेलनास थोर विचारवंत व साहित्यिक हजर आहेत. हा वाळवे गावाचा गौरव आहे. या स्नेह सोहळ्यासाठी आलेल्या उपस्थितांचे मन:पूर्वक स्वागत करीत आहे.''

संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे म्हणाले ''आपण स्वतंत्र होऊन ४० वर्षे लोटली तरी फार मोठे राजकीय मन्वंतर घडले आहे असे वाटत नाही. पिळवणूक व छळवणुकीचे सर्व प्रकार अबाधितपणे चालूच आहेत. कायदे झाले खरे परंतु ते सत्ताधिशांच्याच बाजूने कसे वळले जातील हेच सातत्याने पाहिले गेले. धनदांडग्या वर्गांना अजूनही या देशात अभय आहे. तर सर्वसामान्य जनतेचे रोजच्या जगण्यातले भय भयानक स्वरूपात वाढते आहे. जातीच्या नावाखाली दंगेधोपे मोकाटपणे होत असून शासकवर्ग वेगवेगळ्या नावाखाली काम करणाऱ्या विविध संघटनांना पाठीशी घालीत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे, भाई माधवराव बागल, महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांचा आधार घेत आपल्याला प्राप्त परिस्थितीतून वाटचाल करावयाची आहे. पिळवणूक, जातपात, उच्चनीच असा भेदभाव किंवा पिळवणूक करणाऱ्या शक्तींचा समूळ नाश होईल व नवा प्रगतशील भारत



देश साकारला जाईल असे आपले ध्येय आहे. यासाठी एक सहकारी म्हणून आपल्या साहित्याला व तिच्यातील सर्व कर्तबगार प्रतिभावंतांनी सिंहाचां वाटा उचलावा.''

यानंतर दिनांक २०,२१,२२ जानेवारी १९९६ रोजी वाळवा येथेच चौथे दलित आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित केले होते. महाराष्ट्र राज्य पातळीवरील साहित्य सांस्कृतिक क्षेत्रातील साहित्यिकांचा मोठा सहभाग या साहित्य संमेलनात होता.

संमेलनाचे उद्‌घाटन बहुजन चळवळीतील एक ज्येष्ठ कार्यकर्ते निळू फुले यांनी दीप प्रज्वलन करून केले होते. अध्यक्ष पदावरुन बोलताना बाबूराव बागुल म्हणाले, ''बहुजन समाजाच्या चळवळीला पुन्हा नव्याने गती देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बहुजन समाजातील साहित्यिकांनीच करायचे आहे. भारतीय समाजात ज्या प्रकारची विषमता व असमानता आढळून येते तशी असमानता जगाच्या पाठीवर अन्यत्र कोठे दिसून येत नाही. ही मनोवृत्तीच भारतीय समाजाच्या विघटनाचे खरे कारण आहे.यामध्ये बदल होण्याची नितांत आवश्यकता आहे. गेल्या अनेक काळापासून केवळ शोषकांचीच सत्ता आहे. या काळात वर्ण वर्चस्व वाढविण्याचे पध्दतशीर प्रयत्न झालेले दिसून येतात. बहुजन समाजातील शंबूक, एकलव्य व कर्ण आदी नायकांना संपविण्याचे कारस्थान या काळात घडले. गेल्या काही दिवसात बहुजन समाजाची चळवळ काहींशी थंडावल्याने समाजातील या मनुवादी प्रवृत्तीने पुन्हा उचल खाल्ली आहे. त्याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.'' असे नमूद करुन ते पुढे म्हणाले, ''या देशात खऱ्या अर्थाने त्राता व अन्नदाता बहुजन समाजच असून या देशाची राज्यसत्ता या समाजाच्या हाती असण्याची गरज आहे.जाती-जाती दुभंगल्या गेल्यामुळे बहुजन समाजातील ही रुंदावत चाललेली दरी सांधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बहुजन समाजातील साहित्यकांना करावयाचे आहे. बहुजन समाजातील बुद्धिजीवी वर्गाने हे कार्य हाती घ्यावे.''

चौथ्या दलित-आदिवासी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून नागनाथ अण्णांनी केलेले भाषण म्हणजे बहुजन समाजातील, दलित समाजातील जाणत्यांनी डोळसपणाने कार्य करावयास पाहिजे याचा वस्तुपाठच आहे. ते म्हणाले, ''मी १९४२ साली विद्यार्थी होतो. देश स्वतंत्र व्हावा म्हणून कर्तव्य भावनेने चळवळीत भाग घेतला. सबंध देशातल्या जनतेच्या हालचालीमुळे आपली जी मुले पोटासाठी फौजेत सामील झाली होती त्या मुलांनी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद फौज संघटीत केली. १९४६ साली नाविकांनी बंड केले. प्राथमिक शाळेतला शिक्षक संपावर गेला, पोस्टातला कारकून व पोस्टमनसुध्दा संपावर गेले. ब्रिटीश मुत्सद्दी होते. त्यांनी हे ध्यानात घेतले की आजपर्यंत जे लोक संघर्षाला तयार नव्हते ते आत्ता संघर्ष करायला लागलेत आणि जर ही जनता पेटून उठली तर त्या जनतेला ज्याच्या सहाय्याने चिरडायचं असे ते लष्करही बिथरलंय, तेव्हा आता आपण या देशात फार काळ राहू शकत नाही हे ओळखून ते तडजोडीसाठी तयार झाले. इकडे वल्लभभाई पटेल सारखे काँग्रेसवाले भांडवलदारांच्या धूर्त नेत्यांनी प्रसंग ओळखून या देशातल्या कामगार, कष्ट करणारा शेतकरी आणि सैन्य एकत्रित येऊन ब्रिटीश सत्तेला हाकलून लावतील ही खात्री दिली. पण या देशातल्या भांडवलदारांना सुध्दा राज्य करु देणार नाहीत म्हणून घाईघाईने जी तडजोड केली. त्याला आपण १५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्य दिन म्हणतो. या १५ ऑगस्ट१९४७ ला जवळजवळ ४८ वर्षे झाली. पैकी काँग्रेसने ४५-४६ वर्षे कारभार केला. भारतीय जनतेची अशी खात्री झाली की काँग्रेसचे धोरण हे बडे भांडवलदार आणि मोठे जमीनदार यांच्या हिताचे आहे. कष्ट करणाऱ्या जनतेच्या हिताच्या विरोधी आहे. म्हणून देशभर फार मोठ्या प्रमाणावर असंतोष तयार झाला

आहे. या असंतोषावर जातीयवादी शक्ती स्वार व्हायला लागल्या. या काँग्रेसचा जन्म १८८५ साली ह्यूम या गोऱ्या साहेबानं घडविला, १८५७ साली बंड झाले ते पहिलं स्वातंत्र्य युद्ध होते आणि त्यानंतर या गोऱ्या माणसाच्या ध्यानात आले की ही गुलाम असलेली भारतीय जनता जिच्यात असंतोष तयार होतोय आणि त्याचा कधीतरी स्फोट होणार. तेव्हा या असंतोषास रीतसर वाट करुन द्यायची म्हणून त्यांनी भारतीय जनतेला काँग्रेस नावाचं एक व्यासपीठ तयार करुन दिलं.सुरवातीच्या काळात दादाभाई नौरोजी, राजाराम मोहन रॉय, मोतिलाल नेहरु अशा अनेक तपस्व्यांनी या काँग्रेसच्या पाठीमागे आपले सामर्थ्य उभे केले आणि काँग्रेसच्या नावाने स्वातंत्र्याची चळवळ देशभर वाढायला लागली. या स्वातंत्र्याच्या चळवळीत या देशातील शेतमजूर, कामगार कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यापासून बड्या भांडवलदारांच्यापर्यंत सारे वर्ग एकत्रित झाले. भांडवलदारांना असं वाटायचं की ब्रिटीश राजवट इथं असल्यामुळे साऱ्या ब्रिटीश कंपन्या आहेत. ब्रिटीश उद्योगपती आहेत आणि त्यांनी आपल्या देशाची लूट चालवलेली आहे आणि हे ब्रिटीश सरकार जर गेले, ब्रिटीश सत्ता गेली तर हे ब्रिटीश भांडवलदार जातील आणि हे रान रिकामं होईल आणि आम्ही ती जागा घेऊ शकू आणि आम्ही या देशाची लूट करु शकू, आमची संपत्ती वाढवू शकू असा या भांडवलदारांचा उद्देश होता. म्हणून बिर्ला शेटजी महात्मा गांधीजींच्या पुढे कोरा चेक ठेवावयाचे. परंतु कष्ट करणाऱ्या जनतेला वाटले होते की या बिकट परिस्थितीस ब्रिटीश सत्ता कारणीभूत आहे. ते गेले की आम्ही काबाडकष्ट करुन सुखासमाधानाने भाजी भाकरी खाऊ शकू. शेतकऱ्यांना असं वाटत होतं की, माझी जमीन भिजेल माझ्या उत्पादित शेती मालाला रास्त भाव मिळेल, माझं जीवन सुखी होईल. अशा निरनिराळ्या वर्गांच्या अपेक्षा होत्या. या आझाद हिंद सेनेच्या आणि नाविक दलाच्या बंडामुळे खरे तर ब्रिटीश हादरले आणि तडजोडीला तयार झाले. १५ ऑगस्ट १९४७ ला फक्त या काँग्रेसचा कब्जा केलेल्या नेतृत्वस्थानी जो भांडवलदार वर्ग होता,त्यात महात्मा गांधीना कोरा चेक देणारे बिर्ला शेटजी होते. त्यांनी त्या संधीचा बरोबर लाभ उठवण्याचे ठरविले होते. तसेच या देशातल्या देशभक्त संस्थानिकांनी ब्रिटीश सत्तेबरोबर संघर्ष केला, ती संस्थाने खालसा झाली आणि जे संस्थानिक येथील मातीशी बेईमान झाले, ज्यांनी ब्रिटीशांशी तडजोड केली, ज्यांनी ब्रिटीशांचे मांडलिकत्व पत्करले त्यांना ४७-४८ पर्यंत राहता आले आणि त्यांना तनखे देण्याचा करार म्हणजे ज्यांना जनतेबद्दल कसलीही कदर, प्रेम नाही, ब्रिटीश सत्तेशी झुंज खेळली नाही, ज्यांनी ब्रिटीशांची गुलामी पत्करली, जे भारतीय जनतेशी बेईमान झाले त्यांना भारताच्या तिजोरीतून कायमपणे तनखे देण्याचा करार झाला. ब्रिटीश सत्ता असताना जे या देशात ब्रिटीश उद्योगपती झाले व ज्यांनी देशाची लूट केली त्यांचे उद्योग भारतीयांनी सांभाळायचे व नफे लंडनला नियमितपणे पाठवावयाचे. या सर्वात चीड येण्यासारखी अट नेत्यांनी स्विकारली ती म्हणजे या देशाचे दोन तुकडे करायचे. ती अतिशय मोठी चूक होती. वास्तविक अशा रितीची तडजोड आम्हाला मान्य नाही, म्हणून जर भारतीय जनता मोठ्या प्रमाणावर संघटित झाली असती, ती राजकीयदृष्ट्या जाणती झाली असती, देशाच्या कानाकोपऱ्यातून असा आवाज उठविला असता तर ही वेळ आली नसती. पत्करलेल्या अटी भारतीय जनतेच्या तोट्याच्या होत्या माझ्यासारखा एक लहान विद्यार्थी त्या चळवळीत होता. धोरण ठरविण्याच्या दृष्टीने आम्ही आमचा आवाज उठवू शकलो नाही. पण ब्रिटीश जात आहेत या प्रसंगाला भाळून हा १५ ऑगस्ट १९४७ चा स्वातंत्र्य दिन साजरा केला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे आम्ही काही कार्यकर्ते होतो.१९४६ साली म्हणजे पहिले काँग्रेस मंत्रिमंडळ मुंबईत होते. गृहमंत्री मोरारजी भाईंचा दौरा सातारा



जिल्ह्यात झाला आणि दौऱ्यातच आम्ही हेरलं की हे स्वातंत्र्य फसले आहे. मोरारजीभाई न्यायदान मंडळ उद्ध्वस्त करताहेत. स्वातंत्र्य चळवळीत काम केलेल्या कार्यकर्त्यांवरच जास्त लक्ष ठेवत आहेत. अगदी तुम्हाला आश्चर्य वाटेल, मोरारजीभाईंशी आमचा एक संघर्षही झाला होता. आमची बाजू योग्य होती. ते फार सविस्तर सांगत नाही. माझ्याबरोबर असलेले कै.वसंतदादांनी सह्याद्री बंगल्यातून उतरताना माझी पाठ थोपटली व म्हणाले होते की कुणीतरी साताराचं पाणी दाखवायला पाहिजे होते ते तू दाखविलंस. ठीक झाल. पण त्याच्या पाठोपाठ मुंबईहून मला पकडण्यास वॉरंट आले. मला पकडून सांगली जेलमध्ये ठेवले. वाळवा तालुक्यातल्या व शिराळा तालुक्यातल्या ४००० बहादूर शेतकऱ्यांनी सांगलीला कलेक्टर कचेरीवर मोर्चा आणला आणि माझी सुटका करुन घेतली. म्हणजे सुरवातीपासून आमच्या ध्यानात आलं होत की हे स्वातंत्र्य फसलेलं आहे. आम्ही फार मोठ्या प्रमाणात जनतेला काही पटवून देऊ शकलो नाही. दुसऱ्या बाजूला सत्ताधारी आवाहन करत होते की कुणाच्या पोराला फौजदार करायचं आहे ? कुणाच्या पोराला मामलेदार करायचं आहे? कुणाला आमदार करायचं आहे? कुणाला खासदार करायचं आहे? मग आपल्यातल्या मोजक्या मंडळींना ते सत्ताधाऱ्यांचं आवाहन जवळच वाटलं आणि त्यांनी त्याच्यापुरता विचार करुन काँग्रेस सत्ताधाऱ्यांची बाजू धरली. इमानानं विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांची बाजू धरली आणि हा असा संघर्ष कायमचा चालू आहे. महात्मा फुले यांच्यासारखा द्रष्टा नेता या महाराष्ट्रात जन्माला आला. त्यांना फार मोठ्या प्रमाणात शाहू महाराजांनी साथ केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारखं रत्न हे निर्माण केलं, तयार केलं आणि या सत्यशोधक चळवळीचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातला बहुजन समाज जागा झाला. मा. कै. जेधे यांच्या सारखा एक द्रष्टा नेता की ज्यानं त्या सत्यशोधक चळवळीत वाहून घेतलं. पण दुर्दैवाने देवगिरीकरांच्या हे ध्यानात आलं की ही सत्यशोधक चळवळ म्हणजे बहुजनांना जागी करणारी चळवळ केव्हातरी भयंकर स्वरुप धारण करेल आणि आम्ही आतापर्यंत पिढ्यानपिढ्या वर्चस्व गाजवलेली माणसं खाली गाडली जाऊ. म्हणून त्याच्या सुपीक डोक्यातून एक तत्वज्ञान पुढं आलं. त्यांनी उठवलं की ''अरे कसली बहुजन समाजाची जागृती आणि कसली सत्यशोधक चळवळ काढता आहात. आपला भारत देश गुलाम आहे. ब्रिटीशांना देशाबाहेर घालवून तो भारत स्वतंत्र झाल्यावर सारं ठीक होणार आहे, नंदनवन होणार आहे असा आभास निर्माण केला आणि दुर्दैव आमचं आमच्या नेत्यावर विश्वास ठेवला आणि सत्यशोधक चळवळ गुंडाळली. सर्व जनता काँग्रेस झेंड्याखाली आली, ब्रिटीश सत्तेला हाकलून लावण्यासाठी तुरुंगवास, भूमिगत अवस्था असे अनेक लढे केले. अनेकांनी बलिदान पत्करले. या साऱ्या हुतात्म्यांची सबंध देशभर लाखांनी संख्या होती, हे सांगता येणार नाही पण सारी कष्टकऱ्यांची पोर मेलेली आहेत. टाटा बिर्लांच्या घरातला कोणी मेला नाही. साने गुरुजींसारखा चुकून एखादा पांढरपेशा होता, की ज्यानं अपवाद म्हणून जनतेशी इमान राखलं. नाहीतर शेटजी, भटजी हे स्वतःच्याच स्वार्थाचा विचार करीत होते. त्यांनी बहुजनांच्या हिताचा विचार केला नाही म्हणून जी परिस्थिती तयार झाली की बहुजनाचे नेते जेधे जर काँग्रेसमध्ये आहेत. तर यशवंतरावांना, वसंतरावांना वाटलं आपणही इथं गेलं पाहिजे आणि बहुजन समाजातील कर्तृत्ववान माणसं फार लांब पल्ल्याचा विचार न करता तात्पुरता विचार करुन काँग्रेसमध्ये सामील झाले आणि साऱ्या महाराष्ट्रातल्या बहुजन समाजाने फार मोठ्या प्रमाणात काँग्रेसला पाठिंबा दिला, तर हे दुर्दैव आहे. बहुजनांनी जर सत्यशोधक चळवळ जागृतीची चळवळ, शिक्षणाची चळवळ, कर्मवीर भाऊराव पाटील सारखी या नेत्यांनी चालू ठेवली असती तर आज निराळंच घडलं असत. आपल्या

वाट्याला आज हे दु:ख आलच नसतं. महात्मा फुल्यांचा महाराष्ट्र आपण अभिमानाने सांगतो आणि या महात्मा फुलेंच्या महाराष्ट्रात भाजप शिवसेनेची सत्ता आहे. बहुजनांच्या शत्रूंची सत्ता आहे. म्हणून हुतात्मा किसन अहिर यांच्या पुण्याईनं, त्यागान असणारं हुतात्मा किसन अहिर विद्यालय व वसतीगृह, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाचं महाविद्यालय, हुतात्मा नानकसिंगाच्या नावाच विद्यालय व वसतीगृह, हुतात्मा किसन अहिर यांच्या नावाने सहकारी साखर कारखाना या सर्व घटकांनी खूप मोठी ताकद दिली. विशेषत: ६ डिसेंबर १९९२ नंतर आमची तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली आणि ९ डिसेंबरपासून प्रा. बाबूराव गुरव, डॉ. भारत पाटणकर, ॲड. धैर्यशील पाटील, कॉ. नाना शेटे, राम पाटील, एस. आर. पाटील, जमादार सर, बाळासाहेब नायकवडी अशा अनेक कार्यकर्त्यांनी अक्षरश: सांगली, सातारा, कोल्हापूर आणि थोड्याशा प्रमाणात सोलापूर पिंजून काढायचा प्रयत्न केला, की आता आपण लोकांना सांगितलं पाहिजे, जाणतं केल पाहिजे. बहुजनांना हे जातीयवाद्यांचं आव्हान आहे आणि खरोखरच ६ डिसेंबर १९९२ ला बाबरी मशीद पाडण्याच ते धाडस भाजप, शिवसेना, बजरंगदल, हिंदू एकता यांनी दाखवलं. बहुजनांना बनविण्यासाठी एकानं म्हणायच छे. छे. मी भाजपवाला नाही.मी बजरंग दलाचा आहे. म्हणजेच त्याचाच भाऊ. तिसऱ्यानं म्हणायच मी आर.एस.एस.वाला आहे. त्याचं आणि आमचं जमत नाही. पण सारे एकच आहेत. या साऱ्या जातीयवादी प्रतिगामी शक्तींनी मशीद पाडली आणि त्यांनी अनुकूल परिस्थिती कुठं होती तर ऑगस्ट ९२ मध्ये काँग्रेसच्या खासदारांना संख्या कमी पडली म्हणून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनं भाजप बरोबर युती केली. आणि भाजपच्या खासदारांची मते घेऊन शिवराज पाटलांना लोकसभेचं अध्यक्ष केल. त्याच्या बदल्यांत भाजपच्या एका खासदाराला काँग्रेसच्या खासदारांनी मत देऊन त्याला लोकसभेचं उपाध्यक्ष केलं. ही जातीयवाद्याशी जी एकात्मतेचा जयघोष करणाऱ्या काँग्रेसने स्वत:च राष्ट्रीय जयघोष पायदळी तुडवला आणि कसंही करुन राज्य करायचं आणि आजपर्यंत तुम्ही राष्ट्रीय वाद सांगून तुम्ही कष्ट करणाऱ्यांच्या हिताचं काही करु शकला नाही आणि आता तर उघडउघड जातीयवाद्यांशी युती करुन तुम्ही राज्य करु इच्छिताय तेव्हा आता हे अक्षरश: ह्या काँग्रेसवाल्यानी बहुजनाचं असं अवसान घेतलं.त्यांना वाटल, आम्ही वाटेल ते करु, भाजप बरोबर युती करु, काय वाटेल ते करु आम्हाला कोण विचारणार आहे. जनता संघटित नाही अशा अनेक घटना सांगता येतील. आंध्रमधील एक पोट्टी रामानुज एक तपस्वी गृहस्थ होता. याने त्यांच्या भाषेचे राज्य व्हावे म्हणून आमरण उपोषण केलं आणि प्राण सोडला. तरी दिल्लीला त्याचं ज्ञान झाल नाही आणि त्यांनी प्राण सोडल्यानंतर आंध्रामधली कामगार, शेतकरी जनता उठली आणि मग दिल्लीला जाग आली. मग त्यांनी असा अंदाज घेतला की निरनिराळ्या प्रांतात आता अशी हे भाषावार राज्ये होणार. यांच्या दृष्टीने हे खूळ उठणार आहे. तेव्हा आपणच अगोदर करावं म्हणून फाजल अली, पंडीत हृदयनाथ कुंझरु यांची एक कमिटी निवडली. या कमिटीला खरं बोलायचा अधिकार नव्हता. चार अधिक चार आठ असं ही कमिटी म्हणूच शकत नव्हती म्हणून त्यांनी द्विभाषिकाचा पर्याय आणला. महाराष्ट्रापासून मुंबई तोडायचा प्रयत्न केला म्हणजे एकसंघ मराठी मुलखाचं राज्य ते घोषित करु शकले नाहीत. याच वेळी निदान महाराष्ट्रातल्या काँग्रेसच्या नेत्यांच्या ध्यानात यायला पाहिजे होतं की या काँग्रेसकडं न्याय नाही. सत्य ह्यांना नको आहे. जो आंध्रमधला पोट्टी रामानुज सांगतोय की ब्रिटीशांची नीती फोडा आणि झोडा होती. १५ ऑगस्ट १९४७ नंतर आता एका भाषेचा एक प्रांत करुया हे सत्य आहे. योग्य आहे, असंसुध्दा सांगितलं नाही. या बिचाऱ्याचा हकनाक प्राण



गेला. जालियनवाला बाग हत्याकांड ब्रिटीशांनी केले. आमच्या हजारो भारतीयांचे मुडदे पाडले. आमची मुंबई म्हणून आमची मराठी माणसं आमच्या मुंबईवर हक्क सांगायला गेली. काँग्रेसच्या राज्य सरकारने तर जालियनवाला बागेसारखी या लोकांची कत्तल केली. मोरारजी भाईनी १०५ मराठी माणसांची कत्तल केली.त्याच वेळी हे स्पष्ट झाल होत की, ब्रिटिशांच्या पावलावर पावूल ठेऊन जाणारी ही काँग्रेस सत्ता आहे, राजवट आहे. फरक एवढाच, ब्रिटिशांचं राज्य असताना ब्रिटीश भांडवलदारांच्या हिताचा कारभार करत होतं आणि आता काँग्रेसच्या नावानं हे राज्य चाललंय ते हिंदी भांडवलदारांच्या हिताचं धोरण घेऊन राज्य चाललंय, काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, बहुजनांच्या हिताचं धोरण घेतलं जातच नाही, ही सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट गोष्ट होती. पण ज्या काँग्रेसच्या नेत्यांनी स्वत:पुरता संकुचित दृष्टिकोन ठेवला, त्यांच्यात लढायची हिम्मत नव्हती, त्यांनी निदान जनतेला तरी सांगायला पाहिजे होतं की तुमचा महाराष्ट्र असताना तुम्हाला देत नाहीत, मुंबई तुमची असताना तुम्हांला देत नाहीत, ती मागणी केली त्यांच्यावर गोळ्या घालतायत आणि तुमचे खून करतायत, तुमचा कारभार असताना तिकडे कर्नाटकला निपाणी, कारवार देताय. तुमचा डांग असताना तिकडे गुजरातला देताय, सीमाभागातील जनता लोकशाही पध्दतीने विरोध करते, पण त्यांची दिल्ली कदर करत नाही, या साऱ्याहून काँग्रेसही कष्ट करणाऱ्यांची संस्था नव्हती. त्या ह्यूम साहेबांनी काँग्रेसला जन्म देताना सारे वर्ग काँग्रेसमध्ये आले, मजूर, कामगारांपासून, शेतकऱ्यांपासून भांडवलदार सुध्दा आले होते. भांडवलदारांनी काँग्रेसचा कब्जा केला होता.१९४७ साली तडजोडीत त्यांनी आपल्या वर्गाचे हित लक्षात घेऊन ही तडतोड केली, बाकीच्या ८०, ८५ टक्के जनतेचा विचारच केला नाही. त्या १५ ऑगस्ट १९४७ च्या तडजोडीच्याच विरोधी सबंध देशातल्या कष्टकरी जनतेने उठायला पाहिजे होते. त्यावेळी आपण संघटित नव्हतो. जाणकार नव्हतो. त्यामुळे उठू शकलो नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांच्या वेळी खराखुरा संयुक्त महाराष्ट्र मिळाला नाही. यांना लोकशाहीची चाड नाही, सत्य त्यांच्याकडे नाही. तेव्हा काँग्रेसही आपली नव्हे म्हणून महाराष्ट्रातील नेत्यांनी सत्तेला लाथ मारुन बाहेर पडायला पाहिजे होते आणि कामगार, कष्टकरी जनतेच्या हिताचं धोरण घ्यायच्या दृष्टीने नवे काहीतरी स्थापन करायला पाहिजे होते.शेतकरी कामगार नावाचा पक्ष १९४८ नंतर जनतेने फार मोठी ताकद देऊन वाढवला. जेधेंसारखी तपस्वी मंडळी होती. पण योग्य धोरण घेऊन तो पक्ष वाढू शकला नाही. अनेक डाव्या पक्षांची कशी काय अवस्था झाली हे आपण पाहतो आहे. संयुक्त महाराष्ट्र समिती संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांवर स्थापना झाली. या समितीच्या ब्राम्हणी नेत्यांनी आपली जात वाचवायची या उद्देशाने हिंदू महासभा, जनसंघाला संयुक्त महाराष्ट्र सभेत स्थान दिले. ही अतिशय मोठी चूक झाली. या समितीचे संघटन जातीयवादी शक्ती सोडून डाव्या लोकशाही शक्ती एकत्र आल्या असत्या तर आज निराळेच घडले असते. ५७ च्या निवडणुका झाल्या आणि जनसंघ निघून गेला. हिंदू महासभा अगदी ६५ च्या निवडणुकीपर्यंत समितीत होता.समितीच्या नेत्यांनी या जातीयवादी शक्ती बाजूलाच ठेवायला पाहिजे होत्या. आता आनंदाची गोष्ट अशी आहे की साऱ्या डाव्या पक्षांच्या नेत्यांच्या ध्यानात आलंय की, ही भांडवलदारांची काँग्रेस जशी आपली शत्रू आहे तसच अगदी दुसऱ्या बाजूला हे जातीयवाद्यांचं भूत निरनिराळ्या नावानं वाढत आहे. त्याच बरोबर भाजप, शिवसेना नवीन संकट तयार झाले आहे. आता आपल्या साऱ्या नेत्यांचे डोळे उघडले आहेत. रिपब्लिकन मधल्या सर्व गटांना एकत्र आणणे गरजेचे आहे. रिपब्लिकन, मार्क्सवादी, आंबेडकरी जनता जवळ जवळ यशस्वी होत आलेली आहे. तिनं असा दबाव ठेवून साऱ्या नेत्यांना एकत्रित

आणलंय. अगदी तसंच आपण जे कोणी कष्ट करणारे असू, आंबेडकरांच्या जनतेप्रमाणे बाकीच्या बहुजन समाजातील कष्टकऱ्यांनी या डाव्या शक्तींना सांगितले पाहिजे की एकत्रित या आणि हे स्वातंत्र्य फसलं, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ फसली, हे सारे पुन्हा दुरुस्त करुन खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याचा शोध घेऊ या आणि त्याच्यासाठी सारे कष्ट करणारे बहुजन एकत्र येऊ या म्हणून या हुतात्मा किसन अहिरांच्या पुण्याईने उभा राहिलेल्या केंद्रातून अशा अनेक चळवळी होतात. शेतमजूर, शेतकरी, कष्टकरी संघटना आहेत. विद्यार्थ्यांच्या संघटना करुन त्यांच्यात जागृती करत आहे. स्त्रियांच्या मध्ये जागृती करण्यात फार मोठ्या प्रमाणात यशस्वी झालो आहे असे नाही, पण कष्ट करणाऱ्यांचे जे निरनिराळे विभाग आहेत ते सारे जाणते व्हावेत आणि या संकटाचा विचार करावा, भांडवलशाही शेटजींची ही काँग्रेस आणि दुसऱ्या बाजूला शिवसेना, भाजप या जातीयवादी, प्रतिगामी शक्ती आहेत. या साऱ्यांवर मात करून या डाव्या आघाडीत या साऱ्या बहुजनांनी आपला मोर्चा पुढे नेण्याची गरज निर्माण झाली आहे. तेव्हा आता सांस्कृतिक कामांमध्ये सुध्दा आपण त्यांच्या मागे राहता कामा नये या उद्देशाने दलित-आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या नावाने बहुजनांची ही सांस्कृतिक चळवळ चालू ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. आज त्याचा पहिला दिवस आहे. आज, उद्या, परवा या चळवळीतून बागूल साहेब व शरदभाऊ म्हणतात त्याप्रमाणे आपण काहीतरी योग्य असे निर्णय एकमताने घेण्याची फार गरज आहे.असा हा अतिशय महत्त्वाचा काळ आहे. आणि अशा काळात बहुजनातले जे राजकारणात आहेत हे साहित्यिक काय करतात? एक राजकीय अंग प्रामुख्याने सांभाळतात. जुन्या काळात सुध्दा शाहीर होते, लेखक होते तसेच आता आमच्यातले हे बहुजनांचे कवी, लेखक या सर्वांनी हा सारा बहुजन समाज जागा करावा, यांनी एकत्रित यावे आणि सारी बहुजनांची चळवळ कशी एकत्रित येईल त्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावयाचा आहे. लेख लिहावेत, नियमित चालणारी साप्ताहिके, मासिके सुरु करावीत असतील, ती जास्त जाणतेपणाने काम कसे करतील हे पहावे व याच उद्देशाने अशी संमेलने भरवावीत.

गुरव सरांनी सर्वांचे वतीने सांगितले ते अतिशय चांगले व महत्त्वाचे आहे. हे सांस्कृतिक काम आम्ही मध्येच बंद पडता कामा नये. आपण राजकीय बाबतीत पिछाडीस आहे हे दुर्दैव आहे. याचा असा दुष्परिणाम होईल की आपली एक पिढी त्यात गारद होईल. तर हे घडू नये म्हणून आपण बहुजनातील लेखक व कवींनी या सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी ही अशी सांस्कृतिक चळवळ जाणती, संघटित करावी की ज्यांच्यामुळे साऱ्या महाराष्ट्रातील बहुजन समाज जुन्या काळात जसा महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे रणशिंग फुंकल्यावर जागा झाला होता तो १९४८ नंतर महात्मा गांधींच्या खुनानंतर पुन्हा नव्याने शेतकरी कामगार पक्षाच्या नावानं जागा झाला. पण त्याचा मोठा हिरमोड झाला.असे हे सारे टप्पे, खाचखळगे, धोके, चुका हे सारे ध्यानात घेऊन पुन्हा आता चुकायचे नाही हे लक्षात ठेवून गुरव सर जसे म्हटले महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मार्क्स या साऱ्यांची सांगड घालून प्राप्त परिस्थितीचं एकूण मूल्यमापन करुन योग्य धोरण घेऊ या, या साऱ्या हालचाली होणं अतिशय गरजेचे आहे.

लोकसभेच्या निवडणुका येतील व जातील पण या लोकसभेच्या निवडणुकीला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जर आपल्या बहुजन पक्षाचं चुकलं आणि पुन्हा जर भाजप दिल्लीत आली तर त्याच्याइतका दुःखाचा दिवस दुसरा कोणताच नाही. मग ते अनेक काळ हालणार नाहीत. लष्कर त्यांच्या ताब्यात जाईल. पोलिसांच्याकडून, मिलटरीवाल्यांकडून तुम्हांला



गोळ्या घालून ते बाजूला राहतील. ब्रिटिशांनी जे केले तेच हे करतील. कारण ब्रिटिशांच्यापेक्षाही यांची निती वाईट आहे. आता प्रत्यक्षात त्याचा अनुभव आला आहे. ब्रिटिशांनी अस्पृश्यता मानली नाही. त्यांनी फक्त भांडवलदारांचं व जमिनदारांचं हित पाहिलं, पण या ब्राम्हणवाद्यांनी जुन्या काळात गरिबांच्या जमिनी बळकावल्या. पण माणसाला माणूस म्हणूनसुध्दा वागविले नाही. आमच्याच भावाच्या गळ्यात मडकी बांधली. तुम्ही काबाडकष्ट करणारे शेतकरी ऊसाची मोळी घेऊन गेलात, धान्यांची पोती घेऊन गेलात व पाणी मागितलं तर पाणी ओंजळीत देत होते आणि चुकून केव्हा जेवावयाला वाढल तर ती जागा सारवायला लावलेली आहे. हे सारं ध्यानात घेण्याची गरज आहे. तुम्ही माणूस आहे, त्याला सुध्दा त्यांनी मान्यता दिली नाही. आता तुमच्यात बसलेल्यांपैकी कोणीतरी म्हणणार आहे की नाही? आता बहुजन समाज बदलला आहे. त्यानं हे सारं ओळखलं. तोच आता हे चालू देणार नाही म्हणून हा तात्पुरता बदल आहे हे ध्यानात ठेवायचं. अगदी म्हणजे एखादा विषारी प्राणी; तो गारठलेला आहे म्हणून आपण जर त्याला उबाऱ्याला ठेवल तर तो दंश केल्याशिवाय राहणार नाही, आपला गुण दाखविल्याशिवाय राहणार नाही, असाच पिढ्यानपिढ्या अनुभव येईल. त्यांचं धोरण बदललं नाही. अहो, सत्यशोधक चळवळ ही १०० वर्षापूर्वीची आहे. ३० सालापर्यंत चालली होती. तेव्हा आता बदल झाला आहे. यावर भरवसा ठेवू नका. यात तुमचं कौशल्य आहे. शिंदे, भोसले, सुतार, लोहार यांच्याबरोबर कसं वागायचं त्यांनी ठरवलं आहे. काबाडकष्ट करणाऱ्यांपेक्षा आम्ही श्रेष्ठ आहे, अशी ब्राम्हणांनी जी चुकीची समजूत केली आहे ती तुम्ही करु नका. साऱ्या बहुजनात असणारं अंतर कमी करुन अशी भक्कम अभेद्य फळी तयार करणेची गरज आहे. नुसत्या निवडणुका नव्हे तर निवडणुका लढाव्याच लागतील. ब्राम्हण पुन्हा वरचढ ठरण्याचा प्रयत्न करणार आहेत. अत्यंत सावध राहण्याची गरज आहे. अगदी प्रत्येक क्षण जो जाणता झाला, त्यानं दुसऱ्याला जागं करण्यासाठी एक क्षण सुध्दा वाया घालवता कामा नये. हजारो तोंडं तुमची चालू झाली पाहिजेत. तेवढंच आपल्याकडं सामर्थ्य आहे. संख्या आपली जास्त आहे आणि आपण उत्पादक वर्ग आहोत हे लक्षात ठेवा. या उत्पादक वर्गाने जर असं जाणतेपणानं एक जुटीनं जर उठलं तर ही सत्ता ताबडतोब जाईलच पण तुम्ही, ह्यानी डोकच वर काढता कामा नये असा कायमचा बंदोबस्त केला पाहिजे. त्याच्यासाठी अक्षरश: तपस्व्यासारखी तुमच्या कार्यकर्त्यांनी भूमिका घेण्याची गरज आहे आणि जनतेचा विश्वास संपादन करुन तो टिकवणं आणि कष्ट करणाऱ्यांची ही सत्ता ही समाजवादी दृष्टीनं घोडदौड कशी करेल या दृष्टीनं अत्यंत काळजीपूर्वक विचार करुन पाऊल टाकण्याची गरज आहे.''

नागनाथ अण्णांनी बहुजन समाजामधील विद्वान, जाणकार, विचारवंतांनी काय भूमिका घेऊन साहित्य क्षेत्रातही काय करावयास पाहिजे याचे बहुमोल मार्गदर्शन व प्रबोधन दलित-आदिवासी साहित्य संमेलनाचे निमित्ताने केले आहे. अशा उपक्रमास त्यांनी सर्वतोपरी सहाय्य करून प्रोत्साहन दिले आहे व देत असतात.

* * * *

# २४

## पत्नीसह रशिया दौरा

१९८५ ते १९९० या कालावधीत आमदार असताना १९८८ साली नगर जिल्ह्यातील जामनेरचे आमदार कॉ. झावरे यांनी आमदारांचा रशिया दौरा आयोजित केला होता. त्यामध्ये नागनाथ अण्णांही सामील होणार होते. पण काही कारणामुळे आमदारांचा दौरा रहित झाला. त्यानंतर अण्णांचे मित्र श्री. गुजराथी म्हणाले की, खाजगी यात्रा कंपनीमार्फत गेले असता रशियातील ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक, संस्थांना मोकळेपणाने भेट देता येते. या सूचने नुसार दिल्लीच्या हॉलिडे मेकर्स या कंपनीचे वतीने जाणाऱ्या रशियाचे दौऱ्यामध्ये नागनाथ अण्णांनी जायचे ठरविले व त्या प्रमाणे तिकडे जाण्याची तयारी करणेस लागणारी कागदपत्रे जमविली.

क्रांतिवीरांचा रशिया दौरा निश्चित झालेचे कळताच सौ. कुसुमताई नायकवडी यांनीही रशियाचे दौऱ्यात जाण्याचा हट्ट धरला. नागनाथ अण्णा म्हणाले, ‘‘आता मी जाऊन येतो मग आपण जाऊ.’’ पण खूपच आग्रह धरल्यामुळे त्याही दौऱ्यात सामील झाल्या होत्या.

निघण्यापूर्वी हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्यासमोर अण्णांनी एक सभा बोलावली होती. त्या सभेस कुटुंबियांनी व सहकारी हितचिंतकांनी दौऱ्यासाठी अर्थसाहाय्य करावे असे सुचविले. त्यानुसार धाकटे बंधू शामराव व चिरंजीवांनी आठ हजार रुपये, हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याचे कामगारांनी, हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या शिक्षकांनी, जिजामाता विद्यालयाच्या शिक्षकांनी एक दिवसांचा पगार दिला. पण लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे हुतात्मा कारखान्याचे जीप व ॲम्बेसिडर गाडीच्या ड्रायव्हरांनी एक महिन्याचा पगार दिला. पण पत्नी सौ. कुसुमताई नायकवडी यांनी मात्र स्वत:च्या खर्चाची सोय स्वत:च्या पैशामधूनच केली होती. नंतर पासपोर्ट, विदेशी चलन वगैरे गोष्टीची व्यवस्था झाली.



क्रांतिवीर नागनाथ अण्णा, सौ. कुसुमताई सोमवार दि. ३१ ऑक्टोबर १९८८ रोजी रात्री ११ वाजता मुंबईकरिता वाळव्याहून निघाले. पुण्यामध्ये इन्स्पेक्शन बंगल्यात मुक्काम करुन १ नोव्हेंबरला मुंबईच्या आमदार निवासात खोली नं. १२५ मध्ये मुक्काम करुन दिनांक २ नोव्हेंबरला रेल्वेने दिल्लीस प्रयाण केले. रेल्वेप्रवासामध्ये वसंत पवार आयत्यावेळी सामील झाले होते.

श्री. गुजराथी यांनी रेल्वेने निघताना प्रवासात उपयोगी पडतील असे जेवणाचे पदार्थ, पाणी वगैरे दिले होते. कॉ. दत्ता देशमुख रशियात काय काय पहावे यांच्या सुचना देऊन निरोप देण्यास स्टेशनवर मुद्दाम आले होते. विनोदाने ते अण्णांना म्हणाले की, उभ्या आयुष्यात कधी एकत्रित प्रवास केला नाही, मुक्त एकांत लाभला आहे रशियात आनंद लुटा अण्णांनी ते हसण्यावारी नेले होते. दिल्लीमध्ये ज्या ठिकाणी महाराष्ट्रातील थोर शिक्षणतज्ज्ञ कै. जे. पी. नाईक होते त्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन या संस्थेच्या गेस्ट हाऊसमध्ये अण्णांनी मुक्काम केला. रशियात खूप थंडी असलेमुळे गरजेच्या गरम कपड्यांची खरेदी केली. हॉलिडे मेकर्सच्या दिल्ली कार्यालयात प्रवासाच्या सुचना मिळाल्या २५० डॉलर्स व २० डॉलर्सचा चेक मिळाला व दिल्ली ते मॉस्को विमान प्रवासाची तयारी झाली.

नागनाथ अण्णां हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचे मंजुरीचे निमित्ताने दिल्लीत अनेक दिवस राहिले होते. त्यांचा वाळवा ते दिल्ली प्रवास रेल्वेने अनेक वेळा झाला होता. पण तो भारतातील झाला होता, आता ते परदेशात रशियाच्या राजधानीत मॉस्कोला तेथील स्वातंत्र्यदिन–क्रांतिदिन पाहण्यास जाणार होते. परदेशाला विमानाने प्रथमच व तेही रशियाला जाण्याचा योग आला होता. त्यामध्ये उत्सुकता व जिज्ञासा होती.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाधानी नव्हते, त्यांच्या मते खरे स्वातंत्र्य मिळालेच नाही, नव्या समाजात काय असावे हे ते प्रजासत्ताक लोकशाही रशियामध्ये पाहणार होते. तेथील समाज व्यवस्था पाहणार होते. त्यासाठी लोकवर्गणीतून त्यांचा दौरा होता.भारताप्रमाणेच रशियामध्ये शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. परंतु शेती व्यवसायामध्ये संशोधन करुन यंत्राचा उपयोग करुन रशियामधील शेती प्रगतीशील देशांना अनुकरणीय अशी होती. ते पाहण्याची जिज्ञासा अण्णांना होती.

दिल्ली विमानतळावर सर्व तपासण्या होऊन विमान प्रवास सुरु होणार तेवढ्यात विमानात काही बिघाड झालेमुळे विमानात बसवलेले प्रवाशी परत खाली उतरले, प्रवासी कंपनीने सेन्टॉर हॉटेलमध्ये राहण्याची सोय केली, दुसरे दिवशी ताश्कंदमध्ये मुक्काम करुन मॉस्को येथे ६ नोव्हेंबरला एका अलिशान हॉटेलमध्ये मुक्कामाची सोय केली होती. तिथे इतक्या श्रीमंती थाटाच्या सोयी होत्या ज्यांची नागनाथ अण्णांना गरज नव्हती. पण तो पाहुणचार नाइलाजाने घ्यावा लागला होता.

७ नोव्हेंबर हा रशियाचा क्रांतिदिन. तो आपल्याकडील २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाप्रमाणे साजरा करतात. मॉस्कोच्या लेनिन लाल चौकातील गर्दीमध्ये नागनाथ अण्णां रशियन क्रांतिदिन पहात होते. रशियन नागरिक हातात लाल निशाणे व लाल गुलाबाचे गुच्छ घेऊन उभे होते. सर्वात प्रथम पायदलाच्या परेडस् झाल्या. त्यामागून वाहने व शस्त्रास्त्रांच्या वाहनांची परेड झाली. त्या प्रसंगी रशियाच्या राष्ट्राध्यक्षांचे जनतेला उद्देशून भाषण झाले व तो सोहळा

संपला. त्यादिवशी लोकांमध्ये आनंद ओसांडून वहात होता हे पहावयास मिळाले. अनेक वर्षांची इच्छापूर्ती झाली होती.

दुसऱ्या दिवशी ८ नोव्हेंबरला मॉस्को शहर पाहिले. तेथे कोणीही मोकळा, बेकार इसम दिसला नाही. सर्वजण कामात गढून गेले होते. मॉस्को शहराची लोकसंख्या सुमारे ८४ लाख आहे. पण तेथील १३ राज मार्ग व तेथून ३० देशांना रेल्वेने जाता येते. शहरात एकूण ५ विमानतळ आहेत. १९३० साली येथील बेकारी पूर्णपणे संपली आहे. तेथे १०० टक्के साक्षरता आहे. दिवस शाळा, रात्र शाळा आहेत. तांत्रिक शिक्षणाच्या शाळा आहेत. प्रत्येक व्यक्तीला आवडीनुसार शिक्षण दिले जाते. मॉस्को विद्यापीठाची ३२ मजल्याची इमारत लक्षणीय अशी आहे.

मॉस्कोत वैद्यकीय सेवा मोफत आहे. संस्कृतीची व कलेची जोपासना केली जाते. त्यासाठी नाट्यगृहे, संगीतगृहे, नृत्यगृहे, सर्कशी, चित्रपटगृहे पुष्कळ आहेत. मॉस्कोमध्ये ४५०० वाचनालये आहेत. शहरात २४०० ऐतिहासिक पुरुषांचे पुतळे, ऐतिहासिक इमारती वगैरे जतन करुन ठेवल्या आहेत. शहराच्या माध्यमातून वाहणाऱ्या 'मस्कवा' नदीवर २०० पूल आहेत. प्रसिध्द लाल चौकात २४ जून १९४५ रोजी निधन पावलेल्या कॉ. लेनिन यांची मोठी कबर आहे. कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक नेते चिरनिद्रा घेत आहेत ते पाहण्यासाठी व नेत्यांना अभिवादन करण्यासाठी नेहमी रांग लागलेली असते. मॉस्को येथील लोक उंच, धिप्पाड, देखणे व हळू बोलणारे आणि अधिक जलद चालणारे आहेत. ७ नोव्हेंबरच्या क्रांतिदिनादिवशी सर्व जगातून लोक येत असतात.

दि. ९ नोव्हेंबरला मॉस्कोहून लेनिनग्राडला आगगाडीने आल्यावर तेही शहर मॉस्कोसारखे असून ऐतिहासिक इमारती, पुतळे, झारचा राजवाडा, पाहिला. लेनिनग्राड येथील म्युझियम पाहण्यासारखे आहे. सर्व सेवक महिला आहेत.

लेनिनग्राडहून विमानाने येऊन सोची शहरात मुक्काम केला होता. विमानतळापासून शहर खूप लांब आहे.तेथे प्रवासी संख्या खूपच होती. इमारती साध्या व कमी उंचीच्या आहेत. लोकसंख्या विरळ आहे. त्यामुळे शहर शांत वाटले. तेथे रात्री थिएटरमध्ये रशियन गायनाचा व रशियन नृत्याचा कार्यक्रम पाहिला. रात्री रशियन सर्कस एका भव्य इमारतीत पाहिली.

सोची शहर पाहून १४ नोव्हेंबरला कीव्ह शहरात विमानाने आल्यावर हे पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्द असलेल्या शहरातील निसर्गसौंदर्य पहावयास मिळाले. या पर्यटन स्थळी सुध्दा कोठेही भिकारी पहावयास मिळाला नाही.

दुसरे दिवशी कीव्ह येथील विन नावाची पण नंबर असलेली ३९ नंबरची शाळा पाहिली. एका वर्गात १६ ते ३० मुले होती. तसे बंधन आहे. तेथील मुलांना दुपारी दूध देताना स्टाफ व विद्यार्थांना २५ कोपेक (रशियन चलन) मध्ये पौष्टिक जेवण मिळते. मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम करुन दाखवले. शिक्षक मुलांवर वैयक्तिक लक्ष देतात. तेथे होमवर्क फार कमी प्रमाणात असते.

दिनांक १६ नोव्हेंबरला कीव्ह सोडून विमानाने परतीच्या प्रवासासाठी ताश्कंद येथे आलेवर मुक्काम केला. गुरुवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी तेथे एक प्राथमिक शाळा पाहिली. शाळेच्या बाहेरच्या बागेमध्ये कै. लाल बहादूर शास्त्रींचा मोठा पुतळा आहे. अण्णांनी व बरोबरच्या



सर्वांनी भारताच्या लाडक्या नेत्याला आदराने फुले वाहिली. त्या शाळेतील भिंतीवर कै. पंडीत जवाहरलाल नेहरु, कै. इंदिरा गांधी, कै. लाल बहादूर शास्त्री वगैरे भारतीय नेत्यांचे फोटो लावले होते. भारताचे राष्ट्रगीत भिंतीवर लिहिले आहे. प्रत्येक खोलीत भारत-रुस मैत्री हिंदी भाषेतील फलक लावलेत. १ ते ८ वीच्या त्या शाळेचे नावच लाल बहादूर शास्त्री असे ठेवले आहे.

ताश्कंदचे रस्ते स्वच्छ व मोठे आहेत. फुटपाथला लागून गुलाबाचे ताटवे आहेत. नेहमी वाऱ्याने डोलणाऱ्या गुलाब पुष्पाचे लोक न्याहाळून आनंद घेतात पण कोणी तोडत नाहीत. ताश्कंद हे दगडमातीच्या साध्या घरांचे शहर असलेमुळे भारतीय खेड्यासारखे आहे.

बरोबरच्या इतर प्रवाशांनी मिळालेले डॉलर्स खर्च करुन वस्तू खरेदी केल्या नागनाथ अण्णांनी पत्नीच्या पसंतीने दहा रुबल्स्ला एक या प्रमाणे दोन कॅलेंडर्स फक्त घेतली.

दुसरे दिवशी म्हणजे १९ नोव्हेंबरला दिल्लीला जाण्याची तयारी केली. आवरा आवर केली आणि दिनांक २० नोव्हेंबर १९८८ रोजी विमानाने अण्णा दिल्लीला पोहोचले. ११ पी. ए. च्या गेस्ट हाऊसमध्ये मुक्काम करुन मुंबईला व नंतर वाळवा येथे त्यांचे आगमन झाले.

इतर प्रवाशांसारखे खर्च न करता नागनाथ अण्णांनी अत्यावश्यक तेवढाच खर्च केला. राहिलेले पैसे कामगारांना परत केले. इतका पारदर्शी आचार व विचार कोणत्याही नेत्यामध्ये आढळेल काय? हा एक संशोधनाचा विषय आहे.

रशियाचा दौरा केल्यानंतर नागनाथ अण्णा म्हणतात की आता एकदा चीनचाही दौरा करण्याची इच्छा आहे.

* * * *

## २५

# धर्मांध शक्तींचा बीमोड

अयोध्येतील श्रीराम मंदिर बांधण्यासाठी भारतातील हजारो कारसेवकांना अयोध्येमध्ये येण्याचे आवाहन भाजप व शिवसेना नेत्यांनी केल्यामुळे अयोध्येमध्ये स्फोटक परिस्थिती निर्माण झाली होती. उत्तर प्रदेशमधल्या भाजप सरकारच्या अंतस्थ पाठिंब्यामुळे अयोध्येत जमलेल्या कार सेवकांनी राम मंदिर उभारणे बाजूला ठेवून बाबरी मशीद जमिनदोस्त केली. भाजपचे अनेक वर्षांचे ध्येय साध्य केले. तो दिवस होता ६ डिसेंबर १९९२. भाजप, शिवसेना, बजरंग दल इत्यांदी संघ परिवारातील पक्ष आणि संघटनांच्या कार्यकर्त्यांनी बाबरी मशीद पाडली. ३० जानेवारी १९४८ साली कोकणस्थ ब्राम्हण असलेल्या नथुराम गोडसे या राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाच्या कार्यकर्त्याने मुस्लीम पोशाख धारण करुन महात्मा गांधींचा खून केला होता. हिंदू व मुस्लीमांनी एकमेकांच्या कत्तली कराव्यात या दुष्ट हेतूनेच महात्मा गांधीचा खून केला होता. त्याच दुष्ट हेतूने या ब्रांह्मणी, जातीयवादी धर्मांध शक्तीने बाबरी मशीद पाडण्याचे दुष्ट कृत्य केले. ऑगस्ट १९९२ मध्ये लोकसभेच्या सभापती पदासाठीचे काँग्रेसचे उमेदवार शिवराज पाटील यांनी कमी पडणारी मते भाजपकडून घेतली व भाजपचा खासदार लोकसभेचा उपाध्यक्ष बनवण्यासाठी काँग्रेसच्या खासदारांनी मते दिली. या घटनेचा फायदा घेऊन भाजपने काँग्रेसचे अवसान घेतले व बाबरी मशीद पाडण्याचे धाडस केले होते.

ही घटना नागनाथ अण्णांच्या मनाला जिव्हारी लागली. हिंदू आणि मुस्लीम, बहुजन, कष्टकरी जनतेचे शोषण वाढवणे, त्यांच्यात फूट पाडून त्यांची गुलामी वाढविणे, भांडवलशाही व ब्राम्हणवादी व्यवस्थेचे प्रभुत्व वाढविणे या दिशेने अधिक क्रूरपणे हल्ला झाल्याचे त्यांना स्पष्ट जाणवू लागले. म्हणून ९ डिसेंबर १९९२ रोजी नागनाथ अण्णांच्या सूचनेनुसार वाळव्याच्या शेतकऱ्यांनी विद्यार्थी, कामगार वाळवे गावातून निषेधाची मोठी फेरी काढली.



२५ फेब्रुवारी १९९३ रोजी हुतात्मा किसन अहिर आणि हुतात्मा नानकसिंग यांच्या स्मृतिदिनादिवशी झंझावाती वादळाची चाहूल देणारा कार्यक्रम नागनाथ अण्णांनी आखला होता. वाळवा ते हुतात्मानगर (सोनवडे, ता. शिराळा) या ८० कि.मी. अंतरात राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक म्हणून एक प्रचंड मानवी साखळी संघटित केली. समाज जीवनात राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यासाठी व पेशवाई आणू पाहणाऱ्या जातीयवादी शक्तींचा बीमोड करण्यासाठी ही प्रचंड मानवी साखळी नागनाथ अण्णांच्या आवाहनानुसार तयार करण्यात आली. या मानवी साखळीत वाळवा, तासगाव व शिराळा तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी महिला, ऊस तोडणी कामगार, विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सकाळी ९ वाजता हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर पहिला आऊटबार उडविण्यात आला व मानवी साखळी गुंफायला प्रारंभ झाला. त्यानंतर प्रत्येक किलोमीटर अंतरावर आऊटबार उडविण्यात आले. अशा तऱ्हेने ८० कि.मी. लांबीच्या अंतरावर हजारो नागरिकांनी हुतात्मा किसन अहिर झिंदाबाद, राष्ट्रीय एकात्मता बळकट करा, जातीयवादी शक्तींचा बीमोड करा अशा घोषणा दिल्या व या अर्थाचे आवाहन करणारे पोस्टर्स व बॅनर्स सुध्दा ठिकठिकाणी लावले होते.

या नंतर थोड्याच दिवसात नागनाथ अण्णांनी त्यांच्या जवळच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक वाळवे येथे बोलावली. त्यामध्ये कॉ. नाना शेटे, डॉ. भारत पाटणकर, कॉ. धैर्यशील पाटील, प्रा. डॉ. बाबूराव गुरव उपस्थित होते. एका बाजूला भांडवलशाहीधार्जिणे राज्य करुन भारतीय कष्टकरी जनतेच्या जीवनात नवनवीन दुःखे निर्माण करीत गेलेल्या काँग्रेसचा पराभव आणि दुसऱ्या बाजूला भाजप, शिवसेना इत्यादी ब्राम्हणी, जातीयवादी, धर्मांध शक्तीचा बीमोड करण्याची मोहीम संघटित करण्याचे ठरले. कॉ. जयंत निकम, भाई भारत पाटील, कॉ. बाळासाहेब नायकवडी, कॉ. धनाजी गुरव, एस. आर. पाटील, जमादार सर, कॉ. राम पाटील, नामदेव नांगरे आणि महाविद्यालयाचे प्राध्यापक यांनी रान उठविले. ज्या काळात जातीयवादी धर्मांधांच्या विरुध्द रोखठोक भूमिका घेऊन कोणी जोराने बोलायला तयार नव्हते त्या काळात झंझावती दौरे सुरु झाले. रोखठोक, स्पष्ट घणाघाती भूमिका घेऊन लोकांना आवाहन करणाऱ्या ३०० च्या वर सभा सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये झाल्या.

यानंतर ६ डिसेंबर १९९३ रोजी ब्राह्मणी, जातीयवादी, धर्मांध शक्तीचा ''बीमोड दिन'' कोल्हापूरच्या गांधी मैदानावर साजरा झाला. ५० हजाराच्या संख्येने तीन जिल्ह्यातील राबणारी जनता गर्जत एकत्र जमली. भाजप, शिवसेना इत्यांदी शक्तीना धडकी भरावी असाच हा प्रसंग होता. पूर्वी उघडपणे एकत्र येण्यास व बोलण्यास धजत नव्हते. पण आता लोकांना त्यांचेवर झालेला अन्याय समजल्यामुळे ते एकत्र येऊन उघडपणे अन्यायाविरुध्द बोलू लागले होते. त्याचे श्रेय नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाला व प्रबोधनात्मक उठावालाच जाते.

कोल्हापुरच्या बीमोड दिनी नागनाथ अण्णांनी कार्यकर्त्यांना शपथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील दलित व कष्टकऱ्यांचे संघटन केले परंतु आता काही मंडळी राजकीय स्वार्थासाठी जातीयता वापरत आहेत, असे ते म्हणाले.

असाच बीमोड दिनाचा कार्यक्रम ६ डिसेंबर १९९४ रोजी सोलापूर येथे झाला. सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यामधली जनता एकत्र आली होती.

समाजाचे चार भागामध्ये विभागणी करणाऱ्या आणि ब्राह्मण समाजास श्रेष्ठत्व देणाऱ्या ''मनुस्मृती'' ग्रंथाचा नायनाट करण्याच्या उद्देशाने ६ मे १९९५ रोजी सांगली, सातारा, कोल्हापूर व सोलापूर अशा चार जिल्ह्यामधील १००० ठिकाणी ब्राह्मणी जातीयवादाच्या ''मनुस्मृती'' या आद्य दुष्ट ग्रंथाची सामुदायिकरीत्या होळी करण्याचा कार्यक्रम जनतेने नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली यशस्वी रीतीने पार पाडला.

त्यानंतर वर नमूद केलेल्या चार जिल्ह्यामधली जनता ६ डिसेंबर १९९५ रोजी कराड येथे झालेल्या बीमोड दिनासाठी एकत्र जमली. त्या विराट सभेमध्ये नागनाथ अण्णांनी जातीयवादी, धर्मांध शक्तीचा बीमोड करण्यासाठी आवाहन केले. त्या प्रसंगी बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले की, १५ ऑगस्ट १९४७ ला राजकारणी पक्षांनी जी तडजोड केली त्याला आपण स्वातंत्र्य म्हणतो. आज ४८ वर्षे झाली. हे स्वातंत्र्य आपणापर्यंत म्हणजे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले नाही. जो कष्ट करुन जगतोय, घाम गाळून जगतोय, रक्त आटवून जगतोय त्यांच्यापर्यंत पोहोचलेच नाही. या ४८ वर्षांपैकी ४५ वर्षे काँग्रेसने कारभार केला. त्यांची सत्ता असताना किर्लोस्कर, टाटा-बिर्ला सारख्या उद्योगपतीने खूप मोठ्या प्रमाणात आपले नफे वाढविले, उद्योगधंदे वाढविले. याचा अर्थ काँग्रेसच्या सत्ताधाऱ्यांनी भांडवलदारांना पूरक असे कायदे तयार केले. म्हणून ते आपले नफा वाढवू शकले आणि सामान्य माणसे ही कष्टच करीत राहिली. कर्जांचे बोजे त्यांच्या डोक्यावर वाढले. ज्या अपेक्षेने भारतीय जनतेने स्वातंत्र्यासाठी संग्राम केला. की इथे नंदनवन होईल अशा अपेक्षा होत्या. पण त्या साऱ्या फोल ठरल्या, फार मोठ्या प्रमाणात महागाई, बेकारी, भ्रष्टाचार वाढला. हर्षद मेहताच्या स्टॅम्प घोट्याळ्या सारखे अनेक व्यवहार झाले. यास जनता कंटाळलेली आहे. पूर्वी ज्या ज्या वेळी ब्रिटीश सत्तेच्या विरोधात चळवळी शिगेला जात होत्या त्यावेळी ब्रिटीश राज्यकर्ते हिंदू-मुस्लीम यांचे दंगे पेटवत असत आणि स्वातंत्र्याची चळवळ कशी थंड होईल हे पाहत होते. अगदी आतापर्यंत हर्षद मेहतांची घराघरात चर्चा होत होती. लोकसभेत शिवराज पाटलांना अध्यक्ष करायचे होते. त्यासाठी आवश्यक खासदारांची संख्या काँग्रेसकडे नव्हती. दुसऱ्या बाजूला व्ही. पी. सिंग यांच्या डाव्या आघाडीचे १३२ खासदार असताना काँग्रेसने त्यांच्याशी बोलणी केली नाही आणि भाजपबरोबर बोलणी केली व शिवराज पाटील लोकसभेचे अध्यक्ष झाले. त्या बदल्यात भाजपच्या खासदाराला उपाध्यक्ष केले. हे काँग्रेसवाले जसे बड्या भांडवलदाराच्या हिताचे धोरण घेतात तसे भाजपचेही धोरण असलेमुळे भाजपवाल्याने काँग्रेसवाल्यांची अडचण ध्यानात घेतली की या हर्षद मेहताचे प्रकरण फार मोठे आहे आणि यातून एखाद्या वेळी स्फोट होईल म्हणून ते थंड करण्यासाठी ६ डिसेंबरचा मुहूर्त हेरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महानिर्वाण दिन, क्रांतिसिंह नाना पाटलांचा स्मृतिदिन याच दिवशी बाबरी मशीद पाडण्याचा कट केला तो हेतूपूर्वक केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाही विसरावं व क्रांतिसिंह नाना पाटलांनाही विसरावं आणि बाबरी मशीद हेच प्रकरण लोकांच्या चर्चेत पुढे यावे हा कट त्यांनी विचारपूर्वक केला आणि सर्वांना चीड येण्यासारखी गोष्ट आहे की या देशाचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव व गृहमंत्री शंकरराव चव्हाण मशीद पाडत असताना तटस्थ राहिले. कारण त्यांनासुध्दा मशीद पाडणे ही गोष्ट पाहिजे होती, कारण मशीद पाडली रे पाडली की देशभर हिंदू मुस्लीमांचे दंगे पेटतील व हर्षद मेहता प्रकरण आपोआप थंड होईल असा जो त्यांचा डाव होता तो यशस्वी झाला. तुम्ही



आपआपल्या मनाला विचारा ६ डिसेंबर नंतर हर्षद मेहता प्रकरण आपण सारेजण विसरलो आणि दुसरीच चर्चा चालू झाली. आर. एस. एस, हिंदू महासभा या जातीयवादी ब्राह्मणी शक्ती स्वांतत्र्याच्या चळवळीत कुठेच नव्हत्या. उलट स्वातंत्र्य लढ्याच्या काळात आर. एस. एस. वाले लष्कर भरतीचे काम करत ब्रिटिशांना मदत करीत होते. १५ ऑगस्ट १९४७ नंतर सहा महिन्याच्या आत त्यांनी महात्मा गांधीजींचा खून केला. तो खून नथुराम गोडसे नावाच्या एका कोकणस्थ ब्राह्मणाने, आर. एस. एस. च्या कार्यकर्त्यांने मुस्लीम वेष धारण करुन केला. तुम्हाला मला मुद्दाम सांगायचे आहे की, ३० जानेवारी १९४८ हा महात्मा गांधीजींचा स्मृतिदिन येतो याच दिवशी या राज्यकर्त्यांनी तुमच्या तोंडाला कुलूप लावून ३० जानेवारीला सकाळी ११ वाजता जिथे कुठे असाल तिथे उभे राहायचे व हा झाला महात्माजींचा स्मृतिदिन याउलट स्मृतिदिन वेगळ्या पध्दतीने साजरा करुन दिला असता तर लोक सांगत राहतील की हा नथुराम गोडसे कोकणस्थ ब्राह्मण आर.एस.एस. चा पुढारी कार्यकर्ता; त्याने महात्मा गांधीजींचा खून केला होता. मुस्लीम वेश धारण करण्यामागे हा हेतू होता की, मुसलमानांनी गांधीजींचा खून केला आहे. त्यामुळे हिंदू मुस्लीमांची दंगल सुरु व्हावी अशी ब्राह्मणनीती या कपट कृत्याच्या पाठीमागे होती. म्हणजे ३० जानेवारी १९४८ रोजी ५ वाजता महात्माजींचा खून दिल्लीत झाला व दीड तासाचे आत बी.बी.सी. ने नथुराम गोडसे याचे नाव जाहीर केले, अशा तऱ्हेने जगामध्ये विपर्यस्त बातम्या पसरण्याची व्यवस्था या जातीयवाद्यांनी केली होती.

या नंतर ६ डिसेंबर १९९७ रोजी वाळवा येथे नंतर ६ डिसेंबर १९९८ रोजी कोल्हापूर येथे, व ६ डिसेंबर १९९९ रोजी बीमोड दिन साजरे करण्यात आले. नागनाथ अण्णा बीमोड दिनादिवशी आपल्या भाषणात सांगतात की, जातीयवाद्यांनी ६ डिसेंबर हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महानिर्वाण दिन बाबरी मशीद पाडण्यास मुद्दाम निवडला होता. तसेच मुस्लीम वेष धारण करुन नथुराम गोडसेने महात्मा गांधींचा खून केला हे सर्वसामान्य जनतेला धर्मांध शक्तींचा डाव कळावा म्हणून नागनाथ अण्णांनी ६ डिसेंबर या दिवसी बीमोड दिन साजरे केले होते. हा संघर्ष अनेक काळ असाच धर्मांध शक्तींचा बीमोड होईपर्यंत चालू राहणार आहे. जनता जनार्दनच्या गोड पाण्याच्या सरोवरामध्ये जातीयवादी धर्मांध शक्तीने जातीयतेचे विष पेरुन पाणी गढूळ केले आहे. ते पाणी पुन्हा शुध्द करण्यासाठी नागनाथ अण्णांचे प्रयत्न आहेत. निर्मळ, गोड पाण्याची पूर्व स्थिती येण्यास जनताजनार्दनमध्ये प्रेमाचे वातावरण निर्माण होण्यास बऱ्याच वर्षाचा काळ लागणार आहे. नागनाथ अण्णां सारख्या अनेकांचे प्रयत्न सत्कारणी लागणारे आहेत.

* * * *

# २६

## आटपाडी पाणी परिषद

बच्छावत आयोगाच्या शिफारसीनुसार महाराष्ट्राच्या वाट्याला कृष्णा नदीतून ५९४ टी.एम.सी. पाणी मिळणार होते आणि ते पाणी ३१ मे २००० पर्यंत अडवणे आवश्यक होते या अडवलेल्या पाण्यापैकी जास्तीत-जास्त पाणी स्वातंत्र्यानंतर ५० वर्षे उपेक्षित राहिलेल्या आटपाडी, खानापूर, जत, कवठेमहांकाळ तालुक्यांना मिळावे, अशी तेथील जनतेची अपेक्षा होती. काँग्रेस राजवटीत या भागाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे शेतीसाठी तर सोडाच, पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर झाला होता. या पार्श्वभूमीवर आटपाडी येथील कार्यकर्त्यांनी १९९३ च्या मे मध्ये एक बैठक बोलावली होती. या बैठकीस खानापूर तालुक्यातील दुष्काळग्रस्तांचे काम करणाऱ्या मुक्ती संघर्ष चळवळीचा भाग म्हणून डॉ. भारत पाटणकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. या चर्चेपैकी दुसऱ्या मेळाव्यासाठी क्रांतिवीर नागनाथ अण्णा यावेत अशी अपेक्षा भारतीय रिपब्लिकन पक्षाचे विलास खरात यांनी पाटणकर यांच्याकडे व्यक्त केली. डॉ. पाटणकर यांनी क्रांतिवीर अण्णांनी यावेच अशी त्यांना आग्रही विनंती केली. अण्णांनी या मेळाव्यासाठी येण्याचे मान्य केले. त्यानुसार बैठकीस नागनाथ अण्णा गेले असता त्यांचे निदर्शनास आले की, भाजपचे कार्यकर्ते बंडोपंत देशमुख त्या बैठकीस येऊन बसले होते. त्यांना निघून जाण्यास सांगितले असता ते गेले नाहीत. ते जात नाही असे पाहता अण्णा स्वत: बैठकीमधून उठले तेव्हा त्यांच्याबरोबरचे कार्यकर्ते उठले व शंकरराव खरातांच्या घरासमोरील एक जागेत नागनाथ अण्णांनी आटपाडीच्या कार्यकर्त्यांची पहिली मिटींग १४.४.९३ रोजी घेतली. तेथील कार्यकर्त्यांना अण्णांनी वचन दिले की, पंधरा दिवसांनी आम्ही येथे येत आहोत व आपण पाणी चळवळ सुरु करु या. परंतु प्रत्यक्षात पहिली आटपाडी पाणी परिषद ११ जुलै १९९३ रोजी झाली. सुमारे ४० हजार शेतकरी उपस्थित होते. या परिषदेची प्राथमिक तयारी करण्यासाठी जून मध्ये आटपाडी रेस्ट हाऊसमध्ये बैठक झाली होती. डॉ. भारत पाटणकरांनी आटपाडी तालुक्याचा नकाशा टेबलावर



अंथरला नकाशा वाचून झाल्यावर कोण कुठे जायचे याची मोर्चेबांधणी झाली. तालुक्याचा कोपरान कोपरा पिंजून काढण्याचा आदेश दिल्याप्रमाणे कार्यकर्त्यांच्या सकाळी दोन व सायंकाळी दोन अशा ४ सभा घेण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांवर सोपवली. सुरुवातीला या उपक्रमाबद्दल जनतेमध्ये नाराजीचा सूर होता. पण सभा होत राहिल्या, जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला. याचे श्रेय जयंत निकम, धनाजी गुरव, अण्णासाहेब लेंगरे, झिंबल, मारुती माने, सिताराम बापू पुजारी, शेख साहेब, डॉ. बाबूराव गुरव, डॉ. पाटणकर, सौ. कुसुमताई नायकवडी, श्री. एस. आर. पाटील, श्री. जमादार सर, श्री. बाळासाहेब नायकवडी व हुतात्मा किसन अहिर कारखान्यातील कामगार यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना द्यावे लागेल, त्यामुळे जागृत झालेले ३० हजार शेतकऱ्यांनी ११ जुलै १९९३ च्या परिषदेस उपस्थित राहून तत्कालीन सरकारला धडकी भरविली. दुष्काळी भागातील जनतेमध्ये आत्मविश्वास व जोश आला होता. जनतेमध्ये जागृती निर्माण झाली. ३१ मे २००० च्या आत कृष्णेचे पाणी आडवून त्याचे समान व न्याय्य वाटप झाले पाहिजे, अशी घोषणा त्यावेळी करण्यात आली. त्यानंतर दरवर्षी छत्रपती शाहू महाराजांचा २६ जुलै हा जन्म दिवस आटपाडी पाणी परिषदेचा दिवस ठरविण्यात आला.

नागनाथ अण्णांचे विचारपुर्वक दमदार पाऊल आटपाडी तालुक्यात पडल्याबरोबर पाण्याच्या चळवळीने गती घेतली. अण्णांच्याकडे स्वातंत्र्य चळवळीच्या अनुभवाचा वारसा, ठाम निर्धार आणि स्वच्छ विचार होते. प्रश्नांचा विचार करुन मते मांडणारे व चळवळीस वाहून घेणारे कार्यकर्ते त्यांच्याजवळ होते. त्यामुळे तालुक्यात अभूतपूर्व उत्साह निर्माण झाला होता. मग चळवळीतील कार्यकर्त्यांनी विचारसभा, घोषणा, भिंती रंगवणे, पदयात्रा, पोवाडे व गीते यांनी सर्व तालुका ढवळून टाकला. गावचावडीवर व तहसिल कार्यालयावर मोर्चे काढण्यात आले. तालुक्यातील १०० टक्के संस्थांचे पाणी मागण्याचे ठराव पास करण्यात आले. ६६ हजार स्त्री व पुरुषांच्या सह्यांच्या प्रचंड निवेदनाच्या माध्यमातून अभूतपूर्व एकजूट दिसून आली. परिणामी या चळवळीचे लोण हळूहळू अन्य दुष्काळग्रस्त तालुक्यात पसरले व सरकारवर दबाव वाढू लागला.

याच काळात १९९५ साली विधानसभा निवडणुका झाल्या, काँग्रेस पक्षात बंडखोरी झाली व अपक्ष आमदार मोठ्या संख्येने निवडून आले. त्या अपक्ष आमदारांनी कृष्णा खोरे पाणी प्रश्न सोडविण्याच्या अटीवर सरकारला पाठिंबा दिला. संपूर्ण दुष्काळी टापूतील काँग्रेसचे उमेदवार पराभूत झाले होते. पाणी परिषदेचे हे यश होते. युतीचे सरकार सत्तेवर आल्यावर त्यांना चळवळीची दखल घ्यावी लागली. आणि आटपाडी येथील भवानी हायस्कूलच्या मैदानावरच स्वतंत्र परिषद घेऊन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या स्थापनेची घोषणा करावी लागली. त्यासाठी पैसा उभा करण्याकरिता रोखे विक्री करण्याची सुरुवात त्याच दिवशी झाली. प्रामाणिकपणे प्रयत्न सुरु झाले. धुमधडाक्याने कामे सुरु झाली. परंतु भावनेच्या व अति उत्साहाच्या भरात काही चुकाही झाल्या. त्यामुळे विरोधकांनी सरकारवर टिकेचा भडीमार केला. परिणामी सरकारला चौकशा करुन खातेपालट करावी इत्यादी गोष्टीत लक्ष घालावे लागले. याचवेळी निधीची चणचण निर्माण झाली आणि त्यामुळे कंत्राटदारांना उपोषण करावे लागले. या अडचणी दिवसेंदिवस वाढत गेल्या. वादळे उठत राहिली आणि विधान सभेत युती सरकार पराभूत झाले. यामुळे पाणी चळवळीचे काम थंडावले होते.

या सर्व काळात दुष्काळी भागातील पाण्याचा प्रश्न मांडण्यात, त्यासाठी लढा उभा

करण्यात चळवळ व विचार दूरपर्यंत पोहचविण्यात आटपाडी तालुक्याचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. आटपाडीबरोबरच सातारा जिल्ह्यातील–खंडाळा, फलटण, माण, खटाव, सांगली. जिल्ह्यातील–तासगांव, मिरज पूर्व, कवठेमहांकाळ, जत आणि खानापूर सोलापूर जिल्ह्यातील–माढा, मंगळवेढा व सांगोला अशा तेरा तालुक्यातील शेतकरी जनता या चळवळीत सामील झाली. तासगावचे लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडणारे आमदार आर. आर. पाटील, नागनाथ अण्णांच्या बरोबर या चळवळीसाठी सावळजच्या पाणी परिषदेत सहभागी झाले. सांगोल्याचे आ. गणपतराव देशमुख अण्णांच्या बरोबर येण्यास प्रथम साशंक होते पण खात्री पटल्यानंतर तेही सहभागी झाले.

१९९४ ते १९९८ या काळात नागनाथ अण्णांनी पाच पाणी परिषदा आयोजित केल्या होत्या. त्यापैकी तीन परिषदा १३ दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या होत्या, त्याला प्रचंड यश लाभले. या परिषदेमधून जनतेची एकजूट दिसून आली. विचार मंथन झाले. चळवळीला दिशा मिळाली. संघर्ष तीव्र झाला आणि शासनाला सतत जागे ठेवण्याचे काम या चळवळीने पार पाडले. मात्र या तालुक्यातील साराबंदी आंदोलनाची काटेकोर अंमलबजावणी झाली नाही व सारा बंदी आंदोलन यशस्वी झाले नाही.

त्या दरम्यान कृष्णा खोऱ्यातील कामाचा वेग मंदावताच साप्ताहिक भूमातेचे संपादक बुधाजीराव मुळीक यांनी आटपाडीत निर्धार मेळावा घेतला. परंतु तो मोघम घोषणेने समाप्त झाला. तसेच कृष्णा खोऱ्याचे पाणी ३१ मे २००० च्या अगोदर अडवण्याची अट असलेमुळे पाणी परिषदेचे कार्यकर्त्यांना घेऊन नागनाथ अण्णा यांनी सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे पाणी परिषद घेतली होती.

दुष्काळी तालुक्यातील गरीब, होतकरु विद्यार्थी व विद्यार्थिनींना दत्तक घेऊन त्यांचे शिक्षण हुतात्मा किसन अहिर सह. सा. कारखान्याचे वतीने क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय मध्ये मोफत करण्याची जबाबदारी मानवतेच्या दृष्टीने स्वीकारत असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा नागनाथ अण्णा यांनी २० जुलै १९९८ रोजी घरनिकी ता. आटपाडी येथे केली. या पार्श्वभूमीवर दिनांक २७ जुलै १९९८ रोजी सुमारे ६० हजार स्त्री–पुरुष यांच्या उपस्थितित आटपाडीच्या श्री भवानी विद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यातील जनतेची पाचवी कृष्णा खोरे पाणी परिषद संपन्न झाली. या परिषदेत भाषण करताना पाणी परिषदेचे निमंत्रक नागनाथ अण्णा म्हणाले, कृष्णेचे पाणी अडवणेची मुदत थोडीशी राहिली असल्यामुळे या दुष्काळी तालुक्याचे संघटन अधिक तीव्रपणे टिकवावे लागणार आहे. त्याकरिता प्रत्येक कार्यकर्त्यांनी प्रत्येक कुटुंबापर्यंत या परिषदेचा निर्धार पोहचविला पाहिजे.या परिषदेच्या कामकाजाची माहिती प्रत्येक गावात जाऊन या परिषदेस न आलेल्यानांही समजावून दिली पाहिजे. गेली सात वर्षे धीरोदात्तपणे हुतात्मा किसन अहिर सह. सा. कारखाना या लढ्याच्या पाठीमागे उभा राहिला तसेच यापुढेही या कारखान्याच्या शेतकऱ्यांची साथ अण्णांस शंभर टक्के मिळणार आहे. सरकारला त्या पुढच्या तीन महिन्यात आजच्या परिषदेत केलेल्या ठरावाप्रमाणे अंमलबजावणी केल्याची जाग आली नाही तर ऑक्टोबर महिन्यात तहसिल कार्यालयासमोर धरणे व तहसिल कार्यालयाला घेराव घालण्याची कृती आपणास प्रचंड निर्धाराने करावयाची आहे. माढा तालुक्यामध्ये या आंदोलनाचे नेतृत्व मी स्वत: करणार असून तासगाव, आटपाडी, खानापूर, जत, कवठेमहांकाळ अशा दुष्काळी तालुक्यातही याच दिवशी



आंदोलन यशस्वी केले जाईल. आ. आर. आर. पाटील, माजी मंत्री गणपतराव देशमुख, माजी आ. एस. एम. पाटील, माजी आ. अनिलराव बाबर, माजी आ. भगवान बाप्पा पाटील, डॉ. भारत पाटणकर, वगैरे मान्यवर त्या तालुक्यात या लढ्याचे नेतृत्व करणार आहेत. ''बाप दाखव नाही तर श्राध्द घाल'' या न्यायाप्रमाणे सरकारला या बाबतीत निर्णय करावाच लागेल, अशी जय्यत तयारी कार्यकर्त्यांनी येत्या तीन महिन्यात करावी.

या परिषदेमध्ये तीन पाळ्यांमध्ये ताबडतोब काम सुरु करुन ३१ मे २००० च्या आत कृष्णा खोऱ्याची कामे पूर्ण करावीत. त्यासाठी महाराष्ट्रातील कारखानदारांना विकास कर लागू करुन आवश्यक निधी उभा करावा. पाण्याची विषम वाटप पध्दती बदलून भूमिहिनांसह सर्व कुटुंबांना पाण्याचे समान वाटप करण्याची नवीन आखणी केली पाहिजे.पाणी असूनही ७५% कुटुंबांना कायमचे दुष्काळात ढकलणारी आखणी बदलली पाहिजे, असे महत्त्वाचे ठराव कॉ. डॉ. भारत पाटणकर यांनी मांडले. त्यास गणपतराव देशमुखांनी अनुमोदन दिले. आ. आर. आर. पाटील यांनी निष्क्रीय युती शासनाच्या निषेधाच्या मांडलेल्या ठरावास सर्वांनी पाठिंबा दिला.

या प्रसंगी साथी निळू फुले, ॲड. उस्मानबी शेख, प्रा. शिवाजीराव काळुंगे, बळवंतराव मोरे, चंद्रकांत लोंढे, सौ. कुसुमताई नायकवडी, वैभव नायकवडी वगैरेनी मार्गदर्शन केले वरील पाणी परिषदेत ठरल्याप्रमाणे २९ ऑक्टोबर १९९८ रोजी सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, जत, आटपाडी, मिरज या तालुक्यातील हजारो दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी कष्टकरणाऱ्यांनी तालुक्याच्या तहसिलदारांना कृष्णेचे पाणी २००० सालापर्यंत अडवावे या मागणीसाठी घेराव घालून शासकीय कामकाज बंद पाडले. आ. आर. आर .पाटील, आनंदराव मोहिते यांच्यासह सुमारे २००० आंदोलकांनी स्वत:ला अटक करुन घेतली. आ. आर. आर. पाटील यांनी तासगाव येथील मोर्चा समोर शासनाला बजावले की, पाणी प्रश्नी युती सरकारने उदासीनता ठेवली तर सचिवालय बंद पाडू.

सोलापूर जिल्ह्यामध्ये माढा तहसिल कचेरीसमोर नागनाथ अण्णांनी धरणे आंदोलन सुरु केले. सांगोला तहसिल कार्यालयासमोर गणपतराव देशमुख यांनी धरणे अंदोलन सुरु केले. मंगळवेढा तहसिल कार्यालयासमोर आ. लक्ष्मणराव ढोबळे यांनी भारुड सादर करुन मार्मिक शब्दात युती सरकारवर टीका केली. सातारा जिल्ह्यात वडूज तहसिल कार्यालयासमोर ॲड. सुभाषराव देशमुख यांनी घेरावा आंदोलन केले. त्याचप्रमाणे फलटण येथे माजी आ. हरिभाऊ निंबाळकर व खंडाळ्याचे ॲड. बाळासाहेब बागवान यांनी धरणे आंदोलन केले.

दिनांक २८ ऑगस्ट २००२ रोजी सांगली जिल्ह्यातील पाण्यापासून वंचित राहणाऱ्या सहा तालुक्यातील नागरिकांचा भर पावसात नागनाथ अण्णांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. अण्णांच्या बरोबर डॉ. बाबूराव गुरव, कॉ. नाना शेटे, डॉ. भारत पाटणकर होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील मोर्चाचे सभेत नागनाथ अण्णांनी निर्वाणीचा इशारा दिला की वीज दरवाढ, ऊस कारखान्यांवर लादलेला आयकर यामुळे भांडवलशाहीस पोषक असलेले धोरण राज्यातील लोकशाही आघाडीचे सरकार राबवत असून युती सरकारच्या मार्गाने चाललेल्या या सरकारचे धोरण न बदलल्यास शेतकऱ्यांनी आता खाली खेचावे. यापूर्वी २६ जून रोजी असाच विराट मोर्चा काढून पाण्यापासून वंचित राहणाऱ्यांच्या वतीने शासनाला निवेदन दिले होते. त्याची सरकारने कसलीही दखल न घेतल्यामुळे हा अंतिम इशारा म्हणून आज पुन्हा मोर्चा काढला आहे. यापुढे समान पाणी वाटपासाठी मोर्चा न काढता धडक कृती कार्यक्रम हाती

घेण्याचा निर्णय नागनाथ अण्णांनी जाहीर केला. मोर्चा काढून काही उपयोग होत नाही. अधिकारी वर्ग निर्ढावला आहे. शासन बेफिकीर बनले आहे. समान पाणी वाटपाच्या मागणीसाठी धरणग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी धडक कृतिदल स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सांगली जिल्ह्यातील भर पावसातील झालेला हा मोर्चा ऐतिहासिक म्हणावा लागेल. कारण स्वत: नागनाथ अण्णा भर पावसात छत्री न वापरता भिजत मोर्चाचे नेतृत्व करीत होते.

कृष्णा खोरेच्या पाण्यासाठी दुष्काळी भागाला समान पाणी वाटप होण्यासाठी पाणी संघर्ष चळवळीच्या वतीने आटपाडी तालुक्यात २२ नोव्हेंबर २००० रोजी करगणी, झरे, दिघंची, आटपाडी, शेटफळे या गावादरम्यान ५०,००० हून अधिक स्त्री-पुरुषांनी, शाळकरी मुलांनी प्रचंड अशी मानवी साखळी निर्माण केली होती. नागनाथ अण्णांनी या उपक्रमाद्वारे तालुका बंद व मानवी साखळी यशस्वी केली होती.

६ एप्रिल २००१ रोजी नागनाथ अण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली शेतमजूर, शेतकरी-कष्टकरी संघटनेच्या वतीने दुष्काळी आटपाडी तालुक्याला बारमाही शेतीचे पाणी टेंभू योजनेतून मिळालेच पाहिजे या मागण्यांसाठी हजारो स्त्री-पुरुष शेतकरी बांधवांनी आटपाडी तहसिल कार्यालयावर धडक मोर्चा काढला होता. त्या प्रसंगी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना नागनाथ अण्णां म्हणाले, ''या तालुक्यातील शेतकऱ्यांनी साराबंदीचे आंदोलन यशस्वी केले असते तर पाणी प्रश्न सुटला असता. आता तमाम शेतकऱ्यांच्या विचारातून सुरु झालेले हे आंदोलन थांबवले जाणार नाही,'' असा भक्कम आधार दिला. या वेळी प्रा. बाबूराव गुरव यांनी देखील शासनाला हिसका दाखवूनच आपण विजय मिळवूयाच असे सांगितले, डॉ. भारत पाटणकर म्हणाले, ''संपूर्ण राज्याचे पाणी विषयक धोरण बदलण्याची लढाई आटपाडी तालुक्यातून केली जात आहे. हे महत्त्वाचे असून शासनाला नमवले शिवाय धोरण बदलले जाणार नाही व त्या दृष्टीने सुरु झालेले ठिय्या आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.'' पुढे ७ एप्रिल २००१ रोजी टेंभूच्या डाव्या कालव्याचे काम १५ ऑगस्ट २००१ पासून सुरु करण्याची हमी अधिक्षक अभियंता आर. एल. उबाळे यांनी दिल्यानंतर आटपाडी तहसिल कार्यालयासमोर असणारे ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

यानंतर आटपाडी येथे २८ जुलै २००१ रोजी १३ दुष्काळी तालुक्यांची पाणी संघर्ष परिषद आयोजित केली होती. तेथे बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले,''सत्तेवर बसलेला माणूस सहजासहजी खुर्ची सोडेल असे वाटत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात चिंतामणराव देशमुखांनी राजीनामा दिला परंतु यशवंतराव राजीनामा देऊ शकले नाहीत.१०५ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर मुंबई महाराष्ट्राला मिळाली. सध्याचे सरकारमधील दुष्काळी भागातील मंत्री देखील सहजासहजी जनतेच्या पाणी प्रश्नांवर राजीनामा देतील असे वाटत नाही. तथापी त्यांना एक महिन्याची मुदत देऊन वाट पाहू या.'' आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आ. ह. साळुंखे म्हणाले ''तरुण पिढी दुष्काळी भाग यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी ही पाणी चळवळ सुरु असून या चळवळीकडे 'तुम लढो हम कपडे संभालते है' अशा उपरे पणाच्या भावनेतून न पाहता ही चळवळ भक्कम केली पाहिजे, तरच क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या योगदानांचे व चळवळीचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल.''

शासनाकडून योग्य ती कृती न केल्यामुळे नागनाथ अण्णांनी २२ सप्टेंबर २००१ रोजी शासनाला इशारा दिला की, कृष्णा खोरे योजनेचे पाणी दुष्काळी भागात येत नाही व त्याचा लाभ



येथील जनतेला मिळत नाही तोपर्यंत या भागातून शासनाला एक पैसाही शेतसारा मिळणार नाही. या परिषदेस रणरणत्या उन्हातही स्त्री-पुरुष उपस्थित होते. प्रा. डॉ. बाबूराव गुरव म्हणाले की, कर्मवीर जयंती निमित्त आयोजित केलेल्या या पाणी परिषदेच्या निमित्ताने कर्मवीर अण्णांच्या स्वातंत्र्याच्या तत्त्वास अनुसरुन दुष्काळी जनतेने वाटचाल करावी. शासनापुढे लाचार न होता स्वाभिमानाने आपल्या हक्कासाठी झगडावे. नागरिकांची आंदोलने पोलिसांकरवी चिरडू पाहणाऱ्या सरकारला जाग येणार नाही हे लक्षात ठेवावे.

गेली दहा वर्षे मोठ्या जिद्दीने कार्यरत असलेल्या पाणी संघर्ष तत्त्वांच्या व विचारांच्या संघर्षातून प्रत्यक्ष पाणी मिळण्याचा कृतिशील टप्पा जवळ आला आहे असे प्रा. बाबूराव गुरव यांनी दिनांक ३.१२.२००१ आटपाडी येथे कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितले. त्यावेळी डॉ. भारत पाटणकर यांनी आढावा घेताना सांगितले की, तालुक्यातील समान पाणी वाटप पथ दर्शक प्रकल्प कृष्णा खोरे मंडळाने मान्य केला आहे. तर नागनाथ अण्णा यांनी ग्वाही दिली की पाणी संघर्ष चळवळ कष्टातून कार्यरत आहे. चळवळीच्या वाटेत कोणतेही अडथळे आले तर ते दूर केले जातील. ॲड. उस्मान नबी शेख म्हणाले, दुष्काळी भागाचा पाण्याचा प्रश्न चळवळीमुळे सुटला आहे. त्यामुळे पाणी मिळण्याचे यश आता अंतिम टप्प्यात आले असताना आता आम्ही अजिबात पळ काढणार नाही.

नागनाथ अण्णांचे लक्ष दुष्काळी तेरा तालुक्यांबरोबरच शिराळा पेट्यातील शेतकऱ्यांना समान पाणी वाटप व्हावे या करिता पणुंब्रेवारुण येथे वारणा मुख्य कालवा समान पाणी वाटप परिषदेत नागनाथ अण्णा म्हणाले की, सरकार आम्हाला अडवू पाहत आहे. आम्ही स्वस्थ बसणारे नव्हे. पाण्याच्या प्रश्नावर मोठे जनआंदोलन उभे करायचे आहे. या करिता सर्वांनी या प्रवाहात सामील होणे गरजेचे आहे.

कृष्णा खोरे महामंडळाच्या कार्यपद्धतीवर नागनाथ अण्णा आजपर्यंत टीका करीत आले आहेत. बऱ्याच वेळा त्यांनी आंदोलने छेडली आहेत. अशा परिस्थितीत फलटणच्या ग्राम विकास प्रतिष्ठानचे विश्वस्थ दत्तात्रय भोसले व पत्रकार नाशिल शिकलगार यांनी मागणी केली की, नागनाथ अण्णा नायकवडी यांची कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी नेमणूक व्हावी.

कृष्णा खोऱ्यातील पाणी प्रकल्पासाठी राज्य सरकारने निधी उपलब्ध करुन द्यावा अन्यथा तेरा दुष्काळी तालुक्यातील दोन लाख सत्याग्रही २ ऑक्टोबर पासून तीव्र संघर्ष करतील असा अंतिम इशारा आटपाडी येथे पाणी परिषदेमध्ये बोलताना दि. २६ जुलै २००२ रोजी दिला. या परिषदेचे उद्घाटन अभिनेते निळू फुलेनी केले होते व अध्यक्षपदी माजी मंत्री गणपतराव देशमुख हे होते. या प्रसंगी नागनाथ अण्णा म्हणाले, ''गेली ९ वर्षे खूप संयमाने दुष्काळग्रस्तांच्या पाण्यासाठी लढा सुरु आहे. जातीयवादी युती सरकार गेल्यानंतर आघाडी सरकार सत्तेवर आले पण दुष्काळग्रस्तांच्या पाण्याच्या प्रश्नांवर ते गांभीर्याने पाहात नाहीत. गांधीजींच्या पुण्यतिथी पर्यंत योग्य असा निर्णय झाला नाही तर मोठा संघर्ष छेडला जाईल आणि प्रत्यक्षात शेतात जोपर्यंत पाणी येत नाही तोपर्यंत तीव्र संघर्ष सुरुच राहील.'' डॉ. भारत पाटणकर म्हणाले, ''कृष्णा खोऱ्याचे काम सध्या पूर्णत: बंद आहे. आमदारांच्या बैठकातून पैसे मंजूर केल्याच्या थापा मारल्या जात आहेत.'' या वेळी प्रा. बाबूराव गुरव म्हणाले, पहिल्या तीन वर्षामध्ये संघटन वाढविणेसाठी पाणी परिषदा घेतल्या आणि नंतर ते प्रत्यक्ष होऊ शकते हे

संघटनेने दाखवून दिले आहे. महामंडळाने त्याला तांत्रिक मंजुरी दिली आहे. या पाणी परिषदेत शिवाजीराव काळुंगे (मंगळवेढा), प्रा. विश्वंभर बाबर (म्हसवड), ॲड. बाळासाहेब बागवान (खंडाळा), प्रा दादासाहेब ढेरे (कवठेमहंकाळ), उस्मान नबी शेख व प्रा. आर. एस. चोपडे (झरे) जालंदर जमदाडे (तासगाव), मोहनराव गायकवाड (जत), रावसाहेब शिंदे (खानापूर), माजी आ. माणिक जाधव (लातूर), कॉ. नाना शेटे (साजणी), दत्ताजीराव जाधव (खटाव), प्रा. आर. डी. गायकवाड, किसनराव बारबोले (माढा) प्रा. आ. शरद पाटील, वैभव नायकवडी, सौ. कुसुमताई नायकवडी यांनीही मार्गदर्शन केले.

आटपाडी येथे २६ जुलै २००२ मध्ये झालेल्या पाणी परिषदेत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे २ ऑक्टोबर २००२ पर्यंत शासनाने त्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास तेरा दुष्काळी तालुक्यातील जनता जेल भरो आंदोलन सुरु करेल असा इशारा नागनाथ अण्णांनी आटपाडी येथे दिला. ठरल्याप्रमाणे सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील तेरा दुष्काळी तालुक्यातून ३० ऑक्टोबर अखेर दोन लाख सत्याग्रहींची नाव नोंदणी करुन जेल भरो आंदोलनास तयार राहण्याचे आवाहन २ ऑक्टोबर २००२ रोजी नागनाथ अण्णांनी केले. तसेच २३ ऑक्टोबर २००० रोजीच्या आटपाडी येथील कार्यकर्त्यांच्या बैठकीत असे ठरले की तेरा दुष्काळी तालुक्यातील प्रतिनिधींचे शिष्टमंडळ राज्यपालांना भेटून विदर्भ, मराठवाड्याचा अनुशेषाचा आदेश मागे घेण्याची विनंती करणार आहे.

नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली तेरा दुष्काळी तालुक्यातील जनतेच्या आंदोलनामुळे शासनाने समान पाणी वाटपास तत्त्वत: मान्यता दिली आहे. परंतु निधीअभावी कृष्णा खोरे विकास महामंडळाची कामे रखडली होती. त्यास चालना देण्यासाठी व अखेरचा शासनाला धक्का देऊन जागे करण्यासाठी पुणे येथील महाराष्ट्र कृष्णा खोरे कार्यालयाच्या मुख्य कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सोमवार दिनांक १९ जानेवारी २००४ रोजी आयोजित केले होते. आंदोलनाचे नेते नागनाथ अण्णा, गणपतराव देशमुख, बाबा आढाव, डॉ. भारत पाटणकर, आमदार अनिल बाबर यांच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने आलेल्या शेतकऱ्यांनी १९ जानेवारी २००४ पासून सिंचन भवनासमोर आंदोलन केले होते. हे आंदोलन मागे घेण्याची विनंती करण्यासाठी दि. २० जानेवारी २००४ रोजी गृहमंत्री आर. आर. पाटील व पाटबंधारे मंत्री अजित पवार आले होते.त्यांनी तेथे जाहीर केले की, कृष्णा खोरे सिंचन प्रकल्पासाठी केंद्र सरकारने ३१ मार्च २००४ पर्यंत १५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यास मंजुरी दिली आहे. या रक्कमेपैकी ११५० कोटी रु. कृष्णा खोरे साठी खर्च करण्यात येतील. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तसेच भू संपादनासाठी यातून रक्कम देण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत महिन्याभरात कामे सुरु करण्याचा आमचा प्रयत्न आहे. असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिल्यानंतर दोन दिवसांनी हे ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

या ठिय्या आंदोलनाबद्दल बोलताना डॉ. पाटणकर म्हणाले,''पाणी संघर्ष चळवळीने पुण्यात ठिय्या आंदोलन करुन दिल्ली हलविली आणि त्यामुळे कृष्णा खोरे साठी १५०० कोटी रु. कर्जाची हमी केंद्र सरकारने दिली. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन हे पैसे तातडीने उभे करावेत पाणी संघर्ष चळवळीने कृष्णा खोऱ्याच्या पाण्यासाठी गेली ११ वर्षे क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरु केलेले आहे. आजचे शासनाचे आश्वासन हे या आंदोलनाला मिळालेले सगळ्यात मोठे यश आहे.''

* * * *



# २७

## आपले साहित्य संमेलन, कराड

आजपर्यंत अखिल भारतीय संमेलने भरविली जातात पण तेथे उच्चवर्णीय साहित्यिकांचा प्रभाव जाणवल्यामुळे बहुजन समाजातील साहित्यिकांनी कराड येथे आपले साहित्य संमेलन दि. २७ डिसेंबर २००२ रोजी आयोजित केले होते. त्या संमेलनास उपस्थित राहून मार्गदर्शन व सहकार्य करण्याचे आश्वासन नागनाथ अण्णांनी वाळवा येथे भरलेल्या बैठकीत दिले होते. तसेच हे संमेलन घरचे समजून हुतात्मा किसन अहिर सहकारी कारखाना त्यात सहभागी होईल असेही सांगितले. अण्णांचा आशीर्वाद, सक्रिय सहकार्य मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांना आपले साहित्य संमेलन यशस्वी करण्यास उत्साह मिळाला होता व पूर्ण तयारीही झाली. हे 'आपले साहित्य' संमेलन कराडच्या सद्‌गुरु गाडगे महाराज महाविद्यालयात आयोजित करण्याचे ठरले होते.

पहिल्या दिवशी आपले महानायक चित्ररथ मिरवणूकीच्यावेळी शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, शाहू महाराज, संत तुकाराम, नाना पाटील यांच्या नावाने घोषणा देण्यात आल्या. कराड व कराडच्या परिसरातील विविध शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी मोठ्या संख्येने यात भाग घेतला होता. त्यानंतर कै. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीवर पुष्पहार अर्पण केल्यावर झालेल्या जाहीर सभेत नागनाथ अण्णा म्हणाले की, ''आपण आत्तापर्यंत खूप स्वातंत्र्यदिन साजरे केले. पण कष्टकरी शेतकऱ्यांना स्वातंत्र्य कधीच मिळाले नाही. काँग्रेसच्या चुकीच्या कार्यपध्दतीमुळे देशात जातीयवादी शक्ती सत्तेवर आली आहे व काँग्रेस धोरणाचा पूर्ण पराभव झाला आहे. या आपले साहित्य संमेलनाचे निमित्ताने तरुणांनी, शेतकऱ्यांनी, कष्टकऱ्यांनी एकत्र आले पाहिजे व आपणास जनतेची लोकशाही निर्माण करावयाची आहे. हे काम मी जिवंत आहे तोपर्यंत करत रहाणार आहे. 'आपले साहित्य संमेलनास' माझ्या शुभेच्छा. सर्वांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.''

आपले साहित्य संमेलनाचे उद्घाटन सामुदायिकरीत्या झाले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा, ज्येष्ठ विचारवंत डॉ.आ.ह. साळुंखे, खासदार रामदास आठवले, नगराध्यक्षा सौ. शारदा जाधव, माजी आमदार लक्ष्मण माने, रामदास फुटाणे, श्रीमती अंजुताई बुधगावकर, प्रा. राजेंद्र कुंभार, डॉ. यशवंत मनोहर व शाहीर कुंतिनाथ करके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन उद्घाटन झाले.

उद्घाटनपर भाषण करताना डॉ. यशवंत मनोहर म्हणाले, ''महानगरी वाङ्मयीन अभिरुची आजही आपल्या वाङ्मयीन व्यवहारावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करीत आहे. साहित्यनिर्मितीचे सर्जनशील चक्रीवादळ खरे म्हणजे आज ग्रामीण भागात सरकले आहे. ग्रामीण भागातील प्रतिभांना जीवनातील सुखदु:खाचे महासागर माहीत नाहीत. महानगराव्यतिरिक्त प्रतिभा पूर्ण जबाबदार पूर्ण समंजस, पूर्ण डोळस व पूर्ण चिकित्सक झाल्या तरच याच प्रतिभा उद्या डोस्टोव्हस्की आणि टॉलस्टॉय म्हणून ओळखल्या जातील. मात्र तत्कालीन लाभापासून आणि मानापमानापासून या प्रतिभांनी स्वत:ला वाचवायला हवे. 'नाईकबाच्या नावांने चांगभलं, यळोबाच्या नावानं चांगभलं, सिध्दनाथाच्या नावानं चांगभलं, साहित्याचे नावानं चांगभलं' अशा गजरात मान्यवरांचे हस्ते मशाली पेटवण्यात आल्या.यावेळी क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी या साहित्यिकाच्या मशाली अशाच तेवत ठेवावयाच्या आहेत,असे सांगून आपले साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. ते पुढे म्हणाले की, ''आज इतके वाईट आहे की पहिल बरं म्हणणारे आहेत. बहुजनांनी वेगवेगळ्या मार्गांनी जनजागृती करण्याची गरज आहे. आज खरंखुरं स्वातंत्र्य अनुभवाला येत नाही. बहुजनांनी जातीयवादी, भांडवलशाही, राजकारणी यांना सर्व शक्तिनिशी पराभूत करण्याची गरज असून यामध्ये आपण यशस्वी होऊ, मला विश्वास वाटतो. देशाला स्वातंत्र्य मिळून ५५ वर्षे झाली. मात्र सर्वसामान्यांना खरेखुरे स्वातंत्र्य पाहायला मिळाले नाही. त्यामुळे पारतंत्र्य बरे होते म्हणण्याची त्याच्यावर वेळ आली आहे. स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधीचा खून झाला. बाबरी मशीद पाडण्यात आली, गुजरात राज्यात गोध्रा हत्याकांड झाले, तरीही सत्तेवर जातीयवादी लोक येऊन बसले. ही स्थिती बदलण्यासाठी बहुजन वर्गात स्वत:हून मने आणि संघटना उभ्या करणे गरजेचे आहे. बहुजनांनी जातीयवादी भांडवलदारांना सर्व शक्तिनिशी विरोध करावा.''

प्रास्ताविक करताना प्रा. राजेंद्र कुंभार म्हणाले, ''गेली अनेक वर्षे सांस्कृतिक दहशतवादाखाली सर्व सांस्कृतिक व्यवहार सुरु आहे. या फुग्याला टाचणी लावण्याचे काम आपले साहित्य संमेलनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. आम्हाला ७५ वर्षांनी कळाले आहे की, लोकप्रतिनिधीही कसे मेंढरासारखे वागतात. साहित्याचा काडीचाही संबंध नसणारे लोक संयोजन समितीत असतात. दहावी झालेली मुलगीही समितीची सदस्या होते.सगळेच चोर आहेत. त्यामुळे ते एकमेकांना साव समजत आहेत. आपली संस्कृती भीक घालणाऱ्याची आहे. आज भीक कुणाला घालायची हे ठरविले पाहिजे. हा एल्गार आपण हातात घेतल्याने शत्रुलाही आता बदलावे लागणार आहे.''

खा. रामदास आठवले म्हणाले, ''माणसाची गर्दी दाखविण्यापेक्षा विचारांची गर्दी झाली पाहिजे. आमचे शब्द कोणाला रक्तबंबाळ करणार नाहीत. तर त्या शब्दांनी माणसांची मने पेटवली पाहिजेत. आम्ही गौतम बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मानणारी माणसे आहोत. जर दलित, बहुजन आणि भटके एकत्रित आले तर ते पावलापावलांवर त्यांना फटके



देतील. मात्र आजवर आम्ही फटके खात आलो आहोत. तो विचार बदलून आम्ही आमच्या मशाली पेटविल्या, त्या अंधाराला कापण्यासाठी गावागावात पाठविल्या आहेत आणि हेच विचार घेऊन आम्हाला पुढे जायचे आहे. तरच विचारांची देवाण घेवाण होईल.'' याचवेळी खा. रामदास आठवले यांनी एक कविता ऐकवली.-

हे साहित्य संमेलन आहे आपले, म्हणूनच त्यांच्या डोळ्यात खुपले!
आमचे पूर्वज आमच्यासाठी नव्हे तर त्यांच्यासाठी खपले!
पिढ्यानपिढ्यापासून त्यांच्याच औताला जुपले!
आमचे अनेक मित्र त्यांच्या बाजूला लपले!
म्हणूनच घ्यावे लागले साहित्य संमेलन आपले!
आम्ही वाजविणार आहोत आज क्रांतीच्या साहित्याचे डफळे!
कारण त्यांनी केलेत साहित्य प्रांतात बरेच घपले!
आम्ही मात्र फुले-आंबेडकरांच्या विचाराला जपले!
म्हणूनच कराडला होत आहे साहित्य सम्मेलन आपले!

महात्मा फुले साहित्याचे अभ्यासक हरि नरके विरोधकांवर हल्ला करताना म्हणाले, ''अखिल भारतीय म्हणविले जाणारे साहित्य महामंडळ खरे तर ब्राह्मणी आहे. तो शब्द दडविला जातो. त्या ठिकाणी सर्व व्यवहार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अरविंद लेले यांच्या इशाऱ्यानुसार होतो. ग. ना. जोगळेकर संघाचेच हस्तक आहेत. हे संमेलन अखिल भारतीय म्हणविल्या जाणाऱ्या महामंडळाच्या विरोधात आहे. तो विरोध कुणीही लपवू नये. खरे तर अखिल भारतीयच्या पुढे ब्राह्मण हा शब्द लावण्यास मला संकोच वाटत नाही. हे महामंडळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आहे. अरविंद लेले हे भाजपचे खजिनदार पुण्याच्या महाराष्ट्र परिषदेचे सुत्रधार आहेत. तेच पडद्याआडून सर्व सूत्रे हालवतात. ग. ना. जोगळेकर नेहमीच निवडून येतात आणि हस्तक म्हणून काम करतात. आत्तापर्यंत सव्वाशे वर्षात ७५ संमेलने झाली, त्यापैकी ७० संमेलनाध्यक्ष ब्राह्मण आहेत.तर पाच ब्राह्मणेतर समाजातील होते. बहुजन समाजात जागृती वाढल्यामुळे ही संधी दिली गेली. अन्यथा असे झाले नसते. सातत्य हेच त्यांचे सामर्थ्य आहे. १९०६ मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना झाली. १९६६ साली महामंडळ झाले. महामंडळात सगळे मिळून १६ पदाधिकारी असतात मी ६ वर्षे या महामंडळात काम केले आहे. त्यावेळी बहुजनवादी भूमिका घेणाऱ्या प्रवाहांना सामावून घ्यावे असा मी आग्रह धरला.ब्राह्मणी मानसिकतेच्या संस्कृती संवर्धकाचा सातत्य व स्वार्थासाठी त्याग हा गुण आहे.भांडणे बाहेर न्यायची नाहीत याची ते काळजी घेतात. आम्ही बहुजनवादी ५० वर्षे झाले, काम करतो; परंतु आपले 'इगो' अधिकच आहेत. तथाकथित अखिल भारतीय संमेलनाला गर्दी का जमते असा प्रश्न तुमच्या मनामध्ये असेल तर सरकारने तसा जीआर काढून ठेवला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील लोकांना या काळात पगारी सुट्टी मिळते. परवा आर. एस. एस. च्या वाचनालयाला मुख्यमंत्र्यांनी २५ लाख दिले. मुख्यमंत्री सांस्कृतिक दहशतवादाखाली असल्यामुळे असे झाले. कोण कुठला ब्राह्मण ग. ना. जोगळेकर, मुख्यमंत्र्यांना म्हणतो पैसे द्यायचे असतील तर द्या आणि मुख्यमंत्री लगेच पैसे देतात हे दुर्दैव आहे. तथाकथित अखिल भारतीय संमेलनावर टीका करताना पर्यायी व्यवस्था उभी करताना आपण अनेक पथ्ये पाळली पाहिजेत. एकमेकांवर जाहीर टीका

करता कामा नये. कुठं कुठं जमतय त्यावर विचार करायला हवा. 'मी' पणा बाजूला ठेवला पाहिजे सातत्य ठेवले पाहिजे.''

बहुजन समाजाच्या कोणत्याही साहित्यिक उपक्रमात सहभागी होऊन त्याला नागनाथ अण्णांनी नेहमी सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे. व देत असतात. निपाणी जवळच्या श्री क्षेत्र स्तवनिधी येथील दक्षिण भारत जैन सभेत दि. ३.४.९९ रोजी बोलताना नागनाथ नायकवडी म्हणाले, ''सर्वधर्म समभावाचे नवीन पाऊल स्वागतार्ह आहे. वीरसेवा दलाचे काम कौतुकास्पद आहे. त्यांच्या कामाला प्राधान्याने सर्व ताकदीनिशी प्रोत्साहन द्यावे. मुलींनो शिक्षण व व्यसनमुक्त समाजाकरिता संघटीत सामर्थ्यशाली वीरसेवा दलाची शक्ती वाढवूया.''

कारदगा ता. चिकोडी येथे भरलेल्या पाचव्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे उद्घाटन दि. २६.११.२००० रोजी करताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''आजचे स्वातंत्र्य हे कष्टकरी, कामगार व शेतकरी यांचेपर्यंत पोहोचत नाही. लेखक व कवींनी खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी जनतेची मने तयार करावीत.''

वारणावती (सोनवडे) ता. शिराळा येथे हुतात्मा नानकसिंग उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संयुक्त जयंती सोहळयात दिनांक ५.८.२००१ रोजी बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''जातीयवादी, भांडवलशाही व भ्रष्टाचारी सरकार विरुध्द शेतकरी, कष्टकरी, सामान्य जनतेने क्रांतिसिंह नाना पाटील व आण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वसा घेऊन लढायला तयार व्हावे. क्रांतिसिंह नाना पाटील हे सच्चा हाडाचे कार्यकर्ते होते. नाना पाटील यांनी अन्याय अत्याचाराविरुध्द समाज जागृतीचे काम केले. 'शिका, संघटित व्हा व दळभद्री सरकारविरुध्द संघर्ष करा.' हा संघर्ष अत्यंत जागरुकपणे करावयास हवा तेव्हाच या देशात खरे खुरे स्वातंत्र्य येईल.''

हुतात्मा किसन अहिर विद्यालयात वाळवा येथे अण्णाभाऊ साठे यांच्या ८१ व्या जयंती निमित्त दिनांक ५.८.२००१ रोजी बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य म्हणजे एका सामान्य माणसाची असामान्य साहित्य निर्मिती आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून गोर गरीब कष्टकरी जनतेच्या हृदयद्रावक दु:खाचे यथार्थ चित्रण केले असल्याचे प्रतिपादन केले. कष्टकरी जनतेच्या दु:खाचे प्रतिबिंब असणारे अण्णाभाऊ सारखे साहित्य निर्माण करण्याची कुवत असणारे साहित्यिक आजच्या विद्यार्थ्यांमधून निर्माण होणे ही २१ व्या शतकाची प्रकर्षाने गरज आहे.

सावळज ता. तासगाव येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या २९.८.२००१ रोजीच्या कर्मवीर भाऊराव पाटील जयंती कार्यक्रमात बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले की, भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होऊन गेली तरी देशातील जनतेला खरे खुरे स्वातंत्र्य मिळाले नाही. कष्टकऱ्यांना सुखी जीवनाचा मार्ग सापडत नाही. काँग्रेस सरकारच्या भांडवलशाही धोरणाने देशाची शैक्षणिक प्रगती खुंटली असून देश रसातळाला नेण्याचे काम काँग्रेसवाल्यांनीच केले आहे. केंद्रातील भाजपचे सरकार कामगार, शेतकरी वर्गाच्या विरुध्दचे आहे. गरज नसताना महात्मा गांधींचा खून झाला. बाबरी मशीद पाडली गेली. या सर्व घटनांना जबाबदार कोण? स्वातंत्र्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांनीच बहुजन समाजातील मुलांना ज्ञानदान केले आहे. तेच खरे महाराष्ट्राचे दैवत आहेत.



मल्हारपेठ ता. पाटण येथे महाराष्ट्रातील बेलदार समाजाच्या राज्य व्यापी मेळाव्यात दि. २७.८.२००१ रोजी अध्यक्षपदावरुन बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''भाजपासारख्या जातीयवादी पक्षांबरोबर असणारी शिवसेना बहुजन समाजाच्या हिताचे कार्यक्रम कधीच राबवत नाही. केंद्रातील लोकशाही आघाडी सरकार जातीयवादी आहे. या सरकारकडून बहुजन समाजाच्या विरोधात अनेक निर्णय घेतले जातात. धर्माच्या आधारावरील राजकारण आणण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. अशा पक्षाबरोबर शिवसेना आहे. शिवसेनेने बहुजनांच्या हितासाठी आजवर काही केले नाही. लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी बहुजन समाजासाठी आयुष्य वेचले. अशा लोकनेत्याच्या घरात शिवसेना यावी हे दुर्दैव आहे. भाजप-शिवसेना सत्तेवर आणण्यास काँग्रेसच जबाबदार आहे. केंद्रातील सरकार बहुजनांवर हल्ला करत आहे. साखर उद्योग बहुजनांच्या ताब्यात आहे हे माहीत असल्याने या उद्योगाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न होत आहे. कष्टकरी राबणारे संघटित झाल्याशिवाय जातीयवादी व समाजाला अडचणीत आणणाऱ्या शक्तीचा मुकाबला करता येणार नाही. जम्मू काश्मीरमध्ये रोज एक जवान शहीद होत आहे. सर्वसामान्य कुटुंबातील जवान जात आहेत. देशपांडे, कुलकर्णी का शहीद होत नाहीत.?''

सत्यशोधक विद्यार्थी संघटनेतर्फे परभणी येथे महात्मा फुले हायस्कूलच्या मैदानावर दि. ६.१.२००२ रोजी शिक्षणाचे खाजगीकरण व ब्राह्मणीकरण विरोधी राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले होते. त्या प्रसंगी परिषदेचे उद्घाटन करताना नागनाथ अण्णा म्हणाले होते, ''शिक्षणाचे खाजगीकरण व ब्राह्मणीकरण ही दोन्हीही धोरणे हाणून पाडण्यासाठी समतावादी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी एकजूट व्हावे व त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर आंदोलने उभारावीत. भारतीय स्वातंत्र्या करिता बहुजन समाजातील सर्व शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर आदी लढत होते. त्यामुळेच देश स्वतंत्र होऊ शकला. परंतु स्वातंत्र्यानंतर हिंदी भांडवलदार वर्गाने या देशातील सत्ता लबाडीने काबीज केली. त्यांनी एकवटून या देशावर राज्य सुरु केले व बड्या भांडवलदारांचे हित जपणारे धोरण अवलंबिले. काबाडकष्टाशिवाय जीवन जगणाऱ्या या हिंदी भांडवलदारांना झुगारुन कष्ट करणाऱ्या जनतेचे राज्य या देशावर आणण्यासाठी व समतावादी शिक्षणाच्या हक्कासाठी विद्यार्थ्यांनी पुरोगामी चळवळींना बळ द्यावे.''

लातूर येथे अग्रसेन भवनामध्ये ३१ व्या अखिल भारतीय सत्यशोधक अधिवेशनाचे उद्घाटन २.२.२००२ रोजी करताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''सत्यशोधकीय चळवळीची जुनी धार लोप पावत चालली असून केवळ निष्ठेने अधिवेशनास येणे पुरेसे नाही तर त्याच निष्ठेने समाजातील अन्यायाविरुध्द पेटून उठायला हवे. ब्राह्मणांनी स्वत:च्या स्वार्थासाठी बहुजनांना मागास ठेवले. केशवराव जेधे, नाना पाटील, महात्मा फुले यांनी आंदोलन पुकारले. समाजाला जागृत करण्याचे काम केले. मात्र कालांतराने ही चळवळ थंडावली. तरुण मंडळी या चळवळीकडे येत नाहीत. साहित्याची आघाडी उघडून लेखन भरपूर होत आहे. मात्र ते समाजातील मंडळींनी वाचायला हवे.केवळ वारकरी निष्ठेने अधिवेशने, परिसंवादात सहभागी होऊन समाधान मानून चालणार नाही तर या विचारात अधिकाधिक जणांचा सहभाग होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवा.'' नागनाथ अण्णांचे हस्ते स्मरणिकेचे व सत्यशोधकांची गाथा केशवराव विचारे चरित्रग्रंथ, सत्यशोधकीय साहित्य, भारतीय शेतकऱ्याची दशा व दिशा या पुस्तकांचेही प्रकाशन झाले.

सांगली येथे मुस्लीम यूथ फेडरेशनच्या वतीने शिवजयंती समारंभ २१.२.२००२ रोजी

आयोजित केला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नागनाथ अण्णा म्हणाले, ''रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास समाजापुढे आणून सर्व जाती धर्मातील लोकांनी परिवर्तनाची मशाल ज्योत यापुढेही अखंड तेवत ठेवावी. महात्मा गांधींचा खून करुन हिंदू-मुस्लीम दंगली व्हाव्यात हे ज्यांच्या पोटात होते त्यांच्याकडूनच आता बाबरी मशिदीचा प्रश्न उचलून जनतेला पोटापाण्याच्या प्रश्नांपासून दूर नेण्याचे कट कारस्थान होत आहे हे बहुजन समाजाने ओळखावे.''

सागाव, ता. पन्हाळा येथील वारणा संशोधन चॅरिटेबल ट्रस्टच्या सागाव शाखेचे उद्घाटन दि. ८.२.२००२ रोजी करताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजासाठी शैक्षणिक क्षेत्र निर्माण करुन शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना शिक्षणाचा हक्क प्राप्त करुन दिला, पण देश आज भ्रष्टाचारामुळे पूर्णपणे खिळखिळा झाला आहे. म्हणूनच भ्रष्टाचाराला वेळीच पायबंद घालावयाचा असेल तर शिक्षण व वैद्यकीय क्षेत्रात बदल करण्याची गरज आहे. बहुजनांवरील अन्याय व युवकांना न्याय मिळवून देण्यासाठी मी नेहमी प्रयत्नशील राहणार आहे. सागाव ट्रस्टमुळे गरीब व गरजू लोकांना न्याय मिळेल.''

रुई ता. हातकणंगले येथील न्यू फ्रेंडस् क्लबच्या वतीने सप्तजयंती सोहळ्यात १८.५.२००२ रोजी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''सर्वधर्म समभावासाठी जातीयता विसरुन सर्व समाजमने एकत्र जोडायला हवीत. वाढती जातीयता ही दुर्दैवी बाब आहे. आणि यामुळेच देशाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. हे थांबवायला हवे. जातीयता पोसणाऱ्या कट्टर पंथियांना तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या पक्ष व संघटनांना आता धडा शिकवायला हवा. यासाठी तरुणांनी संघटित होऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. सहकारामुळेच ग्रामीण भागाचा झपाट्याने विकास होत आहे. मात्र या सहकारात मोठ्या प्रमाणात स्वाहाकार वाढला आहे. केंद्र शासनही शेतकऱ्यांना व साखर कारखान्यांना मोडीत काढण्याची धोरणे राबवीत आहे. त्याच्या विरोधासाठी शेतकऱ्यांनीच पुढाकार घ्यायला हवा. केवळ सरकारनेच नव्हे तर साखर कारखान्यातील अधिकाऱ्यांनी कारखान्याबरोबर शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करायला हवा.''

समाजवादी प्रबोधिनी शाखा किर्लोस्करवाडी, क्रांति अग्रणी जी. डी. बापू लाड, समाज प्रबोधन संस्था कुंडल यांचे वतीने शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या व सांप्रदायिकीकरण विरोधात पलूस येथे दिनांक ८.७.२००२ रोजी भरलेल्या परिषदेचे उद्घाटन करताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''केंद्र व राज्य सरकारच्या शिक्षणाच्या खाजगीकरण व मनुवादी भगवेकरणामुळे सर्व सामान्य जनता व शेतकरी कष्टकऱ्यांच्या मुलांना मिळणारे मोफत शिक्षण बंद होणार आहे. त्यांना धर्मवादी शिक्षण देऊन दैववादी बनविण्याचा प्रयत्न पध्दतशीरपणे होत असून यामध्ये सर्व समाजच नष्ट होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. तो थोपविण्यासाठी आता पुन्हा एकदा खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी लढणे अनिवार्य आहे.''

कानेटकर कुटुंबियांच्या योगदानातून साकारलेल्या स्व. डॉ. र. वि. कानेटकर स्मृती ग्रंथालयाचे उद्घाटन दि. ५.७.२००२ रोजी करताना नागनाथ अण्णा म्हणाले होते, ''आदर्श समाज निर्मितीसाठी नश्वर धन संपत्तीपेक्षा ज्ञान ही अक्षर संपत्ती सर्वश्रेष्ठ असते. माणसाने जगण्यासाठी जगावे व जगून कीर्तिरुपे उरावे, आचार, विचार व संस्कार यामुळे माणूस कायमस्वरुपी



इतरांच्या सहवासात राहतो. तो एक खरा जीवनाचा अर्थ आहे. आजच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर घरातल्या आई वडिलाप्रमाणे संस्कार करावेत.''

लातूर येथील मुक्ताई मंगल कार्यालयात पहिल्या सत्यशोधकी साहित्य संमेलनाचे दि. २१.१२.२००३ रोजी उद्घाटन करताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''महात्मा जोतिबा फुले यांनी ज्या उद्देशाने सत्यशोधक चळवळ सुरु केली होती तो उद्देश डोळ्यासमोर ठेवून ही चळवळ वाढविण्याचे काम बहुजन समाजातील तरुण पिढीने करावे. सत्यशोधक चळवळ जिवंत राहावी यासाठी लातूरकर करीत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. या चळवळीसाठी अनुकूल वातावरण आम्ही करु शकलो नाही, ही खंत आहे. ही चळवळ जनतेपर्यंत नेण्यात बहुजन समाजातील तरुण पिढीने पुढाकार घ्यावा. समाजातील महिलांना शिकवून त्यांना प्रोत्साहन दिल्याशिवाय चळवळ वाढणार नाही.'' याच वेळी महात्मा जोतिबा फुले यांच्या पूर्णाकृती प्रतिमेचे अनावरणही नागनाथ अण्णांनी केले.

नागनाथ अण्णांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता तरुणांनी संघटित होऊन शिक्षणावर भर देण्याचा, मुलींना शिक्षण देण्याचा व संघटितपणे शिक्षणाच्या खाजगीकरणाचा विरोध करण्याचे आवाहन वेळोवेळी वेगवेगळ्या प्रसंगी केले आहे. ८० वे वर्ष ओलांडले असले तरी तरुणांच्या उत्साहाने ते तरुणांना प्रोत्साहन देत असतात व देत आहेत.

* * * *



मा. राजमती ताई बिरनाळे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना
मा. नागनाथ (अण्णा) नायकवडी व सौ, कुसुमताई नायकवडी,
मा. बागुल, मा. निळू फुले, मा. राजमती ताई बिरनाळे, श्रीमती-इंदुताई पाटणकर, ई.

## २८

# पुणे विद्यापीठास राजर्षि शाहू महाराज यांचे नाव देण्याबद्दल आंदोलन

औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याबद्दलचे आंदोलन मराठवाड्यातील दलितांनी करुन ऐतिहासिक यश मिळवले होते. आता पश्चिम महाराष्ट्रातील बहुजन समाजातील जनतेची मागणी होती की, छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या पुण्यामध्ये स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली व मराठ्यांचे साम्राज्य स्थापले त्या पुण्यातील विद्यापिठास छत्रपती शिवाजी महाराजांचे २० व्या शतकातील लोकाभिमुख वारस राजर्षि शाहू महाराजांचे नांव देण्याविषयीचे आंदोलन नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम महाराष्ट्रातील बहुजन समाजाने आयोजिले होते. त्यानिमित्त वरुणतीर्थ गांधी मैदान कोल्हापूर येथे ६ मे १९९४ रोजीच्या राजर्षि शाहू महाराजांच्या स्मृतिदिनी भव्य सभा आयोजित केली. तसेच शासनाला निवेदन देण्यासाठी लाखो सह्यांची मोहीम आखली होती. कोल्हापूर येथील सभेसाठी प्रमुख पाहुणे उत्तर प्रदेशमधील बहुजन समाज पक्षाचे नेते कांशीराम यांना निमंत्रित केले होते.

कोल्हापूर येथील विराट सभेमध्ये बोलताना काशीराम म्हणाले, ''महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या विचारातून महाराष्ट्रात सत्तांतर घडवून आणले जाईल. राजर्षि शाहू महाराजांच्या महाराष्ट्रात खुर्चीचे राजकारण खेळणाऱ्या राजकारण्यांनी विधी मंडळाचा एकमुखी ठराव झाला असतानाही मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर लांबणीवर टाकून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बेइज्जत केली. उत्तर प्रदेशात बहुजन समाज पार्टीने सत्ता काबीज केल्यानंतर महाराष्ट्रात या पार्टीचे वादळ झेपावणार या भीतीने राज्यकर्ते अस्वस्थ झाले आणि त्यांनी माझी सभा शिवाजी पार्कवर होण्यापूर्वीच दोन दिवस अगोदर मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करुन टाकले. हा तमाम बहुजन समाजाचा विजय झाला आहे. उत्तर प्रदेशात आम्ही ५५० एकरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने विद्यापीठाची



स्थापना केली आहे. बहुजन समाज पार्टी, महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा सन्मान करेल असा जनतेस ठाम विश्वास वाटतो. या थोर महामानवांच्या सामाजिक समतेच्या विचारांच्या आधारेच आम्ही महाराष्ट्राची सत्ता काबीज केल्याशिवाय राहणार नाही. सध्याचे राजकर्ते सत्तेच्या मोहात ब्राह्मणवादी विचार आचरणात आणून बहूजन समाजात फूट पाडत आहेत. अशा सत्तापिपासूं पुढे न झुकता त्यांच्या खुर्च्या हलविण्याची तयारी बहुजन समाजाने केली पाहिजे. महाराष्ट्रातील सत्ता काबीज करण्याचा तो दिवस आता दूर नाही. पुणे विद्यापीठास राजर्षि शाहू महाराज विद्यापीठ असे नाव देण्याचे अभिवचनही देत आहे.''

त्यानंतर नागनाथ अण्णांचे या सभेत अतिशय आक्रमक भाषण झाले. ते म्हणाले, ''अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्यास मदत केल्याबद्दल काँग्रेस सरकार जबाबदार आहे. निधर्मीपणाचा टेंभा मिरवणारे काँग्रेसवाले राज्य करायला लायक नाहीत. महात्मा गांधींच्या खुन्यांनीच बाबरी मशीद पाडली. भाजप व अन्य जातीयवादी शक्ती यास जबाबदार आहेत.''

एका शाखेच्या वर्धापनदिनाचे निमित्त करुन सभेत व्यत्यय निर्माण करण्यासाठी झांज व ढोल वाजविणाऱ्या शिवसैनिकांची गंभीरपणे दखल घेऊन नागनाथ अण्णा म्हणाले, ''याद राखा! तुमच्या कारवाया ब्रिटिशांना पळवून लावणारी जनता कधीही सहन करणार नाही. एकसंध महाराष्ट्र नाही याची खंत जरुर आहे, पण तेही आव्हान आता आम्ही स्वीकारलेले आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाज एकत्र करणार आहोत''

वरील सभेमध्ये ३० सप्टेंबर १९९४ रोजी बहुजन समाजातील कार्यकर्त्यांचा विशाल मोर्चा मुंबईच्या सचिवालयावर काढण्याचा विचार सर्वांमध्ये ठरला होता.

ठरल्याप्रमाणे लाखोंच्या सह्यांचे निवेदन महाराष्ट्र शासनाला देण्यासाठी हजारो कार्यकर्ते मिळेल त्या वाहनाने मुंबईस गेले होते. कोल्हापूरहून ६० एस. टी. बसेस भरुन कार्यकर्ते गेले होते. मोर्चापुढे बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''१०० वर्षांपूर्वी महात्मा फुलेंनी बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी सत्यशोधक चळवळ सुरु केली. या चळवळीत पुढील काळात शाहू महाराजांच्या सारख्या अनेक थोर व्यक्तींनी सहभाग घेऊन ही चळवळ वाढविली. देशातल्या सर्व ब्राह्मण समाजापेक्षा महाराष्ट्रातील ब्राम्हण समाज हा वेगळा आहे. कारण तो आजपर्यंत स्वत: काबाड कष्ट न करता सुखात व चैनीत जगत आलेला आहे व त्यांची ही परंपरा आपणास मोडावी लागणार आहे. या ब्राम्हणवाद्यांनी अत्यंत हुशारीनं ३० सालच्या राष्ट्रीय चळवळीचा किंवा ४२ च्या वैयक्तिक सत्याग्रहाचा बाऊ केला आहे. कारण यातून जो १५ ऑगस्ट १९४७ जन्माला आला तो बहुजनांच्या मुक्तीचा नव्हताच याची खात्री आता सर्वांना पटली आहे. या ब्राह्मणवाद्यांनी अत्यंत हुशारीने देशाच्या स्वातंत्र्याच्या नावाखाली व राष्ट्रीय चळवळीच्या नावाखाली बहुजनांची सत्यशोधक चळवळ दडपून टाकली व आपल्या दुर्दैवाने आपले त्यावेळचे नेते हे राजकीयदृष्ट्या कमकुवत ठरल्याने या सत्यशोधक चळवळीत खंड पडला होता. जर हा खंड पडला नसता तर आज निराळीच परिस्थिती असती व आपणास ही परिषद हा परिसंवाद घेण्याची गरजच भासली नसती. त्यामुळे अपुरे राहिलेले काम आपणास पुरे करायचे आहे. कांशीरामजींच्या नेतृत्त्वाखाली ही सत्यशोधक चळवळ अखंडपणे चालू ठेवण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. उत्तर प्रदेशमधील आपल्या यशात ही चळवळ वाढेल परंतु शाहू राजांचं नाव पुणे विद्यापीठास

देणे हा एकूण साऱ्या लढ्यातील एक टप्पाच आहे, हे ही आपण विसरता कामा नये व त्यासाठी आपणाला कांशीरामजी सारखं भक्कम नेतृत्व मिळालं आहे. ते आंबेडकरांचं बहुजनांना जागृत करण्याचं काम पुढे चालवत आहेत. सत्यशोधक चळवळ जी बंद पडली होती ती पुन्हा सुरु करण्याचा काळ कांशीरामजींच्या नेतृत्त्वाखाली आला आहे. कांशीरामजींच नेतृत्त्व आपल्यासारख्या सर्वसामान्य जनतेतून पुढं आलेलं नेतृत्त्व आहे. त्यांनी बहुजनांच्या चळवळीकरीता चार चार हजार किलोमीटरचा प्रवास फक्त सायकलवरुन केला आहे. म्हणून आपण साऱ्यांनी या चळवळीस कर्तव्यबुध्दीने ताकत देण्याची गरज आहे. तसेच ही चळवळ शक्तिशाली करण्याच्या दृष्टीने पावले टाकण्याची गरज आहे.''

''ब्रिटिशांपासून आपला देश स्वतंत्र करुन घेण्यात आपल्या देशातील भांडवलदार ब्राह्मणवादी यशस्वी झाले व त्यानंतर त्यांनी आपल्यावर वर्चस्व ठेवले आणि आपण त्यांच्या दुष्टचक्रात अडकलो. आता आपणाला या चक्रातून बाहेर पडण्यासाठी काहीतरी मार्ग काढला पाहिजे. नुसतं बी अगोदर की झाड अगोदर किंवा सामाजिक सुधारणा अगोदर की राजकीय सुधारणा अगोदर यामध्ये आपण वेळ वाया घालवता कामा नये आणि म्हणूनच आपण एकदम मुसंडी मारली पाहिजे. त्यासाठी आपणाला १९३० सालच्या राष्ट्रीय चळवळीच्या ४० सालच्या वैयक्तिक सत्यागृहाचे सिंहावलोकन केले पाहिजे. कारण त्यातून आपणाला मार्ग मिळणार आहे.

अलीकडच्या काळात लोक धर्म, जात, पंथ अशा गोष्टीना महत्त्व देत नाही कारण शेवटी धर्म हा फक्त पोटापाण्याचा आहे. ज्याला कामधंदा निवारा मिळतो तो धर्म मानत बसत नाही. बहुजनांच्या सत्यशोधक चळवळीचा विकास करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक गरजू व्यक्ती हा आहे. ज्यांना जमीन नाही इतर काही उत्पन्नाचे साधन नाही अशा व्यक्तींच्या प्रश्नांवर चळवळी करणे व चळवळीच्या साहाय्याने कष्ट करणाऱ्यांचे, गरजू व्यक्तींचे सामर्थ वाढविण्याची गरज आहे. तरच आपणा सर्वांचे प्रश्न सुटणार आहेत. अशा प्रश्नांचा शोध घ्यावा, त्याच्यावर चर्चा करावी, वाचन करावे, आणि ९८,९९ टक्के कृतीवर भर देऊन त्या प्रकारचे प्रश्न सोडवित जावेत.''

* * * *



# २१

## वडाप जीपचालकांचे आंदोलन

सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील १३ दुष्काळी तालुक्यांतील समान पाणी वाटपाबद्दल शेतकऱ्यांनी आटपाडी येथे भव्य पाणी परिषदा घेतल्या होत्या, त्यामुळे आटपाडी करांच्या सामाजिक, अन्यायी प्रश्नांबाबत नागनाथ अण्णा नेहमीच लक्ष घालीत असत.

आटपाडी तालुक्यातील खाजगी प्रवासी वाहतूकदारांनी जीप, प्रवासी टेम्पो, चालक मालक यांनी आपली संघटना स्थापन केली होती व त्यांची वाहतूक शासनमान्य करावी यासाठी आंदोलनाचा पवित्रा घ्यायचे ठरविले होते. त्यापूर्वी पोलिसांनी आटपाडी बसस्थानकाच्या दोन्ही प्रवेशद्वारांवर उभी राहणारी खाजगी प्रवासी वाहने हटविली होती व जिल्हा पोलीसप्रमुखांच्या सूचनेनुसार ती वाहने दोनशे फुटांपेक्षा लांब अंतरावर उभी करणे सक्तीचे केले होते. त्याचबरोबर एस.टी.च्या भरारी पथकाच्या वाहतूक अधिकाऱ्यांनी अनेक खाजगी वाहनांवर कारवाई केल्याने खाजगी जीपचालकांची चांगलीच कोंडी निर्माण होऊन त्यांच्या व्यवसायावर मोठाच परिणाम झाला होता. खाजगी वाहतूक मोठ्या प्रमाणावर ठप्प होऊन वाहनचालकांवर उपासमारीची वेळ आल्याने आटपाडी तालुक्यातील खाजगी वाहनचालकांमध्ये मोठे नैराश्य आले होते. त्यांच्या प्रश्नांसाठी सप्टेंबर २००० मध्ये तालुक्यातील खाजगी वाहकांची संघटना मजबूत करण्यासाठी एक मेळावा घेतला होता व त्या मेळाव्यात खाजगी वाहनचालकांच्या आंदोलनास क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांचा सल्ला घेण्यासाठी व नेतृत्वासाठी आटपाडीचे संजय देशमुख, गणपतराव पवार, संजय वाघमारे वगैरे नागनाथ अण्णांना भेटण्यासाठी वाळवा येथे आले होते. नागनाथ अण्णांना आटपाडीच्या खाजगी वाहनचालकांची समस्या समजली. त्याबद्दल ते म्हणाले, ''सरकारच्या हलगर्जीपणामुळे हा प्रश्न गंभीर झाला आहे. खाजगी बेकायदा वाहतूक वेळीच

मोडायला पाहिजे होती, परंतु तसे झाले नाही. त्यामुळे यात गुंतलेल्या वाहनचालकांची कर्जे फेडून नोकरीत सामावून घेणेच योग्य ठरेल.'' ह्या चर्चेनंतर या प्रश्नांची सामाजिक व आर्थिक बाजू इत्यादींचा अभ्यास करण्यास डॉ. भारत पाटणकर यांचेवर सोपवले आणि कायदेशीर बाजूची जबाबदारी सातारचे प्रसिध्द ॲडव्होकेट धैर्यशील पाटील यांच्यावर सोपवली, त्यामुळे खाजगी वाहनचालकांच्या मनामध्ये धीर आला होता.

त्यानंतर २५ सप्टेंबर २००० रोजी आटपाडी येथे खाजगी वाहतूकदारांच्या बैठकीच्या अध्यक्षपदावरुन बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''शासनाच्या त्रासाविरुध्द खाजगी प्रवासी वाहतूकदारांनी संघटित व्हावे. संघटनेच्या भूमिकेशी मी सहमत असून त्यांच्या मागण्यांना माझा पाठिंबा आहे. खाजगी प्रवासी वाहतुकीचे स्वागत जनतेने केले आहे. यामुळेच या व्यवसायात गेल्या १५ वर्षांत मोठी वाढ झाली आहे. व्यवसायामुळे अनेकांना उपजीविकेचे साधन मिळाले आहे. शासनकर्त्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे खाजगी वाहतूक वाढली व एस. टी. महामंडळाची सेवा बिघडल्यामुळे खाजगी वाहतुकीकडे प्रवासी आकर्षित झाले आहेत.''

खाजगी वाहतुक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी नागनाथ अण्णांना संघटनेचे नेतृत्व करणेची आग्रही विनंती केली. याच नागनाथ अण्णा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ''मुक्त अर्थव्यवस्थेचे'' धोरण असताना शासन वाहनधारकांना त्रास देत आहे.सततच्या पोलीस कारवाईमुळे वाहने बंद होतात, कर्जाचे हप्ते थकतात. अशा स्थितीत पोलीस व वाहतूक कार्यालयाचे हप्ते कायमस्वरुपी बंद झाले पाहिजेत,अशा मागण्या मांडण्यात आल्या होत्या.

वरील मागण्या मांडण्यासाठी कोल्हापूर, सातारा, व सांगली जिल्ह्यांतील जीप व टेम्पो चालकांनी आपल्या वाहनासह कोल्हापूर मार्केट यार्डापासून आर.टी.ओ. कार्यालयापर्यंत दिनांक ४.१२.२००० रोजी नागनाथ अण्णा यांच्या नेतृत्त्वाखाली मोर्चा काढला होता. मुख्य मागणे होते की, खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या जीप, टेम्पोला अधिकृत मान्यता द्या, अथवा मान्यता देता येत नसेल तर उदरनिर्वाहासाठी सरकारी नोकरी द्या, आर.टी.ओ कार्यालयासमोर भरलेल्या सभेत नागनाथ अण्णा म्हणाले, ''नोकरी मिळत नाही म्हणून तरुणांनी वाहने विकत घेतली. पण व्यवसाय करताना अनेक अडथळे या तरुणांसमोर उभे केले. आमचा व्यवसाय खरोखरच बेकायदेशीर असेल तर आम्ही हा व्यवसाय बंद करतो. आम्हाला कोठेतरी सरकारी नोकरी द्या. वाहने विकत घ्या व नोकरी द्या हीच आमची भावी काळातील मागणी आहे. हप्ता दिला की हा व्यवसाय कायदेशीर होतो, हप्ता दिला नाही की बेकायदेशीर ठरतो. हप्त्याच्या रकमेची वाटणी करण्यासाठी वरपासून खालपर्यंत अक्षरश: चढाओढ सुरु आहे. आता हे सर्व सहन होण्यापलीकडे गेले आहे. त्यामुळेच आजच्या निर्धार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.'' त्यानंतर मोर्चाचे शिष्टमंडळाने प्रादेशिक परिवहन अधिकारी एच. के. पाचारणे यांना निवेदन दिले. खाजगी प्रवासी वाहतूक शासन जोपर्यंत कायदेशीर ठरवत नाही तोवर आर.टी.ओ. विभागामार्फत दंड, वाहन निलंबनाची कारवाई केली जाऊ नये, अशी मागणी डॉ. भारत पाटणकर यांनी केली. तसेच वाहनाबाहेर प्रवासी नेणाऱ्या प्रवासी जीप व टेम्पोवर कारवाईस हरकत नसलेचे मोर्चात सांगितले.



या धडक मोर्चात हिंदकेसरी गणपत आंदळकर, नागनाथ अण्णा, डॉ. भारत पाटणकर यांनी भाग घेतल्यामुळे मोर्चा यशस्वी झाल्याचे समाधान मोर्चेकऱ्यांना मिळाले होते.

४ डिसेंबर २००० वरील मागण्यांचा पाठपुरावा करण्याकरिता खाजगी वाहनचालकांची संघटना मजबूत करण्यासाठी नागनाथ अण्णा वाहनचालकांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिल्यामुळे खाजगी वाहनचालकांचा उत्साह वाढला होता. आटपाडी, कोल्हापूरनंतर विटा येथे २७ नोव्हेंबर २००१ रोजी खानापूर तालुका जीप व टेम्पो चालक व मालकांच्या वतीने क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा सत्कार आयोजिला होता. त्यावेळी ते म्हणाले,''दुष्काळी भागातील जीप टेम्पो चालक, मालक संघटनेने संघटन वाढवावे. संघटन वाढविल्याशिवाय शासनकर्त्यांवर धाक राहणार नाही. वडापवाल्यांनी मोठ्या प्रमाणावर संघटन केल्यास गाडी अडवायची त्यांची हिम्मत होणार नाही.

वडापवाल्यांवरील संकट हे संघटनेवरील संकट आहे. संघटनेवरील संकट सामुदायिक प्रयत्नातून मोडून काढले पाहिजे, त्यासाठी आपण लवकरच कोल्हापूर येथे निर्णायक मेळावा घेणार आहोत. सातारा, सांगली, सोलापूर विभागातील वडापवाल्यांनी सामुदायिक संकटांचा सामना करावा.'' याच प्रसंगी डॉ. बाबूराव गुरव म्हणाले, ''धनदांडगे, सत्तादांडगे व जातदांडगे यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा खऱ्या अर्थांनी विचका केला आहे. संघटनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांनी आपली ताकत वाढवावी.''

त्यानंतर दि. २३ जानेवारी २००२ रोजी सांगली येथे वडापला शासन मान्यता देत नाही, याचा गैरफायदा हप्ते वसुली करुन पोलीस घेत आहेत. प्रवाशांची वाहतूक करणे हा कोणताही गुन्हा नसून या व्यवसायाला रीतसर परवानगी द्यावी व पोलिसांकडून होणारी अडवणूक थांबवावी, या मागण्यासाठी खाजगी चालक, मालक यांनी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर क्रांतिवीर नागनाथ नायकवडी व डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्त्वाखाली भव्य मोर्चा काढला होता. मोर्चा पुढे बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''वडाप वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांकडून पोलिसांना देण्यात येणारे हप्ते पूर्णपणे बंद करावेत. पोलीस आपल्या सोयीप्रमाणे कायदा वापरत असल्याने अनेक लोक बेरोजगार होणार आहेत. म्हणून यापुढे पोलिसांना एकही पैसा देऊ नका.''

यानंतर दिनांक ३० जानेवारी २००२ रोजी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील चालक, मालकांनी एक विराट मोर्चा काढला होता. त्यावेळीही मोर्चाच्या सभेत अण्णांनी खाजगी वाहनचालकांवर होत असलेल्या अन्याय थांबविण्याचे आवाहन शासनास केले.

याचवेळी बोलताना सातारचे प्रकाश गवळी म्हणाले, ''बेकायदा प्रवासी वाहतुकीमुळे एस.टी. तोट्यात आली. हा आरोप चुकीचा आहे. चुकीचे व्यवस्थापन असल्यामुळे एस.टी. तोट्यात आली आहे. खाजगी प्रवासी वाहतुकीविरुध्द कामगार संघटनेचे नेते बोलतात पण प्रत्यक्षात या नेत्यांच्या मालकीच्या जीप व टेम्पो आहेत. ते देखील प्रवासी वाहतुकीतून कमाई करतात.''

डॉ. भारत पाटणकर म्हणाले, ''घटनेने रोजगाराचा हक्क दिला आहे. पण सरकार या हक्काची पूर्तता करु शकत नाही, परिणामी बेरोजगार युवकांनी वाहतूक व्यवसाय क्षेत्रात प्रवेश केला. पण हा व्यवसाय बेकायदेशीर ठरविण्याचा प्रयत्न करुन या युवकावर दंड, हप्ता, एन्ट्री या माध्यमातून अन्याय केला जात आहे. मटका, दारु, यासारखा बेकायदेशीर व्यवसाय सुरु करण्यात कोणताही अडथळा नाही. पण प्रामाणिकपणे कष्ट करुन जगणाऱ्या जीप व टेम्पोचालकांना मात्र कारवाईस सामोरे जावे लागते. खाजगी प्रवासी वाहतुकीमुळे एस.टी. तोट्यात जात असेल तर वातानुकुलित आराम बस वेगवेगळ्या मार्गावर सुरु करण्यास शासन का परवानगी देते? शासनाला खरोखरच एस. टी. ची काळजी असेल तर प्रथम आराम बसचा व्यवसाय बंद करुन दाखवावा व नंतर सर्वसामान्य जीप, टेम्पोचालकांना कायद्याचे ज्ञान सांगावे.''

या मोर्चाचे नेतृत्त्व नागनाथ अण्णा नायकवडी, डॉ. भारत पाटणकर, प्रकाश गवळी, भारत पाटील, दिनेश यादव, हिंदकेसरी गणपतराव आंदळकर, दत्तात्रय पाटील, बाळासाहेब वाडकर व काशिनाथ महाजन यांनी केले होते. अद्यापतरी शासनाने या प्रश्नाबाबत ठोस निर्णय घेतला नाही.

* * * *



# ३०

## वीज दरवाढ विरोधी आंदोलन

दिनांक १ सप्टेंबर १९९८ पासून महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने शेती वीज पंपाची वाढीव वीजबिले आकारली होती त्या वाढीव वीज दरामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याची वस्तुस्थिती निर्माण झाली होती. वीजदर वाढीचा परिणाम शेती, उद्योग, साखर उद्योग यांच्यावरही दूरगामी परिणाम होणार होता. म्हणून १६ सप्टेंबर १९९८ रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा, जिल्ह्यातील शेतकरी शेती वीज पंपधारक आणि पाणीपुरवठा संस्था प्रतिनिधींचा एक व्यापक मेळावा किणी (ता. हातकणंगले) येथे घेण्यात आला होता.

अध्यक्षपदावरुन बोलताना ज्येष्ठ विचारवंत नेते यशवंत चव्हाण म्हणाले की, सरकार परदेशी भांडवलदारांना विकले गेले असून तो करार पूर्ण करताना शेतकऱ्यांची कुवत व ऐपत न पाहाता कर लादले जात असून त्यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडले आहे. या अन्यायी वीज दरवाढीचा निषेध म्हणून एक दिवस विजेचा वापर न करता सत्याग्रह करावा. शेती पंपाची वाढीव वीजबिले भरली नाहीत तर महाराष्ट्र राज्य वीज मंडळ वीज तोडेल, पिकांचे नुकसान होईल, याची काळजी न करता शेतकऱ्यांनी भविष्यातील नुकसानीची काळजी करावी. येत्या दोन वर्षात वीज दर वाढत वाढत प्रतियुनिट १० रुपयांपर्यंत जातील त्या भरमसाट वाढीस आत्ताच पायबंद घालणेसाठी शेतकऱ्यांनी तोटा सोसून संघटितपणे आंदोलनात उतरावे.

त्यानंतर माजी सहकारमंत्री प्रा. एन. डी. पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या सबसिडी बंद केल्यामुळे, शेती वीज पंपावरील दरवाढ, पाणीपट्टी वाढ, यामुळे शासनाने शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडले आहे हा लढा शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या धोरणावर महाराष्ट्रातील राज्यकर्ते चालतात, ते नाणे निधीचे बाहुले असून त्यानुसार निर्णय घेतले जातात. वीज मंडळ, एस. टी. मंडळ नफ्यात चालले पाहिजे. या बडग्यामुळेच दरवाढ, कर लादणे असे निर्णय घेतले जातात.

मेळाव्याचे निमंत्रक नागनाथ अण्णांनी जाहीर केले की दिनांक १२ ऑक्टोबर १९९८ रोजी सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी कोल्हापुरात येऊन वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चात सहभागी होण्यास आवाहन केले.

वीज दरवाढीची पार्श्वभूमी अशी होती की, महाराष्ट्र शासनाने १ जुलै १९९६ पासून वीज दरवाढ करण्याचा अव्यवहार्य निर्णय घिसाडघाईने घेतला होता. त्या निर्णयाला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलने केली त्यामुळे वीज दरवाढ प्रति अश्वशक्ती ३५० रुपयांहून ३०० रुपयांवर आली, शासनाच्या निर्णयाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात सार्वजनिक हितार्थ दाखल केलेल्या याचिकेचा निकाल लागण्यापूर्वीच १ सप्टेंबर १९९८ पासून वीज मंडळाने वीज दर वाढ जाहीर केली होती.

ठरल्याप्रमाणे १२ ऑक्टोबर १९९८ रोजी कोल्हापूर शहरातील विभागीय वीज मंडळाच्या कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी भव्य मोर्चा काढला होता. मोर्चाचे नेतृत्त्व नागनाथ अण्णांनी केले होते. सर्वानुमते त्या वेळी असे ठरले की, अन्यायी वीज दर वाढ रद्द केल्याशिवाय कोणताही शेतकरी वाढीव वीज दराची बिले भरणार नाही. जर वीजबिले भरली नाहीत म्हणून वीज कनेक्शने तोडल्यास तीव्र आंदोलने करण्याचा इशारा देण्यात आला. वीज दरवाढ रद्द करुन पूर्वीचाच प्रति अश्वशक्ती वार्षिक ३०० रु. दर ठेवावा, असे ठरले. या मोर्चामध्ये प्रा. एन. डी. पाटील, एस. आर. पाटील, रवींद्र सबनीस, नागनाथ अण्णा यांनी आंदोलकांच्या वतीने मागण्यांचे निवेदन वीज मंडळाच्या मुख्य अभियंत्याला दिले.

शासन वीज मंडळाचा तोटा कमी करणे व वीज मंडळाचे खाजगीकरण व विभाजनाच्या विरोधात वीज कामगारांनी २५ जुलै २००० ला बेमुदत जाहीर केलेल्या संपामुळे कात्रीत सापडले होते. धावपळ करुन वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा संप २९ जुलै २००० ला मिटला होता. त्याच काळात एन्रॉन कंपनी बरोबरच्या वादामुळे शासन अडचणीत आले होते. नेहमीच मार्च महिन्यामध्ये वीज मंडळाचे कर्मचारी थकीत बिले वसुली करण्याची मोहीम काढतात. त्यातच मार्च महिन्यात सरकारी कर, बँकेची कर्जे वसुलीस शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. पुर्वी शेतकऱ्यांच्यावर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी भांडणारे नेते शासनात मंत्री असूनसुध्दा शेतकऱ्यांवरील अन्याय दूर होत नव्हता. परंतु नागनाथ अण्णांनी या प्रश्नांबाबत तातडीची बैठक कोल्हापूर येथे दि. १७ नोव्हेंबर २००१ रोजी घेतली होती. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३०० शेतकऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तेथे नागनाथ अण्णा म्हणाले की, ''वीज दरवाढीविरुध्द सर्वांनी संघटितपणे मुकाबला करावा. शासनाकडे शिष्टमंडळ नेऊन हा प्रश्न सुटणार नाही तर लाखो लोकांनी संघटितपणे मोर्चा काढून शासनाला वीज दरवाढ मागे घेण्यास भाग पाडले पाहिजे''

कॉ. नाना शेटे, कॉ. वसंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत एन्रॉन प्रकल्प रद्द करण्यात यावा, वीज पंपावर पाच अश्वशक्तीपर्यंत ६०० रुपये व त्यापुढे ८०० रुपये दर स्वीकारावे, इंधन व इतर आकार आकारण्यात येऊ नयेत, विजेवरील दंड व्याज रद्द करणेत यावेत, युनिटचा दर ५० पैशा पेक्षा जास्त असू नये, शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडू नये असे ठराव करण्यात आले होते.

वीज दरवाढीच्या विरोधात लवकरच दोन लाख शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित करण्यात येणार आहे असे नागनाथ अण्णांनी दिनांक २३ नोव्हेंबर २००१ रोजी मणदूर (ता. शिराळा)



येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर सभेत जाहीर केले. तसेच शेतकऱ्यांनी वाढीव दराने वीजबिले भरु नयेत, पहिल्या प्रमाणे वीजबिल जमा करावी. मणदूर परिसरातील शेतकऱ्यांच्याकरिता नागनाथ अण्णांनी बैठकीत खालील ठराव मांडले होते.

- ◆ वारणा धरणाच्या ० ते २६ कि.मी. अंतरापर्यंत कालव्याच्या चढाकडील बाजूस पाण्यापासून वंचित असा जो भाग आहे त्याकरिता उपसा जल सिंचन योजना मंजूर आहेत. त्यास तात्काळ निधी द्यावा व काम सुरु करावे.
- ◆ शिराळा तालुक्याचा उत्तर भाग, वाळवा तालुक्याचा पश्चिम भाग, कराड तालुक्याच्या दक्षिण भागास वरदान ठरणारी वाकुर्डे योजना तत्काळ पूर्ण करण्यात यावी.
- ◆ विधानपरिषद उपसभापती वसंतराव डावखरे यांनी मुख्य कालव्यास अल्पशी गळती आहे, असे सूचित केले होते. कालव्यास पाणी नसताना या समितीला अल्प प्रमाण कसे समजले या करिता मुख्यमंत्र्यांनी दुसरी समिती नेमावी व कालव्यास पाणी सोडून गळतीचे प्रमाण पाहावे.
- ◆ २६ कि.मी. पुढील कालव्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांची मते विचारात घ्यावीत.
- ◆ मुख्य कालव्याची गळती काढण्यासाठी निधी तातडीने द्यावा.

याच वेळी डॉ. भारत पाटणकर यांनी सांगितले की, १६ वर्षां पूर्वी संपादित केलेल्या जमिनीचे पैसे देण्याची प्रक्रिया शासनाने सुरु केली आहे. चळवळीचा विजय होऊ लागला आहे. झगडल्याशिवाय काहीच मिळणार नाही, हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा ५४ वर्षांचा अनुभव आहे. नागनाथ अण्णा म्हणाले, ''वाढीव विजेची बिले पाहून लोकांच्या डोळ्यांतून पाणी येऊ लागले आहे. पोट भरायचे की वीजबिल भरायचे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. काही दिवसांत पश्चिम महाराष्ट्रातून दोन लाख शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार आहे.''

शेती पंपांना ६०० रुपये व ८०० रुपये प्रति हॉर्सपॉवर दरापेक्षा किंवा त्याच प्रमाणातील दरापेक्षा एक पैसाही वीज दरवाढ सहन करणार नाही, घरगुती वापराच्या विजेचे दर आहेत तेवढेच ठेवण्याचा आग्रह धरण्यासाठी नागनाथ अण्णांच्या नेतृत्त्वाखाली विराट मोर्चा कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक २१ जानेवारी २००२ रोजी काढला होता. मोर्चामध्ये सहकारी पाणी पुरवठा संस्था, सेवा संस्था, सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिल्हाधिकारी कार्यालयाचे बाहेरील रस्त्यावर मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. त्यावेळी नागनाथ अण्णा म्हणाले, ''सत्ताधाऱ्यांची नाळच भांडवलशाहीशी जोडलेली आहे. सरकारचे धोरण शेतकऱ्यांचे बाजूने नाही. हे धोरण बदलण्यासाठी जे काही करायला लागेल ते करु. एकजुटीने लढा दिला तर वीज दर वाढीनंतर पाणी, घरफाळा दरवाढीच्या हल्ल्यांनाही परतवून लावू''

विशेष म्हणजे वीज दरवाढीच्या विरोध करणाऱ्या या मोर्चामध्ये वीज मंडळाच्या कामगारांची संघटना सामील झाली होती. वीज दरवाढ विरोधी कृति समितीचे नेते प्रा. एन. डी. पाटील म्हणाले की, आजचा मोर्चा सरकारला इशारा देण्यासाठी आहे. जिल्हाधिकारी व वीज मंडळाचे अधिकारी यांच्या बैठकीत वीज आकारणी बद्दलचे धोरण येत्या फेब्रुवारीचे आत ठरविण्याचे ठरले, त्यापूर्वी मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री, वीज मंडळाचे अध्यक्ष यांची संयुक्त बैठक घेण्याचे प्रयत्न करणेचेही ठरले,पण तसे घडले नाही तर आजच्यापेक्षा मोठा मोर्चा आणण्याचा इशारा शिष्टमंडळाने तेथेच दिला होता.

* * * *

# ३१

## रिपब्लिकन पक्षाच्या खासदारांना सुमो गाडी प्रदान सोहळा

दलितांना न्याय देण्याचा, दलितांच्या संघटनांना हातभार लावण्याचा, दलितांमध्ये आत्मसन्मानाची, स्वाभिमानाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न नागनाथ अण्णांनी संपूर्ण आयुष्यभर केला आहे. दलित संघटनेचा छोटा, मोठा नेता त्यांच्याकडे आला असता त्याला अण्णा प्रेमाने जवळ करतात. आपला मित्र कोण व शत्रू कोण हे उदाहरणे देऊन सांगतात, दलितांच्यासाठी काम करणाऱ्यांना देशातल्या ब्राम्हणी मनुवादी व्यवस्थेने कसे चटके दिले, हे पटवून सांगतात, दलित नेत्यांना त्यांच्या संघटनांना नेहमी मदत ते करीत आले आहेत. दलितांमध्ये संघटनशक्ती वाढावी यासाठी नेहमीच सहकार्य केले आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निर्वाणानंतर रिपब्लिकन पार्टीमध्ये फूट पडली होती हे पाहून नागनाथ अण्णा दुःखी झाले होते. म्हणून नागनाथ अण्णांनी आर. पी. आय. च्या खासदार रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, जोगेंद्र कवाडे, रा. सु. गवई यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न वाळवा येथे एका भव्य कार्यक्रमात केला. नागनाथ अण्णांनी या नेत्यांचे स्वागत करण्यासाठी वेगवेगळे हार न घालता चारीही नेत्यांना एकच भला मोठा हार घालून सत्कार केला. सत्कार करताना 'एकी ठेवा' असे बजावले होते. त्यानंतर मुंबई येथे आर. पी. आय. च्या एकीकरण कार्यक्रमासाठी नागनाथ अण्णांनी सक्रिय सहकार्य करुन पाठिंबा दर्शविला होता.

याच बरोबर आर. पी. आय. च्या कार्यकर्त्यांना त्यांच्या तळागाळातील समाजापर्यंत जाऊन शाहू, आंबेडकर, फुले तत्त्वज्ञान समजावून सांगण्यासाठी वाहनांची व्यवस्था गरजेची होती. ही गरज ओळखून नागनाथ अण्णांनी दिनांक ३०.८.१९९८ रोजी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि., वाळवे यांच्या वतीने 'टाटा सुमो' गाडी देऊन सामाजिक कार्याचा एक मोठा आदर्श घालून दिला होता.



ज्या धर्मांध शक्तीने जाती जमाती निर्माण केल्या, माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारला त्या व्यवस्थेविरुध्द नागनाथ अण्णांनी लढा उभारला आहे, दलितांच्या संघटना आणि चळवळींना सक्रिय पाठिंबा देऊन योग्य ते मार्गदर्शन करुन दलितांमध्ये ऐक्याची जागृती निर्माण करुन अण्णांनी महान राष्ट्रीय कार्य केले आहे व करीत आहेत.

* * * *



मा. नागनाथ (अण्णा) नायकवडी हे
आर. पी. आय. पक्षाचे – मा. खा. रामदास आठवले, मा. खा. जोगेंद्र कवाडे,
मा. ना. पतंगराव कदम, मा. खा. प्रकाश आंबेडकर यांचे स्वागत करताना.



मा. नागनाथ अण्णा नायकवडी – अखिल भारतीय भीमसेन रॅली, नागपूर
येथे भाषण करताना उपस्थित – खा. जोगेंद्र कवाडे

## ३२

# विद्रोही साहित्य संमेलन

औरंगाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी विद्रोही वाङ्मयाबद्दल म्हटले होते की, विद्रोह हा मराठी वाङ्मयीन सर्जनशीलतेचा एक स्थायी भाव आहे व त्याची विविध रंगरुपे मराठी वाङ्मयाच्या इतिहासात परंपरेने वेळोवेळी प्रकट झालेली आहेत. विद्रोहाचे आणि समता, बंधुता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय या लोकशाही मूल्यांच्या प्रतिष्ठापनेचे एक सर्जनशील तत्त्वज्ञान आधुनिक महाराष्ट्राला महात्मा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी दिले. या तत्त्वज्ञानाची ग्राहकता व प्रस्तुतता उत्तरोत्तर अधिकाधिक तीव्रतेने आपणास जाणवत आहे. हे तत्त्वज्ञान ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे तर भारताचीच एक नवी सांस्कृतिक ओळख आहे व भारताच्या सर्वांगीण सांस्कृतिक जडणघडणीची नवी दिशाही आहे. या मानवतावादी व परिवर्तनवादी तत्त्वज्ञानाला मराठी दलित साहित्याच्या जाज्वल्य चळवळीने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मोठीच विश्वसनीयता व अधिमान्यता मिळवून दिली. या साहित्याने मराठी वाङ्मयाचा परीघ व्यापक केला व शेकडो प्रकारच्या दलित-शोषित सर्जनशील स्त्री-पुरुष साहित्यिकांना आत्मविश्वास, आत्मप्रतिष्ठा आणि वाङ्मयीन सांस्कृतिक प्राविण्य प्राप्त करुन दिले.

वरील उद्देश साध्य होण्यासाठी नागनाथ अण्णांनी विद्रोही साहित्य लेखकांना त्यांच्या लेखनकृतीला सक्रिय सहकार्य करुन अशा विद्रोही साहित्य संमेलनास स्वत:ही उपस्थित राहात असतात.

सातारा येथील विद्रोही साहित्याचे ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या 'वैदिकधर्मसूत्रे' आणि 'बहुजनांची गुलामगिरी' या पुस्तकाचे प्रकाशन नागनाथ अण्णा यांच्या हस्ते कोल्हापूर येथे दिनांक ६.९.९८ रोजी संपन्न झाले. त्यावेळी डॉ. आ. ह. साळुंखे म्हणाले,



''गुलाम करणाऱ्यांचा आणि गुलामांचा धर्म एक असू शकत नाही. म्हणून गुलाम करणाऱ्यांचा धर्मग्रंथ फेकून देणे हाच बहुजन समाजाच्या स्वातंत्र्याचा मार्ग आहे. वेदांनी बहुजन समाजावर गुलामगिरी लादली. त्याविरोधात गौतम बुध्दांनी मोठी क्रांती केली. गौतम बुध्दांचे स्वरुप बहुजन समाजाला कळले नाही हे या देशाचे मोठे दुर्दैव आहे. बुध्द कोणासाठी झटले? त्यांनी कोणासाठी आयुष्य खर्ची घातले? हेच लोकांना कळाले नाही. या देशातल्या सर्वसामान्य माणसांसाठी गौतम बुध्द प्रथम उभे राहिले. मात्र शंकराचार्याने त्यांचा पाडाव केला, तो सर्वेक्षण म्हणून आम्हाला शिकवले गेले, गौतम बुध्दांना संपवण्याची प्रक्रिया धर्मसूत्रांनी सुरु केली. अडीच हजार वर्ष 'मनुस्मृती' आपल्या डोक्यावर बसली. बहुजन समाजाच्या चळवळी मोडण्याचे काम या ग्रंथांनी केले. गुलाम करणाऱ्यांचा आणि गुलामांचा धर्म एक असू शकत नाही. आपण श्रध्देच्या मुद्याचा विचार केला पाहिजे, भारतातला माणूस प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवेल, त्या दिवशी भारतीय समाज स्वतंत्र होईल. पुरोगामी चळवळीतूनही माझ्यावर ब्राम्हणद्वेषाचा आरोप होता. आम्हाला कोणाचा द्वेष करायचा नाही. स्वाभिमानाने उभे राहायचे आहे.''

पुस्तकाचे प्रकाशन केल्याचे जाहीर करुन नागनाथ अण्णा म्हणाले, ''गांधीजींची हत्या किंवा बाबरी मशीद पाडणे हे बहुजनांना आव्हान आहे. म्हणून आपल्या विचारांची माणसे वाढविली पाहिजेत.फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणून आपण सांगतो आणि शिवसेना व भाजप राज्य करतात हे दुर्दैव आहे. छत्रपतींचे वारस म्हणून घेणारे त्यांच्याबरोबर गेले. त्यांच्यावर बहिष्कार घातला पाहिजे, किमान निषेध नोंदविला पाहिजे अन्यथा आपल्या बरोबर असल्याचा ते समज करुन घेतील. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या केसाला धक्का लावणाऱ्यांच्या पिढ्या नष्ट केल्या जातील. खरे तर असे वातावरण असता कामा नये. त्यांची सुरक्षा त्यांच्या विचाराच्या प्रसाराची जबाबदारी आपण घेतली पाहिजे.''

या प्रसंगी निळू फुले म्हणाले, ''ब्राह्मण असूनही जी माणसं धर्माविरुध्द लढली, ती बहिष्कृत करण्यात आली. न. र. फाटक, बसवेश्वर, शेजवलकर, कुरुंदकर, विनायकराव कुलकर्णी, द. ग. गोडसे यांचा उल्लेखच होत नाही, लोकमान्य टिळकांचे पुत्र श्रीधरपंत टिळक यांची दखलच घेतली जात नाही. लोकांना वाटते लोकमान्यांच्या नंतर जयंतरावच. पण जयंतरावांच्या वडिलांनी श्रीधरपंतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गायकवाड वाड्यात नेले. 'केसरी' चे ट्रस्टी असलेल्या त्यांच्या मामांनी आंबेडकरांच्या अंगावर लांबून शाल फेकल्या बद्दल त्यांचा निषेध नोंदवला, त्या श्रीधरपंतांना आत्महत्या करावी लागली. ते सतत जेधे-जवळकरांच्या बरोबर असत. माणसे कशी संपवायची ते त्या प्रवृत्तींना चांगले कळते. पण वारे खूप बदललंय. आ. ह. साळुंखे यांच्या अंगाला हात लावण्याची हिम्मत आता कुणात राहिलेली नाही. लोक मला विचारतात साधनेचे संपादक सगळे ब्राह्मण कसे? आंबेडकरांच्या नावाने साताऱ्यात संस्था काम करते पण सगळे विषय वक्ते तेच ठरवितात. फक्त नांव फुले, आंबेडकरांचे. या चलाख्या ओळखल्या पाहिजेत. मशीद तुम्ही तोडायची, हे लांब मुंबईत राहून अभिमान वाटतो म्हणणार. जेलमध्ये आमची पोरं जाणार. सगळे ब्राह्मणी डावपेच समजून घ्यायचे असतील तर डॉ. आ. ह. साळुंखे यांची पुस्तके वाचली पाहिजेत.''

दि. २३ डिसेंबर २००१ रोजी मुरगूड येथे विभागीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणाले, ''संविधान हाच आपला धर्म आहे. काही

प्रस्थापित साहित्य संमेलनात मोडतोड, शिव्याशाप देत आहे तर विद्रोह म्हणजे विध्वंस मोडतोड आहे. अशी एक प्रतिमा आहे. ही एक खोटी प्रतिमा आहे. विद्रोहामुळे प्रस्थापित व्यवस्थेला हादरे बसून ती मोडकळीस येणार आहे. विद्रोह म्हणजे नकार व नकार शोषण व अन्यायाचा आहे. तर नवनिर्माण करण्यासाठी निकोप समाजव्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. बहुजन समाजातील लोक शिल्प निर्माण करणारे आहेत. पण त्या शिल्पांना आकार देण्याचे माहीत नाही. उच्चवर्णीय लोकांनी बहुजन समाजाचे केलेले शोषण मोडून काढण्यासाठी विद्रोहाची आवश्यकता आहे. विद्रोह हा छोट्या मोठ्या गोष्टीत असून स्वत:ला बदलणारा, आनंदाकडे, विकासाकडे नेणारा आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून नागनाथ अण्णा म्हणाले, ''आपण १५० वर्षे गुलामगिरीत होतो, अनेक चळवळी केल्या. पोटासाठी लष्करात गेलो, आझाद हिंद सेनेची सुभाषचंद्र बोस यांनी स्थापना केली म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांची धास्ती घेतली व त्यांचे राज्य गेले व आम्हास स्वातंत्र्य मिळाले. बहुजनांचे दु:ख वेगळे, तर ब्राम्हणवाद्यांचे दु:ख वेगळे आहे. या दु:खातून मुक्त व्हायचे असेल तर ब्राम्हणी संस्कृतीतून मुक्त झाले पाहिजे. महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळ उभी केली म्हणून सर्व संकटांतून मुक्त झालो. अशा प्रकारची विद्रोही चळवळ व्हावी आणि तो दिवस उजाडावा.''

लातूर येथे पहिले सत्यशोधक साहित्य संमेलन दि. २० डिसेंबर २००३ रोजी आयोजित केले होते. तेथे महात्मा जोतिबा फुले यांच्या पूर्णाकृती प्रतिमेचे अनावरण नागनाथ अण्णा यांनी केले. त्या प्रसंगी ते म्हणाले, ''बहुजन समाजाच्या हिताची सत्यशोधक चळवळ जनतेपर्यंत नेण्यात आपण यशस्वी झालो नाही. महात्मा फुलेंच्या या चळवळीचा धागा पुढे न नेणारे आपण गुन्हेगारच आहोत. महात्मा फुले यांची चळवळ राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय देऊन उचलली व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ती पुढे देशपातळीवर नेली. संपूर्ण समाजाने ही चळवळ स्वीकारण्याची गरज आहे. तसा प्रयत्न सत्यशोधक साहित्यिकांनी केला पाहिजे. केवळ शोभेपुरती चळवळ न वापरता खऱ्या अर्थाने बहुजनांची असलेली ही चळवळ बहुजनांपर्यंत पोहोचवावी.''

या संमेलनाचे अध्यक्ष विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे म्हणाले, ''ज्यांच्या जिभा मौन असतात, त्यांचा वाली बनणे ही सत्यशोधक साहित्यिकाची जबाबदारी असून आपण ती समर्थपणे पेलली पाहिजे. प्रतिक्रांती आपल्या अंगणातच नव्हे तर आता आपल्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. ती निर्धाराने रोखण्याची गरज आहे. तसे न झाल्यास प्रतिक्रांतीला सर्वात कमी अवधीमध्ये शरण गेलेली पिढी म्हणून भारतीय इतिहासात आपल्या पिढीची लाजिरवाणी नोंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. सगळा बहुजन समाज स्वत्वाच्या आविष्कारासाठी सज्ज व्हावा म्हणून धडपडणे ही सत्यशोधक साहित्यिकांची जबाबदारी असून अंधाराला फितूर न होण्याची आपण सारेच या संमेलनाच्या निमित्ताने शपथ घेऊ या''

* * * *



# ३३

## भूमिहक्क लढा परिषद, हुतात्मानगर (सोनवडे)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू सहकारी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त लढा परिषद १५ ऑक्टोबर २००१ रोजी हुतात्मानगर सोनवडे येथे क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेशचे नेते प्रतापराव मधाळे यांनी सांगली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात प्रचारसभा घेऊन नियोजित परिषदेची माहिती संबंधितांना दिली होती.

नियोजित भूमिहिनांच्या लढ्याबद्दल सांगताना पुण्याचे माजी महापौर भाऊसाहेब चव्हाण यांनी सांगितले की, दादासाहेबांनी दीन दलित, उपेक्षित समाजघटकांना जगण्याचे हक्क मिळवून देण्यासाठी भूमिहक्काचा संघर्ष केला. त्यांच्या कामाच्या झंझावाताने दलित समाजाच्या प्रश्नांबाबत जागृती निर्माण झाली.त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या कामाची पूर्ती करणेसाठी क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांचे अध्यक्षतेखाली भूमिहिनांचे लढ्याचे रणशिंग फुंकणार आहेत. सोनवडे येथील भूमिहक्क परिषदेत बोलताना नागनाथ अण्णांनी खडसावले की, ''जातीयवाद्यांनी व भांडवलदारांनी सत्तेचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी केला. त्यामुळे भूमी नसणारी सामान्य कष्टकरी जनता आजपर्यंत दारिद्र्यात कुजत पडली आहे.''

सदर परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य हजर होते. तसेच डॉ. भारत पाटणकर, प्रा. डॉ. बाबूराव गुरव, वैभव काका, कॉ. नाना शेटे वगैरेनींही आपले विचार मांडले.

वरील परिषदेमध्ये खालील ठराव सर्वानुमते संमत झाले होते.

**परिषदेतील ठराव असे.**

◆ महार वतनाच्या इनाम वर्ग ६ ब जमिनी बेकायदेशीरपणे हस्तांतरित झाल्या आहेत या

जमिनी संबंधित जमीनधारकांना परत मिळण्यासाठी सरकारने कायदा करावा. आदिवासींच्या जमिनींप्रमाणे त्या विकण्यास व हस्तांतरीत करण्यास मनाई करावी.

- देवस्थानच्या जमिनींचे भूमिहिनांना वाटप करावे.त्यासाठी देवस्थान इनामे रद्द करावीत.
- सरकारी पडिक जमिनी, गायरान जमिनी, वन जमिनी, रेल्वेच्या ताब्यातील जमिनी यांचा अभ्यास करुन त्यापैकी योग्य त्या जमिनींचे भूमिहिनांना वाटप करावे. वरीलपैकी ज्या जमिनी लोक कसत आहेत त्या त्यांच्या नावावर कराव्यात, या संदर्भात शासनाने एका आयोगाची नेमणूक करावी.
- धरणे व इतर प्रकल्पामुळे जे भूमिहीन झाले आहेत त्यांना पर्यायी जमीन मिळाली पाहिजे.
- बेघरांना मोफत जागा दिली पाहिजे.
- पाण्याच्या समान वाटपासाठी शासनाने कायदा करावा. कुटुंब घटक धरुन भूमिहिनांसह सर्व कुटुंबाना पाण्याचे समान वाटप करावे.
- कमाल जमीनधारणा कायदा रद्द करु नये. उलट या कायद्यातील पळवाटा रद्द करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
- आदिवासींची जमीन हस्तांतरणाबाबत घोर फसवणूक होत आहे. ती थांबली पाहिजे. आदिवासी जमीन हस्तांतरण कायद्यातील त्रुटी दूर करुन त्यांच्या जमिनी ताबडतोब त्यांच्या ताब्यात द्याव्यात.
- बेरोजगार तरुणांनी मागणी केल्यावर वनजमिनीचे पट्टे त्यांना भाडेपट्ट्याने मिळावेत व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत वनशेती करण्यासाठी त्यांना आर्थिक मदत करावी.
- भूमिहिनांना शेतजमिनीसाठी पाणी आणि पाणी उपसण्यास लागणारी वीज योग्य दरात मिळावी.
- केंद्र सरकारचा १९८० चा वनसंवर्धन कायदा रद्द करणेत यावा.
- झोपडपट्ट्यांना संरक्षण मिळावे.

पुण्याचे माजी महापौर भाऊसाहेब चव्हाण या परिषदेबद्दल बोलताना म्हणाले की, हुतात्म्यांच्या पावन भूमित भूमिहक्क परिषदेच्या सोहळ्याची सुरुवात होत आहे त्यामुळे ही परिषद यशस्वी होणारच आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर देशावर कोसळलेले आभाळ दादासाहेब गायकवाड यांनी सांभाळले. त्यांनी भूमिहक्क परिषदेची सुरुवात केली त्यांचा लढा गोरगरिबांसाठी होता. त्यांनी उपेक्षितांचे प्रश्न सोडविले.

समाजामध्ये ज्या ज्या ठिकाणी उपेक्षितांवर, दलितांवर, अल्पसंख्यकांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आले बरोबर तो अन्याय दूर करणेसाठी नागनाथ अण्णा नेहमीच पुढाकार घेत होते व घेत आहेत. दलितांच्या भूमिहक्क परिषदेचे अध्यक्षपद याच उद्देशाने स्वीकारले असावे.

भूमिहक्क परिषदेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना दिनांक २६ मे २००२ रोजी नागनाथ अण्णा म्हणाले, ''पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. जनावरे, मुले कुपोषणाने मृत्युमुखी पडत आहेत. त्यास जातीयवादी पक्ष बळकटी देत आहेत. जातीयवादी संघटना बहुजनांच्या विरोधात पुन्हा सक्रिय काम करीत आहेत. त्यांच्या विरोधात भूमिहीन कष्टकऱ्यांनी लढा उभा केला पाहिजे. राज्यात नाव नोंदणी झालेले ४४ लाख तरुण बेरोजगार आहेत. कायदा निरुपयोगी झाला आहे. कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा भ्रष्ट आहे. कायदा तकलादू झाल्यामुळे



जमिनी मिळत नाहीत. सरकारी मदतीचे आक्रमण होत आहे. त्यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात खेडोपाडी राबणारा कष्टकरी वर्ग झोपडपट्ट्यातच राहील. थोडीफार जमीन असणारी विकावयास काढतील व ते भूमिहीन होतील. भूमिहिनांच्या हक्कांसाठी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी लढा उभा केला पाहिजे. केंद्र सरकार वीज दर, पाणी दर, उसावरील आयकर यांच्या रुपाने गोरगरीब सामान्य कष्टकऱ्यांना पिळून काढत आहेत. त्यांना एकजुटीने विरोध केला पाहिजे तरच सामान्य माणसांना न्याय मिळेल.''

या प्रसंगी डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, ''गरिबांच्या व भूमिहिनांच्या हक्कासाठी लढणारी चळवळ कर्मवीर दादासाहेबांनी चालविली. आज हा प्रश्न गंभीर बनला आहे. त्याची चर्चा होत नाही. जमीन पडीक पाडण्याचा अधिकार कोणालाच नाही. पडीक जमीन आणि राबणारे हात यांची सांगड घालण्याचा प्रयत्न दादासाहेब गायकवाड यांनी केला. महार वतनाच्या जमिनी बिगर महार वतनी लोकांकडे गेल्या आहेत.''

डॉ. भारत पाटणकर म्हणाले, ''सरकार सामान्य माणसाचे आधार असणारे वारा, सूर्य, पाणी ताब्यात घेऊ पाहतंय ते आम्ही घेऊ देणार नाही. गच्चीवर शेती करणे शक्य आहे पण पडीक व गायरान जमिनी करणेसाठी देणे काय अवघड आहे? भांडवलदारांची व जातीयवाद्यांची हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी चळवळ केली पाहिजे.''

भूमिहिनांच्या वतीने पिढ्यान पिढ्या कसल्या जाणाऱ्या जंगल जमिनी, महार वतने, इनाम जमिनी, गायरान जमिनी व सर्व भूमिहिनांच्या जमिनी हक्कासाठी कृती समितीच्या वतीने १० ऑक्टोबर २००२ रोजी सकाळी मंत्रालयावर विराट मोर्चा आयोजित केल्याचे कष्टकरी, शेतकरी संघटनेचे नेते नागनाथ अण्णा यांनी दिनांक ७ ऑक्टोबर २००२ रोजी सांगितले. विद्यमान आघाडी सरकारकडून शासनाच्या किमान समान कार्यक्रमातील कलम १८ च्या प्रभावी अमंलबजावणीची भूमिहिनांना अपेक्षा होती पण ती अंमलबजावणी झालीच नाही. त्याबाबत विराट मोर्चाने जाऊन अंमलबजावणीचा आग्रह भूमिहक्क समिती धरणार आहे. पिढ्यानपिढ्या कसल्या जाणाऱ्या जंगल जमिनीवर अजूनही आदिवासी व बिगर आदिवासीचा अधिकार नाही. अजूनही महार वतने, इनाम गायरान, जमिनीवर अनेकांना हक्कच मिळाले नाहीत. भूमिहिनांना जमिनीचे वाटप झालेच पाहिजे. यासाठी आम्ही शिवाजी पार्क ते मंत्रालय विराट मोर्चाचे आयोजन केले आहे.

वरील मोर्चासाठी शेतमजूर - शेतकरी कष्टकरी संघटना, श्रमिक क्रांती संघटना, आदिवासी एकता व जमीन हक्क कृति समिती, पुनर्वसन आंदोलन, सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा, मानवी हक्क अभियान, महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद, नर्मदा बचाव आंदोलन अशा ३५ संघटनेचे कार्यकर्ते या मोर्चात सामील होणार आहेत.

योजिले प्रमाणे दिनांक १० ऑक्टोबर २००२ रोजी शिवाजी पार्क ते मंत्रालयापर्यंत भूमिहक्क परिषदेच्या मागण्या मान्य करण्यास पाठिंबा देण्यासाठी हजारोंचा विराट मोर्चा काढला होता आणि शासनास भूमिहक्क परिषदेच्या मागण्या देण्यात आल्या. त्याचा शासनाने गंभीरपणे विचार करणेचे आश्वासन दिले.

आजपर्यंत भूमिहीन दलितांचे प्रश्न सुटल्याचे दिसून येत नाही. अजून अशा तऱ्हेचे मोर्चे किती काढावे लागतील?

* * * *

## ३४

# साखर कारखान्यावरील आयकर विरोध लढा

सन १९५०-५२ मध्ये भारतात प्रथमच अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे नेतृत्त्वाखाली (लोणी) प्रवरानगर येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा पहिला सहकारी साखर कारखाना सुरु झाला. त्याचे उद्‌घाटन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांनी केले होते. या उपक्रमाचा उद्देश एकच होता की, ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाला किफायतशीर भाव मिळावा.

त्यानंतर १९६० साली महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी प्रवरानगर येथील प्रयोग आदर्श ठेवून महाराष्ट्रात फक्त ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या सहकारी साखर कारखान्यालाच परवानगी देण्याचे धोरण घेतले. त्याचवेळी देशभरच्या ऊसकरी शेतकऱ्याची संघटना व आंदोलनामुळे केंद्र सरकारच्या कृषी खात्याने शेतकऱ्यांना उसाचा किमान भाव खाजगी व सहकारी कारखान्यांनी दिलाच पाहिजे असे धोरण घेतले. त्यानुसार केंद्र सरकार दरवर्षी उसाला कारखान्यांनी द्यायचा किमान भाव जाहीर करते. ते सर्व खाजगी व सहकारी कारखान्यांवर शेतकऱ्यांना तो भाव देण्याचे बंधन आहे.

सहकारी साखर कारखाने मुळातच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे असल्याने व ते वेगळ्या नफ्यासाठी नसलेने साखर विकून येणाऱ्या रकमेतील उत्पादन, व्यवस्थापन व इतर खर्च वजा जाता उरणाऱ्या सर्व रकमेतून ते दरवर्षी शेतकऱ्याला दिला जाणारा उसाचा भाव जाहीर करतात. तो अर्थातच केंद्राने ठरविलेल्या उसाच्या किमान भावापेक्षा बराच अधिक असतो. उद्देश असा असतो की, शेतीमालाचा शेतकऱ्याला जास्तीत जास्त किफायतशीर भाव मिळावा व त्याची पूर्तता सहकारी साखर कारखाने करीत असतात.

या पार्श्वभूमीवर सन २०००-२००१ या वर्षी केंद्र सरकारच्या आयकर खात्याने अशी भूमिका घेतली की, केंद्र सरकार उसाचा जो भाव ठरवते तोच सहकारी साखर कारखान्यांनी



दिल्यावर, साखर विक्रीतून उत्पादन, व्यवस्थापन व इतर खर्च वगळून जी रक्कम राहील ती या सहकारी कारखान्याचा नफा समजून त्यावर आयकराची आकारणी केली जावी. नफ्यासाठी चालवलेल्या खाजगी कारखान्यांना हे तत्त्व ठीक आहे. पण हजारो ऊस उत्पादक शेतकरीच ज्याचे मालक आहेत त्या सहकारी साखर कारखान्यांना लागू करणे म्हणजे शेतकरी उत्पादकाला उसाचा किफायतशीर भाव मिळावा, या मूळ उद्देशावर वज्राघातच होता.

या केंद्र सरकारच्या निर्णयामागे राजकीय हेतू होता. भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारच्या सहकारी साखर कारखानदारीच्या विरोधातील भूमिकेचाच एक भाग होता. कारण महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग काँग्रेसच्या नेत्यांच्या हातात होता. त्यावर उपाय म्हणून पहिला आघात म्हणजे महाराष्ट्रात खाजगी साखर कारखान्यावर असलेली बंदी उठवून खाजगी कारखान्यांना परवानगी देण्याचे धोरण सुरु केले. त्याचा उद्देश महाराष्ट्रातील ही शेतकरी सहकारी साखर कारखानदारी मोडकळीस आणणे, जेणेकरुन महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची शुगर लॉबी मोडीत निघावी, हाच भाजपचा उद्देश आहे.

वास्तविक केंद्र सरकारला सहकारी साखर कारखाने एक्साईज कराच्या रुपाने दरसाल कोट्यावधी रुपये देत आहे ते डोळ्याआड करुन केंद्राला राष्ट्रीय तूट भरुन काढण्यासाठी सहकारी साखर उद्योगावर आयकर बसवून कोट्यावधी रुपयाची लूट न्यावयाची आहे. याच काळात केंद्र सरकारने परदेशातून साखर आयात केल्यामुळे सहकारी साखर कारखान्यांकडे हजारो पोती साखर गोदामात पडून होती. त्यावर बँकांचे व्याज भरावे लागत होते. अशा बिकट परिस्थितीत सहकारी साखर कारखाने आर्थिक कोंडीत सापडले असताना केंद्राने आयकर बसविण्याचा निंदनीय निर्णय घेतला होता.

ब्रिटिश सत्तेला हादरा देणाऱ्या क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या हुतात्मा सहकारी साखर कारखान्याला सुध्दा आयकराची नोटीस मिळाली. लगेच नागनाथ अण्णांनी आयकरास विरोध करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारांच्या प्रतिनिधीचीं कोल्हापुरात बैठक घेतली त्यावेळी ते म्हणाले, ''आज साखर कारखाने सार्वत्रिकपणे बंद पडावेत, असा दुष्ट हेतू मनात धरुन केंद्र सरकारने साखर कारखानदारीवर आयकर लादून तो सक्तीने वसूल करण्याचा घाट घातला आहे. स्वत:च्या उसाची सहकारी पध्दतीने साखर काढून सुखाने जगता यावे हा उद्देश होता. शेतकऱ्यांनी सहकारी कारखाने काढले ते नफा मिळवून गब्बर होण्याचे उद्योग नव्हेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आयकर भरणार नाही. एक नवा पैसाही भरणार नाही. अशी ठाम भूमिका घेऊनच सर्व सहकारी साखर कारखान्यांनी ठामपणे उभे राहिले पाहिजे.''

तेवढ्यात पुणे जिल्ह्यातील काही सहकारी साखर कारखान्यांना आयकर नोटिसा बजावून त्यांची बँकेतील खाती गोठविल्यामुळे आंदोलन चिघळले, त्यामुळे महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी पूर्णपणे बंद होईल, अशी परिस्थिती झाली. वाटाघाटी करुन आयकराच्या प्रश्नावर तोडगा काढावा, अशी मागणी केली होती.

दि.११ सप्टेंबर २००० रोजी झालेल्या कोल्हापूर येथील बैठकीत नागनाथ अण्णांनी जाहीर केले की सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षांनी आयकर नोटिशीची जाहीरपणे होळी करुन जाळावी, संघटितपणे विरोध करावा. तसेच असे ठरले की आयकर न भरण्याचे ठराव सहकारी साखर कारखान्याच्या विशेष सर्व साधारण सभेत मंजूर करावेत. त्यानंतर आयकर आकारणी विरुध्द सामुदायिकरीत्या तुफानी रणशिंग फुंकले जाईल.

जखमेवर मीठ चोळावे, असा उद्योग केंद्रीय अवजड उद्योगमंत्री ना. मनोहर जोशी यांनी कोल्हापूर येथे दिनांक २४.९.२००० रोजी बोलताना केला होता. ते म्हणाले, ''अनेक वर्षे नफा कमविणाऱ्या साखर कारखान्यांना आयकर लागू करण्यास हरकत नाही. मात्र त्याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसू नये. याच बरोबर शिवसेना नेते नारायण राणे यांनी म्हटले होते की, साखर कारखान्यांना आयकर लागू करण्याचे धोरण योग्यच आहे.''

नागनाथ अण्णांनी वरील पार्श्वभूमीवर दि. २८.९.२००० रोजी कोल्हापूर येथील सहकारी साखर कारखानदारांच्या बैठकीत सांगितले की, ''ब्रिटिश सरकार विरुध्द दिलेला लढा आठवा आणि केवळ सहकारी साखर कारखानदारीतच नव्हे तर एकूणच शेती क्षेत्र वाचविण्यासाठी आयकर विरोधीच्या लढ्यात संघर्ष करण्याचा निर्धार केला आहे. तसेच काही नेते दिल्लीत शिष्टमंडळ नेमून तडजोड करतील तर त्यालाही मान्यता देऊ नये. सहकारी साखर कारखाने एक पैसाही आयकर देणार नाहीत.'' उपस्थित सहकारी कारखान्यांनी वरील आव्हानास ठरावान्वये पाठिंबा दिला होता. त्याचा परिणाम असा झाला की केंद्राने सहकारी साखर कारखान्यांकडे आयकराच्या पाठविलेल्या नोटीसा परत घेतल्या. अर्थात ही तात्पुरती मलमपट्टी होती. आयकराची टांगती तलवार बाजूला झाली नव्हती.

म्हणून ३०.१०.२००० रोजी नागनाथ अण्णांनी विद्याभवन शिवाजी पार्क कोल्हापूर येथे जाहीर केले की, 'सहकारी साखर कारखान्यावरील आयकर वसुलीस स्थगिती मिळाली म्हणून संकट संपलं असे समजून समाधान मानून बसणे धोक्याचे ठरेल. जोवर आयकर आकारणीचे धोरण संपूर्णपणे रद्द होत नाही तोवर शेतकरी गप्प बसणार नाहीत. स्थगितीला न भुलता सहकारी कारखान्यांनी आयकर रद्द होईपर्यंत संघर्ष करावा.'

नंतर दिनांक ९.६.२००१ रोजी नागनाथ अण्णांनी कोल्हापूर येथील बैठकीत जाहीर केले की जोपर्यंत सहकारी साखर कारखान्यावरील आयकराची आकारणी रद्द होत नाही तोपर्यंत कोल्हापूर, सांगली, व सातारा जिल्ह्यात केंद्रीय मंत्र्यांचे कार्यक्रम हाणून पाडावेत. त्या उद्देशाने एक समितीही स्थापन केली त्यानंतर दिनांक २३.१.२००१ रोजी सहकारी साखर कारखान्यांचे वतीने एक निवेदन सर्वानुमते प्रसिध्द करण्यात आले. त्यात म्हटले होते की, 'साखर कारखाने बंद पडावेत, असा हेतू ठेवूनच केंद्राने सहकारी साखर कारखान्यावर आयकर लादण्याचा प्रयत्न केला आहे. उसावर प्रक्रिया करण्यासाठी सहकारी कारखाने उभे राहिले ते नफा कमवून गब्बर होण्याचे उद्योग नव्हते. त्यामुळे सहकारी साखर कारखाने एक पैसाही आयकर भरणार नाहीत, हीच भूमिका घ्यावे लागेल. सहकारी उद्योगावर आयकर बसविणे, हा शेतकऱ्यांच्या मानेभोवती फास आवळण्याचा प्रकार असल्याने त्यात तडजोड करता येणार नाही. आयकर विरोधात सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या प्रकरणाचा निकाल काहीही लागला तरी महाराष्ट्रातल्या सहकारी साखर कारखान्यांना आयकर भरणेच मान्य नाही. अशी भूमिका घेऊन केंद्र सरकारला आयकर कायद्यात बदल करणे भाग पाडावे यासाठी तीव्र आंदोलनाची गरज आहे. तसेच आयकराबरोबरच उसावरील खरेदी कर, वाढविलेला अबकारी कर, विक्री कर या कपाती रद्द करण्यास शासनास भाग पाडावे यासाठी सर्व सहकारी साखर कारखान्यांनी सहभागी व्हावे.'

याच काळामध्ये सातारा जिल्ह्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी किसन वीर यांच्या कवठे गावी ९६ व्या जयंती समारंभात बोलताना नागनाथ अण्णांनी किसन वीरांच्या बद्दल गौरवोद्गार काढले होते. ते म्हणाले, ''यशवंतराव चव्हाणांचे राजकारण यशस्वी करण्यासाठी आबासाहेब वीर यांनी आपले अर्ध्याहून अधिक आयुष्य खर्ची घातले. प्रतिसरकारचा विषय जेव्हा लंडनच्या



पार्लमेंटमध्ये चर्चिला गेला तोही आबासाहेबांच्यामुळेच. तसेच सातारा जिल्ह्याच्या विकासाचा पायाही आबासाहेब वीर आणि यशवंतराव चव्हाण यांनीच घातला. धोम धरण पूर्ण करण्याकरिता पर्यायाने हा परिसर सुजलाम सुफलाम करण्याकरिता त्याचप्रमाणे साखर कारखान्याची निर्मिती करण्याकरिता आबासाहेबांनी अफाट कष्ट घेतले. साखर कारखान्यामुळे हा परिसर विकसित झाला आहे.''

''साखर कारखाने उद्ध्वस्त करण्याकरिता प्रतिगाम्यांचे राजकारण चालू आहे. साखर कारखान्यावर जो आयकर लादला आहे तो अन्यायकारक आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातून कोट्यावधी रुपयांची आयकराची मागणी साखर कारखान्यांकडून केली आहे. असा आयकर भरला तर आपण शेतकऱ्यांना चांगला भाव कसा देणार? २० ऑगस्ट २००१ च्या अजिंक्यतारा कारखान्यावरच्या बैठकीस सर्वांनी यावे आणि आबांच्या ९६ व्या जयंतीदिनी निर्धार करुया की आयकर अजिबात भरावयाचा नाही.''

याच कारणाकरिता हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याच्या दि. २९.९.२००१ च्या विशेष सर्वसाधारण सभेत ठराव सर्वानुमते पास केला की, सहकारी कारखानदारीवर आयकर लादण्याचे केंद्राचे धोरण हुतात्मा साखर कारखान्याच्या सभासदांना अजिबात मान्य नसून एक नवा पैसाही आयकर म्हणून हुतात्मा कारखान्याचे सभासद भरणार नाही. प्रसंगी ब्रिटीश सत्तेप्रमाणेच भाजप सरकारशी संघर्ष करण्यास सभासद तयार आहेत. याच सभेत नागनाथ अण्णांनी केंद्र सरकारवर जळजळीत टीका करताना म्हणाले की, केंद्र सरकारची साखर कारखानदारीबद्दल आकसाची प्रवृत्ती आहे. पण त्यांनी लक्षात ठेवावं की ब्रिटीश महासत्तेशी झुंज देणारी ही जनता आहे. हुतात्मा साखर कारखान्याने रणशिंग फुंकले आहे. त्यामुळे केंद्र सरकारबरोबरची लढाई सुरु झाली आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर आदी जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी सभासदांच्या हितासाठी या लढ्यात सहभागी व्हावे. महाराष्ट्रातील साखर संघाचे पुढारी तसेच साखर धंद्यांशी संबंधित राजकीय पुढारी, केंद्र सरकारशी संपर्क साधून काहीतरी सवलत आणण्याचा धोका लक्षात घेऊन सर्वांनी जागृत राहून एक पैसाही आयकर भरणार नाही या निर्णयाशी ठाम राहावे.

त्यानंतर दिनांक १९.८.२००१ रोजी केंद्रीय वित्त राज्यमंत्री बाळासाहेब विखे पाटील सांगलीच्या एका कार्यक्रमासाठी येणार होते. त्यांच्यापुढे निदर्शने करुन आयकरास विरोध करण्यासाठी नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली विराट मोर्चा व रस्ता रोको आंदोलन करणेसाठी जात असताना पोलिसांनी सांगलीवाडीत मोर्चा अडविला. तेवढ्यात कळालं की ना. विखेपाटील इस्लामपूरहून हातकणंगले मार्गाने सांगलीत गेले आहेत. त्यामुळे मोर्चातील लोक खवळले व पुढे सांगलीत जाऊ लागले. त्यावेळी पोलिस व मोर्चातील लोकांची झटापट झाली. पोलिसांनी लाठीमार केला, नागनाथ अण्णांना धक्काबुक्की झाल्यावर लोक खवळले. हे सांगलीत ना. विखे पाटील यांना कळालेवर कार्यक्रम अर्ध्यावर सोडून त्यांनी मोर्चापुढे येऊन नागनाथ अण्णांची माफी मागितली व निवेदन स्वीकारले आणि ऊसावरील आयकर रद्द करण्यात येईल असे आश्वासनही त्यावेळी दिले. ना. विखे पाटील यांनी क्रांतिवीर नागनाथ अण्णांसारख्या स्वातंत्र्य सेनानीला झालेली धक्काबुक्की आणि शांततेने निवेदन देणाऱ्या निदर्शकांवर झालेल्या लाठीहल्ल्याबद्दल खेद व्यक्त केला. त्यांनी पत्रकार परिषदेतही जाहीर केले की, शेतकऱ्यांना भविष्यात कोणताही प्राप्तीकर नाही.

या लाठीहल्ल्यास कारणीभूत झालेल्या पोलिस अधिकारी श्री. पांढरे याचेवर कारवाई

करुन बडतर्फ, करण्यासाठी सांगली, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी सभा घेण्यात आल्या होत्या.

सांगलीच्या वसंतदादा सहकारी साखर कारखान्यामध्ये साखर कारखान्याच्या प्रतिनिधींच्या दिनांक ३०.७.२००१ च्या बैठकीत बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले होते की, वसंतदादा जर हयात असते तर या लढ्यात आम्ही दोघांनी हातात हात घालून पुढाकार घेतला असता. कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांनी लहान वयात या लढ्यात जोमाने सहभागी होऊन खऱ्या अर्थाने वसंतदादांचा वारसा चालवला आहे. त्यांची प्रेरणा सर्वांनी घेतली पाहिजे. ती घेतली तरच आपण या लढ्यात यशस्वी होऊ. हुतात्मा कारखान्याच्या स्थापनेसाठी वसंतदादांनी प्रयत्न केले आहेत.

अशाच कारणासाठी अजिंक्यतारा साखर कारखाना सातारा येथेही आयकर विरोधी मत व्यक्त करुन केंद्र शासनाचा व सांगली येथे पोलिसांनी केलेल्या लाठीमाराचा निषेध व्यक्त करण्यात आला होता. आयकर हा एक प्रकारचा जिझिया कर आहे, तो रद्द करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने एकसंघ प्रयत्न करण्यासाठी सर्व साखर कारखान्यांनी सहयोग द्यावा असे ठरले.

दिनांक २७.८.२००१ रोजी नागनाथ अण्णांनी वाळवा येथे कार्यकर्त्यांची बैठक घेतली होती. त्यावेळी ते म्हणाले की, ३० सप्टेंबरला कोल्हापूर येथे होणाऱ्या आयकर विरोधी परिषदेस लाखोंनी हजर राहावे. आयकर विरोधी परिषदेला सर्व स्तरातील उपस्थिती गरजेची आहे. मोठे शक्तिप्रदर्शन करुन त्याचा धक्का केंद्र सरकारला बसविण्याचा तो प्रयत्न आहे. आयकर हा कारखान्यावर नाही तर त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांवर होणार आहे. कारण जो कारखाना आयकर भरेल तो ऊसाला योग्य दर देऊच शकणार नाही. आयकर विरोधी चळवळीला सांगलीत पोलिसांनी जी वागणूक दिली ती निषेधार्ह तर आहेच, मात्र त्यामागे मोठे राजकारण असू शकते. हे आंदोलन मोडून काढण्याचा हेतू सामान्य शेतकरी, कष्टकरी कधीच यशस्वी होऊ देणार नाही.

आयकर विरोधी सहकारी साखर कारखान्यांची कृति समिती आणि शेतमजूर, कष्टकरी–शेतकरी संघटनेच्या वतीने आयकर धोरणाविरोधी ऊस उत्पादक शेतकऱ्याचा व साखर कामगाराचा निर्धार लढा परिषद दिनांक ३० सप्टेंबर २००१ रोजी गांधी मैदान, कोल्हापूर येथे नागनाथ अण्णांनी आयोजित केली होती. त्यास सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील साखर उद्योगातील कामगारांनी व शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला होता. हजारो शेतकरी व कामगार उपस्थित होते. त्यावेळी नागनाथ अण्णांनी निर्धार लढा हा केंद्र सरकारचे आयकर वसुलीचे धोरण हाणून पाडण्यासाठी, ऊसदरातील प्रति टनी २०० रुपयाची कपात रोखण्यासाठी सहकारी साखर कारखानदारी व साखर उद्योग वाचविण्यासाठी ऊसकरी शेतकरी आणि साखर कामगारांचे संसार उद्ध्वस्त होऊ नयेत म्हणून ही परिषद घेतली आहे असे सांगितले.

आटपाडी येथे केंद्रीय मंत्री राम नाईक दिनांक ५ ऑक्टोबर २००१ रोजी त्यांच्या सत्कार समारंभासाठी आले होते. हे कळताच नागनाथ अण्णांचे नेतृत्वाखाली आयकर विरोधी कार्यकर्त्यांनी त्यांच्या समोर निदर्शने करुन निवेदन दिले. निदर्शकांसमोर ना. राम नाईक यांनी सांगितले की, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी जी भूमिका स्पष्ट केली आहे तिचे मी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांचेकडे समर्थन करीन. याबाबतचे सविस्तर निवेदन आपणास द्यावे. ते मी मंत्रिमंडळाच्या १२ ऑक्टोबरच्या बैठकीत मांडतो.



तसेच लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबतच्या सूचना करण्याचे आश्वासन देतो. कष्टकरी, शेतकरी अडचणीत यावा अशी भूमिका घेतली जाणार नाही. तसेच कृषि प्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांना विरोध करणारे कोणतेही सरकार टिकणार नाही. या प्रश्नाचा व्यक्तिगत पातळीवर सर्व ताकदीनिशी मी पाठपुरावा करीन.

असे ठाम आश्वासन केंद्रीय मंत्री राम नाईक यांनी दिल्यामुळे नागनाथ अण्णा यांनी आयकर विरोधी आंदोलन मागे घेत असल्याची त्याच ठिकाणी घोषणा केली. नागनाथ अण्णांनी ब्रिटीश सरकारला नमविले होते. तसेच स्वदेशातील सरकारला जुलमी व अन्यायी निर्णय मागे घेण्यास भाग पाडले होते. शेतकऱ्यांच्या न्याय्य मागणीचा विजय नागनाथ अण्णांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळेच झाला होता. त्याचा फायदा महाराष्ट्रातील सर्व सहकारी साखर कारखान्याला ऊस पुरविणाऱ्या लाखो शेतकऱ्यांना होणार आहे.

* * * *



ता. १९ ऑगस्ट २००१ रोजी
आयकर विरोधी साखर कारखान्याची कृती समिती आणि शेतमजूर, कष्टकरी–शेतकरी संघटनेच्या वतीने केंद्र सरकारच्या अन्यायकारक आयकर धोरणा विरोधी निदर्शने करत असताना निदर्शकांच्या वरती सांगली येथे पोलीस अधिकारी पांढरे यांनी केलेल्या लाठीमारास प्रतिकार करत असताना मा. नागनाथ अण्णा नायकवडी

## ३५

# हुतात्मा दैनिक

क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांचेकडे अनेक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक चळवळींचे नेतृत्व अन्याय झालेल्या जनतेने दिले होते. शेतकरी व शेतमजूर संघटना, विद्यार्थी संघटना, धरणग्रस्त संघटना, सातारा, सोलापूर, सांगली जिल्ह्यातील १३ दुष्काळी तालुक्यांची पाणी परिषद वगैरे संघटनांचे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळी, जागृती, मोर्चे, ठिय्या आंदोलने सुरु करणेस नागनाथ अण्णांनी पुढाकार घेतला होता.

या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत होती, त्या कार्याची माहिती आंदोलनात भाग घेणाऱ्यांना व त्यास पाठिंबा देणाऱ्यांना होण्यासाठी स्वतंत्र दैनिकाची गरज असल्याचे अण्णांच्या अनेक कार्यकर्त्यांचे व नागनाथ अण्णांचे म्हणणे होते. त्या विषयाबद्दलची चर्चा अनेक कार्यकर्त्यांबरोबर अण्णांनी केली. दैनिक सुरु करण्यास लागणाऱ्या निधीचाही विचार झाला होता. तो निधी सहकारी संस्था द्वारे सदस्य वर्गणीतून करण्यास कार्यकत्यांनी मान्यता दिल्यावर मग नियोजित दैनिकास ''हुतात्मा'' हे नाव देण्याचे सर्वानुमते ठरले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने ब्रिटीशांनी भारतातून जाण्यासाठी आठ ऑगस्ट १९४२ हा दिवस ठरवून मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी ब्रिटिशांनो (चालते व्हा) चले जाव हा ऐतिहासिक ठराव मांडला व त्यानंतर १९४२ चा स्वातंत्र्यलढा कार्यकर्त्यांनी लढवला. व १९४७ साली १५ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळाले.

नागनाथ अण्णांनी नियोजित हुतात्मा दैनिकाचा विचार सातारा येथे ८ ऑगस्ट २००१ रोजी जाहीरपणे मांडण्याचे ठरविले होते. त्या दिवशी त्यांचा सत्कार आयोजित केला होता.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांना ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार



सातारा येथील शाहू कला मंदिरामध्ये डॉ. भारत पाटणकर यांचे अध्यक्षतेखाली साताराच्या प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने व धरणग्रस्तांचे वतीने दिनांक ८.८.२००१ रोजी आयोजित केला होता. त्या प्रसंगी विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते नागनाथ अण्णांचा सत्कार कॉ. धैर्यशील पाटील, प्राचार्य आर. डी. गायकवाड, ॲड. केशवराव पाटील, गणपतराव साळुंखे, लक्ष्मण माने यांच्या उपस्थितीत पार पडला होता.

सत्काराला उत्तर देताना क्रांतिवीर नागनाथ अण्णा म्हणाले, ''फुले–शाहू–आंबेडकर यांच्या विचाराचे दैनिक महाराष्ट्रात नाही, ही बहुजन समाजाची उणीव आहे. ती भरुन काढण्यासाठी सहकार तत्त्वावर ''हुतात्मा'' दैनिक काढणार आहे. हे दैनिक सर्वांना आपले वाटले पाहिजे, यासाठी दैनिकाच्या भागाची किंमत केवळ रुपये दहा ठेवली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचा आवाज या दैनिकातून उठणार आहे. भाजी विक्रेत्या महिला, कामगार, शेतकरी, शेतमजूर या सर्वांना या दैनिकाचे भागधारक करुन घेण्यात येणार आहे. या दैनिकाचे कितीही शेअर्स घेतले तरी त्याला फक्त एक मताचा अधिकार राहणार आहे. एक सामाजिक काम म्हणून प्रत्येकाने मदत करावी.''

अध्यक्षीय भाषणात डॉ. भारत पाटणकर म्हणाले, ''क्रांतीचा विचार पेरणारे लोक कमी आहेत. त्यामधील अण्णा असल्याने हा सत्कार महत्त्वाचा आहे. शासन काय ठरविते यापेक्षा धरणग्रस्तांचे विषयी सरकार काय ठरवते याची दखल घेतली गेली पाहिजे. शासनाच्या अधिकाऱ्यांच्या घरांची ज्या पध्दतीने कॉलनी असते त्याप्रमाणे धरणग्रस्तांची कॉलनी उभी रहावी, स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे धरणग्रस्तांनाही सवलती मिळाव्यात अशी अण्णांची इच्छा आहे. कुठलेही काम पूर्ण होईपर्यंत ते शांत बसत नाहीत.''

कॉ. ॲड. डी.व्ही. पाटील म्हणाले, ''८ ऑगस्टला गांधीजींनी 'चले जाव' ची सुरवात केली. त्यामुळे त्या दिवसाला खूप महत्त्व आहे. ज्या प्रकारचे स्वातंत्र्य अभिप्रेत होते ते मिळाले नसल्याची खंत प्रत्येक क्रांतिवीराला आजही आहे. चळवळीमागचं दुखणं काय आहे हे पाहिले पाहिजे. आपल्यामधीलच काही मंडळी आपल्या विरोधात जाणार आहेत. त्यामुळे धरणग्रस्तांनी संघर्षासाठी तयार रहावे. अण्णांनी स्वत:च्या जीवनातून संघर्ष दाखवून दिला. प्रसंगी हत्यार घेऊन न्यायासाठी उभे राहावे लागते. हे त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात दाखवून दिले आहे. सर्वसामान्य जनता इतिहास घडवत असते. परंतु त्याला वळण देण्याचे काम नेता करतो. तो नेता खंबीर असणे महत्त्वाचे असते व ती खंबीरता अण्णांमध्ये आहे.''

या प्रसंगी सातारा जिल्ह्यातील धरणग्रस्तांनी हुतात्मा दैनिकासाठी ३२ हजार ४८९ रुपयाचा निधी जमा केल्याचे डॉ. भारत पाटणकर यांनी सांगीतले.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी आपल्या अनेक सहकारी कार्यकर्त्यांच्या चर्चेतून हुतात्मा दैनिकासाठी ९ कोटी रुपयांची योजना तयार केली आहे. हुतात्मा दैनिकाचे कार्यालय कोल्हापूर व सांगली येथे राहणार आहे.

नागनाथ अण्णा नियोजित 'हुतात्मा' दैनिकासंबंधी अधिक माहिती देताना म्हणाले,

''देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे उलटली तरी राज्यकर्त्यांना शेतीच्या पाण्याचा आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविता आला नाही. हुतात्मा दैनिकाच्या माध्यमातून पाणी प्रश्नासाठी संघर्ष करण्याचा विचार आहे. सर्वसामान्य जनतेच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी हुतात्मा दैनिक काम करील.''

नागनाथ अण्णांच्या नियोजित दैनिकास जनतेतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेबरोबरच शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी 'हुतात्मा' दैनिकाकडून मोठी कामगिरी होईल अशी अपेक्षा केली जात आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांनी केलेल्या प्रगतीची हुतात्मा दैनिकाकडून दखल घेतली जाईल असा लोकांना विश्वास वाटत आहे.

स्वातंत्र्यपुर्व काळात नागनाथ अण्णांनी इस्लामपूर येथे 'गावराज्य' नावाने साप्ताहिक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सोय करुन ते चालवून दाखविले होते. आचार्य जावडेकर यांचे सहकार्य मिळाले होते. त्या उपक्रमातील उणिवा व अनुभव लक्षात घेऊन हुतात्मा दैनिक सुरु करण्याचा संकल्प नागनाथ अण्णांनी केला आहे व त्यास सर्वांकडून पाठिंबा मिळत आहे. लोकांच्या, लोकांनी चालविलेल्या, लोकांच्या लढ्यासाठी आजच्या युगामध्ये प्रसिध्दी माध्यम असणे गरजेचे होऊन बसले आहे म्हणून अण्णांनी हुतात्मा दैनिकाचा उपक्रम हाती घेतला आहे.

* * * *



# ३६

## ८० वा वाढदिवस, वाळवा.
## (अ)
## मा. अण्णांचे मनोगत

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी आपल्या ७९ वर्षांच्या जीवनामध्ये अनेक अडचणींवर मात करुन स्वातंत्र्य युध्दात व नंतर शिक्षण क्षेत्रात, सहकारी क्षेत्रात, सामान्य शेतकरी–शेतमजुरांच्या प्रश्नांत महान कार्याचे दीपस्तंभ उभारले. त्याची प्रसिध्दी त्यांनी स्वत: केली नाही व दुसऱ्यांनाही करण्याची परवानगी दिली नव्हती. परंतु अण्णांचे ८० वे वर्ष क्रांतिवर्ष विविध सामाजिक उपक्रमाने साजरे करण्याचे अटीवर आपला ८० वा जाहीर वाढदिवस साजरा करणेस मान्यता दिली होती. त्या निमित्ताने दै. लोकमतचे प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी आपल्या जीवनातील ठळक घटना कशा घडल्या हे सांगितले होते.

अण्णा म्हणतात ''आज मी जो आहे, जसा आहे त्याची सुरवात घरातूनच झाली. मी शेतकरी कुटुंबातला, घरची मध्यम शेती, वडील शेतीत रात्रंदिवस काबाडकष्ट करणारे काळ्या मातीत राबणारे अंगठे बहाद्दूर, त्यांना 'बापू' म्हणायचो, सारे त्याच नावाने बोलवायचे. माझ्या आधीचे दोन भाऊ वारले. माझ्यासाठी आई–वडिलांनी नवस केले होते. मी नवसाचा ठरलो. नाव नागनाथ ठेवलं.

मला समजायला लागलं तेव्हा स्वातंत्र्य चळवळीनं चांगलाच जोम धरलेला. आई (क्रांतिवीरांगना लक्ष्मीबाई नायकवडी) आणि वडील (रामचंद्र नायकवडी) दोघेही स्वातंत्र्य लढ्यात. घरात चळवळीचे वातावरण होते. साहजिकच चळवळीचे संस्कार झाले. मनात कुठेतरी हा विचार खोलवर रुजत गेला. आदर्श जीवनाचे धडे घरातच मिळाले. वडील म्हणायचे, 'कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावर पाय द्यायचा नाही आणि कुणाच्या सुतळीच्या तोड्याचीही अपेक्षा करायची नाही. आई वडील शाकाहारी. आमचे वारकऱ्याचे घर. साहजिकच शाकाहाराचा संस्कार झाला. थोडं कळायला लागलं आणि शाळा करत करत घरात पाणी भरायचं काम

माझ्यावर आलं. घरात माणसाचा नेहमीच राबता. तितकीच जनावरं, या सगळ्यांसाठी पाणी भरायचा, शेतात जायचे, कष्टाची भाषा कळायला लागली, आई म्हणायची, शिकलं पाहिजे. तिचे वडील मिलिटरीत होते. म्हणून शिक्षणाचं महत्त्व तिला कळत होतं. वडील शिकू नको म्हणायचे, कुस्ती कर म्हणायचे, कुस्ती करायचो, शिक्षणाकडं तसं दुर्लक्षच, पहिलीला नापास झालो, पण माझा गणित विषय चांगला होता. वर्गात मास्तर सारखं नाव काढायचे. फक्त अपुर्णांकांचं गणित तेवढं जमायचं नाही. सहावीपर्यंतची शाळा वाळव्यातच झाली. पुढं सातवीला आष्ट्यात शाळेला गेलो. तेथे शिराळ्याचे हणमंत नवांगूळ सर शिकवायला होते. ते खादी वापरायचे. खादीचं आणि त्यामागच्या विचाराचं आकर्षण निर्माण झालं.

गावात चौकातल्या कट्ट्यावरनं एक घोषणा कानावर यायची. मग मी धावत चौकात जायचो. भारत माता की जय!, शिवाजी महाराज की जय! अशी शड्डू ठोकत घोषणा देणारे क्रांतिसिंह नाना पाटील असायचे. ते माझ्या हातात तिरंगा ध्वज द्यायचे. तो घेऊन मी सभेत पुढे बसायचो. नाना पाटील खूप छोट्या गोष्टीतून स्वातंत्र्याचं, एकीचं महत्त्व सांगायचे.

आठवीला कोल्हापुरला राजाराम हायस्कूलला गेलो. पहिला जिवलग मित्र बी. एल. गायकवाड वाळव्यात मिळाला होता. १९४२ साली मॅट्रिकचं शिक्षण अर्ध्यावर सोडून भूमिगत चळवळीत दाखल झालो. जनता अन्यायाविरुध्द पेटून उठायची. स्वाभिमानाची जाणीव निर्माण झाली होती. ती पक्की होत होती. विद्यार्थी दशेतच काँग्रेसचा स्वातंत्र्याचा झेंडा खांद्यावर घेतला होता. सखाराम कदम, गणपती बाबर हे सहकारी मिळाले. ए. डी. अत्तार, रा. सु. पाटील, बॅ. पी. जी. पाटील यांची भेट झाली. पुढे जवळीक निर्माण झाली. मे १९३९ च्या सुमारास कर्मवीर अण्णांची भेट झाली. त्यांच्या विचारांचा प्रभाव पडला. सहकाऱ्यांना घेऊन शिराळ्याच्या दुर्गम भागात व्हॉलंटरी शाळाची सुरुवात केली. कोल्हापूर, शिराळा, इस्लामपूर, वाळवा, सांगली असा प्रवास सुरु झाला. संघटन सुरु झाले. लढ्याची तयारी सुरु झाली.१९३९ च्या डिसेंबरमध्ये कोल्हापूर जवळ सोनतळी येथे सेवादलाचा कँप झाला. त्यात सहभाग घेतला. पुढच्याच वर्षी कामेरीला पहिली विद्यार्थी परिषद घेतली. आत्मबळ वाढत गेले. कोल्हापुरात हायस्कूलमध्ये महात्मा गांधींचा 'हरिजन' वाचायला मिळायचा. त्याने संस्कार केले. मग जाणतेपणाने अगदी ठरवून खादीच्या पाठीमागे लागलो. खादीचे कपडे राठ असायचे. त्याचा लंगोट मांडीला कचायचा. पण तो वापरायचाच, गांधीजींचे राष्ट्रवादी विचार मनावर खोलवर परिणाम करुन गेले. इस्लामपुरला खादी भांडाराची शाखा सुरु केली. मुंबईत ७ आणि ८ ऑगस्ट १९४२ ला अखिल भारतीय काँग्रेसचं अधिवेशन असल्याची माहिती 'हरिजन' मधून समजली. त्या अधिवेशनाला विद्यार्थी कार्यकर्ता म्हणून गेलो. 'करेंगे या मरेंगे' आणि 'चले जाव' चा संदेश घेऊन परत आलो. पुढे तोच स्वातंत्र्याचा मंत्र झाला. भूमिगत चळवळीला वेग आला.

स्वातंत्र्याचं कार्य चालू असताना सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचाही प्रभाव होताच, विद्यार्थी दशेत असल्याने त्याचे आकर्षणही होते. हुतात्म्यांची मनिषा कोण पुरी करणार? ही कविता ओठावर असायची, स्वातंत्र्याच्या भावनेने भरलेले ते दिवस. त्यावेळी एक घटना घडली. ती माझ्या मनावर खोलवर आघात करुन गेली. १९४२ मध्ये नोव्हेंबरचा महिना असेल. क्रांतिवीर पांडू मास्तर यांनी पुण्याचा येरवडा जेल फोडून पलायन केले. क्रांतिवीर किसन वीर, छन्नुसिंग त्यांचे सोबत होते ते वाळव्याला आले. त्यांची भेट झाली. तेथून पांडू मास्तर पसार



झाले. पदोपदी मरणाचे सापळे रचले जात असताना निशस्त्र राहून चालणार नव्हते. पांडू मास्तर जेल फोडून पळाले, पण त्यांच्याजवळ नंतर एकही हत्यार नव्हते. ही सल मनात बोचत राहिली. मग ठरवलं, आता सशस्त्र लढा. कोल्हापूर गाठलं. तिथं शस्त्र कशी मिळवता येतील यावर डी. डी. सावंत, जी. ए. लाड, डी. एम. चव्हाण, व्यंकटराव महाडिक यांच्याशी खलबते झाली आणि शेवटी मनाचा निर्धार केला. हत्यारे मिळविल्याशिवाय परत फिरायचे नाही, असं ठरवून १ नोव्हेंबर १९४२ रोजी गोव्याला निघालो. जाताना कोडोलीच्या रंगराव पाटील यांच्याकडून १०० रुपये उसने घेऊन गेलो. मुंगळी (गहहिंग्लज), निंगनूर, सावंतवाडी, दोडामार्गे बांदा, मडगाव अशी खूप भटकंती केली. पोलिसांचा डोळा चुकवावयाचा. शेवटी मडगाव म्हापसा येथे एक पिस्तूल आणि रिव्हॉल्व्हर काडतुसासह मिळविली.१०५ रुपयाला विकत घेतली. भोपळ्यात हत्यार लपवून कोल्हापूर गाठलं. ४४ दिवस या मोहिमेवर गेले. नंतर याच हत्यारांनी शेणोलीजवळ पे स्पेशल ट्रेन आम्ही लुटली. कार्यकर्त्यांची संख्या वाढू लागली. हत्यारं कमी पडायला लागली. मग सांगाव (कोल्हापूर जिल्हा) येथील पोलीस चौकीतून बंदुका पळविल्या. १४ एप्रिल १९४४ रोजी धुळे खजिना लूट केली. जी.डी.बापू लाड, रावसाहेब कळके, उत्तमराव पाटील, किसन पवार, धोंडिराम माळी, राजूताई पाटील हे आम्ही एकत्र होतो. ही लूट गाजली. ब्रिटिशांच्या सत्तेला हादरे बसायला लागले. त्यानंतरचे दिवस स्वातंत्र्याच्या प्रेरणेने भारावलेले होते. नानकसिंग, किसन अहिर हे दोन खंदे साथी लाभले. ते देशासाठी हुतात्मा झाले. ही सल आयुष्यभर मनाला बोचत राहिली. त्यांच्या हौतात्म्याचं जिवंत स्मारक उभारायचं ठरविलं. ते आज वाळव्याच्या क्रांतिभूमीत उभं आहे. सातवीपर्यंत शिक्षण झाल्यावर बी.ए.बी.टी. व्हायचं आणि गावात जाऊन शाळा सुरु करायची. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संस्कारांचं शिक्षण द्यायचं असं ठरविलं होतं. पुढे काय करणार असं शिक्षक विचारायचे, तेव्हा मी त्यांना हे उत्तर द्यायचो. पण तिथंच शिक्षण बाजूस पडलं आणि हे स्वातंत्र्यलढ्याचं शिक्षण सुरु झालं. आपली दिशा चुकली, मार्ग चुकला असं कधी वाटल नाही, जे जे ठरविलं ते ते करुन दाखविलं अगदी या क्षणापर्यंत तरी कशात अपयश आलं नाही.

१९४५ चा नोव्हेंबर, डिसेंबरचा महिना असावा. मी आमच्या कार्यकर्त्यांना लष्करी शिक्षण देण्यासाठी आझाद हिंद सेनेचे मार्गदर्शक आणण्यासाठी दिल्लीला गेलो. तिथे दर्यागंज भागात त्यावेळी श्रीमती मणिबेन पटेल यांच कार्यालय होतं. त्या सेनेच्या सैनिकांच्या बाजूने खटला चालवावयाच्या. त्यांना भेटलो. तिथं आझाद हिंद सेनेचे जवान नानकसिंग आणि मन्सासिंग यांची भेट झाली. हे दोघे कलकत्त्याच्या ब्रिटीश पोलीसांच्या तावडीतून सुटून आलेले. त्यांना मी गाठले आणि माझा प्रस्ताव मोडक्या तोडक्या हिंदीत सांगितला. ते प्रशिक्षण द्यायला व यायला तयार झाले. दोघांनी आपआपल्या कुटुंबियांची भेट घेतली. त्यासाठी लुधियानाला गेलो. नंतर त्या दोघांना घेऊन शिराळ्यात आलो. शिराळा पेट्यात फौजी कँप घेतला. शस्त्र चालवायचं शास्त्रशुध्द प्रशिक्षण कार्यकर्त्यांना दिलं आणि असे ८० प्रशिक्षित कार्यकर्ते तयार झाले. महिनाभर प्रशिक्षण झालं. आमच्यासाठी वाळव्यातून इस्लामपुरला तेथून चरणला आणि चरणमधून जंगलात धान्य पाणी आणलं जायच. प्रत्येकवेळी वेगळी बैलगाडी वापरायचं. गुप्तता पाळली जावी म्हणून या प्रशिक्षणाचा कुणालाच थांगपत्ता लागला नाही. २५ फेब्रुवारी १९४६ चा दिवस सोनवडे गावच्या जवळच्या ओढ्यात ब्रिटीश पोलिसांनी आम्हाला वेढा घातला. पोलीसांशी सशस्त्र चकमक उडाली. यामध्ये नानकसिंग आणि किसन अहिर शौर्याने पुढे

झाले. त्यांनी धावाबोल केला. या दोघांनाही गोळ्या लागल्या व ते धारातिर्थी पडले. त्यांनी स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात प्राणांची आहुती दिली. पोलीस जीव मुठीत धरुन शेवटी पळून गेले. पण या मणदूरच्या ओढ्यात, आमचे दोन खंदे वीरजवान कामी आले. मी त्यावेळी ठरविले, या हुतात्म्यांची जिवंत स्मारके उभी करायची. त्यांना हवं असलेले खरेखुरे स्वातंत्र्य मिळवायचं. त्यांच्यासाठीच आपल आयुष्य झिजवायचं.

स्वातंत्र्यापूर्वी कराड तालुक्यातील कापील गोळेश्वर येथे विद्यार्थी परिषद संघटित केली व याच परिषदेत रयत शिक्षण संस्थेस एक लाखाचा निधी देण्याचा निर्धार केला. तो निधी भूमिगत असतानाच जमविला व संत गाडगे महाराज यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांना समारंभात अर्पण केला. महार वतन मुक्तीचा लढा संघटित केला. यासाठी वाळवा व तासगाव तालुक्यातील ८० गावातून समित्या स्थापन केल्या. पायी प्रवास करुन प्रचार केला. कर्मवीर अण्णा, साथी एस.एम.जोशी, साथी जयप्रकाश नारायण यांचे सारखे महत्त्वाचे नेते, समाज धुरीणांचा सहवास मिळाला. ऐतवडे बु।। या कर्मवीर अण्णांचे जन्मगावी सामुदायिक शेतीचा प्रयोगही केला.

अण्णांनी आपल्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर प्रकाश पडेल असे आपले मनोगत सांगितले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळातील आंदोलनाबद्दल पुढील प्रकरणात खुलासा केला आहे.

* * * *



क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या ८० व्या वाढदिवशी
भाषण करताना मा. एन.डी.पाटील, व्यासपीठावर उपस्थितीत मा. अण्णा, प्रा. ग.प्र.प्रधान,
मा. गणपतराव देशमुख, सौ. कुसुमताई (माई) मा. वैभव (काका) नायकवडी,
कॉ. बाबुराव गुरव, कॉ. भारत पाटणकर व इतर मान्यवर



## (ब)
## दैनिक प्रतिनिधीना सांगितलेले विचार

क्रांतिवीर नागनाथ अण्णा स्वातंत्र्योत्तर काळातील सहकार मेरुमणी. १९४७ साली मिळालेलं स्वातंत्र्य हे खरंखुरं स्वातंत्र्य नव्हते, ते खरंखुरं स्वातंत्र्य आणि लोकशाही सत्ता स्थापन करण्यासाठी तळागाळातल्या जनतेला विश्वास आणि प्रेरणा मिळाली तर स्वातंत्र्यापेक्षाही मोठी चळवळ उभी राहू शकते. ते चित्र आणि योग्य दिशा आज मला दिसते आहे. म्हणूनच आपण कष्टकरी जनतेची चळवळ अविरत चालू ठेवली आहे. हे ध्येय साध्य झाल्याशिवाय ही चळवळ थांबणार नाही. असे प्रतिपादन दैनिक पुढारीशी खास मुलाखतीमध्ये बोलताना नागनाथ अण्णांनी आपले विचार व्यक्त केले.

स्वातंत्र्य चळवळीनंतर जी स्थित्यंतरे झाली. त्याबाबत अनेक स्वातंत्र्यसैनिक समाधानी नव्हते. त्यामुळे ते सामाजिक जीवनापासून बाजूला गेले. पण आपण स्वातंत्र्यानंतरच्या देशाच्या उभारणीत त्याच जिद्दीने उभे राहिलात आणि नव्या समाजरचनेसाठी प्रयत्न करीत राहिलात. हे सारे करताना आपली नेमकी काय भूमिका राहिली? अशा प्रकारची जिद्द बाळगण्याची शक्ती व प्रेरणा कुणाची लाभली?

‘‘अन्न, वस्त्र, निवारा, पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी, सुख समाधान आणि शांतता, सर्वांना शिक्षण आणि हाताला काम ही आम्हाला अपेक्षित असलेली सत्ता होती. पण ती आज अखेर मिळाली नाही. आदर्श राज्य येणार असेल तर स्वातंत्र्यापेक्षा कितीतरी पटीने मोठी क्रांती घडू शकते. त्यासाठी सर्वसामान्य जनतेला सामर्थ्यवान करावे लागेल. त्यांचे प्रश्न समजून घ्यावे लागतील. त्याची राजकीय तयारी आणि गणिते ध्यानात घेतली पाहिजेत. दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त, कष्टकरी, कामगार, शेतकरी या साऱ्या तुकड्या एका लयीत आल्या पाहिजेत. त्यांच्या मनात विश्वास निर्माण केल्यास ‘उपाशी मरु पण लढू’ या हिमतीने ती लढू शकेल. मला ते चित्र आणि योग्य दिशा आज दिसते आहे. १९४७ पासून आम्ही जे म्हणत आलोय तेच आजही म्हणतोय.

म्हणूनच २०१० सालापर्यंत हे खरंखुरं स्वातंत्र्य हाती आल्याशिवाय राहणार नाही.''

समाजपरिवर्तनाचा आपला दृष्टीकोन पूर्वीपासून निश्चित झाला होता. पण स्वातंत्र्य चळवळीमधील लढ्याचे काम आणि त्यानंतरचे सामाजिक काम यासाठी आपण जे लढे दिले त्यात आपण नेमका काय फरक कराल? हे लढे देताना आपल्याला काही वेगळेपण जाणवले काय?

''भविष्यात जनतेला संघटितपणे उभे करावे लागणार आहे. भांडवलदारांविरुध्द संघर्ष निर्माण करण्यासाठी तरुण मुला मुलींच्या फौजा तयार झाल्या पाहिजेत. तरच इतिहासाची पुनरावृत्ती होऊ शकेल. आझाद हिंद सेनेसारख्या या फौजा असतील आणि त्या आपल्या मदतीला राहतील तेव्हा यशस्वी लढा उभारण्यास मोठी मदत होईल. स्वातंत्र्यलढ्यात नाविकांनीही बंड केले होते. त्याप्रमाणे आजच्या सत्तेतील भाईबांधवही या लढ्यात सहभागी होतील. कारण ते आपलेच सगे सोबती आहेत. स्वातंत्र्य लढ्यात बाबू गेनूसारख्या सामान्य कामगाराने हौतात्म्य पत्करले. नव्या लढ्यात असे सामान्य लोक सहभागी होण्यासाठी कष्टकरी जनतेला जागे करण्याची गरज आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तळागाळातील जनतेचा खराखुरा लढा आणि प्रवाह सत्ताधारी मंडळींनी थंड केला होता. पण त्यांच्यात आज पुन्हा नवचैतन्य निर्माण केले पाहिजे. या शक्ती लढण्यासाठी पुढे असणार आहेत. समाजातील वाढती बेकारी आणि व्यसनाधीनता याची चिंता सरकारला नाही. जनतेला आणि शेतीला पाणी मिळाल्याशिवाय देश समृध्द होणार नाही, की इतर देशाबरोबर त्याची घोडदौडही राहणार नाही. शेती, विज्ञान आणि अवकाशाच्या बाबतीतही आपली अपेक्षित प्रगती नाही.''

सत्ता हे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. बहुजनांच्या हाती सत्ता यावी यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केलेत. बहुजनांच्या उन्नतीचा हा मार्ग अजूनतरी कोठे दृष्टिक्षेपात आलेला नाही. अशा वेळी तमाम बहुजन समाजासाठी आपला काय कानमंत्र असेल?

''आपली शैक्षणिक वाटचाल तर अत्यंत असमाधानकारक आहे. ब्रिटिशांनी घालून दिलेलीच शिक्षण पध्दती अजून अंमलात आहे. त्याकाळी कलेक्टर आणि डी.एस.पी. यांच्या हाताखाली लागणारी यंत्रणा कमी खर्चात कशी मिळेल याची व्यवस्था करुनच शिक्षण पध्दती ठरविण्यात आली होती. त्या शिक्षण पध्दतीवर नुसतेच कारकून तयार व्हायचे. त्यापुढे कुणी जावयाचे नाही. प्रचलित शिक्षण पध्दतीही तेच करीत आली आहे. कष्टकरी जनता शिक्षण घेऊन पुढे यावी असे कुणालाच वाटत नाही. उलट त्यांना मोडीत काढले जात आहे. या प्रतिकूल परिस्थितीतही आपण सामर्थ्य निर्माण करायला हवे आणि बहुजनांच्या शिक्षणाची व्यवस्था करायला हवी. या तत्त्वावरच संघर्ष निर्माण करणे हा एकमेव मार्ग आहे.''

स्वातंत्र्याइतकी प्रबळ प्रेरणा समाजाच्या अन्य जडणघडणीत अथवा विधायक परिवर्तनामागे आज दिसत नाही. याबद्दल आपणास काय म्हणावेसे वाटते ?

''स्वातंत्र्य चळवळीत एकदाचे ब्रिटीश निघून गेले की, येथे नंदनवन येईल असे देशभर वातावरण तयार झाले होते. पण अचानकपणे एक दिवस उजाडला. १५ ऑगस्ट १९४७ हाच तो दिवस. देशाचे दोन तुकडे झाले. संस्थानिकांना तनखे देण्याचा निर्णय झाला. हे काही देशाच्या हिताचे झाले नाही. भारतीय जनता ब्रिटिशांची गुलाम झाली होती. त्यातून ती बाहेर पडली. पण पुढे काय? त्यासाठी रस्ता कुणीच दाखविला नाही. ब्रिटीश गेल्यानंतर नंदनवन कुठेच आले नाही.''

आपला समाजकारणाचा पिंड आहे. कोणत्याही राजकीय पक्षाची तमा न बाळगता ६०



वर्षाहून अधिक काळ आपण अनेक मूलभूत प्रश्नांसाठी झगडत आहात. या संपूर्ण संघर्षमय वाटचालीबद्दल आपल्याला काय वाटते ?

''प्रत्यक्षात त्यावेळी इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्रात विशेषत: सातारा, सांगली, कोल्हापूर या भागातील सत्यशोधक चळवळीमुळे समाज पुढे आलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तपश्चर्येमुळे या टापूतील सर्वसामान्य जनता तुलनात्मक दृष्ट्या जास्त जागरुक झाली होती. आणि या जागरुक जनतेने स्वातंत्र्य लढ्यात एक निर्णायक असा संग्राम उभा केला होता. स्वातंत्र्यासाठी त्यांनी शिकस्तीचे प्रयत्न केले होते. हातात बंदुका घेऊन ते लढले होते. हुतात्मा किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग हे हुतात्मा झाले. पण त्यांच्या त्यागाचे चीज काही झाले नाही, की लोकांना ते दिसले नाही. एक लोकशाही राष्ट्र म्हणूनसुध्दा अनुभवाला आला नाही. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यातील अनेक लोक वैफल्यग्रस्त झाले. खरेखुरे स्वातंत्र्य काही मिळाले नाही. त्यासाठी पुन्हा संघर्ष करण्याची गरज आहे.हे ओळखूनच मी या नव्या संघर्षात उतरलो. स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम आम्ही लेव्हीची चळवळ हाती घेतली. जोंधळा, भात व अन्य पिके तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना किती खर्च येतो याचा विचार न करता सरकार शेतकऱ्यांकडून लेव्ही गोळा करीत होते या लेव्हीच्या विरोधात जुनेखेड येथे भव्य परिषद घेऊन आंदोलन सुरु केले. त्यात क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. यशवंत चव्हाण आदींनी सहभाग घेतला होता. शेतकरी परिषद या नावाने ही चळवळ उभी राहिली. हे सर्व उभे करत असताना त्याला फुले-शाहू-आंबेडकरांची प्रेरणा मिळाली. त्यामुळेच ही चळवळ समाजवादाच्या दिशेने वाटचाल करीत लढू लागली.''

स्वातंत्र्य चळवळीतील स्वत्व आणि तात्त्विक अधिष्ठान स्वातंत्र्यानंतर झपाट्याने ओसरले. ते टिकवून ठेवण्यासाठी काय करायला हवे होते ?

''स्वातंत्र्यानंतर आदर्श जीवन जगायला मिळेल अशी एक धारणा निर्माण झाली होती. तसं लोकांच्या मनावर बिंबवलं गेले होते. पण त्याला धक्का पोहोचलेला होता. स्वातंत्र्यानंतर अरेरे ! यापैकी काहीच आपल्या वाट्याला आले नाही, असे या जनतेला वाटू लागले. स्वातंत्र्यानंतर त्यांचे प्रश्न काही सुटले नव्हते. म्हणूनच शेतमजूर, कामगार, शिक्षक, कारकून आणि राबणारे अन्य घटक यांना बरोबर घेऊन संघटित सामर्थ्याच्या जोरावर हा बदल घडवून आणण्यासाठी आमचा हा लढा सुरु झाला आहे. त्यासाठी आम्ही फुले-शाहू-आंबेडकरांचा विचार पकडलेला आहे. ज्याच्यावर योग्य संस्कार राहिले ती सामान्य जनता तटस्थपणे बाजूला राहिली व ज्यांना कशाचीही आत्मीयता नाही ती माणसं प्रतिगामी आणि वेगळ्या वाटेने गेली. स्वातंत्र्यानंतरच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने बैलजोडी, गायवासरु, हात अशी चिन्हे लोकांसमोर ठेवून सत्ता मिळवली. सर्व सामान्य जनतेचे शिक्षण आणि संघटन त्यांना करता आले असते पण ते करु शकले नाहीत.''

संपूर्ण देशाच्या सामाजिक चळवळीची जन्मभूमी असलेल्या महाराष्ट्रात आता चळवळी उभ्या राहून त्या यशस्वी होताना दिसत नाहीत. त्याबाबत आपल्याला काय वाटते ?

''एके काळी सातत्याने सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाला भाषावार प्रांतरचना करण्यातही अपयश आले. संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावर मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट केली जात नाही हे नेत्यांच्या लक्षात आले होते. संयुक्त महाराष्ट्र देण्याचा निर्णय आधीच घेतला असता तर १०५ जणांना हुतात्मा व्हावे लागले नसते. आंध्र प्रदेशात पोट्टी रामनुज भाषावार प्रांतरचनेसाठी हुतात्मा झाले. तेलगू राज्य व्हावे अशी त्यांची मागणी होती. बेळगाव कारवारसह एकसंध मराठी

राज्य झाले पाहिजे. पण अजूनही ते होत नाही. काँग्रेसला सत्तेची ओढ बाजूला जाऊ देत नाही. त्यामुळेच हे प्रश्न लोंबकळत पडले. त्याचेच दुष्परिणाम नंतर दिसू लागले. भाजप, शिवसेनेसारख्या जातीयवादी शक्ती फोफावत राहिल्या आणि त्या या संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढ्यात येऊ लागल्या. पण सर्वसामान्य स्वाभिमानी माणसाला ही गोष्ट पटली नाही.

महाराष्ट्रातील चळवळीला सत्यशोधक चळवळीने खतपाणी घातले. बाकीचे लोक अज्ञानात चाचपडत होते. महाराष्ट्रात फुले–शाहू–आंबेडकरांच्या विचारांमुळे तळागाळातला समाज जागा झाला. कष्टकऱ्यांसाठी लढणाऱ्या चळवळी तरीही कमीच होत्या. अशा काळात प्रतिगामी आणि संकुचित जातीयवादी शक्तींनी मोठे थैमान माजविलेले होते. काँग्रेसमधील भांडवलदारांनी राजकीय सत्ता संपादन केली होती. त्यांच्याकडून लोकांचा भ्रमनिरास झाला होता. तरीही काँग्रेसने खूप काळ सत्तेचा अनुभव घेतला. मध्यंतरीच्या काळात भाजप, शिवसेना युतीच्या सरकारचाही जनतेने अनुभव घेतला. ते सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी काहीही करु शकले नाहीत. म्हणूनच आम्हा सर्वसामान्य जनतेला समाजवादाच्या दिशेने जाणारी खरी खुरी जनतेची सत्ता आली पाहिजे असे वाटू लागले आहे. हे चळवळीचे यश म्हणावे लागेल.''

आपण स्वत: तसेच सुंदरलाल बहुगुणा, अण्णा हजारे, एन. डी. पाटील, गो. रा. खैरनार, बाबा आमटे, मेधा पाटकर यांच्यासारखी माणसे आज समाजात उभे राहात असताना त्याचे दृश्य परिणाम आपल्याला प्रत्यक्षात किती दिसतात असे तुम्हाला वाटते ?

''नर्मदा आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर आणि वरील सर्व मंडळींचा त्याग व लढ्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. पण संघटनेत समर्थ शक्ती असायला हवी. ही सर्वसामान्यांची शक्तीच संघटनेला समर्थपणे पुढे नेऊ शकते. अशा चळवळीत विविध जनसमूह एकत्र आले पाहिजेत. या सर्वांचे मार्ग मात्र गांधीवादी पगड्याचे व व्यक्तिवादापेक्षा सर्वसामान्य जनतेला संघटित करण्याचे हवेत. त्यातून दृश्य परिणाम निश्चितपणे दिसू लागतील. चळवळीतील प्रमुखांनी संघर्षाची मानसिक तयारी करुन ते संघर्ष तीव्र स्वरुपात वाढविले तर सर्वसामान्य जनतेलाही त्यात भाग घेता येईल. या संघटित तुकड्या राजकीय दृष्ट्याही जाणत्या व्हायला हव्यात. त्या आंधळेपणाने कुठेही जाता कामा नयेत. तेच कायमस्वरुपी टिकणारी लोकशाही सत्ता स्थापन करतील. तेव्हाच त्याला खरी दिशा आणि सूर लागला असे म्हणता येईल. आज हा प्रभाव कमी आहे. म्हणून त्याची चळवळ उठून दिसत नाही. पण ते केव्हातरी पुढे येणार आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी संघटितपणे रान उठवले. म्हणूनच ब्रिटीशांना चांगला तडाखा बसलेला होता. तसा तडाखा आजही आवश्यक आहे. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचा ब्रिटिशांनी धसका घेतला होता. जोपर्यंत समूह पेटून उठत नाही तोपर्यंत ताकद वाढत नाही ही वस्तुस्थिती आहे.''

या शतकाची लढाई पाणी, जमीन आणि गरिबी या प्रश्नांशी निगडीत असणार आहे. त्याबाबतीत अधिकार वाणीने सांगू शकतील असे महाराष्ट्रातील आपल्यासारखे अधिष्ठान प्राप्त झालेले फार कमी नेते उरलेले आहेत. या मूलभूत प्रश्नांबाबत आज सखोल मार्गदर्शनाची गरज आहे. त्यासाठी आपली भूमिका काय राहील?

''अमेरिका आणि इंग्लंडमधील सत्तेमध्ये सर्वसामान्य जनतेला स्थान नाही. तिथल्या सत्ता भांडवलशाहीच्या प्रतिक आहेत. चीनसारख्या खंडप्राय देशातील सत्ता सर्वसामान्य जनतेचे हित लक्षात घेऊन चालविली आहे. तिथे भिकारी नाहीत आणि विवंचनाही नाही. आमच्याकडे



योग्य धोरणाच्या अभावामुळे आजची परिस्थिती निर्माण झाली आहे. मूठभर लोकच चांगल्या क्षेत्रात काम करताना दिसतात. पाणी हे एक साधन आहे. ते सर्वांना मिळायलाच हवे. ते सर्वसामान्य माणसाला मिळाले तर देशात समृध्दी येईल. पाण्याचा एक थेंबही वाया जाऊ देऊ नये. ते अडविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. त्यामुळे पाण्याने भिजलेला भारत अशी समृध्दी देईल की निसर्गाचा एखादा कोप झाला तरी चार वर्षे देशातील धान्याची कोठारे हलणार नाहीत. सत्ताधाऱ्यांनी ही दृष्टी ठेवून काम केले पाहिजे. जमीन सुधारण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न झाले तर देशाला समृध्दी येईल.

धरणे आणि कृष्णा खोरे प्रकल्पासाठी ज्या माणसांनी आपल्या जमिनी देऊन त्याग केला. त्यांना गेल्या अनेक वर्षात न्याय मिळालेला नाही. त्यांचे पुनर्वसन झाले व अन्य सुविधा दिल्या तर त्यांच्यात विश्वासाचे वातावरण तयार होईल आणि मगच नवीन धरणासाठी लोक आपली जमीन द्यायला तयार होतील. धरणग्रस्तांसाठी पुनर्वसनाबरोबरच नोकरी आणि विकास सैनिक म्हणून पेन्शन देण्याची योजना राबविली पाहिजे. त्याशिवाय मोठ्या धरणाला होत असलेला विरोध कमी होणार नाही. धरणाचे पाणी सर्वांच्या वाट्याला समान स्वरुपात कसे मिळेल. तसेच या प्रकल्पासाठी निधी कसा जमा करता येईल याकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. या प्रकल्पातील भ्रष्टाचार निपटून काढून कामाला गती देणे आवश्यक आहे. पण कृष्णा खोऱ्याच्या प्रकल्पाचेही नियोजन फसत आहे. ३१ मे २००० पर्यंत कृष्णा खोऱ्यातील पाणी अडवून ते शेतीला देण्याचे नियोजन पूर्ण करायला हवे होते. पण हे पाणी इ. स. २००५ पर्यंत तरी शेतकऱ्यांच्या शेतात पडेल की नाही याबाबत आत्मविश्वास वाटत नाही. कोयना धरण होऊन ४५ वर्षे लोटली. पण आजही धरणासाठी जमीन देणारे धरणग्रस्त उपेक्षित आहेत. याच पध्दतीने काम होत गेल्यास कुणालाच न्याय मिळणार नाही. त्या करिता आधी पहिल्या धरणग्रस्तांचे पुनर्वसन करावे आणि मगच नव्या धरणाला हात घालावा. वाढती लोकसंख्या पाहता उत्पादन वाढविण्यासाठी शेतीला पाणी देणे आवश्यक झालेले आहे. ब्रिटिशांनी या देशातील योजना करताना जास्तीत जास्त लूट कशी करता येईल ते पाहिले. तिच अवस्था आजच्या प्रशासनाची आहे. या सर्व गोष्टी बाजूला ठेवून खेड्यापाड्यात विकास पोहोचविण्याची गरज निर्माण झाली आहे.''

साखर कारखाना, शिक्षण संस्था, आर्थिक संस्था, विविध सहकारी संस्था हा विकासाचा मार्ग आपण नेटाने नेण्याचा मार्ग आदर्शवत असा राबविला. पण महाराष्ट्राच्या विकासाची गंगोत्री म्हणून ठरलेल्या तमाम सहकार क्षेत्राला आपला हा आदर्श पॅटर्न राबविण्यात अपयश का यावे?

''सहकारातून सामान्य माणसाचा विकास व्हावा या उद्देशाने वाळवा येथे हुतात्मा साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली. हा कारखाना म्हणजे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीचा भक्कम आधार आहे. कारखाना नसता तर यापैकी काहीच करता आले नसते आणि ही चळवळ नसती तर सर्वसामान्य माणसे बाजूला गेली असती. हुतात्मा कारखाना परिसरात आज एक आदर्शवत शैक्षणिक संकुल निर्माण झालेले आहे. गोरगरिबांच्या मुलांसाठी वसतिगृह काढण्यात आलेले आहे. आम्ही जसं योजलंय तस घडतंय याचे आम्हाला फार मोठे समाधान आहे. सर्वसामान्य माणसं सुखाने नांदलेली आम्हाला बघायची आहेत. त्यासाठी महात्मा फुले यांच्या विचाराचे व्यासपीठ आम्ही तयार करीत आहोत.''

जातीयवादी प्रवृत्तीविरुध्द आपण सातत्याने आघाड्या केल्या आहेत. भविष्यात या अपप्रवृत्तीचे स्वरुप नेमके कसे असेल आणि त्या विरुध्दचा लढा नव्या पिढीने कशा पध्दतीने पुढे चालवायला हवा ?

''हिंदू महासभा, भाजपा, आर. एस. एस. सारख्या प्रतिगामी शक्ती पूर्वीपासूनच जास्तीत जास्त तीव्र होण्याचा प्रयत्न करीत आहेत. या शक्ती देशाच्या शत्रू आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत या प्रवृत्तींना जेव्हा प्रवेश दिला गेला तेव्हा या चळवळीला लढ्याऐवजी वेगळेच स्वरुप प्राप्त होऊ लागले. सारा बहुजन समाज हजारो वर्षे अज्ञानात कसा राहील हेच या लोकांनी पाहिले. कुठलेही काबाडकष्ट न करता सुखात व चैनीत कसे जगता येईल हेच या मंडळींचे प्रयत्न राहिले. साखर कारखान्यावर आयकर बसवून साखर उद्योग संपवायचा आहे, हे केंद्रातील जातीयवादी पक्षांच्या डोक्यात आहे. त्याविरुध्द बहुजन समाज संघटितपणे ताकद लावून लढतो आहे. या शक्तींचा हा हल्ला परतवून लावला नाही तर साखर उद्योग संपून जाईल. साखर उद्योगाने जरुर काही प्रगतीचा टप्पा गाठलेला आहे. त्यासाठी प्राणपणाने संघर्ष केला आहे. हा उद्योग आम्ही कदापि मोडून काढू देणार नाही. शेतकरी आणि कामगारांच्या भविष्याचा हा लढा आणखी तीव्र केला जाईल.''

साहित्य हा समाजमनाचा आरसा असतो. अनेक वेळा समाजातील वेगवेगळ्या चळवळीचे नेतृत्व साहित्याच्या माध्यमातूनच झालेले आहे. बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी विद्रोही साहित्याची नेमकी गरज ओळखून आपण या चळवळीला सर्वतोपरी सहकार्य करीत आहात. भविष्यात बहुजन साहित्याचा चेहरा नेमका कसा असावा अशी आपली अपेक्षा आहे ?

''प्रगतीचा आणि उन्नतीचा मार्ग दाखवून नव्या पिढीला बौद्धिक सामर्थ्य देऊन ती अधिक समर्थ करण्यासाठी शिक्षणाबरोबरच साहित्य आणि संस्कृतीची गरज आहे. या माध्यमातूनच तळागाळात पोचता येणार आहे. साहित्यातून राबणाऱ्या जनतेला संघर्ष करण्याची ताकद मिळणार आहे. अशा प्रयत्नातून आपले इच्छितही साध्य होणार आहे. साऱ्या बाजूनी बहुजनांची चळवळ पुढे नेणे हा त्यामागचा उद्देश आहे. दलित, आदिवासी ग्रामीण साहित्य जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जात आहे. पण हे साहित्य बहुजन समाजाचे असल्याने ते पुढे नेलेच पाहिजे''

८० वर्षाची आपली कारकीर्द उभ्या महाराष्ट्रात भरभरुन राहिलेली आहे. आपल्या आजपर्यंत केलेल्या कार्याचे सिंहावलोकन करता काही गोष्टी करायच्या राहून गेल्या आहेत. असे जाणवते काय? आणि त्यासाठी भविष्यात काही वेगळ्या योजना आहेत काय?

''कुठलीही चळवळ किंवा कार्यक्रम मोघमपणे पुढे नेता येत नाही. त्याकरिता फुले-शाहू-आंबेडकरांचा विचार आणि देशप्रेम सर्व स्तरात रुजविण्याची गरज आहे. भविष्यात जनतेला फार मोठ्या प्रमाणात संघटित करावे लागणार आहे. भांडवलदार व प्रतिगामी शक्ती विरुध्द लढा द्यावा लागणार आहे. कामगार, कष्टकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी आता कुठलीही तडजोड केली जाणार नाही. बहुजनांच्या शिक्षणसंस्था वाढविल्या पाहिजेत. तात्विक संघर्ष निर्माण करुन सदैव सुखात आणि चैनीत राहिलेल्या भांडवलदारांना बाजूला काढणे आवश्यक आहे. हा बदल घडविण्याची शक्ती कामगार आणि कष्टकऱ्यांत आहे. म्हणूनच ती संघटित केली जात आहे.''

* * * *



## (क)

## विचारवंतांचे मा. अण्णांचे बद्दल मनोगत

क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा ८० वा वाढदिवस दिनांक १५ जुलै २००२ रोजी वाळवा येथे आयोजित केला होता. त्या निमित्त महाराष्ट्रातील लोकनेत्यांनी, विचारवंतांनी व दैनिकांनी नागनाथ अण्णांना शुभेच्छा व्यक्त करताना त्यांच्या विविध व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंबद्दलही आठवणी लिहून पाठवल्या होत्या. त्यामधून नागनाथ अण्णांचे स्वातंत्र्यपूर्वीचे व स्वातंत्र्यानंतरचे महान कार्य लक्षात येत आहे.

पुण्याचे समाजवादी पक्षाचे नेते माजी आमदार प्रा. ग. प्र. प्रधान लिहितात ''स्वातंत्र्य लढ्यामध्ये आम्ही त्यावेळची जी तरुण माणसे एकमेकांचे मित्र झालो, त्यांची मैत्री आयुष्यभर आजवर टिकली आहे. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखालील प्रतिसरकारमधील नागनाथ अण्णाही एक निधड्या छातीचे, साहसी देशभक्त होते. ते भूमिगत असताना १९४५ साली एकदा पुण्यात आले. इस्लामपुरचे डॉ. वा. रा. जोशी यांच्यामुळे माझी त्यांच्याशी भेट झाली. नागनाथ अण्णांवर वॉरंट होते. पण त्यांना त्याचे काहीच वाटत नव्हते. स्वत:चा प्राण पणाला लावून ब्रिटिशांच्या बरोबर लढणारे नागनाथ अण्णा स्वत:बद्दल काही बोललेच नाहीत. मात्र वारणेच्या खोऱ्यात, वाळवा तालुक्यात सरकारवर प्रतिसरकारने कशी मात केली होती हे त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाले. नागनाथ अण्णांना स्वातंत्र्य मिळेल असा आत्मविश्वास वाटत होता. प्रतिसरकारबद्दल बोलताना ते म्हणाले, आम्हाला अभिमान वाटतो की आम्ही अट्टल गुन्हेगारांना वठणीवर आणले आणि लबाड सावकारांना दहशत बसविली. सावकारांनी गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करताना दिलेले कर्जाचे कागद मी जेव्हा फाडायला लावले, तलाठ्याला जेव्हा सात बाराच्या उताऱ्यावर शेतकऱ्यांचे नाव लावायला लावले तेव्हा मला खरे समाधान झाले. अण्णांची त्या रात्री जी दोस्ती जमली ती आयुष्याचे प्रवाह वेगळे होऊनही आजवर कायम आहे.

पुढे १९५४ साली इस्लामपुरला आचार्य जावडेकरांकडे गेलो असताना अचानक अण्णांची गाठ पडली. गप्पा मारताना अण्णा म्हणाले, ''स्वातंत्र्य मिळाल पण शेतकऱ्यांचं राज्य झालं नाही याची माझ्या मनाला खंत आहे. शहरात कामगारांची ट्रेड युनियन चालवणं फारसं अवघड नाही. पण खेड्यापाड्यात पसरलेल्या शेतकऱ्याला संघटित करणं, त्याला न्याय मिळवून देणं सोपे नाही.'' अण्णा स्वत:बद्दल कधी विचारच करीत नाहीत. ते सतत कामात गुरफटलेले असतात किंवा कामाचा विचार करीत असतात.

अण्णांनी साखर कारखाना उभा केला हे त्यांचे फार मोठे कर्तृत्व आहे. पण अण्णा कधी साखर सम्राट झाले नाहीत. ऊसाला महाराष्ट्रात सगळ्यात जास्त भाव देण्यात, साखर कारखान्यातील कामगारांना जास्तीत जास्त सुविधा देण्यात अण्णांचे खरे कर्तृत्व महाराष्ट्राला दिसून आले. नागनाथ अण्णा हे खरे धरतीचे पुत्र आहेत. काळ्या आईवर त्यांचे प्रेम आहे. पीक चांगले काढावे, पण जमिनीला ओरबाडून घेऊ नये. खते वाजवीपेक्षा जास्त वापरु नयेत असे ते शेतकऱ्यांना सतत सांगत असतात. सांगली जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांची जमीन जास्त पाणी वर्षानुवर्षे दिल्यामुळे खारावली, उफाळली याचा अण्णांना फार राग येतो. निसर्गाचे संतुलन राखले पाहिजे अशी त्यांची दृष्टी आहे. अण्णा हे सुरवातीपासूनच व्यापक दृष्टी असलेले कार्यकर्ते होते. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणीप्रमाणे सामाजिक बदल झाले पाहिजेत, हा त्यांचा बौध्दिक आग्रह आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांची शिकवण प्रत्यक्षात आली पाहिजे यासाठी ते सतत झटत असतात. अण्णा खरे समाजवादी आहेत. त्यामुळेच भारत पाटणकरांसारखा नव्या पिढीतील तरुण तेजस्वी कार्यकर्ता त्यांच्याबरोबर काम करीत आहे.

कॉ. दत्ता देशमुख यांनी महाराष्ट्रातील धरणग्रस्तांचा प्रश्न प्रथम धसाला लावला. मी आमदार असताना दत्ता देशमुख, एन. डी. पाटील यांना या प्रश्नाबाबतच्या त्यांच्या प्रयत्नामध्ये त्यांना साहाय्य करीत असे. माझे मित्र डॉ. बाबा आढाव यांच्यामुळे मी धरणग्रस्तांच्या प्रश्नांवरील एका परिषदेस गेलो. तेथे नागनाथ अण्णांची गाठ पडली. आज या प्रश्नावर अण्णांची लढाई सतत चालू आहे. अण्णा संघर्ष करताना प्रत्येक प्रश्नाचा सखोल अभ्यास करतात. महाराष्ट्रात पाणी वाटप कसे झाले पाहिजे, शेतीची पुनर्रचना कशी झाली पाहिजे याच्यावर त्यांचे विचार मला फार मोलाचे वाटतात. मी वयोमानानुसार प्रत्यक्ष कामापासून दूर झालो, पण नागनाथ अण्णांची कामे अखंड चालू आहेत.

''कधी न थांबलो विश्रांतीस्तव<br>
पाहिले न मागे,<br>
बांधू न शकलो प्रीतीचे वा किर्तीचे धागे''

असे अण्णांचे जीवन आहे. सह्याद्रीच्या कातळासारखी त्यांची छाती आहे. त्यांच्या उरातील आवेश आजही अभंग आहे. नागनाथ अण्णा आणि मी समवयस्क, आमच्या आयुष्याचे प्रवाह एकत्र नसले तरी समांतर वाहिले. कारण आम्हा दोघांनाही स्वातंत्र्याइतकीच समतेची ओढ आहे. माझ्यापेक्षा अण्णांनी तळागाळातल्या माणसांमध्ये कितीतरी अधिक काम केले आहे. आजही ८० व्या वर्षात पदार्पण करताना ते तरुणांना लाजवतील अशा उत्साहाने काम करीत असतात. अण्णांनी अनेक संघर्ष केले अनेकदा त्यांचे प्रयत्न त्यांच्या मनासारखे फलदायी झाले नाहीत, पण अण्णांची जिद्द कायम आहे. घाम गाळून शेत करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा,



बळी राजाचे राज्य यावे यासाठी अण्णा आयुष्यभर झटले. आज नव्या आर्थिक धोरणामुळे भारतातला शेतकरी आर्थिक साम्राज्यशाहीच्या विळख्यात सापडला आहे. ब्रिटीश साम्राज्यशाही विरुध्द लढणारे नागनाथ अण्णा खंबीरपणे आर्थिक साम्राज्यशाहीशी झुंज खेळत आहेत. शेतकऱ्यांना जगण्याची हिंमत देत आहेत. नागनाथ अण्णा शतायुषी व्हावेत, कार्यकर्त्यांना त्यांचे अक्षय मार्गदर्शन मिळावे आणि बळीराजाला न्याय मिळवून देण्याचे त्यांचे स्वप्न साकार व्हावे हीच शुभेच्छा.''

श्री. पन्नालाल सुराणा लिहितात, ''जवळ नाही कवडी म्हणून आमच्या घराण्याला नायकवडी म्हणून नाव पडले. नायकवडी जवळ पैसा नव्हता म्हणून काही बिघडले नाही. आई–वडील, नाना पाटील आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिकवणीमुळे माझ्या जीवनाचे सोने झाले.'' पाच वर्षापूर्वी ''ग्यानबाचं अर्थकारण'' या माझ्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नागनाथ अण्णांनी हे उदगार काढले होते. एक सेनापती दोन लढाया लढू शकत नाही अशी एक इंग्रजी म्हण आहे. आपले बुध्दिकौशल्य, चातुर्य आणि सामर्थ्य एका लढाईत पुरेपूर वापरले की ती जिंकल्यानंतर रितेपण येते. आपण गाजविलेल्या पराक्रमाच्या कथा परत परत उगाळून सांगायच्या आणि इतरजणांना तुच्छ लेखायचे अशी बहुतेक सेनापतींची मानसिकता बनते. नागनाथ अण्णांनी मात्र स्वातंत्र्य प्राप्तीबरोबर आपल्या जीवनाचा नवा अध्याय सुरु केला. आपल्या आजूबाजूच्या लोकांचे दु:ख, दारिद्र्य नष्ट व्हावे, अन्याय–जुलूम थांबावेत आणि सगळ्यांना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आयुष्य वेचण्याचा पण अण्णांनी केला. गोरगरीब शेतकरी, अलुतेबलुतेदार यांच्या बाजूने नागनाथ अण्णा उभे राहिल्याने सत्ताधाऱ्यांचा त्यांच्यावर रोष असावयाचा, सहकारी साखर कारखाना काढण्यासाठी आवश्यक ती जुळवाजुळव करुन त्यांनी सरकारकडे रीतसर अर्ज केला. सत्ताधारी मंडळी त्यांची डाळ शिजू देईनात. अण्णांनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. अखेरीस त्यांना परवाना मिळाला. ती संधी आहे तसे आव्हानही आहे, असे समजून अण्णा कामाला लागले. जिवाला जीव देणारे आणि आपले काम चोखपणे करणारे सहकारी मिळवले. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यात व्यवस्थापक, लेखपाल एवढेच नव्हे तर यंत्राची देखभाल करणारे तंत्रज्ञसुध्दा साळी, माळी, दलित, मुस्लीम आदी अठरापगड जातीतले निवडले. अल्पावधीत साखर कारखाना चांगल्या प्रकारे चालू लागला. साखरेचा उतारा साडेबारा–पावणेतेरा पडू लागला. महाराष्ट्रातल्या अनेक जुन्या कारखान्यांचा उतारासुध्दा साडे अकरा टक्क्यांपेक्षा पुढे जात नाही त्यापेक्षा एक टक्का जास्त उतारा देणाऱ्या कारखान्याचे नाव सर्वत्र आदराने घेतले जाऊ लागले. यात आश्चर्य ते कसले? उतारा चांगला पडतो म्हणून शेतकऱ्यांना ऊसाला भाव ही चांगला द्यायचा असे धोरण अण्णांनी ठेवले. वायफळ खर्च अजिबात करायचा नाही. यंत्राच्या देखभालीत कसूर करायची नाही. कारखान्याचे चेअरमन एकदा चाऊस झाले तर एकदा कांबळे.

वाळवा व शिराळा तालुक्यात नागनाथ अण्णांनी अनेक हायस्कुले काढली आहेत. वाचनालयांना प्रोत्साहन दिले जाते. दलित साहित्य संमेलन, आदिवासी साहित्य संमेलन आवर्जुन भरविले जाते. सामाजिक विषमतेवर कठोर प्रहार करायला अण्णा नेहमी बाह्या सारुन सरसावलेले असतात.

सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातले १३ दुष्काळप्रवण तालुके तिथे शेतीला पाणी मिळावे, पाणी समाजाच्या मालकीचे मानले जावे, त्याचे समान वाटप व्हावे यासाठी अण्णां गेली

दहा बारा वर्षे धडपडत आहेत.''

येत्या १५ जुलैला अण्णां ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहेत पण पाठीचा कणा ताठ आहे, मनाचा निर्धार कायम आहे. रचना आणि संघर्ष या दोन चाकांची गाडी समर्थपणे हाकणारा हा गडी म्हणजे ग्रामीण महाराष्ट्राचा खंबीर आधारस्तंभ होय. त्यांना शतश: प्रणाम.

मराठवाड्यातील थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे नागनाथ अण्णांना दीर्घायुष्य चिंतताना लिहितात, ''क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे आयुष्य ही शतज्वालांनी जळणारी एक मशाल आहे. आजही ती वाळव्याच्या परिसरात जळताना दिसते. तिचा प्रकाश उभ्या महाराष्ट्रात पसरला आहे. ही मशाल अनेकदा तुफानात सापडली पण विझली नाही. विझण्यासाठी ती पेटलीच नव्हती.''

''विद्रोहाचे रुप म्हणजे क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, कर्मवीरांच्या विचारांचा व कार्याचा सखोल प्रभाव नागनाथ अण्णांच्या मनावर पडला होता. शिक्षण प्रसारात त्यांनी लक्ष घातले. पत्नी कुसुमताई यांना कोल्हापुरात शिक्षणासाठी ठेवले. त्या पदवीधर झाल्या. अध्यापन शास्त्रातली पदवी देखील त्यांनी मिळवली. त्यांनी शिक्षिका व मुख्याध्यापिकेची जबाबदारी पार पाडली. अण्णांशी संसार करणे म्हणजे एका वादळाच्या सहवासात राहणे. कुसुमताईंनी अण्णांचा संसार मोठ्या कष्टाने उभा केला आणि तो मोठ्या निष्ठेने सांभाळला.

नागनाथ अण्णांनी धरणग्रस्तांचे प्रश्न वेशीवर टांगले. शेतकऱ्यांचे व कामकऱ्यांचे अनेक लढे त्यांनी लढवले. परिवर्तनवादी विचारांची पताका खांद्यावर घेऊन समता पंढरीच्या वाटेवर आजही ते चालतच आहेत. गरिबीच्या विरुध्द जशी त्यांनी झुंज दिली तशी ती वर्णवादाच्या विरुध्दही दिली. ती झुंज आजही चालू आहे.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना हा देशातल्या सहकारी चळवळीतला दीपस्तंभ आहे. भ्रष्टाचाराला येथे प्रवेश नाही, थारा नाही. अण्णांनी कोणत्याही मोहाला आपल्याजवळ फिरकू दिले नाही. नव्या पिढीने अण्णांचा आदर्श आपल्यासमोर ठेवला पाहिजे. आज आमच्यासमोर कुणाचाच आदर्श नाही हे तरुणांचे म्हणणे बरोबर नाही. अण्णा विचारवंत नाहीत, साहित्यिक तर मुळीच नाहीत. पण समाज परिवर्तनाचा ध्यास घेणाऱ्या लेखकांवर त्यांचा जीव आहे. जातीपातीचे टप्पे ओलांडून सामाजिक समतेच्या क्षितिजावर अवती भवतीच्या समाजाची उभारणी त्यांना हवी आहे. त्यांचा सगळा अट्टाहास त्यासाठीच आहे. फुले-शाहू-आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आत्मसात केलेल्या व्यक्तीचा दुसरा कोणताच अट्टाहास असू शकत नाही.''

नागनाथ अण्णांच्या सर्व चळवळीत, समाज परिवर्तनाच्या आंदोलनात सतत बरोबर असणारे तासगावचे प्राध्यापक डॉ. बाबूराव गुरव लिहितात, ''क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांचे सारे आयुष्य असंख्य रोमहर्षक, नाट्यमय प्रसंगांनी भरलेले जीवन आहे. तो एक स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे. नागनाथ अण्णांचे बालपणीचे वातावरण सत्यशोधक चळवळ आणि स्वातंत्र्य चळवळीने भारावलेले होते. त्यांना थोडे दिवस पांडू मास्तर शिकवायला होते. तालमीत देसाई वस्ताद वळणं लावत होते. आष्ट्यात हणमंत गणेश नवांगूळ राष्ट्रीय चळवळीवर प्रेम करणाऱ्या शिक्षकाचा प्रभाव पडला. कोल्हापूर येथे अय्यर सरांचा प्रभाव पडला. घरची आर्थिक परिस्थिती बेताची होती. वसतिगृहात मोफत राहून काही दिवस वार लावून अण्णांनी शिक्षण घेतले. भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांच्या फाशीचा देशातील संवेदनशील बालयुवकांच्या मनावर खूप खोलवर परिणाम झाला होता. तसा तो अण्णांच्या मनावरही झाला होता.



पुढे स्वातंत्र्य लढ्यात गेल्यावर ७ जून १९४३ रोजी चळवळीला निधी संकलित करण्यासाठी शेणोलीजवळ अण्णा व त्यांचे सहकाऱ्यांनी रेल्वे पे ट्रेन लुटली. याच समुहाने कुंडल बँक लुटली. १० ऑक्टोबर १९४३ रोजी अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगावचे पोलीस स्टेशनमधील बंदुका लुटल्या, १४ एप्रिल १९४४ रोजी अण्णा व त्यांचे सहकाऱ्यांनी धुळ्याचा साडेपाच लाखाचा खजिना लुटला. २९ जुलै १९४४ ला अण्णांना वाळव्यात अटक झाली व ते सातारचा जेल फोडून पुन्हा भूमिगत झाले, ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला मिळालेले राजकीय स्वातंत्र्य आपणाला अपेक्षित असलेले खरेखुरे स्वातंत्र्य नाही. कामगार शेतकऱ्यांनी जनसत्ता भारतात स्थापन केल्याशिवाय खऱ्याखुऱ्या कष्टकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा शोध घेणे शक्य नाही, हे ओळखून क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याप्रमाणेच नागनाथ अण्णांनी सत्तेपासून दूर राहून स्वतंत्रपणे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, विधायक, रचनात्मक क्षेत्रात वाट चोखाळायला सुरवात केली. स्वतंत्र भारतातील नागनाथ अण्णांच्या राजकीय, सामाजिक जीवनाची वाटचाल झाडाच्या फांदीवर एकटे, एकाकी बसून सुरेल गीत सातत्याने गाणाऱ्या पक्षासारखी आहे. स्वातंत्र्याच्या अखेरच्या टप्प्यात हैद्राबाद मुक्ती संग्राम उभा राहिला. त्यामध्ये आपल्या हत्यारांसह अण्णा सहभागी झाले.

स्वातंत्र्यानंतर आपल्या हौतात्म्य पत्करलेल्या सहकाऱ्यांची जिवंत स्मारके उभी करणे हेच आपल्या आयुष्याचे मुख्य काम असे मानून अण्णा कामाला लागले. १९४९ साली त्यांनी किसान शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या वतीने वाळव्यात, हुतात्मानगर, शिरगाव या ठिकाणी हायस्कूल व तांत्रिक विद्यालयाचे मुलामुलींची मोफत वसतिगृहे स्थापन केली. १९४६ साली ''गावराज्य'' नावाचे साप्ताहिक सुरु केलं. ते तीन वर्षे चालवले. १९७१ साली हुतात्मा किसन अहिर यांचा पुतळा उभा केला, शेतमजूर, कष्टकरी-शेतकरी संघटनेची स्थापना केली. रस्त्यासाठी साराबंदीचा लढा यशस्वी केला. या वाळवा-इस्लामपूर रस्त्यानेच पुढच्या चळवळीचा आणि विकासाचा रस्ता दाखविला. वाळव्यात शेतीसाठी लिफ्ट उभ्या राहिल्या, हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना उभा राहिला. शेतकऱ्यांना ऊस दर, कामगारांचा पगार, बोनस, तोडणी मजुरांना मजुरी, सुविधा, साखरेचा उतारा, गुणवत्ता अशा विविध आघाड्यांवर भारतात आशिया खंडात उच्चांक नोंदविले, सतत टिकवले. सहकाराच्या माध्यमातून कष्टकरी जनतेची जनसत्ता उभारण्याचे प्रयोग करणाऱ्या पारदर्शी प्रयोगशील संस्था म्हणून सारा देश या संस्थांच्याकडे पाहतो आहे.

नागनाथ अण्णा नायकवडी हे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याप्रमाणेच अखंड क्रांतिकारक आहेत. समाजक्रांती, जाती अंत, वर्गात समताधिष्ठीत समाज रचना हेच त्यांच्या निस्पृह, क्रांतिकारी जीवन चिंतनाचे, कृतीचे, व्यवहाराचे विषय आहेत. अण्णा जमिनीवर घट्ट पाय रोवून उभे आहेत. जनतेत खोलवर पोहोचले आहेत. उदबत्तीने शांतपणे अखंडपणे कोपऱ्यात जळत राहावे तसे अण्णा जळत आहेत. सुगंध शोधत रसिकानं जवळ यावे तसे देशभरातील तळमळीचे परिवर्तनवादी प्रवाह चळवळीला येऊन मिळत आहेत. अण्णा शेवटच्या श्वासापर्यंत क्रांतिकारी प्रेरणेने झुंजत राहणार आहेत. संघर्षाचा महाप्रवाह तयार करणार आहेत.''

पश्चिम महाराष्ट्रात धरणग्रस्तांच्या प्रश्नांमध्ये नागनाथ अण्णांचे सतत बरोबर असणारे कासेगावचे डॉ. भारत पाटणकर लिहितात, ''महाराष्ट्राच्या परिवर्तनाच्या क्रांतिकारक चळवळीच्या इतिहासात अनेक वादळी व्यक्तिमत्त्वे होऊन गेली. काही युगप्रवर्तक होती. काही युगावर ठसा

उमटवणारी होती. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी नावाचे परिवर्तनाचे वादळ विसाव्या शतकाच्या उत्तरार्ध आणि एकविसाव्या शतकाची सुरवात या कालखंडात महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि सहकारी क्षेत्रावर खास ठसा उमटवणारे आहे.

धरणग्रस्त आणि लाभक्षेत्रातले दुष्काळग्रस्त यांची संपूर्ण देशाला आदर्श ठरणारी क्रांतिकारी चळवळ अण्णांच्या नेतृत्वाखाली आज उभी आहे. यामुळे धरणग्रस्त विरोधी लाभक्षेत्रातल्या जनतेला उभे करुन स्वत:ची पोळी भाजणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे कंबरडे मोडले. आज अण्णा महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषदेचे अध्यक्ष आहेत. धरणग्रस्तांना स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणे विकास सैनिक म्हणून सर्व सवलती मिळाव्यात, जमिनीबरोबरच घरटी एक नोकरी देऊन आधी पुनर्वसन–मगच धरण ही घोषणा व्यवहारात आणावी, असे अण्णांचे स्वप्न साकार होण्यापलीकडे चळवळ जात आहे. पाण्याचे समान वाटप होऊन भूमिहिनांसह सर्वांना पाण्याचा समान वाटा मिळाला पाहिजे अशी मूलभूत मागणी घेऊन अण्णांच्या नेतृत्वाखाली सातारा, सांगली,सोलापूर जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त जनता लाखोंच्या संख्येने गेली आठ वर्षे तीव्र आंदोलन करीत आहे. सामाजिक, आर्थिक समतेची गेल्या पन्नास–साठ वर्षातली ही सर्वात मोठी परिवर्तनवादी चळवळ आहे. अण्णांच्या क्रांतिकारक जीवनातली ही अत्युच्च शिखर गाठणारी चळवळ आहे.

ज्या क्रांतिवीरांच्या अंगावरील कपड्यांना खिसाच नसतो, असा हा क्रांतिवीर आधुनिक काळातल्या तरुणांनी नव्या जमान्यातल्या बदलत्या वास्तवात पुढे आणलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाशी समरस होतो. भारतातील आख्या डाव्या नेतृत्वाच्या कल्पनेने बाहेरची झेप घेतो हे त्यांचेतले खरे वादळ आहे.

या वादळाचे रसायनच आगळे आहे. मानव मुक्तीच्या क्षणाला, खऱ्या खुऱ्या मानवी स्वातंत्र्याच्या समाजाला सत्यात आणणारी त्यासाठी वेगवान चळवळ उभी करणारी अनेक वादळे जन्माला घालणारे हे वादळ आहे. या तरुण वादळाचे नाव आहे क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, ८० व्या वर्षात प्रवेश करणारे.''

श्री. विजय चोरमारे दै. सकाळमध्ये लिहितात, ''नागनाथ अण्णा नायकवडी हे काही वेगळेच रसायन आहे. आज ८० च्या घरात असतानाही त्यांचा लोकलढ्यातील सातत्यपूर्ण सहभाग थक्क करुन टाकतो. आपल्या चार तपांहून अधिक काळ सार्वजनिक जीवनातल्या कार्याने अण्णांनी काय कमाई केलीय, असा विचार केला तर एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे जिथे अण्णांचा सहभाग असतो त्या चळवळीला, लढ्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त होते. म्हणून लढणाऱ्या अनेक घटकांना अण्णांचा सहभाग हवा असतो. जिथं जिथं प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द काही लढाई चाललीय, तिथं अण्णा आवर्जून हजेरी लावतात. लढणाऱ्यांना रसदही पुरवतात. त्या बळावर लढणारी मंडळी अखेरच्या क्षणापर्यंत लढत राहतात.

कोयनेमुळे विस्थापित झालेल्यांची संख्या मोठी होती. परंतु लहान मोठ्या प्रकल्पानं कमीजास्त संख्येनं लोकांना विस्थापित केलंय. आधी खणाला खण आणि फणाला फण देण्याची भाषा करणारे लाभधारक पुन्हा ढुंकूनही प्रकल्पग्रस्तांकडे पाहत नाहीत. अशा सर्वच धरणग्रस्तांसाठी अण्णांच्या पुढाकारानं एक व्यापक लढा उभा राहिला. तो आजही सुरु आहे.

तीन चार महिन्यांपूर्वीची घटना आहे. कोल्हापूर जिल्ह्यातल्या धरणग्रस्तांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. मागण्या मान्य होईपर्यंत हटायचे नाही अशा



निर्धाराने धरणग्रस्त निघाले होते. आंदोलन सुरु होते.तोपर्यंत दररोज सकाळी–सायंकाळी वाळव्याहून आंदोलकांसाठी जेवण येत होतं. हे एक नाही अशी अनेक उदाहरणे आहेत.

उत्तरेत फुले–शाहू–आंबेडकर यांचे विचार रुजविण्याचा प्रयत्न कांशीराम करीत होते. अण्णांच्या दृष्टीने तो एक आशेचा किरण होता. कांशीराम यांना महाराष्ट्रात येण्यासाठी त्यांनी सहकार्य केले. ऋणानुबंध घट्ट जुळले, पण कांशीराम यांच्या बहुजन समाज पक्षाने जेव्हा भारतीय जनता पक्षाशी युती केली तेव्हा क्षणात अण्णांनी बहुजन समाज पक्षाबरोबरचे संबंध तोडले. बाबरी मशिदीच्या घटनेनंतर जातीयवादी शक्तींच्या विरोधात आणि अल्पसंख्याकांच्या बाजूने मुलायमसिंग आक्रमक झाले होते. अण्णांनी त्यांच्या समाजवादी पक्षाला जवळ केले. आज ते या पक्षाचे राज्याचे अध्यक्ष आहेत.

गेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि समाजवादी पक्षाची युती झाली. कराड लोकसभा मतदारसंघाची जागा अण्णांसाठी समाजवादी पक्षाला हवी होती. अण्णांचे कार्यकर्ते आग्रही होते. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसनेही श्रीनिवास पाटील यांच्यासाठी प्रतिष्ठेचा प्रश्न केला होता. पक्ष आणि कार्यकर्तेही टोकाचे आग्रही असताना अण्णांनी त्यांची समजूत काढली. जातीयवादी पक्षाबरोबरच काँग्रेसलाही पराभूत करण्याची संधी असताना आपण आग्रह धरणे योग्य नाही अशी भूमिका घेऊन रिंगणातून अण्णा बाजूला झाले.

ते कुठल्याही राजकीय पक्षात असले तरी त्यांचा पक्ष लढणाऱ्याचाच राहिला. प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांचं (वडाप) आंदोलन हे ताजं उदाहरण आहे. कर्ज काढून गाड्या घेऊन बेरोजगार तरुण पोट भरताहेत. सरकार त्यांच्या पोटावर मारतंय, म्हटल्यावर अण्णा त्यांच्या लढ्यात सहभागी झाले.

इतकं सगळं करुनही मी कुणीच नाही, अशीच त्यांची भावना असते. एका हातानं दिलेलं दान दुसऱ्या हाताला कळू नये इतक्या सहजतेने ते चळवळींना मदत करतात. हुतात्मा किसन अहिर कारखान्याच्या शेतकऱ्यांच्या वतीने मदत असल्याचे नम्रपणे सांगतात. लढणाऱ्यांच्या पाठीवर हात ठेऊन ''लढ'' म्हणणारे कुणीतरी असावं लागतं. नागनाथ अण्णा नायकवडी असेच लढणाऱ्यांना बळ देत आलेत, आधार देत आलेत आणि स्वत:ही लढत राहिले''

डॉ. अच्युत माने नागनाथ अण्णांच्याबद्दल लिहितात, ''एखादाच ज्योतिबा, एखादाच गांधी, एखादाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर युगप्रवर्तक कामगिरी करुन मानवी समुहाला अस्मिता देऊन जातो. त्यांच्या जीवनात जे संघर्ष त्यांना करावे लागतात त्यातून तावून सुलाखुन ही व्यक्तिमत्त्वे वादळातून वर उठतात आणि पुढच्या अनेक पिढ्यांना आदर्शवत ठरतात. त्यांचे हौतात्म्य वाया जात नाही तर ते पुढील काळाला प्रेरक ठरते. अशाच एका धगधगत्या व्यक्तिमत्त्वाने आजच्या 'पडझड' सुरु असलेल्या काळातही आपले चैतन्यमयी जीवन सर्वसामान्य कष्टकरी जनतेसाठी वाहिलेले आपण पाहातो. 'तेव्हा सारेच दीप मंदावले' अशी जरी परिस्थिती असली तरी आता पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली अशी उमेद मनात निर्माण होते. अशीच एक सदैव हातात मशाल घेतलेली व्यक्ती म्हणजे क्रांतिवीर नागनाथ नायकवडी. परिवर्तनाची भाषा बोलणारे खूप भेटतांत, पण परिवर्तनासाठी आपले जीवन सर्वस्व देणारे अभावानेच आढळतात. त्यापैकी नागनाथ अण्णा हे एक आहेत. आपल्या जीवनाचे ध्येय अण्णांनी ठरविलेले आहे. म. गांधींच्या विचारातील नैतिकतेचा विचार हा महत्त्वाचा आहे. ही नैतिकताच जीवनाला बळ देत असते. नैतिक अधिष्ठानावर ज्यांचे जीवन उभे आहे. त्या जीवनात क्षुद्र तडजोडी, स्वार्थ नसतो. ही

नैतिकता अण्णांच्या जीवनातील सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. त्यामुळे राजकारण, सहकार, शिक्षण, सामाजिक लढे एवढेच नव्हे तर साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रातही निश्चित विचारांचा पाठपुरावा करताना त्यांनी आपल्या आयुष्यात कधीही तडजोड केली नाही. त्यांना थकवा, कंटाळा, विश्रांती हे माहीतच नाही. सतत ध्येयाच्या दिशेने झेपावणारे हे व्यक्तिमत्त्व काळाच्या आणि वेळेच्या बंधनातून कधीच मुक्त झालेले आहे.

अण्णाभाऊ साठेंनी म्हटल्याप्रमाणे ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नव्हे तर श्रमिकांच्या श्रमावर, घामावर तरलेली असेल तर या कष्टकऱ्यांच्या वाट्याला त्याच्या वाट्याचे स्वातंत्र्य जायला नको का? कुणी निर्माण केले हे पृथ्वीचे दिसणारे वैभव? तो निर्माण करणारा उपाशी आणि त्याच्या जिवावर चालणारी मूठभरांची पंचतारांकित चैन! जो आजही अंधारात आहे त्याला सूर्य भेटला पाहिजे, त्याला हक्काची भाकरी मिळाली पाहिजे यासाठीच धरणग्रस्तांची चळवळ अण्णांनी उभी केली. शेतमजूर, शेतकरी-कष्टकरी संघटना स्थापन केली.

अण्णांनी ज्याप्रमाणे हुतात्मा किसन अहिर आणि हुतात्मा नानकसिंग यांच्याकडून प्रेरणा घेऊन जीवनज्योत पेटविली आहे. तसाच निर्धार कष्टकऱ्यांनी स्त्रियांनी, दलितांनी करुन अण्णांना आदर्श मानून चाललेला प्रवाह निर्धारित आणि व्यापक बनविला तर या भ्रष्ट व्यवस्थेला हादरा देता येईल. श्रमाला मूल्य येण्यासाठी आता हे करणे अटळ आहे. या दृष्टीने तरुण पिढीसाठी नागनाथ अण्णा ही एक प्रेरक शक्ती आहे. ही शक्ती आम्हा सर्वांसमोर राहावी यासाठी त्यांना अधिकाधिक आयुष्य लाभावे. त्यांच्या ८० व्या वाढदिवशी तरुणांनी त्यांच्या कार्याचा वसा घेण्याचा निर्धार करावा.''

कासेगांवच्या श्रीमती इंदूताई पाटणकर लिहितात ''१५ जुलै २००१ रोजी क्रांतिगौरव समारंभ आहे. क्रांतिगौरव वर्षारंभ आहे. अगदी उचित असं नाव आहे या समारंभाला. मला अण्णांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनानंतर या स्वतंत्र भारताच्या आपल्याच लोकांनी चालविलेल्या या राज्यामध्ये दुसऱ्या स्वातंत्र्याची जी लढाई केली आहे ती महत्त्वाची वाटते.

त्यांच्या ज्या साखर कारखान्याला विरोध झाला तो साखर कारखाना ''हुतात्मा पॅटर्न'' म्हणून महाराष्ट्रात नव्हे भारतात प्रसिध्द झाला. शेतकऱ्यांना योग्य दर देण्याचा पायंडा अण्णांनी पाडला.''

दै. अग्रदूत सांगलीचे श्री.कुंभोजकर लिहितात ''नागनाथ अण्णांची नजर आजही अत्यंत तीक्ष्ण अशीच आहे. त्यांच्या शाळेसमोरील वाळूतून जाताना एखादी टाचणी दिसली तरी ते थांबून टाचणी उचलून घेतात. क्रांतिवीर अण्णांनी आपल्या आयुष्यात वेळेला अत्यंत महत्त्व दिले आहे. कोणताही समारंभ असो, वेळेपूर्वी त्या जागेवर ते हजर असतात. हुतात्मा साखर कारखाना निघण्यापूर्वी किर्लोस्कर कंपनीच्या मदतीने अण्णांनी पाण्याची योजना पुरी केली त्यावेळी त्यांच्याकडे गाडी नव्हती. सांगलीतील श्री. वाईंगडे यांची गाडी अधून मधून ते भाड्याने घेऊन जात. कारखाना सुरू झालेनंतर अण्णा अचानक सांगलीला आले. मला घेऊन श्री. वाईंगडे यांचे घरासमोर गाडी उभी केली. श्री. वाईंगडे बाहेर येताच त्यांच्या हातावर सहाशे रुपये ठेवले आणि सांगितले, 'मागे तुमचे टॅक्सी भाडे राहिले होते. आश्चर्याने व कृतज्ञतेने त्यांनी अण्णांना नमस्कार केला. अण्णांचे सारे जीवन जिद्द आणि इर्षेने भरुन गेलेले आहे.''

* * * *



## (ड)
## वाढदिवस सोहळा

वाळव्याच्या, सांगली जिल्ह्याच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय इतिहासात ज्याची नोंद व्हावी अशा क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या ८० व्या वाढदिवसाचा सोन्याचा दिवस १५ जुलै २००१ रोजी सोनेरी किरणाने उजाडला. बरोबर १४ जुलैची मध्यरात्र रात्री १२ वाजता संपली आणि नागनाथ अण्णांनी शुचिर्भूत होऊन वाढदिवसाचा केक कापला. हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणामध्ये भव्य मंडप उभारला होता. आकर्षक व्यासपीठ उभारले होते. व्यासपीठावर नागनाथ अण्णांच्या प्रचंड सभेचे चित्र लावले होते. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, सावित्रीबाई फुले, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेची कट-आऊट लावली होती. अशा प्रसन्न वातावरणामध्ये क्रांतिवीर नागनाथ अण्णा व सौ. कुसुमताई नायकवडी पहाटे पासून समारंभस्थळी स्थानापन्न झाले होते.

बरोबर ८ वाजता अण्णांच्या वाढदिवसानिमित्त जिजामाता विद्यालयाचे कला शिक्षक अनिल शेजाळे व विजय नांगरे यांनी चितारलेल्या रांगोळी, अण्णांच्या जीवन कार्य प्रसंग आधारित पोस्टरचे उद्घाटन झाले. त्या प्रदर्शनास हजारोंनी दाद दिली. त्याच वेळी वाळवा येथील वीर सेवादलाने व्यसनमुक्ती फेरी काढली. तिची सुरुवात वैभव नायकवडी यांच्या हस्ते झाली. ढोल ताशांचे गजरात शेकडो तरुण या फेरीत सहभागी झाले होते. गांधी तालमीच्या मल्लांनी धावत्या ट्रॅक्टर ट्रॉलीत मल्लखांबाची प्रात्यक्षिके केली. गावातील प्रमुख रस्त्यावरुन ही फेरी समारंभाच्या ठिकाणी आली. सकाळी ११ वाजता सभा स्थळी दिघंचीचा छोटा शाहीर ज्ञानेश्वर रणदिवे, शाहीर कुंतिनाथ नरके, हरिभाऊ नरके, शाहीर संजय जाधव यांनी शाहिरी कार्यक्रम रंगवला. तसेच देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम झाला. पडवळवाडीच्या ग्रामस्थांनी घरोघरी गुढ्या उभारल्या

होत्या व प्रत्येकाचे घरी आंबा व नारळाच्या झाडांची रोपे लावली होती. बलवडी क्रांतिस्मृती वनामध्ये किर्लोस्कर ब्रदर्सनी दिलेल्या ८ हजार केळी व अजित पाटील व अरुण पाटील यांनी दिलेली ८० गुलाब रोपांची लागवड हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचे चेअरमन शामराव सव्वाशे यांच्या हस्ते केली.

धुळे, नंदुरबार, उरमोडी, कोयना, वारणा, परिसरातील जनता, सांगली, आटपाडी, विटा, तासगांव, कवठेमहांकाळ, जत, इस्लामपूर शिराळा येथील अण्णांचे चाहते हजारोंच्या संख्येने आले होते. जादा एस. टी. बसेस सोडण्यात आल्या होत्या. वाळवा येथील हुतात्मा चौक ते हुतात्मा किसन अहिर विद्यालयापर्यंतचा रस्ता डांबरी केला होता. उपस्थित २० हजार लोकांची जेवण्याची व मुक्कामास आलेल्यांची राहण्याचीही सोय केली होती. मुख्य सत्कार समारंभाचे वेळी कोणीही हार गुच्छ आणू नयेत अशा सूचना दिल्या होत्या.

क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या गौरव समारंभास हजारोंचा जनसागर लोटला होता. महाराष्ट्राच्या काना–कोपऱ्यातून लोक आले होते. वाळवा परिसरातील प्रत्येक घरातील व्यक्ती या समारंभास नटून थटून उपस्थित होत्या. शनिवारी सायंकाळपासूनच नागनाथ अण्णांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी रांग लागली होती. हुतात्मा संकुलातील शाळेतील हॉलमध्ये नागनाथ अण्णा सर्वांच्या शुभेच्छा स्वीकारत होते. परिसरातील शाळकरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची खूप मोठी रांग लागलेली होती. येणाऱ्या प्रत्येकाला पेढे देऊन संयोजक कार्यकर्ते स्वागत करीत होते. आग्रहाने जेवण करणेस नेत होते.

मुख्य गौरव समारंभाची सुरुवात दुपारी बरोबर १ वाजता झाली. क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या हस्ते हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तत्पूर्वी अण्णांनी हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. सांगलीच्या शांतिनिकेतन कला महाविद्यालयाच्या वतीने अण्णांच्या प्रतिमेची आकर्षक रांगोळी रेखाटण्यात आली होती. ती पाहुन नागनाथ अण्णा व्यासपीठावर आले तेंव्हा हजारोंच्या संख्येने जमलेल्या स्त्री–पुरुष, मुला–मुलींनी तसेच उपस्थित मान्यवरांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करुन स्वागत केले.फटाक्यांची आतषबाजी व हुतात्मा किसन अहिर व नागनाथ अण्णांच्या विजयाच्या, झिंदाबादच्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता. कॉ. नाना शेटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व डॉ. भारत पाटणकर यांनी प्रास्तविक केले.शाहिर संभाजी भगत यांचा पोवाडा आणि डॉ. बाबा आढाव यांनी गायलेल्या गीतांनी समारंभाला चांगला सूर मिळाला. त्यानंतर क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांना क्रांतीचे प्रतिक असलेली चांदीची मशाल, शाल आणि श्रीफळ देऊन प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या हस्ते मोठ्या थाटात सत्कार करण्यात आला. तेव्हा उपस्थित जनसमुदायाने एकच जल्लोष केला.सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थानी साथी निळू फुले होते.

यावेळी बोलताना प्रा. ग. प्र. प्रधान म्हणाले, ''क्रांतिसिंहांच्या या भूमीत क्रांतिवीराचा सत्कार करावयाला मला मिळाले हे माझे भाग्य समजतो. भांडवलशाही आणि प्रतिगामी शक्तींविरुध्द लढा देऊन त्यांचा नि:पात करण्याची गरज आहे. त्यासाठी नव्या पिढीने या लढ्यात सहभागी होण्याची आवश्यकता आहे. केंद्रातील जातीयवादी सरकार पुन्हा चातुर्वर्ण्य



आणण्याचा प्रयत्न करीत आहे. जागतिकीकरणामुळे देशातला शेतकरी भरडला जात आहे. गेल्या २५ वर्षात राजकर्त्यांनी नाळ तोडून टाकलेली आहे. त्यासाठीच या संघटित लढ्याची आवश्यकता आहे. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी दिल्लीतील सिंहासन डळमळायला लावलेले होते. तसा लढा देण्यासाठी नागनाथ अण्णांच्या नेतृत्वाखाली पुढे आले पाहिजे. १९४२ पासून माझे आणि नागनाथ अण्णा यांचे संबंध आले आहेत. अण्णा या लढ्यात अगदी झुंजारपणे लढायचे. मी त्यांचा इतिहास वाचत होतो. स्वातंत्र्यातील लढे आणि आताचे सामाजिक लढे यांच्या असंख्य जखमा अण्णांनी आपल्या अंगावर झेलल्या आहेत. धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, गोरगरीब यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचे हे लढे चालू आहेत. त्यांच्या या लढ्याला आणखी ताकद मिळाली की त्याचे रूपांतर मोठ्या लढ्यात होऊ शकते.''

प्रा. एन. डी. पाटील म्हणाले, ''केंद्रातल्या भाजप आघाडी सरकारने या देशातल्या शेतीचं कंपनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. तुमची जमीन आमच्या ताब्यात द्या, अशीच सरकारची भूमिका आहे. उद्योगपतींनी कंपन्या काढून त्या बुडवल्या, म्हणून आता शेतीचेही कंपनीकरण होऊ घातलेले आहे. या शेतीतून शेतकऱ्यांनाच हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला जातोय. जागतिकीकरणाचे तर फार मोठे संकट निर्माण झाले आहे. त्याविरुध्द एक आवाजाने तोंड देण्याची आवश्यकता आहे. आपला शत्रू हा कपटी आहे. तो प्रबळ आहे. त्याला तोंड देताना मोठी ताकद लावली पाहिजे. त्यासाठी एकट्या दुकट्याचा आवाज पुरेसा पडणार नाही. आमच्या शेतकऱ्यांसाठी जगाची बाजारपेठ खुली करण्यात आली आहे, असा आभास केंद्र सरकार निर्माण करीत आहे. त्यांनी आमच्याकरिता जगाची बाजारपेठ खुली केली आहे, हे खरे आहे पण आपली बाजारपेठ त्यामुळे उजाड झाली आहे. त्याचे काय? इतर देशातील शेतकऱ्यांना सरकारकडून मोठ्या सवलती मिळतात. त्यांना कमी किमतीत खतांचा पुरवठा केला जातो. ती परिस्थिती आपल्या देशात नाही. उलट हे सरकार हात धुवून शेतकऱ्यांच्या पाठीशी लागलेले आहे.जपानमध्ये ३० गुंठे जमीन असलेला शेतकरी पॉवर टिलर घेऊ शकतो. पण आपला शेतकरी आधीच प्रचंड कर्जबाजारी झाला आहे. तो स्पर्धेत कसा काय उतरणार? म्हणूनच त्याविरुध्द संघर्षात्मक चळवळ उभारली पाहिजे. दिल्लीतील सरकार क्रांतीच्या खुणा पुसून टाकणारे सरकार आहे. ते धर्म, जाती आणि समाजात संकुचित विचार पसरवत आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांना न्याय मिळत नाही. म्हणूनच क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी श्रमजीवी चळवळ उभी केली आहे. सर्वसामान्यांचा आवाज उठल्याशिवाय क्रांती होणार नाही.''

विद्रोही साहित्य चळवळीचे अध्वर्यू डॉ. आ. ह. साळुंखे म्हणाले, ''वाळव्याच्या या भूमीने ८० वर्षा पूर्वी एक सुंदर स्वप्न पाहिलेले आहे. ही आनंददायी आणि अभिमानाची गोष्ट आहे. महाराष्ट्रात अण्णांनी हजारो व्यक्तींना आधार दिला आहे. पाच पन्नास चळवळींना त्यांनी बळ दिले आहे, हे त्यांच्या कार्याचं वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सामान्यत: जी माणसं प्रस्थापितांविरुध्द संघर्ष करतात तीच अशा चळवळीच्या माध्यमातून समाजासाठी झोकून देत असतात.नागनाथ अण्णा हे प्रस्थापितांविरुध्द सतत संघर्ष करीत आले आहेत. त्यांनी जनतेला निर्भय आणि बलवान बनविण्याचे काम केले. कारखाना, शाळा, सामाजिक चळवळ यात त्यांनी

केलेले काम अजोड आहे. आज येथे लोकांच्या भावनेच्या विचारांचे उत्सवात रुपांतर झाले आहे. पण तीच ताकद अण्णांच्या चळवळीसाठी लावणे आवश्यक आहे. तरच अण्णांचे विचार पिढ्यानपिढ्या जगातील ही प्रेरणा घेऊनच कामाला लागले पाहिजे.''

साथी निळू फुले म्हणाले, ''बहुजनांच्या ज्या ज्या चळवळी आहेत, त्याचं नेतृत्व बहुजनांनी केले तरच प्रश्न सुटतील, त्याचे नेतृत्व एका विशिष्ट जातीनेच करुन चालणार नाही. विविध संघटनेचा नेता ब्राम्हणच कसा किंवा विविध मासिकाचा संपादक ब्राम्हणच कसा असा प्रश्न विचारला जात होता. पण आज ती वेळ निघून गेली आहे. नागनाथ अण्णांनी आज प्रामाणिकपणे बहुजनांची चळवळ आणि जी शक्ती उभी केली आहे तिच्या पाठीशी मी ढोल वाजवत राहणार आहे. अण्णांना कसलं म्हणून व्यसन नाही. ८० व्या वर्षीही त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. चळवळीत ते १०-१० मैल चालत अग्रभागी असतात, हे आश्चर्यच म्हणावे लागेल. मी आयुष्यभर तोंडाला रंग लावून नाटक व चित्रपटात काम केले, राजकीय पक्षात तर रंग न लावताच नाटक करीत असतातं. पण नागनाथ अण्णांच मात्र रंगही नाही आणि राजकारणही नाही म्हणून तर मी या चळवळीत सहभागी झालो.''

धरणग्रस्तांचे नेते डॉ. बाबा आढाव म्हणाले, ''कर्मवीर अण्णा, क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ. दत्ता देशमुख या सर्वांचे गुण एकत्रित असलेले क्रांतिवीर नागनाथ अण्णा हे अजब रसायन आहे. जातीपातीच्या व धर्माच्या पलिकडे जाणारे क्रांतिवीर अण्णा हे व्यक्तिमत्त्व आहे.गोरगरीबांना न्याय देण्यासाठी 'हम सब एक' म्हणून काम करण्याची आवश्यकता आहे. मरणाच्या दारात कष्टकरी जनतेने दिलेली साथ महत्त्वाची मानून त्यांच्यासाठी क्रांती करण्याचा व धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्तांचा लढा चालविण्याचा निर्धार आम्ही केला आहे. या लढ्याला आधार नागनाथ अण्णांच्यामुळेच आला आहे.''

हुतात्मा दूध संघाचे संस्थापक वैभव नायकवडी म्हणाले, ''क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा या वयात देखील विशीतील तरुणाला लाजवेल असा उत्साह आहे. अपेक्षित स्वातंत्र्य न मिळाल्यामुळे स्वातंत्र्यानंतर क्रांतिवीरांनी चळवळ उभी केली. कुटुंबाची चिंता न करता आजपर्यंत काम केले. क्रांतिवीरांच्या स्वप्नातील स्वातंत्र्य मिळविण्यासाठी व त्यांची मनिषा पुरी करण्यासाठी जिवाची पर्वा न करता साथ करावी.''

ॲड. धैर्यशील पाटील म्हणाले, ''नागनाथ अण्णा हे व्यक्ती राहिले नाहीत तर ते शक्ती झाले आहेत. या देशातून ब्रिटीश निघून गेले पण भांडवलदारांचे वर्चस्व निर्माण झाले. हे खरे खुरे स्वातंत्र्य नव्हे म्हणून नागनाथ अण्णांनी चळवळ उभी केली.या चळवळीच्या पाठीमागे हुतात्मा कारखाना उभा राहिला. त्याचबरोबर चळवळीच्या पाठीमागे वर्गविचार उभा आहे. अण्णांचा प्रवास हा प्रवाहाच्या उलटा असून त्यांनी सर्वसामान्य कष्ट करणाऱ्यांचे राजकारण उभे केले. हा गौरव म्हणजे कष्टकऱ्यांनी दिलेली पोच पावती आहे.''

पणनमंत्री ना. गणपतराव देशमुख म्हणाले, ''स्वातंत्र्योतर काळात झालेल्या चळवळींपैकी नागनाथ अण्णांच्या चळवळीचं स्थान अग्रक्रमाचं आहे. दुष्काळी जनतेचे दुःख, दारिद्र्य नष्ट व्हावे यासाठी ही चळवळ पुढे गेली पाहिजे. चळवळ पुढे नेण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन देत आहे.''



सौ. कुसुमताई नायकवडी म्हणाल्या, ''चळवळीतील शौर्य, साहस, कर्तव्य नवयुवकांनी करावे, त्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून हा समारंभ आयोजित केला आहे. स्वातंत्र्य लढ्यात अण्णांनी झोकून दिल्यानंतर घरच्या लोकांनी आधार दिला. सत्तेचे व स्वार्थाचे राजकारण न करता बहुजन समाजातील राबणाऱ्यांच्या अडचणी, दुःख दूर करण्यात धन्यता मानली. आयुष्यभर घराबाहेर असणाऱ्या अण्णांना स्वार्थीपणाचा लवलेशसुध्दा नाही. घरच नाही तर मिळवायचं कशासाठी? अस म्हणून त्यांनी काम केले. सध्याच राजकारण गढूळ झालं आहे. म्हणून विचारात व आचारात गढूळपणा आणू न देता आचार विचार सुधारुन एकत्र येऊन विकास करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. भावी पिढी आदर्श बनविण्यासाठी मुलांना चांगले वळण लावण्याची जबाबदारी महिलांची आहे. समस्या व प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी सशक्त महिलांची गरज आहे. जोपर्यंत महिला सशक्त बनत नाहीत तोपर्यंत आर्थिक विषमता बदलणार नाही. यापुढेदेखील काहीही अपेक्षा न करता चळवळी यशस्वी करण्यामध्ये साथ देण्याचे आश्वासन देत आहे.''

याचप्रमाणे कॉ. यशवंतराव चव्हाण, डॉ. बाबूराव गुरव, माजी केंद्रीय मंत्री बबनराव ढाकणे, माजी खासदार अनंतराव पाटील यांची भाषणे झाली.

या समारंभासाठी खासदार श्रीनिवास पाटील, माजी खासदार कल्लाप्पा अण्णा आवाडे, श्रीपतराव शिंदे, दौलतराव निकम, संभाजीराव थोरात, भाई गणपतराव कोळी, बागल विद्यापीठाचे बाबूराव धारवाडे, माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर, रयत शिक्षण संस्थेचे डॉ. प्रतापराव माने, हिंदकेसरी गणपतराव आंदळकर, आमदार नरसिंह गुरुनाथ पाटील, भिशीकर गुरुजी, स्वा.सैनिक दत्तू लोहार, आप्पासाहेब पाटील, धोंडीराम पाटील, दीपक साळुंखे, सांगोला सूतगिरणीचे अध्यक्ष जगन्नाथ लिंगाडे, विलास रकटे, किशोर पवार, बी. आर. पाटील, आर. बी. शिंदे, शंकरराव नलवडे, शांताराम गरुड, भिकशेठ पाटील, पन्नालाल सुराणा, बुधाजीराव मुळीक, रामभाऊ कोळेकर, विवेक कांबळे, सनतकुमार आरवाडे, लक्ष्मण माने, संपतराव पवार, यशवंत एकनाथ पाटील यांच्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्रचंड संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

सत्कारास उत्तर देताना क्रांतिवीर नागनाथ नायकवडी म्हणाले, ''आपण एखाद्या पाहुण्याच्या घरात जातो तेव्हा आत चहाच्या तयारीचा आवाज ऐकतो आपण लगेचच चहा घेत नाही असे म्हणू शकत नाही. माझी तशी अवस्था झाली. माझ्या अवतीभोवतीची मंडळी वाढदिवसाच्या समारंभाची तयारी करीत आहेत अशी चाहूल मला लागली होती. परंतु या समारंभाचाही भविष्यातील चळवळीसाठी उपयोग होईल असे मला वाटले. त्यामुळे मी या समारंभाला मंजुरी दिली. माझ्या ६१ व्या वाढदिवसाच्या वेळी कुणी असा समारंभ करतो असे म्हणाले असते तर मी जाहीर विरोध केला असता. आज येथे जमलेली गर्दी केवळ नागनाथ नायकवडीसाठी आहे असे मी मानत नाही. व्यासपीठावर अनेक थोर लोक हजर आहेत. ते काय सांगतात, ते ऐकायला ही गर्दी जमली आहे. व्यासपीठावरील सर्वजण जनतेच्या प्रश्नासाठी एकत्र राहणारच, त्याशिवाय कामगारांच्या प्रश्नांची तड लागणार नाही. साखर कारखान्यांना केंद्र सरकारने लागू केलेल्या आयकराच्या विरोधात ३० सप्टेंबर २००१ रोजी कोल्हापूर येथे गांधी मैदानावर मोठी सभा घेऊन प्रचंड ताकद निर्माण करायची असून दिल्लीतील सरकारला हिसका

दाखवून द्यायचा आहे. तसेच केंद्राच्या मंत्र्यांपुढे मोठे संकट तयार करायचे आहे. ३० सप्टेंबर रोजीच्या सभेला सांगली, सातारा, कोल्हापूर या तीन जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे संचालक, कर्मचारी आणि सभासद प्रचंड संख्येने उपस्थित राहतील. आयकर रद्द झालाच पाहिजे असा हा लढा तीव्र स्वरुपात असायला हवा. त्यासाठी राज्यातील साऱ्या साखर कारखान्यांनी एकत्र आले पाहिजे. आयकराचा हा विषय अत्यंत गंभीर आहे. कारण एकेका कारखान्यांना २०-२० कोटीच्या आयकराच्या नोटिसा आल्या आहेत. केंद्रातील हे सरकार ब्रिटीश सरकारपेक्षा भयंकर आहे. सहकारी कारखाने मोडीत काढण्याचाच त्यांचा डाव आहे.

आजवर आपण कधी सत्कार स्वीकारलेला नाही. पण कार्यकर्त्यांनी आणि सर्वसामान्य जनतेने ८० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने हा जो कार्यक्रम ठरविला, त्याला मी होकार दिला. कारण या निमित्ताने ग. प्र. प्रधान, निळू फुले, एन. डी. पाटील, आ. ह. साळुंखे आणि इतर अनेक लोकांचे विचार ऐकायला मिळाले आणि त्यातून या सामाजिक लढ्याला ताकद मिळणार आहे. त्यामुळे कष्टकऱ्यांच्या प्रश्नांची तड लागणार आहे. शिवाय जनतेच्या प्रश्नांवरही सर्व मंडळी एकत्र राहतील, त्याचे एक समाधान आहे. तसेच २६ जुलै २००१ रोजी आटपाडीत दुष्काळ पाणी परिषदही होणार आहे त्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे.''

या समारंभाचे प्रसंगी प्रा. ग. प्र. प्रधान यांनी जाहीर केले की, नागनाथ अण्णांचे नावाने गौरव समितीच्या वतीने ट्रस्ट स्थापन करण्यात आला असून त्या ट्रस्टमध्ये आज अखेर ८० लाख रुपयांचा निधी जमा झाला आहे.

याच दिवशी पडवळवाडी येथील क्रांतिवीर नागनाथ नायकवडी सभागृहाचे उद्घाटन साथी निळू फुले यांच्या हस्ते संपन्न झाले. हुतात्मा बाबूराव कोकाटे स्मारकामध्ये, हुतात्मा बाबूराव कोकाटे आणि हुतात्मा प्रताप पाटील यांच्या प्रतिमेस निळू फुले यांनी पुष्पहार घातला.

तसेच पलूस तालुका जीप चालकांचे व मालकांचे वतीने नाना पाटील वसतिगृहातील मुलांना खाऊ वाटप स्वा. सेनानी जी. डी. लाड, ईश्वरबापू लाड, गोविंद पवार यांचे हस्ते करण्यात आले. त्यादिवशी जीप चालकांनी खाजगी वाहतूक मोफत केली होती.

इस्लामपूर शाळा नं. ४ मध्ये २७५ गरजू विद्यार्थ्यांना वही व पेन चे वाटप प्रांत ऑफिसर प्रदीप कडूसकर यांच्या हस्ते व प्रा. एन. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

यानंतर सांगली जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे जाहीर सत्कार करण्यात आले व विविध उपक्रमांद्वारे हे वर्ष क्रांती गौरव वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. त्याची नोंद महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासामध्ये 'सोनेरी अक्षरात' होईल असे वाटते.

* * * *



# ३७

## साखर उद्योग परिसंवाद

जसे सहकारी साखर कारखाने दिवसेंदिवस वाढत आहेत तसेच सहकारी साखर उद्योगात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे साखर कारखानदारी संकटात आहे. साखरेच्या किंमती कमी होत आहेत. त्याचबरोबर ग्राहकांकडून ५० किलोच्या पोत्याची मागणी होत आहे. तशा परिस्थितीत साखर कारखान्यापुढील प्रश्नांचे गांभीर्य केंद्र किंवा राज्य सरकारने मनावर घेतले नव्हते. अशी बिकट परिस्थिती असताना साखर उद्योगापुढील प्रश्न सोडवण्याकरिता चर्चा करुन मार्ग सुचवणे गरजेचे होते.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी स्वातंत्र्य मिळवणेसाठी हयात वेचली आहे. आता साखर उद्योगासमोरील अडचणी दूर करणेसाठी लढा उभा केला आहे. २००१ साली साखर उद्योगावर बसवलेला आयकर रद्द होणेसाठी त्यांनी चळवळ हाती घेतली होती. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा,सांगली,कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी कारखान्याचे प्रतिनिधी ऊस उत्पादन करणारे शेतकरी यांचे नेतृत्व नागनाथ अण्णांनी मोर्चे, निदर्शने करुन साखर उद्योगावरील आयकरास विरोध दर्शविला होता. त्यामुळे केंद्रीय अर्थ राज्य मंत्री बाळासाहेब विखे पाटील यांना नागनाथ अण्णा व शेतकऱ्यांना आयकर द्यावा लागणार नाही असे जाहीर करावे लागले होते.

तसेच पत्रकार परिषदेत साखर कारखान्यावरील आयकराच्या नोटिसा परत घेतल्या जातील असे जाहीर केले होते.

वाढदिवसानिमित्त नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या गौरव समितीच्या वतीने साखर उद्योगावरील परिसंवाद दिनांक १५ जुलै २००२ रोजी वाळवे येथे आयोजित केला होता. सुमारे १० हजार लोक बसतील असा भव्य मंडप उभारला होता. नियोजित परिसंवादात बोलताना

वैभव नायकडी म्हणाले की, 'साखर कारखान्यांमुळे केंद्र सरकारला या उद्योगापासून कोट्यावधी रुपये कर रुपाने मिळत असतात. मात्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. आयकराचा बोजा व साखरेचा उठाव होत नसलेने साखर कारखाने मोडीत काढणेची वेळ आली आहे. साखर उद्योग वाचला तरच शेतकरी, शेतमजूर, कामगार जिवंत राहू शकतील या भावनेतून या परिसंवादाचे आयोजन करणेत आले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत, विचारवंत भाग घेणार आहेत. क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या वाढदिवशी होणाऱ्या परिसंवादामुळे सहकारी साखर कारखानदारीस एक वेगळी दिशा देणारी ठरणार आहे. कारण हुतात्मा चळवळीचे प्रत्येक आंदोलन सरकारवर वचक निर्माण करणारे ठरले आहे. म्हणून होणारा परिसंवाद साखर उद्योगाला समज देणारा ठरेल.'

८१ व्या वाढदिवसानिमित्त सातारचे बॅ. पी. जी. पाटील यांनी नागनाथ अण्णा यांच्या जीवनावरील त्यांच्याशी १९३९ साली झालेला परिचय, सातारा जेलमधून बाहेर पडलेल्या वेळचा रोमहर्षक प्रसंग, कर्मवीर अण्णांना १ लाख रुपयाचा कृतज्ञता निधी अर्पण करणेचा समारंभ वगैरे सांगून स्वातंत्र्यानंतरच्या विधायक कार्याबद्दल त्यांनी लिहिले होते की, 'स्वातंत्र्य संग्रामाची चळवळ संपली, कार्यकर्ते पांगले, शे. का. पक्षानंतर कम्युनिस्ट पक्षात गेले. नागनाथ अण्णांनी विचारपूर्वक निर्णय घेऊन दैनंदिन राजकारणाच्या धबडग्यातून स्व:ला जरा बाजूला सारले व ते विधायक कार्याकडे विचारपूर्वक वळले. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना हे त्यांच्या दूरदृष्टीचे जिवंत स्मारक आहे. याच वेळी नागनाथ अण्णांनी एक माध्यमिक व एक उच्चमाध्यमिक विद्यालय चालवले आहे. क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, हुतात्मा बँक, हुतात्मा बझार, हुतात्मा दूध संघ, हुतात्मा पतसंस्था,हुतात्मा नानकसिंग विद्यालय, सावित्रीबाई फुले मुलींचे वसतीगृह व हुतात्मा नानकसिंग वसतीगृह, मुलांचे वसतीगृह स्थापन करुन सामाजिक कामाला शिक्षणाची जोड दिली आहे, ही एक कौतुकास्पद गोष्ट आहे.'

वाढदिवसानिमित्त लिहिताना पुण्याचे डॉ. बाबा आढाव म्हणतात, ''क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या वयाचे ८१ वर्ष सुरु होत आहे. आम्हाला कोंडाण्याच्या लढाईत तानाजीच्या मदतीला धावणाऱ्या शेलार मामांची आठवण येते. वयाची तमा न बाळगता अण्णा सतत लढत आहेत. तानाजी जवळ घोरपड होती. अण्णांच्या जवळ हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना आहे. या घोरपडीचा वापर करुन अण्णांनी अनेक गड-किल्ले सर केले आहेत. देशात अनेक स्वातंत्र्य सेनानी आहेत, परंतु ज्यांनी रणांगण सोडले नाही. त्यामध्ये अण्णांचा नंबर फार वरचा आहे. हे हक्काचे बोट जो पूर्णपणे धरु शकेल त्याचा कार्यभाग पूर्णपणे झालेशिवाय राहणार नाही. अण्णा गरिबांना विसरले नाहीत. गरिबांत राहणारा हा मनाचा श्रीमंत माणूस आहे. अण्णांच्या ठायी शाहू महाराज, संत गाडगे बाबा, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, नाना पाटील, दत्ता देशमुख आदींचे विलक्षण मिश्रण आहे. त्यांच्या जीवनाचे 'रसायन' अगदी न्यारे आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत रक्त सांडणारे अण्णा जीवनात अगदी विरक्त आहेत. ही विरक्तता त्यांचा मूळ वैचारिक पिंड व्यक्त करते. कॉ. दत्ता देशमुखांच्या नंतर महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी पुनर्वसन परिषदेचे नागनाथ अण्णां अध्यक्ष आहेत व ती जबाबदारी ते तन, मन, धनाने पेलत आहेत. कृष्णा खोरे व वारणा खोऱ्यातील धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त पुनर्वसनाची चळवळ त्यांच्या नेतृत्वाखाली चालू आहे. अण्णांचे भाषण मोजके असते. स्वातंत्र्याच्या



चळवळीतील हुतात्म्यांना वंदन करुन भाषणाची सुरुवात करतात व राजकारण, कष्टकऱ्यांची एकजूट व संघर्ष हे तीन मुद्दे स्पष्ट मांडतात.

अण्णां शोषक भांडवलशाहीवर तुटून पडतात. परंतु त्याचवेळी सहकार क्षेत्रात चारित्र्याचा व प्रगतीचा नवा आदर्श निर्माण करतात. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या व्यवहारावर त्यांचे बारकाईने लक्ष असते. शाहू छत्रपतींनी कोल्हापुरात पापाची तिकटी या ठिकाणी कांबळेंना हॉटेल काढून दिले. त्यांच्या प्रेरणेने अण्णांनी हुतात्मा कारखान्याच्या अध्यक्षपदी श्री. महादेव कांबळे यांची निवड केली. भारतात अशी एकमेव घटना असावी. स्त्रियांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन केवळ सहानुभूतीचा न बाळगता प्रत्यक्ष सहभागाबद्दल आग्रहाचा असतो. सौ. कुसुमताई नायकवडी स्वतंत्रपणे विचार मांडणी करतात. महात्मा फुल्यांनी 'स्त्री शुद्रातिशूद्र' हा शब्द प्रयोग वापरला. सांगली, कोल्हापुरात वावरणाऱ्या अण्णांना फेटा संस्कृतीचे वावडे आहे.

फुल्यांच्या भाषेत अण्णा कुळवाडी भूषण आहे. शाहू महाराज 'रयतेचे राजे' होते अण्णा 'रयतेचे नेते' आहेत. अण्णा रयतेला सोबत घेऊन उत्तर प्रदेशातल्या मुलायमसिंगांपर्यंत गेले आहेत. छत्रपती शाहू महाराज कुर्मी परिषदेत गेले होते. अण्णांचा संचार भारतभर चालतो. अनेक चळवळीचे ते खऱ्या अर्थाने आधारस्तंभ आहेत. परंतु एवढे म्हणून भागणार नाही. अण्णांची माया, तिचा अनुभव फार आगळावेगळा आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत आपल्याला मरण आले नाही याचा अर्थ अण्णा फार वेगळ्या शब्दांत व्यक्त करतात. त्यांच्या मते जी गोळी हुतात्मा किसन अहिर व नानकसिंग यांना लागली ती गोळी मला लागली असती तर संसार करता आला असता? मग ती गोळी मला लागली असे समजून घर संसार सोडून 'अवघे विश्वची माझे घर' असे का मानायचे नाही? आणि घराचा खऱ्या अर्थाने का त्याग करायचा नाही?''

डॉ. अच्युत माने वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करताना लिहितात, ''आपल्या जीवनाचे ध्येय अण्णांनी ठरविले आहे. महात्मा गांधींच्या विचारातील नैतिकतेचा विचार महत्त्वाचा आहे. ही नैतिकताच जीवनाला बळ देत असते. नैतिक अधिष्ठानावर ज्यांचे जीवन उभे आहे. त्या जीवनात क्षुद्र तडजोडी किंवा स्वार्थ नसतो, ही नैतिकता अण्णांच्या जीवनात सर्वश्रेष्ठ बनली आहे. त्यामुळे राजकारण, सहकार, शिक्षण, सामाजिक लढे एवढेच नव्हे तर साहित्य संस्कृतीच्या निश्चित विचारांचा पाठपुरावा करताना त्यांनी आपल्या आयुष्यात कधीही तडजोड केली नाही.

६ डिसेंबर १९९२ या बाबरी मशीद उद्ध्वस्तीकरणाच्या दिवसाने एकूणच भारतीय स्वातंत्र्याच्या दैदिप्यमान पार्श्वभूमीवर एक ठसठशीत काळा डाग निर्माण झाला. स्वकियांविरुध्द स्वकियांनीच पण सनदशीर मार्गाने क्रांती करणे आता आवश्यक आहे. त्या दिशेने चाललेल्या जनांच्या प्रवाहाला दिशा देणारी अण्णांच्यासारखी विभूती सर्व स्तरांपर्यंत पोहचवणे आवश्यक आहे. तरुण पिढीसाठी नागनाथ अण्णा ही एक प्रेरक शक्ती आहे.''

क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त भरलेल्या सत्कार समारंभात प्रथम हुतात्मा उद्योगाचे मार्गदर्शक वैभव नायकवडी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनंतर ज्येष्ठ विचारवंत यशवंतराव मोहिते यांच्या हस्ते नागनाथ अण्णांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ विचारवंत यशवंतराव मोहिते म्हणाले, ''झोनबंदी

उठवायचा सल्ला देऊन शेतकऱ्यांच्या हातातील सहकारी कारखानदारी मोडीस काढायला निघालेल्या शेतकरी संघटनेचा नेता शरद जोशी हाच खरा शेतकऱ्यांचा मोठा शत्रू आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी सहकारी साखर कारखानदारी शेतकऱ्यांच्या हाती सोपवली. विशेषत: महाराष्ट्रात ही चळवळ मोठ्या प्रमाणात रुजली आणि यशस्वी झाली. तथापि ब्राम्हण वर्गाला या सहकारी चळवळीमुळे आपले वर्चस्व नाहीसे व्हायला लागलेची जाणीव होऊ लागली आणि या जाणिवेतूनच ही यशस्वी झालेली चळवळ मोडून काढणेसाठी भाजपच्या नेत्यांनी डावपेच आखले आणि शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी कानमंत्र देऊन झोनबंदी उठवण्याचा आणि सहकारी साखर कारखानदारीला सुरुंग लावणेसाठी म्हणून मागेल त्याला साखर कारखाना परवाना देण्याचा नवा धंदा सुरु केल्याचा आरोप करतानाच शरद जोशी हे झोन बंदी उठवल्याने शेतकऱ्यांना जो साखर कारखाना सर्वात जास्त दर देईल त्याला ऊस लावून कसा पैसा मिळेल याची रसभरीत वर्णने करत गावोगाव फिरीत होते. आपला अज्ञानी शेतकरी टाळ्या पिटत त्यांच्या मागे धावत होता. अशा वेळी आपल्या साखर कारखान्यातील मंडळी सावध झाली नाही.

आम्ही शेतकऱ्यांना झोन बंदी उठवल्यावर होणाऱ्या परिणामांबाबत समजावून सांगायला कमी पडलो. या सहकारी चळवळीला जसा उच्चवर्णीयांचा धोका आहे तसाच तो सहकाराच्या माध्यमातून निर्माण झालेली सर्व आर्थिक सत्ता स्थाने आपल्याच हातात राहावीत, त्या माध्यमातून सर्वसामान्यांची मुस्कटदाबी करुन त्यांच्यावर कायमस्वरुपी आपलाच प्रभाव राहावा अशी इच्छा असणाऱ्या सहकारमहर्षींचा धोका आहे. झोन बंदी उठवली तर येत्या पाच सात वर्षात ही साखर कारखानदारी मोडीत निघेल. त्यासाठी सहकारी साखर कारखानदारी मागील उद्देश चळवळीला घातक ठरणारे घटक आणि राज्यकर्त्यांची भूमिका यावर चिंतन करुन मार्ग काढण्याची गरज आहे.''

सत्कारास उत्तर देताना क्रांतिवीर नागनाथ अण्णा म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी करुनही मराठी भाषिक असलेला बेळगाव, कारवार हा भाग महाराष्ट्रात अद्याप आलेला नाही. केवळ महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी नेतृत्व करुन सीमा प्रश्न सुटणार नाही. अजूनही बेळगावचा महाराष्ट्रात समावेश झाला नाही. गोवाही महाराष्ट्रात सामील झाला पाहिजे. तथापि गोव्यातील जनता महाराष्ट्रात आपणहून येतो म्हणत नाही तोपर्यंत थांबले पाहिजे.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले, असे आपण म्हणत असलो तरी खऱ्या अर्थाने अद्यापही आपणास स्वातंत्र्य मिळाले नाही. खरेखुरे स्वातंत्र्य मिळाले असते तर ऊसाला आयकर लागला असता का? जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांची वाट लागली असून शिल्लक साखरेमुळे कारखान्यांना व्याजापोटी १०-१० कोटी रुपये भरावयास लागत आहे. असे जर सातत्याने होऊ लागले तर साखर कामगारांचा पगार आणि ऊसाला दर देणेही अवघड होणार असल्याची भीती वाटते. आता शासनाने १०० किलोच्या पोत्याऐवजी ५० किलोच्या पोत्याचा फतवा काढला आहे. त्यामुळे ही साखर कारखानदारी आणखी अडचणीत आली आहे. यातून मार्ग काढणेची जबाबदारी सांगली, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यावरच असून पक्ष, गट, तट बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र यावे.

सांगली, सातारा, कोल्हापूर हा टापू ऊसाच्या साखर उताऱ्यात आघाडीवर आहे.



तसेच इतर धान्याच्या उताऱ्यातही आघाडीवर आहे. या टापूत निर्माण होणारी माणसेही विशेष गुण असणारी असावीत, म्हणून या तीन जिल्ह्यातून स्वातंत्र्य संग्रामात झालेला उठाव अखेर पर्यंत टिकला. स्वातंत्र्य मिळवणेचा या टापूचा सहभाग विशेष महत्त्वपूर्ण ठरला. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने व नागरिकांनी उठाव केला आणि गोऱ्यांची सत्ता गडगडली. त्यातच महात्मा गांधींची जनशक्ती प्रभावकारक ठरली. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस पक्ष स्थापन झाला, त्याची स्थापना एका गोऱ्या अधिकाऱ्याने केली. हा काळा डाग कायम मनात राहिला. लोकमान्य टिळक यांची काँग्रेस ही पांढरपेशी होती. ती ग्रामीण भागात पोहचलीच नाही. मिळालेले स्वातंत्र्य शेतकरी, कष्टकऱ्यांचे नाही हे क्रांतिसिंह नाना पाटलांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. ५० वर्षे लोटली तरी आम्ही खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी लढत आहोत.पण एक दिवस आम्हाला अपेक्षित असणारी सत्ता येणारच. दिल्लीत अनेक सरकारे आली पण महाराष्ट्राचे मूलभूत प्रश्न सुटले नाहीत.

साखर कारखानदारीसमोरच्या अडचणी सोडवण्यासाठी वरील तिन्ही जिल्ह्यानी एकत्र आले पाहिजे, तरच तो प्रश्न सुटणार आहे. शेतकऱ्यांनी पक्ष संघटना तात्पुरती बाजूला ठेऊन अस्मितेच्या या लढ्यात एकत्रित झाले पाहिजे, भावी आव्हानावर पर्याय आहे. कारखान्या बाबत सरकारचे हेच धोरण राहिल्यास भविष्यकाळ अंधकारमय आहे. त्यासाठी राबणाऱ्या शेतकऱ्यांची मजबूत संघटना निर्माण व्हावी, यासाठी समांतर ताकद तयार करुन साखर कारखानदारीचे संरक्षण करावे.''

राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष पृथ्वीराज जाचक म्हणाले, ''महाराष्ट्रातल्या कारखानदारांनी हुतात्मा पॅटर्नचा वापर केला तरच कारखानदारी संकट मुक्त होईल. कमी उत्पादन खर्च करुन जास्त उत्पादन घेणे, सहवीज निर्मिती, इथेनॉल प्रकल्प उभारणीवर भर द्यावा लागेल.''

भूमाता चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख कृषिभूषण डॉ. बुधाजीराव मुळीक म्हणाले, 'शेतकऱ्यांना मदत करायला गॅट कराराची कसलीही अडचण नाही. मात्र राज्यकर्त्यांच्या इच्छाशक्तीचा अभाव आणि जागतिकीकरणाचा बाऊ करुन प्रत्येकजण लबाडी करीत आहे. त्यामुळे हे संकट ओढवण्याची भीती आहे. कमी खर्चात जास्त उत्पादन आणि जे विकता येत नाही ते पिकवू नका. शेतीसाठी पाणी मिळणार नसेल तर शेतकऱ्यांनी अत्यंत टोकाची व संघर्षाची भूमिका घ्यावी. आमदार, खासदारांना कोंडून घाला अशी संघर्षाची भूमिका शेतकऱ्यांना घ्यावी लागेल.''

राष्ट्रीय साखर तज्ज्ञ संघाचे उपाध्यक्ष व साताऱ्याच्या अजिंक्य साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक विक्रमसिंह अपराध म्हणाले, 'साखर कारखानदारी उद्ध्वस्त करण्याचे निर्णय घेणाऱ्या केंद्र सरकारच्या धोरणाचा निषेध करावयास हवा. महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, कामगारांनी एका झेंड्याखाली येऊन ही जुलमी व्यवस्था उलटून टाकण्यासाठी प्रयत्न करावयास हवा. काटकसर, किफायतशीर उत्पादन आणि उत्तम उताऱ्याच्या ऊसाची निर्मिती, उपपदार्थ निर्मिती प्रकल्प या द्वारे साखर उद्योगांसमोरील आव्हाने अजूनही पेलता येतील. तसेच ऊस खरेदी कर रद्द करुन अबकारी करास सवलत मिळवणे, वाढीव पाणी पट्टीच्या आकारणीला विरोध करणे, राज्य बँक व जिल्हा बँकांनी कर्जाच्या व्याज दरात किमान तीन ते चार टक्के सूट मिळवणे, शाश्वत ऊस पुरवठा होण्यासाठी झोन बंदी ठेवणे, बफर स्टॉक करणेचे धोरण पुन्हा

राबवणे, अन्यायकारक आयकर रद्द करणे, साखरेची आयात थांबवणे व निर्यातीसाठी अनुदान देणे, ५० किलोचे बारदान पॅकिंग बंधन रद्द करणे, अशा उपाययोजना केल्यास साखर उद्योगाला पुन्हा सुवर्णकाळ येईल असा विश्वास वाटतो.''

राज्य साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईक नवरे यांनी साखर उद्योगातील विपणनाचे महत्त्व, इथेनॉल व सहवीज निर्मिती प्रकल्प आणि साखरेच्या वायदा बाजाराची तोंड ओळख करुन दिली.

जिल्ह्यातील साखर उद्योगातील संबंधित अधिकारी व नेतेमंडळी परिसंवादास उपस्थित होते. शेवटी वैभव नायकवडी यांनी आभार मानल्या नंतर परिसंवादाचा कार्यक्रम समाप्त झाला.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या वाढदिवसानिमित्त पहाटे पाच वाजल्यापासून नागनाथ अण्णांना शुभेच्छा देण्यासाठी नागरिक व हितचिंतक येत होते. राज्यभरातून त्यांचे चाहते व कार्यकर्ते आले होते.हुतात्मा विद्यालयात त्यांनी शुभेच्छा स्वीकारण्यापूर्वी हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घातला.सकाळी सहा वाजता हुतात्मा दूध संघाच्या परिसरात नागनाथ अण्णांच्या हस्ते वृक्षारोपण झाले होते. वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाला आलेल्या पाहुण्यांसाठी सावित्रीबाई फुले वसतिगृहात भोजनाची व्यवस्था केली होती. हुतात्मा उद्योग समुहातील सर्व शाखांच्या इमारतींवर आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. गावातील प्रमुख रस्त्यावर स्वागत फलक लावण्यात आले होते. ग्रामपंचायतीजवळ उपसरपंच भिमराव अहिर यांनी अण्णांचा सत्कार केला. हुतात्मा उद्योग समुहातील कार्यकर्त्यांनी वाढदिवसाच्या समारंभाचे उत्साहाने संयोजन केले होते.

शिवाजी विद्यापीठाच्या माध्यम विद्या प्रकाशनाच्या २६ जुलै २००२ च्या संपादकीयामध्ये म्हटले होते की, क्रांतिवीर नागनाथ अण्णा हे ८० वर्षाचे तरुण आहेत, असे म्हटले तर काहीच वावगे ठरणार नाही. समाजाच्या सर्वच थरावर त्यांना अण्णाच म्हणतात. साठी उलटल्यानंतर सर्वांनाच निवृत्तीचे वेध लागतात. मात्र अण्णांचे तसे नाही. त्यांच्या कार्याचा व्याप वाढतोच आहे. वयाच्या १८ वर्षापासून त्यांनी सामाजिक कार्यात उडी घेतली आहे. लढा मग तो कोणताही असो अण्णा त्या ठिकाणी हजर असत.ऊस उत्पादक शेतकरी, धरणग्रस्त, भुमिहीन, शेतमजूर यांच्या आंदोलनात अण्णा अग्रभागी असतात. एकंदरीत फुले-शाहू-आंबेडकर व कर्मवीरांना अभिप्रेत असणारी सामाजिक कार्याची विचार प्रणाली अण्णांच्या जवळ आहे. अण्णांना 'प्रती राजर्षी छत्रपती शाहू महाराज' असेही म्हटले जाते. अण्णा ज्या आंदोलनात सहभागी असतात, त्यावेळी सरकारला त्याची दखल घ्यावी लागते.

चांदोली अभयारण्याने बाधित झालेली महिला सौ. लक्ष्मीबाई बोडके म्हणतात,

''अण्णांना बघूनी सरकार आले धावूनी,
अण्णांना देखूनी सरकार आले वाकूनी'

* * * *



# ३८

## वज्राघात

''जया अंगी मोठेपण तया यातना कठीण'' याचा अनुभव गेली वर्षभर क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या सहवासात घेत होतो. ज्यांच्या पायावर आदराने मस्तक ठेवावे अशी व्यक्ती अभावानेच आढळते. त्याला नागनाथ अण्णा अपवाद आहेत. अशा थोर महामानवावर दिनांक २४ फेब्रुवारी २००५ रोजी नियतीने क्रूरपणे वज्राघात केला. त्या दिवशी त्यांचा द्वितीय पुत्र अरुण (भैय्या) यांचे दुःखद निधन आकस्मिकरित्या झाले होते. अण्णांनी आपल्या पित्यांच्या, बंधुच्या व मातोश्रींच्या निधनांचे दुःख सोसले होते पण कर्त्या चिरंजिवाचे अकाली निधन होणे हे दुःख सोसण्यापलिकडचे होते. या दुःखाला सामोरे जाताना, शोक आवरत आवरत असताना इतर कुटुंबियाना धीर देत असताना नागनाथ अण्णा त्यांच्या पत्नी सौ. कुसुमताई अपार दुःख कसे सहन करतील याची चिंता सर्वांना लागून राहिली होती. पतीच्या दुःखाने हतबल झालेल्या कै. अरुण भैय्यांच्या पत्नी सुषमाताईचे सांत्वन कसे करावे, हा सुध्दा एक चिंतेचा विषय होता.

६ मार्च १९६१ साली जन्मलेले अरुण भैय्या नागनाथ अण्णांचे द्वितीय सुपुत्र. कृषी विषयात एम.एस.सी. झाल्यावर त्यांनी काही काळ नोकरी केली, पण थोडया काळाकरिताच समाज बांधवाची सेवा करण्याचे भान ठेवून ते हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक व हुतात्मा बँकेचे अध्यक्ष आणि हुतात्मा उद्योग समुहाचे नेते झाले. स्पष्ट बोलणे, त्यांचेकडे आलेल्याच्या समस्येवर तात्काळ निर्णय घेणे, पारदर्शी आचार राखणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य होते. हुतात्मा साखर कारखान्याचे मार्गदर्शक असताना कारखान्यास अनेक वर्षे अनेक पुरस्कार मिळाले. हुतात्मा बँकेचे अध्यक्ष असताना बँकेच्या दहा शाखा निघाल्या. साखर

कारखान्याच्या मळीला, बगॅसला व साखरेला अधिक भाव मिळाला होता. तसेच साखर कारखान्याची विस्तार योजना आयोजिली होती. सतत कार्यकर्त्यांमध्ये मिसळणारा, निरपेक्ष बुद्धीने मदत करणारा, आदर्श नेत्याचा वारसा चालविणारा व आदर्श सुपुत्र होते पण असे म्हणतात की 'जो आवडतो सर्वांना तोची आवडतो देवाला' त्या प्रमाणे अरुण भैय्या आपणा सर्वांच्यामधून अचानकपणे निघून गेलेत.

हुतात्मा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक शिवाजीराव वावरे म्हणतात, ''कै. अरुण भैय्यांना कुणाकडून कोणते काम करुन घ्यायचे याचे कौशल्य त्यांचेकडे होते. प्रत्येक गोष्टीचा बारकावा माहीत असल्यामुळे त्यांचे निर्णय यशस्वी ठरत. त्यामुळे साखर कारखान्याच्या जडणघडणेत त्यांची भूमिका आदर्श आहे. नागनाथ अण्णांच्या विचारांचा व कर्तृत्वाचा वारसा जपणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते. पंचायत समितीचे सदस्य म्हणून, हुतात्मा कारखान्याचे मार्गदर्शक म्हणून त्यांनी वाळवा परिसराचा विकास घडविला होता.'' क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य शशिकांत शिंदे म्हणतात, ''अरुण भैय्याचे आकस्मिक निधन म्हणजे माध्यानिचा सुर्यास्त आहे.''

कै. अरुण भैय्यांच्या शोकसभेत कोल्हापूर शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष दादासाहेब पाटील म्हणाले, ''अरुण भैय्यांचे उर्वरित कार्य आपण सर्वांनी मिळून करुया.'' सांगली जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष मोहनराव कदम म्हणाले,''अरुण भैय्यानी तरुणपणात उभे केलेले काम उत्कृष्ट असून त्यांच्या निधनाने हुतात्मा संकुलाची झालेली पोकळी न भरुन येणारी अशी आहे.'' आमदार विलासराव शिंदे म्हणाले,''हुतात्मा संकुलाला खरी दृष्ट लागली. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील अबोल व्यक्तिमत्व आपल्यातून कायमचे हरपले आहे.'' प्राचार्य सायनाकर म्हणाले, ''अरुण भैय्यांचे निधन म्हणजे उपभोगशून्य स्वामी असलेल्या नायकवडी कुटुंबातील कृषी–औद्योगिक क्षेत्रातील घडलेले हे हौतात्म्य होय.'' आमदार गणपतराव देशमुख म्हणाले, ''भैय्यांचे निधनाने सामाजिक, शैक्षणिक, सहकार व राजकीय क्षेत्रात फार मोठी हानी झाली आहे.'' राजाराम बापू दूध संघाचे अध्यक्ष विनायकराव पाटील म्हणाले, ''भैय्यांच्या आठवणी जतन करुन त्याप्रमाणे वागणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.'' अशाच शब्दात तासगांव, पलूस पंचायत समितीचे सभापतीनी शोक व्यक्त केला. तसेच शिराळ्याचे रणधीर नाईक, पैलवान नानासाहेब महाडीक, क्रांती साखर कारखान्याचे अरुण लाड, राज्य कॉंग्रेसचे चिटणीस आनंदराव मोहिते, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर व असंख्य हितचिंतक अरुण भैय्यांना श्रध्दांजली वाहण्यास हजर होते.

अरुण भैय्यांच्या अकाली निधनामुळे नायकवडी कुटुंबियांचे, नागनाथ अण्णांचे, वैभव काकांचे सांत्वन करण्यास व धीर देण्यास महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विविध क्षेत्रातील मान्यवर आले होते. त्यामधे माजी सहकार मंत्री डॉ. एन. डी. पाटील, डॉ. भारत पाटणकर, डॉ. प्रा. बाबूराव गुरव, प्राचार्य व्ही. वाय. पाटील, शिवाजीराव माने, जे. पी. लाड, शिवराम बापू पाटील, बापूसाहेब शिरगांवकर आले होते. महाराष्ट्राचे राज्यमंत्री दयानंद म्हस्के, माजी आमदार श्रीपतराव शिंदे, केशवराव धोंडगे, आमदार शि. द. पाटील, दै. लोकमतचे संपादक दशरथ पारेकर, दै. पुढारीचे संपादक प्रतापसिंह जाधव, कोल्हापूरचे सरनोबत सरकार, माजी न्या.



बी. जी. कोळसे पाटील, प्रतिभा कन्स्ट्रक्शनचे राम जाधव, क्रप इंडस्ट्रीजचे चतुर्वेदी, चंद्रकांत व महीपतराव बोंद्रे पैलवान गणपतराव आंदळकर, सांगलीचे डॉ. भिडे, मिरजेचे डॉ. हेमंत पडीया, प्रा. राम डगळे, बाबासाहेब पाटील भुयेकर, दादासाहेब मंत्री, इस्लामपूरचे माजी नगराध्यक्ष अशोक पाटील, राम राठी, साखराळचे आर. आर. पाटील, जि. प. सदस्या कमल पाटील, माजी सभापती वसंतराव रकटे, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे राणे यांनीही सांत्वन केले होते.

तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आर. आर. पाटील, अर्थमंत्री जयंत पाटील, सहकार मंत्री पतंगराव कदम, खा. सदाशिव मंडलिक, विधान परिषद अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, माजी आमदार सा. रे. पाटील, संजय महाडीक, अनिल ढवण व विविध क्षेत्रातील नेते, उद्योजक व डॉक्टर यांनी सांत्वन केले.

कै. अरुण भैय्यांचे अंत्यविधीस व नंतरच्या धार्मिक कार्यास मी हजर होतो त्यावेळी कै. अरुण भैय्यांच्या जनमानसातील आगळ्या वेगळ्या स्थानाचे दर्शन त्यावेळी झाले होते. अशा दुःखद प्रसंगी नागनाथ अण्णांच्या धीरोदत्त स्वभावाची ओळख झाली. मुलाच्या दुःखद निधनाच्या प्रसंगानंतर हुतात्म्याच्या स्मृतीस अभिवादन करण्याच्या कार्यक्रमात नागनाथ अण्णा सहभागी झाले होते. आंगिकारलेले कर्तृत्व ते विसरले नाहीत. आपल्या स्थितप्रज्ञ आचरणातून अण्णांनी फार मोठा अनुकरणीय आचार समाजबांधवापुढे ठेवला आहे.

नागनाथ अण्णांनी आपल्या जीवनाची वाटचाल स्वातंत्र्य संग्रामात जिवावर उदार होऊन, स्वातंत्र्या नंतर सत्तेच्या राजकारणाात न पडता किसान शिक्षण संस्था स्थापन करण्यात, चिकाटीने हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना सुरु करण्यास, जिद्दीने धरणग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यास, अथक प्रयत्नाने व दुष्काळी तालुक्यातील लोकांचे पाण्याचा प्रश्न सोडविण्यात तळमळीने प्रयत्न करुन केली आहे. अशा धीरोदत्त व स्थितप्रज्ञ महामानव कौटुंबिक दुःखद घटनेमुळे थांबेल काय? याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. याचा प्रत्यक्ष अनुभव कै. अरुण भैय्यांचे दुःखद निधनानंतर मला आला आहे.

* * * *

# ३९

# पुरस्कार व मानपत्र

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी स्वातंत्र्यपूर्व काळात रोमहर्षक व धाडसी कार्य करुन एक आगळा वेगळा इतिहास घडविला. त्याचप्रमाणे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्तेच्या राजकारणात न पडता जनतेला खरे खुरे स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जेथे अन्याय होत असेल तो दूर करण्यासाठी पुढाकार घेण्यात ते सतत अग्रेसर राहिले आहेत. त्यांच्या ८२ वर्षाच्या जीवनामध्ये त्यांनी केलेल्या असामान्य सेवेची आठवण ठेवून महाराष्ट्रातील विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक संस्थांनी नागनाथ अण्णा यांना मानपत्र, स्मृतिचिन्ह व पुरस्कार देऊन गौरविले आहे.

नागनाथ अण्णा यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारमध्ये सेनानी म्हणून केलेल्या कामाबद्दल त्यांना पुणे येथील राजर्षी शाहू महाराज समाज विकास संस्थेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज समता पुरस्कार ३० सप्टेंबर १९९८ रोजी खासदार विठ्ठलराव तुपे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना नागनाथ अण्णा म्हणाले होते की, ''ज्यांचे रक्त सांडल्यामुळे देश स्वतंत्र झाला, त्या कष्टकऱ्यांपर्यंत स्वातंत्र्याचे सुख पोहचलेच नाही. पिळवणूक करणाऱ्यांविरुध्द संघर्ष करुन शोषणमुक्त होण्याच्या व श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या आंदोलनाला प्रारंभ करुया. आपण दलित नाही, या देशाचे मालक आहोत ही जाणीव पददलित शोषित वर्गामध्ये निर्माण केली पाहिजे. अद्याप कष्ट करुनही पिळवणूक आपण का करुन घ्यायची? विषमतेच्या भिंती घासून टाकू या. आपणात एकी नसल्यामुळे सगळे छोटे गट परस्परांपासून दूर जात आहेत. या परिस्थितीवर मात करणेसाठी काही विचारवंतांची व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन पर्याय दिला जाईल.'' अध्यक्षस्थानावरुन



बोलताना आमदार लक्ष्मणराव ढोबळे म्हणाले, ''अण्णा हजारे यांना शिक्षा आणि राजकर्त्यांचे कौतुक हे कशाचे द्योतक आहे? आपल्या समाजाची ही नैतिक घसरण कुठवर होणार आहे? ओठात श्रीराम, बगलेत सुखराम व पोटात नथुराम घेऊन वावरणारे येथील गरिबांच्या, शोषितांच्या विरोधात आहेत. त्यांच्याविरुध्द एक होऊन जातीयवादी शक्ती नष्ट करु या.''

सांगलीच्या लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या नेमिनाथ नगर येथील प्राथमिक विद्यामंदिर शाळेला श्रीमती कळंत्रे अक्का प्राथमिक विद्यामंदिर असे नाव देण्याचा समारंभ नागनाथ अण्णांच्या हस्ते २२ नोव्हेंबर १९९८ रोजी झाला होता. त्यावेळी बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''श्रीमती कळंत्रे अक्का यांचे लोककल्याणाचे कार्य व त्यांचे आचार विचार बहुजन समाजातील तळागाळात पोहचवण्याची व्यवस्था करण्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. कळंत्रे अक्कांना ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक हा मान देत असत. सारेच अक्कांचा शब्द झेलायचे. प्रपंच करुन त्यांनी त्यागी जीवन स्वीकारले. स्वत:चे आयुष्य त्यांनी समाजासाठी झिजवले. त्यांचे कार्य आज श्रीमती सुमती शहा आणि राजूताई बिरनाळे या करीत आहेत. देशात जातीयवादी सरकार आल्यामुळे सर्वसामान्यांचे वाटोळे झाले आहे. बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे.''

प्राचार्य डॉ. शिवराय माळी सार्वजनिक न्यासाच्या वतीने क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांना परिवर्तनवादी पुरस्कार डॉ. आ. ह. साळुंखे यांचे हस्ते दिनांक १६ ऑक्टोबर २००१ रोजी कोल्हापूर येथे देण्यात आला. त्यावेळी डॉ. आ.ह.साळुंखे म्हणाले, ''संघर्षाच्या ज्वाला स्वत:च्या अंगावर घेऊनही हसतमुखाने वावरणारे क्रांतिवीर नागनाथ नायकवडी हे टवटवीत व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा संघर्ष वयाच्या ८० व्या वर्षी सुरु आहे. माणसे संघर्ष करतात, लढतात प्रसंगी प्राणाची फिकीरही करीत नाहीत. मात्र संघर्ष संपल्यावर नवनिर्मितीची प्रतिभा त्यांच्याजवळ असतेच असे नाही. सृजनशीलता कमी पडते. याउलट नवनिर्मितीचा ध्यास घेऊन काहींना काही निर्मिती केलेली माणसे आपल्या निर्मितीला धक्का लागू नये, म्हणून संघर्षात उतरतच नाहीत. संघर्ष करणारे व हुतात्मा संकुलही उभारणाऱ्या अण्णांचा गौरव हा अनेक चळवळींना आधार देणाऱ्या सामर्थ्यशाली हाताचा गौरव आहे.''

सत्काराला उत्तर देताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''खऱ्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याची गरज आहे. स्वातंत्र्याला ५४ वर्षे झाली तरी ५० टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली आहे. भांडवलशाही व ब्राम्हणशाही डोक्यावर नाचते आहे. ज्यांची घरेदारे, जमिनी धरणाच्या पाण्याखाली गेल्या, त्यांना न्याय मिळत नाही. जो बहुजन समाज उत्पादक आहे, राबणारा आहे. बुध्दिवाद्यांनीही हजारो वर्षे या समाजाला माणुसकीने वागविलेले नाही. महात्मा फुल्यांनी सामाजिक चळवळ सुरु केली नसती व राजर्षी शाहूंनी त्याला राजाश्रय दिला नसता तर बहुजन समाज किती वर्षे मागे गेला असता? ही चळवळ पुढे न्यायची तर त्याची गती वाढवायला हवी. शत्रूंना गाडायचे तर गतीने जाणे गरजेचे आहे.''

मल्हारपेठ ता. पाटण येथील कोयना कृषक संस्थेचे अध्यक्ष बाबूराव सुतार अण्णा, पाटण अर्बन बँकेचे चेअरमन तात्या दिवशीकर यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य बेलदार

समाजाच्या मेळाव्याचे उद्‌घाटन करताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''बहुजन समाजात जातीयवादी पक्षाचा संचार झाला आहे. तो निपटून काढण्यासाठी बहुजन संघटनेची फौज निर्माण करणे करजेचे आहे.'' दि. २८ ऑगस्ट २००१ च्या या मेळाव्याचे अध्यक्ष नामदार विक्रमसिंह पाटणकर होते.

मिरज येथील राष्ट्रसेवादल व साने गुरुजी शैक्षणिक संस्थेतील क्रीडा मंडळाच्या वतीने प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या हस्ते नागनाथ अण्णांना ''क्रांतिकारक जिवंत हुतात्मा'' व गौरव चिन्ह दिनांक २९.५.२००१रोजी देण्यात आले. सत्कारास उत्तर देताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''स्वातंत्र्यानंतर ५४ वर्षे उलटून गेल्यानंतरही ग्रामीण कष्टकरी जनतेपर्यंत स्वातंत्र्य पोहचले नाही काँग्रेस पक्षाच्या भांडवलशाही धोरणामुळे भाजपसारख्या जातीयवादी पक्षाची सत्ता येते, हे सामान्यांचे दुर्दैव आहे. भारतीय जनता पक्षाची जवळीक असणारे बजरंग दल, जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा यांचे जातीयवादी राजकारण ब्राम्हणांनाही धोकादायक ठरणार आहे. शेतकरी कष्टकरी व धरणग्रस्तांवर सुरु असलेला अन्याय, महागाई व साखर कारखाने मोडीत काढण्याचे केंद्र सरकारचे राजकारण यामुळे पुन्हा एकदा स्वातंत्र्यासाठी संघटित चळवळ करणे गरजेचे आहे.''

या प्रसंगी डॉ. बाबूराव गुरव म्हणाले, ''जागतिकीकरण, खाजगीकरण, विदेशीकरण, व्यापारीकरण, उदारीकरण, यांत्रिकीकरण ही देशाला आर्थिकदृष्ट्या गुलाम करणारी संकटे आहेत.''

पडवळवाडी ता. वाळवा येथे महादेव कोकाटे यांच्या हस्ते नागनाथ अण्णांचा जाहीर सत्कार केला होता. त्यावेळी नागनाथ अण्णा म्हणाले, ''जोपर्यंत कार्यकर्त्यांची भक्कम फळी व हुतात्म्यांचे आशीर्वाद पाठीशी आहेत, तोपर्यंत मला तुरुंग व पोलीस अत्याचाऱ्यांची भीती नाही.''

चरण ता. शिराळा येथे क्रांतिगौरव वर्षानिमित्त नागनाथ अण्णांचा सत्कार पंचायत राज्य समितीचे अध्यक्ष आ. शिवाजीराव नाईक यांचे हस्ते २८ सप्टेंबर २००१ रोजी झाला. त्यावेळी ते म्हणाले, ''स्वातंत्र्य मिळवून अर्धशतकाहूनही जास्त काळ लोटला तरी देखील आम्ही पारतंत्र्यातच वावरत आहोत याची जाणीव पावलोपावली होत आहे. अद्यापही सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सुटले नाहीत. काँग्रेसने बरीच वर्षे सत्ता उपभोगली. त्यानंतर भाजप शिवसेना आली. आता साडेतीन टक्के लोकांनी आमच्यावर अन्याय केला. आजही सर्वसामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, धरणग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित आहेत.''

अंबप (ता. हातकणंगले) येथे नरवीर उमाजी नाईक समाजसुधारणा मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी व रामोशी समाजाच्या मेळाव्या प्रसंगी नागनाथ अण्णांनी नामफलकाचे उद्‌घाटन केल्यानंतर म्हणाले,''नरवीर उमाजी नाईक हे कर्तृत्ववान महामानव, व्यक्ती होती. आज समाजाच्या सर्व स्तरांवरील न्याय्य हक्कांसाठी बंड करणेची कठीण वेळ आली आहे.''

रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हा कार्यकर्त्यांच्या वतीने नागनाथ अण्णा यांचा जाहीर सत्कार २१ नोव्हेंबर २००१ रोजी संपन्न झाला. सत्काराला उत्तर देताना नागनाथ अण्णा म्हणाले,



''जातीयवादी केंद्र सरकार विरुध्द रिपब्लिकन पक्षाने आंदोलन उभारावे. आजपर्यंत प्रतिगाम्यांच्या विरुध्द आयुष्य वेचले. यापुढे उर्वरीत आयुष्य दीनदलित, अनाथ, अपंग, कष्टकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी वेचणार आहे. ब्राम्हणवादी विचारांला धडा शिकवण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांवर आधारीत चळवळ विकसित केली पाहिजे, देशातील वाजपेयी सरकार म्हणजे ब्राम्हणांचे सरकार आहे. दलितांबाबत या सरकारला देणे घेणे नाही. हे सरकार उलथून टाकण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी झटले पाहिजे. उर्वरीत आयुष्य दीन दलितांसाठी मी खर्च करणार आहे.''

झरे ता. आटपाडी येथील जवाहरलाल नेहरु विद्यालयाच्या प्रांगणात क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी सांस्कृतिक भवनाचे उद्‌घाटन पणन व रोजगार हमी मंत्री गणपतराव देशमुख यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ना.देशमुख यांच्या हस्ते नागनाथ अण्णांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर अध्यक्षस्थानी होते. सत्काराच्या उत्तरादाखल बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''दुष्काळी तालुके नकाशात आहेत की नाहीत हेच कळत नाही. मंत्री देशमुख हे सत्तेत राहूनही पाण्यासाठी संघर्ष करीत आहेत. अहिल्याबाई शिक्षण संस्था व हुतात्मा कारखाना यांचे नाते अतूट आहे. कधी अडचण पडेल तेव्हा त्यांना मदत करु.'' डॉ. बाबुराव गुरव म्हणाले, ''आटपाडी तालुक्यात या भवनचा उपयोग समाज परिवर्तनासाठी व्हावा.'' आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर म्हणाले, ''आपल्यासमोर नागनाथ अण्णा नायकवडी सारखे आदर्श आहेत. मी समाजाचे काहीतरी देणे लागतो असे म्हणणाऱ्यांची संख्या कमी होत आहे.आजचा समारंभ म्हणजे कसे जगावे, हे शिकवतो. शिक्षणाचे बाजारीकरण होते आहे. प्रमाणपत्र देणारी महाविद्यालये झाली आहेत.जगात निरक्षर लोकांची संख्या सर्वात जास्त भारतात आहे. जो देश निरक्षर असतो तो गरीब असतो. या संस्कृतीच्या कवनातून परिवर्तनाचा झरा निर्माण व्हावा.'' प्रा. आर. एस. चोपडे यांनी प्रास्ताविक करताना नागनाथ अण्णांच्या बद्दल गौरवोद्‌गार काढले.

सलगरे ता. मिरज येथील बी. एस. पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना दि. ६ जानेवारी २००२ रोजी नागनाथ अण्णा विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन करताना म्हणाले, ''सीमाभागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच येथील मराठी लोकांवर खरोखरच अन्याय होत आहे. सर्व सुविधांपासून ते वंचित आहेत हे मी प्रत्यक्षात पाहिले आहे. म्हणूनच शेतकरी, कष्टकरी समाजाबरोबरच सीमाभागातील लोकां बरोबर आपण लढणार आहोत. सीमाभागातील मुले प्रचंड अडचणींतून शिक्षण घेत आहेत. सलगरे हे सीमाभागाचे मध्यवर्ती शैक्षणिक ठिकाण आहे. या ठिकाणी वरिष्ठ महाविद्यालय उभा करण्याचा प्रयत्न झाल्यास मी निश्चितच मदत करीन. विहीर खोदून निघालेल्या दगडातून संस्कार केंद्र उभा करणारे विद्यार्थी, शिक्षक, पर्यवेक्षक व प्राचार्य सोनलकर हे कौतुकास पात्र आहेत.''

सोलापूर येथे स्थापत्यविशारद व अर्थतज्ज्ञ आर. जी. गांधी यांच्या स्मरणार्थ संस्थापित श्रमण संस्कृती साधना विद्यापीठातर्फे सामाजिक योगदानाबद्दल नागनाथ अण्णा यांना फल

''समाजभुषण'' पुरस्कार १७ मार्च २००२ रोजी कोल्हापूर येथे दिगंबर बोर्डिंगच्या कर्मवीर सभामंडपात महाराष्ट्र विधानसभेचे सभापती अरुण गुजराथी यांचे हस्ते व वस्त्रोद्योगमंत्री प्रकाश आवाडे यांच्या उपस्थितीत देण्यात आला.

सोलापूर येथील करुणाशील समितीच्या वतीने नऊ परिचारिकांना नागनाथ अण्णा यांच्या हस्ते 'करुणाशील' पुरस्काराचे वितरण २६ मे २००२ रोजी करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नागनाथ अण्णा म्हणाले,''जात पात, धर्म, पक्ष न विचारता सद्भावी वृत्ती ठेवून निरपेक्ष भावनेने सेवा करणाऱ्या परिचारिकाही महिलांमधील उपेक्षित घटक आहेत. या उपेक्षितांचा गौरव म्हणजे खऱ्या अर्थाने करुणा व शिलाचा गौरव होय. या नऊ परिचारिकांना हुतात्मा किसन अहिर कारखानाच्या वतीने रु. ११११ देत आहे व यापुढे करुणाशील समिती मागणी करताच काहींना काही निधी उपलब्ध करुन देईन.''

भाई माधवराव बागल विद्यापीठाच्या वतीने 'भाई माधवराव बागल' पुरस्कार माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांच्या हस्ते व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु शिवाजीराव ताकवले यांच्या हस्ते २८ मे २००२ रोजी देण्यात आला. पुरस्कार सत्काराला उत्तर देताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''काँग्रेसच्या तिरंगी झेंड्याखाली शेतकरी, शेतमजूर, उद्योजक, कामगार, कर्मचारी हे आपापल्या उद्दिष्टांसाठी एकत्र आले होते. पंडित नेहरुबद्दल आदर व्यक्त करुनही वल्लभभाई पटेल हे भांडवलदारांचे नेते होते व तडजोड करुन या देशाचे दोन तुकडे पाडण्यात आले. म्हणूनच खऱ्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. आज गुजरातमध्ये काय चालले आहे? गोध्रा हत्याकांड संघाच्याच मंडळींनी देशभर दंगली घडविण्याच्या उद्देशाने तर घडविले नाही ना? अशीही शंका यावी, अशी ही परिस्थिती आहे. नरेंद्र मोदी उन्मत्त आहेत. असली कामे करणाऱ्यांच्या कुळाचा नायनाट होईल. आता जनतेने दक्ष राहिले पाहिजे. पध्दतशीर कारवाया सुरु आहेत, त्याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने आपण तयारीतच आहोत'' बागल विद्यापीठाचे अध्यक्ष धारवाडे यांनी क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नावाने युध्दशास्त्राच्या अभ्यासाचे अध्ययन सुरु व्हावे असे सुचवले.

न्यायमूर्ती पी. बी. सावंत म्हणाले, ''विधायक काम व संघर्षवादी भूमिका या मार्गाने गेल्याशिवाय राज्यघटनेत नमूद केलेला नवसमाज घडणार नाही. आजकाल अनेक किताब, पारितोषिके, पदव्या दिल्या जात आहेत. राष्ट्रीय व स्थानिक पातळीवर त्या संबंधी वादही निर्माण होत आहेत. पुरस्कार व्यक्तीच्या निवडीसाठी केवळ कसोट्या नव्हे तर ते देणाऱ्या व्यक्तीची पात्रताही विचार करण्यासारखी असते. त्याकडे आपण निर्विकार पहात असतो. परंतु याला काही अपवादही असतात. यापैकी एक आजचा हा गौरव पुरस्कार आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून अनेकांनी लढ्यात उडी घेऊन आयुष्याची होळी केली. त्यांचा उद्देश एकच होता की, देशात लोकशाही यावी, सामाजिक, आर्थिक विषमता नष्ट व्हावी. प्रत्येक व्यक्ती धर्मनिरपेक्ष व्हावी. कारण सामाजिक, आर्थिक विषमता गेल्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही.''

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु एस. जी. ताकवले म्हणाले, ''आजचा सत्कार म्हणजे नागनाथ नायकवडींच्या लढ्याचा फुले, शाहू, आंबेडकर यांच्या क्रांतीचा गौरव आहे. कोल्हापुरच्या



शाहू स्मारक भवनमध्ये झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. कृ. कणबरकर यांनी केले व बागल विद्यापीठाचे अध्यक्ष बाबूराव धारवाडे यांनी आभार मानले.

सातारा येथील शाहू कला मंदिर मध्ये कॉ. व्ही. एन. पाटील जीवन गौरव स्मृती पुरस्कार नागनाथ अण्णा यांना कॉ. यशवंत चव्हाण व कॉ. बळवंत गोहाड यांच्या हस्ते दि.२८ ऑगस्ट २००२ रोजी देण्यात आला. पुरस्काराचा स्वीकार केल्यानंतर नागनाथ अण्णा म्हणाले, ''खरेखुरे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लढा सुरु केला पाहिजे. जातीयवादी शक्तींपासून बहुजन समाजाला वाचविले पाहिजे. ब्रिटिशांची या देशात १५० वर्षे सत्ता होती. शेतमजूर, शेतकरी, कामगार, शिक्षक अशा सर्वच वर्गातून गुलामगिरीविरुध्द लढा दिला जात होता. हिमालयाच्या उंचीएवढी कर्तृत्ववान माणसे त्यावेळी होती. स्वातंत्र्यानंतर देशाची सत्ता कामगार शेतकऱ्यांच्या हाती द्यावी असे काँग्रेसच्या नेत्यांना वाटत नव्हते. प्रत्येक प्रांतातील बहुजन समाजाचा नेता हेरुन भांडवलदारांनी डाव साधला. काँग्रेसच्या भांडवलशाही धोरणाबद्दल देशभर असंतोष आहे. नेहरुंच्या उत्तर प्रदेशमध्येही काँग्रेसला स्थान राहिले नाही. कारण काँग्रेसबद्दलची नाराजी होती. भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शिवसेना या सारख्या पक्षांनी त्याचा फायदा उठविला. कातडी बचाव धोरण स्वीकारुन स्वातंत्र्य लढ्यापासून बाजूला राहिलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ डोक्यावर कसे बसायचे हे निश्चित केले. आपण चैनीत जगायचे, आपल्या पुढील पिढ्या चैनीत जगाव्यात, त्यासाठी पुढे ते राजकारण करीत राहिले. या जातीयवादी पक्षांपासून बहुजन समाज वाचविला पाहिजे. व्ही. एन. पाटील व माझी भेट क्रांतिसिंह नाना पाटील यांनी घडविली. व्ही. एन. पाटील हे कामगारांचे असामान्य नेतृत्व होते. त्यांची राजकीय उंची खूप मोठी होती.''

क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांचा समाजातील वेगवेगळ्या संस्थांकडून गौरव होत असताना ते स्वातंत्र्य संग्रामातील आपल्या सहकाऱ्यांना विसरले नाहीत. त्याकरिता १५ ऑगस्ट २००२ रोजी वाळवा, शिराळा,तासगाव तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचा व जे हयात नाहीत त्यांच्या वारसांचा श्रीफळ, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींचा साडी चोळी देऊन क्रांतिविरांगना राजमतीताई बिरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली गौरव करण्यात आला. त्या प्रसंगी नागनाथ अण्णा म्हणाले, ''शेतकरी, कष्टकरी जनतेला अडचणीत आणणाऱ्या ब्रिटिशांपेक्षाही वाईट शक्ती सत्तेवर आहेत.स्वातंत्र्य हिंदी भांडवलदारांच्या ताब्यात आहे. त्यामुळे खऱ्या स्वातंत्र्यासाठी पुन्हा लढा उभा करावा लागणार आहे. क्रांतिकारकांनी त्यासाठी पुन्हा मनाची तयारी करावी, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी त्याग केला, कारावास भोगला, क्रांतिकारकांना मदत केली त्यांचा यथोचित सत्कार करताना आनंद होत आहे. या निमित्ताने हुतात्मा किसन अहिर, नानकसिंग, बाबूराव कोकाटे, प्रताप पाटील, बाबुजी पाटणकर यांच्या हौतात्म्याचा गर्व वाटतो. आज काँग्रेसच्या चुकीमुळे जातीयवादी शक्ती सत्तेवर आल्या आहेत त्यासाठी पुन्हा लढा उभारण्याची गरज निर्माण झाली आहे.'' यावेळी सातारा तुरुंग फोडण्यास अण्णांना मदत करणारे कामेरीचे एस. बी. पाटील, सांगाव बंदूक लुटीमध्ये मदत करणारे शामराव लहूजी पाटील कोल्हापूर, स्वातंत्र्य सैनिकांना बंदुकीचे ट्रेनिंग देण्यासाठी खोट्या बंदुका तयार

करुन देणारे कोल्हापूरचे डी. बी. पाटील, बातम्या देणारे ऐतवड्याचे भूपाल बागणे, प्रामाणिकपणे पैसे सांभाळणारे काशिनाथ नायकवडी, पैसे लपविण्यासाठी मदत करणारे शिगावचे प्राथमिक शिक्षक भगवान पाटील, भूमिगत असताना संरक्षण करणारे वाळव्याचे खंडू शेळके, गोविंद सव्वाशे, रामू मास्तर यांच्या बरोबर घडलेले प्रसंग सांगून नागनाथ अण्णांनी त्यांचा सत्कार केला. त्याच बरोबर क्रांतिकारक आणि स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारसदार अंकलखोपच्या राजुताई बिरनाळे, वाळव्याच्या द्रौपदी घोरपडे, लक्ष्मी दुधाणे, सौ. कुसुमताई नायकवडी, कासेगावच्या इंदूताई पाटणकर, पडवळवाडीचे तुकाराम खोत, महादेव अनुसे, हंबीर चव्हाण, बापूसाहेब कुंभार, विलास दत्तू वाड, शिराळ्याचे पांडुरंग गायकवाड, ढगेवाडीचे बाळू दादू माने व सुभाष ढगे, जक्राईवाडीचे नामदेव गायकवाड, गंगाराम गायकवाड, चरणचे ईश्वरा गुरव, रामचंद्र नायकवडी, आष्ट्याचे साहेबजी सनदे, इस्लामपूरचे भा. रा. जोशी, कापुरवाडीचे शामराव कदम, माणिकवाडीचे धोंडीराम शिंदे व महादेव देसाई यांचा सत्कार करण्यात आला. हुतात्मा संकुलाचे नेते वैभव नायकवडी, अरुण नायकवडी, हुतात्मा कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती निलावती माळी, उपाध्यक्षा सौ. कुंदाताई शेळके व साखर कारखान्याचे आजी माजी संचालक, अधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सातारा येथील महाराष्ट्र भूषण लोकशाहीर पुंडलिक फरांदे प्रतिष्ठानचे वतीने हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या प्रांगणात प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजाराम बापू फाळके यांचे हस्ते क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांना 'लोकशाहीर फरांदे पुरस्कार' दि. २८ नोव्हेंबर २००२ रोजी वाळवा येथे देण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना नागनाथ अण्णा म्हणाले, ''आजपर्यंत जनतेची सेवा केली, त्याचेच फळ म्हणजे हा पुरस्कार आहे. पुंडलिक फरांदे आज असते तर डफावरती थाप मारुनच त्यांनी जनजागरण करून अन्यायाला वाचा फोडली असती. केंद्र सरकार शेतकऱ्यांवरती रोज नवीन नवीन गंडांतरे आणत आहे. साखर कारखानदारी अडचणीत आणली, सूत गिरण्यांचा निकाल लावला. त्यामुळे हे शत्रू सरकार आहे. गेल्या पंचावन्न वर्षात सीमा प्रश्न सुटला नाही. तर महाराष्ट्र राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्याचे भान नाही. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, कामगार यांना न्याय्य हक्कासाठी संघटित होऊन संघर्ष करावाच लागेल.''

या प्रसंगी डॉ. भारत पाटणकर म्हणाले, ''पुंडलिक फरांदेसारख्या कट्टर सत्यशोधकाच्या नावे क्रांतिवीर नागनाथ अण्णांना दिला जाणारा पुरस्कार आतापर्यंतच्या पुरस्कारापेक्षा वेगळा आहे. सत्यशोधक पध्दतीने व्यवहार करणे अत्यंत अवघड आहे. सामाजिक व्यासपीठाचे नाव देऊन अनेक जातीयवादी शक्ती राजकारणात घुसल्या आहेत. मूल्य शिक्षणाच्या नावाखाली धार्मिक शिक्षण दिले जात आहे. ब्राम्हण्यवादाचा बीमोड करणारे नेते म्हणून अण्णांकडे पाहिले जात आहे. या पुरस्कारामुळे आता नवीन जबाबदारी वाढली आहे.''

आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक रामोशी समाज सेवा समितीच्या वतीने नागनाथ अण्णांना 'आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक राष्ट्र सेवा भूषण' पुरस्कार सप्टेंबर २००२ महिन्यात सातारा येथे देण्यात आला.



दक्षिण भारत जैन सभा बेळगाव या संस्थेचे वतीने 'महाराष्ट्र गौरव' पुरस्कार नागनाथ अण्णांना बेळगाव येथे १० ऑक्टोबर २००३ रोजी भव्य समारंभात देण्यात आला होता. त्यावेळी सत्कारास उत्तर देताना नागनाथ अण्णांनी दक्षिण भारत जैन सभेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. व स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य लढ्यात भाग घेताना सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील जैन बांधवांनी बहुमोल सहकार्य केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. माझ्या आईने माझे नाव नागनाथ ठेवले व त्याप्रमाणे जैन धर्माच्या उच्च आचार विचारांचे अनुकरण मी करीत आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक संस्थांनी नागनाथ अण्णांचा भरपूर पुरस्कार देऊन सत्कार केला आहे. परंतु महाराष्ट्र शासन व केंद्र शासनास अद्याप नागनाथ अण्णांच्या कार्याची आणि समाज सेवेची जाणीव झाली नाही, याची नागनाथ अण्णांना फिकीर नाही किंवा खंत ही नाही. समाजाने त्यांना दिलेला ''क्रांतिवीर'' हा पुरस्कार सर्वात मोठा व महत्त्वाचा असा आहे. त्यात त्यांना समाधान आहे.

* * * *

# ४०

## व्यक्तिमत्त्व

क्रांतिसागराचे व्यक्तिमत्त्व लाभलेल्या क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे आचार व विचार अनुकरणीय असलेमुळे अभिनंदनीय आहेत. त्यांच्या आडनावामधील 'नायक' शब्दामुळे त्यांना नेतृत्वाचे उपजत सद्‌गुण परमेश्वराने बहाल केले आहेत. विद्यार्थी दशेत त्यांनी विद्यार्थी परिषदा घेतल्या आहेत. तसे सेवादलातही नेतृत्व केले आहे. पुढे वाळवा येथे गरजू गरीब मुला मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन मोफत शिक्षणाची सोय करण्यासाठी किसान शिक्षण संस्थेद्वारे विद्यालये व महाविद्यालये सुरु केली, ती लोकवर्गणीतून स्थानिक ग्रामस्थांच्या आर्थिक सहकार्यातून. हे करीत असताना त्यांचे जे सहकारी स्वातंत्र्य लढ्यात हुतात्मा झाले, त्यांची चिरंतन आठवण भावी पिढीला राहावी यासाठी विद्यालयास हुतात्मा किसन अहिर यांचे नाव दिले व वसतिगृहास हुतात्मा नानकसिंगांचे नांव दिले, महाविद्यालयास क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नाव देऊन त्यांचे ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला आहे. वाळवा येथील शेतकऱ्यांना त्यांनी पिकविलेल्या ऊसाची साखर आपणच करण्याकरिता भगिरथ प्रयत्न करुन अण्णांनी सहकारी साखर कारखाना मंजूर करुन घेऊन हजारोंना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.

नागनाथ अण्णांनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात पुढाकाराने भाग घेतला होता. शेणोली पे ट्रेन व धुळे खजिना लुटण्यात महत्त्वाचे योगदान त्यांनी दिले होते. त्यामुळे ब्रिटीश पोलिसांनी त्यांना पकडण्यास आटोकाट प्रयत्न केले. घरभेदी गावकऱ्यामुळे ते पकडले गेले. पण धाडसाने व आत्मविश्वासाने ते सातारा जेलच्या तटावरुन उडी मारुन बाहेर आले आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत पोलीसांना ते सापडले नव्हते. ब्रिटीश सरकार अण्णांचा पराभव करु पहात होते. पण अण्णा ब्रिटीश सत्तेचा पराभव करुन शेवटपर्यंत क्रांतिवीर म्हणून स्वतंत्र राहिले.



मिळालेले स्वातंत्र्य हे खरेखुरे स्वातंत्र्य नाही म्हणून सत्तेच्या राजकारणात न पडता स्वकियांच्या सत्तेविरुध्द जनतेवरील अन्याय दूर करण्यासाठी लढे देत आहेत. वयाच्या ८५ व्या वर्षी तरुणांना लाजवेल असे तडफदार सामाजिक कार्य आजही चालू आहे.

फ्रान्सचा बादशहा नेपोलियन याला जसे 'अशक्य' माहीत नव्हते तसेच नागनाथ अण्णांचेही आहे. अवघड, असाध्य काम असले तरी नागनाथ अण्णा प्रयत्न करीत राहणार आणि असाध्य ते साध्य करुन घेणार. हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याची मंजुरी मिळविण्यात त्यांनी वरील जिद्दीचा आविष्कार दाखविला आहे.

दिल्लीस मुक्कामास असताना सहकारी मित्रांनी हातउसने पैसे तारेने पाठवले होते. पाठवलेले पैसे कशाकरिता खर्च केले हे ते पत्राने वाळव्यास कळवत होते. असा पारदर्शीपणा दाखविणारे अण्णा एकमेव नेते आहेत.

लोकवर्गणी जमा करुन नागनाथ अण्णा रशियास गेले होते. जाताना सौ. कुसुमताई नायकवडी त्यांचेबरोबर स्वत:च्या पैशातून गेल्या होत्या. अण्णांनी, लोकांनी दिलेल्या पैशातून खर्च वजा करिता शिल्लक राहिलेले पैसे ज्यांनी दिले होते, त्यांना परत केले. हे सुध्दा आचरण जगावेगळे म्हणावयास हरकत नाही. काहीतरी सामाजिक किंवा राजकीय कारणाचे निमित्ताने लोकांच्याकडून पैसे जमा करुन त्याचा विनियोग स्वत: करिता व स्वत:चे कुटुंबियांकरिता करणाऱ्या नेत्यांपुढे हा सुध्दा एक आदर्श अण्णांनी ठेवला आहे.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे ते सभासद सुध्दा झाले नाहीत. मग पदाधिकारी होण्याचा प्रश्न येतोच कुठे? अशा प्रकारचे नि:स्वार्थी सामाजिक कार्य पहावयास मिळणे दुर्लभ आहे. या सहकारी साखर कारखान्यात आपल्या कुटुंबातील कोणालाही पदाधिकारी होऊ दिले नाही. असे आदर्श सहकार क्षेत्रात जोपासणारे नागनाथ अण्णा एकमेव सहकारमहर्षि आहेत. सहकार क्षेत्रातील काम करणाऱ्या कामगारांना जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करुन देऊन जास्तीत जास्त पगार देणाऱ्या हुतात्मा साखर कारखान्याचे संस्थापक नागनाथ अण्णांनी कारखान्याचे प्रथम गळीत हंगामाची साखर पाहिल्या पासून गेली २०-२२ वर्षे झाली, त्यांनी कारखाना आवारात पाऊल टाकले नाही, पण सर्व कार्यावर नियंत्रण ठेवून असतात. त्यामुळे साखर उताऱ्यात भारतात नव्हे तर आशिया खंडात पहिला नंबर हुतात्मा कारखान्याने संपादन केला आहे. याचेही श्रेय कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, यांचेबरोबर नागनाथ अण्णांच्याकडे जाते. अण्णा वाळव्यात असले तर रोजच्या रोज त्यांचे कारखान्याचे कामकाजावर लक्ष असतेच परंतु परगावी असले तरी तेथून फोनने कारखान्याच्या कामकाजाबद्दल चौकशी करीत असतात.

साखर कारखान्याचे मंजुरीसाठी नागनाथ अण्णांनी दिल्लीमध्ये सात आठ वर्षे मुक्काम ठोकून महाराष्ट्रातील व बाहेरच्या राज्यातील खासदारांची सहानुभूती मिळविली होती. त्यांच्या सह्यांची निवेदने संबंधींत मंत्र्यांना पाठविली होती. पंतप्रधान इंदिरा गांधींना हजारो शेतकऱ्यांच्या व शेकडो मुला मुलींच्या सह्यांची निवेदने पाठविण्यामागे अण्णांची कार्य कुशलता दिसून येते. तसेच सामाजिक कार्यातील पारदर्शीपणा दिसून येतो. अण्णांनी त्या काळात दिल्लीहून वाळवा येथे पाठवलेल्या शेकडो पत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांनी प्रत्येक पत्रात वसतिगृहातील मुलांची, शाळेतील शिक्षकांची, मदत करणाऱ्या शेतकऱ्यांची, मदत करणाऱ्या

राजकीय नेत्यांची चौकशी केली आहे. एक दोन पत्रात त्यांच्या आईंच्या प्रकृतीची चौकशी केली आहे. पण आपल्या कुटुंबीयांची अजिबात चौकशी नाही अगर कोणत्याही पत्रात उल्लेख नाही. असा अलिप्तपणा सार्वजनिक कार्य करणाऱ्या नेत्यांना आवश्यक आहे. त्यामुळेच हजारो कार्यकर्ते जीव लावून काम करतात, हे त्यांनी कृतीतून दाखवले आहे. ते सुध्दा अनुकरणीय आहे.

हुतात्मा कारखान्यास मंजुरी मिळणेच्या काळातच दिल्लीला नागनाथ अण्णा असताना थोरल्या किरण या चिरंजिवाच्या विवाहाचा बेत ठरविला होता. मुहूर्त ठरवून विवाहाची सर्व तयारी झाली असताना श्रीमती इंदिरा गांधी कर्नाटकातील चिकमंगळूर मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणूक लढवित होत्या. नागनाथ अण्णांनी पोटच्या मुलाच्या विवाहापेक्षा राष्ट्रीय कर्तव्यास प्राधान्य दिले व श्रीमती इंदिरा गांधींच्या निवडणूक प्रचारासाठी चिकमंगळूरला गेले होते. मुलाच्या विवाहास ते उपस्थित राहू शकले नाहीत. एवढी आपल्या नेत्याबद्दल कर्तव्यकठोर निष्ठा क्वचितच पहावयास मिळते. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे उद्‌घाटन श्रीमती इंदिरा गांधी यांच्याच हस्ते करण्याचे नागनाथ अण्णांची इच्छा होती. पण नियतीच्या निर्णयामुळे ती इच्छा अपुरीच राहिली.

अण्णा नेहमी 'अतिथी देवोभव' या विचाराप्रमाणे त्यांच्याकडे येणाऱ्या लहान असो मोठा असो, कार्यकर्ता असो, पुढारी असो सर्वांचे आदरातिथ्य करुन त्यांची पोटपूजा केल्याशिवाय सोडत नाहीत. त्यांचेकडे येणारा त्यांचे इच्छित व अपेक्षित काम तर करुन घेतोच पण मनसोक्त जेवणही करुन जातो. असे म्हणतात, या गुणांचा वारसा त्यांना त्यांच्या आईकडून मिळाला आहे. त्यांच्या आई लक्ष्मीबाई नायकवडी येणाऱ्यांना जेवण दिल्याशिवाय परत पाठवत नसत. वसतिगृहातील मुलांच्या जेवण व्यवस्थेवर त्यांचे व्यक्तिश: लक्ष असे. त्यामुळे त्या क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्याच आई नव्हत्या तर वसतिगृहातील सर्व मुला–मुलींच्या आई होत्या. मुला–मुलींच्या क्रीडा स्पर्धांसाठी त्या परगावी त्या टीम बरोबर जात आणि मुला–मुलींच्या जेवणाची व्यवस्था पहात व प्रोत्साहन देत असत.

अगदी याच पध्दतीने नागनाथ अण्णा धरणग्रस्तांसाठी, प्रकल्पग्रस्तांसाठी समान पाणी वाटपासाठी जी आंदोलने केली, जे मोर्चे काढले, जे ठिय्या आंदोलने केली त्या प्रसंगी वाळव्याहून कारखान्याच्या कॅन्टीनमधून हजारोंच्या जेवणाची व्यवस्था नागनाथ अण्णांनी केली आहे व करीत असतात. सार्वजनिक कार्यात नेतृत्व करीत असताना आपल्या जेवणाचा त्रास त्यांनी इतरांवर कधीच दिला नांही. स्वत:चे व बरोबरच्या सहकाऱ्यांना जेवण वाळव्याहून घेऊन जातात. असे दृश्य या कलियुगात कोठे पहावयास मिळेल का? नाही असेच उत्तर येईल. नाहीतर नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांची उठाठेव व जेवणाच्या सोयी करता करता स्थानिक कार्यकर्त्यांची तारांबळ होत असते. हे अनेक ठिकाणी पहावयास मिळते. मात्र अण्णांचा इतरांना कधीच त्रास झाला नाही व ते देत नाहीत.

महत्वाचे म्हणजे नागनाथ अण्णांचे संपूर्ण जीवन म्हणजे एक उघडे पुस्तक आहे असे म्हणता येईल. रोजचे जीवन साधे, सरळ व सोपे असे आहे. ते एकवेळ सकाळी साडेसातचे पूर्वी जेवतात. पूर्वीपासून त्यांना शाकाहारी जेवण आवडते. सायंकाळी थोडा फलाहार करुन त्यांचा दिवस संपतो.



मंगळवारी त्यांचे जिवलग सहकारी स्वातंत्र्य संग्रामात शहीद झाले आणि महात्मा गांधी यांचा खून जातीयवादी शक्तींच्या प्रतिनिधीने शुक्रवारी केला, म्हणून नागनाथ अण्णा मंगळवार व शुक्रवार हे आठवड्यातील दोन दिवस शुभ कार्यास वर्ज्य मानतात, ते आजपर्यंत व्रत पाळत आहेत. वयाच्या ५० व्या वर्षापासून पारंपरिक स्वत:चे कुटुंबापासून अलिप्त राहून जास्तीत जास्त वेळ इतरांची सेवा करण्यात जीवन घालवतात ''जे का रंजले, गांजले त्यासी म्हणे जो आपुले'' असे ते राष्ट्रीय संत आहेत. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, महिला, दुर्लक्षिलेले दलित व मागासवर्गीय यांच्या विकासासाठी ते सदैव तत्पर राहून प्रयत्न करीत असतात. त्यांच्या संघटना बांधण्यास पुढाकार घेऊन त्यांचेवरील अन्याय दूर करण्यास त्यांनी आपले तन–मन–धन सर्व काही वापरले आहे व वापरत आहेत.

पूर्वी नागनाथ अण्णांचा मुक्काम वाळवा येथील हुतात्मा किसन अहिर विद्यालयात असे. अलिकडे ते हुतात्मा साखर कारखान्याचे साखर शाळेत वास्तव्यास असतात. पहाटे त्यांचा दिनक्रम सुरु होतो. ते हुतात्मा किसन अहिर विद्यालयात स्नान करण्यास जातात. विद्यालया समोरच्या त्यांच्या कुटुंबीयांनी पाठवलेले जेवण घेऊन ८ वाजेपर्यंत साखर शाळेत येतात. बाहेरुन आलेल्यांना भेटी, आलेल्या पत्रांना उत्तरे देणे वगैरे कामात १० वाजेपर्यंत वेळ देतात. नंतर दुपारी स्नान करुन पुन्हा लोकांना भेटणे सुरु होते. ते संध्याकाळपर्यंत. पुन्हा विद्यालयात स्नान करुन आलेवर फलाहार घेऊन रात्री उशीरा त्यांचा दिवसाचा कार्यक्रम संपतो. उत्तम घोलप स्वीय सहाय्यकासारखी सेवा अहोरात्र करीत असतो. श्री. वसंतराव पवार (सर)व जयवंत अहिर (मामा) अण्णांचा पत्रव्यवहार व इतर कामे पहात असतात. अण्णांचा वैयक्तिक खर्च माजी आमदार म्हणून मिळत असलेल्या पेन्शन मधून होतो. स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांनी पेन्शन घेतली नाही व त्यासाठी अर्जही केला नाही. मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील यांनीही आग्रह केला तरी पेन्शनसाठी अर्ज केला नाही.

गुन्हेगारी जमात म्हणून प्रसिध्द असलेल्या पारधी समाजातील लोकांच्या उध्दारासाठी नागनाथ अण्णांनी प्रथमच पुढाकार घेऊन त्यांच्या मुलांना सुशिक्षित करुन त्यांना इतरांसारखे समानतेचे जीवन उपलब्ध करुन दिले आहे. हे फार मोठे मोलाचे समाजकार्य त्यांनी केले आहे.

वाळवा येथे आलेल्या ग्रामीण भागातील कष्टकरी शेतमजूरांना पैशा अभावी उपाशी राहावे लागू नये म्हणून नागनाथ अण्णांनी साखर कारखाना कॅन्टीनमध्ये नुकसान सोसून कष्टकऱ्यांना २ रुपयात पोटभर जेवणाची सोय केली आहे. आजच्या दिवसात २ रुपयात एक कप चहा सुध्दा मिळत नाही अशा वेळी २ रुपयात पोटभर जेवण देणारा उपक्रम नागनाथ अण्णांच्या मानवी सेवा धर्माच्या विचारातून साकार झाला आहे व तो अखंडपणे चालू आहे.

नागनाथ अण्णांनी भारतीय संस्कृती जपली आहे तिचे ते प्रत्यक्ष उदाहरण आहेत. त्यांनी हुतात्मानगर (सोनवडे) येथे ५ हजार नारळाची व आंब्यांची झाडे लावलीत व जोपासलीत. त्यांना आता भरभरुन फळे येत आहेत ती विकण्यासाठी नव्हे तर त्या झाडांची जोपासना व संरक्षण करणाऱ्या मुलांचेसाठी मोफत दिली जातात. वाळवा हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचे आवारात हजारो आंब्याची व नारळाची झाडे फळांनी लगडलेली दिसतात. ती सुध्दा येथील कर्मचाऱ्यांना व कारखाना कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरात त्याचे मोफत वाटप केले जाते. असे

उदाहरण इतर ठिकाणी क्वचित पहावयास मिळते. अनेक भावी पिढ्यांसाठी त्यांनी तरतूद करुन ठेवली आहे. स्वत: पेक्षा भावी पिढीतील लोकांची काळजी ते घेत आहेत.

अशा अनेक उपक्रमांमुळे त्यांचे सहवासात येणाऱ्यांना आश्चर्य वाटते व वस्तुस्थिती कळाल्यावर ते अण्णांना दुवा देतात, त्यांचे शुभचिंतन करतात. त्यांनी आपल्या सत्कार्याने उभ्या केलेल्या संस्था त्यांच्या कार्याची यशोमंदिरे आहेत. बाहेरुन येणारे आदर्श संस्था पाहून आश्चर्यचकित होतात. पण त्या यशोमंदिराचे संस्थापक व मार्गदर्शक नेहमी नजरेआड राहून इतरांना, तरुणांना मार्गदर्शन करीत असतात. नवीन प्रकल्प उभारण्यास प्रोत्साहन देत असतात. त्या महान नेत्यांना व क्रांतिकारांना शतायुषी करावे अशी परमेश्वराजवळ माझ्यासारखे हजारो हितचिंतक प्रार्थना करीत आहेत.

महाराष्ट्रात क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात, साताऱ्च्या प्रतिसरकारात आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाज परिवर्तनासाठी सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात दीपस्तंभाप्रमाणे आदर्श उभे केले आहेत. पुढील अनेक पिढ्यांना नागनाथ अण्णांचे आदर्श कार्य मार्गदर्शन करणार आहे. म्हणूनच त्यांचा ''महाराष्ट्र भूषण'' म्हणून पुरस्कार देऊन जाहीर सत्कार दक्षिण भारत जैन समाजाने बेळगाव येथे गेल्या वर्षी केला आहे.

नागनाथ अण्णांना आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळालेत. त्यामध्ये लहान मोठ्या सार्वजनिक संस्था आहेत. काही वेळा पुरस्कार मिळाल्यामुळे त्या व्यक्तीची प्रतिष्ठा वाढत असते. पण माझ्या मते नागनाथ अण्णांना दिलेल्या पुरस्कारामुळे पुरस्कार देणाऱ्या संस्थांना प्रतिष्ठा लाभली आहे. नागनाथ अण्णा हे आपल्या सामाजिक कार्याने असामान्य आहेतच पण त्यांना दिलेल्या पुरस्कारामुळे त्या संस्थाही मोठ्या झाल्या आहेत.

धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी नागनाथ अण्णांनी आंदोलनाद्वारे केलेले कार्य ऐतिहासिक असे आहे. त्यांनी पुनर्वसनाच्या कालबाह्य कायद्यात बदल करुन नवीन कायदा पास करणेस शासनास भाग पाडले. निर्वाह भत्ता प्रकल्पग्रस्तांना दिल्याशिवाय आंदोलन मागे घेतले नाही. महाराष्ट्र राज्य धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त संग्राम संघटनेचे अध्यक्ष म्हणून नागनाथ अण्णांचे कार्य अविस्मरणीय असे आहे.

फेब्रुवारी २००४ मधे शेतकऱ्यांना पाण्याच्या पंपावरील वीजदरवाढ असह्य झाली होती. त्यासाठी मुंबईच्या मंत्रालयासमोर दहा दिवस ठिय्या आंदोलन नागनाथ अण्णांनी करुन वीजदरवाढ थांबवली. इतर कार्यकर्त्यांबरोबर ठिय्या दिल्यामुळे त्यांचे पाय सुजले तरी त्यांनी शासनाने न्याय जाहीर करेपर्यंत आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष केले होते.

डॉ. बाबूराव गुरव यांनी म्हटल्याप्रमाणे क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचे सारे जीवन हाच मुळी शौर्याचा, धैर्याचा, कर्तृत्वाचा व संघर्षाचा एक उग्रमंगल, दाहक दावाग्नि आहे. नाट्य, रंग, भावनांचा तो अनोखा संगम आहे. भविष्यकाळात असंख्य प्रतिभावंतांना हे जीवन लेखन मोह निर्माण करणार आहे.

आदरणीय नागनाथ अण्णा यांचे समग्र जीवन चरित्र लिहिण्याचा वर्तमान काळातील पहिला मानकरी म्हणून मला सदैव अभिमानच वाटणार आहे आणि वाटत आहे. मातृभक्त



नागनाथ अण्णा यांचे आचार, विचार,जीवन कार्य एवढे प्रचंड आणि विशाल आहे की त्या कार्याचे वर्णन करणे म्हणजेही एक भूषणावह वाङ्मयकृती होणार आहे.

श्री. नागनाथ अण्णा यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना त्यांचे परममित्र श्री. पी. डी. गुणे म्हणतात की, ''तुमच्या रुपाने माझी समाजसेवा करण्याची इच्छा पूर्ण केल्याबद्दल शतश: प्रणाम. माझ्या आयुष्यात महात्मा गांधींच्या नंतर मी पाहिलेला निस्वार्थी आणि समाजाभिमुख आदर्श पुरुष नागनाथ तूच''

पूर्वीच्या बकाऊ वुल्फ कंपनीचे जनरल मॅनेजर व आत्ताच्या क्रुप कंपनीचे प्रतिनिधी श्री. दारा दमानिया श्री. नागनाथ अण्णा यांच्याबद्दल आदराच्या भावना व्यक्त करताना म्हणतात ''अण्णा हे आम जनतेचे नेते आणि अत्युच्च तत्वांचे पालन करणारे व्यक्तिमत्त्व असल्यामुळे त्यांचे जीवनात हुतात्मा सहकारी कारखान्याचे सर्वोत्कृष्ट साध्य त्यांनी मिळविले आहे. आम्ही स्वत:ला भाग्यवान समजतो की, आम्हाला आमच्या जीवनात अण्णांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या सानिध्यात येण्याचा विशेषाधिकार प्राप्त झाला. कारण त्यांनी आपल्या जीवनात योग्य कारणासाठीच आपल्या सर्वस्वाचा त्याग केलेला आहे.''

असे हे कर्तृत्वसंपन्न महान व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे आचार आणि विचार दीपस्तंभाप्रमाणे जिज्ञासूंना प्रेरणा देत असतात. मा. नागनाथ अण्णांच्या आचार, विचार आणि उच्चारांमधून त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन, परोपकारी मनोवृत्ती, सर्वसामान्यांची कणव दिसून येते सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांसारख्या असंघटित सामान्यांच्या जीवनात आशावादी परिवर्तन त्यांनी घडवून आणले आहे. त्यामुळे वाळवा हे सहकार क्षेत्रातील तीर्थस्थान झाले आहे. त्यांनी सहकार क्षेत्रातील हुतात्मा संकुलाद्वारे शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये मानदंड निर्माण केल्यामुळे ते जरी प्रसिध्दी पराङ्मुख असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुगंध भारतातच नव्हे, आशिया खंडात पसरला आहे. हे ऐकून माझ्यासारखे लेखक, जाणकार कार्यकर्ते, अडलेले गरजू व सर्वसामान्य मार्गदर्शनासाठी त्यांचेकडे दररोज येत असतात व येत आहेत. जसे निसर्गातील सर्वात उंच झाडाची उंची मोजता येत नाही तसेच मा. नागनाथ अण्णांच्या महान व्यक्तिमत्त्वाची उंची मोजता येत नाही. मा. अण्णांनी वाळव्यामध्ये इतिहास घडविला व परिसराचा भूगोल बदलला आहे. मा. अण्णांचे भारताच्या स्वातंत्र संग्रामामधील धाडसी कार्य जसे ऐतिहासिक आहे तसेच स्वातंत्र्यानंतरचे सामाजिक कार्यातील योगदान इतिहासात नोंद करण्या सारखे आहे. म्हणूनच थोर विचारवंत, समाजवादी नेते व प्राध्यापक ग. प्र. प्रधान यांनी चरित्राच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, ''हे त्यागी व झुंझार देशभक्ताचे स्फूतीदायी चरित्र आहे.''

* * * *

# हुतात्मा संकुल परिवार

सन १९८३ साली हुतात्मा किसन अहिर सहकारी कारखान्याची सुरुवात झालेमुळे वाळवा परिसरातील शेतकऱ्यांना शेतीपूरक उद्योग व्यवसायाचे प्रमुख साधन मिळाले होते. लोकांच्या आणि शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन वेगवेगळे उपक्रम हुतात्मा संकुलामध्ये मा. नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या प्रेरणेने वाळवा येथे सुरु झाले. व त्या सर्व संस्था या भागात आदर्श सहकारी संस्था म्हणून मानण्यात येत आहेत.

**हुतात्मा सहकारी बँक -**

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांची आर्थिक गरज वाढली होती. ती गरज पुरी करण्यासाठी हुतात्मा साखर कारखान्याचे कुशल मार्गदर्शक वैभव (काका) नायकवडी यांनी पुढाकार घेऊन हुतात्मा सह. बँकेची स्थापना १५ ऑगस्ट १९९६ रोजी केली. गेल्या सात वर्षात बँकेने गतिमान प्रगती केली असून वाळवा, इस्लामपूर, आष्टा, पुणदी, सांगली, कवठेपिरान, शिराळा, कोल्हापूर, भिलवडी व पलूस या दहा ठिकाणी बँकेच्या संगणकीकृत शाखा कार्यरत आहेत. नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे सांगली कोल्हापूर व भिलवडी येथील शाखा बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्ये आहेत. बँकेच्या सभासदांचा सर्वांगीण विकास व प्रगती या ध्येयास अनुसरुन सभासदांना सोने तारण, ठेव तारण, किसान विकासपत्र तारण, दुभती जनावरांची खरेदी, वाहन खरेदी, घरबांधणी, विहिरींवर पाईपलाईन, जमीन सुधारणा, शैक्षणिक उपक्रम, घाऊक व किरकोळ व्यापारी यासाठी व सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून गंभीर रोगावर औषधोपचारासाठी कर्जपुरवठा केला जातो. संचालक मंडळ कोणत्याही प्रकारचा भत्ता अथवा प्रवासखर्च न घेता काटकसरीचे धोरण राबवून सामाजिक बांधिलकी या नात्याने योगदान देत आहे. बँकेच्या कारभारातील पारदर्शकता, काटकसर, फायद्याची व व्यवहाराची सांगड घालून बँकेने प्रथम वर्षापासून नफा मिळवला आहे. बँकेच्या पारदर्शक कामकाजाबद्दल रिझर्व्ह बँकेचे अधिकारी व सहकार खाते (महाराष्ट्र शासन) अधिकारी यांनी प्रशंसा केली असून प्रथमपासून प्रथम श्रेणी प्रदान केली आहे.

या बँकेचा भक्कम पाया मा. वैभव नायकवडी यांनी घातला व स्व. अरुण (भैय्या) नायकवडी यानी बँकेची सर्वांगीण प्रगती करुन त्यावर सोनेरी कळस चढविला आहे.

सध्याचे चेअरमन मा. किरण (दादा) नायकवडी हे शेतकरी आहेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा काय असतात ते जाणतात. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य त्या कारणासाठी हुतात्मा बँकेच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य होत आहे. ठेविदारांचा विश्वास वाढत आहे व या परिसरामध्ये सहकार क्षेत्रातील एक अग्रणी बँक म्हणून नाव कमविले आहे. हुतात्मा साखर कारखान्याच्या भागधारक शेतकऱ्याच्या आर्थिक गरजा पुरविण्याकडे बँक प्राधान्याने लक्ष देत असते हे या बँकेचे धोरण लोकमान्य झाले आहे.



**हुतात्मा बझार, वाळवे -**

सर्वांचे भूषण आदरणीय क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी यांच्या कृपाछत्राखाली सर्वजण या परिसरात कार्यरत आहेत. याचा सार्थ अभिमान आहेच. कारण अण्णांचे कार्य म्हणजेच स्वच्छ व पारदर्शक व्यवहार हे अविभाज्य अंग आहे. आणि हुतात्मा संकुलातील प्रत्येक घटक हा त्यांच्याशी बांधील आहे. म्हणजेच हुतात्मा बझारची संकल्पनाही त्यांच्याशी निगडीत आहेच व याचीच प्रेरणाज्योत मा. श्री. वैभव (काका) नायकवडी यांच्या रुपाने तेवत आहे. असा आदर्श पुढे ठेवूनच आपणास आपले कार्य करावयाचे आहे.

वाळवा व सभोवतालच्या परिसराचा विकास घडवून, सामाजिक, शैक्षणिक व सहकार या विधायक कार्याला वाहून घेऊन ग्रामीण भागातील जनतेच्या वेळेची, श्रमाची व पैशाची बचत होण्याच्या दृष्टीने तळागाळातील लोकांना उत्तम प्रतीचा स्वच्छ व निर्भेळ, निवडक माल तोही वाजवी दरात उपलब्ध व्हावा या सदभावनेतून मा. श्री. वैभव (काका) नायकवडी यांनी हुतात्मा मध्यवर्ती सह. होलसेल व रिटेल ग्राहक भांडाराची स्थापना वाळवा येथे १९९६ साली केली.

आजच्या लोकराज्यात ग्राहक हाच राजा आहे. व त्याचे समाधान हीच आपली पुंजी व आपल्या यशस्वीतेची पावती आहे. या विश्वासास पात्र राहून संस्थेची यशस्वी घौडदौड चालू आहे. याची प्रचिती संस्थेच्या हितचिंतकांकडून मिळणाऱ्या अभूतपूर्व सहकार्यामुळे संस्थेची प्रगती झपाट्याने होत आहे. याचे प्रतिक म्हणजेच संस्थेची नागठाणे, भिलवडी व गोटखिंडी शाखा होत. मा. वैभव काका यांच्या समर्थ नेतृत्वाखाली सर्व संस्थांचे सेवाकार्य अविरतपणे चालू आहे.

**हुतात्मा सह. दूध उत्पादक संघ वाळवा -**

वाळवा परिसरातील शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाद्वारे आर्थिक साहाय्य मिळावे या उद्देशाने हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखान्याचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. वैभव (काका) नागनाथ नायकवडी यांनी मा. नागनाथ अण्णा यांच्याकडून प्रेरणा घेऊन हुतात्मा सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना १९९७ साली केली. हुतात्मा दूध संघास केंद्र शासनाची मान्यता मिळविणेस त्यांना संघर्षही करावा लागत होता. सुरुवातीला दूध संघास १ लाख लिटर दूध संकलन करण्याची परवानगी मिळाली. हा उद्देश साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील शिराळा, वाळवा, मिरज, तासगाव व पलूस हे तालुके आणि कर्नाटक राज्यातील चिकोडी, रायबाग, अथणी व जमखंडी हे तालुके या दुधाचे कार्यक्षेत्र आहे.

कार्यकारी संचालक, पणन विभाग, दूध शाळा विभाग, लेखाविभाग, गुणनियंत्रण विभाग, भांडार विभाग, पशुखाद्य विभाग, पशुवैद्यकीय विभाग व संगणक विभाग, संकलन विभाग अशी विभागवार कामाची रचना केलेली आहे. दुग्धशाळेची क्षमता १ लाख लिटरची असून अथणी/ वाळवा येथे सह. संस्था व संकलन केंद्रे यांचे मार्फत दूध संकलन केले जाते.

डेअरी विभागातील पॅकिंग कपॅसिटी १० हजार पिशव्यांची आहे. स्टोरेज कपॅसिटी ७५ हजार लिटरची आहे.

पशुवैद्यक विभागाच्या वतीने दूध संघामार्फत दि. १५.८.९९ पासून पशुवैद्यकीय सेवा सुरु केली आहे. या सेवेसाठी तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. या विभागाकडे दोन पदवीधर डॉक्टर्स व पाच पशुधन कार्यवेक्षक कर्मचारी आहेत. संघाचे एकूण कर्मचारी १०१ असून त्यापैकी ५६ कुशल व ४५ अकुशल कामगार आहेत.

संघाला दूध पुरवठा करणाऱ्या संस्थांना दुधाचा मोबदला बिले दर १० दिवसांनी प्रत्येक महिन्याच्या ५,१५,२५ या तारखेस बँकेमार्फत दिली जातात. संकलित केलेल्या दुधाचे माप, टेस्टिंग संगणकाद्वारे केले जाते. हंगामाच्या काळात जादा आलेल्या दुधाचे परिवर्तन करुन पांढरे लोणी व पावडरचे उत्पादन केले जाते,परंतु एकही दिवस संकलन बंद केले जात नाही.

या दूध उत्पादक संघाचे चेअरमन मा. वैभव नायकवडी हे राज्यशास्त्र विषयातील एम.ए. असून त्यांनी विद्यार्थी दशेत उत्तम खेळाडू म्हणून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्टुडंट कौन्सिलचे चेअरमन १९८९-९० साली ते होते. हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचे मार्गदर्शक म्हणून काम पहात असताना त्यांनी इस्त्रायल देशाचा अभ्यास दौरा केला आहे. तसेच त्यांनी सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही काम केले आहे. सध्या हुतात्मा साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन म्हणून काम पहात आहेत. हुतात्मा बँकेचे ते संस्थापक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली हुतात्मा दूध संघाची उत्तरोत्तर प्रगती होत आहे.

**हुतात्मा किसन अहिर सह.सा.कारखाना कामगारांची पतसंस्था,वाळवे -**

या सहकारी संस्थेची स्थापना क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या प्रेरणेतून आनंदराव केशव डुके यांनी दि. २१.३.१९८५ रोजी केली. कामगारांच्या सोयीसाठी कामगार भवन बांधणेसाठी संस्थेस आदरणीय नागनाथ अण्णा यांनी ३८ गुंठे जागा हुतात्मा सहकारी साखर कारखान्याकडून विना मोबदला संस्थेस दिली. त्यामध्ये संस्थेने भव्य असे कामगार भवन व क्रांतिविरांगना लक्ष्मीबाई नायकवडी सभागृह बांधले आहे. कामगारांच्या व सभासदांच्या सोयीसाठी हुतात्मा वस्त्र भांडार नावाचा कापड विभाग दि. २१.९.१९९८ रोजी सुरु केलेला आहे.

हुतात्मा साखर कारखान्याच्या कामगारांच्या आर्थिक गरजा भागविण्यामध्ये ही पतसंस्था प्राधान्य देते. मा. वैभव नायकवडी यांच्या मार्गदर्शनाखाली या पतसंस्थेने कामगारांच्या आर्थिक गरजा तर पुऱ्या केल्या आहेत.

**हुतात्मा किसन अहिर नागरी सह. पतसंस्था, वाळवे -**

हुतात्म्यांचे स्मारक म्हणून आदरणीय क्रांतिवीर नागनाथ(अण्णा) नायकवडी यांनी किसन संस्थेच्या वतीने हुतात्मा किसन अहिर विद्यालय, जिजामाता विद्यालय, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय व हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली आहे. या सर्व संस्थांच्या कर्मचारी वर्गाच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी वरील पतसंस्था सभासद नोंदणी सुरु झाली सुरुवातीला ३३१० इतके सभासद झाले होते. नागठाण्याचे कार्यकर्ते ज्ञानू बाळा जाधव हे सुरुवातीचे मुख्य प्रवर्तक नियुक्त करण्यात आले होते. तसेच आनंदराव केशव डुके हे सेक्रेटरी म्हणून काम पहात होते.

मा. वैभव नायकवडी यांच्या पुढाकाराने व सहकार राज्यमंत्री ना. प्रकाशराव आवाडे यांच्या सक्रिय सहकार्याने या संस्थेस दि. १० सप्टेंबर १९९१ साली नोंदणी पत्र मिळाले. या संस्थेस संपूर्ण सांगली जिल्ह्याचे कार्यक्षेत्र मिळाले असून पतसंस्थेचे संपूर्ण काम संगणकाने होत आहे. मा. वैभव (काका) नायकवडी हे या पतसंस्थेचे संकल्पक, संस्थापक व मार्गदर्शक आहेत. त्यांचे सततच्या प्रेरणेमुळे ही संस्था प्रगतिपथावर जात आहे.

या संस्थेमार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. बँकेच्या पध्दतीने या पतसंस्थेचे दैनंदिन कामकाज चालते. या पतसंस्थेने ठेवीदारांचा विश्वास संपादन करण्यात यश मिळविले आहे.

* * * *



# क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या ८३ व्या वर्धापनदिनी भावसुमन

**क्रां**तिवीरांचे जन्मस्थान / वाळवा ग्राम आहे महान //
**ती**र्थक्षेत्र आहे थोर / हुतात्मा झाले किसन अहिर //
**वी**रपुरूष या देशाचे / वारस हे शाहू, फुल्यांचे //
**र**णी स्वातंत्र्याच्या लढला / साथ दिली क्रांती सिंहाला //
**ना**ही केला कधीही स्वार्थ / वसे देही परमार्थ परमार्थ //
**ग**णती नाही तव कार्याची / त्यागमूर्ती कष्टकऱ्यांची //
**ना**गनाथ नाम तयांचे / वारस हे सहकाराचे //
**थ**रकापे भांडवलशाही / राबविली नित लोकशाही //
**अण्णां**चा वाढदिवस / चिरंजीव होवो हीच आस //
**ना**मी संधी आली निज / करू वंदन त्यांना आज //
**य**ज्ञ कुंडी स्वातंत्र्याच्या / ज्यांनी दिले झोकून लीलया //
**क**ष्ट केले त्यांनी अपार / उभारीला हुतात्मा साखर //
**व**ज्रमूठ असे एकीची / तमा नाही केली कशाची //
**डी**वचणे नाही कोणा / देती धीर सर्व जना //
**चि**रंजीवी किर्ती जयाची / स्फूर्ती आज घेऊ तयाची //
**रा**ष्ट्रप्रेम थोर तयाचे / कनवाळू हे दीनदुबळ्यांचे //
**यु**क्ती शक्ती संगम देही / श्रमिक हितासाठी वाही //
**हो**वो पूर्ण इच्छा त्यांची / साम्यवादी रचनेची //
**त**त्व एक ध्यानी ठेवू / क्रांती ध्वजा हाती घेऊ //

शब्दांकन
**कॉ. काका चौधरी,**
खंडाळा ता. खंडाळा, जि. सातारा


# वंशावळ

**रायाजी**

- **येसाजी** (बोगर पाटील – येलूर)
- **कुशाजी** (वाळव्यास आले)
  - **आप्पाजी**
    - **बाळू**
      - **पिराजी**
        - **नारायण**
          - **जोती**
            - **गणपती**
              - **कृष्णा** (दत्तक गेले)
              - **रामचंद्र** (लक्ष्मीबाई)
                - **नागनाथ** (१५ जुलै १९२२) / **सौ.कुसुमताई** (९ एप्रिल १९३२)
                  - **किरण**– सुपुत्र, शेती; **सौ.सुमन** – सून
                    - **चि. गौरव** – नातू
                    - **कु.प्रतिमा** – नात
                  - **अरुण**– सुपुत्र, एम.एस.सी.(ॲग्री); **डॉ.सुषमा** – सून, एम.एस.सी.,एम.फील.,पी.एच.डी.
                    - **कु.अनुभूती** – नात
                    - **चि.केदारज्योती**– नातू
                    - **चि.अभिजित**– नातू
                  - **वैभव**– सुपुत्र, एम.ए.(राज्यशास्त्र); **सौ.नंदिनी** – सून, बी. कॉम
                    - **चि.विरधवल**– नातू
                    - **कु. मधुरा** – नात
                  - **सौ.विशाखा**– कन्या, एम.एम.बी.एड.; डॉ.सुरेश य.कदन – जावई, एम.बी.बी.एस.
                    - **कु.सुप्रिया** – नात, एम. बी. बी. एस.
                    - **चि.दिग्विजय** – नातू, रशियात मेडिकल शिक्षण घेत आहे
                    - **चि.जयदिप** – नातू
                  - **सौ. प्रगती**– कन्या, एम.ए.; उमाजी गो.पाटील–जावई, एम.ई
                    - **चि.मोहिल**– नातू, बी.ई.(कॉम्प्यूटर–इंजिनिअर).
                - **शामराव** मयत ४.७.१९९०(वंश संपला) / **हौसाबाई** (काकी)
              - **चंद्रोजी** (निवृत्ती)
              - **ईश्वरा** (यशवंत)
      - **शिवाजी**
      - **जोती**
      - **केदारी**
      - **लिंबाजी**



# हस्ताक्षर



१५ जुलै १९२२.............. सौ. लक्ष्मीबाई व रामचंद्र नायकवडी या माता पित्यांच्या पोटी वाळवा जि. सांगली येथे जन्म.
१९२२ ते १९४२............ वाळवा येथे प्राथमिक शिक्षण, आष्टा व कोल्हापूर येथे माध्यमिक शिक्षण राजाराम हायस्कूल, कोल्हापूर.
१९३० .......................... क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सभांमध्ये हजर.
१९३९ .......................... रयत शिक्षण संस्थेचे ए.डी. अत्तार बॅ.पी.जी.पाटील भेट त्याच वर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा परिचय.
१९४० .......................... सखाराम मुकादम, वाय.सी.पाटील, बापूजी साळूंखे, बी.एल.गायकवाड यांच्या सहकार्याने व्हॉलंटरी शाळा सुरु.
मे १९४०....................... कामेरी येथे विद्यार्थी परिषद.
७-८ ऑगस्ट १९४२........ मुंबईस अ.भा.काँ.कमिटीच्या ऐतिहासिक अधिवेशनास उपस्थिती.
१ नोव्हेंबर १९४२ ........... हत्यारे आणण्यास गोव्याची यशस्वी मोहीम.
७ जून १९४३ ................. शेणोली पे ट्रेन लुटली.
१४ एप्रिल १९४४ ........... धुळे खजिना लुटला.
२९ जुलै १९४४ ............. फितुरीमुळे वाळवा येथे अटक.
१० सप्टेंबर १९४४ .......... सातारा जेलच्या अभेद्य भिंतीवरुन उडी घेऊन भूमिगत.
२६ जानेवारी १९४५ ........ ऐतवडे बु।। येथील पोलीस छाप्यातून पोलीसांना गुंगारा देऊन भूमिगत.
नोव्हें.,डिसेंबर १९४५......... ढगेवाडी, थावडे स्वातंत्र्यसैनिकांची प्रशिक्षण केंद्र सुरु .
२५ फेब्रुवारी १९४६ .......... अण्णांचे साथीदार किसन अहिर, नानकसिंग सोनवडे येथे पोलीस गोळीबारात हुतात्मा.
२२ मे १९४६ ................. ऐतवडे बु।। येथे बाबूराव कोकाटे व प्रताप पाटील हुतात्मा झाले.
१९४६ .......................... साथी एस.एम.जोशी व जयप्रकाश नारायण यांचे समाजवादी पक्षात येण्याचे आवाहन.
२७ नोव्हेंबर १९४८ ......... कर्मवीर भाऊराव पाटील यांना सातारा येथे विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून एक लाख रुपयांचा निधी अर्पण.
१९४९ .......................... पुन्हा शिक्षणास सुरुवात, मॅट्रिक पास.
किसान शिक्षण संस्थे द्वारा हुतात्मा किसन अहिर विद्यालयाची वाळवे येथे स्थापना.
१३ फेब्रुवारी १९४९.......... सावंतपुरच्या यशवंत गोविंद कदम यांची सुकन्या कुसुमताई बरोबर साध्या पध्दतीत कोल्हापूर येथे विवाह.



१९५२ .......................... विधानसभेच्या निवडणुकीत अपयश.
मे १९५२........................ जुनेखेड लेव्ही विरुध्द आंदोलन.
१९५७........................... विधानसभेवर निवड.
जून १९६२....................... हुतात्मा किसन अहिर विद्यालयात तंत्र - शिक्षणाची सोय.
जून १९६३ ...................... जिजामाता विद्यालयाची स्थापना.
जून १९६५ ..................... सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहाची स्थापना.
२५ फेब्रुवारी १९७१............ हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्याचे अनावरण.
ना. यशवंतराव चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील,
कॉ. दत्ता देशमुख यांच्या उपस्थितीत.
१९७१ ते ७५................. वाळवा ते इस्लामपूर रस्त्यासाठी साराबंदी चळवळ.
१९७३ .......................... शेतकऱ्यांनी ॲम्बेसिडर गाडी भेट म्हणून दिली.
१९७५ ते १९८१............. दिल्लीत मुक्काम करुन कारखाना मान्यता मिळवण्यासाठी संघर्ष व यश.
१३ नोव्हेंबर १९८०........... कृषी मंत्री राव विरेंद्रसिंग बरोबर सकाळी बैठक कृषी भवन दिल्ली.
२६ मार्च १९८१................ हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्यास मंजूरी.
२९ जानेवारी १९८४.......... हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याचा पहिला चाचणी गळीत हंगाम सुरु.
ऑगस्ट १९८४................. वारणा धरण संग्राम संघटनेची स्थापना.
१९८५ .......................... वाळवा मतदारसंघातून विधानसभेवर अपक्ष म्हणून निवड.
२६ मे १९८५.................. ऐतवडे बु ।। शेतकऱ्यांची विराट परिषद .
जून १९९५..................... सोनवडे हुतात्मानगर येथे हुतात्मा नानकसिंग विद्यालय व किसन अहिर वसतिगृहाची स्थापना.
१९८६........................... साखर उतारा वाढीसाठी अभ्यास व सातत्याने १३ वर्षे सलग साखर उताऱ्यात आशिया खंडात प्रथम .
१९८८........................... कोयना धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना.
२९,३०,३१ ऑक्टोबर १९८८.... तिसरे अखिल भारतीय दलित आदिवासी साहित्य संमेलन.
३१ ऑक्टोबर १९८८....... पत्नी समवेत रशिया दौरा.
२७ जून १९८९............... क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी मातोश्रींचे दु:खद निधन.
१९८९-१९९१............... कराड लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीत अपयश.
जून १९९२...................... क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाची स्थापना.
२५फेब्रुवारी१९९३............. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडलेमुळे धर्मांध शक्ती विरोधी मानवी साखळी.
२६ मे १९९३.................. किणी येथे कष्टकरी शेतकऱ्यांची भव्य परिषद.
११ जुलै १९९३............... आटपाडी येथे भव्य पाणी परिषद.
३० सप्टेंबर १९९३........... किल्लारी भूकंपामुळे अनाथ झालेल्या १११ मुलांना दत्तक घेतले.

३० सप्टेंबर १९९४......... पुणे विद्यापीठाला छ.शाहूंचे नाव देण्याबद्दल मुंबई सचिवालयावर मोर्चा.

२६ जुलै १९९५.............. १३ दुष्काळी तालुक्यातील ८० हजार शेतकऱ्यांची आटपाडी पाणी परिषद.

२० ते २२ जाने.१९९६..... चौथे दलित आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलन.वाळवा

३ मार्च १९९६............... महाराष्ट्र धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त संग्राम संघटनेच्या अध्यक्षपदी निवड.

मे १९९६ ..................... तिसऱ्यांदा कराड लोकसभा निवडणूक लढवली. यावेळी तिरंगी लढत.

२६ जुलै १९९६ ............ आटपाडी पाणी परिषद.

५ नोव्हेंबर १९९६........... प्रकल्प व धरणग्रस्तांचा मुंबई येथे मंत्रालयावर मोर्चा.

२१ मे १९९७................. तासगाव येथे १३ तालुक्यांची पाणी परिषद.

१३ डिसेंबर १९९७......... साखर कामगार व शेतकऱ्यांची संयुक्त परिषद.

२९ डिसेंबर १९९७ ......... सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणग्रस्तांचे ठिय्या आंदोलन.

२६ जुलै १९९८............. आटपाडी पाणी परिषद.

३० ऑक्टोबर१९९८........ आर.पी.आय.खासदारांना टाटा सुमो गाडी कोल्हापूर येथे प्रदान.

६ डिसेंबर १९९८ .......... हुतात्मा दैनिकाची मोहीम सुरु.

१७ मार्च १९९९............. दुष्काळग्रस्त व धरणग्रस्तांचा शिवाजी पार्क मंत्रालय भव्य मोर्चा.

२७ मे १९९९................ खासदार फुलनदेवी (उ.प्र) यांच्या हस्ते वाळवा येथील सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन.

२८ जुलै १९९९.............. आटपाडी येथे १३ दुष्काळी तालुक्यांची भव्य पाणी परिषद.

२६-२७ फेब्रु.२०००...... दुसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनास उपस्थिती.

२६ मार्च २०००............. साखर कामगार, शेतकरी भव्य परिषद, वाळवा.

१ मे २००० ................ }
२६ जून २०००............ } तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यातील जनतेचा भर पावसात सांगली कलेक्टर कचेरीवर मोर्चा.

१ नोव्हेंबर २०००........... खाजगी वाहनचालकांची परिषद किणी, जि.कोल्हापूर.

२० ते २८ डिसें.२०००.... वारणा धरणाच्या भिंतीवर ऐतिहासिक लढा, शासनास धरणग्रस्तांना देण्यास ८ लाख रुपये उसनवार दिले

२०-२१ जाने २००१..... औरंगाबादच्या तिसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनास उपस्थिती.

४ एप्रिल २००१.............. आटपाडी तालुक्यातील दुष्काळग्रस्तांचे ठिय्या आंदोलन.

१४ मे २००१................ क्रांतिवीर नगर ता. माण जि. सातारा नामकरण.

१५ जुलै २००१............. ८० वा भव्य वाढदिवस समारंभ वाळवा येथे.

२६ जुलै २००१............ सातारा, सांगली, सोलापूर जिल्ह्यामधील १३ दुष्काळी तालुक्याची पाणी परिषद आटपाडी.



१९ ऑगस्ट २००१.......... आयकर विरोधात केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे पाटील यांचे समोर सांगलवाडी-सांगली येथे निदर्शन, पोलीस लाठीमार, धक्काबुक्की मंत्र्यांनी समक्ष येऊन माफी मागितली.

३० सप्टेंबर २००१........... आयकर विरोधी भव्य परिषद, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मैदान, कोल्हापूर.

२७ ऑक्टोबर २००१........ क्रांतिवीर नागनाथ नायकवडी नगर ता.खटाव जि.सातारा बौध्दविहार भूमिपूजन.

२१जानेवारी२००२........... वीज दर वाढ विरोधी मोर्चा, कोल्हापूर.

९-१० फेब्रुवारी २००२........ विद्रोही साहित्य संमेलन, सातारा.

२६ मे २००२ ................. बुध्द पौर्णिमा, दादासाहेब गायकवाड जन्म शताब्दी वर्ष, पहिली परिषद हुतात्मानगर.

२६ जुलै २००२............... १३ दुष्काळग्रस्त तालुक्यांची परिषद, आटपाडी.

२२ सप्टेंबर २००२.......... गुजरात मुस्लीम हत्याकांडविरोधी विद्रोही सांस्कृतिक चळवळ मेळावा, पुणे. महात्मा फुले यांच्या घराच्या मैदानामध्ये - अध्यक्ष.

१० ऑक्टोबर २००२........ जंगल जमिनीत अतिक्रमण कायम करणेबद्दल मंत्रालयावर मोर्चाचे नेतृत्व, मुंबई. कर्मवीर दादासाहेब गायकवाड समिती तर्फे.

५ डिसेंबर २००२............. सरकारी दूध कर्मचारी प्रश्नांवर राज्य व्यापी परिषद वाळवा.

८ फेब्रुवारी २००२ ........... विद्रोही साहित्य संमेलन अध्यक्ष, सावंतवाडी.

२६ जुलै २००३............... १३ दुष्काळग्रस्त तालुक्यांची पाणी परिषद आटपाडी.

१७ नोव्हेंबर २००३.......... माण तालुका दुष्काळग्रस्त ठिय्या आंदोलन यशस्वी समाप्ती कार्यक्रमाचे अध्यक्ष दहिवडी.

१९-२०जाने.२००४......... दुष्काळग्रस्त व धरणग्रस्तांचे अभूतपूर्व ऐतिहासिक यशस्वी ठिय्या आंदोलनाचे नेतृत्व, कृष्णाखोरे विकास मंडळ, पुणे.

२० मे. २००४ ................ सांगली मतदार संघातून १४ व्या लोकसभेची निवडणूक लढवली पण अपयश.

२६ जुलै २००४ ............. आटपाडी पाणी परिषद.

१५ जुलै २००७ .............. ८६ व्या वर्षात पदार्पण प्रसंगी मा.अण्णांच्या चरित्र पुस्तकाचे प्रकाशन, वाळवा.

## क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांचा उल्लेख केलेली ग्रंथसंपदा.

| अ. नं. | पुस्तकाचे नाव (प्रकाशन ता.) | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १) | उजळती प्रकाश रेखा (३ ऑगस्ट १९९९) | डॉ. बाबूराव गुरव | क्रांति वैभव प्रकाशन, हणमंत वडिये |
| २) | क्रांतिवीर–किसन वीर | भा.वि.धर्माधिकारी | विश्वकर्मा प्रकाशन, सातारा |
| ३) | महाराष्ट्र अॅन्ड इंडियन फ्रीडम स्ट्रगल (डिसें.१९८५) | के. के. चौधरी | एस.के.सागल,डीजीआयपीआर गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र |
| ४) | सातारचा सिंह (१५ ऑगस्ट १९८६) (३ ऑगस्ट २००२) | राघव शिवणीकर | एस. एम. अधाटे, ४ विजय हौसिंग सोसायटी पुणे – ४११०१६ |
| ५) | सातारचे प्रतिसरकार (मे १९८८) | ल.ग.कुलकर्णी | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ. |
| ६) | जीवन संग्राम (डिसेंबर १९८३) (जून १९८४) | सा.बा.सनदे | -------''------ |
| ७) | मी दत्तूचा 'दत्ता' झालो त्याची गोष्ट | कॉ.दत्ता देशमुख | ग. रा. तांबोळी, कॉ.दत्ता देशमुख पुरोगामी विचारमंच, ८५२ वी सुभाष रोड, कोल्हापूर. |
| ८) | क्रांतिसिंह नाना पाटील (१९८३,२००३) | डॉ.जयसिंगराव पवार | रिया पब्लीकेशन, रॉयल पॅलेस टाकळा राजारामपुरी,कोल्हापूर. |
| ९) | मराठी माणसं (३० जुलै१९९८) | डॉ.दिनकर पाटील | किर्ती प्रकाशन, शांताबाई १०४२ जनता बँक कॉलनी, कोल्हापूर– ४१६०१२ |
| १०) | इच्छापूर्ती (१८एप्रिल १९९९) | सौ.कुसुमताई नायकवडी | किर्ती प्रकाशन, शांताबाई १०४२ जनता बँक कॉलनी, कोल्हापूर– ४१६०१२ |
| ११) | कर्मवीर भाऊराव पाटील (१९८२) | मा.भि.काटकर | सौ.सरोजनी, मा.काटकर, रयत सावली,९ ब,केसकर पेठ,सातारा |
| १२) | दोन दिव्य तारे (२५फेब्रुवारी१९७१) | वि.चामुंडराय | जयवंत अहिर हु.कि.अ.स्मारक समिती, वाळवा. |
| १३) | क्रांतिपर्व (२ ऑक्टोबर १९८७) | डॉ.उत्तमराव पाटील | डॉ.हेमंत भा.देशमुख,लोकमानस साप्ताहिक, दोंडाईचा (धुळे) |
| १४) | वसंतदादा पाटील (१९८६) | भालचंद्र वि. धर्माधिकारी | सौ.सुमती धर्माधिकारी विश्वकर्मा प्रकाशन, सातारा. |
| १५) | या गरिबांनो या, झेंडा हाती घ्या.(२५फे ब्रु.९६) | डॉ.भारत पाटणकर | वसंतराव पवार, वाळवा |
| १६) | एक दृष्टीक्षेपात क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी | डॉ.भारत पाटणकर | क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती,वाळवा |
| १७) | मंतरलेले दिवस | ग.दि.माडगूळकर | |
| १८) | क्रांतिसागर (मकर संक्रांत २००४) | प्रा.डॉ.पी.बी.पाटील | शांतिनिकेतन प्रकाशन,सांगली |
| १९) | राजमती पाटील–बिरनाळे एक क्रांतिकारी, ३१ जानेवारी २००४ | डॉ.सौ.पद्मजा पाटील | डॉ.एम.जी.ताकवले मालती प्रकाशन, माणगाव |
| २०) | कोकरुड ते बर्मिगह्याम | प्रा.ए.डी.अत्तार | सौ. लांडे श्रीरामपूर |
| २१) | उद्योगरत्न | प्रा.दिनगर पाटील, सौ.शकुंतला पाटील | कीर्ती प्रकाशन |

* * * *

# क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी पुरस्कार सुची

१९९३.................. श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील ट्रस्ट नेमिनाथ नगर, सांगली.
**स्व. नेमगोंडादादा पाटील जनसेवा पुरस्कार १९९३**

७.६.१९९८........... दक्षिण भारत जैन सभा सांगली, ७८ वे अधिवेशन रुकडी ता. हातकणंगले.
**डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील समाज सेवा पुरस्कार**

१९९८.................. राजर्षी शाहू महाराज समाज विकास संस्था, पुणे
**राजर्षी शाहू महाराज पुरस्कार ९८ - मानपत्र**

९.१२.१९९९......... म. ज्योतिबा फुले सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा प्रतिष्ठान पुसेगांव, ता. खटाव, जि. सातारा.
**फुले आंबेडकर सामाजिक कृतज्ञता पुरस्कार**

१९९९.................. ॲड. रंगनाथ डोळस युगांतर प्रतिष्ठान नाशिक,
**कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार**

२३.१.२०००......... जयहिंद मित्रमंडळ, विडणी ता. फलटण, जि. सातारा.
**नेताजी सुभाषचंद्र बोस गौरव पुरस्कार**

२१.५.२०००......... जैन युवा ग्रुप, निपाणी- **अरिहंत पुरस्कार २०००**

१०.६.२००१......... अध्यक्ष व समस्त धनगर समाज बांधव- **प्रतिशाहू पुरस्कार**

१९.८.२००१......... क्रांतिसिंह नाना पाटील जन्मशताब्दी समिती, विटा, जि. सांगली
**क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार २००१**

१२.३.२००२......... संजय पाटील स्मारक लोकसेवा प्रतिष्ठान,संकेश्वर, जि.बेळगांव
**हरिश्चंद्र-तारामती गौरव पुरस्कार २००२**

२३,२४.३.२००२...... बुध्द, फुले, आंबेडकर जागतिक साहित्य संमेलन आयोजक समता विचार मंच कल्याण- **सन्मानचिन्ह व**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर रत्न पुरस्कार.**

२८.५.२००२............. भाई माधवरावजी बागल विद्यापीठ, कोल्हापूर
**भाई माधवरावजी बागल पुरस्कार २००२**

२८.८.२००२............ कॉ. व्ही. एन. पाटील स्मृती जीवनगौरव पुरस्कार
**जीवन गौरव पुरस्कार**



२७.१०.२००२.......... रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आयोजीत लोकराजा छ. शाहू महाराज आरक्षण शताब्दी महोत्सव
**मानचिन्ह व रिपब्लिक मित्र पुरस्कार**

२८.११.२००२.......... लोकशाहीर पुंडलीक फरांदे प्रतिष्ठान, सातारा
**शाहीर फरांदे पुरस्कार**

२००२...................... समता विचार मंच आयोजित बुध्द, फुले, आंबेडकर जागतिक साहित्य संमेलन कल्याण- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर रत्न पुरस्कार**

२००२...................... सेवाभूमी विकलांग विकास आणि पुनर्वसन संस्था, लातूर
**कै. लक्ष्मीबाई मगर भूमिपुत्र पुरस्कार**

१४.५.२००३............. ट्रस्टी, पदाधिकारी अमृत महोत्सव समिती श्री १००८ नेमिनाथ दिगंबर जैन मंदिर, शाहुपुरी कोल्हापूर
**भ. नेमिनाथ पुरस्कार २००२-२००३**

१०.१०.२००३.......... दक्षिण भारत जैन सभा, बेळगाव- **महाराष्ट्र गौरव पुरस्कार**

२००३...................... आधार सामाजिक विकास संस्था, कागल जि.कोल्हापूर
**समाज भूषण पुरस्कार**

४.१.२००४.............. आनंदराव पाटील प्रतिष्ठान, पुणे, चिकोत्रा खोरे विकास मंच, महिला व शेतकरी मेळावा- **चिकोत्रा भूषण पुरस्कार**

................................ स्थापत्य विशारद, अर्थतज्ज्ञ आर.जी.गांधी श्रमण संस्कृती साधनापीठ पुरस्कृत, सामाजिक योगदानाबद्दल
**समाजभूषण पुरस्कार**

................................ नारायण मेघाजी लोखंडे प्रतिष्ठान,पुणे- समाज वैभव पुरस्कार

१२.५.२००५............ जय भवानी तरुण मंडळ, पिपरी चिंचवाड शहर, पुणे
**जीवन गौरव फुले-शाहु-आंबेडकर लोकमान्य पुरस्कार**

३.२.२००६............... नरवीर उमाजी नाईक समाज सुधारक मंडळ, महाराष्ट्र राज्य
**आद्य क्रांतिवीर उमाजीराव नाईक पुरस्कार**

२७.७.२००६............ लोकराजा राजर्षी शाहू महाराज फाऊंडेशनच्या वतीने
**शाहू महाराज पुरस्कार**

२०.८.२००६............ रयत सेवा कृषि उद्योग सहकारी संघ व स्व. एस्. आर. पाटील विकास ट्रस्ट कोल्हापूर
**स्व. एस्. आर. पाटील सहकार प्रेरणा पुरस्कार**

७.१०.२००६........... दै.जागृत लोकनेता व लोकनेता फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने
**लोकनेते पुरस्कार**

५.११.२००६........... जैन फाऊंडेशन, सांगली
**प्रथम राष्ट्रीय पुरस्कार**

१४.५.२००७........... दे.भ. दादासाहेब साखळकर स्मृत्यर्थ
**सामाजिक कृतज्ञता पुरस्कार**


२६.५.२००७........... महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे.''कै.नरुभाऊ लिमयेस्मृर्ती''
**आर्यभूषण पुरस्कार**

३.६.२००७............. महाराष्ट्र पत्रकार संघ
**राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार**

या पुरस्काराशिवाय मा. नागनाथ अण्णा यांना स्मृतिचिन्हे, मानपत्रे, सन्मानपत्रे, गौरवचिन्हे वेगवेगळ्या संस्थांनी देऊन सन्मान केला आहे.



# हुतात्मा साखर कारखाना कार्यक्षेत्र नकाशा



# किसान शिक्षण संस्था (शाखा) नकाशा

